TEXT FLY
WITHIN THE
BOOK ONLY

THE BOOK WAS
DRENCHED

UNIVERSAL
LIBRARY
OU_196083
UNIVERSAL
LIBRARY

ॐ

केनोपनिषत्

(द्वैताद्वैतभाष्यभाषांतरांसह.)

संपादक,

चिंतामण गंगाधर भानु, बी. ए.

प्रकाशक,

दामोदर सांवळाराम आणि मंडळी,

प्रिं., पब्लिशर्स, एजंट्स् इत्यादि, ठाकुरद्वार–मुंबई.

सन १९१२ इ.

या पुस्तकासंबंधानें सर्व हक्क प्रकाशकांनीं आपणाकडे राखून ठेविले आहेत.

किंमत १ रुपया.

पुस्तक घर नं. ४३४, ठाकुरद्वार रोड–मुंबई येथें 'इंदुप्रकाश' छापखान्यांत
रा. रा. दामोदर सांवळाराम यंदे यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

प्रस्तावना.

केनोपनिषद् हें सामवेदांतील आहे. या वेदांतील तलवकार अथवा जैमिनीय शाखेंत हें उपनिषद् अंतर्गत झालें आहे. ही शाखा व विशेषतः या शाखेंतील ब्राह्मणें फारशीं उपलब्ध नाहींत. असो; या उपनिषदाला तलवकार उपनिषद् असें पूर्वी म्हणत असत. पण पुढें, 'केन' या पदानें या उपनिषदाचा प्रारंभ होतो म्हणून त्याला 'केनोपनिषद्' हें नांव प्राप्त झालें. ह्या उपनिषदांत चार खंड आहेत. पैकीं पहिल्या दोन खंडांमध्यें सगुण आणि निर्गुण ब्रह्माचें साम्र वर्णन आहे. हें वर्णन छंदोबद्ध आहे. दुसऱ्या दोन खंडांमध्यें ब्रह्माचा आणि देवांचा परस्पर संबंध काय आहे, देवांचें सर्व सामर्थ्य ब्रह्मापासून कसें निष्पन्न होतें, ब्रह्मज्ञान झालें असतां श्रेष्ठत्व कां प्राप्त होतें, किती प्रकारानें ब्रह्माची उपासना करावी, ब्रह्मज्ञानाला आरंभ करण्यापूर्वी कोणती सामग्री सिद्ध केली पाहिजे आणि ब्रह्मज्ञानाचें फल काय, इत्यादि गोष्टींचा विचार केला आहे.

या उपनिषदाची भाषा संहितेंतील भाषेप्रमाणें आहे. पहिल्या दोन खंडांतील पद्यावरून असें वाटूं लागतें कीं, ज्या वेळीं हें उपनिषद् दृश्य झालें त्या वेळीं ऋषींचा अधिकार पूर्ण वेदांत समजून घेण्याइतक्या योग्यतेचा झाला होता. सगुण ब्रह्माची उपासना करून मग श्रवण–मननादि साधनांनीं चिंतन करावें व मग निर्गुण परब्रह्माचें स्वरूप बुद्धीस अगोचर आहे असें समजून घ्यावयाचें आणि नंतर सर्व उपाधींचा त्याग क्रमाक्रमानें करून आपण स्वतः ब्रह्मरूप व्हावयाचें. हें समजून घेण्याचा अधिकार तत्कालीन ऋषींस प्राप्त झाला होता. पण शेवटच्या दोन खंडांत सामान्यतः सगुण ब्रह्माचें वर्णन गाथारूपानें अथवा गद्यरूपानें केलें आहे. येथील भाषा व विषय–वर्णनाची पद्धति अतिशय साधी असून सहज समजण्यासारखी आहे.

वैदिक ग्रंथाचा अभ्यास करणाऱ्या पंडितांस हें सांगावयास नकोच कीं, सामवेद हा प्रायः ऋग्वेदच आहे. सामवेद संहितेंतील १५४९ सूक्तांपैकीं, पंचाहत्तर सूक्तें वजा केलीं असतां बाकीचीं सर्व सूक्तें ऋग्वेदांतून घेतलीं आहेत. असो; सामवेद संहितेंतील ऋऋंत्रांपासून असा एक अकारण लाभ होतो कीं ऋग्वेदांतील सूक्तांचे व ऋचांचे पाठ ठरविण्याचें काम सामवेदांतील पाठ–पाठांतरांनीं सुलभ होतें.

सामवेदांतील सूक्तांचा उपयोग यज्ञाचे विधि चालले असतां गायनरूपानें होतो. विशेष यज्ञ व यज्ञांतील विशेष विधि चालूं केले म्हणजे सामवेदांतील सूक्तें अथवा सामें गावयाचीं, असा पूर्वीपासूनचा संप्रदाय आहे. हीं सामें कशीं म्हणावीं याचे नियमहि बांधलेले आहेत. त्यांवरून असें दिसतें कीं गायनकलेचा उत्कर्ष या वेळींही बराच झाला होता. सामें म्हणणाऱ्या ऋत्विजांस उद्गाते असें म्हणत असत.

होता, अध्वर्यु, उद्गाता आणि ब्रह्मा असे मुख्य चार ऋत्विज् असतात. यांच्या हाताखालीं तीन तीन उपऋत्विज् असतात. हे सर्व मिळून सोळा ऋत्विजांचा समुदाय होतो. सदस्य या नांवाचा एक सतरावा ऋत्विज् असतो. त्याच्याकडे उपद्रष्ट्याचें म्हणजे सर्व विधि बरोबर चालले आहेत कीं नाहीं हें पाहण्याचें काम असतें. यावरून यज्ञामध्यें चारी वेदांचा उपयोग असतो, हें स्पष्ट होईल. होत्यानें ऋग्वेदांतील मंत्र म्हणावे, अध्वर्यूनें यजुर्वेदांतील (यजु) म्हणून यजन करावें, साम म्हणून सामवेदी उद्गात्यानें गायन करावें, अशीं पूर्वी तीन वेदांचीं तीन निरनिराळीं कामें होतीं. वेदत्रयी अथवा त्रैविद्या असे शब्द वैदिक ग्रंथांतून आढळतात त्याचें तात्पर्य हें आहे कीं पूर्वकाळीं तीन वेदांच्या साहाय्यानें यज्ञादि कर्मे होत असत. नंतर कांहीं कालानें अथर्ववेदाची संहिता उपलब्ध झाली, तेव्हां त्या वेदाचाही अंतर्भाव यज्ञकर्मांत होऊं लागला. या वेदांतील ऋत्विजाचें काम ब्रह्मयाचें होतें. म्हणजे यज्ञामध्यें कांहीं अप्रयोग होतात कीं काय, झाल्यास शांति वगैरे कशी करावयाची, पिशाचें, राक्षस इत्यादि भूतगणांचा नाश कसा करावयाचा, प्रायश्चित्तें कशीं द्यावयाचीं, इत्यादि ठरविण्याचीं कामें या ब्रह्मयाकडे असत.

असो. या उपनिषदांत एकंदर चवतीस मंत्र आहेत. पहिल्या खंडांतील आठ मंत्रांत उपास्य वस्तु सगुण असते म्हणून तें परमार्थी परब्रह्म नव्हे; परब्रह्म हें ज्ञानाच्या पलीकडे म्हणजे ज्ञानाला अगोचर आहे असें सांगितलें आहे, दुसऱ्या खंडांतील पांच मंत्रांत निर्गुण ब्रह्माची प्राप्ति म्हणजे काय, ब्रह्मज्ञ कोणाला म्हणावें आणि ब्रह्मज्ञान झाल्यापासून फलप्राप्ति काय होते, या विषयांचें विवेचन केलें आहे. वर सांगितल्याप्रमाणें तिसऱ्या खंडांतील बारा मंत्रांत ब्रह्माचें सर्वश्रेष्ठत्व, देवांचें दुर्बलत्व इत्यादि विषयांचें वर्णन आहे आणि चवथ्या खंडांत देवांचा अभिमान विगलित झाल्यावर त्यांना सद्गुरु-मुखानें ब्रह्मज्ञान कसें झालें, हें ज्ञान झाल्यावर त्यांस श्रेष्ठत्व कसें प्राप्त झालें, उपासना-मार्गापैकीं दैवी, आध्यात्मिक आणि नामोपासना हे मार्ग कसे आहेत, हें सांगून शेवटीं ब्रह्मविद्येची प्रतिष्ठा काय, तिचीं अंगें कोणतीं आणि तिचें वसतिस्थान कोणतें, यांचें निदर्शन केलें आहे. शेवटच्या मंत्रांत म्हणजे आठव्या मंत्रांत ब्रह्मज्ञान-विज्ञान झालें असतां कोणतें फल प्राप्त होतें हें सांगून उपनिषदाची समाप्ति केली आहे.

यावरून या उपनिषदांतील विषय परम कल्याणाचे आहेत हें वाचकांच्या लक्षांत येईल.



विषयाची अनुक्रमणिका.

—:*0*:—

मंत्र.	विषय.	शंकराचार्य.	शंकराचार्य.	रामानुजाचार्य.	मध्वाचार्य.	दयानंद.	विवरण.
	खंड पहिला.						
१	सर्वप्रेरक कोण?	८	८१	१४७		१८६	२२१
२	सर्वप्रेरक ब्रह्म आहे.	१२	९०	१४९		१८७	२२३
३—८	तें इंद्रियांस अगोचर असून व उपाधिशून्य असून सर्वांचें प्रेरक मात्र आहे.	१९	९४	१५१	१७१	१८९	२२५
	खंड दुसरा.						
१—३	निर्गुण ब्रह्म अज्ञेय आहे.	३२	१०५	१५२		१९६	२२९
४—५	ब्रह्मज्ञान म्हणजे काय? तें कसें होतें आणि त्याचें फल काय?	४३	११३	१५६	१७५	१९९	२३४
	खंड तिसरा.						
१—११	ब्रह्माचें सर्वप्रेरकत्व व अग्न्यादि देवांचें दुर्बलत्व, त्यांचा अभिमान आणि या अभिमानाचा निरास.	५२	११८	१५८	१७७	२०२	२३७
१२	उमेचें (ब्रह्मविद्येचे) मूर्तिमंत अवतरण.	६१	१४०	१६०		२१२	२४१
	खंड चवथा.						
१	ब्रह्मज्ञानाचा उपदेश.	६३	१४१	१६१		२१३	२४२
२—३	ब्रह्मज्ञानानें प्राप्त होणारें श्रेष्ठत्व.	६४	१४१	१६२		२१३	२४३
४	आधिदैवी उपासना.	६५	१४१	१६३		२१५	२४४
५	आध्यात्मिक उपासना.	६७	१४३	१६५	१८०	२१६	२४५
६	नामोपासना.	६९	१४४	१६६		२१७	२४५
७	उपनिषदांचें स्वरूप.	७०	१४४	१६७		२१७	२४६
८	ब्रह्मविद्येची सामग्री.	७५	१४५	१६८		२१८	२४७
९	ब्रह्मविद्येनें प्राप्त होणारें फल (मोक्ष, ब्रह्मस्थिति).	७८	१४५	१६९		२१९	२४८
	उपसंहार.						२४९
	सूचि.						२७३

केनोपनिषत्

श्रीमच्छंकरभगवत्पादविरचितभाष्योपेता ।

आचार्यांची प्रस्तावना.

ॐ तत्सद्ब्रह्मणे नमः ।

केनेषितमित्याद्योपनिषत्परब्रह्मविषया वक्तव्येति नवमस्याध्यायस्याऽऽरम्भः । प्रागेतस्मात्कर्माण्यशेषतः परिसमापितानि समस्तकर्माश्रयभूतस्य च प्राणस्योपासनान्युक्तानि कर्माङ्गसामविषयाणि च । अनन्तरं च गायत्रसामविषयं दर्शनं वंशान्तमुक्तं कार्यं सर्वमेतद्यथोक्तं कर्म च ज्ञानं च सम्यगनुष्ठितं निष्कामस्य मुमुक्षोः सत्त्वशुद्धयर्थं भवति । सकामस्य तु ज्ञानरहितस्य केवलानि श्रौतानि स्मार्तानि च कर्माणि दक्षिणमार्गप्रतिपत्तये पुनरावृत्तये च भवन्ति । स्वाभाविक्या त्वशास्त्रीयया प्रवृत्त्या पश्वादिस्थावरान्ताऽधोगतिः स्यात् । " अथैतयोः पथोर्न कतरेण च न तानीमानि क्षुद्राण्यसकृदावर्तीनि भूतानि भवन्ति । जायस्व म्रियस्वेत्येतत्तृतीयं स्थानम् । " इति श्रुतेः । " प्रजा ह तिस्रो अत्यायमीयुः " इति मन्त्रवर्णाद्विशुद्धसत्त्वस्य तु निष्कामस्यैव बाह्यादनित्यात्साध्यसाधनसंबन्धादिह कृतात्पूर्वकृताद्वा संस्कारविशेषोद्भवाद्विरक्तस्य प्रत्यगात्मविषया जिज्ञासा प्रवर्तते । तदेतद्वस्तु प्रश्नप्रतिवचनलक्षणया श्रुत्या प्रदर्श्यते केनेषितमित्याद्यया । काठके * चोक्तम्—" पराञ्चि खानि व्यतृणत्स्वयंभूस्तस्मात्पराङ् पश्यति नान्तरात्मन् । कश्चिद्धीरः प्रत्यगात्मानमैक्षदावृत्तचक्षुरमृतत्वमिच्छन् " इत्यादि । " परीक्ष्य लोकान्कर्मचितान्ब्राह्मणो निर्वेदमायान्नास्त्यकृतः कृतेन " । " तद्विज्ञानार्थं स गुरुमेवाभिगच्छेत्समित्पाणिः श्रोत्रियं ब्रह्मनिष्ठम् " इत्याद्याथर्वणे च । एवं विरक्तस्य प्रत्यगात्मविषयं विज्ञानं श्रोतुं मन्तुं विज्ञातुं च सामर्थ्यमुपपद्यते नान्यथा । एतस्माच्च प्रत्यगात्मब्रह्मविज्ञानात्संसारबीजमज्ञानं कामकर्मप्रवृत्तिकारणमशेषतो निवर्तते । " तत्र को मोहः कः

शोक एकत्वमनुपश्यतः " इति मन्त्रवर्णात् । " तरति शोकमात्मवित् " इति,

" भिद्यते हृदयग्रन्थिश्छिद्यन्ते सर्वसंशयाः ।
क्षीयन्ते चास्य कर्माणि तस्मिन्दृष्टे परावरे "

इत्यादिश्रुतिभ्यश्च । कर्मसहितादपि ज्ञानादेतत्सिध्यतीति चेन्न । वाजसनेयके तस्यान्यकारणत्ववचनात् । " जाया मे स्यात् " इति प्रस्तुत्य " पुत्रेणायं लोको जय्यो नान्येन कर्मणा । कर्मणा पितृलोको विद्यया देवलोकः " इत्यात्मनोऽन्यस्य लोकत्रयस्य कारणत्वमुक्तं वाजसनेयके । तत्रैव च पारिव्राज्यविधाने हेतुरुक्तः । " किं प्रजया करिष्यामो येषां नोऽयमात्माऽयं लोकः " इति । तत्रायं हेत्वर्थः । प्रजाकर्मतत्संयुक्तविद्याभिर्मनुष्यपितृदेवलोकत्रयसाधनैरनात्मलोकप्रतिपत्तिकारणैः किं करिष्यामो न चास्माकं लोकत्रयमनित्यं साधनसाध्यमिष्टं येषामस्माकं स्वाभाविकोऽजोऽजरोऽमृतोऽभयो न वर्धते कर्मणा नो कनीयान्नित्यश्च लोक इष्टः । स च नित्यत्वान्नाविद्यानिवृत्तिव्यतिरेकेणान्यसाधन-निष्पाद्यस्तस्मात्प्रत्यगात्मब्रह्मविज्ञानपूर्वकः सर्वैषणासंन्यास एव कर्तव्य इति । कर्मसहभावित्वविरोधाच्च प्रत्यगात्मब्रह्मविज्ञानस्य । न ह्युपात्तकारकफलभेदविज्ञानेन कर्मणा प्रत्यस्तमितसर्वभेददर्शनस्य प्रत्यगात्मब्रह्मविषयस्य सहभावित्वमुपपद्यते । वस्तुप्राधान्ये सत्यपुरुषतन्त्रत्वाद्ब्रह्मविज्ञानस्य । तस्माद् दृष्टादृष्टेभ्यो बाह्यसाधनसाध्येभ्यो विरक्तस्य प्रत्यगात्मविषया ब्रह्मजिज्ञासेयं केनेषितमित्यादिश्रुत्या प्रदर्श्यते । शिष्याचार्यप्रश्नप्रतिवचनरूपेण कथनं तु सूक्ष्मवस्तुविषयत्वात्सुखप्रतिपत्तिकारणं भवति । केवलतर्कागम्यत्वं च दर्शितं भवति । " नैषा तर्केण मतिरापनेया " इति श्रुतेश्च । " आचार्यवान्पुरुषो वेद " आचार्यादेव विद्या विदिता साधिष्ठं प्रापत् " इति । " तद्विद्धि प्रणिपातेन " इत्यादिश्रुतिस्मृतिनियमाच्च । काङ्क्षद्भिरुं ब्रह्मनिष्ठं विधिवदुपेत्य प्रत्यगात्मविषयादन्यत्र शरणपश्यन्नभयं नित्यं शिवमचलमिच्छन्पप्रच्छेति कल्प्यते ॥

सिद्धान्ती—आतां नवव्या अध्यायाला आरंभ करावयाचा आहे, त्याचा हेतु, परब्रह्म हाच आहे विषय ज्याचा तें, उपनिषद् सांगावें हा आहे, म्हणजे या नवव्या अध्यायांत ब्रह्मप्रतिपादक उपनिषद् आहे; यांचें नांव ' केन ' असें आहे.

शिष्य—हें नांव पडण्याचें कारण ?

सिद्धान्ती—कारण, या उपनिषदाला आरंभ झाला आहे तो 'केनेषितं' (कोणीं प्रवृत्त केलें म्हणून) या शब्दांनीं झाला आहे. असो; या ज्ञानकांडाच्या पूर्वी सर्व कर्मांचा उपदेश निःशेष परिसमाप्त झाला आहे. तसेंच, समस्त कर्मांना आश्रय असणारा जो प्राण त्याचीं हीं उपासना—व्याख्यानें समग्र झालीं. त्याचप्रमाणें, कर्मोपासनांस अंगभूत असणारीं जीं सामें तीं व तद्विषयक उपासना यांचेंही वर्णन केलें. त्यानंतर गायत्र नामक सामविषयाचें विवेचन मुद्दां 'वंश' अध्यायाची समाप्ति होईपर्यंत केलें.

शिष्य—वंश म्हणजे ?

सिद्धान्ती—या प्रकरणांत शिष्यपरंपरा सांगून संप्रदाय कसा चालत आला व त्याचें सनातनत्व कसें आहे हें सांगितलें असतें. याप्रमाणें सर्व कर्तव्याचे विधि यथाशास्त्र समजून घेऊन त्यांचें अनुष्ठान आटपल्यावर आणि सर्व उपासनांचें अनुष्ठान संकल्पशून्यत्वानें केल्यावर मुमुक्षूला निष्कामत्व प्राप्त होतें आणि कर्त्याची सत्वशुद्धि होते. सत्वशुद्धि म्हणजे चित्तशुद्धि हें आतां सांगण्याचें कारण नाहीं.

शिष्य—भगवन्! निष्काम कर्मांनी व निष्काम उपासनेनें चित्तशुद्धि होते हें नीटच आहे; पण सकाम-वृत्तीनें (फलाच्या आशेनें) श्रौत व स्मार्त कर्में केलीं, म्हणजे येथें ज्ञानाचा बिलकुल संबंध नसला, तर सकाम कर्मांनेंच मोक्ष नाहीं का मिळणार ?

सिद्धान्ती—नाहीं. अज्ञानी पुरुषाला मोक्षप्राप्ति होणें सर्वथा अशक्य आहे. श्रुतीनें व स्मृतीनें सांगितलेली कर्में फल मिळावें या आशेनें केलीं असतां जीवांस दक्षिणमार्गानें (यालाच पितृयाण मार्ग असें म्हणत असतात.) पितृलोकाची प्राप्ति होते. या दक्षिण मार्गानें जाणारे लोकांस पुनः पुनः जन्म घ्यावे लागतात.

शिष्य—पण भगवन्! श्रुतिस्मृतिविहित कर्में केलीं नाहींत किंवा उपासना केली नाही किंवा ज्ञानसंपादनही केलें नाहीं तर अशा पुरुषाची काय गति होते बरें ?

सिद्धान्ती—अरे! विचारतोस काय ? शास्त्रानें प्रतिषिद्ध केलेली कर्में करणारा पुरुष पशुयोनीला किंवा त्याच्यापेक्षांही अतिशय जड अशा स्थितीला जाऊन पोंहचतो. त्याला पशूपासून तों येट स्थावर पदार्थापर्यंत कोणत्या तरी एका अज्ञानी स्थितींत जन्म घ्यावा लागतो! अधोगतीच ही! श्रुति काय म्हणते तें पहा: 'श्रुतिविरहित कर्में केलीं नाहींत, तर देवयान किंवा पितृयाण या दोन मार्गांपैकीं कोणत्याही मार्गानें न जातां भलत्याच मार्गानें या लोकास जावें लागतें. हे लोक क्षुद्र अशा कीटकादिकांच्या जन्माला जातात. आणि जन्मास यावें, मरावें, पुनः जन्मास यावें व मरावें, एवढाच यांचा नित्यक्रम होतो!' दुसरी एक श्रुति असेंच म्हणते कीं, 'तिसऱ्या मार्गानें जाणारे हे तीन

प्रकारचे प्राणी (जरायुज, अंडज, आणि उद्भिज्ज ह्या प्राणिवर्गांच्या तीन खाणी किंवा तीन कोटी आहेत) अत्यंत कष्टप्रद स्थितीमध्यें जाऊन पडतात. '

शिष्य—महाराज ! श्रौतस्मार्त कर्में सकाम वृत्तीनें केलीं असतां पितृ-लोक मिळतो, श्रुतिस्मृतींनीं न सांगितलेलीं कर्में केलीं असतां, अधोगतीला जावें लागतें, हें मला समजलें; पण जे लोक विहितकर्में निष्कामवृत्तीनें करितात त्यांना कोणती गति प्राप्त होते ?

सिद्धान्ती—ऐक; जो निष्काम झाला तो शुद्धसत्व होतो. त्याला बाह्य म्हणजें अनित्य विषयांसंबंधीं वैराग्य प्राप्त होतें आणि पूर्वीच्या सुकृतानें किंवा ह्या जन्मींच्या पुण्य-कृत्यांनी असल्या विरक्त पुरुषाला आत्मज्ञानाची इच्छा प्राप्त होते. नेहमीं ध्यानांत ठेंव कीं आत्मव्यतिरिक्त जो विषय आहे, तो बाह्य असतो. तो अनित्य असतो. कारण त्याचा कार्यकारणरूपी शृंखलेशीं नित्य संबंध असतो.

शिष्य—मला हें नीटसें समजलें नाहीं.

सिद्धान्ती—अरे ! आत्मा हीच एक कायती सत्यवस्तु आहे. 'ती सर्व-व्यापी आहे ' असा श्रुतीचा सिद्धान्त तुला ठाऊक आहेना ? अर्थातच आत्म्या-शिवाय बाकीच्या सर्व वस्तू मिथ्या असतात. त्यांना व्यावहारिक सत्ता कायती असते, म्हणजे जोंपर्यंत अध्यास कायम आहे तोंपर्यंतच त्यांना सत्यत्व असतें. तसेंच, त्यांचें नामरूपही कार्यकारणांनीं बद्ध झालेलें असतें. असो; या कार्य-कारणरूपी शृंखलेला मागें ठेवून जो पुरुष निष्काम झाला, ज्याला पूर्व-संचितानें किंवा वर्तमानकालीन पुण्याईने उत्तम संस्कार होऊन आत्मज्ञानाची इच्छा उत्पन्न झाली, त्याला मुमुक्षु असें म्हणतात. या मुमुक्षूला ब्रह्मज्ञानाची प्राप्ति करून द्यावी. हें या उपनिषदाचें प्रयोजन आहे.

शिष्य—भगवन् ! आपण मला मुमुक्षु पुरुष हा अधिकारी आणि ब्रह्मज्ञान हा विषय, हे सांगितलें. हें मला समजलें. आतां मला हें समजत नाहीं कीं श्रुतीनें विषयाला एकदम प्रारंभ करावा तें न करितां 'कोणाच्या प्रवृत्तीमुळें ' अशा प्रकारचा प्रश्न कां केला आहे ?

सिद्धान्ती—अरे बाबा ! समजूत चांगली पडावी म्हणून जशी तूं आणि मी ब्रह्मविषयाची चर्चा प्रश्नोत्तररूपानें करित आहोंत, त्याप्रमाणेंच मुमुक्षूंची समजूत सौकर्यानें व्हावी, एतदर्थ श्रुतीनें प्रश्नोत्तररूपी व्याख्यान देण्याला आरंभ केला आहे. वत्सा, शुद्धचित्त व विषयविरक्त होऊन गुरूकडे गेल्याशिवाय आणि शंका विचारून आपल्या मनाचें समाधान करून घेतल्याशिवाय हें ब्रह्मज्ञान ऐकण्याचें, किंवा त्याचें मनन करण्याचें, किंवा याचा साक्षात्कार करून घेण्याचें सामर्थ्य उत्पन्न होत नाहीं. " परमेश्वरानें जीवांना जीं इंद्रियें दिलीं आहेत तीं बहिर्मुख बाहेर बघणारीं, आहेत. त्यांचीं मुखें सृष्टीकडे केलेलीं आहेत म्हणून तीं बाह्य विष-

यांचें दर्शन जीवाला करवितात. स्वभावतः जीव बाहेर बघतो, आंत बघत नाहीं. विषयाकडे त्याचें लक्ष असतें, आत्मस्वरूपाकडे नाहीं; पण ज्ञान झालेला एखादा पुरुष मात्र सर्व इंद्रियें विषयांपासून निवृत्त करितो आणि त्यांस आपापले व्यापार बंद करावयास लावून, आपण आत्मस्वरूपाचें चिंतन करितो; कारण त्याला अमृत म्हणजे ब्रह्म होण्याची इच्छा असते. (काठक उपनिषद्) 'हे सर्व लोक (भुवनें) आणि त्यांतील विषय, हे सर्व कर्मानेंच उत्पन्न झाले आहेत आणि दुःखदायक आहेत, असें पाहून ब्रह्म-जिज्ञासु पुरुषाला यासंबंधीं तीव्र तिरस्कार उत्पन्न होतो; कारण त्याला हें ज्ञान झालेलें असतें कीं ब्रह्म ही नित्यसिद्ध वस्तु आहे. कितीही कर्म केलें तरी त्या कर्मसंचयानें केव्हांही ब्रह्मप्राप्ति होणार नाहीं. म्हणून त्याला कर्माचा आणि कर्मजन्य विषयांचा कंटाळा येतो! 'मग तो विरक्त पुरुष ब्रह्मज्ञान समजून घेण्यासाठीं हातामध्यें दर्भ घेऊन विद्वान् आणि ब्रह्म-निष्ठ सद्गुरूला शरण जातो.' (छांदोग्य उपनिषद्) या श्रुतींच्या उपदेशावरून तुला समजलेंच असेल कीं ब्रह्मविद्येचें समग्र अध्ययन करण्याला केवळ विषयविरक्त पुरुषाला मात्र अधिकार आहे, इतराला नाहीं. असो; याप्रमाणें गुरूला शरण जाऊन ब्रह्मज्ञान-विज्ञान-संपादन केलें म्हणजे संसार उत्पन्न करणारें जें अज्ञान आहे व जें अज्ञान काम-क्रोधात्मक प्रवृत्ति उत्पन्न करण्याला कारण आहे, तें अज्ञान सर्वथा नाहींसें होतें. 'ज्याची दृष्टि सर्वत्र एकस्वरूप पाहूं लागली, त्याला मोह किंवा शोक उत्पन्न होण्याचें कारणच नाहींसें होतें' (ईशावास्य). 'आत्मवेत्त्याला शोकसागर तरून जातां येतो' त्याचप्रमाणें 'हृदयाची ग्रंथि फुटते, सर्व संशय तुटतात, सर्व कर्मे संपतात. कोणाचीं? ज्याला सर्वव्यापी परब्रह्माचें ज्ञान झालें त्याला आम्ही आतां सांगितलेलीं फलें प्राप्त होतात.' हा अनेक श्रुतींचा उपदेश आहे. सारांश, ज्यांचें अज्ञान म्हणजे संसारबीज नष्ट झालें त्यांचें शोकमोहादिकाचें कारणच नष्ट होतें.

शिष्य—नुसत्या ज्ञानानें मोक्ष मिळतो हें नीटच आहे; पण मला असें ठाऊक आहे कीं, श्रुतीनें जीवाला कर्म करावयास सांगितलें आहे. जिवंत आहे तोंपर्यंत जीवाचें कर्म सुटतही नाहीं. तेव्हां स्वभावतः कर्म केव्हांही सुटत नाहीं, म्हणून जीवास कर्म करावें लागतें आणि श्रुतीनें सांगितलें आहे म्हणून तो कर्म करितोही. तेव्हां आपण ज्ञानाबरोबर कर्माचाही अंगीकार करतील तर आमच्या सारख्यास श्रुतिविरुद्ध जावें लागणार नाहीं. आणि मोक्षप्राप्तीचीही सोपीं सोपीं साधनें उत्पन्न होतील.

सिद्धान्ती—ही तुझी निवळ भ्रांति आहे. कर्माची आणि ज्ञानाची संगति कधींही जुळावयाची नाहीं.

शिष्य—हें कसें?

सिद्धान्ती—बृहदारण्यकांत काय सांगितलें आहे तें ऐक. 'मला जाया (स्त्री) असावी' असा आरंभ करून 'पुत्रानें हा लोक जिंकतां येतो. हा लोक जिंकण्याला दुसरें साधन नाहीं; श्रुत्युक्त कर्मानें पितृलोक साध्य होतो आणि विद्येनें म्हणजे उपासनेनें देवलोकाची प्राप्ति होते' याप्रमाणें आत्मलोकाशिवाय बाकीच्या तीन लोकांच्या प्राप्तीचीं कारणें पुत्र, कर्म आणि उपासना आहेत, असें बृहदारण्यक म्हणतें. कर्मानें व उपासनेनें भूलोक, स्वर्गलोक व देवलोक यांची प्राप्ति होते. पण वत्सा! तेथेंच कर्मसंन्यास कां करावा, याचेंही कारण सांगितलें आहे. ऐकः—

'संतति उत्पन्न करून आम्हांस काय करावयाचें आहे? संतति हा लोक (भूलोक) देईल; पण आत्मलोक कांहीं प्राप्त करून देणार नाहीं.' याचा अर्थ असा आहेः प्रजा, कर्म आणि कर्मासह उपासना या तीन साधनांनीं अनुक्रमें मनुष्यलोक, पितृलोक आणि देव-लोक साध्य होतात. पण हे तिन्ही लोक अनात्मक आहेत म्हणजे या लोकांनीं आत्मप्राप्ति व्हावयाची नाहीं. तेव्हां मुमुक्षु पुरुष विरक्त होऊन सहजच म्हणतो कीं मला प्रजा किंवा कर्म किंवा उपासना हीं साधनें घेऊन काय करावयाचें आहे? कारण ही साधनें अनित्य व दुःखमूलक अशा भुवनांची मात्र प्राप्ति करून देणार! हे अनित्य लोक आम्हांस नको आहेत, आम्हांला सहजसिद्ध, अनाद्यनंत (अज, अजर, अमर आणि अभय) असा लोक म्हणजे आत्मलोक हवा आहे, आत्मवस्तू ही कर्मानें मोठी होते किंवा लहान होते, असा प्रकार नाही. ती वस्तु नित्य आहे आणि ती नित्य आहे म्हणून आम्हांस हवी आहे. अर्थातच मुमुक्षूला नित्य आत्मलोक हाच पुरुषार्थ हवा असतो आणि या पुरुषार्थाची सिद्धि अविद्येची निवृत्ति झाल्याशिवाय दुसऱ्या कोणत्याही साधनांनीं सिद्ध होत नाहीं. म्हणून तो सर्व कर्मांचा व सर्व वासनांचा त्यागच करितो. मात्र हा त्याग 'आत्मा आणि ब्रह्म यांचें स्वरूप एकच आहे,' असें साक्षात् ज्ञान झाल्यानंतर मात्र करावयाचा आहे. सारांश, आत्मप्राप्तीसाठीं सर्व कर्मांचा व सर्व वासनांचा त्याग केला पाहिजे, हें सिद्ध झालें. अथवा आत्मज्ञान आणि कर्म यांचा तीव्र विरोध आहे, हें सिद्ध झालें. कर्म आहे तेथें आत्मज्ञान व्हावयाचें नाहीं आणि आत्मज्ञान असेल तेथें कर्माला अवकाश मिळत नाही. असा या उभयतांचा तमःप्रकाशाप्रमाणें तीव्र विरोध आहे.

शिष्य—अजून माझी चांगलीशी समजूत पडली नाहीं.

सिद्धान्ती—हें पहा, प्रत्येक कर्मामध्यें कर्ता, करण, कार्य, आणि कर्मफल अशाप्रकारचें भेदज्ञान हवें असतें ना? हें भेद-ज्ञान असल्याशिवाय कर्म होतच नाहीं. नव्हे? बरें! आतां ब्रह्मात्मैक्याचा जो विषय आहे, तेथें हा विषय ग्रहण करणाराची दृष्टि पूर्णतः भेदशून्य झाली पाहिजे. अभेद पाहणारा पुरुष मात्र ब्रह्म-

विद्या समजून घेण्याला योग्य होतो. असो. कर्मांत भेददृष्टि हवी. ब्रह्मविद्येंत अभेद-दृष्टि हवी. ब्रह्मविद्येमध्यें वस्तुप्रधान प्रवचन असतें, म्हणजे येथें सिद्ध वस्तूचें वर्णन असतें व येथें पुरुषाच्या इच्छेची मातब्बरी मुळींच नसते. वस्तु असेल तसें ज्ञान करून घ्यावयाचें असतें; पण कर्मामध्यें कर्म करणें किंवा न करणें हें पुरुषाच्या स्वाधीन असतें. तात्पर्य, ब्रह्मविद्या वस्तुतंत्र आहे, पुरुषतंत्र नाहीं. कर्म-विद्या पुरुष-तंत्र आहे, वस्तुतंत्र नाहीं. तेव्हां कर्म आणि ज्ञान यांच्यामध्यें तीव्र विरोध आहे, हें तुला आतां जास्त विस्तारानें सांगावयास नको आहे, असो; तेव्हां दृष्ट आणि अदृष्ट बाह्य साधनें आणि बाह्य साध्यें (आत्मेतर पुरुषार्थ) यांच्या संबंधानें विरक्त झालेला पुरुष 'ब्रह्म काय आहे?' अशी जिज्ञासा करित होत्साता गुरूजीस प्रश्न विचारित आहे, असा आरंभीच्या मंत्रावरून बोध होतो. या ब्रह्म-जिज्ञासेचा विषय प्रत्यगात्मा म्हणजे ब्रह्म हा आहे.

शिष्य—गुरुजी! आपण मला आतांच सांगितलें कीं प्रश्नोत्तर रूपानें तत्त्वज्ञानाचा ऊहापोह केला असतां शिष्याची समजूत लवकर पडते. भगवन्! मला पुनः असेंही वाटतें कीं, विचारविषय जर अतिशय सूक्ष्म, कुशाग्र बुद्धीला मात्र ग्रहण करितां येण्यासारखा, असेल तर ही प्रश्नोत्तररूपी पद्धति फारच चांगली आहे. कारण विचारप्रवचन चाललें असतां शिष्याला शंका विचारतां येतात आणि गुरुजीस त्या शंकेचें निराकरण करून शिष्याचें समाधान करितां येतें.

सिद्धान्ती—होय. बरोबर आहे. मनुष्याच्या स्वबुद्धीला व तर्काला ब्रह्मज्ञान गोचर नाहीं, हें आतांच आम्हीं सिद्ध करून दाखविणार आहों. 'हें ब्रह्मज्ञान तर्कानें समजण्यासारखें नाहीं, तर्कानें ब्रह्मबुद्धि सांपडावयाची नाहीं.' अशी श्रुतिही आहे. "तसेच, गुरूजवळ शिकणारा पुरुष मात्र आत्मवेत्ता होतो." "प्रसिद्धच आहे कीं, गुरूपासून साक्षात् मिळालेली विद्या मात्र उत्तम प्रकारें फलद्रूप होते." आणखी, 'गुरूला शरण जाऊन, त्याला नमस्कार करून' इत्यादि श्रुति, व भगवद्गीता गुरूची आवश्यकता सिद्ध करितात, असो; ह्या उपनिषदाचा असा प्रस्तव केला आहे कीं, आत्मविद्येशिवाय दुसरें विश्रांतिस्थान नाहीं, असा निश्चय झाल्यामुळें कोणी एक मुमुक्षु त्या नित्य, कल्याणप्रद, कूटस्थ आणि अभय देणाऱ्या ब्रह्मस्वरूपाला जाणण्याची इच्छा करित आहे, व तो ब्रह्मनिष्ठ गुरूकडे विधिपूर्वक जाऊन त्यांस नम्रतेनें प्रश्न करित आहे.

सामवेदीयतलवकारोपनिषत् ।

शान्तिपाठः ।

ॐसह नाववतु सह नौ भुनक्तु सह वीर्यं करवावहै ।
तेजस्वि नावधीतमस्तु मा विद्विषावहै ॥

ॐ शान्तिः । शान्तिः । शान्तिः ।

(१) हें ब्रह्मज्ञान आम्हां उभयतांचें संरक्षण करो ! आम्हांस त्याचें उत्तम रहस्य समजो ! आम्हीं उभयतां त्याचा अर्थ करण्याविषयीं सारखेच श्रम करूं. आमचें अध्ययन तेजःपुंज असो ! आणि आमच्यामध्यें केव्हांही द्वेष उत्पन्न न होवो !

शान्तिः शान्तिः शान्तिः

आप्यायन्तु ममाङ्गानि वाक्प्राणश्चक्षुः श्रोत्रमथो बलमिन्द्रियाणि च सर्वाणि सर्वं ब्रह्मौपनिषदं माऽहं ब्रह्म निराकुर्यां मा मा ब्रह्म निराकरोदनिराकरणमस्त्वनिराकरणं मेऽस्तु तदात्मनि निरते य उपनिषत्सु धर्मास्ते मयि सन्तु ते मयि सन्तु ॥

ॐ शान्तिः । शान्तिः । शान्तिः ।

(२) माझीं अंगें माझी वाणी, प्राण, चक्षु, श्रोत्र, माझें बल आणि सर्व कर्मेंद्रियें हीं सर्व पुष्ट होवोत ! हें सर्व उपनिषदांत वर्णन केलेलें ब्रह्मच आहे. हें सर्व दृश्य व कल्प्य ब्रह्म होय. मी ब्रह्मज्ञानाच्या विरुद्ध केव्हांही असूं नये, माझ्या विरुद्ध ब्रह्मानेंही कधीं असूं नये, मी व ब्रह्म यांनीं सर्वदा एकरूप असावें, मी आत्मस्वरूपामध्यें एकरूप झाल्यावर उपनिषदांमध्यें जे धर्म सांगितले आहेत, ते सर्व धर्म माझ्यामध्यें असोत, त्या सर्व धर्मांचा लाभ मला होवो !

शान्तिः शान्तिः शान्तिः

हे दोन शान्तिपाठ–करून मग या उपनिषदाच्या पठनाला प्रारंभ करावयाचा असतो.

ॐ केनेषितं पतति प्रेषितं मनः । केन प्राणः प्रथमः प्रैति युक्तः । केनेषितां वाचमिमां वदन्ति चक्षुः श्रोत्रं क उ देवो युनक्ति ॥ १ ॥

अन्वय व अर्थ—**केन इषितं प्रेषितं मनः पतति** (कोणा विशेष चैतन्याच्या इच्छेनें प्रेरित झाल्यामुळें मन स्वविषयाकडे धांव घेतें ?) **केन युक्तः प्रथमः प्राणः प्रैति** (कोणी आज्ञा केल्यामुळें प्रथम प्राण–प्राणवायु, (जीवनकला)–आपला व्यापार करितो.) **केन इषितां इमां वाचं वदन्ति** (कोणी प्रेरिलेली ही वाणीनामानें प्रसिद्ध असलेली वाक्-शक्ति भाषण

करिते.) उ कः देवः चक्षुः श्रोत्रं युनक्ति (कोणता देव नेत्राला आणि कर्णाला स्वव्यापार करावयास लावितो.)

सारांश, इंद्रियें, मन, प्राण इत्यादि कोणाच्या प्रेरणेनें आपापले व्यापार करित असतात ? हा मुमुक्षूचा प्रश्न आहे.—

केनेषितमित्यादि । केनेषितमिति केन कर्त्रेषितमिष्टमभिप्रेतं सन्मनः पतति गच्छति स्वविषयं प्रतीति संबध्यते । इषेराभीक्ष्ण्यार्थस्य गत्यर्थस्य चेहासंभवादिच्छार्थस्यैवैतद्रूपमिति गम्यते । इषितमितीट्प्रयोगस्तु च्छान्दसस्तस्यैव प्रपूर्वस्य नियोगार्थे प्रेषितमित्येतत् । तत्र प्रेषितमित्येवोक्ते प्रेषयितृप्रेषणविशेषविषयाकाङ्क्षा स्यात् । केन प्रेषयितृविशेषेण । कीदृशं वा प्रेषणमिति । इषितमिति तु विशेषणे सति तदुभयं निवर्तते । कस्येच्छामात्रेण प्रेषितमित्यर्थविशेषनिर्धारणाद्यद्येषोऽर्थोऽभिप्रेतः स्यात्केनेषितमित्येतावतैव सिद्धत्वात्प्रेषितमिति न वक्तव्यम् । अपि च शब्दाधिक्यादर्थाधिक्यं युक्तमितीच्छया कर्मणा वाचा वा केन प्रेषितमित्यर्थविशेषोऽवगन्तुं युक्तः । न प्रश्नसामर्थ्यादेहादिसंघातादनित्यात्कर्मकार्याद्विरक्तोऽतोन्यत्कूटस्थं नित्यं वस्तु बुभुत्समानः पृच्छतीति सामर्थ्यादुपपद्यते । इतरथेच्छावाक्कर्मभिर्देहादिसंघातस्य प्रेरयितृत्वं प्रसिद्धमिति प्रश्नोऽनर्थक एव स्यात् । एवमपि प्रेषितशब्दस्यार्थो न प्रदर्शित एव न संशयवतोऽयं प्रश्न इति प्रेषितशब्दस्यार्थविशेष उपपद्यते । किं यथा प्रसिद्धमेव कार्यकारणसंघातस्य प्रेषयितृत्वं किंवा संघातव्यतिरिक्तस्य स्वतन्त्रस्येच्छामात्रेणैव मनआदिप्रेषयितृत्वमित्यस्यार्थस्य प्रदर्शनार्थं केनेषितं पतति प्रेषितं मन इति विशेषणद्वयमुपपद्यते । ननु स्वतन्त्रं मनः स्वविषये पततीति प्रसिद्धम् । तत्र कथं प्रश्न उपपद्यत इति । उच्यते । यदि स्वतन्त्रं मनः प्रवृत्तिनिवृत्तिविषयं स्यात्तर्हि सर्वस्यानिष्टचिन्तनं न स्याद्दनर्थं च जानन्संकल्पयति । अत्युग्रदुःखे च कार्ये वार्यमाणमपि प्रवर्तत एव मनस्तस्माद्युक्त एव केनेषितमित्यादिप्रश्नः । केन प्राणो युक्तो नियुक्तः प्रेरितः सन्प्रैति गच्छति स्वव्यापारं प्रति । प्रथम इति प्राणविशेषणं स्यात्तत्पूर्वकत्वात्सर्वेन्द्रियवृत्तीनाम् । केनेषितां वाचमिमां शब्दलक्षणां वदन्ति लौकिकाः । तथा चक्षुः श्रोत्रं च स्वे स्वे विषये क उ देवो द्योतनवान्युनक्ति नियुङ्क्ते प्रेरयति ॥ १ ॥

सिद्धान्ती—कोणी इच्छा केली असते म्हणून मन आपल्या स्वविषयाकडे धांवत जातें ? कोणाच्या इच्छेनुसार मन स्वव्यापार करितें ?

शिष्य—' इष ' याचे ' पुनः पुनः ' व ' जाणें ' असे अर्थ आहेतना ?

सिद्धान्ती—त्या दोन्ही अर्थांचा येथें संभव नाहीं. येथें इच्छा हाच अर्थ आहे. आणि त्याच अर्थवाची शब्दाचें इषित हें रूप आहे.

शिष्य—मग ' एषित ' असें रूप व्हावें. ' इषित ' हें रूप व्याकरण-दृष्टीनें बरोबर नाहीं.

सिद्धान्ती—हा आर्ष प्रयोग आहे. याच 'इष्' धातूच्या पूर्वी 'प्र' हा उपसर्ग लावून प्रेषित हा आज्ञादर्शक शब्द सिद्ध केला आहे. कोणी आज्ञा केली असें म्हणावयाचा प्रसंग येतो, तेव्हां 'आज्ञा करणाराची विशेष आज्ञा कोणती आज्ञेचा विषय काय होता,' हें समजण्याची इच्छा उत्पन्न होते. कोणी विशेष चैतन्यानें आज्ञा केली. कशी आज्ञा केली ? हें समजून घ्यावयाचें आहे. ह्या उभय प्रश्नांचें उत्तर " इच्छा मात्रानें " असें दिले म्हणजे समाधान होत नाहीं. पण कोणाच्या चैतन्यमात्रानें आज्ञापिलेले मन असा अर्थविशेष सिद्ध होतो, आणि समाधान होतें.

पूर्वपक्षी—जर हाच अर्थ इष्ट होता तर ' कोणाच्या इच्छामात्रानें मन इत्यादि ' वाक्य मंत्रांत ठेविलें असतें म्हणजे कार्य झालें असतें. प्रेषित शब्दाची आवश्यकता नव्हती. विनाकारण अधिक शब्द घालणें योग्य नाहीं. आतां ' प्रेषित ' हें पद विद्यमानच आहे, म्हणून श्रुतीला अधिकच अर्थ सांगावयाचा आहेसें दिसतें. तो हा की ही आज्ञा केली ती कोणी ? बरें, ही आज्ञा इच्छा करून केली, कांहीं कर्म करून केली, किंवा वाणीच्या द्वारानें केली ? हा विशेष प्रश्न श्रुतीला समजून द्यावयाचा आहे.

सिद्धान्ती—नाहीं. नुसत्या प्रश्नाच्या सामर्थ्यानें प्रश्नकर्ता देहादि-संघाताला विटलेला आहे, अनित्य कर्मासंबंधाने व कर्मफलासंबंधाने विरक्त झाला आहे, आणि म्हणून देहव्यतिरिक्त व अनित्यव्यतिरिक्त कांहीं कूटस्थ व नित्यवस्तू जाणण्याची इच्छा प्रश्न करणाराला उत्पन्न झाली आहे, असें नुसत्या प्रश्नाच्या सामर्थ्यानें कळवून द्यावयाचें आहे, म्हणून ' इषित ' व प्रेषित असे दोन्ही शब्द प्रश्नांत घातलेच पाहिजेत.

शिष्य—भगवन् ! हे शब्द मंत्रांत नसतील तर उपयोगच नाहीं, कारण इच्छा, वाणी, कर्म इत्यादि देहादिकांचे प्रेरक आहेत, हें प्रसिद्धच आहे; तेव्हां विचारणाराचा प्रश्नच निरर्थक झाला असता. नव्हे ?

सिद्धान्ती—बरोबर आहे. कर्म करण्यास इच्छा, वाणी इत्यादि प्रेरणा करितात हें प्रसिद्ध आहे, तेव्हां कोणाच्या प्रेरणेनें मन स्वविषयाकडे जातें, हा

प्रश्न विचारण्याची जरूरच नाहीं. तेव्हां 'कोणाच्या अस्तित्वानें प्रेरित होऊन मन स्वविषय व्यापार करितें?' हें विचारणें उपपन्नच आहे, योग्यच आहे.

पूर्वपक्षी—पण असा अर्थ केला तरी प्रेषित शब्दाचा अर्थ कोठें स्पष्ट झाला आहे?

सिद्धान्ती—हा संशय उत्पन्न झालेल्या पुरुषाचा प्रश्न आहे, तेव्हां त्याचा विशेष कांही तरी अभिप्राय असला पाहिजे, हें उघड आहे.

पूर्वपक्षी—काय आहे तो विशेष अभिप्राय?

सिद्धान्ती—मुमुक्षूला असें विचारावयाचें आहे कीं, मनाला जी प्रेरणा होते, ती कार्य-कारणांचा संघात जो देहात्मा (उपाधींनीं युक्त जो जीवात्मा) त्याकडून होते, किंवा संघाताव्यतिरिक्त केवळ स्वतंत्र जो परमात्मा त्याच्या इच्छामात्राने मनादिक प्रेरित होतात? हा विशेष अर्थ कळावा म्हणून त्यानें दोन विशेषणें घालून हा प्रश्न केला आहे. अर्थातच त्याच्या इच्छेनुसार त्याचा प्रयत्न योग्यच आहे.

पूर्वपक्षी—पण मन हें स्वातंत्र्यानें व स्वप्रेरणेनें आपल्या विषयांचें ग्रहण करितें हें प्रसिद्ध आहे. मग असा खुळ्यासारखा प्रश्न करण्यांत काय तात्पर्य आहे?

सिद्धान्ती—कोणता विषय ग्रहण करावा, कोणता करूं नये, हे स्वातंत्र्य जर मनाला असलें, तर कोणीही जीवानें अनिष्ट विषयांचें चिंतन केलेंच नसतें. वस्तुस्थिति पहाः पण अमुक एक विषय अनर्थ करणारा आहे, असें जाणूनही असें स्पष्ट ज्ञान असतांही आपण अनिष्ट विषयांचें चिंतन करितों! पहा कीं द्यूतादि कर्म अतिशय उग्र दुःख देणारें आहे, असलें कार्य करूं नये, असें जोरानें निवारण होत असतांही मन त्या अनिष्ट विषयाचें चिंतन व संकल्प करतेंच ना? तेव्हां तें स्वतंत्र नाहीं, हे स्पष्ट आहे. म्हणून 'कोणाच्या अस्तित्वानें प्रेरित होऊन मन स्वव्यापार करितें?' असा प्रश्न करणें योग्यच आहे. याचप्रमाणें प्रथम प्राण कोणाच्या प्रेरणेनें स्वव्यापार करितो; हाही प्रश्न योग्यच आहे.

शिष्य—येथें प्राणाला प्रथम हें विशेषण दिलें आहे. कारण प्राण हा सर्व इंद्रियवृत्तींच्या आधी विद्यमान असतो. प्रथम प्राण असेल तर सर्व इंद्रिय-वृत्तीचे व्यापार चालतात. म्हणून प्रथमप्राण असें म्हटलें आहे ना?

सिद्धान्ती—बरोबर आहे. याच प्रमाणें वाणीचा प्रेरक कोण, कर्ण, नेत्रादिकांचा स्वस्वव्यापारासंबंधानें प्रेरक कोण, असें ब्रह्मजिज्ञासु साधकानें विचारलें आहे.

मन हें स्वतंत्र नाहीं, कोणाच्या तरी प्रेरणेनें मन स्वव्यापार करितें, असें या मंत्रांत स्पष्ट ठरविलें आहे आणि हा प्रेरकही देहेंद्रियादिकांच्या संघाताव्यतिरिक्त आहे हें ठरलें. सारांश, देहातीत कोणी जो प्रेरक आहे तो समजून घ्यावा अशी साधकाची मनीषा आहे. हें स्पष्ट होतें. ॥ १ ॥

एवं पृष्टवते योग्यायाऽऽह गुरुः शृणु त्वं यत्पृच्छसि । मनआदिकरणजातस्य को देवः स्वविषयं प्रति प्रेरयिता कथं वा प्रेरयतीति ।

सिद्धान्ती—याप्रमाणें अधिकारी साधकानें प्रश्न विचारल्यावर आचार्य सांगतात कीं " 'मन आदि इंद्रियांची स्वविषयाकडे प्रवृत्ति कोणता देव करितो व ती प्रेरणा कशी करितो' असा तूं जो प्रश्न विचारला आहेस त्याचें उत्तर ऐक."—हें उत्तर दुसऱ्या मंत्रांत दिलें आहे.

श्रोत्रस्य श्रोत्रं मनसो मनो यद्वाचो ह वाचं स उ प्राणस्य प्राणश्चक्षुषश्चक्षुः । अतिमुच्य धीराः प्रेत्यास्माल्लोकादमृता भवन्ति ॥ २ ॥

अन्वय व अर्थ—श्रोत्रस्य श्रोत्रं (तो कर्णाचा कर्ण आहे) **मनसः मनः** (मनाचें मन आहे) **यत् वाचः वाचं** (जो वाचेची वाचा आहे.) **स उ प्राणस्य प्राणः चक्षुषः चक्षुः** (तोच प्राणाचाही प्राण आहे, नेत्रांचाही नेत्र आहे.) **अतिमुच्य** (सर्व उपाधींचा त्याग करून) **अस्मात् लोकात् प्रेत्य धीराः अमृताः भवन्ति** (हे विद्वान् लोक देहपात झाल्याबर अमृत लोकास जातात.)

सारांश, ज्याअर्थी हा प्रेरक इंद्रियाचें इंद्रिय, मनाचें मन, व प्राणाचा प्राण आहे, त्याअर्थी विद्वान् लोक इंद्रियादि उपाधींचा त्याग करितात आणि हा लोक सोडून देऊन अमृत होतात.

श्रोत्रस्य श्रोत्रं शृणोत्यनेनेति श्रोत्रं शब्दस्य श्रवणं प्रति करणं शब्दाभिव्यञ्जकं श्रोत्रमिन्द्रियं तस्य श्रोत्रं स यस्त्वया पृष्टश्चक्षुः श्रोत्रं क उ देवो युनक्तीति । असावेवंविशिष्टः श्रोत्रादीनि नियुङ्क्त इति वक्तव्ये नन्वेतदननुरूपं प्रतिवचनं श्रोत्रस्य श्रोत्रमिति । नैष दोषः । तस्यान्यथाविशेषानवगमात् । यदि हि श्रोत्रादिव्यापारव्यतिरिक्तेन स्वव्यापारेण विशिष्टः श्रोत्रादिनियोक्ताऽवगम्येत दात्रादिप्रयोक्तृवत्तदेदमननुरूपं प्रतिवचनं स्यात् । न त्विह श्रोत्रादीनां

प्रयोक्ता स्वव्यापारविशिष्टो लवित्रादिवदधिगम्यते। श्रोत्रादीनामेव तु संहतानां व्यापारेणाऽऽलोचनसंकल्पाध्यवसायलक्षणेन फलावसानालिङ्गेनावगम्यते। अस्ति हि श्रोत्रादिभिरसंहतो यत्प्रयोजनप्रयुक्तः श्रोत्रादिकलापो गृहादिवदिति संहतानां परार्थत्वादवगम्यते श्रोत्रादीनां प्रयोक्ता। तस्मादनुरूपमेवेदं प्रतिवचनं श्रोत्रस्य श्रोत्रमित्यादि कः पुनरत्र पदार्थः श्रोत्रस्य श्रोत्रमित्यादेः। नह्यत्र श्रोत्रस्य श्रोत्रान्तरेणार्थः। यथा प्रकाशस्य प्रकाशान्तरेण। नैष दोषोऽयमत्र पदार्थः। श्रोत्रं तावत्स्वविषयव्यञ्जनसमर्थं दृष्टम्। तच्च स्वविषयव्यञ्जनसामर्थ्यं श्रोत्रस्य चैतन्ये ह्यात्मज्योतिषि नित्ये संहते सर्वान्तरे सति भवति नासतीत्यतः श्रोत्रस्य श्रोत्रमित्याद्युपपद्यते। तथाच श्रुत्यन्तराणि–" आत्मनैवायं ज्योतिषाऽऽस्ते " " तस्य भासा सर्वमिदं विभाति " " येन सूर्यस्तपति तेजसेद्धः " इत्यादीनि।

" यदादित्यगतं तेजो जगद्भासयतेऽखिलम्। क्षेत्रं क्षेत्री तथा कृत्स्नं प्रकाशयति भारत " इत्यादि गीतासु। काठके च–" नित्यो नित्यानां चेतनश्चेतनानाम् " इति। श्रोत्राद्येव सर्वस्याऽऽत्मभूतं चेतनमिति प्रसिद्धं तादिह निवर्त्यते। अस्ति किमपि विद्वद्बुद्धिगम्यं सर्वान्तरतमं कूटस्थमजरममृतमभयमजं श्रोत्रादेरपि श्रोत्रादि तत्सामर्थ्यनिमित्तमिति प्रतिवचनं शब्दार्थश्चोपपद्यत एव। तथा मनसोऽन्तःकरणस्य मनः। न ह्यन्तःकरणमन्तरेण चैतन्यज्योतिषा दीपितं स्वविषयसंकल्पाध्यवसायादिसमर्थं स्यात्। तस्मान्मनसोऽपि मन इति। इह बुद्धिमनसी एकीकृत्य निर्देशो मनस इति। यद्वाचो ह वाचं यच्छब्दो यस्मादर्थे श्रोत्रादिभिः सर्वैः संबध्यते। यस्माच्छ्रोत्रस्य श्रोत्रम्। यस्मान्मनसो मन इत्येवम्। वाचो ह वाचमिति द्वितीया प्रथमात्वेन विपरिणम्यते। प्राणस्य प्राण इति दर्शनात्। वाचो ह वाचमित्येतदनुरोधेन प्राणस्य प्राणमिति कस्माद्द्वितीयैव न क्रियते। न। बहूनामनुरोधस्य युक्तत्वाद्वाचमित्यस्य वागित्येतावद्वक्तव्यं स उ प्राणस्य प्राण इति शब्दद्वयानुरोधेन। एवं हि बहूनामनुरोधो युक्तः कृतः स्यात्। पृष्टं च वस्तु प्रथमयैव निर्देष्टुं युक्तम्। स यस्त्वया पृष्टः प्राणस्य प्राणाख्यवृत्तिविशेषस्य प्राणस्तत्कृतं हि प्राणस्य प्राणनसामर्थ्यम् न ह्यात्मनाऽनधिष्ठितस्य प्राणनमुपपद्यते। " को ह्येवान्यात्कः प्राण्याद्यदेष आकाश आनन्दो न स्यात् " " उर्ध्वं प्राणमुन्नयत्यपानं प्रत्यग-

स्यति" इत्यादिश्रुतिभ्यः। इहापि च वक्ष्यते—"येन प्राणः प्रणीयते तदेव ब्रह्म त्वं विद्धि" इति। श्रोत्रादीन्द्रियप्रस्तावे घ्राणप्राणस्य ननु युक्तं ग्रहणम्। सत्यमेवं प्राणग्रहणेनैव तु घ्राणप्राणस्य ग्रहणं कृतम्। एवं मन्यते श्रुतिः सर्वस्यैव करणकलापस्य यदर्थप्रयुक्ता प्रवृत्तिस्तद्ब्रह्मेति प्रकरणार्थो विवक्षितः। तथा चक्षुषश्चक्षूरूपप्रकाशकस्य चक्षुषो यद्रूपग्रहणसामर्थ्यं तदात्मचैतन्याधिष्ठितस्यैवातश्चक्षुषश्चक्षुः। प्रष्टुः पृष्टस्यार्थस्य ज्ञातुमिष्टत्वाच्छ्रोत्रादेः श्रोत्रादिलक्षणं यथोक्तं ब्रह्म ज्ञात्वेत्यध्याहियते। अमृता भवन्तीति फलश्रुतेश्च। ज्ञानाद्धयमृतत्वं प्राप्यते। ज्ञात्वा विमुच्यत इति सामर्थ्याच्छ्रोत्रादिकरणकलापमुज्झित्वा। श्रोत्रादौ ह्यात्मभावं कृत्वा तदुपाधिः संस्तदात्मना जायते म्रियते संसरति च। अतः श्रोत्रादेः श्रोत्रादिलक्षणं ब्रह्माऽऽत्मेति विदित्वाऽतिमुच्य श्रोत्राद्यात्मभावं परित्यज्य ये श्रोत्राद्यात्मभावं परित्यजन्ति ते धीरा धीमन्तः। नहि विशिष्टधीमत्त्वमन्तरेण श्रोत्राद्यात्मभावः शक्यः परित्यक्तुम्। प्रेत्य व्यावृत्यास्माल्लोकात्पुत्रमित्रकलत्रबन्धुषु ममाहंभावसंव्यवहारलक्षणात्त्यक्तसर्वैषणा भूत्वेत्यर्थः। अमृता अमरणधर्माणो भवन्ति। "न कर्मणा न प्रजया धनेन त्यागेनैके अमृतत्वमानशुः" "पराञ्चि खानि व्यतृणत्" "आवृत्तचक्षुरमृतत्वमिच्छन्" "यदा सर्वे प्रमुच्यन्ते" "अत्र ब्रह्म समश्नुते" इत्यादिश्रुतिभ्यः। अथ वाऽतिमुच्येत्यनेनैवैषणात्यागस्य सिद्धत्वादस्माल्लोकात्प्रेत्यास्माच्छरीरात्प्रेत्य मृत्वेत्यर्थः॥ २॥

सिद्धान्ती—शिष्यराया! मनादि जीं सर्व इंद्रियें आहेत, तीं स्वस्वव्यापार करीत असतां त्यानां कोणता देव प्रेरणा करितो आणि ती कशी करितो हें तुलाही समजून घ्यावयाचें आहे ना? ऐक आतां—हा श्रोत्राचा श्रोत्र आहे. श्रोत्र म्हणजे शब्द—श्रवण करण्याचें जें इंद्रिय तें होय. हें इंद्रिय शब्दाला प्रकट करणारें आहे. त्या ह्या शब्द प्रकट करणाऱ्या इंद्रियाचा हा श्रोत्र असतो. श्रोत्राप्रमाणेंच हा श्रोत्राचा व चक्षूचा श्रोत्र व चक्षु आहे. मनाचें मनही तोच आहे.

पूर्वपक्षी—हें हो! काय भलतेंच उत्तर दिलें आहे? कोण प्रेरणा करितो असें विचारलें, त्याला 'हा देव श्रोत्राचें श्रोत्र आहे', हें काय उत्तर झालें? खरें उत्तर असें पाहिजे होतें कीं, अमुक अमुक धर्म असणारा अमुक प्रेरणा करितो; तें सोडून देऊन हें भलतेंच काय उत्तर दिलें आहे?

सिद्धान्ती—तुम्हीं श्रुतीचा अभिप्राय समजलां नाहीं. श्रुतीला जो प्रेरक सांगावयाचा आहे, त्याला कोणताही धर्म किंवा कोणताही गुण आरोपीत

करणें श्रुतीला इष्ट वाटत नाहीं. त्याचा गुणधर्म समजणें शक्यच नाहीं. तसेंच, श्रुतीनें सांगितलें याहून अन्य तऱ्हेनें प्रेरकस्वरूप सांगणें व समजणें शक्य नाहीं.

पूर्वपक्षी—हें कशावरून ?

सिद्धान्ती—असें पहा कीं तुमच्या प्रक्रियेनें कर्णादिकांना प्रेरणा करणारा कर्णादिकांचे व्यापार–व्यतिरिक्त पाहिजे. (म्हणजे ऐकणें पाहणें, इत्यादि व्यापार न करणारा प्रेरक पाहिजे.) अर्थातच तो प्रेरक दुसऱ्या कांहीं गुणकर्मांनीं विशिष्ट असला पाहिजे. याप्रमाणें स्वगुण–कर्म–विशिष्ट कोणी श्रोत्रादिकांचा प्रेरक आहे. असें म्हटलें तर त्या गुणकर्म–विशिष्ट प्रेरकाच्या गुणकर्मांचा प्रेरक कोण, त्याचा प्रेरक कोण, त्याचा प्रेरक कोण, अशी प्रश्नांची शेवटपर्यंतही न संपणारी मालिका लागेल. कोणी कोणाला दान दिलें तर 'दान देणाराचा प्रेरक कोण ?' हें निश्चित सांगतां येतें. पण तसें येथें सांगतां येत नाहीं आणि म्हणून स्वगुण-कर्म-विशिष्ट कोणी प्रेरक आहे असें सांगितलें असतें, तर उत्तर बरोबर झालें नसतें. येथें श्रोत्रादिकांचा जो प्रेरक आहे, प्रयोक्ता आहे, तो गवत कापणाऱ्या खुरप्याप्रमाणें स्वतः कांहीं कर्म करणारा आहे; असें सांगावयाचे नाहीं. श्रोत्रादि जीं इंद्रियें आहेत, तीं एकत्र झालीं असतां ऐकणें, पाहणें, संकल्प करणें, निश्चय करणें, ह्या चिन्हांनीं ज्याचा व्यापार अनुमानितां येतो आणि फलप्राप्तीच्या चिन्हानें जो समजला जातो असा कोणी एक श्रोत्रादिकांहून निराळाच आहे, असें ज्ञान होतें. श्रोत्रादिकांहून जो भिन्न आहे, ज्यानें प्रेरणा केली असतां मात्र श्रोत्रादि सर्व इंद्रिय–कलाप इष्ट व्यापार करितात, तो श्रोत्रादिकांचा प्रयोजक आहे, असें समजतें. कारण हीं सर्व इंद्रियें परतंत्र आहेत. अचेतन गृह जसें जीवांच्या इष्ट कार्यास उपयोगी पडतें तशींच हीं जड परतंत्र इंद्रियें स्वतंत्र व इंद्रियभिन्न प्रेरकाच्या उपयोगीं पडतात. हा अर्थ सांगावयाचा आहे, म्हणून श्रुतीनें जें उत्तर दिलें आहे, तें बरोबर आहे. सारांश, सर्व इंद्रियांचा प्रेरक इंद्रियभिन्न व इंद्रियधर्मभिन्न आहे. जड इंद्रियें इष्टानिष्ट व्यापार करितात, त्यावरून त्यांस कोणी तरी स्वतंत्र प्रेरक आहे, असें ठरतें.

शिष्य—म्हणजे येथें स्वव्यापार-परतंत्र जे देहादिक त्यांहून विलक्षण आणि स्वरूपानें स्वतंत्र असा कोणी तरी एक प्रेरक आहे, हें सिद्ध होतें. सारांश, हा सर्वेंद्रियविलक्षण असा इंद्रियप्रेरक आहे, म्हणून त्याला श्रोत्राचें श्रोत्र व चक्षूचें चक्षु असें म्हटलें.

पूर्वपक्षी—कानाचा कान, किंवा डोळ्याचा डोळा हा काय पदार्थ आहे ? मला वाटत नाहीं कीं कोठें कानाला कान किंवा डोळ्याला डोळे असतात, असें श्रुतीस सांगावयाचें आहे ! प्रकाशाला दुसरा कोणी प्रकाशक लागत नाहीं. त्याचप्रमाणें कानाला कानही असणें शक्य नाहीं. तेव्हां हा तुमचा कानाचा कान हा काय पदार्थ आहे ? सांगा पाहूं.

सिद्धान्ती—यांत गडबडण्यासारखें कांहीं नाहीं. असें पहा कीं कानाला शब्द प्रकट करण्याचें जें सामर्थ्य आहे, तें त्याचें स्वतःचें असतें काय? नाहीं. तर नित्य सन्निहित असणारें सर्वांतर्यामी, स्वयंप्रकाश, असें जें चैतन्य आहे, त्याच्या सामर्थ्यानें आपलें श्रोत्र हें शब्द प्रकट करूं शकतें. होय ना? हें चैतन्य नसतें तर श्रोत्राला आपला विषय व्यक्त करितां आला असता काय? नाहीं. तेव्हां श्रोत्राचें शब्दप्रकटनाचें सामर्थ्य ज्या चैतन्यामुळें प्राप्त होतें, त्या चैतन्याला श्रोत्राचें श्रोत्र म्हटलें हें योग्यच झालें. याचप्रमाणें इतर इंद्रियांचें विवेचन समजावें. दुसऱ्या श्रुति काय म्हणतात तें पहा. 'याला जें तेजः-सामर्थ्य आहे, तें तेजस्वी आत्म्यामुळें होय' 'ह्याच्या प्रकाशानें हें सर्व प्रकाशतें' 'ज्याच्या तेजानें पुष्ट झाल्यामुळें सूर्य प्रकाशरूप होतो.' तसेंच, गीतेमध्येंही म्हटलें आहे. 'जगाला प्रकाश देणारें जें सूर्याचें सर्व तेज आहे, तें माझें आहे' क्षेत्र व त्याचप्रमाणें इतर सर्व वस्तु हा क्षेत्री (क्षेत्रज्ञ, आत्मा) प्रकाशितो,' कठश्रुतीमध्यें म्हटलें आहे. 'हा आत्मा नित्यांचा नित्य आणि चेतनांचा चेतन आहे.' असो; या व इतर श्रुति असें स्पष्ट सांगतात कीं, सर्वांचा कर्म-प्रेरक आत्मा आहे.

शिष्य—भगवन्! यावरून पुष्कळ लोक श्रोत्रादि इंद्रियेंच आत्मा आहे असें समजतात, तें खोटें आहे. श्रोत्रादि इंद्रियें म्हणजे आत्मा. यांच्या पलीकडे कांहीं नसून तीं स्वतंत्र आहेत असें म्हणणाऱ्या नास्तिकांचें म्हणणें खोटेंच म्हणावयाचें!

सिद्धान्ती—खोटें म्हणून काय विचारतोस? अरे! त्यांत सत्याचा एक रतिभर सुद्धां अंश नाहीं. केवळ इंद्रियेंच तीं! त्यांचा उपयोजक दुसराच आहे. असो; बाबा! सर्वप्रेरक आत्मा कसा आहे तो पहाः हा आत्मा केवळ विद्वान् लोकांच्या निर्मळ बुद्धीला मात्र समजणारा, सर्वांच्या अंतःकरणामध्यें वास्तव्य करणारा, कूटस्थ; अजर, अमर, अभय, अज, श्रोत्रादिकांस श्रोत्ररूपानें स्वव्यापारसामर्थ्य देणारा, असा आहे श्रुतीनें जें उत्तर दिलें आहे. त्याचा हा अर्थ आहे. श्रोत्राचा प्रेरक कोण? याला उत्तर श्रोत्रांचें श्रोत्र म्हणजे आतांच सांगितलेला इंद्रियांच्या सामर्थ्याचा प्रकाशक आत्मा आहे. असेंच बाकीच्या प्राणमनासंबंधीं स्पष्टीकरण आहे. सर्वांचा प्रेरक आत्मा आहे. इच्छा-मात्रें करून प्रेरणा करणाऱ्या आत्म्याच्या सामर्थ्यानें सर्व इंद्रियें आपापले व्यापार करितात, अथवा इंद्रियांच्या द्वारा आत्म्याचें अस्तित्व निरनिराळे व्यापार करवितें.

शिष्य—मनाचीही हीच गोष्ट आहे काय?

सिद्धान्ती—होय होय!! स्वयंप्रकाश चैतन्यज्योति जर नसती किंवा चैतन्य-ज्योतीनें अंतःकरण प्रकाशित झालें नसतें, तर अंतःकरणाला संकल्प करणें,

निश्चय करणें, ध्यानांत ठेवणें इत्यादि व्यापार करितांच आले नसते. म्हणून आत्म्याला मनाचें मन म्हटलें. समजलें ?

शिष्य—पण येथें मन म्हणजे मन आणि बुद्धि असा अर्थ आहे ना ? बरें झालें ! माझी समजूत बरोबर ठरली.

पूर्व०—अहो ! " ज्या अर्थी वाचेची वाचा आत्मा आहे " या वाक्यखंडांत ' ज्या अर्थी ' याचा संबंध कोणीकडे ?

सिद्धान्ती—याचा संबंध हा: ' ज्या अर्थी ' हा शब्द कर्ण, मन, वाणी, प्राण, चक्षु ह्या सर्वांशीं संबद्ध आहे. त्याचा असा अर्थ करावयाचा कीं ज्या अर्थी वाणीचा प्रेरक आत्मा आहे किंवा मनाचा प्रेरक आत्मा आहे, त्या अर्थी जड मनादिकांचे ठिकाणी आत्मबुद्धि असते तिचा त्याग करून प्रेरकाचा मात्र स्वीकार करणें हें बुद्धिमान् पुरुषाला योग्य आहे. मन आत्मा नव्हे म्हणून त्याचा व तसाच सर्व इंद्रियांचा त्याग करावा, असा उपदेश आहे.

पूर्व०—तें असो; पण येथें मंत्रांत 'वाचो ह वाग्' असा व्याकरणशुद्ध प्रयोग करावयाचा सोडून "वाचो ह वाचं" असा व्याकरण-दुष्ट प्रयोग कसा केला ?

सिद्धान्ती—येथें द्वितीयेचा अर्थ प्रथमापर करावयाचा आहे. श्रुतीस हेंच इष्ट आहे.

पूर्व०—कशावरून ?

सिद्धान्ती—प्राणाचा प्राण असा प्रयोग आहे, त्यांत प्राण हा शब्द प्रथमांत आहे. त्यावरून " वाचं " याचा अर्थ प्रथमापरच घेतला पाहिजे.

पूर्व०—नाहीं. तसें न करितां आपण प्राण हा प्रथमान्त शब्द द्वितीयापर कां घेऊं नये ? कारण " वाचं " ही द्वितीया आहे. पहिल्या वाचं या शब्दाच्या अनुरोधानें प्राण या शब्दानें चालावें. निदान, तुमचेंच म्हणणें आम्ही तरी काय म्हणून घ्यावें ?

सिद्धान्ती—पुष्कळ शब्दांच्या अनुरोधानें पाहिलें असतां " वाच् " हा शब्द प्रथमान्तच घेतला पाहिजे, असें दिसतें. प्राणाचा प्राण हे दोन शब्द आहेत; या दोन शब्दांच्या अनुरोधानें वाच् शब्दाचा अर्थ ठरविला पाहिजे. आम्हीं केला आहे हाच अर्थ वाक्यार्थी सुसंगत आहे. कारण ' स देवः ' (तो देव) हे शब्द प्रथमाविभक्तीमध्यें आहेत. ' वाचं ' शब्दाच्या पाठीमागें असा दुसरा द्वितीयांत शब्द नाहीं. ' स ' आणि प्राण हे दोन प्रथमान्त शब्द, ' वाचं ' हा प्रथमान्तच असला पाहिजे, असें ठरवितात. तुम्हीं म्हणतां या सरणीनें वाक्यांतील जास्त शब्दांचा उपरोध होतो. शिवाय, ' प्रेरक कोण ?' या प्रश्नाचें उत्तर प्रथमाविभक्तीमध्येंच दिलें पाहिजे. प्रेरक कोण याचें उत्तर

द्वितीयान्त असणें योग्य नाहीं. असो; आचार्य साधकाला म्हणतात,–जो तूं प्राणाचा प्रेरक विचारलास तो हा प्राणाला प्राणनसामर्थ्य देणारा, जीवंत राहण्याचें सामर्थ्य देणारा, प्राण म्हणजे आत्मा आहे. आत्म्याचें अधिष्ठान नसेल तर प्राणाला प्राणनसामर्थ्य राहणार नाहीं. श्रुति सांगतेः–'याच्या (आत्म्याच्या) शिवाय कोण जगेल, कोण श्वासोच्छ्वास करूं शकेल ?' 'जर हा आनंदरूपी आकाश आत्मा नसेल तर कोणाच्या क्रिया चालू राहतील ?' 'हा प्राणाला वरती नेतो आणि खालींही ढकलितो.' येथेंही म्हटलें आहे. "प्राणाला जें प्राण देतें, तेंच ब्रह्म आहे असें तूं जाण."

पूर्वपक्षी—कर्णादि इंद्रियें घेतलीं, तेव्हां घ्राणांतील प्राणवायूचें म्हणजे श्वासोच्छ्वासाचें ग्रहण कां केलें नाहीं ?

सिद्धान्ती—प्राणाचें ग्रहण केलें, ह्यांतच श्वासोच्छ्वासाचें ग्रहण केल्यासारखें झालें. नाहीं काय ? असो; श्रुतीचें तात्पर्य हें आहे कीं ज्याच्या प्रेरणेनें सर्व इंद्रियें, आपापलीं कार्यें करण्यास प्रवृत्त होतात, तें ब्रह्म आहे. हा सर्व प्रकरणाचा अर्थ आहे. अर्थातच रूपाचा प्रकाश करणारा चक्षु आहे. त्याला रूप-ग्रहण करण्याचें सामर्थ्य आहे, तें तेथें आत्म–चैतन्य अधिष्ठित आहे म्हणून आहे. याप्रमाणें साधकानें जो प्रश्न विचारला होता आणि ज्याचें उत्तर त्याला हवें होतें त्या प्रश्नाचें उत्तर 'इंद्रियांचें प्रेरक ब्रह्म आहे, सर्व–प्रेरक ब्रह्म आहे, असें ज्ञान करून घेणें अत्यंत इष्ट आहे' हें अध्याहृत ध्यावें, असें स्पष्ट दिसतें. कारण 'अमृतत्व प्राप्त होतें' हें पुढें फल सांगितलें आहे. आणि ज्ञानानें मोक्ष मिळतो हें प्रसिद्ध आहे. असो; तेव्हां, 'ज्ञान झाल्यावर मोक्ष मिळतो' या वाक्याच्या सामर्थ्यानें पुढील वाक्याचा असा अर्थ करावयाचा कीं कर्ण–नेत्रादि सकल इंद्रियें सोडून देऊन जे पुरुष आत्मज्ञान करून घेतात, तें मुक्त होतात; पण जे लोक इंद्रियादिकांचे ठिकाणीं आत्मभाव धारण करितात ते उपाधिग्रस्त व उपाधिरूप होऊन जन्ममरणाच्या चक्रांत सांपडतात. म्हणून श्रोत्रादिकांच्या ठिकाणीं आत्मभाव न ठेवणारे बुद्धिमान् लोक श्रोत्रांचा प्रेरक जो परमात्मा अथवा प्रत्यगात्मा त्याचें स्वरूप समजून घेतात.

पूर्वपक्षी—म्हणजे असें कीं मोक्ष हा पदार्थ सर्वांसच साध्य आहे !

सिद्धान्ती—नाहीं. बुद्धि शुद्ध होऊन जेव्हां तिला विशेष संस्कार प्राप्त होतो, तेव्हां तिला इंद्रियें आत्मा नव्हेत. असें निश्चयानें समजतें. विशेष–ज्ञान झाल्याशिवाय इंद्रियादिकांमध्यें भासणारा जड आत्मभाव सोडितां येत नाहीं. असो; ह्या लोकामधून गेल्यावर म्हणजे पुत्र, मित्र, कलत्र, बंधु यांच्या ठिकाणीं ज्या ममत्वानें व अभिमानानें व्यवहार होतो, त्या ममत्वाभिमानाचा त्याग केल्यावर, पुत्रैषणा, वित्तैषणा, लोकैषणा इत्यादिकांचा त्याग कल्यावर हे बुद्धिमान् लोक अमरत्व पावतात, 'अमरत्व प्राप्त करून घ्यावयाचें असेल, तर तें कर्मानें

किंवा संपत्तीनें किंवा धनानें प्राप्त व्हावयाचें नाहीं. त्यागानें मात्र अमरत्व प्राप्त होतें.' 'घात्यानें इंद्रियें बहिर्मुख केलीं आहेत.' 'मनासह सर्व इंद्रियें स्तब्ध करून अमरत्वाची इच्छा करितो.' 'जेव्हां सर्व आशापाश नाहींसे होतात.' 'येथें ब्रह्मप्राप्ति करून घेतो.' सारांश, हा पुरुष ह्या लोकींच अमर होतो.

शिष्य—किंवा सर्व वासनांचा त्याग सिद्ध झाल्यानंतर हा पुरुष हें शरीर सोडून गेला अथवा मेला म्हणजे तो अमर होतो असा अर्थही होईल.

सिद्धान्ती—अरे! 'शरीर असतांना जो अमर झाला, तो शरीर-त्याग केल्यावर अमर होतो, असा अर्थ करण्यास कांहींच हरकत येणें शक्य नाहीं ॥२॥

न तत्र चक्षुर्गच्छति न वाग्गच्छति नो मनो न विद्मो न विजानीमो यथैतदनुशिष्यादन्यदेव तद्विदितादथो अविदितादधि । इति शुश्रुम पूर्वेषां ये नस्तद्व्याचचक्षिरे ॥ ३ ॥

अन्वय व अर्थ—**तत्र चक्षुः न गच्छति, वाक् न गच्छति न मनः** (तेथें नेत्राला जातां येत नाहीं. वाणीला जातां येत नाहीं व मनालाही जातां येत नाहीं.) **न विद्मः न विजानीमः यथा एतत् अनुशिष्यात्** (हें ब्रह्म आम्हांस म्हणजे आमच्या बुद्धीस माहीत नाहीं. आणि शिष्याला ब्रह्माची समजूत कशी करून द्यावी, हेंही आम्हांस विदित नाहीं.) **विदितात् तत् अन्यत् एव** (जाणलेल्या किंवा जाणण्यास योग्य अशा वस्तूंहून तें निराळेंच आहे.) **अथ अधि अविदितात्** (व न जाणलेल्या किंवा न कळणाऱ्या वस्तूंहून तें निराळेंच आहे.) **इति** (याप्रमाणें) **पूर्वेषां शुश्रुम** (पूर्वीच्या संप्रदायशुद्ध आचार्यांकडून आम्हांस कळलें आहे.) **ये नः तत् व्याचचक्षिरे** (या गुरुजीनींच आम्हांस पूर्वी ब्रह्मविषयाचें व्याख्यान सांगितलें होतें.)

सारांश, ही सर्वप्रवर्तक व ज्ञानरूप ब्रह्मवस्तु अशी आहे कीं, ती डोळ्याला दिसत नाहीं, वाणीला तिचा उच्चार करितां येत नाहीं, मनानें तिचें आकलन करितां येत नाहीं, बुद्धीला तिचें ग्रहण करितां येत नाहीं, सारांश, ही ब्रह्मवस्तु इंद्रियें, मन, आणि बुद्धि यांस अगोचर आहे. ही वस्तू आत्म-साक्षात्कारानें अधिगत झाली तरी तिचें ज्ञान दुसऱ्यांस करून देतां येत नाहीं. ही वस्तु ज्ञात व ज्ञेय आणि अज्ञात व अज्ञेय या वस्तूंहून निराळी आहे; असें आम्हीं

ज्या संप्रदायशुद्ध आचार्यां जवळून आत्मज्ञानाचा उपदेश करून घेतला त्यांनी आम्हांस सांगितलें आहे.

यस्माच्छ्रोत्रादेरपि श्रोत्राद्यात्मभूतं ब्रह्मातो न तत्र तस्मिन्ब्रह्मणि चक्षुर्गच्छति। स्वात्मनि गमनासंभवात्। तथा न वाग्गच्छति। वाचा हि शब्द उच्चार्यमाणोऽभिधेयं प्रकाशयति यदा तदाऽभिधेयं प्रति वाग्गच्छतीत्युच्यते। तस्य च शब्दस्य तन्निर्वर्तकस्य च करणस्याऽऽत्मा ब्रह्मातो न वाग्गच्छति। यथाऽग्निर्दाहकः प्रकाशकश्चापि सन्न ह्यात्मानं प्रकाशयति दहति च तद्वत्। नो मनो मनश्चान्यस्य संकल्पयित्रध्यवसायितृ च सदात्मानं संकल्पयत्यध्यवस्यति च तस्यापि ब्रह्माऽऽत्मेतीन्द्रियमनोभ्यां हि वस्तुनो विज्ञानं तदगोचरत्वान्न विद्मस्तद्ब्रह्मेदृशमित्यतो न विजानीमो यथा येन प्रकारेणैतद्ब्रह्मानुशिष्यादुपदिशेच्छिष्यायेत्यभिप्रायः। यद्धि करणगोचरं तदन्यस्मा उपदेष्टुं शक्यं जातिगुणक्रियाविशेषणैः। न तज्जात्यादिविशेषणवद्ब्रह्म। तस्माद्विषमं शिष्यानुपदेशेन प्रत्याययितुमिति। उपदेशे तदर्थग्रहणे च यत्नातिशयकर्तव्यतां दर्शयति—न विद्म इत्यादि। अत्यन्तमेवोपदेशप्रकारप्रत्याख्याने प्राप्ते तदपवादोऽयमुच्यते। सत्यमेवं प्रत्यक्षादिभिः प्रमाणैर्न परः प्रत्याययितुं शक्यः। आगमेन तु शक्यत एव प्रत्याययितुम्। तदुपदेशार्थमागममाह—अन्यदेव तद्विदितादथो अविदितादधीति। अन्यदेव पृथगेव तद्यत्प्रकृतं श्रोत्रादीनां श्रोत्रादीत्युक्तमविषयं च तेषाम्। तद्विदितादन्यदेव हि विदितं नाम याद्विदिक्रियया ऽतिशयेनाऽऽप्तं तद्विदिक्रियाकर्मभूतं क्वचित्कचित्कस्यचिद्विदितं स्यादिति सर्वमेव व्याकृतं तद्विदितमेव तत्तस्मादन्यदित्यर्थः। अविदितमज्ञातं तर्हीति प्राप्त आह—अथो अविदिताद्विदितविपरीतादव्याकृतादविद्यालक्षणाद्व्याकृतबीजात्। अधीत्युपर्यर्थे लक्षणयान्यदित्यर्थः यद्धि यस्मादध्युपरि भवति तत्तस्मादन्यदिति प्रसिद्धं यद्विदितं तदल्पं मर्त्यं दुःखात्मकं चेति हेयम्। तस्माद्विदितादन्यद्ब्रह्मेत्युक्ते त्वहेयत्वमुक्तं स्यात्। तथाऽविदितादधीत्युक्तेऽनुपादेयत्वमुक्तं स्यात्। कार्यार्थं हि कारणमन्यदन्येनोपादीयतेऽतश्च न वेदितुरन्यस्मै प्रयोजनायान्यदुपादेयं भवतीत्येवं विदिताविदिताभ्यामन्यदिति हेयोपादेयप्रतिषेधेन स्वात्मनोऽन्यब्रह्मविषया जिज्ञासा शिष्यस्य निवर्तिता स्यात्। न ह्यन्यस्य स्वात्मनो विदिताविदिताभ्यामन्यत्वं वस्तुनः संभवतीत्यात्मा ब्रह्मेत्येष वाक्यार्थः।

"अयमात्मा ब्रह्म" "य आत्माऽपहतपाप्मा" । यत्साक्षादपरोक्षाद्ब्रह्म" । "य आत्मा सर्वान्तरः" इत्यादिश्रुत्यन्तरेभ्यश्चेत्येवं सर्वात्मनः सर्वविशेषरहितस्य चिन्मात्रज्योतिषो ब्रह्मत्वप्रतिपादकस्य वाक्यार्थस्याऽऽचार्योपदेशपरम्परया प्राप्तत्वमाह—इति शुश्रुमेत्यादि । ब्रह्म चैवमाचार्योपदेशपरम्परयैवाधिगन्तव्यं न तर्कतः प्रवचनमेधाबहुश्रुततपोयज्ञादिभ्यश्चेत्येवं शुश्रुम श्रुतवन्तो वयं पूर्वेषामाचार्याणां वचनम्। य आचार्या नोऽस्मभ्यं तद्ब्रह्म व्याचचक्षिरे व्याख्यातवन्तो विस्पष्टं कथितवन्तस्तेषामित्यर्थः ॥ ३ ॥

सिद्धान्ती–श्रोत्रादिकांचें मुद्धां श्रोत्रादि (म्हणजे प्रेरक व नियामक) ब्रह्म आहे, म्हणून त्या ब्रह्माचे ठिकाणीं चक्षूला जातां येत नाहीं, म्हणजे डोळ्याला तें ब्रह्म दिसत नाहीं.

शिष्य––कारण, ब्रह्म डोळ्याचा आत्मा आहे ?

सिद्धान्ती––होय, डोळ्याचा आत्मा डोळ्याला कसा दिसणार? याच प्रमाणें वाचेची गोष्ट आहे. शब्दाचा उच्चार होत असतां मनामधील अभिधेय (जें काय बोलावयाचें आहे तें) वाणी जेव्हां प्रकाशूं लागते, तेव्हां त्या अभिधेयाकडे वाणी जाते, असें म्हणतात. पण त्या शब्दाचा आणि त्या शब्दाला प्रकाशणाऱ्या वाणीचा आत्मा ब्रह्म असल्यामुळें तिला ब्रह्माचें ग्रहण करितां येत नाहीं. अग्नि हा दाहक व प्रकाशक खरा; तरी आपल्या स्वतःला तो जाळीत नाहीं किंवा प्रकाशित नाहीं. ही वाणीची व्यवस्था झाली. आतां, मनालाही ब्रह्माचें ग्रहण करितां येत नाही. मन हें दुसऱ्या विषयाचा संकल्प किंवा निश्चय करितें व आपल्या स्वतःचाही संकल्प व निश्चय करितें; तथापि त्याचा नियामक आत्मा ब्रह्म आहे म्हणून मनाला ब्रह्म ग्रहण करितां येत नाहीं.

शिष्य––भगवन् ! आपल्यास वस्तूचें ज्ञान होतें, तें इंद्रियमनांच्या साहाय्यानें होतें. आतां मन आणि ब्रह्म या उभयतांसही जर ब्रह्मवस्तु समजत नाहीं, तर ब्रह्म हें अमुक स्वरूपाचें आहे, असें आपल्यास समजावयाचें नाहीं. ह्याचप्रमाणें दुसऱ्याला सांगण्याचा प्रकारही आपल्यास माहीत असावयाचा नाहीं. म्हणजे ब्रह्म आपल्यास कळावयाचें नाहीं व दुसऱ्यासही कळवून देतां यावयाचें नाहीं, असें झालें.

सिद्धान्ती–छान ! ठीक समजलास. आतां––

पूर्व०–कां बरें ? कळवून कां देतां यावयाचा नाहीं आत्मा ? ज्या पदार्थाचा आपल्यास उपदेश करावयाचा असतो, त्याची जाति, त्याचे गुण आणि त्याचें कर्म हीं सांगितलीं म्हणजे आपल्यास त्या वस्तूचें ज्ञान देतां घेतां येतें.

सिद्धान्ती––हें तुमचें बोलणें बरोबर आहे; पण जें ब्रह्म इंद्रियादिकांस गोचरच होत नाहीं, त्याची जाति–गुणादि विशेषणें कशीं सांगतां येणार ! शिवाय

ब्रह्माला जाति नाहीं, गुण नाहीं आणि तें कोणती क्रियाही करित नाहीं. तेव्हां इंद्रियादिकांस जें अगोचर, जें अद्वितीय, निर्गुण आणि निष्क्रिय असें ब्रह्म-वस्तु आहे, त्या ब्रह्मवस्तूचा उपदेश दुसऱ्या शिष्यादिकांस कसा करितां येणार ? आतां या मंत्रामध्यें ' आपल्यास ब्रह्म कळत नाहीं. व तें लोकांस सांगतांही येत नाहीं ' इत्यादि म्हटलें आहे, त्यावरून तें समजून देण्याचा व समजून घेण्याचा अतिशय यत्न करणें हें आपलें कर्तव्य आहे,—असें श्रुति सांगत आहे.

पूर्वपक्षी—हें हो काय ? कोणत्याही प्रकारानें ब्रह्माचा उपदेश दुसऱ्याला करितां यावयाचा नाहीं, असें अत्यंत आग्रहानें बोललतां काय, आणि आतां ब्रह्मवस्तु समजून घेण्या देण्याचें कर्तव्य करावें, असें म्हणतां काय ? तुमच्या बोलण्याचें तात्पर्य तरी काय ?

सिद्धान्ती—तात्पर्य होय ? त्याचें तात्पर्य असें आहे कीं प्रत्यक्षादि प्रमाणांनीं जरी ब्रह्मोपदेश दुसऱ्यास उमजेल अशा रीतीनें करितां यावयाचा नाहीं, तथापि श्रुतीचे ब्रह्मप्रतिपादक मंत्र खचीत समजून देतां घेतां येतील.

पूर्वपक्षी—आहे का एखादी अशी श्रुति कीं जी मला इंद्रियागोचर ब्रह्माचा उपदेश करूं शकेल ?

सिद्धान्ती—मंत्राचा पुढचा भागच पहा काय सांगत आहे तें !

पूर्व०—मंत्राचा अर्थ असा दिसतो कीं तें ज्ञात वस्तूहून निराळें आहे व अज्ञात वस्तूहूनही निराळें आहे.

सिद्धान्ती—अन्यत् म्हणजे पृथक् किंवा निराळे होय. आपण ब्रह्म म्हणजे नेत्राचें नेत्र, मनाचे मन इत्यादि ब्रह्मलक्षण केलें आहे. हें चर्चाविषयक ब्रह्म इंद्रियादिकांस अगोचर आहे, हेंही आपण आतांच ठरविलें. आतां जी वस्तु ' जाणणें ' या क्रियेनें अतिशय जवळ येते म्हणजे प्राप्त होते, ती वस्तु ' जाणणें ' या क्रियेचें कर्म होतें. आतां हें ज्ञेय (जाणण्याचें कर्म असणारी वस्तु) कोठें आहे, केवढें आहे, कोणाला ज्ञात आहे, याची उत्तरें देतां आलीं म्हणजे तें ज्ञेय व्याकृत (व्यक्त) स्वरूपाचें असतें. अथवा विदित असणारी गोष्ट ज्ञेय म्हणजे व्याकृत अथवा दृश्य असते. सारांश, व्याकृत वस्तु ज्ञात किंवा ज्ञेय असते. तिच्यापासून निराळी, ती अविदित वस्तु होय. अर्थातच ही वस्तु अविदित अथवा अज्ञात झाली. म्हणून ब्रह्मवस्तूला ज्ञेय किंवा ज्ञातवस्तूहून निराळी, असें म्हटलें आहे.

शिष्य—तसेंच, ती वस्तू विदित–विलक्षण म्हणजे अव्याकृत म्हणजे अविद्या. अविद्याही सर्व जें कांहीं व्याकृत आहे, त्याची आदिजननी आहे. लक्षणानें सांगतां येणारी जी वस्तू त्याहून ही निराळी आहे, असें झालें. म्हणजे ही वस्तु विदित नाहीं; आणि अविदित नाहीं असें ठरलें.

सिद्धान्ती—होय; आणि 'ती वस्तु विज्ञात होणें शक्य नाहीं,' अशी शंका पूर्वपक्षानें काढिली असती, तिचें निराकरण केलें. सारांश, ही वस्तु ज्ञेयाज्ञेय-विलक्षण आहे, असें ठरलें.

शिष्य—मंत्रांत "अधि" शब्द आहे, त्याचा अर्थ काय ? 'अधि' चा अर्थ तर उपर (म्हणजे वर असणें) असा आहे.

सिद्धान्ती—येथें त्याचा अर्थ 'निराळा' असा आहे, अधि म्हणजे निराळा, भिन्न असा अर्थ करावा.

पूर्व०—तुम्हीं आतां शब्दांचे अर्थही फिरवूं लागलां ! 'वर' याचा 'भिन्न, निराळा' असा कसा अर्थ होईल. हा तुमचा शब्दावरही पगडा बसूं लागला बरें.

सिद्धान्ती—नाहीं. एक वस्तु दुसऱ्या वस्तूवर असली म्हणजे वर असणारी वस्तु खालच्या वस्तूहून निराळी नसते काय ? आम्ही अर्थाची फिरवाफिरव किंवा ओढाताण मुळींच करित नाहीं. असो, जी जी गोष्ट आपल्यास समजते आपल्या परिच्छिन्न बुद्धीच्या कक्षेंत येते, ती ती अल्प, मर्यादित, विनाशी, आणि दुःख देणारी असते.–म्हणजे जें विदित आहे, तें अल्प, विनाशी आणि दुःखद आहे, म्हणून त्याज्यही आहे.

शिष्य—पण आपण ब्रह्माला 'ज्ञात वस्तूहून निराळें' असें ठरविलें आहे, ज्ञात वस्तू त्याज्य झाली, तर अज्ञातवस्तू अत्याज्य होणार म्हणजे सर्वांनीं ब्रह्म वस्तूचा स्वीकार करावा अशी ती वस्तू होणार.

पूर्व०–त्याबरोबरच अविदित म्हणजे अज्ञात वस्तूहून ब्रह्मवस्तु निराळी आहे, आहे, म्हणजे अत्याज्य (न टाकून देतां येण्यासारखी) नाहीं म्हणजे 'स्वीकार्य' आहे असें ठरेल. स्वीकार्य वस्तू अल्प म्हणजे त्याज्य असते; म्हणून ब्रह्मवस्तु त्याज्यही ठरेल. तेव्हां हा घोटाळा आहे तरी काय ? ब्रह्मवस्तु 'त्याज्य नाहीं' असेंही सांगतां !

सिद्धान्ती––तुम्ही अजून ब्रह्मवस्तूचें रहस्य समजून घेतलें नाहीं. थोडी कृपा करून, थोडेंसें चित्त देऊन, ऐका:–आपल्यास एखादें कार्य करावयाचें असलें म्हणजे त्या कार्याचें कारण कार्याहून निराळें असतें आणि तें दुसऱ्यास देतां घेतांही येतें, हें ठीक आहे. पण जाणणारा जो आहे. त्याची जाणीव दुसऱ्याच्या हेतुसिद्धीसाठीं दुसऱ्याला देतां घेतां येत नाहीं. म्हणून ब्रह्म वस्तूला ज्ञाताज्ञात-वस्तूहून निराळी असें म्हटलें आहे. म्हणून तिचें हेय (त्याज्यत्व) व उपादेयत्व (स्वीकार्यत्व) निषिद्ध केलें आहे. याचा अर्थ असा आहे:. 'आत्म स्वरूपाशिवाय ब्रह्म ही निराळी वस्तु आहे' अशा शिष्याच्या समजुतीचा निरास करावयाचा आहे. आपल्यास जें ब्रह्म समजून घ्यावयाचें तें आत्मस्वरूपाहून निराळे नाहीं असें सांगावयाचें आहे. जी वस्तू हेय नाहीं व उपादेय नाहीं, ती

आत्मवस्तुच असली पाहिजे. आपल्या सगळ्यास ठाऊक आहे कीं 'आपला आत्मा आहे' हें सर्व लहान थोरास विदित आहे. पण तो कसा आहे, हें मात्र एक दुसऱ्यास सांगूं शकणार नाहीं. आपला 'आत्मा नाहीं' असें कोणीही म्हणत नाहीं. पण अमुक प्रकारचा तो आहे आहे असें कोणासही सांगतां येत नाहीं. सारांश, तो विदित आहे व विदित नाहीं. म्हणजे तो अविदिताहून निराळा आणि विदिताहून निराळा आहे, असें झालें. आपला आत्मा कोणास टाकितां येत नाहीं किंवा कोणाला नवीन करितांही येत नाहीं. आतां, अशी दुसरी कोणतीही वस्तु नाहीं कीं जी विदित असून अविदित असते किंवा त्याज्य असून त्याज्य नसते. आत्माही त्याज्य व अत्याज्य वस्तु नाहीं, हे आपल्यास ठाऊक आहे. ब्रह्म हे त्याज्य अत्याज्य (हेय व उपादेय नाहीं असें) नाहीं असें श्रुति म्हणते. यावरून आत्मा म्हणजे ब्रह्म असें युक्तीनेंच ठरलें. श्रुति म्हणते "मी आत्मा ब्रह्म आहें" "हा आत्मा पापशून्य आहे" "हा आत्मा अपरोक्ष ब्रह्मच आहे" "हा आत्मा सर्वांचा अंतर्यामी आहे" असें एकतानतेनें अनेक श्रुति-वाक्यें म्हणतात. याप्रमाणें सर्वांतर्यामी, सर्व-विशेष-शून्य (निर्गुण) ज्ञानाचा मात्र प्रकाश जें आहे, अशा ब्रह्माचें प्रतिपादन करणारे हें वादविषयक वाक्य आहे. त्याचा अर्थ गुरुपरंपरेनें समजून घेतला पाहिजे. असो, आतां अर्थ काय होतो, तो पहाः—या वाक्याचा अर्थ 'ब्रह्म म्हणजे सर्व इंद्रियादिकांस अगोचर असलेला आत्मा होय,' असा आहे. हा अर्थ संप्रदायपद्धतीनेंच, समजून घेतला पाहिजे. सारांश, ब्रह्मस्वरूप समजन घ्यावयाला संप्रदायशुद्ध आचार्योपदेश हेंच एक साधन आहे. हें ब्रह्मतत्त्व नुसत्या तर्कानें, मीमांसेने, स्वबुद्धीनें, बहुश्रुतपणानें, तपानें, यज्ञानें किंवा इतर कोणत्याही अन्य साधनानें, समजावयाचें नाहीं, असें येथें श्रुति सांगत आहे. प्रश्न विचारावयास आलेल्या साधकाला आचार्य सांगतात कीं "'इंद्रियादिकांस सर्वथा अगोचर असणारा आत्मा म्हणजे ब्रह्म होय' असें "आमच्या ब्रह्मोपदेशक गुरूजीनी आम्हास सांगितलें आहे."

सारांश, ब्रह्मस्वरूपाचें श्रुतिबलानें व श्रुत्यनुकूल अनुमानादि प्रमाणांनीं संप्रदायज्ञ गुरु मात्र स्पष्टीकरण करूं शकतात. तात्पर्य, आत्मा म्हणजे ब्रह्म आणि ब्रह्म म्हणजे आत्मा हें या श्रुतीचें रहस्य ठरलें आणि तुम्ही जो विलक्षण घोटाळ्याचा पूर्वपक्ष केला होता, याचाही निकाल झाला. ॥ ३ ॥

अन्यदेव तद्विदितादथो अविदितादधीत्यनेन वाक्येनाऽऽत्मा ब्रह्मेति प्रतिपादिते श्रोतुराशङ्का जाता तत्कथं त्वात्मा ब्रह्म । आत्मा हि नामाधिकृतः कर्मण्युपासने च संसारी कर्मोपासनं वा साधनमनुष्ठाय ब्रह्मादिदेवान्स्वर्गं वा प्राप्तुमिच्छति तत्तस्मा-

दन्य उपास्यो विष्णुरीश्वर इन्द्रश्च प्राणो वा ब्रह्म भवितुमर्हति न त्वात्मा । लोकप्रत्ययविरोधात् । यथाऽन्ये तार्किका ईश्वरादन्य आत्मेत्याचक्षते तथा कर्मिणः "अमुं यजामुं यज" इत्यन्या एव देवता उपासते। तस्माद्युक्तं यद्विदितमुपास्यं तद्ब्रह्म भवेत्। ततोऽन्य उपासक इति तामेतामाशङ्कां शिष्यलिङ्गेनोपलक्ष्य तद्वाक्याद्वाऽऽह मैवं शङ्किष्ठाः ॥

पूर्व०—याप्रमाणें 'विदित वस्तूहून व अविदित वस्तूहून ब्रह्म निराळें आहे' या आधारावर ब्रह्म म्हणजे आत्मा व आत्मा म्हणजे ब्रह्म, असा जो आपण निष्कर्ष काढिला तो मला ग्राह्यसा दिसत नाहीं. आत्मा म्हणजे कर्म किंवा उपासना करण्याचा अधिकारी, संसारामध्यें असणारा व कर्म आणि उपासना या साधनाचें अनुष्ठान करून ब्रह्मलोकादि स्वर्ग लोकांची किंवा तेथील लोकांची प्राप्ति करून घेऊं इच्छिणारा जीव आहे, अशी आमची समजूत आहे. तसेंच, त्याच्याहून निराळा असणारा, सर्वांनीं उपासना करण्यास योग्य असा विष्णु, किंवा शंकर, किंवा इंद्र, किंवा प्राण हे सर्व किंवा यांच्या पैकीं एकेक ब्रह्मपदवीला योग्य आहेत, असा ब्रह्मशब्दाचा अर्थ आम्हीं समजतों. यावरून, आत्मा म्हणजे ब्रह्म नव्हे, हें सिद्ध झालें. शिवाय, लौकिक समजूतही मी म्हणतों तशीच आहे. पुनः पुष्कळ नैयायिक असें म्हणतात कीं, आत्मा हा ईश्वराहून निराळा आहे.' कर्मवादी लोकही 'ह्या देवाप्रीत्यर्थ यज्ञ करा, त्या देवाप्रीत्यर्थ यज्ञ करा' असें सांगून आत्म्याहून देवता निराळ्या आहेत, असें म्हणतात. यावरून असें ठरतें कीं मंत्रांतील विदित शब्दानें उपास्य ब्रह्माचा बोध व्हावा आणि उपासक जीव त्याच्याहून निराळा असावा.

सिद्धान्ती—ह्या असल्याप्रकारच्या शंका शिष्यांना सहजच उत्पन्न होतील, हें मनांत आणून शिष्याचे निमित्तानें किंवा कोणी शिष्यानें तशीच शंका खरोखर घेतली म्हणून श्रुति सांगते कीं अशा प्रकारची शंका किंवा असले कुतर्क करण्याचें कांहीं एक कारण नाहीं.

यद्वाचाऽनभ्युदितं येन वागभ्युद्यते ।
तदेव ब्रह्म त्वं विद्धि नेदं यदिदमुपासते ॥ ४ ॥

अन्वय व अर्थ—वाचा यत् अनभ्युदितं, वाग् येन अभ्युद्यते (वाणीला जें प्रकाशित करितां येत नाहीं; पण ज्याच्या योगानें स्वतः वाणी प्रकाशित होते.) **तत् एव ब्रह्म त्वं विद्धि** (तेंच ब्रह्म होय, असें तूं जाण.) **यत् इदं उपासते न इदं** (जें हें उपासिलें जातें तें हें ब्रह्म नव्हे.)

सारांश, वाणीस अगोचर पण वाणीला प्रकाशित करणारें तें ब्रह्म होय, अर्थात् ज्याची हल्लीं उपासना करितात तें ब्रह्म नव्हे असें समजून घे.

यच्चैतन्यमात्रसत्ताकं वाचा वागिति जिह्वामूलादिष्वष्टसु स्थानेषु विषक्तमाग्नेयं वर्णानामभिव्यञ्जकं करणं वर्णाश्चार्थसङ्केतपरिच्छिन्ना एतावन्त एवं कर्मप्रयुक्ता इत्येवं तदभिव्यङ्ग्यशब्दः पदं वागित्युच्यते। "अकारो वै सर्वा वाक्सैषा स्पर्शान्तस्थोष्मभिर्व्यज्यमाना बह्वी नानारूपा भवति' इति श्रुतेः। मितममितं स्वरः सत्यानृते एव विकारो यस्यास्तया वाचा पदत्वेन परिच्छिन्नया करणगुणवत्याऽनभ्युदितमप्रकाशितमनभ्युक्तं येन ब्रह्मणा विवक्षितेऽर्थे सकरणा वागभ्युद्यते चैतन्यज्योतिषा प्रकाश्यते प्रयुज्यत इत्येतत्। यद्वाचो ह वागित्युक्तं वदन्वाक्। यो वाचमन्तरो यमयतीत्यादि च वाजसनेयके। "या वाक्पुरुषेषु सा घोषेषु प्रतिष्ठिता कश्चित्तां वेद ब्राह्मणः" इति प्रश्नमुत्पाद्य प्रतिवचनमुक्तम्, "सा वाग्यया स्वप्ने भाषते" इति। सा हि वक्तुर्वक्तिर्नित्या वाक्चैतन्यज्योतिःस्वरूपा। "न हि वक्तुर्वक्तेर्विपरिलोपो विद्यते" इति श्रुतेः। तदेवाऽऽत्मस्वरूपं ब्रह्म निरतिशयं भूमाख्यं बृहत्त्वाद्ब्रह्मेति विद्धि विजानीहि त्वं यैर्वागाद्युपाधिभिः। वाचो ह वाक्चक्षुषश्चक्षुः श्रोत्रस्य श्रोत्रं मनसो मनः कर्ता भोक्ता विज्ञाता नियन्ता प्रशासिता विज्ञानमानन्दं ब्रह्मेत्येवमादयः संव्यवहारा असंव्यवहार्ये निर्विशेषे परे साम्ये ब्रह्मणि प्रवर्तन्ते तान्युद्दस्याऽऽत्मानमेव निर्विशेषं ब्रह्म विद्धीत्येवशब्दार्थः। नेदं ब्रह्म यदिदमित्युपाधिभेदविशिष्टमनात्मेश्वराद्युपासते ध्यायन्ति। तदेव ब्रह्म त्वं विद्धीत्युक्तेऽपि नेदं ब्रह्मेत्यनात्मनोऽब्रह्मत्वं पुनरुच्यते। नियमार्थमन्यब्रह्मबुद्धिपरिसंख्यानार्थं वा ॥ ४ ॥

सिद्धान्ती—तुम्हांस ठाऊकच आहे कीं, वाग् (वाणी) हें इंद्रिय अग्निस्वरूपाचें असून जिह्वामूलादि *अष्ट स्थानांवर स्थापित झालें आहे. हें इंद्रिय वर्णांस (स्वरव्यंजनादिकांस) प्रकाशित करितें. 'अमुक वर्णांनी अमुक क्रम असतां अमुक अर्थ मात्र प्रकाशित करावा.' असा संकेत ठरलेला आहे.

---

* उर, कंठ, शिर जिव्हामूल, दंत, नासिका आणि ओष्ठद्वय व तालु हीं वर्णांचीं आठ स्थानें आहेत.

तसेंच, शब्दोच्चार होत असतां ‡स्फोटशक्तीनें अर्थप्रकाशन कसें होतें, हेंही स्पष्ट झालेलें आहे. असो; इतका अर्थ वाग् या शब्दानें अभिव्यक्त होतो. 'अकार' हीच सर्व वाणी आहे. ही स्पर्श, अंतस्थ आणि ऊष्म, या रूपांनीं प्रकट होणारी आहे. ही पुष्कळ आणि पुष्कळ स्वरूपांची आहे.' अशी श्रुतिच आहे. अकार ही ॐकाराची स्फोटाख्य चिच्छक्ति आहे. सर्व वाणीचें हेंच मुख्य रूप आहे. 'क' पासून 'म' पर्यंतचे सर्व वर्ण 'स्पर्श' नांवानें ओळखले जातात; 'य, र, ल, व' यांस 'अंतस्थ' म्हणतात; 'श, ष, स, ह' ह्यांचें 'ऊष्मन्' हें नांव आहे. हा वर्णविचार झाला. वाणीला प्रकट करणारीं अनेक रूपें आहेत. ती केव्हां ऋचेसारख्या नियमित पदांनीं (पद्य), केव्हां यजुसारख्या अनियमित पदांनी (गद्य), केव्हां सामासारख्या सप्तस्वरात्मक स्वरूपामध्यें प्रकट होते. तसेंच, केव्हां ती सत्य (यथार्थवादी) व केव्हां ती असत्य (अयथार्थवादी) या विकारांनीं विकृत होत असते. अशा प्रकारची स्फोट नामक पदानें मर्यादित झालेली, कर्णासारख्या इंद्रियाने उपाधियुक्त असलेली, परिच्छिन्न व उपाधियुक्त वाणी अपरिच्छिन्न व निरुपाधिक ब्रह्मस्वरूपाला प्रकाशित करूं शकत नाहीं. तिला ब्रह्मस्वरूपाचें वर्णन करितां येत नाहीं, हे योग्यच आहे. पण विवक्षित अर्थ इंद्रियाच्या साहाय्यानें प्रकट करावा हें सामर्थ्य किंवा ही प्रेरणा वाणीला ज्ञानरूपी प्रकाशमान ब्रह्मस्वरूपाकडून प्राप्त होते, असा मंत्रांतील पूर्वार्धाचा अर्थ आहे.

पूर्वपक्षी—*आपण म्हणतां याला कांहीं प्रमाण आहे काय ?*

सिद्धान्ती—*आम्ही प्रमाणाशिवाय बोलतच नाहीं. मागच्याच मंत्रात* 'ब्रह्म हें वाणीची वाणी आहे, वाणीचें प्रवर्तक आहे,' असें म्हटलें नाहीं काय ? बृहदारण्यकामध्ये 'आत्मा हा वाणीचें अंतर्याम नियमित करितो' असें म्हटलें आहे. पुनः पुरुषामध्यें जी वाणी प्रतिष्ठित झालेली आढळते, तीच मेघगर्जनेसारख्या तारस्वरामध्येंही दिसते. तिचें स्वरूप जाणणारा कोणी विद्वान् ब्राह्मण आहे काय ?' असा प्रश्न उत्पन्न करून त्याला उत्तर दिलें आहे की, 'स्वप्नामध्यें जिच्या साहाय्यानें आपल्यास बोलतां येतें ती वाणी होय.' सारांश ही मोठ्या भैरव स्वरापासून तो अतिमंद (मनांतील बोलण्याइतका हलु) स्वरापर्यंत वावरत असते. ही वाणी बोलणाऱ्याची वाक्शक्ति आहे; ती वाणीची वाणी नित्य आहे आणि ज्ञानरूप आहे.

पूर्वपक्षी—*ही नित्य आहे हें कशावरून ?*

---

‡ स्फोट म्हणजे कोणत्याही शब्दाचा उच्चार होत असतां पहिलें दुसरें अक्षर प्रकट झाल्याबरोबर जी एक अपूर्व कल्पना उत्पन्न होते व जिच्या योगें आपल्यास शब्दप्रतिपाद्य अर्थ कळतो, ती अखंड शक्ति होय. हा विषय मोठा आहे. यावर विस्तृत विवेचन पूर्वमीमांसेंत व व्याकरणग्रंथांत सांपडेल.

सिद्धान्ती—श्रुतिच असें सांगते कीं बोलणाऱ्याच्या बोलण्याची प्रेरणा करणाऱ्या शक्तीचा केव्हांही नाश होत नाहीं. हेंच ब्रह्म होय.

पूर्व०—पण या व्याख्यानाचें तात्पर्य काय ?

सिद्धान्ती—श्रुतीला असें सांगावयाचें आहे कीं, या वाणीकडूनही प्रकाशित न होणारें पण वाणीला प्रकाशित करणारें ब्रह्म हें मर्यादाशून्य आहे, याची शक्ति सर्वांपेक्षां जास्त आहे, तें अतिशय मोठें आहे म्हणून त्याला "भूमा" असें म्हणतात. तें ब्रह्म होय, असें जाण. 'वाणीची वाणी' नेत्राचा नेत्र, कर्णांचा कर्ण, मनाचें मन, सर्व-कर्ता, सर्व-भोक्ता, सर्व-ज्ञाता, सर्व-नियंता, सर्व-शास्ता, ज्ञान-रूप, आनंदरूप इत्यादि जीं ब्रह्माला नावें आहेत तीं केवळ वाणी आदि उपाधीनीं मात्र प्राप्त झालेलीं आहेत; पण ब्रह्म ही वस्तू व्यवहाराच्या पलीकडची निर्गुण, निर्विशेष, सर्व-श्रेष्ठ, एक-सर, एक-स्वरूप आहे. हिच्या ठिकाणीं उपाधींचा स्पर्श होत नाहीं. तेव्हां, 'सर्व उपाधींचा नाश करून केवल, निर्विशेष, ब्रह्मस्वरूप तूं जाणून घे' हें मंत्रांमधील एव (मात्र) शब्द सांगत आहे. 'बाबांनो ! उपाधियुक्त व भेदात्मक आणि अनात्म स्वरूपाचे जे ईश्वरादि पदार्थ सामान्य लोकांकडून उपासिले जातात, तें ब्रह्म नव्हे.' असें श्रुति आक्रोश करून सांगत आहे.

पूर्व०—'तेंच ब्रह्म आहे,' असें सांगितल्यावर पुनः 'अमुकवस्तु ब्रह्म नाहीं' हें सांगण्याचें कारण काय ?

सिद्धान्ती—अनात्मक वस्तू ब्रह्म नाहींत हें सांगण्याचें कारण ब्रह्मवस्तूचा अर्थ निश्चित व्हावा आणि अन्य ठिकाणी ब्रह्मबुद्धि होईल ती नाहींशी करावी, हा आहे हा श्रुतीचाही अभिप्राय आहे. ॥ ४ ॥

यन्मनसा न मनुते येनाऽऽहुर्मनो मतम् ।
तदेव ब्रह्म त्वं विद्धि नेदं यदिदमुपासते ॥ ५ ॥

अन्वय व अर्थ—**मनसा यत् न मनुते** (जो मनानें विचार करित नाहीं, ज्याला विचार करण्यासाठीं मनाचें साहाय्य घेण्याची अपेक्षा नसते.) **येन मनः मतं आहुः** (पण ज्याच्या साह्यानें मन हें परमेश्वराच्या विचाराचा विषय होतें.) **तदेव ब्रह्म त्वं विद्धि यद् इदं उपासते इदं न** (या उत्तरार्धाचा अर्थ चौथ्या मन्त्रांत दिलाच आहे.)

सारांश, विचार करितानां ज्या ब्रह्माला मनाची अपेक्षा नसते, पण मन मात्र ज्याच्या विचाराचा विषय होतें व आपली विचारप्रवृत्ति ज्याच्या सामर्थ्यानें मन करितें तेंच ब्रह्म आहे, इतर दुसरें नाहीं, हें तूं जाण.

यन्मनसा न मनुते । मन इत्यन्तःकरणं बुद्धिमनसोरेकत्वेन गृह्यते। मनुतेऽनेनेति मनः सर्वकरणसाधारणम् । सर्वविषयव्यापकत्वात् । "कामः संकल्पो विचिकित्सा श्रद्धाऽश्रद्धा धृतिरधृतिर्ह्रीर्धीर्भीरित्येतत्सर्वं मन एव " इति श्रुतेः । कामादिवृत्तिमन्मनस्तेन मनसा यच्चैतन्यज्योतिर्मनसोऽवभासकं न मनुते न संकल्पयति नापि निश्चिनोति । मनसोऽवभासकत्वेन नियन्तृत्वात् । सर्वविषयं प्रति प्रत्यगेवेति स्वात्मनि न प्रवर्ततेऽन्तःकरणम् । अन्तस्थेन हि चैतन्यज्योतिषाऽवभासितस्य मनसो मननसामर्थ्यं तेन सवृत्तिकं मनो येन ब्रह्मणा मतं विषयीकृतं व्याप्तमाहुः कथयन्ति ब्रह्मविदः तस्मात्तदेव मनस आत्मानं प्रत्यक्चेतयितारं ब्रह्म विद्धि । नेदमित्यादि पूर्ववत् ॥ ५ ॥

सिद्धान्ती—या मंत्रांत मन म्हणजे अंतःकरण असा अर्थ इष्ट आहे.

शिष्य—कारण निश्चय करणारी बुद्धि व संकल्प करणारें मन, ह्या दोन्ही वस्तूंचा अंतर्भाव मनानें करावयाचा आहे म्हणून ना?

सिद्धान्ती—होय. शिवाय, ज्याच्या योगानें आपण विचार करितों तें मन अशी व्युत्पत्ति केली म्हणजे मन हें अंतःकरणांतील सर्व विचार-साधन असणाऱ्या इंद्रियांचा उद्बोध करितें.

पूर्वपक्षी—कशावरून ?

सिद्धान्ती—कारण, मन सर्व ज्ञेय विषयांस व्यापून टाकित असतें, ' काम (इच्छा) संकल्प, विचिकित्सा (संशय) श्रद्धा, अश्रद्धा, धृति, अधृति, लज्जा, बुद्धि, आणि भीति हीं सर्व मनाचींच रूपें आहेत. हीं सर्व मिळूनच मन होतें. ' अशी श्रुति आहे, याप्रमाणें काम-संकल्पादि ज्याच्या वृत्ति आहेत, [प्रकार आहेत] त्या मनाच्या साहाय्यानें ज्योतिःस्वरूप आणि सर्वप्रकाशक ब्रह्म विचार करित नाहीं म्हणजे ब्रह्म संकल्प करित नाहीं, किंवा निश्चय करित नाहीं किंवा दुसरा कोणताही मानसिक व्यापार करीत नाहीं.

शिष्य—खरेंच आहे, मनालाही जें प्रकाशित करणार, त्या मनाचें साहाय्य ब्रह्म कशाला घेईल ? ब्रह्म मनाचेंच सर्वदा नियमन करित असतें. सर्व विषयांचें ग्रहण मन करितें, तें ब्रह्माच्या साहाय्यानें होय. तेव्हां मनाचा आत्मा असणारे ब्रह्माच्या ठिकाणी मनाची प्रवृत्ति असूं शकत नाहीं. हेंही नीटच आहे. व हें पूर्वी ठरविलेंही आहे.

सिद्धान्ती—मनाचे अंतर्यामी असून त्याचें नियमन करणाऱ्या स्वयंप्रकाश आणि सर्व-प्रकाशक ब्रह्मामुळें जर मनाला विचार करण्याचें सामर्थ्य येतें, तर तें मन ब्रह्माला स्वविषय करूं शकणारच नाहीं, मनाला ब्रह्माचा विचार करितां

येणार नाहीं, हें स्पष्टच आहे, पण ब्रह्म मात्र मनाच्या सर्व वृत्तींसह [काम, संकल्प, संशय, इत्यादि वृत्तींसह] मनाचा विचार करितें, मनाला आपल्या विचाराचा विषय करितें व याच्याच तेजःसामर्थ्यानें मनाला मननसामर्थ्य प्राप्त होतें. ब्रह्मवेत्यांचें हें सांगणें आहे, मन ब्रह्माला ज्ञेय आहे. पण मनाला ब्रह्म ज्ञेय नाहीं; असें सांगण्याचा अभिप्राय आहे. म्हणून 'मनाचा आत्मा, मनाला प्रकाशित करणारी वस्तू ब्रह्म आहे' असें जाण. पुढील मंत्रार्धाचें व्याख्यान पूर्वीच झालें आहे. ॥ ५ ॥

यच्चक्षुषा न पश्यति येन चक्षूंषि पश्यति ।
तदेव ब्रह्म त्वं विद्धि नेदं यदिदमुपासते ॥ ६ ॥

अन्वय व अर्थ—चक्षुषा यत् न पश्यति (जें डोळ्याच्या साह्यानें पाहात नाहीं.)—पण—**येन चक्षूंषि पश्यति** (ज्याच्या योगानें चक्षु प्रकाशित होतात.) पुढील अन्वयार्थ पूर्वीप्रमाणें

यच्चक्षुषा न पश्यति न विषयीकरोत्यन्तःकरणवृत्तिसंयुक्तेन येन चक्षूंष्यन्तःकरणवृत्तिभेदभिन्नाश्चक्षुर्वृत्तीः पश्यति लोकश्चैतन्यात्मज्योतिषा विषयीकरोति व्याप्नोति ॥ ६ ॥

सिद्धान्ती—जी वस्तू नेत्रांच्या साहाय्यानें केव्हांही पाहत नाहीं; पण जी वस्तु अंतःकरणासह अंतःकरणवृत्तींमधील नेत्राचीं निरनिराळीं स्वरूपें पाहते. सारांश, ज्या स्वप्रकाशक ज्ञान—ज्योतीला अंतःकरणाची उपाधि प्राप्त झाली म्हणजे सर्व पदार्थ पाहण्याचे विषय होतात; ती वस्तु ब्रह्म आहे असें जाण.

शिष्य—म्हणजे ज्याच्या सामर्थ्यानें मात्र डोळ्याला सर्व अंतर्बाह्य विषय प्रकाशित होतात, पण डोळ्यांनी ज्याला पाहतां येत नाहीं, किंवा डोळ्याची ज्याला अपेक्षा नाहीं, तें ब्रह्म आहे. होयना ?

सिद्धान्ती—होय. एक गोष्ट ध्यानांत ठेव. ती ही कीं, आपल्यास पदार्थ दिसतात, ते ब्रह्माच्या सत्तामात्रेंकरून होय. या सर्व—साक्षाला जेव्हां अंतःकरणाची उपाधि असते, तेव्हां हा सोपाधिक साक्षी नेत्रादिकांच्या वृत्ति प्रकाशित करितो. प्रकाश ब्रह्माचाच, पण इंद्रियविषय प्रकट होण्यास त्याला जड अंतःकरणाची उपाधि अवश्य असते. ब्रह्म सामान्यज्ञान करून देतें. विशेषज्ञान हें विशेष—उपाधिद्वारा प्रकाशित करितें. असो; चला, पुढचा मंत्र घेऊं. ॥ ६ ॥

यच्छोत्रेण न शृणोति येन श्रोत्रमिदꣳ श्रुतम्।
तदेव ब्रह्म त्वं विद्धि नेदं यदिदमुपासते ॥ ७ ॥

अन्वय व अर्थ—श्रोत्रेण यत् न शृणोति येन इदं श्रोत्रं श्रुतं (जें कानानें ऐकत नाहीं, पण जें कानाला व कानाच्या ऐकण्याला विषय करितें, तें ब्रह्म आहे असें तूं जाण.

यच्छोत्रेण न शृणोति दिग्देवताधिष्ठितेनाऽऽकाशकार्येण मनोवृत्तिसंयुक्तेन न विषयीकरोति लोको येन श्रोत्रमिदं श्रुतं यत्प्रसिद्धं चैतन्यात्मज्योतिषा विषयीकृतं तदेवेत्यादि पूर्ववत् ॥ ७ ॥

सिद्धान्ती—जें कानानें ऐकत नाहीं.

शिष्य—कर्ण हें इंद्रिय दिग्देवतेचें अधिष्ठान आहे; तें आकाश नामक महाभूताचें कार्य आहे. ऐकण्याचे वेळीं तें मनोवृत्तींनी युक्त असतें. तें द्वय म्हणजे कान होयना ?

सिद्धान्ती—होय. सारांश, जें कानाचा विषय केव्हांही होत नाहीं, किंवा कानांनी ऐकत नाहीं, पण जे स्वयंप्रकाश आणि सर्व-प्रकाशक ज्ञानरूप ब्रह्म कानाला विषय करितें व त्याला ऐकण्याचें सामर्थ्य देतें; तें ब्रह्म आहे इत्यादि अर्थ पूर्वीप्रमाणें आहे. ॥ ७ ॥

यत्प्राणेन न प्राणिति येन प्राणः प्रणीयते।
तदेव ब्रह्म त्वं विद्धि नेदं यदिदमुपासते ॥ ८ ॥

अन्वय व अर्थ—प्राणेन यत् न प्राणिति येन प्राणः प्रणीयते (जें प्राणानें म्हणजे घ्राणेंद्रियानें कशाचाही वास घेत नाहीं; पण जें घ्राणेंद्रियाला मात्र वास घेण्याची शक्ति देतें. किंवा लोक ज्याच्या साह्यानें नासिकाद्वारें वास घेऊं शकतात; तें ब्रह्म होय.

यत्प्राणेन घ्राणेन पार्थिवेन नासिकापुटान्तरवस्थितेनान्तःकरणप्राणवृत्तिभ्यां सहितेन यन्न प्राणिति गन्धवन्न विषयीकरोति येन चैतन्यात्मज्योतिषाऽवभास्यत्वेन स्वविषयं प्रति प्राणः प्रणीयते। तदेवेत्यादि सर्वं समानम् ॥ ८ ॥

इति श्रीमत्परमहंसपरिव्राजकाचार्यश्रीमच्छंकरभगवत्पादकृतौ केनोपनिषत्पदभाष्ये प्रथमः खण्डः ॥ १ ॥

सिद्धान्ती—पृथ्वीनें घटित व नासिकाच्या (नाकाच्या) पुटामध्यें राहून अंतःकरण व प्राण यांच्या सहित असणारें जें प्राणरूपी घ्राणेंद्रिय त्यानें म्हणजे नाकानें ब्रह्मवस्तु वास असणाऱ्या वस्तूंना विषय करित नाहीं. तात्पर्य, ज्या वस्तूला वास घेण्यासाठीं नाकाची आवश्यकता नसते; पण जिच्या प्रकाशामुळें नाकाला मात्र वासाच्या वस्तु ओळखितां येतात, व जें इंद्रिय ब्रह्माचा ज्ञानविषय होतें. ती वस्तू ब्रह्म आहे, इत्यादि अर्थ पूर्वी सांगितलाच आहे ॥ ८ ॥

याप्रमाणें आचार्यकृत भाष्याचें भाषांतर आहे.

प्रथम खण्ड समाप्त.

द्वितीयः खण्डः ।

एवं हेयोपादेयविपरीतस्त्वमात्मा ब्रह्मोत प्रत्यायितः शिष्योऽहमेव ब्रह्मेति सुष्ठु वेदाहं मामिति गृह्णीयादित्याशङ्क्याऽऽचार्यः शिष्यबुद्धिविचालनार्थं यदीत्याह—

सिद्धान्ती—याप्रमाणें 'हेयोपादेयविलक्षण असें आत्मस्वरूप आहे,' असें शिष्याला सांगितलें. तसेंच, 'तूंही ब्रह्मच आहेस' असेंही सांगितलें.

शिष्य—भगवन्! आतां ठीक झालें. 'मी ब्रह्म आहें,' असा मला बोध झाला; तसेंच मला उत्तम प्रकारानें ब्रह्म समजलें. ब्रह्माचें ज्ञान उत्तम झालें,' असें त्या शिष्यासही वाटलें असेल. नाहीं बरें?

सिद्धान्ती—ही तुझी व त्या शिष्याची शंका मनांत येऊन, गुरुजी शिष्याला किती ज्ञान झालें आहे, हें कसून पाहण्यासाठीं म्हणतातः—

यदि मन्यसे सुवेदेति दहरमेवापि नूनम्। त्वं वेत्थ ब्रह्मणो रूपं यदस्य त्वं यदस्य देवेष्वथ नु मीमाꣳस्यमेव ते मन्ये विदितम् ॥ ९ ॥ १ ॥

अन्वय व अर्थः—यदि सुवेद इति मन्यसे (ब्रह्मस्वरूप मला उत्तम रीतीनें आणि स्पष्ट रीतीनें समजलें, असें जर तुला वाटेल) **दहरं एव अपि नूनं** (तर तें ब्रह्माचें स्वरूप तुला खरोखरच समजलें नाहीं, असें म्हटलें पाहिजे) **यत् अस्य ब्रह्मणः रूपं त्वं वेत्थ** (जें ब्रह्मरूप तुला समजलें आहे.) **अथ यत् अस्य त्वं देवेषु** (किंवा देवांच्या स्वरूपामध्येंच हें स्वरूप आहे.—असें तुला वाटत असेल तर)—तें तुझें

म्हणणें अज्ञानात्मक आहे—नु (खरोखर) ते विदितं मीमांस्यं एव मन्ये (तुला 'ठाऊक असलेले स्वरूपाची' पुनः मीमांसाच करावयास पाहिजे.)

सारांश, ब्रह्मस्वरूप आपल्याला समजलें असें तुला वाटत असेल, तर तुला कांहींच समजलें नाहीं, असें म्हटलें पाहिजे. अर्थातच आपल्याला ब्रह्माचें आध्यात्मिक व आधिदैविक स्वरूप समजलें असें वाटत असेल, तर अद्यापि ब्रह्मस्वरूपाचा विचार करणें तुला अवश्य आहे असेंच म्हटलें पाहिजे.

नन्विष्टैव सुवेदाहमिति। निश्चिता प्रतिपत्तिः सत्यमिष्टा निश्चिता प्रतिपत्तिर्न हि सुवेदाहमिति । याद्धि वेद्यं वस्तु विषयीभवति तत्सुष्ठु वेदितुं शक्यं दाह्यमिव दग्धुमग्नेर्दग्धुर्न त्वग्नेः स्वरूपमेव। सर्वस्य हि वेदितुः स्वात्मा ब्रह्मेति सर्ववेदान्तानां सुनिश्चितोऽर्थः। इह च तदेव प्रतिपादितं प्रश्नप्रतिवचनोक्त्या श्रोत्रस्य श्रोत्रमित्याद्यया। यद्वाचाऽनभ्युदितामति विशेषतोऽवधारितम्। ब्रह्मवित्संप्रदायनिश्चयश्चोक्तोऽन्यदेव तद्विदिताद्यो अविदिताद्धीत्युपन्यस्तमुपसंहरिष्यति चाविज्ञातं विजानतां विज्ञातमविजानतामिति। तस्माद्युक्तमेव शिष्यस्य सुवेदेति बुद्धिं निराकर्तुम्। न हि वेदिता वेदितुर्वेदितुं शक्योऽग्निरिव दग्धुमग्नेः। न चान्यो वेदिता ब्रह्मणोऽस्ति यस्य वेद्यमन्यत्स्याद् ब्रह्म। "नान्यदतोऽस्ति विज्ञातृ" इत्यन्यो विज्ञाता प्रतिषिध्यते। तस्मात्सुष्ठु वेदाहं ब्रह्मेति प्रतिपत्तिर्मिथ्यैव। तस्माद्युक्तमेवाऽऽहाऽऽचार्यो यदीत्यादि । यदि कदाचिन्मन्यसे सुवेदेति सुष्ठु वेदाहं ब्रह्मेति। कदाचिद्यथाश्रुतं दुर्विज्ञेयमपि क्षीणदोषः सुमेधाः कश्चित्प्रतिपद्यते कश्चिन्नेति साशङ्कमाह—यदीत्यादि। दृष्टं च " य एषोऽक्षिणि पुरुषो दृश्यत एष आत्मेति होवाचैतदमृतमभयमेतद्ब्रह्म " इत्युक्ते प्राजापत्यः पण्डितोऽप्यसुरराडविरोचनः स्वभावदोषवशादनुपपद्यमानमपि विपरीतमर्थं शरीरमात्मेति प्रतिपन्नः। तथेन्द्रो देवराट् सकृदद्विस्त्रिरुक्तं चाप्रतिपद्यमानः स्वभावदोषक्षयमपेक्ष्य चतुर्थे पर्याये प्रथमोक्तमेव ब्रह्म प्रतिपन्नवान्। लोकेऽप्येकस्माद्गुरोः शृण्वतां कश्चिद्यथावत्प्रतिपद्यते कश्चिदयथावत्कश्चिद्विपरीतं कश्चिन्न प्रतिपद्यते किमु वक्तव्यमतीन्द्रियमात्मतत्त्वम्। अत्र हि विप्रतिपन्नाः सदसद्वादिनस्तार्किकाः सर्वे। तस्मादविदितं ब्रह्मेति सुनिश्चितोक्तमपि विषमप्रतिपत्तित्वाद्यदि मन्यस इत्यादि साशङ्कं वचनं युक्तमेवाऽऽचार्यस्य । दहरमल्पमेवापि नूनं त्वं वेत्थ जानीषे ब्रह्मणो रूपम्। किमनेकानि ब्रह्मणो रूपाणि महान्त्यर्भकाणि च येनाऽऽह दहरमेवेत्यादि। बाढम्।

अनेकानि हि नामरूपोपाधिकृतानि ब्रह्मणो रूपाणि न स्वतः। स्वतस्तु "अशब्दमस्पर्शमरूपमव्ययं तथाऽरसं नित्यमगन्धवच्च यत्" इति शब्दादिभिः सह रूपाणि प्रतिषिध्यन्ते। ननु येनैव धर्मेण यद्रूप्यते तदेव तस्य स्वरूपमिति ब्रह्मणोऽपि येन विशेषेण निरूपणं तदेव तस्य रूपं स्यादत उच्यते। चैतन्यं पृथिव्यादीनामन्यतमस्य सर्वेषां विपरिणतानां वा धर्मो न भवति। तथा श्रोत्रादीनामन्तःकरणस्य च धर्मो न भवतीति। ब्रह्मणो रूपमिति। ब्रह्म रूप्यते चैतन्येन। तथा चोक्तम्—"विज्ञानमानन्दं ब्रह्म" "विज्ञानघन एव" "सत्यं ज्ञानमनन्तम्" "प्रज्ञानं ब्रह्म" इति च ब्रह्मणो रूपं निर्दिष्टं श्रुतिषु। सत्यमेवं तथाऽपि तदन्तःकरणदेहेन्द्रियोपाधिद्वारेणैव विज्ञानादिशब्दैर्निर्दिश्यते तदनुकारित्वादेहादिवृद्धिसंकोचच्छेदादिषु नाशेषु च न स्वतः। स्वतस्त्वविज्ञातं विजानतां विज्ञातमविजानतामिति स्थितं भविष्यति। यदस्य ब्रह्मणो रूपमिति पूर्वेण संबन्धः। न केवलमध्यात्मोपाधिपरिच्छिन्नस्यास्य ब्रह्मणो रूपं त्वमल्पं वेत्थ यदप्यधिदैवतोपाधिपरिच्छिन्नस्यास्य ब्रह्मणो रूपं देवेषु वेत्थ त्वं तदपि नूनं दहरमेव वेत्थेति मन्येऽहम्। यदध्यात्मं यदधिदैवं तदपि च देवेषूपाधिपरिच्छिन्नत्वादहरत्वान्न निवर्तते। यत्तु विध्वस्तसर्वोपाधिविशेषं शान्तमनन्तमेकमद्वैतं भूमाख्यं नित्यं ब्रह्म न तत्सुवेद्यमित्यभिप्रायः। यत एवमथ नु तस्मान्मन्येऽद्यापि मीमांस्यं विचार्यमेव ते तव ब्रह्म। एवमाचार्योक्तः शिष्य एकान्त उपविष्टः समाहितः सन्यथोक्तमाचार्येणाऽऽगममर्थतो विचार्य तर्कतश्च निर्धार्य स्वानुभवं कृत्वाऽऽचार्यसकाशमुपगम्योवाच—मन्येऽहमथेदानीं विदितं ब्रह्मेति ॥ ९ ॥ १ ॥

शिष्य—भगवन्! त्या मुमुक्षु शिष्याला ब्रह्म समजलें असें निश्चित भान झालें असेल तर उत्तमच गोष्ट झाली.

सिद्धान्ती—निश्चित ज्ञान होणें ही उत्तम गोष्ट आहे; पण 'मला चांगलें कळलें,' असें भान असलें म्हणजे त्या पुरुषाला ब्रह्मस्वरूप समजलेंच नाहीं असें म्हणावें लागतें; कारण जी ज्ञेय वस्तू आपल्या ज्ञानाचा विषय होते, ती मात्र चांगल्या प्रकारानें जाणणें हें शक्य आहे. अग्नीला जसा ज्वाला—ग्राही पदार्थ जाळितां येतो, सर्वथा व्यापून टाकितां येतो, तशी ज्ञेय वस्तू ज्ञात होणें, बुद्धीचा विषय होणें, बुद्धिव्याप्त होणें ठीक आहे. पण अग्नीला आपल्या स्वतःचें स्वरूप जाळितां येत नाहीं. तसेंच, जी वेद्य वस्तू नाहीं, ती ठाऊक होणें शक्यही नाहीं.

आतां ब्रह्मच पहा. 'हें ब्रह्म किंवा आत्मा प्रत्येक जाणणाऱ्याचा आत्मा आहे' असा सर्व वेदान्त-शास्त्रे निश्चितपणानें सर्वत्र उद्घोष एकसारखा करीत आहेत. ह्याही उपनिषदांत प्रश्नोत्तररूपानें असें सिद्ध केलें आहे कीं 'ब्रह्म हा प्रत्येक इंद्रियाचा आत्मा आहे' तसेंच पुनः 'वाणीला जें गोचर नाहीं,' इत्यादि वाक्यानीं ब्रह्मस्वरूपाचा विशेष निश्चय केला आहे. तसेंच, ब्रह्मवेत्यांचा जो संप्रदाय-पूर्वक निश्चय ठरला आहे, त्याचाही उच्चार केला आहे.

शिष्य—हा उच्चार केव्हां केला भगवन ?

सिद्धान्ती–अरे ! सर्व 'ज्ञाता–ज्ञात वस्तूंहून ही ब्रह्मवस्तु निराळी आहे' असा पहिल्याखंडांतील तिसरा मंत्र ह्या इतक्यांत विसरलास कीं काय ? पुनः याच खंडात श्रुति असा उपसहार करील कीं " ब्रह्म समजणें शक्य नाहीं असें ज्यानां वाटतें त्यानां ब्रह्म समजलें असते आणि ज्यांना 'ब्रह्म समजलें' असें वाटतें, त्याना तें मुळीच समजलें नसतें. "

शिष्य—आतां समजलो कीं मुमुक्षूला " ब्रह्म समजलें " असें जें भान झालें असेल त्याचें निराकरण करणें अगदीं अवश्य आहे. कारण जाणणाऱ्याचाच जो जाणणारा, ज्ञात्याचा जो ज्ञाता, त्याला जाणणें, त्याचें स्वरूप समजणें, अशक्यच आहे. अग्नीला कधीं स्वतःला जाळतां येईल काय ? नाहीं.

सिद्धान्ती—शिवाय, ब्रह्माहून ब्रह्मस्वरूप जाणणारा दुसरा आहे तरी कोण कीं ज्याला 'दुसरी असणारी ब्रह्मवस्तू' समजून घेतां येईल ? श्रुतीनेंच 'याच्या शिवाय जाणण्याचें सामर्थ्य असणारे दुसरें कोणी नाहीं.' असा स्पष्ट अन्य-ज्ञात्याचा प्रतिषेध केला आहे. तेव्हां, हें सिद्ध झालें कीं, मला ब्रह्म समजलें, हें ज्ञान मिथ्या आहे. अर्थातच आचार्यानीं मुमुक्षूला या मंत्रांत जो प्रश्न विचारला आहे तो योग्यच आहे. आचार्य म्हणतात, जर कदाचित् तुला असें वाटलें असेल कीं 'मला ब्रह्माचें ज्ञान उत्तम झालें—'

शिष्य—भगवन् ! येथें असें साशंकित रीतीनें कां विचारिलें बरें ? मुमुक्षूला ब्रह्म समजलें नाहीं, असा जर आचार्यांचा निश्चय होता, तर 'जर तुला समजलें असेल तर' असा संशयार्थी प्रश्न कां केला ?

सिद्धान्ती—अरे ! कांहीं पापशून्य व बुद्धिमान् लोकांना हें प्रायः अज्ञेय ब्रह्मस्वरूप सुद्धां कदाचित् श्रुतिवाक्यानें उमजतें, पण पुष्कळ लोकांना समजत नाहीं. म्हणून असा शंकात्मक प्रश्न आचार्यांनीं केला. शिवाय, अशी एक ऐतिहासिक गोष्ट आहे कीं, एकदां विरोचन आणि इंद्र हे उभयतां गुरूकडे ब्रह्म-जिज्ञासेनें गेले. 'आम्हांस ब्रह्म सांगा' अशी गुरूची त्यांनीं प्रार्थना केली. तेव्हां 'हा जो नेत्रांमध्यें पुरुष दिसतो, तोच आत्मा आहे, हा अमृत आहे, अभय आहे, हेंच ब्रह्मस्वरूप होय.' असें गुरुजींनीं सांगितलें. हें ऐकून विरोचन व इंद्र हे

दोघेही आपापल्या स्थानीं गेले. नंतर प्रजापतीचा पुत्र जो दैत्य–पति विरोचन तो मोठा पंडित होता, तरी स्वाभाविक दोषाला वश होऊन तो एक अशुद्ध, अयोग्य, आणि विपरीत निश्चय करिता झाला कीं, 'शरीर हा आत्मा होय.' असा गुरूजींच्या म्हणण्याचा भावार्थ आहे. पण देवपति जो इंद्र, त्याला दोन-तीन वेळ जरी हें वाक्य गुरुजींनीं सांगितलें, तथापि त्याला तिन्ही वेळ आत्मस्वरूपाचा बोध झाला नाहीं. अर्थात् गुरुजींनीं त्याला निरनिराळ्या तऱ्हेनें स्वरूप समजून देण्याचा प्रयत्न केला, तरी इंद्राची समजूत पटली नाहीं. पुढें आपल्या स्वभावांतच कांहीं दोष आहे व तो ब्रह्मचर्यानें म्हणजे तपश्चर्येनें घालवून टाकिला पाहिजे, असा निश्चय करून इंद्रानें तपश्चर्या केली. चौथ्या वेळीं जेव्हां गुरूजींनीं पहिल्याच अर्थाचा बोध करणारें चौथें वाक्य सांगितलें, तेव्हां ब्रह्मस्वरूपासंबंधाने त्याचा निश्चय झाला—

शिष्य—होय, मलाही असा अनुभव आहे कीं, एकाच गुरुजींनीं आपल्या शिष्य–वर्गांत एखादें वाक्य चांगले समजून सांगितलें म्हणजे कांहीं बुद्धिमान् शिष्य शंका–समाधान करून घेऊन यथावत् अर्थाचे ग्रहण करितात. कांहीं शिष्यांस विरोचनाप्रमाणें अयथार्थ ज्ञान होतें, कांहीं विपरीत अर्थाचें ग्रहण करितात आणि कांहींना तर मुळीच कांही समजत नाहीं. ही जर सामान्य सिद्धान्तार्ची गोष्ट आहे, तर अतींद्रिय (इंद्रियांस अगोचर) जें आत्मतत्त्व त्याच्यासंबंधाने इंद्र–विरोचनाप्रमाणेच भिन्न भिन्न पुरुष भिन्न भिन्न समजुती करून घेतील, हें उघड आहे.

सिद्धान्ती—बरोबर आहे. येथें सुद्धा सद्वादी, असद्वादी व तर्कवादी यांच्या समजुतीमध्यें पुष्कळ विप्रतिपत्ति (समजूतीचें वैचित्र्य) आहे. तेव्हां गुरुजींना जरी पक्कें ठाऊक होतें कीं त्या मुमुक्षूला ब्रह्म समजलें नाहीं, तथापि पुष्कळ लोकांना अयथार्थ व विपरीत जाणीव उत्पन्न होते, म्हणून त्यांनीं साशंक प्रश्न विचारला, हें योग्यच झालें. ते म्हणतात " बाबा ! 'ब्रह्मरूप मला समजलें' असें जर तुला वाटत असेल, तर खरोखरच तुला अति अल्प ब्रह्मज्ञान झालें आहे, असें समजलें पाहिजे.

पूर्व०—काय ? ब्रह्माचीं लहान मोठीं अशीं अनेक रूपें आहेत काय ? कीं *'तुला ब्रह्माचें लहान स्वरूप समजलें' असें गुरूजींनीं मुमुक्षूस विचारावें !*

सिद्धान्ती—*होय आहेत. नामरूपांच्या उपाधींनीं मात्र निर्माण केलेलीं अनेक ब्रह्मरूपें आहेत !* पण ब्रह्माला स्वतः रूपच नाहीं; तेव्हां तेथें लहान किंवा मोठीं अनेक रूपें कोठून असणार ! प्रत्यक्ष श्रुतिच म्हणते कीं 'ब्रह्माचे ठिकाणीं शब्द, स्पर्श, रूप, रस आणि गंध इत्यादिकांचा यत्किंचित् सुद्धां रिघाव नाहीं. तें *अव्यय आहे, आणि नित्य आहे'* ह्या काठक मंत्रांतील शब्दादिकांचा स्पष्ट आणि प्रत्यक्ष प्रतिषेध असें सांगतो कीं. ब्रह्माला कोणत्याही प्रकारचें स्वरूप नाहीं.

पूर्व०—ज्या धर्मामुळें एखादा पदार्थ आपल्यास ज्ञात होतो, तो धर्म त्या पदार्थाचें स्वरूप असतें; असा न्याय आहे. तेव्हां ज्या विशेषणांनीं (गुण-धर्मांनीं) ब्रह्माचें निरूपण होतें, तीं विशेषणें ब्रह्माचें रूप झालीं पाहिजेत.

सिद्धान्ती—नाहीं. तुम्ही म्हणतां, हें खरें असेल तर पृथ्वी, अप्, तेजादि पंचमहाभूतांचा प्रत्येकीं अथवा सर्वशः चैतन्य हा धर्म झाला पाहिजे. चैतन्या-मुळें पृथ्वीचा अथवा इतर कोणत्याही महाभूताचा किंवा सर्व महाभूतांचा प्रत्यय आपल्यास येतो. म्हणून चैतन्य पंचमहाभूतांचा धर्म आहे किंवा हें त्याचें स्वरूप आहे अथवा सृष्टीचें तरी हें स्वरूप आहे, असें म्हणावें लागेल. प्रत्येकाचें मूळस्वरूप तरी चैतन्य–धर्मात्मक आहे, असें म्हणणें भाग पडेल. पण तसा प्रत्यय तर आपल्यास येत नाहीं. तसेंच श्रोत्रादिकांचा व अंतःकरणाचा धर्मही चैतन्य नव्हे.

पूर्व०—मग ब्रह्माचें रूप तरी काय ? मला वाटतें कीं चैतन्यानें ब्रह्माचें स्वरूप समजतें. म्हटलें आहे ' चैतन्य हेंच ब्रह्माचें स्वरूप आहे ' ' ब्रह्म हें आनंदरूप आणि विज्ञानरूप आहे. ' ' ब्रह्म हे अंतर्बाह्य ज्ञानरूप आहे.' ' तें सत्, चित्, आणि अनंत आहे. ' ' प्रज्ञान हें ब्रह्म आहे ' याप्रमाणें ब्रह्माचें स्वरूप श्रुतीनें अनेक वेळ सांगितलें आहे. सारांश, ब्रह्माला स्वरूप आहे असें माझ्या व श्रुतीच्या मतानें ठरलें.

सिद्धान्ती—तुम्ही म्हणतां हें खरें आहे, तथापि तुम्ही उद्धृत केलेल्या श्रुतीं-मध्यें विज्ञानादि शब्दांनीं जो ब्रह्माचा निर्देश केला आहे, तो अंतःकरण, देह, इंद्रियें, या उपाधींच्या द्वारानें केला आहे व ह्या उपाधींचे अनुकरण करून उपाधींची वृद्धि झाली, क्षय झाला, त्यांस छिन्नविछिन्न केलें किंवा त्यांचा नाश झाला, तर या उपाधिद्वारा निर्दिष्ट झालेल्या विज्ञानादि ' ब्रह्मरूपाची वृद्धि, सकोचादि विकार होतात ' असें सांगतात, स्वतः आत्म्यासंबंधानें सांगत नाहींत. हे विकार उपाधींचे आहेत.

शिष्य—नाहीं समजलें.

सिद्धान्ती—हें पहा ! एखाद्या जलसंचयामध्यें सूर्यप्रतिबिंब पडलें असता जल हाललें किंवा विभागिलें तर सूर्यबिंब हालत आहे किंवा विभागिलें जात आहे असा आपल्यास मिथ्या भास होतो, तो जलांतील प्रतिबिंबाच्या हालण्या डोलण्यावरून होतो. बिंब हालत नाहीं किंवा डोललें जात नाहीं. तसेंच, तो जलसंचय आटला तर त्यांतील प्रतिबिंब नाहींसें होतें, म्हणून बिंबाला कांहीं धक्का लागत नाहीं. तसेंच, उपाधींनी आत्मा निर्दिष्ट झाला म्हणून त्या उपाधि किंवा उपाधींनी दाखविलेला धर्म, हें आत्म्याचें रूप नव्हे.

पूर्व०—तुमच्या आत्म्याला जर रूपच नाहीं, तर त्याचा अनुभव तरी कसा घ्यावयाचा ?

सिद्धान्ती—'ब्रह्म अज्ञेय आहे' असा ज्यांचा विचारपूर्वक निश्चय झाला, त्यांना ब्रह्म समजलें, पण 'ब्रह्म समजलें' असा ज्यांनां भास होतो, त्यांना ब्रह्म स्वरूप समजत नाहीं. या मंत्र-वाक्याचें विवरण करितांना ब्रह्मानुभवाचा कसा प्रत्यय येईल, तें स्पष्टपणानें सांगूं.

शिष्य—हें ठरलें. आतां मंत्राच्या पुढील वाक्याचें स्वरूप आम्हांस समजून सांगा.

सिद्धान्ती—पुढील वाक्यांत सांगितलें आहे कीं, केवल शारीरिक उपाधींनीं मर्यादित झालेल्या (या तुला समजलेल्या) ब्रह्माचें स्वरूप अल्प आहे, इतकेंच नव्हे, तर आधिदैविक म्हणजे दैवी उपाधींनीं मर्यादित झालेल्या या त्वत्ज्ञात ब्रह्माचें स्वरूप सुद्धां तुला अत्यंत थोडें समजलें आहे; देवज्ञात स्वरूप सुद्धां चांगलें समजलें नाहीं असा माझा निश्चय आहे. आध्यात्मिक असो आधिदैविक असो, उपाधि नेहमीं मर्यादा उत्पन्न करणाऱ्या आहेत, म्हणून उपाधि-मर्यादित ब्रह्म नेहमीं अल्प असावयाचें. अल्पत्वापासून त्याची सुटका उपाधि आहेत तोंपर्यंत होत नाहीं. पण अखिल उपाधींचा निःशेष विध्वंस झाला आहे, अशा निरुपाधिक शांत, अनंत, एक, अद्वैत, भूमा या नांवाचें जे नित्य ब्रह्म आहे, तें मुमुक्षूला चांगलें समजलें नाहीं असें म्हणण्याचा गुरुजीचा अभिप्राय आहे.

शिष्य—असें आहे म्हणूनच ना गुरूजी म्हणतात कीं अद्यापि मुमुक्षूनें ब्रह्मविचार कर्तव्य आहे ?

सिद्धान्ती—होय. याच अभिप्रायानें गुरूजी 'ब्रह्म-मीमांसा कर्तव्य आहे,' असें म्हणतात. यानंतर तो मुमुक्षु एकांतामध्यें जाऊन बसला आणि स्वस्थ चित्त होऊन त्यानें आचार्यांनीं जीं जीं श्रुतिवाक्यें सांगितलीं होतीं व ज्या ज्या युक्ति प्रयुक्ति उपयोजिल्या होत्या, त्यांचा विचार करून आणि तर्कानें म्हणजे न्याय-पद्धतीनें गुरूपदिष्ट अर्थाचा निश्चय करून व शेवटीं स्वरूपाचा अनुभव घेऊन तो गुरूजींकडे आला आणि म्हणाला 'महाराज ! मला आतां ब्रह्म समजले आहे असें वाटतें.' ॥ ९ ॥ ॥ १ ॥

कथमिति । शृणुत ।

शिष्य—हें कसें ?

सिद्धान्ती—सांगतों ऐका.

नाहं मन्ये सुवेदेति नो न वेदेति वेद च ।
यो नस्तद्वेद तद्वेद नो न वेदेति वेद च ॥ १० ॥ २ ॥

अन्वय व अर्थ—सुवेद इति अहं न मन्ये (मला ब्रह्म चांगलें समजलें आहे, असें वाटत नाहीं.) नो न वेद इति न वेद इति च

'समजलें नाहीं असें नाहीं व समजलें असेंही नाहीं.) यः नः तद्वेद तत् नो वेद न वेद इति वेद च (जो आमच्यामध्यें येऊन म्हणतो कीं, 'मला ब्रह्म समजलें आहे,' त्याला कांहीं समजलें नाहीं व 'मला समजलें नाहीं' असें जो म्हणतो, त्याला समजलें आहे, सारांश स्पष्टच आहे.

नाहं मन्ये सु वेदेति नैवाहं मन्ये सुवेद ब्रह्मेति । नैव तर्हि विदितं त्वया ब्रह्मेत्युक्त आह–नो न वेदेति वेद च । वेद चेति च शब्दान्न वेद च । ननु विप्रतिषिद्धं नाहं मन्ये सु वेदेति नो न वेदेति वेद चेति । यदि न मन्यसे सु वेदेति कथं मन्यसे वेद चेति । अथ मन्यसे वेदैवेति । कथं न मन्यसे सुवेदेति । एकं वस्तु येन ज्ञायते तेनैव तदैव वस्तु न सुविज्ञायत इति विप्रतिषिद्धं संशयविपर्ययौ वर्जयित्वा । न च ब्रह्म संशयितत्वेन ज्ञेयं विपरीतत्वेन वेति नियन्तुं शक्यम् । संशयविपर्ययौ हि सर्वत्रानर्थकरत्वेनैव प्रसिद्धौ । एवमाचार्येण विचाल्यमानोऽपि शिष्यो न विचचाल । "अन्यदेव तद्विदितादथो अविदितादधि" इत्याचार्योक्तागमसंप्रदायबलादुपपत्त्यनुभवबलाच्च जगर्ज च ब्रह्मविद्यायां दृढनिश्चयतां दर्शयन्नात्मनः । कथमित्युच्यते । यो यः कश्चिन्नोऽस्माकं सब्रह्मचारिणां मध्ये तदुक्तं वचनं तत्त्वतो वेद स तद्ब्रह्म वेद । किं पुनस्तद्वचनमित्यत आह—नो न वेदेति वेद चेति । यदेवान्यदेव तद्विदितादथो अविदितादधीत्युक्तं वस्त्वनुमानानुभवाभ्यां संयोज्य निश्चितं वाक्यान्तरेण नो न वेदेति वेद चेत्यवोचदाचार्यबुद्धिसंवादार्थं मंदबुद्धिग्रहणव्यपोहार्थं च । तथा च गर्जितमुपपन्नं भवति यो नस्तद्वेदेति ॥ १० ॥ २ ॥

सिद्धान्ती—आचार्य साधकाला विचारतात 'हे मुमुक्षु पुरुषा! तुला आतां ब्रह्म समजलें काय?' मुमुक्षु म्हणतोः 'नाहीं. मला तें स्पष्टपणानें समजलें नाहीं. मला तें विज्ञात झालें, असें म्हणतां येत नाही.' आचार्य म्हणतातः 'तर मग तुला तें ब्रह्म समजलें नाहीं. असं म्हण. ब्रह्म मुळींच विज्ञात झालें नाहीं, असें म्हण.' मुमुक्षु म्हणतोः–नाहीं भगवन्! तें मला समजलें नाहीं असें नाहीं, व समजलें असेंही नाहीं. मला तें ज्ञात नाहीं व अज्ञातही नाहीं.' आचार्य म्हणतात 'अरे! हें असें परस्पर–विरुद्ध काय बोलतोस? गोष्ट समजते किंवा समजत नाहीं. एखादी गोष्ट समजतेही व समजतही नाहीं, असा आपल्याला कधींही अनुभव येत नाहीं. जर तुला ती गोष्ट चांगली समजली नसेल तर ती समजली असें कसें म्हणतोस? व समजली आहे असें म्हणतोस तर ती चांगली कशी तुला

समजली नाहीं.' ज्या तुला ब्रह्मवस्तु समजली, त्या तुला ती चांगली समजली नाहीं, असें म्हणून तूं आपलें बोलणेंच परत घेतोस! ह्या तुझ्या विरोधी बोलण्यानें मी काय समजूं ? मुमुक्षु म्हणतोः—'माझे संशय व विपरीत भावना ह्या शास्त्र-श्रवणादिकानें नाहींशा झाल्या. पण ब्रह्मवस्तूचा साक्षात्कार झाला तरी ती मला चांगली समजली, म्हणजे माझ्या बुद्धीचा विषय झाली, असें मी म्हणणार नाहीं. आपणच सांगा मी कसें म्हणूं तें?' आचार्य विचारतातः—अरे, ब्रह्मवस्तु जाणली असतां तेथें संशय किंवा विपरीत भावना उत्पन्न होतील असा संभवच नाहीं. कारण शास्त्रानें संशयादिकांचा नाश होतो. संशय विपर्यय हे सर्वदां आणि सर्वत्र अनर्थ उत्पन्न करणारे आहेत, ही गोष्ट जगत्-प्रसिद्ध आहे. पण संशय—विपर्यय-शून्य झालास तर ब्रह्मविज्ञान झालें असे म्हणेनास ? असो; याप्रमाणे आचार्यांनीं त्याची पुष्कळ कसून परीक्षा घेतली, परंतु शिष्याने सर्व आचार्य—प्रश्नांचीं उत्तरें बराबर देऊन तो आपण घेतलेल्या स्थानापासून ढळला नाहीं. तो म्हणालाः—"ब्रह्म हे ज्ञात वस्तूहून निराळें आहे, व अज्ञात वस्तूहून निराळें आहे.' हा मंत्र आपणच मला सांगितला आहे. वेदपरंपरा व संप्रदायपद्धति आपण सांगितलेल्या मंत्राचेंच समर्थन करितात. युक्तिही त्यालाच अनुमोदन देते, आणि माझा अनुभवही तेंच सांगतो." असें निश्चयपूर्वक बोलून त्यानें मौनाचा स्वीकार केला. या त्याच्या स्पष्ट व मोकळेपणाच्या बोलण्यावरून व शेवटच्या निश्चित स्तब्धपणावरून आचार्यांस व इतर सर्वांस कळून चुकलें कीं, ब्रह्माच्या स्वरूपाविषयीं व ब्रह्मविद्येविषयीं त्याचा निश्चय दृढ झाला आहे.

शिष्य—कशावरून म्हणतां असें आपण ?

सिद्धान्ती—जो मुमुक्षु आमच्या सारख्या ब्रह्मवेत्यामध्यें उभा राहून, तो साधक म्हणाला तसें तात्विक दृष्टीनें समजून म्हणेल, त्याला खरोखर ब्रह्म समजलें आहे, असें म्हटलें पाहिजे.

शिष्य—कोणतें त्या मुमुक्षूचें असे वचन कीं जें त्याची ब्रह्मज्ञता दाखवितें ?

सिद्धान्ती—'मला ब्रह्म समजले नाहीं. व मला तें समजले' हें वाक्य जेव्हां तो बोलला, तेव्हांच आम्हांस समजलें कीं हा ब्रह्मज्ञ झाला आहे. ज्ञाताज्ञात वस्तूहून ब्रह्मवस्तु निराळी आहे असा आचार्यांनी सांगितलेला मंत्र या मुमुक्षूनें युक्ति आणि अनुभव या दोन्ही साधनानीं अजमाहून पाहिला आणि ब्रह्मवस्तूविषयीं आपल्या बुद्धीचा निश्चय केला. हा त्या मुमुक्षूचा निश्चय (रूपान्तरानें 'मला ब्रह्म समजलें नाहीं व समजले' या वाक्यानें) जेव्हां त्यानें आम्हां सर्वांस सांगितला, तेव्हां आचार्य-ज्ञानाची व मुमुक्षूच्या ज्ञानाची एकतानता झाली. त्यानें आपला निश्चय वाक्यान्तरानें सांगितला, हा मंदबुद्धीचे जे लोक आहेत त्यांना उत्पन्न होणाऱ्या मोहाचें निराकरण करण्यासाठीं सांगितला. अर्थातच त्या मुमुक्षूचें वाक्य श्रुतीला, युक्तीला, आणि अनुभवाला योग्य असेंच घेतें. ॥१०॥२॥

सारांश, जीवांच्या परिच्छिन्न बुद्धीला अनंत ब्रह्म गोचर होणारें नव्हे, पण त्या बुद्धीला शास्त्रश्रवणानें ब्रह्माचें परोक्ष ज्ञान होतें. म्हणून या मंत्राचा भावार्थ असा कीं ब्रह्माचें सामान्य ज्ञान होणें सुकर आहे; पण विशेषज्ञान किंवा विज्ञान होणें कठिण आहे. अतएव समजलें व समजलें नाहीं असें मंत्रोक्त वचन योग्यच आहे. गणितांतील आनंत्याचें ज्ञान-विज्ञान कोणास होतें बरें!)

शिष्याचार्यसंवादात्प्रतिनिवृत्य स्वेन रूपेण श्रुतिः समस्तसंवादनिर्वृत्तमर्थमेव बोधयति—यस्यामतमित्यादिना।

सिद्धान्ती—याप्रमाणें आचार्य व शिष्य यांचा संवाद संपवून श्रुति स्वतःच सर्ववादिसंमत जो अर्थ उत्पन्न झाला, तो या मंत्रांत सांगत आहे.

यस्यामतं तस्य मतं मतं यस्य न वेद सः। अविज्ञातं विजानतां विज्ञातमविजानताम् ॥ ११ ॥३ ॥

अन्वयार्थ—यस्य अमतं तस्य मतं (ज्याला कळलें नाहीं असें वाटतें त्याला कळलें आहे) **यस्य मतं सः न वेद** (ज्याला कळलें आहे असें वाटतें त्याला कांहीं समजलें नाहीं) **विजानतां अविज्ञातं, अविजानतां विज्ञातं** (ज्ञानी पुरुषाला ब्रह्म अज्ञेय आहे, असें समजतें आणि अज्ञान्याला तें ज्ञेय आहे असें समजतें.)

सारांश, ब्रह्मवस्तु वस्तुतः मानवी ज्ञानाला अज्ञेय आहे, ज्ञानाच्या पलीकडे असणारी ही वस्तु आहे, असें ज्याला निश्चित ज्ञान झालें, त्याला ब्रह्म काय नाहीं हें समजून ब्रह्मवस्तु श्रुतिद्वारानें मात्र 'अज्ञेय आहे' असें समजतें. ज्याला ब्रह्म समजलेंसें वाटतें, त्याला तें बिलकुल समजलेलें नसतें.

यस्य ब्रह्मविदोऽमतमविज्ञातमविदितं ब्रह्मेति मतमभिप्रायो निश्चयस्तस्य मतं ज्ञातं सम्यग्ब्रह्मेत्यभिप्रायः। यस्य पुनर्मतं ज्ञातं विदितं मया ब्रह्मेति निश्चयो न वेदैव स न ब्रह्म विजानाति सः। विद्वद्विदुषोर्यथोक्तौ पक्षाववधारयति—अविज्ञातममतमविदितमेव ब्रह्म विजानतां सम्यग्विदितवतामित्येतत्। विज्ञातं विदितं ब्रह्माविजानतामसम्यग्दर्शिनामिन्द्रियमनोबुद्धिष्वेवाऽऽत्मदर्शिनामित्यर्थः। न त्वत्यन्तमेवाव्युत्पन्नबुद्धीनाम्। न हि तेषां विज्ञातमस्माभिर्ब्रह्मेति मतिर्भवति। इन्द्रियमनोबुद्ध्युपाधिष्वात्मदर्शिनां तु ब्रह्मोपाधिविवेकानुपलम्भाद् बुद्ध्याद्युपाधेश्च विज्ञातत्वाद्विदितं ब्रह्मेत्युपपद्यते भ्रान्तिरित्यतोऽसम्यग्दर्शनपूर्वपक्षत्वेनोपन्यस्यते विज्ञातम-

विजानतामिति । अथवा हेत्वर्थ उत्तरार्धोऽविज्ञातमित्यादिः ॥ ११ ॥ ३ ॥

सिद्धान्ती—ज्या ब्रह्मवेत्त्याला असें वाटतें कीं 'मला ब्रह्म समजलें नाहीं कारण तें अज्ञेय आहे, हा माझा निश्चय आहे,' त्याला ब्रह्माचें स्वरूप उत्तम रीतीनें समजलें असतें.

पूर्व०—अहो ! हा काय घोंटाळा आहे ? मघांपासून आपण ज्याला समजलें त्याला समजलें नाहीं आणि ज्याला समजलें नाहीं, त्याला समजलें असें अनेक वेळ म्हणाला, याचें तात्पर्य काय ?

सिद्धान्ती—*थोडावेळ थांबा. ह्याचें तात्पर्य तुम्हांला आतां इतक्यांतच सांगतों.* या मंत्राचा अर्थ शब्दशः आपण पूर्ण करूं, आणि नंतर मग तो समजून घेऊं. पुढच्या वाक्याचा अर्थ असा आहे कीं 'मला ब्रह्म समजलें असा ज्याच्या बुद्धीनें निश्चय केला, त्याला कांहीं समजलेलें नसतें. सारांश, विद्वान् आणि अविद्वान् यांचे दोन पक्ष होतात. ते असेः ज्यांना यथार्थ ज्ञान झालेले आहे, त्यांच्या बुद्धीचा असा निश्चय असतो कीं, बुद्धीला ब्रह्मवस्तु नेहमीं अज्ञातच राहणार; पण ज्यांना मुळी साक्षात्कारच झाला नाहीं आणि जें मन बुद्ध्यादि उपाधीनीं युक्त असलेल्या ज्ञात्याला ब्रह्मवस्तुज्ञान होतें असें समजतात, त्यांना कांहीं ब्रह्मवस्तूचें ज्ञान नसतें. आतां, ज्यांची बुद्धि मुळीच असंस्कृत असते, त्यांना तर ब्रह्मवस्तूविषयीं अत्यंत अज्ञानच असतें. त्यांना मात्र केव्हांही वाटत नाहीं की, *आपल्यास ब्रह्म समजलें आहे. असो; आतां तुम्ही मघाशीं जी शंका विचारलीत* तिचें स्पष्ट निराकरण करितों. जीवाला विषयाचें ज्ञान होतें तें इंद्रियांच्या, मनाच्या व बुद्धीच्या द्वारानें होतें. ही सर्व द्वारें जड आहेत. या विषयज्ञानाच्या उपाधि आहेत. या उपाधि जोंपर्यंत जीव आपल्या उराशीं बाळगून ठेवितो, तोंपर्यंत त्याला कोणत्याही वस्तूचें यथार्थ ज्ञान-विज्ञान होणार नाहीं. बुद्धि निश्चयानें सांगेल, मनाला वाटेल, इंद्रिये दाखवितील तशी वस्तू जीवाला दिसते, वस्तु असेल तशी दिसत नाहीं. वस्तूचें यथार्थ ज्ञान होईल केव्हां ? जेव्हां जीव इंद्रियादि उपाधि टाकून देईल तेव्हां. आतां हें स्पष्टच आहे कीं इंद्रियांच्या उपाधि आत्मस्वरूप आहेत असें जे मानतात, इंद्रियादि उपाधिच आत्मा आहे (जीव आहे) असें समजतात, त्यांना उपाधींमुळें विवेक उत्पन्न होत नाहीं. आणि ब्रह्मवस्तु समजत नाहीं. तथापि उपाधीच्या द्वारानें आपल्यास ब्रह्म समजलें आहे अशी ते स्वतःची समजूत करून घेतात. अर्थातच ही भ्रांति आहे, जड व सान्त बुध्यादिकांस चिद्रूपी अनंत ब्रह्म केव्हांही समजावयाचें नाहीं. असो; याप्रमाणें मंत्राच्या उत्तरार्धांतील शेवटच्या दोन पदांनीं या साक्षात्कार न झालेल्या लोकांचा पूर्वपक्ष सांगितला जातो.

शिष्य—या अज्ञानी लोकांस ब्रह्म समजलें असें वाटतें हाच ना पूर्वपक्ष ? बरें, पण मला असेंही वाटतें कीं या मंत्रांतील दुसरा चरण हेत्वर्थी आहे, असें रजत-दृष्टांतावरून समजतें. शुक्तिज्ञात्याला रजत अज्ञात असतें व शुक्तिज्ञान नसलेल्याला रजतज्ञान होतें म्हणून हा उत्तरार्ध पहिल्या अर्धाचा हेतु आहे. 'हें उपाधिग्रस्त विश्व ब्रह्म नव्हे, ही सृष्टि ही केवळ भ्रांति आहे.' हें तात्पर्य आहे.

सिद्धान्ती—कांहीं प्रत्यवाय नाहीं. असो; ॥ ११ ॥ ३ ॥

अविज्ञातं विजानतामित्यवधृतम्। यदि ब्रह्मात्यन्तमेवाविज्ञातं लौकिकानां ब्रह्मविदां चाविशेषः प्राप्तः। अविज्ञातं विजानतामिति च परस्परविरुद्धम्। कथं तु तद्ब्रह्म सम्यग्विदितं भवतीत्येवमर्थमाह—

सिद्धान्ती—याप्रमाणें गेल्या मंत्रांत सम्यग्दर्शी लोकांना ब्रह्मवस्तु बुद्धीला अज्ञेय आहे असें सांगितलें आहे व तें आपल्यास समजलेंही.

शिष्य—पण जर ब्रह्मवस्तु ब्रह्मवेत्त्यानांही समजत नाहीं तर त्यांच्यामध्यें आणि सामान्य लोकांमध्यें कोणता विशेष आहे ? लोकांनाही ब्रह्म समजत नाहीं व ब्रह्मवेत्त्यांनाही समजत नाहीं, तेव्हां या उभयतामध्यें फरक कोणता ? तसेंच जाणणाऱ्याला जाणतां येत नाहीं, समजणाऱ्याला समजत नाहीं, हा परस्पर-विरोध कसा उपपन्न होतो ? हें अजूनही मला चागलेसे समजत नाहीं. आणखी ते ब्रह्म चांगल्या रीतीनें कसें समजेल ? हेही आपण मला कृपा करून सांगावें. म्हणजे ब्रह्मवेत्ते आणि सामान्य लोक यांत विशेष कोणता ? परस्पर विरोधी वाक्यांची संगति कशी लावावयाची ? आणि ब्रह्मज्ञान-विज्ञान कसे करून घ्यावयाचें ? या तीन प्रश्नांचीं उत्तरें मला आपण कृपा करून सांगावीं.'

सिद्धान्ती—पुढील मंत्राचें व्याख्यान ऐक.

प्रतिबोधविदितं मतममृतत्वं हि विन्दते। आत्मना विन्दते वीर्यं विद्यया विन्दतेऽमृतम् ॥१२॥४॥

अन्वय व अर्थ—हि प्रतिबोध-विदितं मतं अमृतत्वं विंदते (कराण प्रत्येक ज्ञान होण्याचे वेळीं तें ज्ञान ज्या आत्म्याला होतें त्याचें स्वरूप समजलें म्हणजे अमृतत्व मिळतें-मोक्ष प्राप्त होतो)**-आत्मना वीर्यं विन्दते** (आत्मज्ञानानें सामर्थ्य प्राप्त होतें.) **विद्यया अमृतं विन्दते** (विद्येच्या योगानें अमृत प्राप्त होतें) सारांश, आपल्या विषयज्ञानाचा साक्षी

आत्मा आहे, त्याचा निश्चय झाला म्हणजे आपल्याला जन्म–मृत्यु तरून जाण्याचें सामर्थ्य प्राप्त होतें व शेवटीं अमृताची प्राप्ति होते.

प्रतिबोधविदितं बोधं बोधं प्रति विदितम्। बोधशब्देन बौद्धाः प्रत्यया उच्यन्ते । सर्वे प्रत्यया विषयीभवन्ति यस्य स आत्मा सर्वबोधान्प्रतिबुध्यते सर्वप्रत्ययदर्शी चिच्छक्तिस्वरूपमात्रः प्रत्ययैरेव प्रत्ययेष्वविशिष्टतया लक्ष्यते नान्यद्द्वारमात्मनो विज्ञानायातः प्रत्ययप्रत्यगात्मतया विदितं ब्रह्म यदा तदा तन्मतं तदा तत्सम्यग्दर्शनमित्यर्थः। सर्वप्रत्ययदर्शित्वे चोपजननापायवर्जितदृक्स्वरूपतानित्यत्वं विशुद्धस्वरूपत्वमात्मत्वं निर्विशेषतैकत्वं च सर्वभूतेषु सिद्धं भवेत्। लक्षणभेदाभावाद्योम्न इव घटगिरिगुहादिषु। विदिताविदिताभ्यामन्यद्ब्रह्मेत्यागमवाक्यार्थः । एवं परिशुद्ध एवोपसंहृतो भवति। "दृष्टेर्द्रष्टा श्रुतेः श्रोता मतेर्मन्ता विज्ञातेर्विज्ञाता" इति हि श्रुत्यन्तरम्। यदा पुनर्बोधक्रियाकर्तेति बोधक्रियालक्षणेन तत्कर्तारं विजानातीति बोधलक्षणेन विदितं प्रतिबोधविदितमिति व्याख्यायते । यथा यो वृक्षशाखाश्चालयति स वायुरिति तद्वत् । तदा बोधक्रियाशक्तिमानात्मा द्रव्यं न बोधस्वरूप एव । बोधस्तु जायते विनश्यति च । यदा बोधो जायते तदा बोधक्रियया सह वशगः । यदा बोधो नश्यति तदा नष्टबोधो द्रव्यमात्रं निर्विशेषः। तत्रैवं सति विक्रियात्मकः सावयवोऽनित्योऽशुद्ध इत्यादयो दोषा न परिहर्तुं शक्यन्ते। यद्यपि काणादानामात्ममनःसंयोगजो बोध आत्मनि समवैति। अत आत्मनि बोद्धृत्वं न तु विक्रियात्मक आत्मा। द्रव्यमात्रस्तु भवति घट इव रागसमवायी। अस्मिन्पक्षेऽप्यचेतनं द्रव्यमात्रं ब्रह्मेति "विज्ञानमानन्दं ब्रह्म" इत्याद्याः श्रुतयो बाधिताः स्युः। आत्मनो निरवयवत्वेन प्रदेशाभावान्नित्यसंयुक्तत्वाच्च मनसः स्मृत्युत्पत्तिनियमानुपपत्तिरपरिहार्या स्यात् । संसर्गधर्मित्वं चाऽऽत्मनः श्रुतिस्मृतिन्यायविरुद्धं कल्पितं स्यात्। "असङ्गो न हि सज्जते" "असक्तं सर्वभृत्" इति श्रुतिस्मृती द्वे। न्यायश्च। गुणवद्गुणवता संसृज्यते नातुल्यजातीयम्। अतो निर्गुणं निर्विशेषं सर्वविलक्षणं केनचिदप्यतुल्यजातीयेन संसृज्यत इत्येतन्न्यायविरुद्धं भवेत् । तस्मान्नित्यालुप्तविज्ञानस्वरूपज्योतिरात्मा ब्रह्मेत्ययमर्थः सर्वबोधबोद्धृत्व आत्मनः सिध्यति नान्यथा। तस्मात्प्रतिबोधविदितं मतमिति यथा व्याख्यात एवार्थोऽस्माभिः। यत्पुनः स्वसं-

वेद्यता प्रतिबोधविदितमित्यस्य वाक्यस्यार्थो वर्ण्यते। तत्र भवति सोपाधिकत्व आत्मनो बुद्ध्युपाधिस्वरूपत्वेन भेदं परिकल्प्याऽऽत्मनाऽऽत्मानं वेत्तीति संव्यवहारः। "आत्मनैवात्मानं पश्यति" "स्वयमेवाऽऽत्मनाऽऽत्मानं वेत्थ त्वं पुरुषोत्तम" इति। ननु निरुपाधिकस्याऽऽत्मन एकत्वे स्वसंवेद्यता परसंवेद्यता वा संभवति। संवेदनस्वरूपत्वात्संवेदनान्तरापेक्षा च न संभवति। यथा प्रकाशस्य प्रकाशान्तरापेक्षाया न संभवस्तद्वत्। बौद्धपक्षे स्वसंवेद्यतायां क्षणभंगुरत्वं निरात्मकत्वं च विज्ञानस्य स्यात्। न हि विज्ञातुर्विज्ञातेर्विपरिलोपो विद्यतेऽविनाशित्वात्। "नित्यं विभुं सर्वगतम्" "स वा एष महानज आत्माऽजरोऽमरोऽमृतोऽभयः" इत्याद्याः श्रुतयो बाध्येरन्। यत्पुनः प्रतिबोधशब्देन निर्निमित्तो बोधः प्रतिबोधो यथा सुप्तस्येत्यर्थं परिकल्पयन्ति। सकृद्विज्ञानं प्रतिबोध इत्यपरे। निर्निमित्तः सनिमित्तः सकृद्वाऽसकृद्वा प्रतिबोध एव हि सः। अमृतत्वममरणभावं स्वात्मन्यवस्थानं मोक्षं हि यस्माद्विन्दते लभते यथोक्तात्प्रतिबोधाप्रतिबोधविदितात्मकात्तस्माप्रतिबोधविदितमेव मतमित्यभिप्रायः। बोधस्य हि प्रत्यगात्माऽऽत्मविषयं च मतममृतत्वे हेतुः। न ह्यात्मनोऽनात्मत्वममृतत्वं भवत्यात्मत्वादात्मनोऽमृतत्वं निर्निमित्तमेव। एवं मर्त्यत्वमात्मनो यदविद्यायाऽनात्मत्वप्रतिपत्तिः कथं पुनयथोक्तयाऽऽत्मविद्ययाऽमृतत्वं विन्दत इत्यत आह-आत्मना स्वेन स्वरूपेण विन्दते लभते वीर्यबलं सामर्थ्यं धनसहायमन्त्रौषधितपोयोगकृतं वीर्यं मृत्युं न शक्नोत्यभिभवितुमनित्यवस्तुकृतत्वात्। आत्मविद्याकृतं तु वीर्यमात्मनैव विन्दते नान्येनेत्यतोऽनन्यसाधनत्वादात्मविद्यावीर्यस्य तदेव वीर्यं मृत्युं शक्नोत्यभिभवितुम् यत एवमात्मविद्याकृतं वीर्यमात्मनैव विन्दतेऽतो विद्ययाऽऽत्मविषयया विन्दतेऽमृतम्, "नायमात्मा बलहीनेन लभ्यः" इत्याथर्वणे। अतः समर्थो हेतुः, अमृतत्वं हि विन्दत इति ॥ १२ ॥ ४ ॥

सिद्धान्ती—प्रत्येक ज्ञानाच्या वेळीं (म्हणजे बुद्धीच्या साह्यानें आपल्यास जे प्रत्यय येतात ते येत असतां) हा प्रतिबोध या शब्दाचा अर्थ आहे. हे बोध किंवा हें ज्ञान ज्याचे (साक्षित्वाचे) विषय होतात. तो आत्मा होय. आत्म्याला सर्व बोधांचें अथवा प्रत्ययाचें, साक्षी या रूपानें, ज्ञान असतें. तो ज्ञानरूप मात्र आहे. त्याचें ज्ञान साक्षात् तर केव्हांच होत नाहीं. असे कोणतेही शब्द नाहींत कीं ज्यांचा वाच्यार्थ ब्रह्मस्वरूपाचें प्रतिपादन करील, किंवा असें कोणतें ज्ञान नाहीं कीं ज्याचा विषय ब्रह्म असेल. आपल्यास जें ज्ञान होतें त्याचा

सामान्यत्वानें लक्ष्य असणारा (म्हणजे परोक्षत्वानें समजणारा) नित्य साक्षी असणारा तो आत्मा होय. हा केवळ शाखाचंद्रन्यायानें (बालकाला चंद्र दाखवावयाचा असला म्हणजे झाडाच्या फांदीवर तो आहे, असें आपण दाखवितों तद्वत्) मात्र लक्षितां येतो. लक्ष्यवृत्तीनें मात्र सांगतां येतो. 'या बुद्धीला येणाऱ्या प्रत्ययांचा आत्मा ' हें सांगण्याशिवाय आत्म्याचें लक्षणेनें तरी स्वरूप सांगणारें दुसरें द्वारच नाहीं. म्हणून असें म्हणावयाचें कीं बुद्धीचा जो निर्विशेष साक्षी किंवा बुद्धीचा जो नित्य आत्मा तें ब्रह्म होय. हें ज्याला समजलें, 'आत्मा हा बुद्धीचा, प्रत्ययांचा, साक्षी असून त्यांचा तो नियामक आहे, प्रत्येक प्रत्ययामध्यें तो विद्यमान असतो.' असें ज्याला समजलें तो सम्यग्दर्शी किंवा यथार्थज्ञानी होय. त्यालाच खरोखर खरें ब्रह्मज्ञान होणें शक्य आहे.

शिष्य—भगवन् ! हा प्रत्येक ज्ञानाचा साक्षी म्हणजे अंतर्बाह्य विषयांपासून उत्पन्न होणारें व नाश पावणारें जें ज्ञान त्याचा हा साक्षी झाला म्हणजे येणाऱ्या जाणाऱ्या ज्ञानाचा अथवा उत्पन्न विनष्ट होणाऱ्या प्रत्ययांचा हा साक्षी होतो. अर्थातच हा नित्य असला पाहिजे. हा शुद्ध स्वरूपाचा म्हणजे विकार न होणाऱ्या स्वरूपाचा असला पाहिजे. तसेंच, याच्यामध्यें साक्षित्वाशिवाय दुसरें कांहीं एक नसल्यामुळें हा निर्विशेष अथवा निर्गुण असला पाहिजे, आणि याचें वास्तव्य सर्व भूतांचे ठिकाणीं असलें पाहिजे. कारण हा सर्व-साक्षी आहे व सर्वव्यापी आहे. एवंच हा नित्य म्हणजे शुद्ध म्हणजे बुद्ध (हा सर्व प्रत्ययांचा साक्षी ज्ञाता आहे.) म्हणजे मुक्त (कोणत्याही संसर्गानें लिप्त न होणारा) असा असला पाहिजे. अथवा सर्व प्रत्ययांचा साक्षी म्हणून नित्य, ज्ञानैकरूप म्हणून शुद्ध व बुद्ध आणि सुखदुःखविरहित म्हणजे मुक्त असला पाहिजे. याच्या ठिकाणीं लक्षण-भेदांचा (गुणभेदांचा) अभाव असतो, म्हणून (अनेक लक्षणाभेदांनीं भिन्न झालेला नसतो म्हणून) हा आकाशाप्रमाणें (घट, गिरि आणि गुहा इत्यादिकांमध्यें ओतप्रोत भरलेल्या शुद्ध आकाशाप्रमाणें) हा आहे. हा ज्ञाताज्ञाताहून निराळा आहे; म्हणजे ज्ञात वस्तू याच्याहून निराळी आहे, असें नव्हे. सर्व ज्ञात व अज्ञात वस्तूंचा हा आत्मा आहे, पण याच्या ठिकाणीं ज्ञातवस्तूंची ज्ञेयता नाहीं, किंवा अज्ञातवस्तूंची अज्ञेयताही नाहीं. असा श्रुतीचा अभिप्राय आहे. याप्रमाणें केवळ शुद्ध ज्ञानरूप हा आहे, असा सारांश आहे. " हा दृष्टीचा द्रष्टा, श्रुतीचा श्रोता, मतीचा मंता, आणि विज्ञातीचा विज्ञाता आहे. " अशी समानार्थक श्रुति प्रमाणच आहे. होयना ?

पूर्वपक्षी—अहो पण, ज्या वेळेला आत्मा हा ज्ञानाच्या क्रियेचा कर्ता आहे, ' बोधक-क्रिया म्हणजे समजणें, ' विषयाचें ज्ञान होणें, ह्या लक्षणानें तो बोध-क्रियेचा कर्ता आहे, असें मंत्रांतील ' प्रतिबोधविदितं ' शब्दाचें व्याख्यान केलें पाहिजे. वृक्षाच्या शाखांस हालविणाऱ्याला जसें आपण ' वायु ' असें

म्हणतों, त्याप्रमाणें बोध-क्रियेची शक्ति असणारा आत्मा आहे, असें म्हटलें पाहिजे. हें एक द्रव्य आहे. आत्मा हा विज्ञानरूप नव्हे तर ज्ञानी असणारें एक द्रव्य आहे.

शिष्य—हें तुमचें बोलणें मला समजलें नाहीं.

पूर्वपक्षी—यांत न समजावयाचें तें काय आहे? वृक्षास हालविणाऱ्याला जसें आपण वायु म्हणतों, तसेंच, ज्ञान करून देण्याची शक्ति ज्याला ज्यावेळीं असते व आहे, त्याला त्यावेळीं ज्ञान करून देण्याची शक्ति असणारा आत्मा असें म्हणावें. आत्मा ज्ञानरूपच आहे, असें नव्हे, तर तो ज्ञान देणारा आहे, ज्ञान उत्पन्न करणें हा त्याचा गुण आहे. आतां ज्ञान हें उत्पन्न होतें व नाहींसें होतें; ज्यावेळीं ज्ञान उत्पन्न होतें त्यावेळीं आत्मा हा ज्ञान-कर्तृत्वाच्या गुणांसह विद्यमान असतो. आणि ज्यावेळीं ज्ञान नष्ट होतें त्यावेळीं ज्ञानक्रियाशून्य असा द्रव्य मात्र आत्मा असतो. सारांश, आत्मा हे एक द्रव्य आहे आणि ज्ञान उत्पन्न होत असतांना ज्ञान उत्पन्न करणें हा त्याचा गुण आहे.

सिद्धान्ती—हे जर खरें म्हटलें तर आत्म्याला विकार होतात असें होईल. विकारवंत पदार्थ असतो त्याला अवयव असतात व तो अनित्य, अशुद्ध, ज्ञान नसेल त्यावेळीं अबुद्ध इत्यादि दोषान्वित होतो, असें आपल्यास म्हटलेंच पाहिजे. पण आत्मा निर्विकार, निरवयव, नित्य आणि विशुद्ध आहे, असें श्रुति म्हणते; म्हणून तुमचा 'प्रतिबोधविदितं' या शब्दांचा 'ज्ञानक्रिया करणारा' हा अर्थ श्रुतीला संमत होत नाहीं.

पूर्वपक्षी—अहो महाराज! आत्म्याचा आणि मनाचा जेव्हां संयोग होतो तेव्हां आत्म्यामध्यें बोध समवेत होतो, म्हणजे तो आत्म्याशीं एकरूप होतो; म्हणून आत्म्याला बोधकत्वाचें (बोध करण्याचें) सामर्थ्य येतें. आत्मा विकारवंत आहे, असें आम्ही वैशेषिक* पंथाचे अभिमानी म्हणत नाहीं. तो अविकारीच आहे. मात्र आत्मा हे एक द्रव्य आहे, असें आम्ही म्हणतों. मृत्तिकेच्या घटाशीं (मातीच्या गाडग्याला) रंग मिळून जसें उभयतांचें एकरूपत्व होतें, तसेंच, आत्म्याचें ज्ञानाशी एक रूपत्व होतें.

सिद्धान्ती—असें म्हटलें तरी अडचण कोठें दूर होत आहे! ती अडचण ही: केव्हां ज्ञान असतें व केव्हां नसतें, अशी आत्म्याची स्थिति होऊन त्याला अचैतन्यत्व प्राप्त होतें. सारांश, तुमच्या प्रक्रियेप्रमाणें आत्मा हे एक अचैतन्य

---

* वैशेषिक शास्त्राचा कर्ता कणाद या नांवाचा एक प्रसिद्ध ऋषि होता. या महर्षीनेंच कणांची (Atomic Theory) कल्पना सिद्ध केली. वैशेषिक दर्शनकार कणाद हे आस्तिक असून ईश्वरानें हें जगत् कणांपासून (अणूंपासून) उत्पन्न केलें हा यांचा एक मुख्य सिद्धान्त आहे.

द्रव्य आहे, असें होतें, पण हें म्हणणें बरोबर नाहीं. कारण 'ब्रह्म हें विज्ञानरूप व आनंदरूप आहे.' इत्यादि अनेक श्रुति तुमच्या म्हणण्यानें बाधित होतील. श्रुति-बाध होणें हें तर केव्हांही इष्ट नाहीं. शिवाय एकरस व घनदाट आत्मा हा निरवयव आहे. तेव्हां निरवयव आत्म्याशीं सावयव मनाचा नूतन संयोग कसा होणार ? ज्याला अवयव नाहींत त्या वस्तूचा अवयव असणाऱ्या वस्तूंशीं संयोग-संबंध होत नाहीं असें तुमचें न्यायदर्शन म्हणतें. पुनः; सर्वव्यापी आत्मा हा मनाशीं नित्य-संयुक्त आहे; म्हणून तुमच्या सरणीनें स्मरण होण्याची उपपत्ति जुळणार नाहीं. प्रत्यक्ष ज्ञानाचा नाश झाल्यानंतर कांहीं वेळानें व त्या प्रत्यक्ष ज्ञानाच्या संस्कारानें स्मरण होतें. पण आत्मा नित्य असल्यामुळें आत्ममनांचा संयोग नित्यच राहणार; म्हणजे सर्व गोष्टी प्रत्यक्ष असणार. सारांश, ह्या विचारसरणीनें स्मरणाच्या उत्पत्तीला अवकाशच राहणार नाहीं. आणखी, आत्म्याला संसर्गाची उपाधि असणें, संयोग होणें, स्मृतीच्या, श्रुतीच्या, व न्यायाच्या सांगण्याविरुद्ध आहे. 'आत्मा असंग आहे याला कशाचीही आसक्ति नसते' आत्मा हा सर्व-व्यापी असून सर्वांपासून अलिप्त आहे' हें श्रुतिस्मृतींचें सांगणें आहे. न्यायही तुमच्या विरुद्धच आहे. पहा कीं दोन वस्तूंचा संसर्ग होण्याला कांहीं तरी वस्तु उभयतांस सामान्य असावी लागते. सगुणाचा सगुणाशीं संयोग होतो, निर्गुणाचा सगुणाशीं होत नाहीं. तेव्हां निर्गुण, निर्विशेष, सर्व-विलक्षण आत्मा अद्वितीय (ज्याच्याशीं तुल्य अशी कोणतीच वस्तु किंवा वस्तुजाति नाहीं.) असा आहे. या निर्गुण आत्म्याशीं तुमच्या सगुण मनाचा संबंध कसा होणार ? म्हणून आम्ही म्हणतों कीं ज्याचें मुख्य स्वरूपच नित्य-ज्ञान आहे, ज्याचे विज्ञान केव्हांही लुप्त होत नाहीं तो आत्मा किंवा तें ब्रह्म होय. हें तत्त्व सिद्ध होण्याला सर्व बोधांचें साक्षित्व आत्म्याचे ठिकाणीं असलेंच पाहिजे. येथें दुसरा प्रकार आणूं पाहणें संभवनीय नाहीं. म्हणून 'प्रतिबोधे विदितं' यांचा 'प्रत्येक बोधाचा साक्षी' असा जो आम्ही अर्थ केला आहे-तोच यथार्थ आहे. आत्मा हा प्रत्येक बोधाचा साक्षी आहे, असा ब्रह्मवेत्यांचा निश्चय असतो व असाच अर्थ आम्ही केला आहे.

पूर्वपक्षी—'प्रतिबोधविदितं' या पदांचा अर्थ स्वसंवेद्यता असा केला तरी वेद्य आणि वेदिता (ज्ञेय आणि ज्ञाता) असे दोन भाग पडतातच.

सिद्धान्ती—यांत कांहीं दोष नाहीं. आत्म्याला बुद्ध्यादि उपाधींमुळें सोपाधि-कत्व येतें. तें सोपाधिकत्व येथें प्राप्त झालें आहे (जीवत्व प्राप्त झालें आहे). त्या जीवात्म्याचा व शुद्ध आत्म्याचा भेद जीवास दिसतो अशी भेदाची कल्पना करून शुद्ध आत्मा जीवात्म्याला पाहतो, (जाणतो) असा व्यवहार ठीक होतो. ही व्यवहारांतील भाषा आहे, परमार्थीतील नव्हे. हें ध्यानांत ठेवा. "आत्म्याच्याच साहाय्यानें आत्म्याला (जीवाला) पाहतो" "हे पुरुषोत्तमा ! तूं स्वतःच

आत्म्याच्या साहाय्यानें आत्म्याला पाहतोस" या श्रुति व स्मृति आम्ही म्हणतों याला प्रमाणच आहेत.

पूर्वपक्षी—ज्या आत्म्याला कोणतीही उपाधि नाहीं, जो एकच आहे, त्याला स्वसंवेद्यता (स्वतःनें स्वतःला जाणणें) किंवा परसंवेद्यता दुसऱ्याकडून जाणलें जाणें) याचा संभव असणारच; कारण जाणणें हें आत्म्याचें स्वरूप आहे.

सिद्धान्ती—कणाद म्हणतात, तसें आत्म्याला स्वतःविषयीं ज्ञान असणें संभवनीय नाहीं, कारण तो ज्ञानरूप आहे. प्रकाशाला दुसऱ्या प्रकाशाची अपेक्षा लागत नाहीं. त्याप्रमाणें 'जाणणें' या स्वरूपाला (बोध स्वरूपाला) बोधासाठीं दुसऱ्याची अपेक्षा असत नाहीं. आतां, प्रत्येक क्षणीं नष्ट होणारें 'विज्ञानच आत्मस्वरूप आहे,' असें जे बौद्धपंथी लोक म्हणतात तें म्हणणें ग्रहण केलें, तर विज्ञानाला म्हणजे आत्म्याला क्षणभंगुरत्व व निरात्मकत्व प्राप्त होईल. पण असें म्हणणें श्रुति-विरुद्ध आहे. पहा कीं 'जाणणाऱ्याचें जाणणें-(जाणण्याची शक्ति-जाणणेपणा, जाणण्याचें साक्षित्व)-याचा नाश केव्हांही होत नाहीं; कारण साक्षित्व अविनाशी आहे' 'हा आत्मा नित्य, विभु व सर्व-व्यापी आहे' हा आत्मा मोठा, अनादि, अजर (कधींही म्हातारा न होणारा) अमर, अमृत, आणि अभय असा आहे,' इत्यादि श्रुति तुमच्या अर्थानें बाधित होतात. म्हणून बौद्धपक्ष खोटा आहे.

पूर्वपक्षी—बरें! तें असो; 'प्रतिबोध' शब्दानें 'मी ब्रह्म आहें' अशा चिंतनाची चित्तवृत्ति जोंपर्यंत असते, तोंपर्यंत त्या वृत्तीला 'संप्रज्ञात समाधि' असें म्हणतात; आणि तो चित्तव्यापार स्तब्ध होऊन परमात्मानंद-साक्षात्कार झाला, (या आनंदाचा अनुभव आपल्यास झोंपेमध्यें येत असतो) म्हणजे त्याला 'असंप्रज्ञात समाधि' असें म्हणतात. तेव्हां 'प्रतिबोध' शब्दानें निर्निमित्त (निमित्तशून्य) बोध हा अर्थ केला किंवा आत्मसाक्षात्काराचा अर्थ केला तर काय बिघडेल?

सिद्धान्ती—निष्कारण बोध केव्हांही होत नाहीं. असो; पण बोध निष्कारण असो वा सकारण असो, एकदां होवो किंवा अनेकदां होवो, त्याचें नित्यसाक्षित्व नष्ट होत नाहीं. म्हणून प्रतिबोधाचा अर्थ आम्ही बोधाचा साक्षी, असाच करणार व हा तुम्हांसही मान्य असला पाहिजे. असो; अमृतत्व म्हणजे अमरणता (स्वात्मारामामध्यें प्रतिष्ठापन) होय, मोक्ष होय. ज्या अर्थी आतां ठरविलेल्या ज्ञान-साक्षित्वाचे मात्र स्वरूप आत्मा आहे, व ज्या अर्थी आत्मज्ञान झालें असतां मोक्ष मिळतो, त्या अर्थी बोध-साक्षी आत्मा आहे, असा ब्रह्मवेत्यांचा निश्चय होतो. अमृतत्व मिळण्याला बोधाचा प्रत्यगात्मा हाच आत्मा आहे. बोध-साक्षी आहे, असा निश्चय होणें हें साधन आहे. 'मी परमात्मा आहें' हा अखंड बोध झाला म्हणजे जीव मुक्त होतो.

पूर्वपक्षी—बोधाचा साक्षी जो प्रत्यगात्मा (अंतर्यामी आत्मा) तो परमात्मा नव्हे. परमात्मा, ब्रह्मांडाच्या बाहेर राहतो आणि या ब्रह्मांडाच्या बाहेर राहणाऱ्या परमात्म्याची प्राप्ति झाली म्हणजे मोक्ष मिळतो.

सिद्धान्ती—असें नाहीं. तुमच्या म्हणण्यानें प्रत्यगात्मा हा आत्मा नाहीं, असें होतें. 'आत्मा अमर आहे' असें श्रुति सांगते; कारण मृत्यूचाही आत्मा तोच आहे. तसेंच, परमात्म्याचाही आत्मा तोच आहे आणि त्याचें अमरत्व हें स्वभावसिद्ध आहे. मृत्यूचाही तो आत्मा असतो, म्हणून मृत्यूला आपल्या स्वतःच्या आत्म्याचें हनन करितां येणार नाहीं. आत्म्याचे ठिकाणीं जर अनात्मप्रतीति झाली, (म्हणजे देह हा आत्मा आहे; किंवा आत्मा हा देह आहे, अशी जर भ्रांति झाली) तर मात्र आत्म्याला मर्त्यत्व प्राप्त होईल (तर मात्र आत्मा मरेल) अर्थातच देह मरेल.

शिष्य—बरें. आत्मविद्येनें अमृतत्व प्राप्त होतें, असें मंत्रांत म्हटलें आहे, त्याची उपपत्ति कशी ?

सिद्धान्ती—ऐकाः उभयतांही चित्त देऊन ऐकाः—स्वरूपानेंच वीर्य, बल किंवा सामर्थ्य जीवाला मिळतें. हें पहाः धन, मणिमंत्र, औषधी, तप, योग, मित्र इत्यादिकांपासून प्राप्त झालेल्या बलाला मृत्यूचा पराभव करितां येत नाहीं; पण आत्मविद्येनें प्राप्त झालेलें जें सामर्थ्य असतें, तें आत्मस्वरूपानें मात्र मिळतें, त्याची प्राप्ति दुसऱ्या कोणत्याही साधनानें होत नाहीं. तेव्हां आत्मसाधनानें प्राप्त झालेल्या आत्मविद्येचें अविनाशी बल मृत्यूचा पराभव करूं शकतें; असें आहे म्हणून आत्मविद्येनें मिळालेलें बल आत्म्यानेंच मिळविलें असें होतें. म्हणून श्रुति म्हणते कीं, आत्मविद्येनें अमृत मिळतें. 'हा आत्मा बलहीनाला केव्हांही मिळावयाचा नाहीं' अशी छांदोग्य श्रुति प्रमाण आहे. अर्थात् आत्मविद्या अमरत्व मिळविण्याला महासमर्थ उपाय आहे ॥ १२ ॥ ४ ॥

इह चेदवेदीदथ सत्यमस्ति न चेदिहावेदीन्महती विनष्टिः। भूतेषु भूतेषु विचित्य धीराः प्रेत्यास्माल्लोकादमृता भवन्ति ॥ १३ ॥ ५ ॥

इति द्वितीयः खण्डः ॥ २ ॥

अन्वयार्थ—इह चेत् अवेदीत् अथ सत्यं आस्ति (आत्मस्वरूप वर वर्णन केल्याप्रमाणें आहे, असें जर येथें म्हणजे या लोकीं समजेल, तर अमरत्व प्राप्त होईल.) इह न चेत् अवेदीत् महती विनष्टिः (हें आत्म-

स्वरूप जर येथें कळलें नाहीं, तर फार मोठा भयंकर अनर्थ आहे.) धीराः भूतेषु भूतेषु विचित्य अस्मात् लोकात् प्रेत्य अमृताः भवन्ति (विद्वान् लोक प्रत्येक चराचर भूताचे ठिकाणीं आत्मस्वरूप आहे, असें जाणतात आणि ह्या लोकांतून गेल्यावर (अथवा येथें असतांनां ही) मोक्ष–पदवी प्राप्त करून घेतात.)

सारांश, ब्रह्मज्ञान झालें असतां शोक–मोहादि नाहींसे होऊन मोक्ष मिळतो; पण हें ज्ञान झालें नाहीं तर मोठ्या संकटाचा समय प्राप्त होतो. बुद्धिमान् लोक आत्मज्ञान करून घेतात आणि मुक्त होतात.

कष्टा खलु सुरनरतिर्यक्प्रेतादिषु संसारदुःखबहुलेषु प्राणिनिकायेषु जन्मजरामरणरोगादिसंप्राप्तिरज्ञानादत इहैव चेन्मनुष्योऽधिकृतः समर्थः सन्यद्यवेदीत्मादानं यथोक्तलक्षणं विदितवान्यथोक्तेन प्रकारेण। अथ तदस्ति सत्यं मनुष्यजन्मन्यस्मिन्नविनाशोऽर्थवत्ता वा सद्भावो वा परमार्थता वा सत्यं विद्यते। न चेदिहावेदीदिति न चेदिह जीवंश्चेदधिकृतोऽवेदीन्न विदितवांस्तदा महती दीर्घाऽनन्ता विनष्टिर्विनाशनं जन्मजरामरणादिप्रबन्धाविच्छेदलक्षणा संसारगतिस्तस्मादेवं गुणदोषौ विजानन्तो ब्राह्मणा भूतेषु भूतेषु सर्वभूतेषु स्थावरेषु चरेषु चैकमात्मतत्त्वं ब्रह्म विचित्य विज्ञाय साक्षात्कृत्य धीरा धीमन्तः प्रेत्य व्यावृत्य ममाहंभावलक्षणादविद्यारूपादस्माल्लोकादुपरम्य सर्वात्मैकत्वभावमद्वैतमापन्नाः सन्तोऽमृता भवन्ति ब्रह्मैव भवन्तीत्यर्थः। "स यो ह वै तत्परमं ब्रह्म वेद ब्रह्मैव भवति" इति श्रुतेः॥ १३॥ ५॥

इति श्रीमत्परमहंसपरिव्राजकाचार्यश्रीमच्छंकरभगवत्पादकृतौ केनोपनिषत्पदभाष्ये द्वितीयः खण्डः॥ २॥

सिद्धान्ती—खरोखर अज्ञानामुळें संसाराची स्थिति मोठी दुःखप्रद होते. जन्म पावणें, रोगी असणें, वार्धक्य येणें, आणि मरणें इत्यादि सर्व दुःखें या संसारांत अज्ञानी पुरुषाला प्राप्त होतात. चौऱ्यांशी लक्ष योनींतील कोणत्याही योनीमध्यें तुम्ही जन्म घ्या, देव व्हा, मनुष्य असा, पशुपक्ष्यादिकांमध्यें जन्म घ्या, किंवा भूतप्रेतादिकांमध्यें वास्तव्य करा, सारांश, कोठेंही असा, ह्या दुःखपूर्ण संसाराची स्थिति खरोखर अति कष्टाची, अति संकटाची असावयाची. या संसारात अज्ञानी पुरुषाला केव्हांही आणि कोठेंही शुद्ध सुखाचा क्षणभरसुद्धां अनुभव प्राप्त होत नाहीं. म्हणून ह्या लोकींच जर मनुष्याला ज्ञानाचा अधिकार प्राप्त होऊन, ब्रह्मस्वरूपाचें यथार्थ ज्ञान झालें; वरती ज्या रीतीनें ब्रह्मस्वरूप जाणून

घ्यावें असें सांगितलें आहे, त्या रीतीनें तो जर ब्रह्मवेत्ता झाला, तर खरोखर तो मनुष्य ह्या जन्मींच अविनाशी म्हणजे अमर होतो, या जन्मींच तो ब्रह्मस्वरूप होतो. येथें त्याला जें हवें तें सद्रूप मिळतें, त्याचें शील उत्तम प्रकारचें होतें आणि परमार्थ साध्य होऊन तो कृतार्थ होतो; पण जर जीवानें अधिकारसंपन्न न होतां ब्रह्मज्ञान संपादन केलें नाहीं, तर दीर्घ, व दीर्घकालपर्यंत, अनंत कालपर्यंत, त्याच्या पाठीमागें जन्म-जरा-मरणात्मक संसार हात धुवून लागतो. संसार आणि जन्म-मरणादि दुःखें यांचें नित्य साहचर्य आहे. जेथें संसार आहे, तेथें या दुःखांचें वास्तव्य असतें. असो; याप्रमाणें ब्रह्मज्ञानाचे गुण आणि ब्रह्मविषयक अज्ञानाचे दोष शहाणे लोक जाणून घेतात आणि ब्रह्मवेत्ते होतात. यानांच ब्राह्मण ही संज्ञा योग्य आहे. हे महात्मे या स्थावर-जंगमात्मक सृष्टींमधील 'प्रत्येक वस्तू-वस्तू-मध्यें आत्मतत्त्व आहे,' असें साक्षात्-ज्ञान करून घेतात. हे कृतार्थ लोक ममत्त्व आणि अहंकार हींच जिचीं लक्षणें आहेत, अशा अविद्येची निवृत्ति करून संसाराचा म्हणजे सकाम व साभिमान कर्मांचा त्याग करितात आणि सर्व भूतांचे ठिकाणीं अद्वैत-बुद्धि प्राप्त झाल्यामुळें व सर्व ठिकाणी त्यांस ब्रह्मस्वरूप दिसूं लागल्यामुळें ते येथेंच अमृतत्व पावतात अथवा ब्रह्म होतात. हा तात्पर्यार्थ आहे. 'ज्याला परब्रह्मस्वरूप समजलें, तो ब्रह्मरूप होतो, हें प्रसिद्धच आहे.' ही श्रुति आमचे म्हणण्यास प्रमाण आहे.

शिष्य—भगवन्! हा मृत्युलोक सोडून गेल्यावर हे कृतार्थ लोक मोक्ष पावतात, असा नाहींका अर्थ होणार?

सिद्धान्ती—वेड्या! जो येथेंच मुक्त झाला तो देह-पात झाल्यावर मुक्त होतो, हें विशेष शब्दांनीं सांगावयास पाहिजे काय! जीवन्मुक्त पुरुष मुक्त असतो व होतो. ॥ १३ ॥ ५ ॥

याप्रमाणें दुसऱ्या खंडाचें आचार्य-भाष्य-भाषांतर पूर्ण झालें.

॥ द्वितीय खण्ड समाप्त ॥

तृतीयः खण्डः ।

ब्रह्म ह देवेभ्यो विजिग्ये तस्य ह ब्रह्मणो विजये देवा अमहीयन्त । त ऐक्षन्तास्माकमेवायं विजयोऽस्माकमेवायं महिमेति ॥ १४ ॥ १ ॥

अन्वय व अर्थ—ब्रह्म ह देवेभ्यः विजिग्ये (ब्रह्म एकदां देवांस जय प्राप्त करून देतें झालें) तस्य ह ब्रह्मणः विजये देवा अमहीयन्त (त्या

ब्रह्मानें दिलेल्या जयामुळें देवांस अत्यंत गर्व उत्पन्न झाला) ते ऐक्षन्त (त्यांना असें वाटलें कीं) अस्माकं एव अयं विजयः (हा विजय आम्हींच मिळविला आहे) अस्माकं एव अयं महिमा (हा महिमा आम्हींच मिळविला आहे.) सारांश स्पष्टच आहे.

ब्रह्म ह देवेभ्यो विजिग्ये "अविज्ञातं विजानतां विज्ञातमविजानताम्" इत्यादिश्रवणाद्यदस्ति तद्विज्ञातं प्रमाणैर्यन्नास्ति तदविज्ञातं शशविषाणकल्पमत्यन्तमेवासद् दृष्टम्। तथेदं ब्रह्माविज्ञातत्वादसदेवेति मन्दबुद्धीनां व्यामोहो मा भूदिति तदर्थेयमाख्यायिकाऽऽरभ्यते। तदेव हि ब्रह्म सर्वप्रकारेण प्रशास्तृ देवानामपि परो देव ईश्वराणामपीश्वरो दुर्विज्ञेयो देवानां जयहेतुरसुराणां पराजयहेतुस्तत्कथं नास्तीत्येतस्यार्थस्यानुकूलानि ह्युत्तराणि वचांसि दृश्यन्ते। अथवा ब्रह्मविद्यायाः स्तुतये। कथं ब्रह्मविज्ञानाद्धग्न्यादयो देवा देवानां श्रेष्ठत्वं जग्मुस्ततोऽप्यतितरामिन्द्र इति। अथवा दुर्विज्ञेयं ब्रह्मेत्येतत्प्रदर्श्यते। येनाग्न्यादयोऽतितेजसोऽपि क्लेशेनैव ब्रह्म विदितवन्तस्तथेन्द्रो देवानामीश्वरोऽपि सन्निति वक्ष्यमाणोपनिषद्विधिपरं वा सर्वं ब्रह्मविद्याव्यतिरेकेण प्राणिनां कर्तृत्वाद्यभिमानो मिथ्येत्येतद्दर्शनार्थं वाऽऽख्यायिका। यथा देवानां जयाद्यभिमानस्तद्वदिति। ब्रह्म यथोक्तलक्षणं परं ह किल देवेभ्योऽर्थाय विजिग्ये जयं लब्धवद्देवानामसुराणां च सङ्ग्रामेऽसुराञ्जित्वा जगदरातीनीश्वरसेतुभेत्तृन्देवेभ्यो जयं तत्फलं च प्रायच्छज्जगतः स्थेम्ने। तस्य ह किल ब्रह्मणो विजये देवा अग्न्यादयोऽमहीयन्त महिमानं प्राप्नुवन्तस्तदाऽऽत्मसंस्थस्य प्रत्यगात्मन ईश्वरस्य सर्वज्ञस्य सर्वक्रियाफलसंयोजयितुः प्राणिनां सर्वशक्तेर्जगतः स्थितिं चिकीर्षोरयं जयो महिमा चेत्यजानन्तस्ते देवा ऐक्षन्तेक्षितवन्तोऽग्न्यादिस्वरूपपरिच्छिन्नात्मकृतोऽस्माकमेवायं विजयोऽस्माकमेवायं महिमाऽग्निवायविन्द्रत्वादिलक्षणो जयफलभूतोऽस्माभिरनुभूयते नास्मत्प्रत्यगात्मभूतेश्वरकृत इत्येवं मिथ्याभिमानेक्षणवताम्॥ १४॥ १॥

सिद्धान्ती—ब्रह्मानें एकदां देवांचें साहाय्य करून देवांस जय मिळवून दिला.

शिष्य—भगवन्! ब्रह्म हें सर्व ज्ञानकर्मेंद्रियांच्या पलीकडचें आहे. मग त्यानें देवांस कसा जय मिळवून दिला?

सिद्धान्ती—हीच शंका श्रुति निवारण करीत आहे.—

"विद्वानाला 'ब्रह्मअज्ञेय आहे' असें समजतें आणि अविद्वानाला वाटतें कीं 'मला ब्रह्म समजलें आहे" इत्यादि श्रुतिवाक्यें ऐकून मदबुद्धींना असा मोह उत्पन्न होईल कीं, जी वस्तु सत् आहे, ती प्रमाणानें कळते; पण जी वस्तु नसते तीच समजत नाहीं व ती सशाच्या शिंगाप्रमाणें अत्यंत असत् (खोटी) अशी असते. याच आनुभविक न्यायानें अविज्ञात व अविज्ञेय ब्रह्मवस्तु (न समजलेली व समजण्यास अशक्य अशी ब्रह्मवस्तु) असत् असली पाहिजे. ही अशी भ्रांति होऊं नये, म्हणून श्रुतीला पुढील आख्यायिका सांगावी लागत आहे. त्याचप्रमाणें ब्रह्म हें सर्व प्रकारानें देवांचा अतिश्रेष्ठ देव आहे. तोच सर्व-नियामक आहे व ईश्वरांचा ईश्वर आहे. तो समजण्यास अतिशय कठिण आहे. देवांना जय येण्याचें व असुरांचा पराभव होण्याचें कारण तेंच परब्रह्म आहे. हें असें ब्रह्म आहे. याला 'नाहीं' असें कसें म्हणावयाचें? असो; या अर्थास अनुकूल असें ब्रह्माच्या अस्तित्वाचें समाधानकारक उत्तर देऊन सर्व शंकांचें निरसन या गोष्टीनें करितात. या आख्यायिकेंत असें सिद्ध होईल कीं, ब्रह्म-विज्ञान झालें म्हणून अग्न्यादिदेवांना स्वर्गामध्यें श्रेष्ठ स्थानें मिळालीं आहेत व इंद्र हा तर त्यांच्याहून मोठा म्हणजे देवदेवेश्वर झाला आहे. इंद्रासही इंद्रत्व देणारें परब्रह्म अतिश्रेष्ठ व समजण्यास अति गहन असलें पाहिजे, हेंही येथें स्पष्ट होतें. कारण, या आख्यायिकेंतील अति-तेजस्वी अग्निप्रमुख देवांसमुद्धां मोठ्या कष्टानें ब्रह्मज्ञान झालें. त्याच प्रमाणें इंद्र हा देवांचा राजा असूनही त्याला ब्रह्म-ज्ञान लवकर झालें नाहीं. तेव्हां ब्रह्मज्ञान दुर्विज्ञेय आहे, हें कळविण्यासाठीं ही आख्यायिका सांगितली आहे. उद्देश हा कीं पुढें जें कांहीं मंद अधिकाऱ्यांस ज्ञान सांगावयाचें आहे, तें सगुण ब्रह्मोपासनापर आहे, हें व ब्रह्मविद्येशिवाय इतर सर्व वस्तु मिथ्या आहेत हें, कर्तृत्वाचा अभिमान धरणारे प्राण्यांस स्पष्ट कळावें. ह्या गोष्टींतही देवांना स्वविजयप्रीत्यर्थ जो अभिमान झाला होता तो खोटा आहे, असेंच दाखविलें आहे, असो;

एकदां असें झालें कीं देवांचा व असुरांचा भयंकर संग्राम चालला असतां ब्रह्मानें—

शिष्य—ज्याचें लक्षण मागें सांगितलें आहे त्या ब्रह्मानें ना?'

सिद्धान्ती—होय. त्या ब्रह्मानें देवांस जय मिळवून दिला आणि जगाचा द्वेष करणारे व ईश्वरप्रणीत धर्माचा विध्वंस करणारे जे असुर, त्यांचा पराजय केला. जगताच्या संरक्षणासाठीं देवांस हा जय व त्याचें फल (मोठेपणा व ऐश्वर्य) हीं परब्रह्मानें दिलीं होतीं. हा ब्रह्मनिर्मित विजय प्राप्त झाल्यानंतर अग्नि-प्रमुख देवांस मोठें वैभव प्राप्त झालें. तेव्हां आपल्या अंतर्यामी राहून आपलें नियमन करणारा जो सर्वज्ञ परमेश्वर, कीं ज्याच्या इच्छेनें सर्व कार्यकारणादि नियम निर्बाध रीतीनें चालतात, जो सर्व जगाची स्थिति उत्तम रीतीनें कायम

राहावी अशी योजना करितो व कर्मानुसार फल देतो, त्या परमेश्वराच्या कृपेनें आपल्यास हा जय प्राप्त झाला ही गोष्ट देव विसरले. त्यांना असें वाटूं लागलें की हा जो आम्हांस जय मिळाला आहे, आमचें हें जें वैभव वाढलें आहे, आम्हांस 'अग्नि, वायु, इंद्र इत्यादि' ऐश्वर्यसूचक नांवें मिळालीं आहेत, तसेंच या जयानें जें आमचें महत्त्व (ऐश्वर्य) वाढलें आहे, तें सर्व आमच्या पराक्रमाचें फल आहे. शिष्या! प्रत्यगात्मा जो परमेश्वर त्याच्या अगाध सामर्थ्यानें प्राप्त झालेला विजय केवल आपल्या (मर्यादित) शक्तीचा परिणाम आहे, असें देवांस भ्रांतीनें वाटलें. ही केवळ शुद्ध भ्रांति होय. हा मिथ्या अभिमान देवांच्या अज्ञानानें त्यांस प्राप्त झाला होता. ॥ १४ ॥ १ ॥

तद्धैषां विजज्ञौ तेभ्यो ह प्रादुर्बभूव तन्न व्यजानत किमिदं यक्षमिति ॥ १५ ॥ २ ॥

अन्वयार्थ—तत् ह तेषां विजज्ञौ (–हा यांचा मिथ्या अभिमान–ब्रह्माला कळला)–तेभ्यो–तेभ्यो ह प्रादुर्बभूव (देवांस तें ब्रह्म प्रकट झालें) किं इदं यक्षं इति तत् न व्यजानत (ही पूज्य व सर्व–वंद्य वस्तु काय आहे, हें देवांस समजेना) सारांश स्पष्टच आहे.

तद्ध किलैषां मिथ्येक्षणं विजज्ञौ विज्ञातवद्ब्रह्म। सर्वेक्षितृ हि तत्सर्वभूतकरणप्रयोक्तृत्वाद्देवानां च मिथ्याज्ञानमुपलभ्य मैवासुरवद्देवा मिथ्याभिमानात्पराभवेयुरिति। तदनुकम्पया देवान्मिथ्याभिमानापनोदनेनानुगृह्णीयामिति तेभ्यो देवेभ्यो ह किलार्थाय प्रादुर्बभूव। स्वयोगमाहात्म्यनिर्मितेनात्यद्भुतेन विस्मापनीयेन रूपेण देवानामिन्द्रियगोचरे प्रादुर्बभूव। तत्प्रादुर्भूतं ब्रह्म न व्यजानत नैव विज्ञातवन्तो देवाः। किमिदं यक्षं पूज्यं महद्भूतमिति ॥ १५ ॥ २ ॥

सिद्धान्ती—ब्रह्माला अर्थातच देवांचें हें मिथ्या ज्ञान व मिथ्या ज्ञानाला कारण झालेला अभिमान यांचें ज्ञान झालें. कारण ब्रह्म सर्वसाक्षी आहे व सर्व ज्ञानेंद्रियें आणि कर्मेंद्रियें त्याच्याच सत्तेनें चालतात. असो; देवांस हें अज्ञान उत्पन्न झालें आहे म्हणून, मिथ्याभिमानी राक्षसांचा जसा पराभव झाला, तसा यांचाही पराभव होईल, तो होऊं नये, म्हणून व देवांचा खोटा अभिमान नाहींसा करावा व त्यांच्यावर अनुग्रह करावा, या करुणापूर्ण इच्छेनें ब्रह्म मूर्तिमंत होऊन देवांस गोचर झालें. ती मूर्ति ब्रह्मानें आपल्या स्वतःच्या योगमाहात्म्यानें निर्माण केलेली म्हणून अति अद्भुत, अत्यंत आश्चर्य उत्पन्न करणारी व देवादिकांच्या इंद्रियांस

सुद्धां गोचर होणारी अशी असती झाली. पुढें, ही विलक्षण मूर्ति पाहून हें असें अद्भुत व सर्वाश्चर्य उत्पन्न करणारें काय प्रकरण आहे, हें देवांस समजेना; आणि ते आपापसांत म्हणूं लागले कीं 'हें काय विलक्षण प्रकरण आहे?' ॥ १५ ॥ २ ॥

तेऽग्निमब्रुवञ्जातवेद एतद्विजानीहि किमेतद्यक्ष-मिति तथेति ॥ १६ ॥ ३ ॥

अन्वय व अर्थ—**ते अग्निं अब्रुवन्** (ते अग्नीला म्हणाले) **जातवेद** (हे सर्वज्ञ अग्ने) **एतत् विजानीहि** (हें जाणून घे कीं,) **किं एतत् यक्षं** (ही पूज्य वस्तू काय आहे?) **इति** (या प्रमाण देवांनीं अग्नीस आज्ञा केली) **तथा इति** ('बरें आहे,' असें अग्नि म्हणाला.) सारांश स्पष्टच आहे.

तदभ्यद्रवत्तमभ्यवदत्कोऽसीत्यग्निर्वा अहमस्मी-त्यब्रवीज्जातवेदा वा अहमस्मीति ॥ १७ ॥ ४ ॥

अन्वय व अर्थः—**तत् अभ्यद्रवत्** (तो अग्नि तिकडे लवकर गेला) **तं अभ्यवदत् कः असि इति** (त्याला त्या-अद्भुत रूप-यक्षानें विचारिलें तूं कोण आहेस?) **अहं अग्निः वै अस्मि इति अब्रवीत्** (मी अग्नि आहें) **वा जातवेदाः अहं अस्मि इति** (किंवा मला जातवेद असेंही म्हणतात)–हीं माझीं नावें सर्वश्रुत आहेत. असें अग्नि म्हणाला.) ॥१७॥४॥

तस्मिंस्त्वयि किं वीर्यमित्यपीदꣳ सर्वं दहेयं यदिदं पृथिव्यामिति ॥ १८ ॥ ५ ॥

अन्वयार्थ—**तस्मिन् त्वयि किं वीर्यं इति** (तुझ्यामध्यें कोणत्या प्रकारचें सामर्थ्य आहे, हें मला सांग, असें यक्षानें विचारलें) **यत् इदं पृथिव्यां इद सर्वं अपि दहेयं** (या पृथ्वीमध्यें जें काय आहे, त्या सर्वांचें मी दहन करूं शकेन, असें अग्नि म्हणाला ॥ १८ ॥ ५ ॥

तस्मै तृणं निदधावेतदहेति तदुपप्रेयाय सर्वजवेन तन्न शशाक दग्धुं स तत एव निववृते नैतदशकं विज्ञातुं यदेतद्यक्षमिति ॥ १९ ॥ ६ ॥

अन्वयार्थ—तस्म तृणं निदधौ (त्याच्या पुढें यक्षानें गवताची काडी ठेविली) **एतत् दह इति** (ही काडी माझ्या देखत जाळून टाक, असें ब्रह्म म्हणालें) **तत् उपप्रेयाय** (अग्नि त्या काडीच्या जवळ गेला)—**पण सर्व—जवेन तत् दग्धुं न शशाक** (आपल्या सर्व सामर्थ्यानें त्याला तें तृण जाळतां आलें नाहीं) **स ततः एव निववृते** (तो तेथून लागलीच मागच्या पायांनीं परत फिरला) **यद् एतत् यक्षं इति एतत् विज्ञातुं न अशकम्** (ही अद्भुत वस्तु काय आहे हें मला समजलें नाहीं, असें तो देवांजवळ जाऊन म्हणाला) ॥ १९ ॥ ६ ॥

या सर्व मंत्रांचा तात्पर्यार्थ अगदीं उघड आहे.

ते तदजानन्तो देवाः सान्तर्भयास्तद्विजिज्ञासवोऽग्निमब्रुवन्नुक्तवन्तो हे जातवेद एतदस्मद्गोचरस्थं यक्षं विजानीहि विशेषतो बुध्यस्व त्वं नस्तेजस्वी किमेतद्यक्षमिति । तथाऽस्त्विति तद्यक्षमभ्यद्रवत्तत्प्रतिगतवानग्निः । तं च गतवन्तं पिपृच्छिषुं तत्समीपेऽप्रगल्भत्वात्तूष्णींभूतं तद्यक्षमभ्यद्रव (वद) दग्नि प्रत्यभाषत कोऽसीति । एवं ब्रह्मणा पृष्टोऽग्निरब्रवीदग्निर्वै अग्निनामाऽहं प्रसिद्धो जातवेदा इति च नामद्वयेन प्रसिद्धतयाऽऽत्मानं श्लाघयन् । इत्येवमुक्तवन्तं ब्रह्मावोचत्तस्मिन्नेवं प्रसिद्धगुणनामवति त्वयि किं वीर्यं सामर्थ्यमिति । सोऽब्रवीदिदं जगत्सर्वं दहेयं भस्मीकुर्याम् । यदिदं स्थावरादि पृथिव्यामिति । पृथिव्यामित्युपलक्षणार्थं यतोऽन्तरिक्षस्थमपि दह्यत एवाग्निना । तस्मा एवमभिमानवते ब्रह्म तृणं निदधौ पुरोऽग्नेः स्थापितवद्ग्रहौतत्तृणमात्रं ममाग्रतो दह न चेदस्य दग्धुं समर्थो मुञ्च दग्धृत्वाभिमानं सर्वत्रेत्युक्तस्तत्तृणमुपप्रेयाय तृणसमीपं गतवान्सर्वजवेन सर्वोत्साहकृतेन वेगेन गत्वा न शशाक नाशकद्दग्धुं स जातवेदास्तृणं दग्धुमशक्तो व्रीडितो हतप्रतिज्ञस्तत एव यक्षादेव तूष्णीं देवान्प्रति निववृते निवृत्तः प्रतिगतवान् । नैतद्यक्षमशकं शक्तवानहं विज्ञातुं विशेषतो यदेतद्यक्षमिति । ॥ १६ ॥ ३ ॥ १७ ॥ ४ ॥ १८ ॥ ५ ॥ १९ ॥ ६ ॥

सिद्धान्ती—याप्रमाणें अंतःकरणामध्यें भीति उत्पन्न झालेले व हें काय आहे, हें जाणण्याची इच्छा करणारे अज्ञानी देव अग्नीस विनंति करिते झाले कीं—

शिष्य—अग्नि हा सर्व देवांच्या पुढें चालणारा आहे म्हणून, तो अग्र–गामी आहे म्हणून, त्याला अग्नि हें नांव प्राप्त झालें आहेना ? तसेंच, मंत्रामध्यें 'जातवेद' अशा नांवानें देवांनीं अग्नीला हाक मारली आहे. त्याचा अर्थ जात म्हणजे उत्पन्न झालें आहे 'वेद' म्हणजे ज्ञान ज्याला, असाच अर्थ ना ? 'जातवेद' म्हणजे सर्वज्ञ देव असाच अर्थ घ्यावयाचा ना ?

सिद्धान्ती—होय, तुझी शब्दव्युत्पत्ति बरोबर आहे. अग्नि सर्वज्ञ नाहीं. पण तो बहुतेक सर्व जाणतो. असो; देवांनीं विनंति केली कीं, ही जी पूज्यमूर्ति आपल्यास दिसत आहे, ती कोणाची आहे याचें विशेष ज्ञान करून घे. हे जातवेदा ! आम्हां देवांमध्यें तूंच अधिक तेजस्वी आहेस.' ही विनंति ऐकून अग्नि म्हणाला, 'बरें आहे. ही कोणाची मूर्ति आहे, हें मीं जाऊन पहातों.'

नंतर तो अग्नि देवांचा निरोप घेऊन त्या यक्ष मूर्तीकडे सत्वर निघून गेला. तो विचारण्याच्या हेतूनें आपल्याकडे आलेला अग्नि आपल्या (ब्रह्माच्या) दिव्य स्वरूपानें घाबरून गेला आहे, प्रश्न विचारण्याचेंही धैर्य त्याच्यामध्य राहिलें नाहीं, त्यानें मौन धारण केलें आहे, असें पाहून त्या यक्षानें अग्नीस विचारलें कीं 'तूं कोण आहेस ?' अग्नि म्हणाला, 'माझें नांव अग्नि आहे व मला जातवेदही म्हणत असतात. हीं दोन्हीं माझीं प्रसिद्ध नांवें आहेत,' असें त्यानें मोठ्या डौलानें स्वस्तुति करून सांगितलें. नंतर त्या अभिमानी अग्नीला ब्रह्मानें विचारलें 'तुझ्या प्रसिद्ध नांवाप्रमाणें तुझ्यामध्यें कांहीं सामर्थ्य तरी आहे काय ?' अग्नीनें सगर्व उत्तर केलें कीं 'हें जगत् व त्यातील सर्व स्थावर जंगम पदार्थ एका क्षणामध्ये मी भस्म करून टाकीन, एवढेंचसें काय, पण अंतरिक्षांतील सर्व पदार्थही दग्ध करण्याचें मला सामर्थ्य आहे.' हें अग्नीचें अभिमानाचें उत्तर ऐकून ब्रह्मानें त्याच्यापुढें एक गवताची काडी ठेविली, आणि त्यास सांगितलें कीं 'हें तृण माझ्यासमक्ष जाळून टाक. पण तुला ही काडी दग्ध करितां आली नाहीं, तर आपलें दग्ध करण्याचें सामर्थ्य व त्याचा अभिमान सर्वथा टाकून दे.' हें ऐकून अग्नि त्या तृणाजवळ अतिवेगानें गेला आणि आपल्याजवळ जेवढें सामर्थ्य होतें नव्हतें, तें सर्व उत्साहानें एकवट करून खर्ची घातलें आणि तें तृण जाळण्याचा त्यानें दीर्घ प्रयत्न केला; पण त्या जातवेदाला तें तृण काहीं जाळतां आलें नाहीं. अर्थातच, आपल्या या सामर्थ्यशून्यत्वाची व प्रतिज्ञा–भंगाची खातरी होऊन त्याला अत्यंत लज्जा उत्पन्न झाली आणि यक्षाकडे मान वर करून न पाहतां तो देवांकडे लवकर निघून गेला आणि तेथें जाऊन त्यांस म्हणाला,– 'मला हें काय आहे, ही वस्तू कोणती आहे, तिचे गुणधर्म काय, हें कांहींच समजून घेतां आलें नाहीं. ॥ १७ ॥ ४ ॥ ॥ १८ ॥ ५ ॥ १९ ॥ ६ ॥

अथ वायुमब्रुवन्वायवेतद्विजानीहि किमेतद्यक्षमिति तथेति ॥ २० ॥ ७ ॥

अन्वयार्थ—**अथ वायुं अब्रुवन्** (नंतर ते देव वायूला म्हणाले) **वायो किं एतत् यक्षं इति विजानीहि** (हा चमत्कारिक प्राणी कोण आहे तें जाणून ये) **तथा इति** (होय असें म्हणून वायु निघाला.) ॥ २० ॥७॥

तदभ्यद्रवत्समभ्यवदत्कोऽसीति वायुर्वा अहमस्मीत्यब्रवीन्मातरिश्वा वा अहमस्मीति ॥ २१ ॥ ८ ॥

अन्वयार्थ—**तत् अभ्यद्रवत्** (तो तेथें सत्वर गेला व अग्नीसारखाच स्तब्ध झाला) **कः असि इति तं अभ्यवदत** (तूं कोण आहेस असें त्याला यक्षानें विचारलें) **वायुः वै अहं अस्मि इति मातरिश्वा वै अहं अस्मि इति अब्रवीत्** ('माझें नांव वायु आहे, मला मातरिश्वाही म्हणतात, हें नांव सर्वप्रसिद्ध आहे ' असें वायूनें उत्तर दिलें. ॥ २१ ॥ ८ ॥

तस्मिꣳस्त्वयि किं वीर्यमित्यपीदꣳ सर्वमाददीय यदिदं पृथिव्यामिति ॥ २२ ॥ ९ ॥

अन्वयार्थ—**तस्मिन् त्वयि किं वीर्यं इति** ('तुझ्यामध्यें काय सामर्थ्य आहे ?' असें यक्षानें त्यास विचारलें) **यत् इदं पृथिव्यां इदं सर्वं आददीय** (या पृथ्वीमध्यें जें कांहीं सर्व आहे त्या सर्वाचा मी घेणारा आहें, आकर्षण करणारा आहें) ॥ २२ ॥ ९ ॥

तस्मै तृणं निदधावेतदादत्स्वेति तदुपप्रेयाय सर्वजवेन तन्न शशाकाऽऽदातुं स तत एव निववृते नैतदशकं विज्ञातुं यदेतद्यक्षमिति ॥ २३ ॥ १० ॥

अन्वयार्थ—**तस्मै तृणं निदधौ** (त्याच्यापुढें ब्रह्मानें तेंच तृण ठेविलें)—आणि—**एतत् आदत्स्व इति** (ब्रह्म म्हणालें, याचें ग्रहण कर) **तत्**

उपप्रेयाय (त्याच्याजवळ वायु गेला.)–पण–सर्वजवेन तत् आदातुं न शशाक (आपल्या सर्व सामर्थ्यानें वायूला त्याचें ग्रहण करितां आलें नाहीं.) स ततः एव निववृते (तो लगेच तेथून परतच फिरला.) आणि देवांस–यत् एतत् यक्षं इति न एतत् विज्ञातुं अशकं (म्हणाला कीं जें हें यक्षस्वरूप आहे, तें समजण्यास मी समर्थ झालों नाहीं.) सारांश स्पष्टच आहे.

अथ वायुमित्यथानन्तरं वायुमब्रुवन्हे वाववेतद्विजानाहीत्यादि समानार्थं पूर्वेण । वानाद्गमनाद्गन्धनाद्वायुः । मातर्यन्तरिक्षे श्वयतीति मातरिश्वा । इदं सर्वमप्याददीय गृह्णीयाम् । यदिदं पृथिव्यामित्यादि समानमेव ॥ २० ॥ ७ ॥ २१ ॥ ८ ॥ २२ ॥ ९ ॥ २३ ॥ १० ॥

सिद्धान्ती—नंतर वायूला देव म्हणाले 'हे वायो !

शिष्य—भगवन् ! यापुढील सर्व वृत्तांत अग्नीच्या वृत्तांताप्रमाणेंच असेल ?

सिद्धान्ती—होय.

शिष्य—वायु म्हणजे गमन करणारा वाहणारा, किंवा गंधाला इकडून तिकडे नेणारा असाच अर्थ आहे ना ?

याचप्रमाणें अंतरिक्षामध्यें ज्याचें वास्तव्य आहे, त्यालाच मातरिश्वा म्हणतात ना ?

सिद्धान्ती—होय. मात्र तो वायु म्हणाला कीं 'सर्व पदार्थ ग्रहण करण्याचें आकर्षण्याचें उचलण्याचें. सामर्थ्य मला आहे.' असो; पुढील अर्थ मागच्याप्रमाणेंच आहे. ॥ २० ॥ ७ ॥ २३ ॥ १० ॥

अथेन्द्रमब्रुवन्मघवन्नेतद्विजानीहि किमेतद्यक्षमिति तथेति तदभ्यद्रवत्तस्मात्तिरोदधे ॥ २४ ॥११॥

अन्वय व अर्थ—अथ इंद्रं अब्रुवन् (नंतर देव इंद्रास विनंति करून म्हणाले) मघवन् किं एतद् यक्षं एतत् विजानीहि (हा यक्ष कोण आहे तें समजून घेऊन परत ये) तथा इति (इंद्र म्हणाला बरें आहे.) तत् अभ्यद्रवत् (तो त्याकडे सत्वर गेला) तस्मात् तिरोदधे (तो येण्याबरोबर यक्ष गुप्त झाला !) ॥ २४ ॥ ११ ॥

स तस्मिन्नेवाऽऽकाशे स्त्रियमाजगाम बहुशोभमानामुमां हैमवतीं ताꣳ होवाच किमेतद्यक्षमिति ॥ २५ ॥ १२ ॥

इति तृतीयः खण्डः ॥ ३ ॥

अन्वय व अर्थ—तस्मिन् एव आकाशे बहुशोभमानां हैमवतीं उमां स्त्रियं सः आजगाम (त्या आकाशामध्येंच बहु शोभायमान, सुवर्णालंकार घातलेली, उमा नांवाची स्त्री इंद्रास दिसली, तिच्या जवळ, त्याच आकाश—प्रदेशांत, तो जाऊन उभा राहिला) किं एतत् यक्षं इति तां ह उवाच (' हे देवि ! हा यक्ष कोण आहे तें कृपा करून मला सांग ' असा तिला इंद्रानें सादर प्रश्न केला. ॥ २५ ॥ १२ ॥

अथेन्द्रमिति। अथेन्द्रमब्रुवन्मघवन्नतेद्विजानीहीत्यादि पूर्ववत्। इन्द्रः परमेश्वरो मघवान्बलवत्वात्तथेति तदभ्यद्रवत्तस्मादिन्द्रादात्मसमीपं गतात्तद्ब्रह्म तिरोदधे तिरोभूतमिन्द्रस्येन्द्रत्वाभिमानोऽतितरां निराकर्तव्य इत्यतः संवादमात्रमपि नादाद्ब्रह्मेन्द्राय। तद्यक्षं यस्मिन्नाकाश आकाशप्रदेश आत्मानं दर्शयित्वा तिरोभूतमिन्द्रश्च ब्रह्मणस्तिरोधानकाले यस्मिन्नाकाश आसीत्स इन्द्रस्तस्मिन्नेवाऽऽकाशे तस्थौ। किं तद्यक्षमिति ध्यायन्न निववृतेऽग्न्यादिवत्तस्येन्द्रस्य यक्षे भक्तिं बुद्ध्वा विद्योमारूपिणी प्रादुरभूत्स्त्रीरूपा। स इन्द्रस्तामुमां बहुशोभमानां सर्वेषां हि शोभमानानां शोभनतमां विद्यां तदा बहुशोभमानेति विशेषणमुपपन्नं भवति। हैमवतीं हेमकृताभरणवतीमिव बहुशोभमानामित्यर्थः। अथवो मैव हिमवतो दुहिता हैमवती नित्यमेव सर्वज्ञेनेश्वरेण सह वर्तत इति ज्ञातुं समर्थेति कृत्वा तामुपजगाम। इन्द्रस्तां होमां किलोवाच पप्रच्छ ब्रूहि किमतद्दर्शयित्वा तिरोभूतं यक्षमिति ॥ २४ ॥ ॥ ११ ॥ २५ ॥ १२ ॥

इति श्रीमत्परमहंसपरिव्राजकाचार्यश्रीमच्छंकरभगवत्पादकृतौ केनोपनिषत्पदभाष्ये तृतीयः खण्डः ॥ ३ ॥

सिद्धान्ती—नंतर इंद्राचीही देवांनीं पूर्ववत् प्रार्थना केली आणि अतिबलवान् जो देवपति इंद्र तो ' मी सर्व माहिती आणितों ' असें म्हणून तो यक्षस्थानाकडे गेला. हा इंद्र जवळ येत आहे, असें पाहून ब्रह्म अंतर्धान पावलें !

पूर्वपक्षी—मघवानासारख्या पराक्रमी देवाला तें ब्रह्म भ्यालें, यात कांहीं शंका नाहीं.

सिद्धान्ती—ब्रह्माला कोण भिवविणार? अहो! तें अंतर्धान पावलें, तें केवळ इंद्राचा आपल्या मोठेपणाविषयींचा आभिमान नाहींसा करावा, एतदर्थ होय. त्याला इंद्राचा ऐश्वर्याभिमान नष्ट करावयाचा होता.

पूर्वपक्षी—हें कशावरून?

सिद्धान्ती—अहो! ब्रह्मानें त्या इंद्राशीं बोलण्याचें सुद्धां नाकारिलें, यावरूनच इंद्राच्या अतिरिक्त गर्वाचा ब्रह्माला प्रध्वंस करावयाचा होता, 'संवादा इतकी सुद्धां आपली योग्यता नाहीं' असें इंद्रास दाखवावयाचें होतें, असें स्पष्ट होत नाहीं काय? असो; ज्या आकाश-प्रदेशामध्यें ब्रह्म दिसलें आणि दिसेनासें झालें, तेथेंच-ब्रह्म तिरोहित झालें तरी-इंद्र एकाग्रतेनें उभा राहिला आणि आकाशामध्यें पाहूं लागला. नंतर ही यक्षरूपी मूर्ति कोण असावी, असा तो आपल्या मनांतच भक्तिपूर्वक विचार करूं लागला. म्हणजे अग्नि व वायु यांच्याप्रमाणें इंद्र पळून गेला नाहीं. यक्षावर याची भक्ति होती हें त्याच्या एकनिष्ठ चिंतनानें स्पष्ट झालें. इंद्राची भक्ति पाहून तेथें उमारूपी विद्या प्रकट झाली. सर्व शोभिवंत वस्तूंमध्यें अति शोभायमान असें हें अभिनव स्त्रीरूप पाहून इंद्राला सादर कौतुक वाटलें आणि—

शिष्य—भगवन्! जगांतील सर्व शोभिवंत वस्तूंमध्यें विद्या ही अतिशय शोभिवंत व वंद्य वस्तु आहे. नाहीं बरें?—

सिद्धान्ती—होय-आणि म्हणूनच 'बहु शोभमाना' हें विशेषण तिला उत्तम शोभतें. तसेंच, सुवर्णालंकार घातलेली स्त्री जशी शोभिवंत दिसते, तशीच ही दिसत होती.

शिष्य—अथवा उमा ही हिमवत् पर्वताची कन्या आहे म्हणूनही तिला हैमवती म्हणावें.

सिद्धान्ती—हो हो!! हाही अर्थ ठीक आहे. कारण, सर्वज्ञ ईश्वराजवळ उमेचें नित्य-वास्तव्य आहे. ज्ञानाजवळ विद्येचें वास्तव्य नित्य असावयाचेंच. असो; 'ही ईश्वरी उमाच प्रत्यक्ष अवतीर्ण झाली आहे, हिला विचारलें म्हणजे आपली जिज्ञासा पूर्ण होईल,' असें समजून जेथें ती सर्वज्ञ उमा उभी राहिली होती, तेथें इंद्र गेला आणि तिला हातानें, गुप्त झालेल्या जागेकडे बोट दाखवून विचारता झाला कीं 'हें आतांच येथें गुप्त झालेलें कोण आहे तें मला कृपा करून सांग.' ॥२४॥११॥२५॥१२॥

॥ तृतीय खण्ड समाप्त ॥

चतुर्थः खण्डः ।

सा ब्रह्मेति होवाच ब्रह्मणो वा एतद्विजये महीयध्वमिति ततो हैव विदांचकार ब्रह्मेति ॥२६॥१॥

अन्वय व अर्थ—ब्रह्म इति सा ह उवाच (तें ब्रह्म आहे, असें ती म्हणाली) **विजये ब्रह्मणः वै एतत् महीयध्वं** (हा जो तुम्हांस जय मिळाला, तो ब्रह्माच्या सामर्थ्याचा आहे आणि म्हणून तुम्ही एवढे मोठे झालांत; यास्तव तुम्ही ब्रह्माचा जयजयकार करा.) **ततः ह एव ब्रह्म इति विदांचकार** (मग इंद्राला कळलें कीं, तें ब्रह्म होतें.) सारांश स्पष्ट आहे.

सा ब्रह्मेति होवाच ह किल ब्रह्मण ईश्वरस्यैव विजय ईश्वरेणैव जिता असुरा यूयं तत्र निमित्तमात्रं तस्यैव विजये यूयं महीयध्वं महिमानं प्राप्नुथ । एतदिति क्रियाविशेषणार्थम् । मिथ्याभिमानस्तु युष्माकमयमस्माकमेवायं विजयोऽस्माकमेवायं महिमेति । ततस्तस्मादुमावाक्याद्धैव विदांचकार ब्रह्मेतीन्द्रोऽवधारणात्ततो हैवति न स्वातन्त्र्येण ॥ २६ ॥ १ ॥

सिद्धान्ती—उमेनें सांगितलें कीं 'तें ब्रह्म होतें. इंद्रा ! हा खरोखर ईश्वराचाच विजय आहे. वस्तुतः ईश्वरानेंच असुरांचा पराभव केला. तुम्ही तेथें निमित्त मात्र होतां. त्यानें मिळविलेल्या जयानें तुम्हांस हें एवढें महत्त्व प्राप्त झालें आहे. म्हणून तुम्ही ब्रह्माचा जयजयकार करावा, त्याचे धन्यवाद गावे, हे योग्य आहे.'

शिष्य—भगवन्! एतत् याचाचना एवढें हा अर्थ ? हा क्रियाविशेषणपर शब्द आहे. असेंच ना ?

सिद्धान्ती—होय. नंतर देवी म्हणाली, "आम्ही जय मिळविला, आम्ही विजयी झालों' हा जो तुमचा अभिमान आहे, हा केवल व्यर्थ आहे. हा महिमा केवळ परमश्वराचा आहे.' शिष्या ! हें जेव्हां उमादेवीनें सांगितलें, तेव्हां मात्र इंद्रास कळलें कीं, ती अदृश्य झालेली वस्तु ब्रह्म होतें. इंद्राला ही जी गोष्ट कळली, ती त्याला स्वतः व स्वातंत्र्यानें कळली नाहीं, उमेनें सांगितली म्हणून कळली.

शिष्य—यावरून गुरुमुखाव्यतिरिक्त ब्रह्मज्ञान होत नाहीं. चित्ताची एकाग्रता झाल्याशिवाय गुरु भेटत नाहीं, अधिकार असल्याशिवाय चित्ताची एकाग्रता व दृढनिश्चय असत नाहींत, ह्या गोष्टी आणि ब्रह्मस्वरूप प्रथमतः मूर्तस्वरूपानेंही

दिसतें ही गोष्ट, सारांश, अग्न कितीतरी गोष्टी या आपल्या आख्यायिकेवरून सिद्ध होतात.

सिद्धान्ती—तुझे सर्व सिद्धान्त शास्त्राला अनुकूलच आहेत आणि श्रुतीचाही हाच अभिप्राय आहे कीं तूं सांगितलेल्या गोष्टी मुमुक्षूंनीं लक्षांत ठेवाव्या. ।२६।१।

तस्माद्वा एते देवा अतितरामिवान्यान्देवान्यदग्निर्वायुरिन्द्रस्ते ह्येनन्नेदिष्ठं पस्पृशुस्ते ह्येनत्प्रथमो विदांचकार ब्रह्मेति ॥ २७ ॥ २ ॥

अन्वयार्थ—तस्मात् वै एते देवाः अन्यान् देवान् अतितराम् इव (म्हणून हे देव जणुं कांहीं देवांमध्यें अति-श्रेष्ठ झाले आहेत) **यत् अग्निः वायुः इंद्रः ते हि एनत् नेदिष्ठं पस्पृशुः** (ज्या अर्थी इंद्र, वायु, अग्नि हे देव ब्रह्माच्या अतिशय जवळ जाऊन त्याला दर्गिंद्रियानें स्पर्श करिते झाले) **ते ही एनत् प्रथमः ब्रह्मेति विदांचकार** (आणि याच देवांना 'हें ब्रह्म आहे' असें प्रथम कळलें.

यस्मादग्निर्वाय्विन्द्रा एते देवा ब्रह्मणः संवाददर्शनादिना सामीप्यमुपगतास्तस्मादैश्वर्यगुणैरतितरामिव शक्तिगुणादिमहाभाग्यैरन्यान्देवानतितरामतिशयेन शेरत इवैते देवाः । इवशब्दोऽनर्थकोऽवधारणार्थो वा । यदग्निर्वायुरिन्द्रस्ते हि देवा यस्मादेतद्ब्रह्म नेदिष्ठमन्तिकतमं प्रियतमं पस्पृशुः स्पृष्टवन्तो यथोक्तैर्ब्रह्मणः संवादादिप्रकारैस्ते हि यस्माच्च हेतोरेनद्ब्रह्म प्रथमः प्रथमाः प्रधानाः सन्त इत्येतद्विदांचकार विदांचक्रुरित्येतद्ब्रह्मेति ॥ २७ ॥ २ ॥

ज्या अर्थी इंद्र, अग्नि, वायु, या देवांनां ब्रह्माचें दर्शन, त्याच्याशीं संवाद व त्याच्या अति निकट असण्याची संधि मिळाली, त्या अर्थी ऐश्वर्य-शक्ति, महा भाग्य इत्यादि गुणांनीं हेच देव सर्व देवांपेक्षां अतिशय श्रेष्ठ आहेत असें ठरलें. अधिकारानें, आत्मयोग्यतेनें ते मात्र जणूं कांहीं इतर देवांच्या पुढें गेले.

शिष्य—येथें 'इव' शब्दाचा अर्थ मात्र असा आपण केला.

सिद्धान्ती—किंवा 'इव' शब्द निरर्थक आहे असें समजावें. असो; हें पहा कीं अग्नि, वायु, इंद्र, हे देव ब्रह्माच्या अतिशय जवळ जाऊं शकले, अतिशय प्रियकर वस्तूला स्पर्श करण्याचा अधिकार प्रेमी पुरुषास मात्र असतो, त्याप्रमाणें त्यानीं त्याला दृष्टिद्वारा स्पर्शही केला आणि त्याच्याशीं संवादादि प्रकार केले,

त्या अर्थी हे देव सर्व देवांमध्ये प्रधान देव होत, असें ठरलें. शिवाय, ब्रह्मज्ञानही पहिल्याप्रथम त्यांसच झालें. ॥ २७ ॥ २ ॥

शिष्य—भगवन्! येथें 'प्रथमः' हा शब्द बहुवचनी व पुढील क्रियापदही बहुवचनी असावें, असा आपला अभिप्राय दिसतो.

सिद्धान्ती—होय. बहुवचनींच हीं पदें घेणें इष्ट आहे.

तस्माद्वा इन्द्रोऽतितरामिवान्यान्देवान्स ह्येनन्नेदिष्ठं पस्पर्श स ह्येनत्प्रथमो विदांचकार ब्रह्मेति। ॥ २८ ॥ ३ ॥

अन्वयार्थ—तस्मात् वै इंद्रः अन्यान् देवान्—(म्हणूनच इंद्र हा बाकीच्या सर्व देवांपेक्षां—श्रेष्ठतम आहे—) बाकीचा अन्वय व अर्थ मागील मंत्राप्रमाणेंच आहे.

यस्मादग्निर्वायू अपीन्द्रवाक्यादेव विदांचक्रतुरिन्द्रेण ह्युमावाक्यात्प्रथमं श्रुतं ब्रह्मेत्यतस्तस्माद्वा इन्द्रोऽतितरामतिशयेन शेत इवान्यान्देवान्स ह्येनन्नेदिष्ठं पस्पर्श यस्मात्स ह्येनत्प्रथमो विदांचकार ब्रह्मेत्युक्तार्थं वाक्यम्॥ २८ ॥ ३ ॥

सिद्धान्ती—अग्नि, वायु यांस मुद्दां इंद्राच्या सांगण्यावरून ब्रह्मज्ञान झालें; पण इंद्राला उमा—वाक्यावरून प्रथम (सर्वांच्या अगोदर, ब्रह्मज्ञान झालें म्हणून इंद्र हा बाकीच्या वायु—अग्नि आदि सर्व देवांपेक्षां अत्यंत श्रेष्ठ आहे, असें ठरलें. त्यालाच प्रथम ब्रह्माच्या अति जवळ जातां आलें, व ब्रह्मज्ञान झालें, इत्यादि विवरण मागच्या मंत्राप्रमाणेंच आहे, असें समज. ॥ २८ ॥ ३ ॥

तस्यैष आदेशो यदेतद्विद्युतो व्यद्युतदा३इतीन्यमीषदा ३ इत्यधिदैवतम् ॥ २९ ॥ ४ ॥

अन्वयार्थ—तस्य एषः आदेशः (ह्या ब्रह्माचा हा आदेश म्हणजे उपदेश आहे) यत् एतत् विद्युतः व्यद्युतद् आइति (हें जणुं कांहीं विजेचें लकाकणें आहे) न्यमीमिषत् आ (हें जणूं कांहीं डोळ्याचें झांकणें उघडणें आहे.) इति अधिदैवतं (हें ब्रह्माचें आधिदैविक स्वरूप होय)

सारांश, हा आहे कीं ब्रह्म प्रकट होऊन अंतर्धान पावलें, हा काय विजेचा लःकन् पडणारा व क्षणांत नाहींसा होणारा प्रकाश आहे किंवा नेत्रांची उघड झांप आहे, असें हें उपमामूलक वर्णन आधिदैविक आहे, कारण उपमा विजेची व नेत्रतेजाची म्हणजे प्रकाशात्मक देवांसंबंधीं आहे.

तस्य प्रकृतस्य ब्रह्मण एष आदेश उपमोपदेशो निरुपमस्य ब्रह्मणो येनोपमानेनोपदेशः सोऽयमादेश इत्युच्यते । किं तद्यदेतत्प्रसिद्धं लोके विद्युतो व्यद्युतद्विद्योतनं कृतवदित्येतदनुपपन्नमिति विद्युतो विद्योतनमिति कल्प्यते । आ इत्युपमार्थे । विद्युतो विद्योतनमिवेत्यर्थः । " यथा सकृद्विद्युतम् " इति श्रुत्यन्तरे च दर्शनाद्विद्युदिव हि सकृदात्मानं दर्शयित्वा तिरोभूतं ब्रह्म देवेभ्यः । अथवा विद्युतस्तेज इत्यध्याहार्यम् । व्यद्युतद्विद्योतितवत्, आ इव । विद्युतस्तेजः सकृद्विद्योतितवदिवेत्यभिप्रायः । इतिशब्द आदेशप्रतिनिर्देशार्थ इत्ययमादेश इति । इच्छब्दः समुच्चयार्थः । अयं चापरस्त्याऽऽदेशः । कोऽसौ न्यमीमिषत् । यथा चक्षुर्न्यमीमिषन्निमेषं कृतवत् । स्वार्थे णिच् । उपमार्थ एवाऽऽकारः । चक्षुषो विषयं प्रति प्रकाशतिरोभाव इव चेत्यर्थः । इत्यधिदैवतं देवताविषयं ब्रह्मण उपमानदर्शनम् ॥ २९ ॥ ४ ॥

सिद्धान्ती—ब्रह्म तर निरुपमच आहे म्हणा ! त्याला कशाचीही उपमा देतां येत नाहीं; पण इंद्रादि देवांस जें ब्रह्म दिसलें, त्याचा परिस्फोट कांहीं तरी उपमा देऊन श्रुति करीत आहे तें कसें तें ऐकः लोकांमध्यें विजेची चमक ही तर प्रसिद्धच आहे. तिच्यासारखें ब्रह्म प्रकाशित झालें, असें ब्रह्मसंबंधानें म्हणणें मुळींच योग्य नाहीं. कारण स्वयंप्रकाशी ब्रह्म परप्रकाशी विजेसारखें प्रकाशतें असें म्हणणें, म्हणजे सूर्याला काजव्याचा प्रकाश मिळतो असें म्हणण्यासारखें आहे. म्हणून केवल उपमा या दृष्टीनें विजेची चमक असें क्षणभर मात्र म्हणावें इतकेंच. ही कल्पना आहे, वास्तवप्रकार नाहीं. 'विजेच्या चमकण्याप्रमाणें' असें वचन दुसऱ्या श्रुतींतही आढळतें. म्हणून विजेच्या लःकन् प्रकाशाप्रमाणें तें ब्रह्म देवांस एकदां दृश्य होऊन पुनः अदृश्य झालें, असें म्हटलें पाहिजे. किंवा तेज हा शब्द अध्याहृत घेऊन, विजेच्या तेजाप्रमाणें ब्रह्मप्रकाश होतो असाही अर्थ करावा.

शिष्य—मंत्रांमधील 'आ' शब्दाचा अर्थ इव (प्रमाणें) आहे. सारांश विजेच्या प्रकाशाप्रमाणें एकदम ब्रह्म प्रकाशित झालें, असा मला अभिप्राय दिसतो. मंत्रांत जो 'इति' शब्द आहे तो हा उपदेश होता, असें दाखविणारा आहे, व 'इत्' शब्द सर्व शब्दांचा समुच्चय करितो.

सिद्धान्ती—उत्तम आहे. आणखी एक ब्रह्माला या मंत्रांत उपमा दिली आहे, किंवा उपमा देऊन ब्रह्मोपदेश केला आहे, तो असाः—ज्या प्रमाणें आपण क्षणामध्यें नेत्र उघडतों व मिटतों, (नेत्रविषय पाहातों, आणि लगेच पापणी झांकतों) त्याप्रमाणें म्हणजे तितक्या लवकर ब्रह्म देवांस प्रकाशित झालें; आणि अंतर्धान पावलें. येथें 'आ' शब्द उपमादर्शक आहे. हा आधिदैवी उपमा देण्याचा प्रकार झाला. म्हणजे ब्रह्माला देवताविषयक प्रकाशाच्या उपमा दिल्या. सारांश, असा कीं चक्षूची निमीलनता (मिटणें) हें जसें सहज व लवकर होतें, तसें ब्रह्माचें क्षिप्रकारित्व होतें, तशी ब्रह्माची शीघ्रता दिसली. सृष्टि करण्याचे वेळीं कोणताही प्रतिबंध नव्हता, म्हणून विश्वोत्पत्ति श्रमाशिवाय लवकर करितां आली, हें डोळ्याच्या दृष्टान्तानें दर्शविलें, आणि विजेच्या प्रकाशी दृष्टान्तानें ब्रह्माची निरुपम व सर्वव्यापी तेजोमयता स्पष्ट झाली. एवंच, या दृष्टान्तांनीं ब्रह्माचें सर्वव्यापित्व, तेजोमयत्व, सर्वशक्तिमत्व इत्यादि दिव्य गुण स्पष्ट करून दाखविले आहेत, व ब्रह्माची तेजोरूपानें उपासना करावी, असें सांगितलें आहे ॥ २९॥४॥

अथाध्यात्मं यदेतद्गच्छतीव च मनोऽनेन चैतदुपस्मरत्यभीक्ष्णं संकल्पः ॥ ३० ॥ ५ ॥

अन्वय व अर्थ—अथ अध्यात्मं (यानंतर अध्यात्म—दृष्टीनें ब्रह्माचें स्वरूप वर्णन करितात.) **यत् एतत् मनः गच्छति इव** (जीवाचें मन या ब्रह्मस्वरूपाकडे जणूं कांहीं धांवत जातें असें) **अनेन च एतत् उपस्मरति** (या मनानें साधक, हा ब्रह्माचें स्मरण करितो.) **अभीक्ष्णं संकल्पः** (मनाचा ब्रह्मविषयक संकल्प वरचेवर असावा) ब्रह्मचिंतन करावें.—सारांश, जीवानें ब्रह्माचें चिंतन अखंड करावें हा उपदेश आध्यात्मिक आहे.

अथानन्तरमध्यात्मं प्रत्यगात्मविषय आदेश उच्यते । यदेतद्गच्छतीव च मन एतद्ब्रह्म ह्यौकत इव विषयीकरोतीव यथाऽनेन मनसैतद्ब्रह्मोपस्मरति समीपतः स्मरति साधकोऽभीक्ष्णं भृशं संकल्पश्च मनसो ब्रह्मविषयो मनउपाधिकत्वाद्धि मनसः संकल्पस्मृत्यादिप्रत्ययैरभिव्यज्यते ब्रह्मविषयीक्रियमाण इव चातः स एष ब्रह्मणोध्यात्ममादेशो विद्युन्निमेषणवदधिदैवतं द्रुतं प्रकाशनधर्म्यध्यात्मं च मनः प्रत्ययसमकालाभिव्यक्तधर्मीत्येष आदेशः । एवमादिदृश्यमानं हि ब्रह्म मन्दबुद्धिगम्यं भवतीति ब्रह्मण आदेशो-

पदेशः । नहि निरुपाधिकमेव ब्रह्म मन्दबुद्धिभिराकलयितुं शक्यम् ॥ ३० ॥ ५ ॥

सिद्धान्ती—आधिदैविक उपदेश मागील मंत्रांत झाला. या मंत्रांत अध्यात्मदृष्टीनें (मनादिकांच्या साहाय्यानें) ब्रह्माचें चिंतन कसें करावें असा उपदेश करावयाचा आहे. आपण नेहमीं असें चिंतन करावें कीं, माझें मन ब्रह्माकडे जात आहे, ब्रह्माला आपल्या चिंतनाचा विषयच करीत आहे, आणि या मनाच्या साहाय्यानें हें ब्रह्म आपल्या जवळच असून आपण त्याचें स्मरण करीत आहों, व आपल्या मनाचा अखंड संकल्पही ब्रह्मविषयक आहे.

शिष्य—म्हणजे, मला नीटसें समजलें नाहीं.

सिद्धान्ती—साधकानें नित्य असें चिंतन करावें कीं, आपले मन नेहमीं ब्रह्मविषयाचा संकल्प करीत राहील. (म्हणजे ब्रह्मचिंतन करावें असा त्याला ध्यास लागावा). मनाच्या साहाय्यानें ब्रह्मस्मरण वारंवार करावें आणि आपलें मन ब्रह्माचें जणुं कांहीं आकलन करीत आहे, अशी आपली भावना असावी. सारांश, आपली इच्छा ब्रह्मपर, आपलें स्मरण ब्रह्मपर, आणि आपलें चिंतनही ब्रह्मपर असावें. मनाचे सर्व व्यापार ब्रह्मपरच असावे.

शिष्य—महाराज ! जीवानें चिंतन, स्मरण, इत्यादि गोष्टी कराव्या, असें सांगावयाचें सोडून श्रुतीनें येथें मनाचा उच्चार कां केला ? मनानें स्मरण करावें असें कां सांगितलें ?

सिद्धान्ती—जीवाची मन ही उपाधि आहेना ? अर्थातच संकल्प, स्मृति, इत्यादि मनाचे जे प्रत्यय आहेत, स्वरूपें आहेत, त्यांच्या द्वाराने जीव हा ब्रह्माला आपल्या चिंतनाचा जसा कांहीं विषय करीत आहे, असा भाव श्रुतीनें प्रकट केला आहे. मनाचे व्यापार पाहिले असतां, त्यांचे प्रवर्तक जें ब्रह्म तें तद्द्वारा अभिव्यक्तच जणुं कांहीं होत असतें. समजलें ? मनाच्या दृष्टीनें हा उपदेश केला आहे, म्हणून व मनाला ब्रह्माचें प्रकाशन करण्याचें परोक्ष सामर्थ्य आहे, व मन हें अध्यात्म आहे म्हणून, ह्या उपदेशाला आध्यात्मिक उपदेश म्हणतात, मागील विद्युत्प्रकाश व नेत्रनिमेषण या स्वरूपांनीं जो उपदेश झाला, त्याला आपण आधिदैविक उपदेश असें म्हटलें.

शिष्य—भगवन् ! मनाचा धर्म असा आहे की, ज्ञान होत असतां ज्ञेय विषयाचे धर्म–स्वरूपानें, ज्ञेय विषय–रूपानें, आपण प्रकट व्हावें. जो विषय मन पाहतें तद्रूपच मनाची वृत्ति होत असते, असा मानस शास्त्राचा नियम आहे. तेव्हां ब्रह्मचिंतन करीत असतांना मनही ब्रह्मरूप झालें पाहिजे. म्हणजे मनाला ब्रह्माचें आकलन करितां येतें असें झालें.

शिष्य—अरे! हा उपदेश किंवा या उपदेशांत सांगितलेलें ब्रह्म मंदबुद्धीच्या लोकांस समजेल, अशा रीतीनें श्रुतीचें येथें प्रवचन आहे. निर्गुण व निर्विकल्प ब्रह्माचें आकलन करण्यास मंदबुद्धीच्या लोकांना सामर्थ्य नसतें, म्हणून त्यांना समजेल अशा रीतीनें म्हणजे केव्हां विजेचा दृष्टान्त देऊन, केव्हां मनाचे धर्म सांगून ब्रह्माकडे सामान्य बुद्धीच्या जीवांचेंही लक्ष जाईल, अशीही व्यवस्था श्रुतिमातेनें केली आहे. सारांश, मंदबुद्धींनीं 'मन हेंच ब्रह्म आहे' अशी उपासना करावी. ॥ ३० ॥ ५ ॥

तद्ध तद्वनं नाम तद्वनमित्युपासितव्यं स य एतदेवं वेदाभिहैनं सर्वाणि भूतानि संवाञ्छन्ति ॥ ३१ ॥ ६ ॥

अन्वय व अर्थ—तत् ह (खरोखर तें ब्रह्म) **तद्वनं नाम** (सर्वांचें कल्याण करणारें आहे हें प्रसिद्ध आहे)—म्हणून—**तद्वनं इति उपासितव्यं** (तें सर्वोपास्य आहे अशा स्वरूपानें ब्रह्माची उपासना करावी) **सः यः एतत् एवं वेद** (ज्या कोणाला या स्वरूपानें ब्रह्माचिंतन करावें असें ज्ञान होईल) **एनं सर्वाणि भूतानि अभिसंवाञ्छन्ति ह** (त्याची सर्व भूतें प्रार्थना करूं लागतात. तो सर्व भूतांस हवासा वाटूं लागतो.) या प्रमाणें या मंत्रांत सगुण ब्रह्माची उपासना केली असतां, काय फल प्राप्त होतें हें सांगितलें.

किंच तद्ब्रह्म ह किल तद्वनं नाम तस्य वनं तद्वनं तस्य प्राणिजातस्य प्रत्यगात्मभूतत्वाद्वननीयं संभजनीयमतस्तद्वनं नाम प्रख्यातं ब्रह्म तद्वनमिति यतस्तस्मात्तद्वनमित्यनेनैव गुणाभिधानेनोपासितव्यं चिन्तनीयमिति। अनेन नाम्नोपासकस्य फलमाह—स यः कश्चिदेतद्यथोक्तं ब्रह्मैवं यथोक्तगुणं वेदोपास्तेऽभि हैनमुपासकं सर्वाणि भूतान्यभिसंवाञ्छन्ति ह प्रार्थयन्त एव यथा ब्रह्म ॥३१।६॥

सिद्धान्ती—हें प्रसिद्धच आहे कीं, सर्व भूतांच्या अंतर्यामी सर्व-संरक्षक ब्रह्म आहे. म्हणून तें सर्वांनीं उपासना करण्यास योग्य आहे. हें असें आहे, म्हणूनच त्याला 'सर्वोपास्य' असें नांव आहे.

शिष्य—'तत्वनं' म्हणजे सर्व प्राण्यांचा प्रत्यगात्मा ब्रह्म आहे, म्हणून तें सर्वोपास्य आहे, असाच अर्थ समजून घ्यावयाचा ना? वन म्हणजे 'उपासना

करण्यास योग्य ' हें तर स्पष्टच आहे. तेव्हां ब्रह्माचें नांव ' तद्वन ' असें पडलें तेंही ठीकच झालें. मी म्हणतों हें बरोबर आहेना ?

सिद्धान्ती—ठीक आहे. या अशा सर्वोपास्य ब्रह्माचें ' उपास्य ' या दृष्टीनें सर्वांनीं चिंतन करावें. हें श्रुतीस सांगावयाचें आहे. ब्रह्म उपास्य आहे आणि त्याची उपासना आपण करावी, हें ज्ञान प्रत्येकास झालें पाहिजे, असा श्रुतीचा अभिप्राय आहे. हें ज्याला समजलें, त्यानें सर्वोपास्य ब्रह्माची उपासना ' सर्वोपास्य ' या नांवानें सुरू केली, म्हणजे त्या नामोपासकाची सर्व भूतें प्रार्थना करावयास लागतात. ब्रह्म सर्ववंद्य आहे, म्हणून त्याचा उपासकही तसा होतो. ॥ ३१ ॥ ६ ॥

एवमनुशिष्टः शिष्य आचार्यमुवाच—

याप्रमाणें उपदेश सिद्ध झालेला साधक आचार्यांची प्रार्थना करितो. (अधिदैवी, अध्यात्म व नाम, या तीन उपासना झाल्यावर साधक विचारतो)—

उपनिषदं भो ब्रूहीत्युक्ता त उपनिषद्ब्राह्मीं वाव त उपनिषदमब्रूमेति ॥ ३२ ॥ ७ ॥

अन्वयार्थ—भोः उपनिषदं ब्रूहि (भगवन् ! मला उपनिषद् सांगावें.) **उक्ता ते ब्राह्मी उपनिषद्** (तुला ब्रह्मविषयाचें उपनिषद् सांगितलें आहे.) **वाव ते उपनिषदं अब्रूम** (तुला ब्राह्मी उपनिषद् सांगितलेंच आहे.)

सारांश, उपनिषद सांगा, अशी साधकाची प्रार्थना आहे; व तें उपनिषद् सांगितलेंच आहे, असें आचार्य म्हणत आहेत.

उपनिषदं रहस्यं यच्चिन्त्यं भो भगवन्ब्रूहीत्येवमुक्तवति शिष्य आहाऽऽचार्यः । उक्ताऽभिहिता ते तवोपनिषत् । का पुनः सेत्याह—ब्राह्मीं ब्रह्मणः परमात्मन इयं तां परमात्मविषयत्वादतीतविज्ञानस्य वावैव त उपनिषदमब्रूमेत्युक्तामेव परमात्मविद्यामुपनिषदमब्रूमेत्यवधारयत्युत्तरार्थम् । परमात्मविषयामुपनिषदं श्रुतवत उपनिषदं भो ब्रूहीति पृच्छतः शिष्यस्य कोऽभिप्रायः । यदि तावच्छ्रुतस्यार्थस्यः प्रश्नः कृतस्ततः पिष्टपेषणवत्पुनरुक्तोऽनर्थकः प्रश्नः स्यादथ सावशेषोक्तोपनिषत्स्यात्ततस्तस्याः फलवचनेनोपसंहारो न युक्तः प्रेत्यास्माल्लोकादमृता भवन्तीति ।

तस्मादुक्तोपनिषच्छेषविषयोऽपि प्रश्नोऽनुपपन्न एवानवधारितत्वात् । कस्तर्ह्यभिप्रायः प्रष्टुरित्युच्यते । किं पूर्वोक्तोपनिषच्छेषतया तत्सहकारिसाधनान्तरापेक्षा । अथ निरपेक्षैव । सापेक्षा चेदपेक्षितविषयामुपनिषदं ब्रूहि । अथ निरपेक्षा चेदवधारय पिप्पलादब्रह्मातः परमस्तीत्येवमभिप्रायः । एतदुपपन्नमाचार्यस्यावधारणवचनमुक्ता त उपनिषदिति । ननु नावधारणमिदं यतोऽन्यद्वक्तव्यमित्याह । तस्यै तपो दम इत्यादि सत्यं वक्तव्यमुच्यत आचार्येण न तूक्तोपनिषच्छेषतया तत्सहकारिसाधनान्तराभिप्रायेण वा । किंतु ब्रह्मविद्याप्राप्त्युपायाभिप्रायेण वेदैस्तदङ्गैश्च सह पाठेन समीकरणात्तपःप्रभृतीनाम् । न हि वेदानां शिक्षाद्यङ्गानां च साक्षाद्ब्रह्मविद्याशेषत्वं तत्सहकारिसाधनत्वं वा सहपाठेतानामपि यथायोग्यं विभज्य विनियोगः स्यादिति चेद्यथा सूक्तवाकानुमन्त्रणमन्त्राणां यथादैवतं विभागस्तथा तपोदमकर्मसत्यादीनां ब्रह्मविद्याशेषत्वं तत्सहकारिसाधनत्वं वेति कल्प्यते । वेदानां तदङ्गानां चार्थप्रकाशकत्वेन कर्मात्मज्ञानोपायत्वमित्येवं ह्ययं विभागो युज्यतेऽर्थसंबन्धोपपत्तिसामर्थ्यादिति चेत् । नायुक्तेः । न ह्ययं विभागो घटनां प्राञ्चति । न हि सर्वक्रियाकारकफलभेदबुद्धितिरस्कारिण्या ब्रह्मविद्यायाः शेषापेक्षा सहकारिसाधनसंबन्धो वा युज्यते । सर्वविषयव्यावृत्तप्रत्यगात्मविषयनिष्ठत्वाच्च ब्रह्मविद्यायास्तत्फलस्य च निःश्रेयसस्य,

" मोक्षमिच्छन्सदा कर्म त्यजेदेव ससाधनम् ।
त्यजतैव हि तज्ज्ञेयं त्यक्तुः प्रत्यक्परं पदम् " ।

तस्मात्कर्मणां सहकारित्वं कर्मशेषापेक्षा वा न ज्ञानस्योपपद्यते । ततोऽसदेव सूक्तवाकानुमन्त्रणवद्यथायोगं विभाग इति । तस्मादवधारणार्थतैव प्रश्नप्रतिवचनस्योपपद्यते । एतावत्येवेयमुपनिषदुक्ताऽन्यनिरपेक्षामृतत्वाय ॥ ३२ ॥ ७ ॥

सिद्धान्ती—' उपनिषदाचें रहस्य भगवन्! मला सांगा,' अशी साधक विनंति करिता झाला. तेव्हां आचार्योनीं उत्तर केलें कीं, तुला उपनिषद् सांगितलें आहे. साधकानें पुनः विचारलें ' कोणतें उपनिषद् तें ? आचार्योनीं पुनः उत्तर केलें. 'परमात्मविषयक जो उपदेश केला, परब्रह्माचें स्वरूप जें आम्हीं सांगितलें, तेंच उपनिषद् होय. शिष्या, परब्रह्माचें जें रहस्य आहे, तेंच उपनिषद् होय,' असें आचार्योनीं मुमुक्षुस सांगितलें. हा ब्रह्मविषय अतिकठिण आहे, जीवाच्या ज्ञानाला गोचर होणारा हा विषय नव्हे, म्हणून उपनिषदाचें रहस्य गुरुजींनीं सांगितलें

असूनही 'हें मी तुला आतांच परमात्मविद्येचें रहस्य सांगितलें' असें गुरुजास साधकाचें चित्त आकर्षण करण्याकरितां सांगावें लागलें आहे.

शिष्य—भगवन्! ब्रह्मविद्या ऐकूनही या साधकानें 'मला ब्रह्म सांगा' अशी आचार्यांची प्रार्थना केली, यांत त्याचा अभिप्राय काय असावा? जर ऐकिलेलाच विषय पुनः ऐकावा, हा या प्रश्नाचा अर्थ असेल, तर हें पिष्टपेषणच चाललें आहे म्हणावयाचें! समजलेलीच गोष्ट पुनः विचारणें म्हणजे दळलेलें दळण पुनः दळण्यासारखें आहे. हा प्रश्न व्यर्थ आहे असें मला वाटतें.

पूर्वपक्षी—असें नव्हे. उपनिषदाचा कांहीं भाग सांगावयाचा राहिला होता, तेव्हां उपनिषद् ऐकल्याची फलश्रुति काय आहे, ती सांगून जो उपसंहार केला, 'मेल्यावर ब्रह्मज्ञ लोक मुक्त होतात.' असे फल सांगून जें उपनिषदाचें प्रवचन संपविलें, तें योग्य झालें नाहीं, असा साधकाच्या प्रश्नाचा अभिप्राय आहे.

शिष्य—ज्याअर्थी उपनिषद्-श्रवणाचें फलही सांगितलें आहे, त्याअर्थी त्या विषयाचा कांहीं शेष राहिला होता आणि म्हणून तो सांगण्याविषयीं शिष्याची प्रार्थना आहे, हा तुमचा तर्क योग्य नाहीं; कारण फलश्रुति सांगतात, ती विषय समाप्त झाल्यावर सांगत असतात. यावरून उपनिषदांत कांहीं सांगावयाचें राहिलें नव्हतें हें स्पष्ट आहे. तेव्हां भगवन्! साधकाचा अभिप्राय काय असावा बरें?

सिद्धान्ती—सांगतों ऐक. पूर्वीच उपनिषद् सांगितलें होतें, तरी 'उपनिषद् सांगा' असें साधक म्हणतो, तेव्हां त्याचा अवशेष म्हणून त्याचें साधन साध्य करणाऱ्या अन्य सहकारी साधनांची अपेक्षा साधकाला असली पाहिजे, असा एक पक्ष होईल किंवा साधन-निरपेक्ष तरी तो अवशेष असला पाहिजे, असा दुसरा पक्ष होईल. सापेक्ष असेल तर 'मला उपनिषद् सांगा, कारण उपनिषदाचीं अंगभूत साधनें मला समजून घ्यावयाचीं आहेत' अशी साधकाची प्रार्थना असली पाहिजे. पण तशी ती नाहीं. तेव्हां अन्य साधनांची अपेक्षा नाहीं असें ठरलें. म्हणून 'आतां तुला सांगावयाचें कांहीं एक राहिलें नाहीं' हें पिप्पलादाप्रमाणें* ध्यानांत ठेव, असें सांगितलें पाहिजे. म्हणून 'तुला सर्व उपनिषद् सांगितलें आहे' हें निश्चित आचार्यांचें उत्तर साधकाच्या प्रश्नाला यथायोग्य असेंच आहे. सांगावयाचें कांहीं एक राहिलें नाहीं.

शिष्य—हें पुनः एकदां मला समजून सांगा.

सिद्धान्ती—पूर्वपक्षाची शंका अशी आहे कीं, ज्याअर्थी मला उपनिषद् सांगा असा शिष्याचा प्रश्न आहे, त्याअर्थी उपनिषदाचा कांहीं तरी भाग सांगाव-

---

* हा अथर्ववेदाचा आचार्य होय. प्रश्नोपनिषदांत याचा पुनः अवतार येणारच आहे.

याचा राहिला आहे. तेव्हां, या प्रश्नाला दोन तऱ्हेनें उत्तर देतां येईल. एकतर सर्व उपनिषद् सांगूनही त्याला साहाय्यकारी असणाऱ्या सहकारी साधनांचें ज्ञान साधकाला होण्याची अपेक्षा आहे किंवा दुसरी तऱ्हा म्हणजे साधनाची अपेक्षा नाहीं हें ठरवून उत्तर द्यावयाचें. साधन–ज्ञानाची अपेक्षा आहे असा जर पक्ष घेतला तर साधकाच्या प्रार्थनेमध्यें 'मला सहकारी साधनें सांगा' अशी इच्छा प्रकट व्हावयास पाहिजे होती; पण तसें तर साधक म्हणत नाहीं. तेव्हां साधनाच्या ज्ञानाची अपेक्षा त्याला नव्हती, असें ठरतें. ब्रह्मविद्येचा उपदेश आटपला व साधनांची ही अपेक्षा नाहींशी झाली, तेव्हां असेंच म्हणावयास पाहिजे कीं, ब्रह्मविद्येचें प्रवचन आटपलें, आतां सांगावयाचें असें कांहीं एक राहिलें नाहीं; आणि हाच अभिप्राय मनांत आणून आचार्यांनीं उत्तर दिलें आहे कीं, ब्रह्मविद्येचें सर्व प्रवचन झालें. समजलें ?

पूर्वपक्षी—आचार्य असें निश्चित बोलतात असें मला दिसत नाहीं; कारण त्यांना कांहीं तरी पुढें सांगावयाचें आहे असें पुढील मंत्रावरून दिसतें.

सिद्धान्ती—या उपनिषदाचें प्रतिष्ठापन तप, दम, इत्यादिकांवर आहे असें आचार्यांनीं सांगितलें आहे खरें; पण हें सांगणें ब्रह्मविद्येचीं कांहीं अंगें राहिलीं आहेत किंवा तिचीं कांहीं दुसरीं सहकारी साधनें। सांगावयाचीं आहेत, या अभिप्रायानें प्रतिष्ठापनाचें प्रवचन केलें नाहीं. तर ब्रह्मविद्या–प्राप्तीचा तो उपाय आहे, तें एक ब्रह्मविद्येचें साधन आहे, असें म्हणण्याचा अभिप्राय आहे. वेदवेदांगांचें जेव्हां अध्ययन होतें, तेव्हांच तपःप्रभृतीचें अनुष्ठान होतें. म्हणून या तपादिकांचा ब्रह्मविचाराशीं कांहीएक संबंध नाहीं, हें ध्यानांत ठेवा. वेद वेदांगें म्हणजे वेद व शिक्षादि* वेदांगें ह्यांचें अध्ययन स्वाध्यायांत अंतर्भूत होतें, तसेच तपादिकांचें आचरणही तेव्हांच होतें. या सर्वांचा ब्रह्मविद्येशी कोणताही संबंध नाहीं.

पूर्वपक्षी—मग या गोष्टी कशाला सांगितल्या आतां ? ह्या सांगण्याचा हेतु असा आहे कीं, वेदांचा व वेदांगांचा पाठ चालला असतांना तप, दम, इत्यादि गोष्टी सहजच सिद्ध होतात. वेद किंवा वेदांगें हीं साक्षात् ब्रह्मविद्येचीं अंगें नव्हेत किंवा सहकारी साधनेंही नव्हेत हें सर्व–प्रसिद्ध आहे. तथापि तपादिकांचें अनुष्ठान वेद वेदांगांच्या पाठाबरोबरच होत असलें, तरी ब्रह्ममीमांसेच्या वेळीं त्यांचा यथायोग्य विभाग करून विनियोग करितां येईल.

शिष्य—हें कसें ?

। ब्रह्मविद्येची चर्चा चालली असतां, त्यावेळी उपयोगीं पडणारीं साधनें, तीं सहकारी साधनें होत.

* शिक्षा, कल्प, व्याकरण, ज्योतिष, छंद, निरुक्त हीं वेदाचीं सहा अंगें आहेत, या अंगांचें वेदासह, सांग पठन झालें म्हणजे वेदविद्येचें अध्ययन पूर्ण होतें.

पूर्वपक्षी-सूक्त-वाकानें* अनुमंत्रण आपण करितों, तेव्हां ज्या यागामध्यें ज्या देवतेला आपण बोलावतों त्याच यज्ञामध्यें त्याच देवतेचें विसर्जनही आपण यथा-योग्य करितों, असा जसा प्रघात आहे, यज्ञामध्यें विशेष देवतांचें आवाहन-विसर्जन करण्याप्रीत्यर्थ ज्याप्रमाणें आपण विशेष सूक्तांचा विशेष विनियोग करितों, अथवा आवाहन-विसर्जन हें जसें यज्ञाचें अंग आहे, त्याचप्रमाणें तप, दम, कर्म, सत्य इत्यादिकांस ब्रह्मविद्येचें उपांगत्व प्राप्त व्हावें किंवा निदान तपादि हीं ब्रह्मविद्येचीं सहकारी साधनें तरी व्हावीं, असें दिसतें. वेद आणि वेदांगें यांकडे अर्थप्रकाशनाचें काम आहे म्हणून कर्मांला जसें वेदवेदांगांचें साहाय्य होतें, याचप्रमाणें आत्मज्ञाना-लाही तपादिकांचें साहाय्य व्हावें. आम्ही केलेल्या ह्या विभागानें किंवा ह्या योजनेनें सातव्या मंत्राचा अर्थ उत्तम होतो, संबंधही ठीक जुळतो आणि युक्तीला ही योजना संमत होते. सारांश, तपादि गोष्टी ब्रह्मविद्येचीं साक्षात् अंगें तरी आहेत, किंवा साक्षात् सहकारी साधनें तरी आहेत असें ठरतें.

सिद्धान्ती—नाहीं, हें तुमचें म्हणणें युक्तीला जुळत नाहीं. तुमची ही योजना जुळली असती.

शिष्य—केव्हां ! भगवन् !

सिद्धान्ती—जर या तपादिकांची योग्यता असती तर ! ध्यानांत ठेवा कीं, कर्मांचा आणि ज्ञानाचा अत्यंत विरोध आहे. म्हणून ही तुमची योजना पटत नाहीं. म्हणजे हो योजना एक क्षणभरही स्वरूप धारण करूं शकत नाहीं. पहा कीं क्रिया, कारक, (कर्तृत्व, करणत्व इत्यादि) फल-प्रमुख सर्वभेद-बुद्धींचा सर्वथा तिरस्कार करणाऱ्या ब्रह्म-विद्येचें कर्म हें एक उपांग असणें किंवा सहकारी साधन असणें, याचा संभवच नाहीं. अंधकारानें प्रकाशाला साहाय्य करावें, असें जरी कधीं काळीं घडलेंच, तरी कर्मांचें साहाय्याची विद्येला अपेक्षा उत्पन्न होणार नाही. सर्व विषय नाहींसे करून ब्रह्मविद्या ही स्वतः प्रत्यगात्म-विषयामध्यें समर्पिलेली असते. आणि या विद्येचें फलही मोक्षरूप असतें. म्हणून आत्मरूप विद्या व मोक्षरूप फल हीं कर्मरूप अविद्या आणि स्वर्गरूप फल यांहून अत्यंत विलक्षण आहेत. अतएव तुम्हीं म्हणतां, हा संबंध जुळणें शक्य नाहीं. म्हटलें आहेः-मुमुक्षूनें साधनांसह कर्मांचा त्याग केलाच पाहिजे. म्हणजे ज्याला मोक्ष हवा आहे त्यानें साधनांसह कर्मांचा त्याग केलाच पाहिजे. आणि हा त्याग करणाऱ्या मुमुक्षूनें हें समजून

---

* सूक्तवाक म्हणजे स्तोत्र किंवा स्तोत्र-पठनाचा विधि. ह्या स्तोत्रानें देव-तांचें आवाहन यज्ञ-समाप्तीचे वेळीं करितात. कोणत्या देवतांस कोणत्या सूक्त-वाकानें आमंत्रण द्यावयाचें हें ठरलेलें आहे. आवाहन-विसर्जनाची पद्धति वेदानेंच ठरविलेली असते.

घेतलें पाहिजे कीं, त्याग करणाऱ्या संन्याशाचा प्रत्यगात्मा हाच परमात्मा आहे. म्हणून आम्ही म्हणतों की कर्मांचें सहकारित्व किंवा कर्मांचें उपांगत्व ज्ञानाला एक क्षणभर सुद्धां सहन व्हावयाचें नाहीं. यास्तव तुम्ही जी योजना मनांत आणली आहे ती सर्वथा अयोग्य आहे. ही योजना अयोग्य आहे म्हणून सत्य नाहीं. आणि सत्य नाहीं म्हणून अयोग्य आहे. तात्पर्य, साधकाचा निश्चय होण्यासाठींच हीं सातव्या मंत्रांतील प्रश्नोत्तरें आहेत. या केनोपनिषदाची येथें समाप्ति झाली. हें उपनिषद बरोबर रीतीनें समजलें असतां दुसऱ्या कोणत्याही गोष्टीची अपेक्षा शिलक राहत नाहीं ॥ ३२ ॥ ७ ॥

यामिमां ब्राह्मीमुपनिषदं तवाग्रेऽब्रूमेति तस्यै तस्या उक्तायाउपनिषदः प्राप्त्युपायभूतानि तपआदीनि ।

हें जें ब्रह्मोपनिषद् तुम्हांला सांगितलें, त्याच्या प्राप्तीचे परोक्ष उपाय आतां सांगतों. यांच्या योगानें प्रथम सगुण ब्रह्मज्ञानाचें व पुढें निर्गुण ब्रह्मज्ञानाचें संपादन करितां येईल. ब्रह्मविद्या प्राप्त करून घेण्याची इच्छा होण्याचे अगोदर या तपादिकांचें आचरण सिद्ध होऊन चित्तशुद्धि झाली असली पाहिजे.

तस्यै तपो दमः कर्मेति प्रतिष्ठा वेदाः सर्वाङ्गानि (णि?) सत्यमायतनम् ॥ ३३ ॥ ८ ॥

अन्वय व अर्थ—तस्यै (त्या विद्येचें) तपः दमः कर्म वेदः सर्वाङ्गाणि प्रतिष्ठा इति (तप, दम, कर्म, वेद आणि वेदांगें ही प्रतिष्ठा आहे) सत्यं आयतनं (तिचें सत्य निवासस्थान आहे.) सारांश स्पष्टच आहे.

तपः कायेन्द्रियमनसां समाधानम् । दम उपशमः । कर्माग्निहोत्रादि । एतैर्हि संस्कृतस्य सत्त्वशुद्धिद्वारा तत्त्वज्ञानोत्पत्तिर्दृष्टा । ह्यमृदितकल्मषस्योक्तेऽपि ब्रह्मण्यप्रतिपत्तिर्विपरीतप्रतिपत्तिश्च यथेन्द्रविरोचनप्रभृतीनाम् । तस्मादिह वाऽतीतेषु वा बहुषु जन्मान्तरेषु तपआदिभिः कृतसत्त्वशुद्धेर्ज्ञानं समुत्पद्यते यथाश्रुतम् ।

" यस्य देवे परा भक्तिर्यथा देवे तथा गुरौ ।
तस्यैते कथिता ह्यर्थाः प्रकाशन्ते महात्मनः "

इतिमन्त्रवर्णात् । " ज्ञानमुत्पद्यते पुंसां क्षयात्पापस्य कर्मणः " इति स्मृतेः । इतिशब्द उपलक्षणप्रदर्शनार्थः । इत्येवमाद्यन्यदपि ज्ञानोत्पत्तेरुपकारकममानित्वमदम्भित्वमित्याद्युपदर्शितं भवति । प्रतिष्ठा पादौ पादाविवास्यास्तेषु हि सत्सु प्रतितिष्ठति ब्रह्मविद्या

प्रवर्तते पङ्क्थामिव पुरुषः । वेदाश्चत्वारः सर्वाणि चाङ्गानि शिक्षादीनि षट् कर्मज्ञानप्रकाशत्वाद्वेदानां तद्रक्षणार्थत्वादङ्गानां प्रतिष्ठात्वम् । अथवा प्रतिष्ठाशब्दस्य पादरूपकल्पनार्थत्वाद्वेदास्त्रिवतराणि सर्वाङ्गानि (णि ?) शिरआदीनि । अस्मिन्पक्षे शिक्षादीनां वेदग्रहणेनैव ग्रहणं कृतं प्रत्येतव्यम् । अङ्गिनि गृहीतेऽङ्गानि गृहीतान्येव भवन्ति । तदायतनत्वादङ्गानाम् । सत्यमायतनं यत्र तिष्ठत्युपनिषत्तदायतनं सत्यमिति । अमायिताऽकौटिल्यं वाङ्मनःकायानां तेषु ह्याश्रयति विद्या येऽमायाविनः साधवः । नासुरप्रकृतिषु मायाविषु । " न येषु जिह्ममनृतं न माया च " इति श्रुतेः । तस्मात्सत्यमाय्तनमिति कल्प्यते । तपआदिष्वेव प्रतिष्ठात्वेन प्राप्तस्य सत्यस्य पुनरायतनत्वेन ग्रहणं साधनातिशयत्वज्ञापनार्थम् ।

" अश्वमेधसहस्रं च सत्यं च तुलया धृतम् ।
अश्वमेधसहस्राच्च सत्यमेकं विशिष्यते " इति स्मृतेः ॥ ३३ ॥८॥

सिद्धान्ती—तप म्हणजे शरीर, इंद्रियें आणि मन यांचे विवेकानें समाधान करणें होय.

शिष्य—मन शब्दानें मन, बुद्धि चित्त आणि अहंकार हे चतुष्टय येथें घ्यावयाचें आहे ना ?

सिद्धान्ती—होय, यांचें समाधान असणें, यांची समवृत्ति स्थिर करणें हें समाधान होय. इंद्रियांचा उपशम होणें, याला दम म्हणतात. अग्निहोत्रादि नित्यनैमित्तिकांचें निष्काम अनुष्ठान हें कर्म होय. या तप, दम व कर्म यांनीं मन सुसंस्कृत झालें म्हणजे सत्व–शुद्धि होते, अथवा चित्त निर्मल होतें. या निर्मल चित्तामध्यें तत्त्वज्ञान किंवा ब्रह्मविद्या आपलें स्वरूप प्रकट करावयास लागते. सर्वजण ध्यानांत ठेवा कीं, ज्याचे अंतःकरण शुद्ध झालें नाहीं, ज्याच्या अंतःकरणांतून वासनांसह काम–क्रोधादि विकार बाहेर गेले नाहींत, त्यानें ब्रह्मविद्या पुष्कळ वेळ ऐकिली किंवा तिचें प्रत्यही प्रवचन केलें, तरी त्याला ब्रह्मस्वरूप समजणार नाहीं, इतकेंच नव्हे, पण उलट त्याला अयथार्थ ज्ञान मात्र प्राप्त होईल.

शिष्य—इंद्र, विरोचन, प्रभृति लोकांस ब्रह्माच्या संबंधानें भलतेंच ज्ञान झालें, यांच्या समजुती भलत्याच झाल्या, हें आपल्यास इतिहासावरून समजतें. ईशोपनिषद्भाष्यांतही या कथेचा उल्लेख झाला आहे.

सिद्धान्ती—यासाठीं या जन्मीं किंवा अनेक पूर्वजन्मीं केलेल्या तपादिकांनीं जर सत्वशुद्धि झाली असेल, तर श्रुतीनें सांगितल्याप्रमाणें यथार्थ ज्ञान उत्पन्न

होतें. म्हटलें आहे,-' ज्यांची ईश्वराचे ठिकाणीं पराभक्ति आहे आणि जशी देवाचे ठिकाणीं तशी आचार्यांचे ठिकाणींही आहे, त्या महात्म्याला मात्र श्रुतीनें सांगितलेले सिद्धान्त उत्तम तऱ्हेनें प्रकट होतात.' (श्वेताश्वतर) 'पापकर्माचा क्षय झाला म्हणजे शुद्ध पुरुषांस ज्ञानाचा अधिगम होतो.' असें स्मृतिही सांगते.

शिष्य--महाराज, मंत्रांत जो 'इति' शब्द आहे त्याचा काय उपयोग!

सिद्धान्ती—तपादिकांप्रमाणेंच अमानित्व, अदंभित्व इत्यादि जीं ज्ञानोपकारक साधनें गीताप्रमुख ग्रंथांत सांगितलीं आहेत; त्यांचाही निर्देश व्हावा. सारांश, मंत्रांत सांगितलीं आहेत इतकींच साधनें नव्हेत तर आणखी कांहीं साधनें आहेत, हें श्रुतीस सांगावयाचें आहे; म्हणून 'इति' शब्दाची योजना आहे.

शिष्य—श्रुतीची प्रतिष्ठा म्हणजे काय?

सिद्धान्ती—जें असल्याशिवाय आपल्यास उभें राहतां येत नाहीं, आधार असत नाही, त्याला 'प्रतिष्ठा' असें म्हणावें. प्रतिष्ठा म्हणजे पाय किंवा पाया होय.

पूर्वपक्षी—ब्रह्मविद्येला पाय कसले?

सिद्धान्ती—पायाप्रमाणेंच ज्यांचा उपयोग ब्रह्मविद्येला होतो, ज्यांच्या साधनानें ब्रह्मविद्येची प्रवृत्ति होते, ते 'चार वेद व त्यांचीं सहा अंगें हीं ब्रह्मविद्येचे पाय आहेत,' असें म्हटल्यास कांहीं प्रत्यवाय नाहीं. जीव जसे पायांनीं चालतात तसेच वेदांच्या साहाय्याने ब्रह्मविद्येची प्रवृत्ति होते; तसेंच, वेद कर्म-प्रकाशक व ज्ञानप्रकाशक आहेत व वेदांगें वेदार्थाचें रक्षण करतात. म्हणून वेद आणि वेदांगें यांस ब्रह्मविद्येची प्रतिष्ठा असें म्हटले आहे. ह्याच्याशिवाय ब्रह्मविद्येची स्फूर्तिच व्हावयाची नाही.

शिष्य—अथवा प्रतिष्ठा शब्दानें वेद हे ब्रह्मविद्येचे चरण आहेत अशी कल्पना केली तर वेदाचीं जीं इतर अंगें आहेत, तीं ब्रह्मविद्येचीं मस्तकादि इतर सर्व उपकरणें आहेत असेंही कां न म्हणावें?

सिद्धान्ती—ह्या अर्थामध्यें वेद शब्दानें वेदांगांचें ही ग्रहण केलें पाहिजे, असें ठरतें. अंगीचे (मुख्यवस्तूचें) ग्रहण केलें असतां अंगांचे ग्रहण अर्थातच होतें. कारण अंगांचे वसतिस्थान अंगी हेच असतें.

याप्रमाणें वेद, वेदांगें, तपादि कर्म ही सर्व विद्येची प्रतिष्ठा होय, हीं असतील तरच ब्रह्मविद्येची प्राप्ति होते.

शिष्य—'सत्य' हें ब्रह्मविद्येचें 'वसतिगृह आहे' असें कां म्हटलें आहे?

सिद्धान्ती—कारण उपनिषदांचें वास्तव्यच सत्याचे ठिकाणीं असतें. जे लोक मायावी नाहींत, साधु आहेत, ज्यांची वाणी, ज्यांचें मन आणि ज्यांचें

शरीर यांस कपट किंवा दंभ यांचा स्वप्नांतही स्पर्श होत नाहीं, त्या दैवी संपत्तीच्या महात्म्यांमध्यें, सत्य वृत्तीच्या साधूंमध्यें, ब्रह्मविद्येचें वसतिस्थान असतें. ब्रह्मविद्या या लोकांचा मात्र आश्रय करिते. पण मायावी, असुर-संपत्तीच्या, लोकांचा ती आश्रय करित नाहीं. 'जेथें कपट आहे. अनृत आहे, माया आहे, तेथें ब्रह्मविद्येचें वास्तव्य नसतें.' (प्रश्नो० १।१६) ही श्रुति प्रमाण आहे; म्हणून ब्रह्मविद्येचें स्थान 'सत्य' हेंच आहे अशी योजना केली आहे.

पूर्वपक्षी—तप, दम, इत्यादि शब्द जर अनेक दुसरीं साधनें दाखवितात, तर त्यांतच सत्याचा अंतर्भाव कां केला नाहीं ?

सिद्धान्ती—तपादिकांना प्रतिष्ठा असें म्हटलें आहे हें खरें; तथापि सत्य हे ब्रह्मविद्येचें स्थान आहे, यां अधिक सांगण्यानें ' ब्रह्म-विद्येचें अतिउत्तम साधन म्हटलें म्हणजे सत्य मात्र आहे ' असें विशेष जोरानें सांगावयाचें आहे.—स्मृतीमध्यें म्हटलें आहे:—

एकदां सत्य आणि सहस्र अश्वमेध यांची तुलना केली. तेव्हां सहस्र अश्वमेधांपेक्षांही सत्य हें जास्त श्रेष्ठ ठरलें ! ' ॥ ३३ ॥ ८ ॥

यो वा एतामेवं वेदापहत्य पाप्मानमनन्ते स्वर्गे लोके ज्येये प्रतितिष्ठति प्रतितिष्ठति ॥ ३४ ॥ ९

इति चतुर्थः खण्डः ॥ ४ ॥

सह ना० आप्यायन्तु० सन्तु ॥

इति सामवेदीयतलवकारोपनिषत्समाप्ता ।

अन्वय व अर्थ—यः वै एतां एवं वेद (ज्याला ह्या ब्रह्मविद्येचें यथार्थ ज्ञान झालें) **पाप्मानं अपहत्य** (सर्व पापरूपाचा विनाश करून)—तो—**अनंते ज्येये स्वर्गलोके प्रतितिष्ठति प्रतितिष्ठति** (अनंत आणि अति श्रेष्ठ स्वर्गलोकांमध्यें जाऊन राहतो. अति श्रेष्ठ स्वर्ग हें त्याचें वास्तव्यस्थान होतें) सारांश उघड आहे.

यो वा एतां ब्रह्मविद्यां केनेषितमित्यादिना यथोक्तामेवं महाभागां ब्रह्म ह देवेभ्य इत्यादिस्तुतां सर्वविद्याप्रतिष्ठां वेदामृतत्वं

हि विन्दत इत्युक्तमपि ब्रह्मविद्याफलमन्ते निगमयते—अपहत्य पाप्मानमविद्याकामकर्मलक्षणं संसारबीजं विधूयानन्तेऽपर्यन्ते । स्वर्गे लोके सुखात्मके ब्रह्मणीत्येतत् । अनन्त इति विशेषणान्न त्रिविष्टपे । अनन्तशब्द औपचारिकोऽपि स्यादित्यत आह—ज्येय इति । ज्येये ज्यायसि सर्वमहत्तरे स्वात्मनि मुख्य एव प्रतिष्ठति । न पुनः संसारमापद्यत इत्यभिप्रायः ॥ ३४ ॥ ९ ॥

इति श्रीमत्परमहंसपरिव्राजकाचार्यश्रीमच्छंकरभगवत्पादकृतौ केनोपनिषत्पदभाष्ये चतुर्थः खण्डः ॥ ४ ॥

समाप्तमिदं श्रीमच्छंकराचार्यविरचितं तलवकारोपनिषदपर-पर्यायकेनोपनिषत्पदभाष्यम् ।

सिद्धान्ती—याप्रमाणें ब्रह्मस्वरूप वर्णन करणाऱ्या या ' केन ' नामक महा भाग्यशाली ब्रह्मविद्येचें ज्ञानविज्ञान ज्यांस झालें, तिसऱ्या खण्डांतील ब्रह्मस्तुति ज्यानें उत्तम तऱ्हेनें समजून व उमजून घेतली आणि ब्रह्मविद्येची प्रतिष्ठा ज्याला पूर्णपणें आकलन करितां आली, त्याला ब्रह्मविद्येचें फल जें अमृतत्व (मोक्ष) तें मिळतें. हें मागें दुसऱ्या खण्डाच्या शेवटींच सांगितलें आहे. त्याचाच पुनः अनुवाद या मंत्रांत केला आहे.

शिष्य—' पापवृत्ति नाहींशी करून ' म्हणजे " अविद्येनें उत्पन्न होणारी वासना व वासनाजन्य कर्म हेंच ज्याचें कारण आहे, असा संसार नाहींसा करून " असेंच समजावयाचें ना ? वासनेनें कर्म उत्पन्न होतें, कर्मानें संसार उत्पन्न होतो, अविद्येनें वासना होते म्हणून अविद्या हीच पापमूर्ति आहे, असें मला वाटतें.

सिद्धान्ती—बरोबर आहे. असो; हा निर्मल चित्ताचा ब्रह्मज्ञ पुरुष सुखात्मक स्वर्गलोकामध्यें म्हणजे ब्रह्मलोकामध्यें जाऊन राहतो.

पूर्वपक्षी—स्वर्ग लोकाचा अर्थ ब्रह्मदेव, इंद्र-चंद्रादि देव जेथें राहतात, तो देवलोक असाच अर्थ घेतला पाहिजे.

सिद्धान्ती—नाहीं. कारण मंत्रांत स्वर्ग लोकाचें ' अनंत ' हें विशेषण आहे. देवांचा स्वर्ग नित्य नाहीं व अनंतही नाहीं. तो आपल्या भूलोकासारखाच अनित्य व सादंत आहे, म्हणजे याला आदि आहे व अंत आहे. यावरून येथें स्वर्ग लोक म्हणजे मुक्तीचा लोक होय असें ठरतें.

पूर्वपक्षी—अनंत शब्द केवल उपचाराकरितां घातला असेल ?

सिद्धान्ती—पण दुसरा शब्द ' ज्येय ' (श्रेष्ठ सर्वश्रेष्ठ) असा शब्द आहे. त्याची व्यवस्था कशी लावावयाची ? ही व्यवस्था तुम्हांस लावतां येणार नाहीं. सारांश, तो ब्रह्मज्ञ पुरुष आपल्या आत्म्यामध्यें जाऊन राहतो. आत्मा हा सर्वश्रेष्ठ आहे. आत्मरूप झालेला पुरुष पुनः संसारांत येऊन पडत नाहीं, त्याचा संसार संपतो. ॥ ३४ ॥ ९ ॥

चतुर्थः खण्डः समाप्तः

श्रीमच्छंकराचार्यांनीं विरचित ' तलवकार शाखेंतील केनोपनिषदाचें पदभाष्य. भाषान्तर येथें समाप्त झालें.

जो विष्णु सर्वेश्वर सर्वदर्शी ।
सर्वात्मचारी निजशुद्धरूपी ॥
जो सर्व प्रत्यक्ष सदा विमुक्त ।
तो मी प्रभु निर्भय निर्विकार ॥ १ ॥

॥ ॐ शान्तिः शान्तिः शान्तिः ॥

ॐतत्सत्.

केनोपनिषत्

श्रीशाङ्करवाक्यभाष्योपेता।

ॐ तत्सद्ब्रह्मणे नमः।

प्रथमः खण्डः

मंत्र पहिला.*

समाप्तं कर्मात्मभूतप्राणविषयं विज्ञानं कर्म चानेकप्रकारम्। ययोर्विकल्पसमुच्चयानुष्ठानाद्दक्षिणोत्तराभ्यां सृतिभ्यामावृत्त्यनावृत्ती भवतः। अत ऊर्ध्वं फलनिरपेक्षज्ञानकर्मसमुच्चयानुष्ठानात्कृतात्मसंस्कारस्योच्छिन्नात्मज्ञानप्रतिबन्धकस्य द्वैतविषयदोषदर्शिनो निर्ज्ञाताशेषबाह्यविषयत्वात्संसारबीजमज्ञानमुच्छिच्छित्सतः प्रत्यगात्मविषयजिज्ञासोः केनेषितमित्यात्मस्वरूपतत्त्वविज्ञानायायमध्याय आरभ्यते। तेन च मृत्युपदमज्ञानमुच्छेत्तव्यं तत्तन्त्रो हि संसारो यतः। अनधिगतत्वादात्मनो युक्ता तदधिगमाय तद्विषया जिज्ञासा। कर्मविषये चानुक्तिः। तद्विरोधित्वात्। अस्य विजिज्ञासितव्यस्याऽऽत्मतत्त्वस्य कर्मविषयेऽवचनम्। कस्मादिति चेदात्मनो हि यथावद्विज्ञानं कर्मणा विरुध्यते। निरतिशयब्रह्मस्वरूपो ह्यात्माविजिज्ञापयिषितः। "तदेव ब्रह्म त्वं विद्धि नेदं यदिदम्" इत्यादिश्रुतेः। नहि स्वाराज्येऽभिषिक्तो ब्रह्मत्वं गमितः कंचन नमितुमिच्छत्यतो ब्रह्मास्मीति संबुद्धो न कर्म कारयितुं शक्यते। न ह्यात्मानमवाप्तार्थं ब्रह्म मन्यमानः प्रवृत्तिं प्रयोजनवतीं पश्यति। न च निष्प्रयोजना प्रवृत्तिरतो विरुध्यत एव कर्मणा ज्ञानम्। अतः कर्मविषयेऽनुक्तिर्विज्ञानविशेषविषयैव जिज्ञासा। कर्मानारम्भ इति चेन्न। निष्कामस्य संस्कारार्थत्वात्। यदि ह्यात्मविज्ञानेनाऽऽत्माविद्याविषयत्वात्परितित्याजयिषितं कर्म ततः "प्रक्षालनाद्धि पङ्कस्य दूरादस्पर्शनं वरम्" इत्यनारम्भ एव कर्मणः श्रेयानल्पफलत्वादायासबहुलत्वात्तत्त्वज्ञानादेव च श्रेयःप्राप्तेरिति चेत्सत्यम्। एतदविद्याविषयं कर्माल्पफलत्वादिदोषवद्बन्धरूपं च सकामस्य। "कामान्यः कामयते" "इति नु कामयमानः"

---

* मंत्रांचे अन्वयार्थ मागें दिलेच आहेत. केवल भाष्य व त्याचा अर्थ इतका मात्र विषय येथें घेतला आहे.

इत्यादिश्रुतिभ्यः । न निष्कामस्य । तस्य तु संस्कारार्थान्येव कर्माणि भवन्ति तन्निर्वर्तकाश्रयप्राणविज्ञानसहितानि । "देवयाजी श्रेयानात्मयाजी वा" इत्युपक्रम्याऽऽत्मयाजी तु करोति "इदं मेऽनेनाङ्गं संस्क्रियते" इति संस्कारार्थमेव कर्माणीति वाजसनेयके ।

"महायज्ञैश्च यज्ञैश्च ब्राह्मीयं क्रियते तनुः ।
यज्ञो दानं तपश्चैव पावनानि मनीषिणाम्"

इत्यादिस्मृतेश्च । प्राणादिविज्ञानं च केवलं कर्मसमुच्चितं वा सकामस्य प्राणात्मप्राप्त्यर्थमेव भवति । निष्कामस्य त्वात्मज्ञानप्रतिबन्धनिर्मार्ष्टयै भवति । आदर्शनिर्मार्जनवत् । उत्पन्नात्मविद्यस्य त्वनारम्भो निरर्थकत्वात् ।

"कर्मणा बध्यते जन्तुर्विद्यया च विमुच्यते ।
तस्मात्कर्म न कुर्वन्ति यतयः पारदर्शिनः" इति ।

"क्रियापथश्चैव पुरस्तात्संन्यासश्च तयोः संन्यास एवात्यरेचयत्" इति, "त्यागेनैके" "नान्यः पन्था विद्यते" इत्यादि श्रुतिभ्यश्च, न्यायाच्च । उपायभूतानि हि कर्माणि संस्कारद्वारेण ज्ञानस्य ज्ञानेन त्वमृतत्वप्राप्तिः, "अमृतत्वं हि विन्दते" "विद्यया विन्दतेऽमृतम्" इत्यादिश्रुतिस्मृतिभ्यश्च । नहि नद्याः पारगो नावं न मुञ्चति यथेष्टदेशगमनं प्रति स्वातन्त्र्ये सति । नहि स्वभावसिद्धं वस्तु सिषाधयिषति साधनैः स्वभावसिद्धश्चाऽऽत्मा तथा नाऽऽपिपयिषितः । आत्मत्वे सति नित्यात्वात् । नापि विचिकीर्षितः, आत्मत्वे सति नित्यत्वादविकारित्वादविषयत्वादमूर्तत्वाच्च । श्रुतेश्च "न वर्धते कर्मणा" इत्यादि । स्मृतेश्च "अविकार्योऽयमुच्यते" इति । नच संचिकीर्षितः । "शुद्धमपापविद्धम्" इत्यादिश्रुतिभ्यः । अनन्यत्वाच्च । अन्येनान्यत्संस्क्रियते । नचाऽऽत्मनोऽन्यभूता क्रियाऽस्ति, न च स्वेनैवाऽऽत्मना स्वमात्मानं संचिकीर्षेत् । न च वस्त्वन्तराधानं नित्यप्राप्तिर्वा वस्त्वन्तरस्य नित्या । नित्यत्वं चेष्टं मोक्षस्य । अत उत्पन्नविद्यस्य कर्मारम्भोऽनुपपन्नः । अतो व्यावृत्तबाह्यबुद्धेरात्मविज्ञानाय केनेषितमित्याद्यारम्भः । प्रवृत्तिलिङ्गाद्विशेषार्थः प्रश्न उपपन्नः । रथादीनां हि चेतनावदधिष्ठितानां प्रवृत्तिर्दृष्टा नानधिष्ठितानाम् । मनआदीनां चाचेतनानां प्रवृत्तिर्दृश्यते । तद्धि लिङ्गं चेतनावतोऽधिष्ठातुरस्तित्वे । करणानि हि मनआदीनि

नियमेन प्रवर्तन्ते । तन्नासति चेतनावत्यधिष्ठातर्युपपद्यते । तद्विशेषस्य चानधिगमाच्चेतनावत्सामान्ये चाधिगते विशेषार्थः प्रश्न उपपद्यते । केनेषितं केनेष्टं कस्येच्छामात्रेण मनः पतति गच्छति स्वविषये नियमेन व्याप्रियत इत्यर्थः । मनुतेऽनेनेति विज्ञाननिमित्तमन्तःकरणं मनः प्रेषितमिवेत्युपमार्थः । न त्विषितप्रेषितशब्दयोरर्थावित्र संभवतः । न हि शिष्यानिव मनआदीनि विषयेभ्यः प्रेषयत्यात्मा विविक्तनित्यचित्स्वरूपतया तु निमित्तमात्रं प्रवृत्तौ नित्यचिकित्साधिष्ठातृवत् । प्राण इति नासिकाभवः । प्रकरणात् । प्रथमत्वं चलनक्रियायाः प्राणनिमित्तत्वात्स्वतो विषयावभासमात्रं करणानां प्रवृत्तिः । चलिक्रिया तु प्राणस्यैव मनआदिषु तस्मात्प्राथम्यं प्राणस्य प्रैति गच्छति युक्तः प्रयुक्त इत्येतत् । वाचो वदनं किंनिमित्तं प्राणिनां चक्षुःश्रोत्रयोश्च को देवः प्रयोक्ता । करणानामधिष्ठाता चेतनावान्यः स किंविशेषण इत्यर्थः ॥ १ ॥

सिद्धान्ती—कर्माचें आश्रयस्थान-शुद्ध प्राणाची उपासना, तसेंच, नित्य नैमित्तिकादि अनेक प्रकारचें श्रुतिविहित कर्म हीं समाप्त झालीं. कर्म आणि उपासना यांचे समुच्चयानें अनुष्ठान न करितां केवळ कर्माचें अनुष्ठान केलें तर दक्षिण-मार्गानें पितृ लोकास जाऊन, पुनः या कर्म-लोकावर जन्म घेण्यास परत यावें लागतें आणि यांचें समुच्चयानें अनुष्ठान केलें तर देव-मार्गानें जातां येऊन कल्पाच्या शेवटपर्यंत तरी पुनः जन्म घ्यावा लागत नाही. ही सकाम कर्माची कथा झाली. कर्म-कांडानें संसारच उत्पन्न व्हावयाचा हें ठरलें; पण याच्या पलीकडे जाऊन फल-निरपेक्ष कर्माचा व निष्काम उपासनेचा समुच्चय जर केला म्हणजे श्रुतीनें सांगितलेलें कर्म व परमेश्वराची उपासना ह्या दोहींचें अनुष्ठान व त्यांची फलें परमेश्वरार्पण करण्याच्या बुद्धीनें केलीं तर आत्म्यावर (जीवावर) एक प्रकारचा उत्तम संस्कार होतो.

शिष्य—तो कोणता संस्कार ?

सिद्धान्ती—जीव स्वतः शुद्ध होतो, आणि आत्मनाशाला प्रतिबंध करणारें मोहकृत अनेकत्व दाखवून फसविणारें व त्यांचे दोष जीवाच्या पदरांत बांधणारें जें अज्ञान आहे, त्याचा नाशही ह्या शुद्धीकरण संस्कारानें होतो. नंतर संस्कृत झालेल्या व कोणताही बाह्यविषय दुष्ट मानणाऱ्या पुरुषाला बाह्य विषय समजण्याचे राहिले नसल्यामुळें व सर्व बाह्य-ज्ञान दुष्ट असून संसारबीज उत्पन्न करणारें आहे, असा त्याचा निश्चय झाला असल्यामुळें अज्ञानाचा उच्छेद करावा आणि आत्म-स्वरूपाचें ज्ञान करून घ्यावें, या दोन इच्छांनीं प्रवृत्त होऊन साधकानें ' कोण सर्व-प्रवर्तक आहे ' या प्रश्नानें केनोपनिषदानें आरंभ केला आहे.

शिष्य—भगवन्! या उपनिषदावर आचार्यांनीं भाष्य लिहिलें आहे व तें आपणाकडून समजूनही घेतलें. मग पुनः हा त्याच उपनिषदावरील भाष्याची मीमांसा करण्याला आरंभ कशाला केला?

सिद्धान्ती—आपण वाचलें तें पदभाष्य आहे म्हणजे त्यांत पदशः भाष्य केलें आहे. प्रत्येक पदाचा विचार करून तें भाष्य लिहिलें आहे. असो; हें भाष्य करून आचार्यांचें समाधान झालें नाहीं. ब्रह्मसूत्राचे व न्यायाचे पद्धतीनें अर्थ केल्याशिवाय व अर्थाचा निर्णय करतांना श्रुतिवाक्यांचें व युक्तिबद्ध न्यायाचें साहाय्य घेतल्याशिवाय वाक्यार्थ निश्चित होत नाहीं. म्हणून या पद्धतीनें अर्थ-निश्चय करण्यासाठीं हा आरंभ आहे. हें वाक्य-भाष्य आचार्यांनीं मोठ्या हौसेनें लिहिलें आहे. असो; आत्मस्वरूपाचा तत्त्वविनिश्चय व्हावा, या उद्देशानें श्रुतीनें या उपनिषदाची योजना केलीं आहे, हें आपण मागेंच समजून घेतलें आहे.

शिष्य—आत्मज्ञानानें अज्ञानाचा नाश आणि अज्ञान-जन्य व अज्ञान-तंत्र जे जन्म-मृत्यु आणि संसार, त्यांचाही नाश होतो. हें फल आपण मला अनेक वेळ सांगितलें आहे. आणि आत्मज्ञान झालें नाहीं, तोंपर्यंत आपल्यास शुद्ध सुखाचा लाभ होणार नाहीं, हेंही मला समजलें आहे. मला स्वरूप समजावें अशी उत्कट इच्छा आहे. आणि श्रुतीनें चालविलेला हा आत्मज्ञानाचा शोध योग्य आहे, इतकेंच नव्हे, तर तो जीवोपकारकही आहे. तेव्हां हें ज्ञान समजून घेण्यासाठीं प्रथम कोणत्या कर्माला आरंभ करावयाचा, हें सांगावें.

सिद्धान्ती—अरे! कर्मविषय संपला, असें आरंभींच तुला सांगितलें ना? ज्ञान-कांडांत कर्मविधीचा गंध सुद्धां असावयाचा नाहीं. कर्म आणि ज्ञान यांच्या मध्यें अत्यंत विरोध आहे.

शिष्य—म्हणजे, आम्ही जाणून घ्यावयाचें जें आत्मतत्त्व तें कर्माविषयीं स्तब्ध असतें; कारण आत्म्याचें यथार्थ ज्ञान आणि कर्म यांचा विरोध आहे. यांचें साहचर्य असणें शक्य नाहीं. असेंच समजावयाचें कीं काय?

पूर्वपक्षी—अहो! आत्मविद्येमध्यें 'शरीरादिकांहून आत्मा निराळा आहे' असें सांगावयाचें असतें व कर्मकांडांतही आत्मा 'देहादिकांहून व्यतिरिक्त आहे' हें गृहीत केलेलें असतें. मग उभयतांमध्यें विरोध आहे, असें जें तुम्ही वरचेवर म्हणतां, याचें रहस्य काय?

सिद्धान्ती—ज्याच्याहून श्रेष्ठ असें कांहीं नाहीं, तें ब्रह्म आणि आपला आत्मा हे एकाच रूपाचे आहेत, असें ज्ञान ब्रह्मविद्या करून देते. एवंच ब्रह्मात्मैक्य ज्ञान समजावून देणारी ब्रह्मविद्या आपल्यास समजून घ्यावयाची आहे. 'तेंच ब्रह्म आहे,' असें तूं जाण. 'ज्या ह्याची उपासना करितात तें हें ब्रह्म नव्हे,' अशी श्रुति या उपनिषदांतच अवतीर्ण झाली आहे. अर्थात् येथें कर्माचा आणि

उपासनेचा निषेध केला आहे. कारण कर्मामध्यें व उपासनेमध्यें आत्मा देहादिकांहून भिन्न आहे, असें सांगितलेलें असतें. ब्रह्म व आत्मा एकच आहेत, हें तीं सांगत नाहींत; इतकेंच नव्हे, तर उभयतांमध्यें, ब्रह्म व आत्मा यांमध्यें विरोध आहे, असें समजतात. समजलें ?

शिष्य—भगवन् ! कर्मामध्यें आणि उपासनेमध्यें आत्मा (जीव) हा देहादिकांहून निराळा आहे, हें ज्ञान असतें खरें; पण हा विषय मिळावा, तें सुख असावें, असे संकल्प करून जीव कर्माला व उपासनेला प्रवृत्त होतो. त्याला आत्म-स्वरूपाचें खरें ज्ञान झालेलें नसतें. आत्म्याला (जीवाला) कांहींतरी बाह्य विषयात्मक सुख मिळवावयाचें असतें, असेंही म्हणतात.

सिद्धान्ती—बरोबर आहे. पण, शुद्ध आत्म्याला कांहीं बाहेरून मिळवावयाचें नसतें. आत्मा ब्रह्मरूप आहे, असा ब्रह्मविद्येनें निश्चय होतो. हें ज्ञान झाल्यावर आत्म्याला स्वाराज्याचा अभिषेक होतो. सारांश, स्वतंत्र, सुखरूप, आणि ज्ञानरूप असणारा आत्मा कोणालाही नमस्कार करण्याची, दुसऱ्या कोणाच्या तंत्रानें चालण्याची, इच्छा करीत नाहीं. ' मी ब्रह्म आहें ' असें ज्ञान झालेला पुरुष कर्म करित नाहीं व करवीतही नाहीं. कृतार्थ म्हणजे ब्रह्मस्वरूप आत्म्यानें कर्म करणें किंवा करविणें शक्यच नाहीं. सर्व पुरुषार्थांचाही आत्मा असणारें–जें ब्रह्म तेंच आपण आहोंत, असा निश्चय झालेला पुरुष कर्माचे ठिकाणीं प्रवृत्त कशाला होईल ? कांहींतरी अर्थ साधावयाचा असला म्हणजे कर्म करण्याची प्रवृत्ति होते. ब्रह्मज्ञान्याचे सर्व अर्थ पूर्ण झालेले असतात. म्हणून तो कर्म करण्याला प्रवृत्त होत नाहीं.

पूर्वपक्षी—कर्म करण्याला हेतु नसला म्हणून काय झालें ? समुद्राच्या लाटा नेहमीं इकडून तिकडे लोटांगणें घेत असतात, पृथ्वी नित्य फिरत असते, यांत त्यांचा काय हेतु आहे ? मला तर कांहीं दिसत नाहीं. कर्म करणें हा पदार्थांचा स्वभाव आहे. मग तेथें हेतु असो वा नसो.

सिद्धान्ती—हे तुमचें म्हणणें कांहीं अंशीं खरें आहे; तथापि समुद्रांच्या लाटांचे आंदोलनांनीं समुद्रांतील जल-संचय शुद्ध राहतो व पृथ्वीच्या फिरण्यानें सृष्टीचीं अनेक कार्यें होतात, असें स्पष्ट दिसतें. असो; पण आमचा कर्म या शब्दाचा अर्थ ' व्यवहारी पुरुषाचें कर्म ' असा आहे. व्यवहारांत हेतूशिवाय कर्म होतेंसें दिसत नाहीं; म्हणून व्यावहारिक कर्म परमार्थी आत्म-ज्ञानाच्या विरुद्ध असतें. असो; या उपनिषदांत कर्माविषयीं चर्चा नाहीं, व त्याचें तात्पर्य आम्ही म्हणतों असेंच आहे. येथें समजून घ्यावयाचें आहे, तें केवल आत्म-स्वरूपाचें ज्ञान होय.

पूर्वपक्षी—' ज्याला संकल्प नाहीं, अशा प्रकारचें नित्य-कर्म केलें पाहिजे ' असेंही श्रुति सांगते ना ?

सिद्धान्ती—होय सांगते हें खरें; पण तें कर्म केवल संस्कारासाठीं म्हणजे चित्त निर्मल करण्यासाठीं मात्र असतें; पण हें आत्म विज्ञान उत्पन्न होण्यापूर्वीचें कर्म असतें.

पूर्वपक्षी—तुमच्याच सरणीनें आत्मविज्ञान होणाऱ्या पुरुषानें, कृतार्थ होणाऱ्या पुरुषानें, कर्मांचा त्याग करण्याची इच्छा केली, तर त्यांत वावगें काय आहे ? 'चिखलांत जाऊन हात भरावे आणि मग ते धुवून टाकावे, यापेक्षां चिखलांत न जाणें हा प्रकार काय ! वाईट ?' यावरून पुरुषानें निष्काम अथवा सकाम कर्म करणें योग्यच नाहीं. कारण कर्मांचें फल अतिशय थोडें आहे, कर्म करण्याला फार आयास लागतात आणि केवल-ज्ञान संपादन केलें म्हणजे आयासव्यतिरिक्त अतिश्रेष्ठ फलाची प्राप्ति होते. म्हणून कोणत्याही प्रकारचें कर्म पुरुषानें करूं नये. असें तुम्ही म्हणावें.

सिद्धान्ती—तुम्ही म्हणतां, हें खरें आहे; पण हें अविद्येनें प्रवृत्त केलेल्या कर्मांविषयींचें वर्णन आहे. सकाम कर्मांचें फल अल्प, अनित्य, आणि बंध करणारें असतें 'जो इच्छेची पूर्ति व्हावी अशी वासना धरितो' इत्यादि श्रुति सांगतात कीं, 'सकाम कर्म बद्धक आहे.' पण 'निष्काम कर्म बद्धक आहे,' असें श्रुति सांगतच नाहीं. हें निष्काम कर्म व ही निष्काम प्राणादिकांची उपासना संस्कार उत्पन्न करण्यांत म्हणजे चित्त शोधण्यांत समर्पित होतात. 'देवाची उपासना करणारा श्रेष्ठ आहे व आत्मोपासना करणाराही श्रेष्ठ आहे' असा आरंभ करून 'हीं माझीं अंगें (इंद्रियादि सर्व) हें कर्म, संस्कृत करित आहे' असें ज्ञान करून घेऊन आत्म-यज्ञ करणारा पुरुष निष्काम कर्मच करित असतो. वाजसनेय उपनिषद् पहा. तसेंच, 'यज्ञ आणि महा-यज्ञ तनूंत म्हणजे शरीरांत राहणाऱ्या आत्म्याला ब्रह्मरूप म्हणजे शुद्ध करितात' 'यज्ञ, दान व तप, हीं ज्ञात्याचें चित्त शुद्ध करणारीं आहेत,' इत्यादि स्मृति हेंच सांगतात.

शिष्य—नुसती प्राणादिकांची उपासना केली, किंवा यज्ञादिकर्मांच्या सह प्राणोपासना सकाम पुरुषानें केली तर फल काय मिळतें ?

सिद्धान्ती—प्राणोपासकाला प्राणात्मा मात्र मिळतो. पण हीच उपासना निष्काम वृत्तीनें केली, तर आत्म-ज्ञानाच्या आड येणारे सर्वदोष नाहींसे होतात. आरसा घांसून टाकला म्हणजे स्वच्छ प्रतिबिंब दाखवितो. निष्काम कर्म व उपासना हीं अहंकार व वासना नष्ट करून आत्मा स्वच्छ दिसेल, असें करितात. असो; ज्याला ब्रह्मज्ञान प्राप्त झालें आहे, त्यानें मात्र सकाम कर्म करणें, हें निरर्थक होतें. 'जीवाला कर्म बद्ध करितें आणि विद्या मोक्ष देते.' म्हणून ब्रह्म-द्रष्टे यति कर्म करीत नाहींत. 'प्रथम कर्म-मार्ग आणि नंतर ज्ञान-मार्ग (कर्मसंन्यास मार्ग) हे दोन मार्ग आहेत. त्यांत कर्म-संन्यास हा ब्रह्मज्ञानाचा श्रेष्ठ मार्ग आहे' 'कित्येक संन्याशी त्यागानें मोक्ष मिळतो असें म्हणतात.' 'मोक्ष-

प्राप्तीला दुसरा मार्ग नाहीं' इत्यादि श्रुति हेंच सांगतात कीं, ब्रह्मज्ञाला सकाम कर्म करण्याची आवश्यकता नाहीं. न्याय ही असाच आहे. पहा कीं कर्म हें मनाला संस्कृत करण्याचें साधन आहे. चित्तशुद्धि ज्ञानोदयाला संधि देते. म्हणजे चित्तशुद्धि करणारें कर्म ज्ञानाचा एक परोक्ष उपाय आहे. पण अमृत-प्राप्ति व्हावयाची ती ज्ञानानें मात्र व्हावयाची. येथें कर्माचा साक्षात् कांहीं उपयोग नाहीं. ' ज्ञानानें अमृतत्व प्राप्त होतें,' 'विद्येनें अमृत मिळतें' इत्यादि श्रुति-स्मृति आम्ही म्हणतों, याला प्रमाण आहेत. तसेंच, नदी उतरून पलीकडे गेलेला पुरुष नांव सोडीत नाहीं असें नाहीं.' कारण नदी उतरल्यावर आपल्यास इष्ट असणाऱ्या देशाला जाण्याचें त्याला पूर्ण स्वातंत्र्य असतें. तेथें त्याला नावेची अपेक्षा असत नाहीं. पुनः, जी वस्तु स्वभावसिद्ध आहे, ती साधनांनीं साध्य करून घेण्याची कोणीही इच्छा किंवा खटपट करित नाहीं. आत्मा ही स्वभावसिद्ध वस्तु आहे. तसेंच, कोठें बाहेर जाऊन आत्मप्राप्ति करून घेण्याची इच्छा व प्रयत्न कोणी करित नाही, कारण, आत्मा स्वस्वरूप आहे. आणि आत्मस्वरूप नित्य प्राप्त झालेलेंच आहे. तसेंच, त्याला कोणी विकारही करूं शकत नाहीं, कारण तो नित्य आहे, अविकारी आहे, अविषय आहे आणि अमूर्त आहे. ' तो कर्माच्या योगानें वाढत नाहीं. ' अशी श्रुति आहे. ' तो अविकारी आहे ' असें स्मृति म्हणते. ' त्याला कोणी संस्कारूं इच्छित नाहीं, कारण तो स्वयंशुद्ध आहे, तो पापपुण्यासही अगोचर आहे.' असें श्रुति म्हणतात. शेवटीं तो एकच एक आहे म्हणजे अद्वितीय आहे.

शिष्य—खरेंच आहे; संस्कार करावयाचा असला म्हणजे एक वस्तु दुसऱ्या वस्तूला संस्कार करिते. पण येथें दुसरी वस्तुच नाहीं. तेव्हां संस्कार होणार कसा ?

पूर्वपक्षी—पण क्रियेनें तर संस्कार होईल कीं नाहीं ?

सिद्धान्ती—अहो ! क्रिया ही आत्म्याहून निराळी असेल, तर ती संस्कार करील, पण क्रियेंतही आत्मा असतोच; तेव्हां क्रियेमध्यें असणाऱ्या आत्म्याला किंवा क्रियेला आश्रय देणाऱ्या आत्म्याला तुमची क्रिया (आभासिक क्रिया) संस्कार कसा करूं शकेल ? क्रियेच्या पूर्वीच शुद्ध स्वरूपानें असणाऱ्या आत्म्याला त्याच्या मात्र आश्रयानें चालणारी क्रिया कशी शुद्ध करील ? याचप्रमाणें आत्मा आपल्या स्वतःला संस्कारूं इच्छील ह संभवत नाहीं; कारण तो शुद्धस्वरूपच आहे. शिवाय, अन्य वस्तु ही नेहमीं अन्य वस्तूला आधार असणें किंवा अन्य वस्तूची अन्य वस्तूला नित्य-प्राप्ति असणें, हें ही संभवत नाहीं. मोक्ष ही वस्तु नित्य आहे. मोक्षाशिवाय नित्यत्व असत नाहीं व नित्यत्वाशिवाय मोक्षही असत नाहीं. पण संस्कार अनित्य आहे, म्हणून नित्य मुक्त आत्म्याला संस्कारही होत नाहीं. याप्रमाणें स्वभावसिद्ध, नित्य-प्राप्त, निर्विकार आणि असंस्कार्य अशा आत्म्याला (ब्रह्माला) व ब्रह्मज्ञानाला कर्माच्या आरंभाची मुळींच अपेक्षा

नसते. म्हणून ज्याची बुद्धि बाह्य–विषयांपासून निवृत्त झाली आहे, असा शुद्धचित्त साधक (मुमुक्षु) आत्मज्ञानासाठीं आचार्याला (गुरूला) शरण जाऊन विचारतो. असो; या उपनिषदाचें हें असें अवतरण आहे.

शिष्य—भगवन्! येथें पहिल्या प्रथमच 'आत्मा ही वस्तु काय आहे' हें न विचारितां 'मनाची प्रवृत्ति कशानें होते? मनाला कोण प्रवृत्त करितो,' इत्यादि प्रश्न कां बरें विचारले?

सिद्धान्ती–आपल्यास प्रवृत्ति दिसत आहे म्हणून! पुनः; येथें विशेष अर्थाचें प्रतिपादन करावयाचें आहे. व तें सर्वांस समजेल अशा प्रश्नोत्तर रूपानें करावयाचें आहे. येथें 'आत्मा आहे' हें ज्ञान आहे, असें गृहीत धरून त्याचें विशेष स्वरूप ठरवावयाचें आहे. म्हणून 'आत्मस्वरूप अमुक अमुक आहे' असें न सांगतां श्रुतीनें साधकाकडून प्रश्न विचारविला आहे व तो 'प्रवृत्ति कोठून होते?' या रूपानें विचारिला आहे. 'मनाला कोण प्रवृत्त करितो?' हा पहिला प्रश्न आहे.

पूर्वपक्षी—मन हें स्वतःच कार्याविषयीं प्रवृत्त होतें. त्याला अन्य–प्रेरक कशाला हवा आहे?

सिद्धान्ती—मन स्वतः चैतन्ययुक्त नाहीं, असें स्मृति सांगते. तें स्वतःच प्रवृत्तिसमर्थ असतें, तर त्याला अनिष्ट विषयांकडे जाण्याची प्रवृत्ति कां होती? असो; मन अचेतन आहे. रथ आदि ज्या अचेतन वस्तु आहेत, त्यांना हांकणारा सारथि व नेणारे घोडे इत्यादि मिळाल्याशिवाय त्यांची प्रवृत्ति दिसत नाहीं. रथ चालतो. केव्हां? त्यावर चैतन्य युक्त सारथि बसला असेल व चैतन्ययुक्त कोणी प्राणी सहकारिकारणें असतील, तेव्हां रथ आपला व्यापार करूं लागतो. मन हें ही रथाप्रमाणेंच अचेतन आहे, तरी त्याची प्रवृत्ति दिसते. पहा कीं 'मी हें पाहिलें नाहीं, कारण माझें मन दुसरीकडे होतें,' इत्यादि वाक्यें व अनुभव सांगतात कीं, मन हें साधन आहे, शुद्ध चैतन्य नाहीं. यावरून असें अनुमान होतें कीं, त्या अचेतन मनावर ज्ञानाचें किंवा आत्म्याचें स्वामित्व असतें व म्हणून तें प्रवृत्त होतानां दिसतें.

सारांश, मनाच्या व्यापारावरून चैतन्याचें अस्तित्व आहे असें ठरतें. पुनः, सर्व शास्त्रांस संमत असणाऱ्या सिद्धान्तांप्रमाणें अचेतन–स्वरूपी मन, इंद्रियें, इत्यादिकांचे व्यापार तर नियमानें चाललेले असतात. असे नियमबद्ध व प्रयोजनपूर्ण व्यापार, चैतन्याचें अस्तित्व असल्या खेरीज, चालावयाचे नाहींत.

पूर्वपक्षी—चैतन्य सर्व–सामान्य आहे, हें आम्ही क्षणभर कबूल करूं; पण मनाला चेतविणारें जें विशेष चैतन्य आहे तें आम्हांस प्राप्त नसल्यामुळें मनाचे व्यापार चैतन्याश्रयानें चालतात, असें आम्ही म्हणणार नाहीं.

सिद्धान्ती—ही तुमची शंका मनांत आणूनच साधकानें असा प्रश्न विचारला आहे कीं 'कोणाच्या इच्छामात्रानें मन हें आपल्या विषयांकडे नियमानें जाण्याचा व्यापार करितें ?'

शिष्य—ज्याच्या योगानें आपण विचार करितों, तें मन होय ना ?

सिद्धान्ती—होय. मन हा एक अंतःकरणाचा भाग आहे. आणि मनाच्या द्वारानें वस्तु-ज्ञान होतें. मन स्वतः जड आहे, तरी पण कोणीतरी पाठविल्यासारखें तें आपल्या विषयाकडे जातें !

पर्वपक्षी—मागें पदभाष्य करितांना, आपण 'इषित' आणि 'प्रेषित' या शब्दांचे जे विशेष अर्थ केले, त्यांचाही संभव येथें कां नसावा ?

सिद्धान्ती—नाहीं. हें संभवत नाहीं. आत्मा हा मनादिकांस विषयाकडे पाठवितो, असें नाहीं. शिष्याला काम सांगून गुरुजी जसें त्यास बाहेर पाठवितात, तसा प्रकार येथें नाहीं. आत्म्याचें स्वरूप 'स्पष्ट व नित्यज्ञान' हेंच आहे. तो स्पष्टत्वानें आणि नित्यत्वानें ज्ञानरूप मात्र आहे. येथें इच्छेचा किंवा क्रियेचा संभव नाहीं.' असो; मनादिकांची जी प्रवृत्ति होते, तिला हा आत्मा निमित्त कारण आहे. नित्य चिकित्सा करणारा चकोर* सन्निध असला म्हणजे तो राजाच्या भोजनादि प्रवृत्तीचें निमित्त असतो, त्याप्रमाणें आत्मसान्निध्यानें मनादिकांची प्रवृत्ति होते. सारांश, आत्मसान्निध्य हें मनःप्रवृत्तीचें कारण आहे. असो;

शिष्य—येथें प्राण म्हणजे आपल्यास जें जीवित असतें, तें ना ?

सिद्धान्ती—नाहीं. नाकामध्यें ज्याचें अस्तित्व सिद्ध असतें, तो प्राणवायु येथें इष्ट आहे, कारण प्रकरण मनादि इंद्रियांच्या संबंधाचें आहे. इंद्रियांचा विचार चालला आहे, जीवाचा नाहीं. समजलें ? प्राणालाच प्रथम घेतलें, त्याचें कारण सर्व चलन-क्रियांचें निमित्त प्राण हा आहे. कारण विषयांचें ज्ञान करून द्यावें, इतकीच ज्ञानेंद्रियांची प्रवृत्ति असते. पण विषयांचें ग्रहण करणें, किंवा त्यांचा त्याग करणें, ह्याचें निमित्त प्राण हाच आहे. सर्व इंद्रियांच्या क्रिया ह्याच्या निमित्तानें चालतात. म्हणून प्राणाला प्राथम्य दिलें आहे. असो; याचप्रमाणें वाणीला कोण प्रेरित करितो ? प्राण्यांच्या चक्षुःश्रोत्रांना (नेत्रकर्णांना) कोण प्रवृत्त करितो ? कोणता देव या इंद्रियांकडून व प्राणाकडून आपापले व्यापार करवितो ? या इंद्रियांचा अधिष्ठाता जो कोणी चेतनावान् आहे, त्याचें स्वरूप काय ? त्याचे

---

* चकोर जवळ असला म्हणजे अन्नादि भोज्य पदार्थ शुद्ध व निर्विष असतात, असा समज वेदकालापासून आहे. चकोरानें गडबड केली नाहीं म्हणजे अन्नादि सेवन करण्यास हरकत नसते.

गुणधर्म कोणते ? हें सर्व समजून घ्यावें, असा साधकाचा अभिप्राय आहे. सारांश, अंतःकरणांचा, बाह्यकरणांचा व ज्ञान-कर्मेंद्रियांचा, प्रवर्तक कोण आहे ? ' हें समजून घ्यावयाचें आहे ॥ १ ॥

मंत्र दुसरा.

श्रोत्रस्य श्रोत्रमित्यादिप्रतिवचनं निर्विशेषस्य निमित्तत्वार्थम् । विक्रियादिविशेषरहितस्याऽऽत्मनो मनआदिप्रवृत्तौ निमित्तत्वमित्येतच्छ्रोत्रस्य श्रोत्रमित्यादिप्रतिवचनस्यार्थः । अनुगमात्तदनुगतानि ह्यत्रास्मिन्नर्थेऽक्षराणि । कथं शृणोत्यनेनेति श्रोत्रं तस्य शब्दावभासकत्वं श्रोत्रत्वम् । शब्दोपलब्धृरूपतयाऽवभासकत्वं न स्वतः श्रोत्रस्याचिद्रूपत्वात् । आत्मनश्च चिद्रूपत्वात् । यच्छ्रोत्रस्योपलब्धृत्वेनावभासकत्वं तदात्मनिमित्तत्वाच्छ्रोत्रस्य श्रोत्रमित्युच्यते । यथा क्षत्रस्य क्षत्रं यथा वोदकस्यौष्ण्यमग्निनिमित्तमिति दग्धुरप्युदकस्य दग्धाऽग्निरुच्यते । उदकमपि ह्यग्निसंयोगादग्निरुच्यते । तद्वदनित्यं यत्संयोगादुपलब्धृत्वं तत्करणं श्रोत्रादि । उदकस्येव दग्धृत्वमनित्यं हि तत्र तत् । यत्र तु नित्यमुपलब्धृत्वमग्नाविवौष्ण्यं स नित्योपलब्धिस्वरूपत्वाद्दग्धेवोपलब्धोच्यते । श्रोत्रादिषु श्रोतृत्वाद्युपलब्धिरनित्या नित्या चाऽऽत्मन्यतः श्रोत्रस्य श्रोत्रमित्याद्यक्षराणामर्थानुगमादुपपद्यते निर्विशेषस्योपलब्धिस्वरूपस्याऽऽत्मनो मनआदिप्रवृत्तिनिमित्तत्वमिति । मनआदिष्वेवं यथोक्तम् । वाचो ह वाचं प्राणस्य प्राण इति विभक्तिद्वयं सर्वत्रैव द्रष्टव्यम् । कथं, पृष्टत्वात्स्वरूपनिर्देशः प्रथमयैव च निर्देशः । तस्य च ज्ञेयत्वात्कर्मत्वमिति द्वितीया । अतो वाचो ह वाचं प्राणस्य प्राण इत्यस्मात्सर्वत्रैव विभक्तिद्वयम् । यदेतच्छ्रोत्राद्युपलब्धिनिमित्तं श्रोत्रस्य श्रोत्रमित्यादिलक्षणं नित्योपलब्धिस्वरूपं निर्विशेषमात्मतत्त्वं बु (तद्बु) द्ध्वाऽतिमुच्यानवबोधनिमित्ताध्यारोपिताद् बुद्ध्यादिलक्षणात्संसारान्मोक्षणं कृत्वा धीरा धीमन्तः प्रेत्यास्माल्लोकाच्छरीरात्प्रेत्य वियुज्यान्यस्मिन्नप्रतिसंधीयमाने निर्निमित्तत्वादमृता भवन्ति । सति ह्यज्ञाने कर्माणि शरीरान्तरं प्रतिसंदधत आत्मावबोधे तु सर्वकर्मारम्भनिमित्ताज्ञानविपरीतविद्याग्निविप्लुष्टत्वात्कर्मणामित्यनारम्भेऽमृता एव भवन्ति । शरीरादिसंतानाविच्छेदप्रतिसंधानाद्यपेक्षयाऽध्या-

रोपितमृत्युवियोगात्पूर्वमप्यमृताः सन्तो नित्यात्मस्वरूपत्वादमृता भवन्तीत्युपचर्यते ॥ २ ॥

पूर्वपक्षी—ह्या प्रश्नाला गुरुजींनीं काय उत्तर दिलें आहे बरें ? साधकाला आचार्यांनीं काय सांगितलें ?

शिष्य—प्रेरक वस्तु (कर्णाचा कर्ण, मनाचें मन, वाचेची वाचा असणारी वस्तु) इंद्रियादिकांस स्वव्यापार करण्याविषयींची प्रेरणा करिते, असें उत्तर दिलें आहे.

पूर्वपक्षी—हें काय उत्तर ? याच्यापासून अर्थबोध तो काय होणार ? कानाला कान नसतात किंवा डोळ्यास डोळे नसतात. शिवाय, कानाला कान असला तरी त्या कानाचा प्रेरक कोण, त्याचें विशेष स्वरूप काय, हें आम्हांस कोठें कळलें आहे ?

सिद्धान्ती—' कर्णाचा कर्ण ' असें येथें जें उत्तर दिलें आहे, त्याचें रहस्य असें आहे कीं, आपल्याला निर्विशेष स्वरूपाची कांहीं तरी कल्पना करितां यावी. निर्विशेषाच्या सन्निधिमात्रानें कर्ण-नेत्रादि इंद्रियें व मनोबुद्धिरूप अंतःकरण हीं सर्व प्रवृत्त होतात. ज्याला कोणत्याही प्रकारची विक्रिया नाहीं, असा आत्मा मनादिकांच्या ठिकाणीं प्रवृत्ति उत्पन्न करण्याचें निमित्त मात्र आहे, असें 'श्रोत्राचें श्रोत्र व मनाचें मन' हें उत्तर देऊन सुचविलें आहे.

पूर्वपक्षी—पण येथें निर्विशेषत्व दाखविणारें एकही पद किंवा एकही अक्षर नसतांना आपण निर्विशेष आत्मा इंद्रियादिकांस प्रवृत्त करितो, असा अर्थ कोठून काढला ?

सिद्धान्ती—श्रुतिही केवल उपलक्षणानें व अनुमान पद्धतीनें उत्तर देत आहे. श्रुतीमध्यें जीं अक्षरें आहेत त्यांच्या सरणीवरूनच आम्हीं म्हणतों हा अर्थ बरोबर आहे.

पूर्वपक्षी—कशावरून ?

सिद्धान्ती—ज्याच्या योगानें आपण श्रवण करितों ते श्रोत्र होय. या श्रोत्राला शब्दप्रकाशन करण्याचें सामर्थ्य असतें म्हणून श्रोत्राला श्रोतृत्व येतें. पण श्रोत्र जड आहे, तेव्हां शब्द उपलब्ध करण्याचें सामर्थ्य ज्या आत्म्यास मात्र आहे, त्याच्या कृपाप्रसादानें श्रोत्राला शब्द प्रकाशित करण्याचें बल प्राप्त होतें. हें बल श्रोत्राचें स्वतःचें नव्हे. कारण श्रोत्र हें अचिद्रूप आहे, जड आहे. म्हणून त्याला शब्द प्रकाशित करण्याचा धर्म असणें शक्य नाहीं. पण आत्मा चिद्रूपी आहे. तेव्हां ह्या आत्मचैतन्याच्या निमित्तानें मात्र जड श्रोत्रास शब्द प्रकाशित करण्याचें सामर्थ्य येतें. सारांश, श्रोत्राला शब्द ग्रहण करतां येऊन तो प्रकाशित करण्याचें जें सामर्थ्य असतें, तें ब्रह्मनिमित्तानें मात्र होतें, म्हणून ब्रह्माला किंवा आत्म्याला

श्रोत्राचें श्रोत्र असें म्हटलें. ज्याप्रमाणें प्रजेचें रक्षण करणें हा राजाचा स्वतःसिद्ध धर्म आहे, तसा ज्ञानरूप आत्म्याचा धर्म वस्तुस्वरूप स्पष्ट करण्याचा आहे. तसेंच, उदकामध्यें असलेली उष्णता अग्निनिमित्तक असते, अग्नीपासून प्राप्त झालेली असते, म्हणून त्या उदकालासुद्धां आपण 'दहन करणारा अग्नि' असें नांव देतों, अग्निसंसर्गानें उदकालाही आपण अग्नि असें म्हणतों; पण उदकाचा दाहकधर्म हा अग्नीपासून आलेला म्हणून अनित्य असतो, अग्निसंसर्ग आहे तोंपर्यंत टिकणारा असतो; तद्वत्, आत्म्याच्या संयोगानें कर्णास शब्द प्रकट करण्याचें सामर्थ्य प्राप्त होतें. म्हणून श्रोत्रादि साधन असतें आणि जोंपर्यंत आत्मसंयोग आहे, तोंपर्यंतच श्रोत्रादिकांस शब्दादि विषय प्राप्त करून घेऊन ते प्रकाशित करण्याचें सामर्थ्य असतें. आत्मसंयोगानें मात्र हा धर्म प्राप्त होतो, म्हणून तो अनित्य असतो, पण अग्नीचा नित्य धर्म उष्णता व दाहकशक्ति हा आहे, तसेंच आत्मस्वरूपाचा सर्वप्रकाशकत्व हा धर्म आहे; म्हणून त्याला नित्य ज्ञानरूप आणि नित्यप्रकाशक म्हणतात. अचेतन कर्णादिकांची प्रकाशनशक्ति अनित्य आहे, आत्म्याची नित्य आहे. म्हणून शब्दादिकांचें ग्रहण करणारीं जीं इंद्रियें त्यांस स्वस्वव्यापाराचें सामर्थ्य देणाऱ्या आत्म्याला श्रोत्रादिकांचें श्रोत्रादि म्हटलें, तें योग्यच आहे. या मंत्रांतील शब्दांपासून आपल्यास असा अर्थबोध झाला कीं, असें स्पष्ट अनुमान काढितां आलें कीं, ज्ञानैकरूप जो निर्विशेष आत्मा आहे, तोच मनादिकांच्या प्रवृत्तीचें निमित्त-कारण मात्र आहे. याचप्रमाणें पुढीलही अर्थ समजावा—

सारांश, कोणतेंही इंद्रिय स्वतंत्रतेनें प्रकाशक नाहीं. आत्मा काय तो परमार्थत्वानें स्वप्रकाश व सर्व-प्रकाशक आहे, म्हणून तो निर्विशेष व एकरसात्मक आहे, हें ठरलें.

पूर्वपक्षी—येथपर्यंत तुम्हीं जें जें म्हटलेंत तें तें आम्ही ग्रहण केलें, तरी तुमचा अर्थ बरोबर नाहीं. असें या वाक्यांतील जो शब्द-रचना आहे, तिच्या वरून स्पष्ट दिसतें. पहा कीं 'प्राणाचा प्राण' असें मंत्रांत म्हटलें आहे, त्याप्रमाणें वाचेची वाचा असें न म्हणतां 'वाचेच्या वाचेला' अशी शब्द-योजना केली आहे. एक ठिकाणीं प्रथमा विभक्ति आहे व दुसरे ठिकाणीं द्वितीया आहे, तेव्हां तुम्हीं म्हणतां हा अर्थ नसावा.

सिद्धान्ती—येथें असलेला श्रुतीचा गूढ अभिप्राय तुम्हांस समजला नाहीं, असें दिसतें. श्रुतीला येथें हें इष्ट आहे कीं, 'प्राणाचा प्राण आणि प्राणाच्या प्राणाला' वाचेची वाचा आणि वाचेच्या वाचेला' असे सर्वत्र प्रथमा आणि द्वितीया विभक्तींचे दोन्ही अर्थ प्रकट करावे.

पूर्वपक्षी—कशावरून ?

सिद्धान्ती—साधकानें 'प्रेरक कोण आहे ?' असें विचारलें आहे, तेव्हां त्या प्रश्नाचें उत्तर प्रथमेंतच दिलें पाहिजे. नेहमीं स्वरूप-निर्देश प्रथमः

विभक्तीनें होतो. म्हणून मंत्रांत दिसत असलेली प्रथमा योग्यच आहे. आतां विचारलेल्या प्रश्नाच्या उत्तरानें जें जाणावयाचें आहे, तें जाणण्याचें कर्म आहे व द्वितीयेचा मात्र अर्थ कर्मपर असतो. म्हणून 'वाचं' हें जें द्वितीयान्त पद आढळतें तें बरोबर आहे, इतकेंच नव्हे, तर श्रोत्राचें श्रोत्र, मनाचें मन, प्राणाचा प्राण, हीं ही पदें द्वितीयान्त मानणें हें योग्य आहे. तात्पर्य, येथें प्रथमा-विभक्ति व द्वितीया विभक्ति ह्या दोन्ही योग्यच आहेत. असो; याप्रमाणें श्रोत्रादिकांनां विषयाची उपलब्धि करून देणारें जें निमित्त-कारण, श्रोत्रादिकांचें श्रोत्रादि असणें हें ज्याचें लक्षण आहे, पण ज्याचें नित्य ज्ञानस्वरूप आहे आणि जें निर्विशेष आहे, तें प्रवृत्तिनिमित्त, ज्ञानरूप, निर्विशेष आत्मतत्त्व उत्तम प्रकारें जाणून घेतो तो ब्रह्मज्ञ पुरुष होय. बाबांनों! अज्ञानाचे निमित्तामुळें बुद्ध्यादि-लक्षणात्मक संसाराचा आत्म्यावर आरोप येतो, त्या अज्ञानाचा त्याग ब्रह्मज्ञ पुरुष करितात, संसारांतून मुक्त होऊन ते शहाणे पुरुष या अनित्य शरीराचा संगच टाकून देतात. आणि अर्थातच दुसऱ्या कोणत्याही विषयामध्यें शिरण्याचें निमित्तच नसतें म्हणून ते निर्विषय म्हणजे मुक्त होतात.—

शिष्य—बरोबरच आहे कीं अज्ञान असेल तर जीवाच्या हातून कर्में होतील आणि फलयोगासाठीं त्यांस दुसऱ्या शरीरांत प्रवेश करावा लागेल. पण ज्यांना आत्मबोध झाला आहे, ज्यांनीं कर्माला आरंभ करण्याचें निमित्त असणारें जें अज्ञान व तज्जन्य कर्म त्याला तद्विलक्षण ब्रह्मविद्याग्नीनें जाळून टाकिलें आहे, त्यांच्या हातून कर्म होत नाहीं आणि ते मुक्त होतात.

सिद्धान्ती—शाबास! कर्म नाहीं म्हणून शरीर नाहीं आणि अज्ञान नाहीं म्हणून कर्मही नाहीं.

सारांश, अज्ञान नाहींसें झालें म्हणजे कर्म नाहींसें होतें व मोक्ष मिळतो.

पूर्वपक्षी—अनादिकालापासून असणाऱ्या संसार-परंपरेमुळें जो जीव शरीरी होता तो जीव एकदम शरीर-विमुक्त कसा होईल?

सिद्धान्ती—ऐका, 'मी पुढें शरीरी होईन' अशी ज्ञानी पुरुषाची भावना नष्ट झाल्यामुळें, त्या पुढील शरीरांस उत्पन्न करणारीं पुण्य-पापादि कर्में (पुण्य कर्म करण्याचे किंवा अज्ञानांत जाऊन पडण्याचे अधिकार मला आहेत;) मृत्यु, भय, रोग, चिंता, इत्यादि मला आहेत, इत्यादि सर्व अध्यास अथवा अज्ञानजन्य आभास व तन्मूलक कर्में नाहींशींच होतात. सर्व जीव, स्वरूपानें अमरच आहेत. कारण ते आत्मस्वरूप आहेत आणि आत्मा हा अक्षर आणि अविनाशी आहे. असो; ज्ञानी पुरुष मुक्त होतात याचा अर्थ, त्यांनां मुक्ति हा नवीन पदार्थ मिळतो असें नव्हे, ते स्वरूपतः मुक्तच असतात; परंतु त्यांच्यावर अज्ञानाचें जें एक कृष्णमेघपटल आलें असतें व ज्याच्या योगानें 'आपण बद्ध

आहों ' असें त्यांस वाटत असतें, तें नाहींसें होतें. स्वरूपतः सर्वच जीव मुक्त आहेत, अमक्यास मुक्ति मिळाली हें म्हणणें केवळ औपचारिक आहे. सारांश, अज्ञानाचा नाश होणें ही मुक्ति होय. ॥ २ ॥

मंत्र तिसरा.

न तत्र चक्षुर्गच्छतीत्युक्तेऽपि पर्यनुयोगे हेतुरप्रतिपत्तेः । श्रोत्रस्य श्रोत्रमित्येवमादिनोक्तेऽप्यात्मतत्त्वेऽप्रतिपन्नत्वात्सूक्ष्मत्वहेतोर्वस्तुनः पुनः पुनः पर्यनुयुयुक्षाकारणमाह–न तत्र चक्षुर्गच्छतीति । तत्र श्रोत्राद्यात्मभूते चक्षुरादीनि वाक्चक्षुषोः सर्वेन्द्रियोपलक्षणार्थत्वान्न विज्ञानमुत्पादयन्ति । सुखादिवत्तर्हि गृह्येतान्तःकरणेनात आह–नो मनः । न सुखादिवन्मनसो विषयस्तत् । इन्द्रियाविषयत्वात् । न विद्मो न विजानीमोऽन्तःकरणेन यथैतद्ब्रह्म मनआदिकरणजातमनुशिष्याद्नुशासनं कुर्यात्प्रवृत्तिनिमित्तं भवेत्तथाऽविषयत्वान्न विद्मो न विजानीमः । अथवा श्रोत्रादीनां श्रोत्रादिलक्षणं ब्रह्म विशेषेण दर्शयेत्युक्त आचार्य आह न शक्यते दर्शयितुं कस्मान्न तत्र चक्षुर्गच्छतीत्यादि पूर्ववत्सर्वमत्र तु विशेषो यथैतदनुशिष्यादिति । यथैतदनुशिष्यात्प्रतिपादयेत् । अन्योऽपि शिष्यानितोऽन्येन विधिनेत्यभिप्रायः । सर्वथाऽपि ब्रह्म बोधयेत्युक्त आचार्य आह, अन्यदेव तद्विदितादथो अविदितादधीत्यागमम् । विदिताविदिताभ्यामन्यत्वम् । यो हि ज्ञाता स एव सः । सर्वात्मकत्वात् । अतः सर्वात्मनो ज्ञातुर्ज्ञात्रन्तराभावाद्विदितादन्यत्वम् । " स वेत्ति वेद्यं न च तस्यास्ति वेत्ता " इति च मन्त्रवर्णात् । " विज्ञातारमरे केन विजानीयात् " इति च वाजसनेयके । अपि च व्यक्तमेव विदितं तस्मादन्यदित्यभिप्रायः । यद्विदितं व्यक्तं तदन्यविषयत्वादल्पं सविरोधं ततोऽनित्यमत एवानेकत्वादशुद्धमत एव तद्विलक्षणं ब्रह्मेति सिद्धम् । अस्तु तर्ह्यविदितम् । न विज्ञानानपेक्षत्वात् । यद्धयविदितं तद्विज्ञानापेक्षमविदितविज्ञानाय हि लोकप्रवृत्तिः । इदं तु विज्ञानानपेक्षं कस्माद्विज्ञानस्वरूपत्वात् । न हि यस्य यत्स्वरूपं तत्तेनान्यतोऽपेक्ष्यते । न च स्वत एवापेक्षा । अनपेक्षमेव सिद्धत्वात् । प्रदीपः स्वरूपाभिव्यक्तौ न प्रकाशान्तरमन्यतोऽपेक्षते स्वतो वा यद्धयनपेक्षं तत्स्वत एव सिद्धं प्रकाशात्मकत्वात्प्रदीपस्यापेक्षितोऽप्यनर्थकः स्यात् । प्रकाशे विशेषाभावात् । नहि

प्रदीपस्य स्वरूपाभिव्यक्तौ प्रदीपप्रकाशोऽर्थवान्। न चैवमात्मनोऽन्यत्र विज्ञानमस्ति येन स्वरूपविज्ञानेऽप्यपेक्ष्यते। विरोध इति चेन्नान्यत्वात्। स्वरूपविज्ञाने विज्ञानस्वरूपत्वाद्विज्ञानान्तरं नापेक्षत इत्येतदसत्। दृश्यते हि विपरीतज्ञानमात्मनि सम्यग्ज्ञानं च न जानाम्यात्मानमिति श्रुतेश्च "तत्त्वमसि" "आत्मानमेवावेत्" "एतं वै तमात्मानं विदित्वा" इति च। सर्वत्र श्रुतिष्वात्मविज्ञाने विज्ञानान्तरापेक्षत्वं दृश्यते तस्मात्प्रत्यक्षश्रुतिविरोध इति चेन्न। कस्मात्। अन्यो हि स आत्मा बुद्ध्यादिकार्यकरणसंघाताभिमानसंतानाविच्छेदलक्षणोऽविवेकात्मको बुद्ध्यवभासप्रधानश्चक्षुरादिकरणो नित्यचित्स्वरूपात्मान्तःसारो यत्रानित्यं विज्ञानमवभासते। बौद्धप्रत्ययानामाविर्भावतिरोभावधर्मकत्वात्तद्धर्मतयैव विलक्षणमपि चावभासते। अन्तःकरणस्य मनसोऽपि मनोऽन्तर्गतत्वात्सर्वान्तरश्रुतेः। अन्तर्गतेन नित्यविज्ञानस्वरूपेणाऽऽकाशवदप्रचलितात्मनाऽन्तर्गर्भभूतेन बाह्यो बुद्ध्यात्मा तद्विलक्षणोऽर्चिर्भिरिवाग्निः प्रत्ययैराविर्भावतिरोभावधर्मकैर्विज्ञानाभासरूपैरनित्यैरनित्यविज्ञान आत्मा सुखी दुःखीत्यभ्युपगतो लौकिकैरतोऽन्यो नित्यविज्ञानस्वरूपादात्मनः। तत्र हि विज्ञानापेक्षा विपरीतज्ञानत्वं चोपपद्यते न पुर्नानित्यविज्ञाने। तत्त्वमसीति बोधोपदेशो नोपपद्यत इति चेत्। आत्मानमेवावेदित्येवमादीनि च नित्यबोधात्मकत्वात्। न ह्यादित्योऽन्येन प्रकाश्यतेऽतस्तदर्थबोधोपदेशोऽनर्थक इति चेन्न। लोकाध्यारोपापोहार्थत्वात्। सर्वात्मनि हि नित्यविज्ञाने बुद्ध्याद्यनित्यधर्मा लोकैरध्यारोपिता आत्माविवेकतस्तदपोहार्थो बोधोपदेशो बोधात्मनः। तत्र च बोधाबोधौ समञ्जसौ। अन्यनिमित्तत्वादुदक इवौष्ण्यमग्निनिमित्तम्। राज्यहनी इवाऽऽदित्यनिमित्ते लोके नित्यावौष्ण्यप्रकाशावग्न्यादित्ययोरन्यत्र भावाभावयोर्निमित्तत्वादविवोपचर्येते। धक्ष्यत्यग्निः प्रकाशयिष्यति सवितेति तद्वत्। एवं च सुखदुःखबन्धमोक्षाद्यध्यारोपो लोकस्य तदपेक्ष्य तत्त्वमस्यात्मानमेवावेदित्यात्मावबोधोपदेशेन श्रुतयः केवलमध्यारोपापोहार्थाः। यथा सविताऽसौ प्रकाशयत्यात्मानमिति तद्वत्। बोधाबोधकर्तृत्वं च नित्यबोधात्मनि। तस्मादन्यदविदितात्। अधिशब्दश्चान्यार्थे। यद्वा यद्धि यस्याधि तत्ततोऽन्यत्सामर्थ्याद्यथाऽधिभृत्यादीनां राजा। अव्यक्तमेवाविदितं ततोऽन्यदित्यर्थः। विदितमविदितं च व्यक्ताव्यक्ते कार्यकारणत्वेन विकल्पिते

ताभ्यामन्यद्ब्रह्म विज्ञानस्वरूपं सर्वविशेषप्रत्यस्तमितमित्ययं समुदायार्थः । अत एवाऽऽत्मत्वान्न हेय उपादेयो वा । अन्यद्धयन्येन हेयमुपादेयं वा । न तेनैव तद्यस्य कस्यचिद्धेयमुपादेयं वा भवति । आत्मा च ब्रह्म सर्वान्तरात्मत्वादविषयमतोऽन्यस्यापि न हेयमुपादेयं वा अन्याभावाच्च । इति शुश्रुम पूर्वेषामित्यागमोपदेशः । व्याचचक्षिरे इत्यस्वातन्त्र्यं तर्कप्रतिषेधार्थम् । ये नस्तद्ब्रह्मोक्तवन्तस्ते नित्यमेवाऽऽगमं ब्रह्मप्रतिपादकं व्याख्यातवन्तो न पुनः स्वबुद्धिप्रभवेन तर्केणोक्तवन्त इत्यागमपारम्पर्याविच्छेदं दर्शयति विद्यास्तुतये । तर्कस्त्वनवस्थितो भ्रान्तोऽपि भवतीति ॥३॥

शिष्य—भगवन्! मागें इतकें विस्तृत ब्रह्म–वर्णन झालें असतांही या तिसऱ्या मंत्रांत पुनः आणखी तेंच चर्वित–चर्वण कां केलें आहे? दुसऱ्या मंत्रांत सर्व इंद्रियांचें इंद्रिय किंवा प्रकाशक असणारें तें आत्म–तत्त्व होय, असें सांगितलें असतांही पुनः हा तिसरा मंत्र कशाला?

सिद्धान्ती—या प्रश्नाला तिसऱ्या मंत्रामध्यें जें उत्तर दिलें आहे, त्याचा भाव इतकाच आहे कीं, अद्यापपर्यंत साधकाची समजूत नीटशी पडली नाहीं, साधकाचा निश्चय झाला नाहीं. बाबा! ध्यानांत ठेव कीं, आत्मवस्तु अति सूक्ष्म आहे, समजण्यास अतिशय कठीण आहे; आणि म्हणून पुनः पुनः साधकानें प्रश्न विचारले आणि आचार्यांनीं निरनिराळ्या मार्गानें त्याचें समाधान केलें. या मंत्रांतील विषय असा आहे कीं, श्रोत्रादिकांचा प्रवर्तकच आत्मा असल्यामुळें श्रोत्रादिकांपैकीं कोणतेंही इंद्रिय ब्रह्मज्ञान उत्पन्न करूं शकत नाहीं. ब्रह्मापर्यंत जाण्याचें सामर्थ्य कोणासच असत नाहीं. या मंत्रांत नेत्र आणि वाणी हीं दोन इंद्रियें बाकीच्या सर्व अंतर्बाह्य इंद्रियांचा बोध करितात. सारांश, बाह्य विषय पाहणारीं इंद्रियें ब्रह्मज्ञान उत्पन्न करीत नाहींत असें प्रथम सांगितलें आणि—

शिष्य—भगवन्! पण, याप्रमाणें अंतःकरणालाही ब्रह्मविषय ग्रहण करण्याचें सामर्थ्य नाहीं असें कसें म्हणतां येईल? सुखादि वस्तु इंद्रियांस समजत नाहींत; तथापि अंतःकरणाला त्या विषय होऊं शकतात. तसाच हा आत्मविषयही अंतःकरणास कां समजूं नये?

सिद्धान्ती—कारण, सुखाप्रमाणें ब्रह्म हा मनाचा विषय नाहीं. मनाला ज्ञान होतें तें इंद्रियद्वारा होतें. इंद्रियांस हा ब्रह्मविषय अगम्य आहे, म्हणून मनालाही तो अगम्यच असला पाहिजे. शिवाय; मनाच्याच आत्म्याचें ज्ञान मनाला तरी कसें होणार? म्हणून अंतःकरणाला ब्रह्मस्वरूप कळत नाहीं. ज्याच्या सामर्थ्यानें मनादि सर्व इंद्रियगण स्वस्वविषयाचेठायीं प्रवृत्त होतो, ज्याची सर्व इंद्रियांवर सत्ता आहे, त्याब्रह्माचें स्वरूप काय आणि तें इंद्रियांमध्यें प्रवृत्ति कशी उत्पन्न

करितें हें आम्हांस समजत नाहीं. कारण तो मनादिकांचा विषयच नव्हे, त्यांना तो समजावयाचाच नाहीं, असें आचार्य म्हणतात.

शिष्य—किंवा या मंत्रावरून मला वाटतें असाही एक बोध उत्पन्न होईल कीं 'ब्रह्म हें इंद्रियादिकांचें इंद्रिय आहे, तर तें ब्रह्म मला विशेष-स्वरूपानें दाखवा' असें साधकानें आचार्यांस विचारलें. तेव्हां त्यांनीं सांगितलें कीं 'ब्रह्मापर्यंत नेत्र जात नाहींत, वाणी जात नाहीं, मन जात नाहीं.' तसेंच, हा विषय साधकाला कसा समजून द्यावा, हेंही आचार्यांस कळेना. शिष्याची समजूत पडून त्याचें मन साक्षात् श्रवणानें निःसंदेह होईल, असा समजून देण्याचा मार्ग कोणता ? आपण उपलक्षण मात्र करून ब्रह्मविषय समजून सांगण्याचा प्रयत्न करीत आहों, त्याशिवाय दुसरा मार्ग आहे वा नाहीं ? किंवा दुसरा कांहीं विधि आहे वा नाहीं ? हेंच आचार्यांस समजेना.

सिद्धान्ती—हा तुझा अर्थ चांगला आहे. क्रिया-गुणशून्य असणाऱ्या (निष्क्रिय व निर्गुण असणाऱ्या) ब्रह्माचें विशेष स्वरूप समजणें शक्यच नाहीं. आपण समजून घ्यावयाचें तें इतकेंच कीं, साधकानें आचार्यांची प्रार्थना करून त्यांस विचारलें कीं, 'सामान्य स्वरूपात्मक ब्रह्मज्ञान तरी मला करून द्या,' तेव्हां निरुपाय होऊन व समजून देणें अशक्य असें समजून, आचार्यांनीं एक परंपरेनें प्राप्त झालेला मंत्र सांगितला. सारांश, संप्रदायांत पूर्वीपासून जसा उपदेश करित आले, तसाच उपदेश येथेंही केला. कारण ज्याला क्रिया नाहीं, गुण नाहीं, अशा निर्विशेष वस्तूचें कथन करण्यास आगमाशिवाय दुसरा मार्गच नाहीं. असो; आगमोक्त मंत्राचा अर्थ हा आहे कीं ब्रह्मवस्तु ज्ञाताज्ञाताहून निराळी आहे, इतकेच काय तें सांगतां येतें. याशिवाय ब्रह्मासंबंधानें दुसरें कांहीं म्हणतां येणें शक्य नाहीं. ही वस्तु कळण्यासारखी नाहीं व न कळण्यासारखीही नाहीं. एवढेंच कायतें फार तर सांगणें शक्य आहे. 'कारण, ब्रह्मवस्तु सर्वांचा आत्मा आहे म्हणून ज्याला जाणावयाचें असतें, तो जाणणाराच ही आत्मवस्तु असतो. म्हणून सर्वांचा आत्मा असणाऱ्या ज्ञात्याला दुसऱ्या कोणत्या ज्ञात्यानें जाणून घेतां येईल ? कोणत्याही नाहीं.' 'त्याला सर्व समजतें; पण त्याला जाणणारा कोणीही नाहीं.' 'अहो ! सर्व जाणणाऱ्याला दुसरा कोण जाणणार ?' या अनुक्रमें श्वेताश्वतर व बृहदारण्यक श्रुति आम्ही म्हणतों याला प्रमाणच आहेत.

शिष्य—आतां, विदित म्हणजे 'समजते अशी वस्तु' 'समजलेली वस्तु' व्यक्त असते.—हिच्याहून आत्मवस्तु निराळी आहे. कारण जें जें म्हणून व्यक्त आहे, तें अल्प, विरोधात्मक म्हणून अनित्य, अनित्य म्हणून अनेक, अनेक म्हणून अशुद्ध असतें, असे व्यक्त या शब्दापासून बोध होतात. सारांश, व्यक्त हें अल्प, अनित्य, अनेकरसात्मक, अशुद्ध, इत्यादि गुणविशिष्ट असतें.

सिद्धान्ती—आणि म्हणूनच व्यक्ताहून निराळा असणारा आत्मा अल्प नाहीं, विरोधात्मक नाहीं, अनित्य नाहीं, अनेक नाहीं, व अशुद्धही नाहीं, असें ठरतें.

पूर्वपक्षी—जर ही तुमची वस्तु ज्ञात वस्तूहून निराळी आहे, तर ती अविदित असली पाहिजे, अज्ञात असली पाहिजे. कोणतीही वस्तु ज्ञात किंवा अज्ञात असावयाची. ब्रह्म वस्तु ज्ञात नाहीं, हें तुम्हीं ठरविलें. तेव्हां ती अज्ञातच असली पाहिजे !

सिद्धान्ती—नाहीं; कारण ब्रह्मवस्तूमध्यें विज्ञानाची अपेक्षा असत नाहीं.

पूर्वपक्षी—म्हणजे काय ?

सिद्धान्ती—म्हणजे असें: जी वस्तू अज्ञात असते ती ज्ञात करून घेण्यासाठीं ज्ञानाची आवश्यकता असते. ज्योतिष्टोमयज्ञ आपल्यास विदित नसेल तर तो समजून घ्यावयाची आवश्यकता उत्पन्न होते, ही गोष्ट लोक-प्रसिद्ध आहे. पण ब्रह्मवस्तूचे ठिकाणीं मात्र ज्ञानाची अपेक्षा नाहीं.

पर्वपक्षी—कशावरून ?

सिद्धान्ती—कारण, स्वतःच तें ज्ञानस्वरूप आहे. पदार्थाचें जें स्वरूप असतें, तें समजून घेण्याला त्या पदार्थाला दुसऱ्याच्या ज्ञान-प्रयत्नाची अपेक्षा असत नाहीं. उंसाची गोडी उंसाला समजण्यासाठीं उंसानें दुसऱ्या कोणाचीही प्रार्थना करणें नलगे. याचप्रमाणें, स्वतःला स्वतःचें स्वरूप स्वतःच सांगावें अशी अपेक्षा नसते. कारण तें स्वरूप स्वतः सिद्ध असतें.

शिष्य—खरेंच. प्रदीपाला आपलें प्रकाशस्वरूप व्यक्त करून घेण्यासाठीं दुसऱ्या प्रकाशाची किंवा आपल्या स्वतःच्या प्रकाशाची अपेक्षा नसते, हें मला सुद्धां ठाऊक आहे. ज्याची सिद्धि होण्यासाठीं दुसऱ्याची अपेक्षा नसते, तें स्वतः सिद्ध असतें.

सिद्धान्ती—कारण, दीप हा स्वतः प्रकाशमान असतांही दुसऱ्या प्रकाशकाची जर अपेक्षा करील, प्रकाशकालाच दुसऱ्या प्रकाशकाची आवश्यकता असेल, तर तो पहिला प्रकाशक अर्थशून्य होईल. कारण प्रकाशाप्रकाशामध्यें कोणताही भेद नसतो. जसा एक स्वच्छ प्रकाश असतो तसाच दुसराही स्वच्छ प्रकाश असतो. तसेंच, तुम्हांस हेंही समजलें पाहिजे कीं, प्रदीपाचें स्वरूप प्रकट करण्यासाठीं त्याच्या स्वतःचा सुद्धां प्रकाश उपयोगी पडत नाहीं. एवंच दिव्याचें स्वरूप कळण्यासाठीं दुसऱ्याच्या किंवा स्वतःच्या प्रकाशाची अपेक्षा दिव्याला नसते. याच न्यायानें आत्म्याचें ज्ञान करून देणारें असें दुसरें कोणतेंही ज्ञान नाहीं, किंवा त्याला दुसऱ्या कोणत्याही ज्ञानाची अपेक्षा नाहीं, कीं जें दुसऱ्याचें अथवा स्वतःचें ज्ञान आत्म्याचें स्वरूप प्रकाशित करील.

पूर्वपक्षी—हें तर तुम्ही विरोधात्मक बोलतां. कारण ज्या गोष्टीचें आपल्यास ज्ञान नाहीं, ती गोष्ट समजून घेण्याविषयीं प्रयत्न होत असतो, हा सर्व लोकांचा अनुभव आहे. तसेंच, शास्त्राचीही प्रवृत्ति अज्ञात गोष्टी ज्ञात करण्यासाठीं असते. म्हणून ज्या ज्या म्हणून अज्ञात गोष्टी असतात, त्या ज्ञात करून घेण्याविषयीं ज्ञानाची आवश्यकता नित्य आहे; आणि तुम्ही अज्ञात वस्तूसंबंधानें 'ज्ञानाची अपेक्षा नाहीं,' असें म्हणतां, हा व्यवहारदृष्टीनें व शास्त्रदृष्टीनें विरोध आहे ?

सिद्धान्ती—नाहीं, कारण तुम्ही म्हणतां यांत अन्य वस्तू आहे, असें गृहीत केलेलें आहे.

पूर्वपक्षी—ज्ञान-स्वरूपी वस्तूचें स्वरूपज्ञान करून घेण्याला दुसऱ्या ज्ञानाची अपेक्षा नाहीं, असें जें तुम्ही म्हणत आहांत, तें असत्य आहे. आत्मस्वरूपाचे संबंधानें विपरीत ज्ञान असतें व यथार्थ ज्ञान असतें, असें स्पष्ट दिसतें. 'मी आपण स्वतः आपलें आत्मरूप जाणत नाहीं.' अशी श्रुति आहे व 'तें तूं आहेस' 'आत्मज्ञान करून घ्यावें' 'या आत्म्याचें स्वरूप समजून घेतलें' इत्यादि श्रुति असें स्पष्ट सांगतात कीं आत्मज्ञानाला अन्य-ज्ञानाची अपेक्षा आहे. हें शास्त्र-दृष्टीनें बोलणें झालें. पुनः अनुभवही असाच आहे कीं, जी गोष्ट आपल्यास ठाऊक नसते ती आपण अन्य ज्ञानानें समजून घेतों.

सिद्धान्ती—तुम्ही बोलतां हें म्हणणें बरोबर नाहीं.

पूर्वपक्षी—कशावरून ?

सिद्धान्ती—ऐका, तुम्ही पारमार्थिक आत्म्याचा व आभासिक आत्म्याचा (जीवाचा) घोंटाळा करित आहांत. आभासिक आत्मा म्हणजे जीव. हा मनोबुद्ध्यादि कार्य-करण-संघाताचा अभिमानी असतो; म्हणजे जीवाला स्थूल शरीराचा व लिंग शरीराचा अभिमान असतो. हा अभिमान जीवाच्या अनादि व अखंड अज्ञानानें प्राप्त झालेला असतो. म्हणून जीव पूर्ण अज्ञानी असतो. याला जें ज्ञान होतें तें बुद्धि ज्या विषयाचें प्रकाशन करील, त्या विषयाचें मात्र असतें. पुनः, बुद्धि मुद्धां नेत्रकर्णादिकांच्या द्वारानें ज्ञान करून घेत असते. म्हणजे इंद्रियांच्या द्वारानें काम करणाऱ्या बुद्धीनें प्राप्त करून दिलेलें बाह्य विषयांचें ज्ञान मात्र या इंद्रियाभिमानी अज्ञानी जीवांस असतें. पण तें ज्ञानही या अज्ञानी जीवात्म्याचा आत्मा हा नित्य ज्ञानस्वरूपी असतो, म्हणून होतें. सारांश, जीवात्म्याला बाह्य विषयाचें अनित्य ज्ञान असतें व होऊं शकतें.

पूर्वपक्षी—हें ज्ञान अनित्य आहे असें तुम्ही कशावरून म्हणतां ?

सिद्धान्ती—कारण बुद्धि विषयांचें जें ज्ञान करून देते, तें केव्हां केव्हां उदय पावलेलें असतें व केव्हां अस्तंगत झालेलें असतें. याप्रमाणें उदयास्त पावणारें

मात्र अनित्य ज्ञान जीवात्म्याला असतें. काशीक्षेत्राचें ज्ञान तें क्षेत्र पाहिल्यावर अथवा त्याचें वर्णन ऐकल्यावर होतें. हेंच ज्ञान कांहीं कालानें नष्ट होतें. असाच सर्व बाह्यज्ञानाच्या उदयास्तांचा प्रकार आहे. पण, परमात्मा जो आहे, तो अंतःकरणाच्या अथवा मनोबुद्धींच्या आंत प्रवेश करून त्यांचें नियमन करणारा आहे. हा अंतर्गत आत्मा नित्य ज्ञानस्वरूपाचा आहे, हा आकाशाप्रमाणें स्थिर असतो, हा सर्वांचा अंतर्यामी आहे. म्हणून हा परमात्मा जीवात्म्याहून,—मनोबुद्ध्यादि इंद्रियांच्या द्वारानें बाह्य विषयांचें ज्ञान करून घेणाऱ्या व बुद्ध्यादि इंद्रियें आपणच आहों, असें म्हणून त्यांस कवटाळणाऱ्या बाह्य व आभासिक आत्म्याहून,—निराळा आहे. दोघांमध्यें विलक्षण वैलक्षण्य आहे. अग्नि ज्याप्रमाणें ज्वालांनीं कमीजास्त होतोसा दिसतो, त्याप्रमाणें उदयास्त पावणाऱ्या अनित्य ज्ञान-विज्ञानांनीं व ज्ञानाचा आभास मात्र असणाऱ्या विकारांनीं सिद्ध झालेल्या जीवात्म्याचें ज्ञान—विज्ञान अनित्य असतें व तो आपल्यास 'मी सुखी किंवा दुःखी आहें' असें समजतो.—सारांश, जीवात्म्याचें स्वरूप असें आहेः—तो अनित्यज्ञानात्मक आहे व सुखी दुःखी असणारा आहे. यालाच लोकामध्यें 'आत्मा' असें समजतात, हें शुद्ध अज्ञान आहे. हा जीवात्मा परमात्म्याहून निराळा आहे. कारण परमात्म्याचें स्वरूप नित्य ज्ञानात्मक व नित्य आनंदात्मक आहे. असो; तेव्हां या मायोपाधिक आत्म्याचे ठिकाणी ज्ञानाची अपेक्षा किंवा विपरीत ज्ञान होणें शक्य आहे. सारांश, आत्मस्वरूपाच्या आड पडदा येऊन, देहादिकांवरच आत्मबुद्धि उत्पन्न झाली असते. असा हा 'जीवात्मा' अज्ञात गोष्टी ज्ञात करून घेण्याविषयी प्रयत्न करितो, किंवा त्याला पुष्कळ वेळ विपरीत ज्ञान होतें. पण जो नित्य ज्ञानस्वरूप आहे, त्या आत्म्याचे ठिकाणी ज्ञानाची अपेक्षा असणें आणि विपरीत ज्ञान होणें शक्य नाहीं.

पूर्व०—जो ज्ञानस्वरूप आहे त्याला 'तें तूं आहेस' असा बोध तरी श्रुति कां करिते ? पण बोध करिते यावरून ज्ञानरूप आत्म्याला बोधाची आवश्यकता आहे, असें या श्रुतिवाक्यावरून कळतें. तसेंच आत्मस्वरूपाचें ज्ञान झालें इत्यादि श्रुतिवाक्येंही, तुम्ही म्हणतां हें खरें असेल तर, व्यर्थ होतात. पण श्रुतिवाक्यें व्यर्थ असणें शक्य नाहीं. तेव्हां तुमचा अर्थ चुकला आहे, आत्मा नित्यबोधरूप नाहीं, असें तात्पर्य आहे, सूर्याला दुसऱ्या प्रकाशकाची आवश्यकता नाहीं. तेव्हां त्याला 'तूं दुसऱ्या प्रकाशकापासून प्रकाश घे' असा जर उपदेश केला तर तो व्यर्थच होईल.

सिद्धान्ती—तुम्ही अद्यापि श्रुतीचें तात्पर्य काय आहे, हें समजला नाहीं, असें दिसतें. व्यवहारामध्यें आत्म्यावर अहंकार, बुद्धि, मन, इंद्रियें, शरीर, विषय इत्यादिकांचा जो मिथ्या आरोप होत असतो, त्याचें निरसन करण्या-

करितां श्रुतीचा उपदेश आहे. हें सर्व-प्रसिद्ध आहे कीं सर्वात्मा व ज्ञानरूप आत्मा याच्यावर 'मला हें समजलें' 'मी उंच आहें' 'मला हें दिसतें' 'मला या विषयापासून सुख होतें.' इत्यादि अनित्य धर्मांचे आरोप व्यवहारामध्यें नित्य होत असतात. त्याचें कारण आत्मस्वरूपाचें पूर्णज्ञान नसतें हें होय. या मिथ्याज्ञानाचा नाश करावा, एतदर्थ 'तें तूं आहेस' इत्यादि उपदेश ज्ञानी आत्म्यालाही करावा लागतो.

पूर्वपक्षी—पण ज्ञानी आत्म्याला उपदेश कशाला? त्याचें सार्थक काय? अज्ञान्याला आपण बोध करितों आणि ज्याला बोध करितों, तो अज्ञानाचा आश्रय असतो; पण हाच ज्ञानरूप आत्मा जर अज्ञानात्मक झाला तर त्याचें अज्ञान कधींही नष्ट व्हावयाचें नाहीं.

सिद्धान्ती—आत्मा बोधरूप आहे; हें तुम्हांस समजलें हें ठीक झालें. आतां ज्ञानरूप जीवाला असा भ्रम झाला असतो कीं, आपल्याला अज्ञान प्राप्त झालें आहे, म्हणून त्याचें निरसन झालें पाहिजे. त्या निरसनासाठीं श्रुतीचा बोध आहे. जीव तर स्वरूपतः ज्ञानरूपच आहे, तेव्हां ज्ञानरूप जीवाला भ्रमनिवृत्यर्थ बोध करणें, हें समंजस आहे. तसेंच, ज्ञानरूप आत्म्याला बोध न करणें हेंही समंजसच आहे; अग्नीच्या संसर्गानें उदक उष्ण होतें किंवा सूर्याच्या प्रकाशामुळें व अप्रकाशामुळें दिवस आणि रात्र उत्पन्न होतात, हें खरें; पण उष्णता आणि प्रकाश हे अग्नि आणि सूर्य यांचे धर्म आहेत. या धर्मांचा अस्तोदय होतोसा दिसतो, तो कांहीं निमित्त-कारणांमुळे होतोसा दिसतो आणि म्हणून त्या धर्मांस केव्हां केव्हां अनित्य धर्म असें म्हटलें जातें, बाकी अग्नीचा धर्म दहन करणें हा आहे व सूर्याचा धर्म स्वप्रकाश असून प्रकाश देणें हा आहे. हें जसें आहे; तसेंच आत्मा हा स्वरूपतः ज्ञानरूप आहे, तरी कांहीं अन्य-निमित्त-कारणांनीं त्याच्यावर अज्ञानत्वाचा आरोप येतो. हें अज्ञान किंवा हा अज्ञानाचा भ्रम अनित्य असतो. याप्रमाणें या आत्म्यावर अज्ञानानें 'तो सुखी आहे' 'तो दुःखी आहे' 'तो बद्ध होतो, व तो मुक्त होतो' इत्यादि आरोप व्यवहारामध्यें नेहमीं होत असतात. हें अज्ञान मनांत आणून श्रुति माऊली भ्रमपूर्ण जीवांस बोध करिते कीं 'तूं आत्मरूप आहेस.' 'याला आत्मस्वरूप समजलें' इत्यादि उपदेश केवल भ्रमाच्या निरसनासाठीं असतात.

शिष्य—आपण नाहींका नेहमीं म्हणत कीं, स्वयंप्रकाश आणि सर्वप्रकाशक सूर्य तिमिराचा नाश करून आपल्या स्वतःलाही प्रकट करितो! तसेंच ज्ञानरूप आत्माही अज्ञानाचा नाश करून स्वतः प्रकट होतो, हें म्हणणेंही योग्य आहे असें समजलें पाहिजे.

सिद्धान्ती—तात्पर्य, मायोपाधिक आत्म्याला ज्ञानरूप आत्मा स्वरूपाचा बोध करितो, पण ज्ञानरूप आत्म्याला या बोधाची आवश्यकता असत नाहीं.

या विवेचनावरून तुम्हांस समजलें असेल कीं, आत्मा हा अज्ञात वस्तूहून निराळा आहे.

शिष्य--येथें 'अधि' शब्दाचा अर्थ अन्य म्हणजे निराळा असा करावयाचा काय ?

सिद्धान्ती--होय. भृत्यांचा भर्ता जो राजा हा जसा भृत्यांहून निराळा असतो, तसाच हा आत्मा अविदित वस्तूहून निराळा असतो. तात्पर्य, आत्मा हा अव्यक्त वस्तूहून निराळा असतो. ज्याचें स्वरूप बरोबर समजलें नाहीं, त्याला अव्यक्त असें म्हणावें. व्यक्त म्हणजे ज्ञात आणि अव्यक्त म्हणजे अज्ञात. व्यक्ताव्यक्त गोष्टी कार्यकारणात्मक असतात. या कार्यकारणात्मक वस्तूहून ब्रह्म निराळें आहे, हें ज्ञानरूप आहे आणि ह्या रूपांत सर्व विशेषांचा म्हणजे गुणधर्मांचा अस्त होतो. सारांश, ब्रह्म हें कार्यकारण-शून्य आहे, तें एक रस आहे आणि तें सर्वांचा आत्मा आहे. म्हणून त्याच्या स्वरूपांतून कांहीं टाकून देण्यासारखें नाहीं, किंवा याच्या स्वरूपांत कांहीं नवीन घालण्यासारखें नाहीं. तो हेयोपादेय नाहीं. दोन वस्तू असतील तेव्हां एकीनें दुसरीस टाकावें किंवा दुसरीनें पहिलीस घ्यावें असा प्रकार होईल. पण एकच नित्य वस्तू असली म्हणजे ती टाकण्याचे किंवा घेण्याचे संस्कार उत्पन्न होणें शक्य नाहीं. याच न्यायानें सर्वांचा आत्मा असल्याकारणानें ब्रह्म हें दुसऱ्याचा घेण्यादेण्याचा विषयच होत नाहीं.

शिष्य—दुसरा पदार्थ आहे कोठें कीं, जो आत्मवस्तू घेईल किंवा टाकील ? जर एकच आत्मवस्तु आहे, तर ती आपल्या स्वतःस टाकील कशी व टाकील कोठें आणि घेईल काय व घेईल कोठून ?

सिद्धान्ती--असाच उपदेश पूर्वीच्या वेदज्ञ लोकांनीं केला आहे. हा उपदेश आम्ही ऐकला, असें आचार्य साधकाला ह्या मंत्रानें सांगत आहेत.

शिष्य—श्रुतीचा हा उपदेश आहे आणि यांचेंच व्याख्यान आम्ही ऐकिलें, असें या मंत्रांत आचार्य कां म्हणतात बरें?

सिद्धान्ती—आपल्या मानवी तर्क-कुतर्काचा प्रतिषेध करावा म्हणून ब्रह्मवस्तूविषयीं तर्क किंवा अनुमान करण्याचें आम्हां जीवांस सामर्थ्य नाहीं, आपण विचार करावयाचा तो श्रुति-मार्गानेंच केला पाहिजे, हें स्पष्ट करण्यासाठीं आचार्य 'आम्ही श्रुतीचें व्याख्यान ऐकिलें' असें म्हणतात आणि वेदाची परंपरा अखंड व अविछिन्न आहे, असें दाखवितात.

पूर्वपक्षी—म्हणजे तर्काची कांहीच किंमत नाहीं कीं काय ?

सिद्धान्ती—ज्या तर्काला श्रुतीचा आधार नाहीं तो तर्क भ्रमात्मक असतो. श्रुतीला अनुकूल जो तर्क असेल, त्याचा स्वीकार करण्यास श्रुति सदैव सिद्धच आहे ॥ ३ ॥

मंत्र चवथा.

यद्वाचेति मन्त्रानुवादो दृढप्रतीतेः । अन्यदेव तद्विदितादिति योऽयमागमार्थो ब्राह्मणोक्तोऽस्यैव दृढिम्ने मन्त्रा यद्वाचेत्यादयः पठ्यन्ते । यद ब्रह्म वाचा शब्देनानभ्युदितमनभ्युक्तमप्रकाशित-मित्येतत् । येन वागभ्युद्यत इति वाक्प्रकाशहेतुत्वोक्तिः । येन प्रकाश्यत इति वाचोऽभिधानस्याभिधेयप्रकाशकत्वस्य हेतुत्वमु-च्यते ब्रह्मणः । उक्तं च-केनेषितां वाचमिमां वदन्ति यद्वाचो ह वाचमिति । तदेव ब्रह्म त्वं विद्धीत्यविषयत्वेन ब्रह्मण आत्मन्यव-स्थापनार्थ आम्नायः । यद्वाचाऽनभ्युदितं वाक्प्रकाशनिमित्तं चेति ब्रह्मणोऽविषयत्वेन वस्त्वन्तरजिघृक्षां निवर्त्य स्वात्मन्येवावस्था-पयत्याम्नायस्तदेव ब्रह्म त्वं विद्धीति यत्नत उपरमयति । नेदमित्यु-पास्यप्रतिषेधाच्च ॥ ४ ॥

सिद्धान्ती—चवथ्या मंत्रापासून आठव्या मंत्रापर्यंतचे पांचही मंत्र वर सांगित-लेल्या ब्रह्मस्वरूपाचें दृढीकरण करण्यासाठीं अवतीर्ण केले आहेत. 'ब्रह्मवस्तु ज्ञाताज्ञातवस्तुंहून निराळी आहे' हा श्रुत्यर्थ ब्रह्मज्ञपुरुषांनीं किंवा ब्राह्मणग्रंथांनीं सांगितला, त्याच्या दृढीकरणासाठीं या मंत्राचा अनुवाद आहे. चवथ्या मंत्रांत सांगितलें आहे कीं, वाणीला [शब्दाला] जें प्रकाशितां येत नाहीं, तें ब्रह्म वाणीला बोलण्याचें सामर्थ्य देतें. सारांश, बोलण्याचें व बोलण्याच्या विषयांचें प्रकाशन-कारण आत्मा मात्र आहे. हा मंत्र पहिल्या मंत्राचाच अनुवाद करून उत्तर देतो. या मंत्राचा पूर्वार्ध 'ब्रह्म हें सर्वांगोचर आहे, म्हणून तें आत्मा मात्र आहे, असें व उत्तरार्ध 'ब्रह्म सर्व अंतर्बाह्य ज्ञानाचा अविषय आहे, हें सांगण्यासाठीं आहे. वाणीचें प्रकाशन-कारण, पण वाणीचा सर्वथा अविषय असणारें ब्रह्म-रूप आहे. दुसरी वस्तू असण्याचा संभव नाहीं. हें स्पष्ट सांगण्यासाठीं श्रुति म्हणते कीं, सर्वांचा अविषय असणारी वस्तुच ब्रह्म आहे. दुसरी वस्तु नाहीं व कदाचित् कोणास भासली तरी ती ब्रह्म नाहीं, असें एक-कंठानें सांगण्याचा श्रुतीचा अभिप्राय आहे. ज्या ब्रह्माची उपासना करितात, तें ब्रह्म नव्हे; तर—

शिष्य—म्हणजे मूर्त किंवा अमूर्त वस्तूंची लोक उपासना करितात. त्या 'ब्रह्म' वस्तू ना ?

सिद्धान्ती—होय, त्या वस्तू उपास्य नाहींत. एक ब्रह्मवस्तु उपास्य आहे, असें श्रुतीला सांगावयाचें आहे. ॥ ४ ॥

मंत्र पांचवा.

यन्मनसेत्यादि समानम् । मनो मतमिति । येन ब्रह्मणा मनोऽपि विषयीकृतं नित्यविज्ञानस्वरूपेणेत्येतत् । सर्वकरणानामविषयं तानि च सव्यापाराणि सविषयाणि नित्यविज्ञानस्वरूपावभासतया येनावभास्यन्त इति श्लोकार्थः । " क्षेत्रं क्षेत्री तथा कृत्स्नं प्रकाशयति " इति स्मृतेः । " तस्य भासा " इति चाऽऽथर्वणे । येन प्राण इति । क्रियाशक्तिरप्यात्मविज्ञाननिमित्तेत्येतत् ॥ ५ ॥ ६ ॥ ७ ॥ ८ ॥

इति प्रथमः खण्डः ॥ १ ॥

सिद्धान्ती—पांचव्याही मंत्राचें वरच्या प्रमाणेंच व्याख्यान करावयाचें. नित्य ज्ञानरूप जें ब्रह्म मनालाही विषय करितें, तसेंच इंद्रियांनाही विषय करितें, तें ब्रह्म मनाचा व इंद्रियांचा अविषय असून तीं इंद्रियें व तें मन आपापले विषयांचें ग्रहण करून जे व्यापार करितात, ते व्यापार व ते विषय त्यांना ज्ञान-स्वरूप ब्रह्म प्रकाशित करित असतें. इंद्रियांचे सर्व व्यापार चालतात, ते असे होत, हा श्लोकाचा अर्थ आहे. सर्व ' क्षेत्रांस (ज्ञान-विषयांस) प्रकाशित करणारा क्षेत्री (आत्मा) मात्र आहे ' असें स्मृति म्हणते. ' याच्या प्रकाशानें मात्र ' असें श्रुति सांगते. प्राणाला क्रिया करण्याचें सामर्थ्य आहे, तें सुद्धां आत्म्याच्या ज्ञान-रूपानें आहे. सारांश, सर्व ज्ञान देणारा आणि कर्ता करविता आत्माच आहे. ॥ ५ ॥ ६ ॥ ७ ॥ ८ ॥

प्रथमः खंडः समाप्तः

पहिलें खंड संपलें.

द्वितीयः खण्डः ।

मंत्र पहिला (क्रमांक ९ वा).

यदि मन्यसे सुवेदेति शिष्यबुद्धिविचालना गृहीतंस्थिरतायै । विदिताविदिताभ्यां निवर्त्य बुद्धिं शिष्यस्य स्वात्मन्यवस्थाप्य तदेव ब्रह्म त्वं विद्धीति स्वाराज्येऽभिषिच्योपास्यप्रतिषेधेनाथास्य बुद्धिं विचालयति यदि मन्यसे सुवेदाहं ब्रह्मेति त्वं ततोऽल्पमेव ब्रह्मणो रूपं वेत्थ त्वमिति नूनं निश्चितं मन्यत इत्याचार्यः । सा पुनर्विचालना किमर्थेत्युच्यते पूर्वगृहीते वस्तुनि बुद्धेः स्थिरतायै । देवेष्वपि सुवेदाहमिति मन्यते यः सोऽप्यस्य ब्रह्मणो रूपं दहरमेव वेत्ति नूनम् । कस्मात् । अविषयत्वात्कस्यचिद् ब्रह्मणः अथवाऽल्पमेवास्याऽऽध्यात्मिकं मनुष्येषु देवेषु च । आधिदैविकमस्य ब्रह्मणो यद्रूपं तदिति संबन्धः । अथ न्विति हेतुर्मीमांसायाः । यस्माद्दहरमेव सुविदितं ब्रह्मणो रूपमन्यदेव तद्विदिताद्दित्युक्तत्वात्सुवेदेति च मन्यसेऽतोऽल्पमेव वेत्थ त्वं ब्रह्मणो रूपं यस्मादथ नु तस्मान्मीमांस्यमेवाद्यापि ते तव ब्रह्म विचार्यमेव यावद्विदिताविदितप्रतिषेधागमार्थानुभव इत्यर्थः । मन्ये विदितमिति शिष्यस्य मीमांसानन्तरोक्तिः प्रत्ययत्रयसंगतेः । सम्यग्वस्तुनिश्चयाय विचालितः शिष्य आचार्येण मीमांस्यमेव त इति चोक्त एकान्ते समाहितो भूत्वा विचार्य यथोक्तं सुपरिनिश्चितः सन्नाहाऽऽगमाचार्यात्मानुभवप्रत्ययत्रयस्यैकविषयत्वेन संगत्यर्थम् । एवं हि सुपरिनिष्ठिता विद्या सफला स्यान्नानिश्चितेति न्यायः प्रदर्शितो भवति । मन्ये विदितमिति परिनिष्ठितनिश्चितविज्ञानप्रतिज्ञाहेतूक्तेः ॥ ९ ॥ १ ॥

सारांश, याप्रमाणें सर्वज्ञान–प्रवर्तक व क्रियाप्रवर्तक ब्रह्म आहे, त्याच्या साक्षित्वानें मात्र सर्व मन–बुद्धि–इंद्रिय–प्राणादिकांचे व्यापार चालतात, तें ब्रह्म आत्मरूप आहे; पण तें ब्रह्म अथवा तो आत्मा स्वतः ज्ञानरूप असल्यामुळें ज्ञेयाज्ञेय–विलक्षण आहे, असें ठरलें.

सिद्धान्ती—या मंत्रांत साधकाच्या बुद्धीची परीक्षा आचार्यांनीं घेतली आहे. त्यानें जें ज्ञान ग्रहण केलें होतें, त्याला स्थिरता देण्यासाठीं ही परीक्षेची योजना आहे. ज्ञाताज्ञात गोष्टींपासून शिष्याच्या बुद्धीला काढून घेऊन तिला आत्मस्वरूपामध्यें ठेवावयाचें आणि तेंच ' ब्रह्म आहे ' असें निश्चयानें सांगुन साधकाला स्वाराज्याचा अभिषेक करावयाचा, हें मोठें काम पहिल्या खंडांत झालें.

त्याच वेळीं 'दृश्य विश्व हें कांहीं ब्रह्मरूप नव्हे' असेंही पटवून ज्याची उपासना करितात, तें ब्रह्म नव्हे असें सांगितलें. साधकाला सांगितलेलें हें सर्व गूढ रहस्य यथास्थित समजलें आहे कीं नाहीं, हें पाहण्यासाठीं आचार्य साधकाला म्हणतातः जर तुला असें वाटत असेल कीं, आपल्याला ब्रह्मस्वरूपाचें ज्ञान झालें, तर तुला फारच थोडें ज्ञान झालें असें समजलें पाहिजे.

शिष्य—भगवन्! ही जी आचार्यांनीं पुनः पुनः विचालना चालविली आहे, ती कशासाठीं आहे बरें?

सिद्धान्ती—असा वरचेवर ऊहापोह केला, निरनिराळ्या मार्गांनीं एका सिद्धान्ताची स्थापना केली, म्हणजे पूर्वी गृहीत केलेलें जें ज्ञान असतें, त्याचे ठिकाणीं ग्राहकाची बुद्धि स्थिर होते.

शिष्य—हा असा प्रकार सर्व ठिकाणीं करावा लागतो काय?

सिद्धान्ती—काय विचारावें! प्रत्यक्ष देवांमध्यें सुद्धां अभिमानानें असें कोणी म्हणूं लागला कीं, 'मला ब्रह्मस्वरूप यथास्थित कळलें आहे,' तरी सुद्धां असें म्हणावयास पाहिजे कीं, त्या देवालाही ब्रह्मस्वरूपाचें मुळींच ज्ञान झालें नाहीं.

पूर्वपक्षी—कशावरून?

सिद्धान्ती—कारण, ब्रह्मवस्तु ही कोणत्याही ज्ञानाचा विषय होत नाहीं. कोणतेंही ज्ञान कितीही विस्तृत झालें तरी तें ब्रह्मवस्तूला आकलन करूं शकणार नाहीं. सारांश, देवांमध्यें काय किंवा मनुष्यांमध्यें काय, ब्रह्मसंबंधीं पूर्ण ज्ञान कोणालाही व्हावयाचें नाहीं. कारण मनो बुद्ध्यादिकांनीं होणारें ज्ञान साक्षेप सोपाधिक, असतें. ब्रह्माचें आध्यात्मिक किंवा आधिदैविक स्वरूपाचें ज्ञान आहे, तें अद्यापि समजलेंच नाहीं, असें—देव मनुष्यांतील कोणीही 'मला ब्रह्मरूपाचें यथास्थित ज्ञान झालें' हें म्हणत असेल तर—म्हटलें पाहिजे. सारांश, अद्यापि तें पूर्णपणें समजलें नाहीं; असेंच निश्चित केलें पाहिजे. ज्ञाताज्ञात वस्तूहून ब्रह्मरूप निराळें आहे, असा साधकानें निश्चय केला असेल व आपल्याला तें स्वरूप यथार्थ समजलें, असें त्याला वाटूं लागलें असेल, तर आपण असें समजावें कीं, त्याला अद्यापि स्वरूपाचें ज्ञान झालें नाहीं. त्यानें अजूनही स्वरूपाची मीमांसा सुरूच ठेविली पाहिजे.

शिष्य—कोठपर्यंत ही विचारणा चालवावयाची?

सिद्धान्ती—जावत्कालपर्यंत 'ब्रह्मवस्तु, ज्ञातवस्तु-विलक्षण आहे व अज्ञातवस्तुविलक्षण आहे' हा श्रुतीचा उपदेश साक्षात्कृत झाला नाहीं, तोंपर्यंत ही विचारणा चालवीच पाहिजे. असो; मंत्रांतील शेवटचीं जीं दोन पदें आहेत, तीं असें दाखवितात कीं पूर्ण मीमांसा करून मग साधक असें म्हणूं लागला कीं मला ज्ञानविज्ञान झालें.

पक्षपक्षी--हें कशावरून म्हणतां तुम्ही ?

सिद्धान्ती—यथार्थ ज्ञानाचा निश्चय स्थिर होण्यासाठीं केलेल्या परीक्षेनें प्रोत्साहित झालेला साधक एकांतवास करिता झाला, त्यानें तेथें आपलें मन स्थिर करून विचार केला आणि श्रुतीचें सांगणें, आचार्यांचा उपदेश आणि आत्मानुभव या तीन गोष्टी एकत्र करून साधक 'मला आतां ब्रह्मस्वरूपाचें ज्ञान ठीक झालें आहे,' असें म्हणाला. अशी विचारानें, श्रद्धेनें, विवेकानें आणि अनुभवानें सिद्ध झालेली गोष्ट मात्र सफल होते म्हणजे सर्वथा ज्ञात होते. कोणत्याही वस्तूचें ज्ञान करून घ्यावयाचें असलें, तरी श्रद्धा, उपदेश, विचार, विवेक आणि आत्मानुभव या सर्व गोष्टींचें साहाय्य हवें. यांच्या साहाय्यानें बुद्धीचा निश्चय झाला म्हणजे विद्या सफल होते. जेथें बुद्धीचा निश्चय झालेला नसतो ती विद्या केव्हांही फलद्रूप होत नाहीं. साधक जेव्हां म्हणूं लागतो कीं, 'मला यथार्थ ज्ञान झालें आहे,' त्या वेळीं असें समजावें कीं, त्याला वस्तु-ज्ञान-विज्ञान निश्चित झालें आहे. मंत्रांतील शेवटचीं दोन पदें स्पष्ट सांगतात कीं, तेथें ज्ञेयवस्तूचें अवतरण आणि ज्ञेय वस्तु ज्ञात होण्याचें साधन, हीं दोन्हीं हि निश्चयानें दृश्य झालीं आहेत; येथें 'प्रतिज्ञा' व 'हेतु' हीं दोन्हीं सांगितलीं आहेत. पण याचें स्पष्टीकरण पुढील मंत्रव्याख्यानांत होईल. ॥ ९ ॥ १ ॥

मंत्र दुसरा (क्रमांक १० वा).

परिनिष्ठितं सफलं विज्ञानं प्रतिजानीत आचार्यात्मनिश्चययोस्तुल्यतायै। यस्माद्धेतुमाह—नाह *मन्ये सुवेदेति। अहेत्यवधारणार्थो निपातो नैव मन्य इत्येतत्। यावदपरिनिष्ठितं विज्ञानं तावत्सुवेद सुष्ठु वेदाहं ब्रह्मेति विपरीतो मम निश्चय आसीत्। सो (स उ) पजगाम भवद्भिर्विचालितस्य। यथोक्तार्थमीमांसाफलभूतात्स्वात्मब्रह्मत्वनिश्चयरूपात्सम्यक्प्रत्ययाद्विरुद्धत्वात्। अतो नाह मन्ये सुवेदेति। यस्माच्च तस्मैव न वेदेति मन्य इत्यनुवर्तते। अविदितब्रह्मप्रतिषेधात्। कथं तर्हि मन्यत इत्युक्त आह—वेद च। चशब्दाद्वेद च न वेद चेत्यभिप्रायः। विदिताविदिताभ्यामन्यत्वाद्ब्रह्मणस्तस्मान्मया विदितं ब्रह्मेति मन्य इति वाक्यार्थः। अथवा वेद चेति नित्यविज्ञानब्रह्मस्वरूपतया नो न वेद वेदैव चाहं स्वरूपविक्रियाभावात्। विशेषविज्ञानं च परार्ध्यस्तं न

---

* वाक्य-भाष्यामध्यें आचार्यांनीं 'नाह मन्ये' हा पाठ घेऊन भाष्य लिहिलें आहे. पद-भाष्यामध्यें 'नाहं मन्ये' असा पाठ घेतलेला आहे.

स्वत इति परमार्थतो न च वेदेति या नस्तद्वेद तद्वेदेति पक्षान्तर-निरासार्थमाम्नाय उक्तार्थानुवादात्। यो नोऽस्माकं मध्ये स एव तद्ब्रह्म वेद नान्यः। उपास्यब्रह्मवित्त्वात्। अतोऽन्यस्य यथाऽहं वेदेति वेद चेति पक्षान्तरे ब्रह्मवित्त्वं निरस्येत। कुतोऽयमर्थोऽवसीयत इत्युच्यते। उक्तानुवादादुक्तं ह्यनुवदति नोन वेदेति वेद चेति ॥ १० ॥ २ ॥

सिद्धान्ती—जें ज्ञान निश्चित व सफल झालें तें स्पष्ट दाखविण्यासाठीं व आचार्यांचा आणि साधकाचा आत्मानुभव यांची तुलना करण्यासाठीं प्रतिज्ञापूर्वक दुसऱ्या मंत्राचा अवतार आहे.

पूर्वपक्षी—कशावरून ?

सिद्धान्ती—कारण, या मंत्रांत हेतु सांगितला आहे.

शिष्य—हेतु कोणता ?

सिद्धान्ती—मला वस्तुज्ञान स्पष्ट झालें नाहीं असें निश्चयानें वाटतें, हा वस्तुनिश्चयाचा हेतु आहे. 'अह' याचा अर्थ 'निश्चय' होय.

पूर्वपक्षी—मला हें तुमचें व्याख्यान मुळींच समजत नाहीं.

सिद्धान्ती—असें काय करितां ? जोंपर्यंत 'मला ब्रह्मज्ञान चांगलें समजलें' असा साधकाचा निश्चय होता, तोंपर्यंत त्याला स्वरूपाचें निश्चित ज्ञान झालें नव्हतें; कारण ब्रह्मवस्तु ही कोणाही जीवाच्या ज्ञानाचा विषय असत नाहीं, हें आम्हीं मागेंच सांगितलें आहे. पहिल्या प्रथम साधकाला विपरीत ज्ञान झालें होतें. तेव्हां आचार्यांनीं त्याला हालवून जागा केला. नंतर श्रुतीचा भावार्थ, आचार्यांचा उपदेश आणि आत्मानुभव या सर्वांची एकवाक्यता होऊन 'आपला आत्मा ब्रह्मरूपच आहे.' असा त्याचा निश्चय झाला आणि सर्वत्र सुसंवाद (एकवाक्यता) झाला, कोठेंही विरोधाचा भाग राहिला नाहीं. तेव्हां साधकानें आपला निश्चय सांगितला कीं, ब्रह्मविषयाचें ज्ञान होणें शक्य नाहीं. तसेंच, हा साधक पुढें ही सांगतो कीं 'मला हें ज्ञान झालें नाहीं असेंही नाहीं' येथें ब्रह्म अज्ञात वस्तुच असली पाहिजे, या विचाराचा प्रतिषेध केला. एवंच साधक म्हणतो कीं, मला ब्रह्मवस्तु समजली नाहीं असें नाहीं. सारांश, त्याचा अभिप्राय असा आहे कीं जीवाच्या ज्ञानाला ब्रह्मवस्तु समजणें अशक्य आहे, पण प्रत्यगात्म्याला 'ती वस्तु आपणच आहोंत' असा साक्षात्कार होणें शक्य आहे. ती वस्तु ज्ञात-विलक्षण, व अज्ञात-विलक्षण आहे, हें ज्ञान साधकाला झालें आणि हेंच साक्षात्कृत ज्ञानविज्ञान खरें आहे, असा वाक्याचा अर्थ आहे. किंवा ब्रह्मस्वरूप नित्य ज्ञानात्मक आहे, म्हणून तें जीवाच्या ज्ञानाला समजत नाहीं; पण जीव स्वतःच

ब्रह्मरूप आहे, त्याच्या स्वरूपांत कोणताही विकार होत नाहीं, म्हणून स्वरूप-निश्चय होतो. हें शुद्ध ज्ञान साधकाला झालें होतें. सारांश तो ब्रह्मज्ञ झाला.

शिष्य—म्हणजे मला अभिप्राय असा दिसतो कीं येथें विशेष ज्ञानाचा निषेध केला आहे. सामान्य स्वरूप-ज्ञानाचा नाहीं.

सिद्धान्ती—बरोबर समजलास. 'मला समजलें' असें ज्याला ज्ञान होतें व जो तें ज्ञान सर्व लोकांमध्यें सांगत सुटतो, त्याला खरोखर ब्रह्मज्ञान झालेलें नसतें. कारण तो असें म्हणतो कीं ब्रह्म हें उपास्य आहे. त्याला, 'मला ब्रह्म समजलें' असें म्हणणाऱ्याला, निश्चित ज्ञान नसतें पण दुसऱ्याला असतें.

पूर्वपक्षी—हें कशावरून म्हणतां आपण ?

सिद्धान्ती—कारण, तो साधक श्रुतीमध्यें जें काय सांगितलें आहे त्याचाच अनुवाद करित असतो. वेदवाक्यें व मीमांसा यांच्या साहाय्यानें 'मी ब्रह्म आहें' अशी ब्रह्मात्मैक्य-वृत्ति त्याच्या (उपासकाच्या) अंतःकरणाची होते. या प्रकारें झालेलें ज्ञान विशेष विज्ञान होय. हें ज्ञान अध्यस्त असतें. पण आत्मसाक्षात्कारानें झालेलें यथार्थ ज्ञान शुद्ध असतें, म्हणून ब्रह्मज्ञ म्हणतो. 'मला समजलें नाहीं' व 'मी ब्रह्म आहें' असो; येथील अनुवाद ब्रह्मज्ञान-निश्चयार्थ आहे. ॥ १० ॥ २ ॥

मंत्र तिसरा (क्रमांक ११ वा).

यस्यामतमिति श्रौतमाख्यायिकार्थोपसंहारार्थम् । शिष्याचार्योक्तिप्रत्युक्तिलक्षणयाऽनुभवयुक्तिप्रधानयाऽऽख्यायिकया योऽर्थः सिद्धः स श्रौतेन वचनेनाऽऽगमप्रधानेन निगमनस्थानीयेन संक्षेपत उच्यते । यदुक्तं विदितादन्यद्भागादीनामगोचरत्वात् । मीमांसितं चानुभवोपपत्तिभ्यां ब्रह्म तत्तथैव ज्ञातव्यं कस्मात् । यस्यामतं यस्य विविदिषाप्रयुक्तप्रवृत्तस्य साधकस्यामतमविज्ञातमविदितं ब्रह्मेत्यात्मतत्त्वनिश्चयफलावसानावबोधतया विविदिषा निवृत्तेत्यभिप्रायः । तस्य मतं ज्ञातं तेन विदितं ब्रह्म येनाविषयत्वेनाऽऽत्मत्वेन प्रतिबुद्धमित्यर्थः । स सम्यग्दर्शी यस्य विज्ञानानन्तरमेव ब्रह्मात्मभावस्यावसितत्वात्सर्वतः कार्याभावो विपर्ययेण मिथ्याज्ञानो भवति । कथं मतं विदितं ज्ञातं मया ब्रह्मेति यस्य विज्ञानं स मिथ्यादर्शी विपरीतविज्ञानो विदितादन्यत्वाद्ब्रह्मणो न वेद स न विजानाति । ततश्च सिद्धमवैदिकस्य विज्ञानस्य मिथ्यात्वम् । अब्रह्मविषयतया निन्दितत्वात्तथा कापिलकण-

भुगादिसमयस्यापि विदितब्रह्मविषयत्वादनवस्थिततत्कजन्यत्वाद्विविदिषानिवृत्तेश्च मिथ्यात्वमिति । स्मृतेश्च—

" या वेदबाह्याः स्मृतयो याश्च काश्च कुदृष्टयः ।
सर्वास्ता निष्फलाः प्रोक्तास्तमोनिष्ठा हि ताः स्मृताः "

इति विपरीतमिथ्याज्ञानयोर्नेष्टत्वादिति । अविज्ञातं विजानतां विज्ञातमविजानतामिति पूर्वहेतूक्तिरनुवादस्याऽऽनर्थक्यात् । अनुवादमात्रेऽनर्थकं वचनमिति पूर्वोक्तयोर्यस्यामतमित्यादिना ज्ञानाज्ञानयोर्हेत्वर्थत्वेनेदमुच्यते । अविज्ञातमविदितमात्मत्वेनाविषयतया ब्रह्म विजानतां यस्मात्तस्मात्तदेव ज्ञानं यत्तेषां विज्ञातं विदितं व्यक्तमेव बुद्ध्यादिविषयं ब्रह्माविजानतां विदिताविदितव्यावृत्तमात्मभूतं नित्यविज्ञानस्वरूपमात्मस्थमविक्रेयममृतमजरमभयमनन्यत्वादविषयमित्येवमविजानताम् । बुद्ध्यादिविषयात्मतयैव नित्यं विज्ञातं ब्रह्म । तस्माद्विदिताविदितव्यक्ताव्यक्तधर्माध्यारोपेण कार्यकारणभावेन सविकल्पमयथार्थविषयत्वात् । शुक्तिकादौ रजताद्यध्यारोपणज्ञानवन्मिथ्याज्ञानं तेषाम् ॥ ११ ॥ ३ ॥

सिद्धान्ती—हा वेदमंत्र गेल्या आख्यायिकेमध्ये जो अर्थ निष्पन्न झाला आहे, त्याचा उपसंहार करण्यासाठीं आहे. आख्यायिकेतील साधक आणि आचार्य यांच्यामध्ये जो वाद–प्रतिवाद झाला, युक्ति आणि अनुभव या उभयतांच्याही साधनांनीं जो अर्थ सिद्ध झाला, तोच अर्थ वेदान्त–प्रधान श्रुति येथें संक्षेपानें सांगत आहे. परंपरेनें हाच अर्थ प्राप्त झाला आहे व युक्तीलाही तोच संमत आहे. सारांश, श्रुति–परंपरा व युक्ति यांस संमत असणारा अर्थ या मंत्रांत गोंविला आहे. प्रथम जी श्रुतीनें प्रतिज्ञा केली होती, तिचा अनुवाद ही श्रुति आतां हेतुपुरःसर करित आहे.

शिष्य—कशाला ही खटपट पुनः चालविली आहे ?

सिद्धान्ती—' ज्ञात–वस्तूहून ही वस्तु निराळी आहे, इंद्रियादिकांस ही वस्तु गोचर होणें शक्य नाहीं ' अशी श्रुतीनें प्रथम प्रतिज्ञा केली. पुढें उपपत्ति आणि अनुभव या उभयतांच्या द्वारानें असें ठरविलें कीं, ब्रह्मवस्तु ही इंद्रियादिकांस अगोचर आहे, हेंच ज्ञान खरें आहे. हा हेतु झाला आणि पुनः तत्त्वनिश्चय करण्यासाठी ' निगमन रूपानें ' श्रुतिच पुनः प्रतिज्ञेचा अनुवाद करीत आहे.

शिष्य—तत्त्वाचा निश्चय होण्यासाठींच हा अनुवाद आहे ना ?

सिद्धान्ती—होय. याला निगमन म्हणतात. हेतु सांगून प्रतिज्ञेचा हेतूसह पुनः उच्चार करणें, याला निगमन म्हणावें. पर्वत वन्हिमान् आहे, ही प्रतिज्ञा;

धुराचें दर्शन हा हेतु. धूर दिसत आहे म्हणून पर्वत वन्हिमान् आहे, हें निगमन होय. म्हणजे हेतूसह प्रतिज्ञेचा उच्चार करावयाचा याला निगमन म्हणतात. असो; मीमांसा करावी या हेतूनें प्रवृत्त झालेला साधक ज्यावेळेला असा निश्चय करतो कीं, ब्रह्म वस्तु ही अज्ञात किंवा अज्ञेय आहे. व हा निश्चय जेव्हां आत्मानुभवानें (आत्मसाक्षात्कारानें सिद्ध झालेल्या ब्रह्म स्वरूपानें) दृढ होतो, त्या वेळेला त्याची मीमांसा करण्याची किंवा जाणण्याची प्रवृत्ति नष्ट होते व तो ब्रह्मज्ञ होतो.

शिष्य—म्हणजे ब्रह्म अज्ञेय आहे, तें ज्ञानाचा अविषय आहे, कारण तें स्वरूपानें आत्मा आहे, ज्ञानरूप आहे, असें ज्याला समजतें, तो ब्रह्मज्ञ असतो, असा श्रुतीचा व आपला अभिप्राय आहे, असें मला वाटतें.

सिद्धान्ती—होय. ज्याचें सर्व विज्ञान ब्रह्मरूप व आत्मरूप झालें, ज्याला सर्वत्र कार्य-कारणाचा अभाव दिसतो, सर्वत्र ब्रह्म (आत्मा) आहे असा साक्षात्कार असतो, तो यथार्थ द्रष्टा अथवा सम्यग्दर्शी होतो. याच्या उलट ज्याचें ज्ञान असतें तो मिथ्याज्ञानी असतो.

शिष्य—म्हणजे ज्याला ' मला ब्रह्म समजलें आहे ' असें ज्ञान झालें असतें, तो मिथ्यादर्शी होय. त्यालाच अयथार्थ ज्ञान झालेलें असतें. ब्रह्म हें ज्ञेयाहून निराळें, अज्ञेय, आहे, असें त्याला समजलें नसतें. अज्ञेय ब्रह्म ज्ञात झालें, असें समजतो, तो अज्ञानी आहे असेंच श्रुतीला सांगावयाचें आहे ना ?

सिद्धान्ती—ठीक समजलास. यावरून तुझ्या हें ध्यानांत येईल कीं, ति-विलक्षण जें ज्ञान असतें तें खोटें असतें, अवैदिक ज्ञान मिथ्या असतें. त्या ज्ञानाचा विषय ब्रह्म हा नसतो म्हणून तें मिथ्या ज्ञान सर्वथा निंद्य व त्याज्य ही आहे. सांख्य शास्त्रकर्ते कपिल, न्यायशास्त्राचे प्रचारक कणाद, या उभयतांचीं ' दर्शनें ' मिथ्या आहेत.

पूर्वपक्षी—या दर्शनांस मिथ्या म्हणण्याचा आपल्यास काय अधिकार आहे ?

सिद्धान्ती—कारण (१) त्यांनीं ब्रह्म समजतें हा आपल्या दर्शनाचा विषय केला आहे, (२) ज्या तर्काला अधिष्ठान नाहीं, मूलाधार नाहीं, त्या तर्कानें हीं दर्शनें सिद्ध झालीं आहेत. आणि (३) समजून घेण्याची त्यांची इच्छा निवृत्त झाली आहे. अहो ! समजणें शक्य नाहीं, असें दृढ निश्चयात्मक ज्ञान झाल्याखेरीज विविदिषा निवृत्त होणें शक्यच नाहीं. पण यांची झाली आहे ! असो; या तीन कारणांस्तव त्यांचीं दर्शनें असत् आहेत. स्मृतीनें म्हटलें आहे—

' ज्या स्मृति, वेद-बाह्य आहेत, जेथें वाटतील तसले तर्क व कुतर्क यांचें मात्र साम्राज्य आहे, त्या स्मृति निष्फल होत. कारण, त्यांचा जन्म तमोगुणापासून अथवा अज्ञानापासून झाला आहे. '

म्हणून जेथें विपरीत ज्ञान किंवा मिथ्या ज्ञान असतें, त्या स्मृति अनर्थकारकच होत.

पूर्वपक्षी—या मंत्राचा जो दुसरा चरण आहे. आणि ज्याचा अर्थ—'ज्ञानी लोकांना हें (ब्रह्म) समजणें शक्य नाहीं, असें ज्ञान असतें आणि अज्ञानी लोकांस हें ज्ञेय आहे असें ज्ञान असतें,'—असा आहे, तो हा दुसरा चरण विनाकारण अवतीर्ण केला आहे असें दिसतें.

सिद्धान्ती—नाहीं. पहिल्या चरणांत सांगितलेल्या अर्थाचा हेतु दुसऱ्या चरणांत सांगितला आहे. जर येथें हेतु स्पष्ट दिसत नसता तर तुमचें म्हणणें बरोबर होतें.

पूर्वपक्षी—कसा हेतु आहे तो सांगा पाहूं ?

सिद्धान्ती—पूर्वी यांच अर्थाचीं जीं जीं वाक्यें येऊन गेलीं, त्यांत ज्ञाते लोकांस ब्रह्म अज्ञात असतें व अज्ञानी लोकांस तें ज्ञात आहेसें वाटतें, हा अर्थ सांगितला आणि येथें ब्रह्म हें ज्ञानाचा विषय नाहीं, असें जें ज्ञान तें सम्यक् ज्ञान आणि तें ब्रह्म ज्ञानाचा विषय आहे, हें असम्यग् ज्ञान किंवा अयथार्थ ज्ञान आहे, असा उपदेश करावयाचा आहे. ब्रह्म ज्ञेय नाहीं कारण तें ज्ञानाचा विषयच होऊं शकत नाहीं, असा सर्व वाक्यांचा सहेतुक अर्थ आहे. ज्यांचें ज्ञान ब्रह्म ज्ञेय आहे, असें सांगतें, तें ज्ञान बुद्धयादि उपाधींनीं अशुद्ध झालेलें असतें, म्हणून यथार्थ नसतें. सारांश ज्ञात आणि अज्ञात वस्तूंहून निराळें असणारें आत्मज्ञान नित्य आहे, विज्ञानरूप आहे, अक्रिय, अमर, अजर, अभय आहे, एकरूप आहे, ब्रह्मरूप आहे. अशा प्रकारचें ज्ञान अज्ञानी लोकांस नसतें. त्यांना असें वाटत असतें कीं, ब्रह्म हें बुद्धीचा विषय आहे, आणि म्हणून तें ज्ञेय आहे. अर्थातच ते लोक ब्रह्माचे ठिकाणीं ज्ञात-अज्ञातत्व, व्यक्ताव्यक्तत्व, इत्यादि धर्मांचा विनाकारण आरोप करितात, त्याच्या ठिकाणीं कार्यकारणभाव आहे असें समजतात, म्हणून यांचें ज्ञान सविकल्पक असतें व अर्थातच तें अयथार्थ असतें. शिंपलीच्या तुकड्यावर रुप्याचा आरोप करून तें रुपें आहे, असें ज्ञान करून घ्यावयाचें हा अयथार्थ प्रकार आहे. हे तुम्हां सर्वांस जसें सहज समजेल, तसेंच या अज्ञानी लोकांचें ज्ञानही अयथार्थ आहे हें समजलें पाहिजे.

शिष्य—म्हणजे बुद्धि हा आत्मा आहे, मन आत्मा आहे, इंद्रिय आत्मा आहे, शरीर आत्मा आहे असें सिद्धान्त सांगणारे जे बुद्धादि वेदबाह्य दर्शनकार, आहेत, ते सर्व मिथ्यावादी आहेत असेंच म्हटलें पाहिजे ?

सिद्धान्ती—यांत संशय काय ? व्यक्ताव्यक्ताच्या पलीकडे असणाऱ्या व त्यांचा अंतर्भाव करणाऱ्या ब्रह्माला जे लोक 'भ्रांतीनें व्यक्त आहे' असें म्हणतात, किंवा अव्यक्त आहे असें म्हणतात, ब्रह्म ज्ञात आहे असें म्हणतात, किंवा तें अज्ञात आहे, असें म्हणतात, ते सर्व मिथ्यावादीच होत. ॥ ११ ॥ ३ ॥

मंत्र चवथा (क्रमांक १२ वा).

प्रतिबोधविदितं मतमिति। वीप्साप्रत्ययानामात्मावबोधद्वारत्वाद्बोधं प्रति बोधं प्रतीति वीप्सा सर्वप्रत्ययव्याप्त्यर्था। बौद्धा हि सर्वे प्रत्ययास्तप्तलोहवन्नित्यविज्ञानस्वरूपात्मव्याप्तत्वाद्विज्ञानस्वरूपावभासास्तदन्यावभासश्चाऽऽत्मा तद्विलक्षणोऽग्निवदुपलभ्यत इति तेन ते द्वारीभवन्त्यात्मोपलब्धौ। तस्मात्प्रतिबोधावभासप्रत्यगात्मतया यद्विदितं तद्ब्रह्म तदेव मतं ज्ञातं तदेव सम्यग्ज्ञानवत्प्रत्यगात्माविज्ञानं न विषयविज्ञानम्। आत्मत्वेन प्रत्यगात्मानमैक्षदिति च काठके। अमृतत्वं हि विन्दत इति हेतुवचनं विपर्यये मृत्युप्राप्तेः। विषयात्मविज्ञाने हि मृत्युः प्रारभत इत्यात्मविज्ञानममृतत्वनिमित्तमिति युक्तं हेतुवचनममृतत्वं हि विन्दत इति। आत्मज्ञानेन किममृतत्वमुत्पाद्यते। न। कथं तर्हि। आत्मना विन्दते स्वेनैव नित्यात्मस्वभावेनामृतत्वं विन्दते। नाऽऽलम्बनपूर्वकम्। विन्दत इत्यात्माविज्ञानापेक्षम्। यदि हि विद्योत्पाद्यममृतत्वं स्यादनित्यं भवेत्कर्मकार्यवत्। अतो न विद्योत्पाद्यम्। यदि चाऽऽत्मनैवामृतत्वं विन्दते किं पुनर्विद्यया क्रियत इत्युच्यते। अनात्मविज्ञानं निवर्तयन्ती सा तन्निवृत्त्या स्वाभाविकस्यामृतत्वस्य निमित्तमिति कल्प्यते। यत आह वीर्यं विद्यया विन्दते। वीर्यं सामर्थ्यमनात्माध्यारोपमायास्वान्तध्वान्तानभिभाव्यलक्षणं बलं विद्यया विन्दते। तच्च किंविशिष्टम्। अमृतमविनाशि। अविद्याजं हि वीर्यं विनाशि। विद्ययाऽविद्याया बाध्यत्वात्। न तु विद्याया बाधकोऽस्तीति विद्याजममृतं वीर्यम्। अतो विद्याऽमृतत्वे निमित्तमात्रं भवति। " नायमात्मा बलहीनेन लभ्यः " इति चाऽऽथर्वणे। लोकेऽपि विद्याजमेव बलमभिभवति न शरीरादिसामर्थ्यं यथा हस्त्यादेः। अथवा प्रतिबोधविदितं मतमिति सकृदेवाशेषविपरीतनिरस्तसंस्कारेण स्वप्नप्रतिबोधवद्यद्विदितं तदेव मतं ज्ञातं भवतीति। अथवा गुरूपदेशः प्रतिबोधस्तेन वा विदितं मतमित्युभयत्र प्रतिबोधशब्दप्रयोगोऽस्ति। सुप्तप्रतिबुद्धो गुरुणा प्रतिबोधित इति। पूर्वं तु यथार्थम् ॥ १२ ॥ ४ ॥

शिष्य—येथें या चवथ्या मंत्रांत जी वीप्सा आहे, बोध शब्दाचा अनेक वेळ उच्चार ' प्रति ' या उपसर्गानें दर्शित केला आहे, त्याचें तात्पर्य काय ?

सिद्धान्ती—आपल्यास होणारें प्रत्येक ज्ञान हें आत्मज्ञानाचें एक द्वार आहे, हें एक साधन आहे, असें सांगण्यासाठीं हा बोध, तो बोध, अशी वीप्सा (पुनरुच्चार) केली आहे. हेतु हा कीं, या वीप्सेनें आपल्यास होणाऱ्या सर्व ज्ञानांचा अंतर्भाव व्हावा. वीप्सा ही पुनस्त्वाचें सातत्य दाखविते. अखंडपणानें पुनः पुनः होणें याचें नांव वीप्सा हें आहे. आपलीं सर्व ज्ञानें बुद्धीच्या द्वारानें होतात. ही बुद्धि नित्य विज्ञानरूपी आत्म्यानें व्याप्त झालेली असते. म्हणून आत्म्याच्या सर्व प्रकाशकत्वानें बुद्धीलाही विषय-प्रकाशनाचें सामर्थ्य प्राप्त होतें. सारांश, प्रत्येक विषयज्ञानाचे वेळीं आत्मा प्रकट होतो. सर्व ज्ञानांत जें सामान्य ज्ञानरूप आहे, तोच आत्मा होय.

शिष्य—भगवन् ! अग्नींत घातलेला लोखंडाचा तापलेला लाल गोळाही ज्या प्रमाणें दहन-प्रकाशनाचीं कामें करितो, त्याप्रमाणेंच आत्म्यानें व्याप्त झालेली आपली बुद्धि आपल्याला विषयाचें ज्ञान करून देत असेल.

सिद्धान्ती—बुद्धि स्वतंत्रतेनें विषय-प्रकाशक नाहीं. ती तशी आहे असा भास मात्र होतो. खरा अवभासक तिच्याहून निराळा आहे. तो आत्मा होय. हा आहे म्हणून बुद्धीला ज्ञान देण्याघेण्याचें सामर्थ्य येतें. लोखंडास दहन करण्याचें व प्रकाश देण्याचें सामर्थ्य जसें अग्नीपासून प्राप्त होतें, तसें बुद्धीला विषयज्ञान देण्याचें सामर्थ्य आत्म्यापासून मिळतें. अर्थातच आपल्यास बुद्धिद्वारा जीं जीं म्हणून ज्ञानें होतात, जे जे प्रत्यय येतात, ते सर्व आत्मज्ञानाचीं जणूं कांहीं द्वारेंच होतात. म्हणून प्रत्येक प्रत्ययाचा वेळेला प्रकट होणारा जो प्रत्यगात्मा (प्रत्येक प्रत्ययाला प्रकाशित करणारा जो आत्मा) ज्याच्या साह्यानें विषय विदित होतो, तें ब्रह्म आहे, असें जें ज्ञान तेंच खरें ज्ञान होय. या खऱ्या ज्ञानाचा आश्रय प्रत्यगात्म्याचें विज्ञान आहे. विषयाचें विज्ञान नाहीं. आम्ही म्हणतों याला ' आत्मस्वरूपानें प्रत्यगात्म्याला पाहता झाला. ' अशी काठक श्रुति प्रमाण आहे. हें आत्मज्ञान झालें म्हणजे अमृतत्व प्राप्त होतें. उलट ज्ञान झालें तर मृत्यु प्राप्त होतो, असा श्रुतीनें हेतुही सांगितला आहे. विषय हाच आत्मा असें ज्ञान ज्याला असतें, त्याला मृत्यु भय उत्पन्न करितो, अशी श्रुति आहे.

शिष्य—तेव्हां, ज्याला आत्मज्ञान झालें तो अमृत होतो, हें युक्तच आहे; आत्मज्ञान हा अमृतत्वाचा हेतुच आहे.

पूर्वपक्षी—म्हणजे आत्म-ज्ञान झालें कीं, जीवाला अमरत्व प्राप्त होतें, असें समजावयाचें होय ?

सिद्धान्ती—नाहीं.

पूर्वपक्षी—काय समजावयाचें तर मग ?

सिद्धान्ती—ब्रह्मज्ञ पुरुष स्वतःच आत्मा असतो. आणि आत्म्याचा नित्य स्वभाव अमृतत्व हा आहे, म्हणून तो आत्मरूपानें अमृत होतो.

पूर्वपक्षी—तो पुरुष आत्मज्ञानानें अमृत होतो, असें कां म्हणत नाहीं ? 'आत्मवेत्ता शोकसागर तरून जातो,' अशी श्रुति आहे.

सिद्धान्ती—हें ठीक आहे, पण ब्रह्मज्ञ पुरुष स्वतंत्र असतो. त्याला कोणत्याही आश्रयाची अपेक्षा असत नाहीं. आत्मज्ञानानें मुक्त होतो, असें म्हटलें तर (१) आत्म्याची उपासना ब्रह्मज्ञ पुरुषानें केली पाहिजे, असा विधि प्राप्त होईल.

पूर्वपक्षी—झाला तर बिघडलें काय ?

सिद्धान्ती—बिघडतें इतकेंच कीं (२) मोक्ष हा विद्येचें (उपासनचें) कार्य होतो, कार्य तेथून अनित्य असतें, पण मोक्ष अनित्य नाहीं, म्हणून तो कार्य नाहीं. सारांश, ब्रह्मज्ञाला उपासना विहित केली जाते व मोक्ष अनित्य ठरतो, या दोन कारणांस्तव आत्मविद्येनें अमृतत्व प्राप्त होतें, हें म्हणणें अशास्त्र ठरतें.

पूर्वपक्षी—मग जर आत्मत्वानेंच अमृतत्व मिळालेलें असतें, तर विद्येची खटपट कशाला सांगता ? विद्या संपादन करून करावयाचें तरी काय ?

सिद्धान्ती—ऐका, विद्येचें कार्य अनात्म-विज्ञान; विषय-ज्ञान, मिथ्या-ज्ञान व माया, या सर्वांस निवृत्त करावयाचें हें आहे. मायेचें निवारण झालें म्हणजे आत्मस्वरूप स्वभावतः प्रकट होतें. हें खरें आहे, तरी आत्मविद्याही माया-विनाशक आहे, म्हणून ती अमृतत्वाचें निमित्त-करण आहे, असें लक्षणेनें म्हणतातही. हें मनांत ठेवून श्रुति पुढें काय सांगते तें ऐका ! आत्म्याच्या ज्ञानानें वीर्य मिळतें व विद्येनें अमृत मिळतें.

शिष्य—भगवन् ! वीर्य म्हणजे काय ? वीर्य म्हणजे सामर्थ्यच ना ?

सिद्धान्ती—पण हें सामर्थ्य कसलें ? हें शारीर सामर्थ्यच नव्हे; तर अनात्मक वस्तूवर आत्मस्वरूपाचा आरोप करविणारी व आत्म-स्वरूपाला मर्यादित करणारी जी अंधकारी माया, तिलाही ज्याचा पराभव करितां येत नाहीं असें जें सामर्थ्य, तें विद्येनें प्राप्त होतें. सारांश, मी मनुष्य आहें, इत्यादि प्रकारचे अभिमान परमेश्वरी-माया उत्पन्न करिते. ते अभिमान ज्या बलाचा पराभव करूं शकत नाहींत, पण जें बल त्या अभिमानाचा पराभव करितें, तें बल विद्येनें मिळतें.

शिष्य—या बलाचा विशेष काय ?

सिद्धान्ती—तें अविनाशी असतें. अविद्येचें बल विनाशि असतें. विद्या-अविद्येचा बाध करूं शकते. विद्येला अविद्येचा नाश करितां येतो; पण विद्येचा

नाश करणारी दुसरी वस्तूच नाहीं, म्हणून विद्येपासून उत्पन्न झालेलें बल अविनाशी असतें.

शिष्य—म्हणूनच अमृतत्वाला विद्या ही निमित्त-मात्र आहे, असें आपण म्हणतां ? विद्या अविद्येचा नाश करून आत्मज्ञानावरील पडदा एकीकडे सारिते. होयना ?

सिद्धान्ती—होय. शिवाय " आत्मा हा बलहीन पुरुषाला केव्हांही मिळत नाहीं " असें आथर्वण श्रुतींत सांगितलें आहे. तसेंच, व्यवहारामध्येंही आपल्यास दिसतें कीं हत्तीसारख्या मोठमोठ्या बलवंत प्राण्यास सुद्धां हीनशक्तीचीं मनुष्यें आपल्या बुद्धिसामर्थ्यानें आपल्या तंत्रानें चालवितात. बुद्धिबल हें शरीर-बलाहून श्रेष्ठच आहे.

शिष्य—' प्रतिबोध ' या पदाचा दुसरा कांहीं अर्थ शक्य आहे काय ?

सिद्धान्ती—होय. बरें विचारिलेंस. ऐक.

या मंत्रार्धाचा असाही एक अर्थ करावा कीं, सर्व विपरीत संस्कार (अज्ञान) एकदम नाहींसे झाले असतां जें ज्ञान प्रकट होतें, मायेचा निरास झाल्याबरोबर जी वस्तु प्रकट होते, ती सद्योमुक्तीला (तत्काल मुक्ति होण्याला कारण होते. स्वप्नांतून जागें झाल्यावर जगताचें जसें यथार्थ ज्ञान होतें, तसें, मायेचें स्वप्न निरस्त झाल्यावर वस्तुज्ञान होऊन मुक्ति मिळते. गुरूपदेशानेंही हें कार्य होत असतें. निजलेल्याला, अज्ञाननिद्रेमध्यें घोरत पडलेल्या जीवाला, गुरूपदेशानें ज्ञान जागृति झाली म्हणजेही त्याला वस्तुज्ञान होतें. मात्र साधकाला आत्म-साक्षात्कार झालाच पाहिजे. बाकीचा अर्थ पूर्वीप्रमाणेंच आहे. ॥ १२ ॥ ४ ॥

येथें जीवन्मुक्ति, क्रममुक्ति, सद्योमुक्ति या सर्वांचा विचार झाला.

मंत्र पांचवा (क्रमांक १३ वा).

इह चेदवेदीदित्यवश्यकर्तव्यतोक्तिर्विपर्यये विनाशश्रुतेः । इह मनुष्यजन्मनि सत्यवश्यमात्मा वेदितव्य इत्येतद्विधीयते । कथमिह चेदवेदीद्विदितवान् । अथ सत्यं परमार्थतत्त्वमस्त्यवाप्तं तस्य जन्म सफलमित्यभिप्रायः । न चेदिहावेदीन्न विदितवान्वृथैव जन्म । अपि च महती विनष्टिर्महान्विनाशो जन्ममरणप्रबन्धाविच्छेदप्राप्तिलक्षणः स्याद्यतस्तस्मादवश्यं तद्विच्छेदाय ज्ञेय आत्मा । ज्ञानेन तु किं स्यादित्युच्यते । भूतेषु भूतेषु । चराचरेषु सर्वेष्वित्यर्थः । विचित्य । पृथङ् निष्कृष्यैकमात्मतत्त्वं संसारधर्मैरस्पृष्टमात्मभावेनोपलभ्येत्यर्थः । अनेकार्थत्वाद्धातूनाम् । न पुन-

ञित्वेति संभवति विरोधात् । धीराः । धीमन्तो विवेकिनो विनिवृत्तबाह्यविषयाभिलाषाः । प्रेत्य । मृत्वाऽस्माल्लोकाच्छरीराद्यनात्मलक्षणाद्यावृत्तममत्वाहंकाराः सन्त इत्यर्थः । अमृता अमरणधर्माणो नित्यविज्ञानामृतत्वस्वभावा एव भवन्ति ॥ १३ ॥ ५ ॥

इति द्वितीयः खण्डः ॥ २ ॥

सिद्धान्ती—या मंत्रांत ब्रह्मज्ञान मिळविणें अत्यंत अवश्य आहे, ब्रह्मज्ञान झालें नाहीं तर जीवाचा घात होतो, असें सांगितलें आहे. मनुष्य–जन्म प्राप्त झाला असतां प्रत्येकानें आत्मज्ञान करून घेतलेंच पाहिजे, असा विधि या मंत्राच्या स्पष्ट अर्थानें उत्पन्न होतो.

शिष्य—तो कसा ?

सिद्धान्ती—ह्या जन्मामध्यें जर आत्मा हें परमार्थ तत्त्व आहे, असें ज्ञान झालें व ज्ञान होऊन आपण आत्मरूप झालों, तर जन्माचें सार्थक होतें. यावरून आत्मज्ञान करून घ्यावें हा विधि उत्पन्न होतो, हा अभिप्राय आहे. जर ब्रह्मज्ञान झालें नाहीं, तर मनुष्याचा जन्म व्यर्थ होतो, इतकेंच नव्हे, तर त्याचा मोठा घोरला घात होतो. हा घात म्हणजे जन्म मरणाचें जें बद्धक व सुख–दुःखात्मक चक्र आहे त्याची अखंड प्राप्ति ब्रह्मज्ञान न झालेल्या पुरुषास होते. तेव्हां या दुःखसागरांतून तरून जावयाचें असेल तर, म्हणजे या चक्राचा स्फोट करावयाचा असेल तर, आत्मज्ञान करून घेतलेंच पाहिजे; असा विधिच उत्पन्न झाला!

शिष्य—ज्ञानानें काय होईल ?

सिद्धान्ती—आत्मज्ञानाचें फल असें होतें कीं सर्व चराचर वस्तूंमध्यें विद्यमान असणारें व संसार–धर्माचा स्पर्श होऊं न देणारें आत्मतत्त्व यथार्थ स्वरूपानें आपल्यास प्राप्त होतें.

पूर्वपक्षी—मंत्रांत विचित्य (स्वच्छ करणें, नाश करणें) असा शब्द असतांना आपण त्या शब्दाचा प्राप्त होणें असा कसा अर्थ केला ?

सिद्धान्ती–धातूला अनेक अर्थ असतात, हें प्रसिद्ध आहे ज्ञात्याला पुनः पुनः विरोधामुळें संसार उत्पन्न होणें संभवत नाहीं, असा विचित्य याचा आम्ही केलेला अर्थ करून व्याख्यान करण्यास कांहीं प्रत्यवाय दिसत नाहीं. असो; बाह्य विषयांचा अभिलाष ज्यांनीं टाकून दिला आहे, अंतर्बाह्य एक आत्मतत्वच आहे असाच ज्यांचा निश्चय झाला आहे ते, मेल्यानंतर किंवा ह्या मृत्युलोकांत शरीरादि ज्या अनात्म वस्तु आहेत, त्यांच्यावरील ममत्वाचा व अहंकाराचा त्याग केल्यानंतर अमृत होतात. त्यांचा मरणधर्म नाहींसा होतो. अथवा ते नित्य ज्ञानरूप अमृतत्वाचे अवतार होतात. सारांश ते मुक्त होतात ॥ १३ ॥ ५ ॥

॥ द्वितीय खण्ड समाप्त ॥

तृतीयः खण्डः ।

मंत्र पहिला (क्रमांक १४ वा).

ब्रह्म ह देवेभ्य इति ब्रह्मणो दुर्विज्ञेयतोक्तिर्यत्नाधिक्यार्था । समाप्ता ब्रह्मविद्या यदधीनः पुरुषार्थः । अत ऊर्ध्वमर्थवादेन ब्रह्मणो दुर्विज्ञेयतोच्यते । तद्विज्ञाने कथं नु नाम यत्नमधिकं कुर्यादिति । शमाद्यर्थो वाऽऽम्नायोऽभिमानशातनात् । शमादि वा ब्रह्मविद्यासाधनं विधित्सितं तदर्थोऽयमर्थवादाम्नायः । न हि शमादिसाधनरहितस्याभिमानरागद्वेषादियुक्तस्य ब्रह्मविज्ञाने सामर्थ्यमस्ति । व्यावृत्तबाह्यमिथ्याप्रत्ययग्राह्यत्वाद्ब्रह्मणः । यस्माच्चाग्न्यादीनां जयाभिमानं शातयति । ततश्च ब्रह्मविज्ञानं दर्शयत्यभिमानोपशमे । तस्माच्छमादिसाधनविधानार्थोऽयमर्थवाद इत्यवसीयते । सगुणोपासनार्थो वाऽपोदितत्वात् । नेदं यदिदमुपासत इत्युपास्यत्वं ब्रह्मणोऽपोदितमपोदितत्वादनुपास्यत्वे प्राप्ते तस्यैव ब्रह्मणः सगुणत्वेनाधिदैवमध्यात्मं चोपासनं विधातव्यमित्येवमर्थो वेत्यधिदैवतं तद्वनमित्युपासितव्यमिति हि वक्ष्यति । ब्रह्मेति परो लिङ्गात् । न ह्यन्यत्र परादीश्वराग्नित्यसर्वज्ञात्परिभूयाग्न्यादींस्तृणं वज्रीकर्तुं सामर्थ्यमस्ति । तन्न शशाक दग्धुमित्यादिलिङ्गाद्ब्रह्मशब्दवाच्य ईश्वर इत्यवसीयते । न ह्यन्यथाऽग्निस्तृणं दग्धुं नोत्सहते वायुर्वाऽऽदातुम् । ईश्वरेच्छया तृणमपि वज्रीभवतीत्युपपद्यते । तत्सिद्धिर्जगतो नियतप्रवृत्तेः । श्रुतिस्मृतिप्रसिद्धिभिर्नित्यसर्वविज्ञान ईश्वरे सर्वात्मनि सर्वशक्तौ सिद्धेऽपि शास्त्रार्थनिश्चयार्थमुच्यते । तस्येश्वरस्य सद्भावसिद्धिः कुतो भवतीत्युच्यते । यदिदं जगद्देवगन्धर्वयक्षरक्षःपितृपिशाचादिलक्षणं द्युवियत्पृथिव्यादित्यचन्द्रग्रहनक्षत्रविचित्रं विविधप्राण्युपभोगयोग्यस्थानसाधनसंबन्धि तदत्यन्तकुशलशिल्पिभिरपि दुर्निर्माणं देशकालनिमित्तानुरूपनियतप्रवृत्तिनिवृत्तिक्रममेतद्धीकृकर्मविभागज्ञप्रयत्नपूर्वकं भवितुमर्हति कार्यत्वे सति यथोक्तलक्षणत्वात् । गृहप्रासादरथशयनासनादिवद्विपक्ष आत्मादिवत् । कर्मण एवेति चेत् । न । परतन्त्रस्य निमित्तमात्रत्वात् । यदिदमुपभोगवैचित्र्यं प्राणिनां तत्साधनवैचित्र्यं च देशकालनिमित्तानुरूपनियतप्रवृत्तिनिवृत्तिक्रमं च तन्न नित्यसर्वज्ञकर्तृकम् । किं तर्हि कर्मण एव तस्याचिन्त्यप्रभावत्वात्सर्वैश्च फलहेतुत्वाभ्युपगमात् । सति कर्मणः फलहेतुत्वे किमीश्वराधिककल्पनयेति न

नित्यस्येश्वरस्य नित्यसर्वज्ञशक्तेः फलहेतुत्वं चेति चेत्। न कर्मण एवोपभोगवैचित्र्याद्युपपद्यते। कस्मात्। कर्तृतन्त्रत्वात्कर्मणः। चिंतिमत्प्रयत्ननिर्वृत्तं हि कर्म तत्प्रयत्नोपरमादुपरतं सद्देशान्तरे कालान्तरे वा नियतनिमित्तविशेषापेक्षं कर्तुः फलं जनयिष्यतीति न युक्तमनपेक्ष्यान्यदात्मनः प्रयोक्तृ कर्तैव फलकाले प्रयोक्तेति चेन्मया निर्वर्तितोऽसि त्वां प्रयोक्ष्ये फलाय यदात्मानुरूपं फलमिति न देशकालनिमित्तविशेषानभिज्ञत्वात्। यदि हि कर्ता देशविशेषाभिज्ञः सन्स्वातन्त्र्येण कर्म नियुञ्ज्यात्ततोऽनिष्टफलस्याऽप्रयोक्ता स्यात्। न च निर्निमित्तं तदनिच्छयाऽऽत्मसमवेतं तच्चर्मवद्विकरोति कर्म। न चाऽऽत्मकृतमकर्तृसमवेतमयस्कान्तमणिवदाकृष्टृ भवति प्रधानकर्तृसमवेतत्वात्कर्मणः। भूताश्रयमिति चेन्न साधनत्वात्। कर्तृक्रियायाः साधनभूतानि भूतानि क्रियाकालेऽनुभूतव्यापाराणि समाप्तौ च हलादिवत्कर्त्रा परित्यक्तानि न फलं कालान्तरे कर्तुमुत्सहन्ते। न हि हलं क्षेत्राद् व्रीहीन्गृहं प्रवेशयति भूतकर्मणोश्चाचेतनत्वात्स्वतःप्रवृत्त्यनुपपत्तिः। वायुवदिति चेन्नासिद्धत्वात्। न हि वायोरचिंतिमतः स्वतःप्रवृत्तिः सिद्धा रथादिष्वदर्शनात्। शास्त्रात्कर्मण एवेति चेच्छास्त्रं हि क्रियातः फलसिद्धिमाह नेश्वरादेः स्वर्गकामो यजेतेत्यादि। न च प्रमाणाधिगतत्वादानर्थक्यं युक्तम्। न चेश्वरास्तित्वे प्रमाणान्तरमस्तीति चेत्। न। दृष्टन्यायहानानुपपत्तेः। क्रिया हि द्विविधा। दृष्टफलाऽदृष्टफला च। दृष्टफलाऽपि द्विविधाऽनन्तरफलाऽऽगामिफला च। अनन्तरफला गतिभुजिलक्षणा। कालान्तरफला च कृषिसेवादिलक्षणा। तत्रानन्तरफला फलापवर्गिण्येव कालान्तरफला तूत्पन्नप्रध्वंसिनी। आत्मसेव्याद्यधीनं हि कृषिसेवादेः फलं यतो न चोभयन्यायव्यतिरेकेण स्वतन्त्र कर्म ततो वा फलं दृष्टम्। तथा च कर्मफलप्राप्तौ न दृष्टन्यायहानमुपपद्यते। तस्माच्छान्ते यागादिकर्मणि नित्यः कर्तृकर्मफलविभागज्ञ ईश्वरः सेव्यादिवद्यागाद्यनुरूपफलदातोपपद्यते स चाऽऽत्मभूतः सर्वस्य सर्वक्रियाफलप्रत्ययसाक्षी नित्यविज्ञानस्वभावः संसारधर्मैरसंसृष्टः। श्रुतेश्च। "न लिप्यते लोकदुःखेन बाह्यः" "जरां मृत्युमत्येति" "विजरो विमृत्युः"। "सत्यकामः सत्यसंकल्प एष सर्वेश्वरः पुण्यं कर्म कारयति"। "अनश्नन्नन्यो अभिचाकशीति"। "एतस्य वा अक्षरस्य प्रशासने" इत्याद्या असंसारिण एकस्या-

ऽऽत्मनो नित्यमुक्तस्य सिद्धौ श्रुतयः । स्मृतयश्च सहस्रशो विद्यन्ते । न चार्थवादाः शक्यन्ते कल्पयितुम् । अनन्ययोगित्वे सति विज्ञानोत्पादकत्वात् न चोत्पन्नं विज्ञानं बाध्यते । अप्रतिषेधाच्च । न चेश्वरो नास्तीति निषेधोऽस्ति । प्राप्त्यभावादिति चेन्नोक्तत्वात् । न हिंस्यादितिवत्प्राप्त्यभावाप्रतिषेधो नाऽऽरभ्यत इति चेन्न । ईश्वरसद्भावे न्यायस्योक्तत्वात् । अथवा प्रतिषेधादिति कर्मणः फलदान ईश्वरकालानां न प्रतिषेधोऽस्ति।न च निमित्तान्तरनिरपेक्षं केवलेन कर्त्रैव प्रयुक्तं फलदं दृष्टम् । नच विनष्टोऽपि यागः कालान्तरे फलदो भवति । सेव्यबुद्धिवत्सेवकेन सर्वज्ञेश्वरबुद्धौ तु संस्कृतायां यागादिकर्मणा विनष्टेऽपि कर्माणि सेव्यादिवेश्वरात्फलं कर्तुर्भवतीति युक्तम् । न तु पुनः पदार्था वाक्यशतेनापि देशान्तरे कालान्तरे वा स्वं स्वं स्वभावं जहति नहि देशकालान्तरेषु चाग्निरनुष्णो भवति । एवं कर्मणोऽपि कालान्तरे फलं द्विप्रकारमेवोपलभ्यते । बीजक्षेत्रसंस्कारपरिरक्षाविज्ञानवत्कर्त्रपेक्षफलं कृष्यादि, विज्ञानवत्सेव्यबुद्धिसंस्कारापेक्षफलं च सेवादि । यागादेः कर्मणस्तथाऽविज्ञानवत्कर्त्रपेक्षफलत्वानुपपत्तौ कालान्तरफलत्वात्कर्मदेशकालनिमित्तविपाकविभागज्ञबुद्धिसंस्कारापेक्षं फलं भवितुमर्हति । सेवादिकर्मानुरूपफलज्ञसेव्यबुद्धिसंस्कारापेक्षफलस्येव । तस्मात्सिद्धः सर्वज्ञ ईश्वरः सर्वजन्तुबुद्धिकर्मफलविभागसाक्षी सर्वभूतान्तरात्मा । यत्साक्षादपरोक्षाद्य आत्मा सर्वान्तर इति श्रुतेः । स एव चात्राऽऽत्मा जन्तूनां नान्योऽतोऽस्ति द्रष्टा श्रोता मन्ता विज्ञाता नान्यदतोऽस्ति विज्ञात्रित्याद्यात्मान्तरप्रतिषेधश्रुतेस्तत्त्वमसीति चाऽऽत्मत्वोपदेशात् । न हि मृत्पिण्डः काञ्चनात्मत्वेनोपदिश्यते । ज्ञानशक्तिकर्मोपास्योपासकशुद्धाशुद्धमुक्तामुक्तभेदादात्मभेद एवेति चेन्न । भेददृष्ट्यपवादात् । यदुक्तं संसारिण ईश्वरादनन्या इति । तन्न किं तर्हि भेद एव संसार्यात्मनाम् । कस्माल्लक्षणभेदाद्ध्वमहिषवत् । कथं लक्षणभेद इत्युच्यते । ईश्वरस्य तावन्नित्यं सर्वविषयं ज्ञानं सवितृप्रकाशवत् । तद्विपरीतं संसारिणां खद्योतस्येव । तथैव शक्तिभेदोऽपि । नित्या सर्वविषया चेश्वरशक्तिर्विपरीतेतरस्य । कर्म च चित्स्वरूपात्मसत्तामात्रनिमित्तमीश्वरस्य । औष्ण्यस्वरूपद्रव्यसत्तामात्रनिमित्तदहनकर्मवत् । राजायस्कान्तप्रकाशकर्मवच्च स्वात्माविक्रियारूपम् । विपरीतमितरस्य । उपासीतेति वचनादुपास्य ईश्वरो गुरुराजवत्।

उपासकश्चेतरः शिष्यभृत्यवत्। अपहतपाप्मादिश्रवणान्नित्यशुद्ध ईश्वरः। पुण्यो वै पुण्येनेति वचनाद्विपरीत इतरः। अत एव नित्यमुक्त एवेश्वरो नित्याशुद्धियोगात्संसारीतरः। अपि च यत्र ज्ञानादिलक्षणभेदोऽस्ति तत्र भेदो दृष्टः। यथाऽश्वमहिषयोस्तथा ज्ञानादिलक्षणभेदादीश्वरादात्मनां भेदोऽस्तीति चेन्न। कस्मात्। अन्योऽसावन्योऽहमस्मीति न स वेद ते क्षय्यलोका भवन्ति। मृत्योः स मृत्युमाप्नोतीति भेददृष्टिर्ह्यपोह्यते। एकत्वप्रतिपादिन्यश्च श्रुतयः सहस्रशो विद्यन्ते। यदुक्तं ज्ञानादिलक्षणभेदादित्यत्रोच्यते। नानभ्युपगमात्। बुद्ध्यादिभ्यो व्यतिरिक्ता विलक्षणाश्चेश्वराद्भिन्नलक्षणा आत्मानो न सन्ति। एक एवेश्वराख्याऽऽत्मा सर्वभूतानां नित्यमुक्तोऽभ्युपगम्यते। बाह्यश्चक्षुर्बुद्ध्यादिसमाहारसंतानाहंकारममत्वादिविपरीतप्रत्ययप्रबन्धाविच्छेदलक्षणो नित्यशुद्धबुद्धमुक्तविज्ञानात्मेश्वरगर्भो नित्यविज्ञानावभासश्चित्तचैत्यबीजबीजिस्वभावः कल्पितोऽनित्यविज्ञान ईश्वरलक्षणविपरीतोऽभ्युपगम्यते। यस्याविच्छेदे संसारव्यवहारः। विच्छेदे च मोक्षव्यवहारः। अन्यश्च मृत्प्रलेपवत्प्रत्यक्षप्रध्वंसो देवपितृमनुष्यादिलक्षणो भूतविशेषसमाहारो न पुनश्चतुर्थोऽन्यो भिन्नलक्षण ईश्वरादभ्युपगम्यते। बुद्ध्यादिकल्पितात्मव्यतिरेकाभिप्रायेण तु लक्षणभेदादित्याश्रयासिद्धो हेतुः। ईश्वरादन्यस्याऽऽत्मनोऽसत्त्वात्। ईश्वरस्यैव विरुद्धलक्षणत्वमयुक्तमिति चेत्सुखदुःखादियोगश्च। न। निमित्तत्वे सति लोकविपर्ययाध्यारोपणात्सवितृवत्। यथा हि सविता नित्यप्रकाशरूपत्वाल्लोकाभिव्यक्त्यनभिव्यक्तिनिमित्तत्वे सति लोकदृष्टिविपर्ययेणोदयास्तमयाहोरात्रादिकर्तृत्वाध्यारोपभाग्भवत्येवमीश्वरे नित्यविज्ञानशक्तिरूपे लोकज्ञानापोहसुखदुःखस्मृत्यादिनिमित्तत्वे सति लोकविपरीतबुद्ध्याऽध्यारोपितं विपरीतलक्षणत्वं सुखदुःखादयश्च न स्वतः। आत्मदृष्ट्यनुरूपाध्यारोपाच्च। यथा घनादिविप्रकीर्णेऽम्बरे येनैव सवितृप्रकाशो न दृश्यते स आत्मदृष्ट्यनुरूपमेवाध्यस्यति सवितेदानीमिह न प्रकाशयतीति सत्येव प्रकाशेऽन्यत्र भ्रान्त्या। एवमिह बौद्धादिवृत्त्युद्भवाभिभवाकुलभ्रान्त्याऽध्यारोपितः सुखदुःखादियोग उपपद्यते। तत्स्मरणाच्च तस्यैवेश्वरस्यैव हि स्मरणम् "मत्तः स्मृतिर्ज्ञानमपोहनं च, नाऽऽदत्ते कस्यचित्पापम्" इत्यादि। अतो नित्यमुक्त एकस्मिन्सवितरीव लोकाविद्याध्यारोपितमीश्वरे संसारित्वम्। शास्त्रादिप्रामाण्यादभ्युपगतम-

संसारित्वमित्यविरोध इति । एतेन प्रत्येकं ज्ञानादिभेदः प्रत्युक्तः । सौक्ष्म्यचैतन्यसर्वगत्वाद्यविशेषे च भेदहेत्वभावात् । विक्रियावत्त्वे चानित्यत्वात् । मोक्षे च विशेषानभ्युपगमाद्भ्युपगमे चानित्यत्वप्रसङ्गात् । अविद्यावदुपलभ्यत्वाच्च भेदस्य तत्क्षयेऽनुपपत्तिरिति सिद्धमेकत्वं तस्माच्छरीरेन्द्रियमनोबुद्धिविषयवेदनासंतानस्याहंकारसंबन्धादज्ञानबीजस्य नित्यविज्ञानान्यनिमित्तस्याऽऽत्मतत्त्वयाथात्म्यविज्ञानाद्विनिवृत्तावज्ञानबीजस्य विच्छेद आत्मनो मोक्षसंज्ञा विपर्यये च बन्धसंज्ञा । स्वरूपापेक्षत्वादुभयोः ।

सिद्धान्ती—आतां या पुढें जे मंत्र आहेत त्यांच्या द्वारा श्रुति ब्रह्माचें दुर्विज्ञेयत्व (ब्रह्मस्वरूप समजण्याचा कठिणपणा) सांगत आहे, त्याचा हेतु हा कीं, ब्रह्मज्ञान करून घेण्याविषयीं आपण अधिक यत्न करावा. बाकी, ब्रह्मविद्येचा विषय येथें म्हणजे दुसऱ्या खंडाच्या शेवटीं संपला. ज्या ज्ञानानें पुरुषार्थ–सिद्धि होते, त्या ज्ञानाचें प्रवचन दुसऱ्या खण्डाच्या शेवटींच संपलें. आतांच सांगितल्याप्रमाणें या तिसऱ्या खण्डांतील मंत्र केवल अर्थवादपर आहेत. ब्रह्माची स्तुति करावी आणि त्याचें दुर्विज्ञेयत्व सांगावें, हा या अर्थवादी मंत्रांचा उपयोग आहे.

शिष्य—हा वेळपर्यंत तो ब्रह्मविषय झाला, त्याच्या संबंधानें कांहीं अधिक प्रयत्न करावयास श्रुति सांगणार आहे काय ?

सिद्धान्ती—होय. अभिमानाचा नाश करून शमदमादिकांचें संपादन करावें, यासाठीं श्रुतीचा प्रयत्न आहे. ब्रह्मविद्येचें साधन शमादि आहे व तें प्रत्येक जिज्ञासु पुरुषानें प्राप्त करून घ्यावें, असा विधि आहे, हें मुख्यत्वानें सांगावयाचें आहे. ब्रह्मज्ञान प्राप्त करून घेण्याचें सामर्थ्य हवें असेल, तर प्रत्येकानें शमदमादिसाधन–संपत्ति मिळविली पाहिजे व अभिमान, राग, द्वेष इत्यादिकांचा त्याग केला पाहिजे. याच्या शिवाय ब्रह्मज्ञानाचा अधिकारच प्राप्त होत नाहीं. आत्मव्यतिरिक्त जी जी अंतर्बाह्य वस्तु भासत आहे, ती सर्व मायेच्या विलासानें उत्पन्न झाली आहे, अतएव त्याज्य आहे व तो भास मिथ्या आहे, हेंही ज्ञान झालें पाहिजे. ब्रह्मज्ञान हवें असणाऱ्या पुरुषास मिथ्या ज्ञान वर्ज आहे. मिथ्या भास नष्ट होईल तर ब्रह्मज्ञान–विज्ञान होईल. बाह्य विषयांचें ज्ञान मिथ्या असतें. शमदमादि प्राप्त होऊन अभिमान नष्ट झाल्याखेरीज ब्रह्मज्ञान होत नाहीं.

पूर्वपक्षी—तुम्ही हें म्हणतां, याला कांहीं पुढील मंत्रांत आधार आहे काय ?

सिद्धान्ती—आधाराशिवाय आम्ही बोलतच नाहीं. अग्नि आदि देवांचा विजयसंबंधीं अभिमान नाहींसा केला व त्यांचा अभिमान विगलित झाला, तेव्हां त्यांनां ब्रह्म–साक्षात्कार झाला, हें पुढील आख्यायिकेंत स्पष्ट दिसणार आहे.

म्हणून शमदमादि साधन विहित करण्यासाठीं हे पुढील अर्थ-वादात्मक मंत्र आहेत हें स्पष्ट झालें. तसेंच, निर्गुण ब्रह्माची उपासना विहित नाहीं. हें सांगावयाचें आहे.

पूर्वपक्षी—' ज्याची तुम्ही उपासना करित आहां तें हें ब्रह्म नव्हे, ' याप्रमाणें ब्रह्माचें उपास्यत्व विहित नाहीं, असें मागेंच ठरविलें आहे. आतां हाच अर्थ पुनः सांगण्याचा हेतु काय ?

सिद्धान्ती—मागें निर्गुण ब्रह्माची उपासना विहित नाहीं, हें सांगितलें आहे. पण आतां येथें सगुण ब्रह्माची उपासना अधिदैवीदृष्टीनें व अध्यात्मदृष्टीनें करावयास हवी, असा विधि विहित करावयाचा आहे. आणि हा विधि प्रत्यक्ष शब्दांनीं श्रुति स्वतःच सांगणार आहे, मागें उपासना त्याज्य म्हणून सांगितली, तेव्हां उपासना सर्वथा नष्ट झाली कीं काय, अशी शंका येईल, तिचें निराकरण हें कीं सगुण ब्रह्माची उपासना, नामोपासना, इत्यादि श्रुतीनें प्रारंभीं इष्टच मानल्या आहेत.

पूर्वपक्षी—पण ब्रह्म जर अज्ञेय आहे, तर त्याची उपासना तरी कशी करावयाची ?

सिद्धान्ती—येथें ब्रह्म शब्दानें परमेश्वर हा अर्थ ग्रहण करावयाचा आहे. कारण प्रत्यक्ष परमेश्वराशिवाय म्हणजे नित्य आणि सर्वज्ञ परमेश्वराशिवाय अग्न्यादिकांचा पराभव करणें, तृणाला वज्राचें सामर्थ्य देणें आणि अग्नि, वायु इत्यादिकांचें त्या तृणाला उपद्रव करण्याचें असलेलें सामर्थ्य नाहींसें करणें, या गोष्टी दुसऱ्या कोणासही साधावयाच्या नाहींत. या स्पष्ट चिन्हांवरून ' ब्रह्म ' शब्दाने परमेश्वरच अभिप्रेत आहे, हें स्पष्ट आहे.

शिष्य—खरेंच; नाहीं तर अग्नीची तृण दग्ध करण्याची शक्ति व वायूचें तृण उचलण्याचें सामर्थ्य हीं नाहींशीं होणें शक्यच नाहीं.

सिद्धान्ती—आणि तृण सुद्धां वज्रासारखें अभेद्य होतें, हें ईश्वराच्या संकल्पाव्यतिरिक्त दुसऱ्या कोणाच्याही हातून होणें नाहीं असें स्पष्ट समजतें, तेंही परमेश्वर हाच ब्रह्म शब्दाचा अर्थ केला म्हणजे योग्य आहे, असें ठरतें.

पूर्वपक्षी—पण ईश्वराची सिद्धि करण्याचें व त्याची उपासना येथें विहित करण्याचें प्रयोजन काय ?

सिद्धान्ती—जगताची नियत-प्रवृत्ति चालते, जगतांतील सर्व पदार्थ आपापलीं कामें नियमित रीतीनें करितात, हें स्पष्टपणानें समजून घेतलें असतां व अचेतनास प्रवर्तकत्व नसतें, हें ध्यानांत ठेवलें असतां, ईश्वराची सिद्धि होण्यास बळकट पुरावा मिळतो.

पूर्वपक्षी—श्रुतिस्मृतींनीं सिद्ध केलेंच आहे कीं, ईश्वर हा नित्य, सर्वज्ञ, सर्वात्मा आणि सर्व-शक्ति आहे. मग येथें हा प्रश्न घेण्याचें व तो न्यायानें सिद्ध करण्याचें मला तर कांहीं कारण दिसत नाहीं.

सिद्धान्ती—जोंपर्यंत तर्कानें एखाद्या गोष्टीचा निश्चय झाला नाहीं, श्रुति-स्मृतींनीं सांगितलेल्या गोष्टी जोंपर्यंत प्रमाणशुद्ध तर्कानें सिद्ध होत नाहींत; तोंपर्यंत शास्त्राला व शास्त्रगत सिद्धांतांना निश्चितपणा येत नाहीं.

शिष्य—म्हणजे शास्त्रांत सांगितलेल्या गोष्टी तर्क-पद्धतीनें सिद्ध होतील, तेव्हां त्या निश्चित होतात असें समजावयाचें आहे.

पूर्वपक्षी—बरें, त्या ईश्वराची अस्तित्वासिद्धि तर्काच्या सामर्थ्यावर तुम्ही करणार तरी कशी ?

सिद्धान्ती—ऐका. जें हें कार्यरूपी जगत् आपल्यास दिसत आहे, जेथें देव, गंधर्व, यक्ष, राक्षस, पितर, पिशाच इत्यादि अनेक बुद्धिमान् प्राण्यांच्या अनंत कोटी आहेत, ज्या या जगाला आकाश, अंतराल, पृथ्वी, सूर्य, चंद्र, ग्रह, नक्षत्रें इत्यादि शोभायमान व नियमबद्ध वस्तूंनीं अत्यंत व सुंदर वैचित्र्य प्राप्त झालें आहें, जेथें अनंत प्राण्यांना स्वतःच्या उपभोगासाठीं स्वस्वकर्मानुसार भिन्न भिन्न स्थानें व साधनें दृश्य होत आहेत, जे हें अत्यंत विशाल अत्यंत सुंदर आणि अत्यंत कौशल्यसूचक जगत् कोणत्याही हजारों कुशल कारागिरांस निर्मितां यावयाचें नाहीं, जेथें देश, काल, निमित्त यांस योग्य असा नियमित प्रवृत्ति-निवृत्तींचा क्रम स्पष्ट दिसतो, त्या ह्या अनंत जगाच कोणी तरी विलक्षण बुद्धीचा कर्ता असला पाहिजे, हें स्पष्ट दिसतें. कारण जीवांचें कर्म व जीवांचे भोग यांचें पूर्ण ज्ञान असून त्यांचें सहेतुक (संकल्पपूर्वक) विभाजन झालेलें दिसत आहे, यावरून स्पष्ट होतें. सारांश, या जगद्विरचना-कौशल्यानें परमेश्वरसिद्धीचें एक खासें साधन आपल्यास सांपडतें.

शिष्य—म्हणजे आपलें म्हणणें असें कीं हें अत्यंत रमणीय विश्व अनंत प्रकारच्या भिन्न प्राण्यांस कर्मानुरूप उपभोग घेण्यास उपयोगी पडतें, यावरून कर्माचें योग्य फल कोणतें आहे, हें जाणणाऱ्या कोणातरी सर्वज्ञ आणि सर्व-शक्ति चैतन्याकडून विश्वाची घटना झाली आहे, असें अनुमान निघतें. विश्व हें कार्य व त्याचा कर्ता ईश्वर असें आपण म्हणतां.

सिद्धान्ती—होय. कारण उघडच आहे कीं, अल्पज्ञ जीवांस, कोणत्या जीवाचें कोणतें कर्म आहे आणि त्या कर्माला योग्य फल केव्हां आणि कोठें दिलें पाहिजे, इत्यादि समजण्याचें सामर्थ्य नसतें. सारांश, जीवास हें जगत् उत्पन्न करितां यावयाचें नाहीं असें ठरतें. फार तर काय पण कोणाही परिच्छिन्न-बुद्धीला हें अघटित विश्व निर्माण करितां येणार नाहीं.

पूर्वपक्षी—हें जगत् केलें आहे, असें तुम्ही म्हणतां हें कशावरून ?

सिद्धान्ती—हें कार्य सहेतुक आहे, असें जर समजलें नाहीं, तर जीवादिकांमध्यें जें स्वभाववैचित्र्य दिसतें आणि अमुक कर्माचें फल अमुकच असावयास पाहिजे असे जे ठरलेले नियम दिसतात, त्यांचा उलगडा हें जगत् बुद्धिपूर्वक उत्पन्न केलें आहे, असें समजल्याविना होत नाहीं. हें जगत् स्वयंभू असतें तर स्वभाववैचित्र्य दिसतें ना ! तसेंच जगाचीं जीं लक्षणें आम्ही सांगितलीं तीं नसतीं तर ह्या जगाची उत्पत्ति बुद्धिपूर्वक झाली नाहीं, असें म्हणतां आलें असतें. पण जेथें जेथें म्हणून वैचित्र्य दिसतें, कार्य-कारी संघटना (व्यवस्थित मांडणी) दिसते, तेथें तेथें प्रत्येक भागाकडे कोणतें कार्य आहे व तें त्यानें कसें करावें, हें ज्ञान असणाऱ्या चैतन्याकडून ती वस्तु निर्माण करण्यांत आली आहे असें स्पष्ट अनुमान करितां येतें. एखाद्या घराचेंच उदाहरण घ्याना ? तेथें अनेक प्रकारच्या सोई दिसतात; घराचा प्रत्येक भाग कांहीं तरी विशिष्ट योजनेनें केलेला असतो आणि घराचे भाग, नियमित कार्यें, विशेष पद्धतीनें करीत असतात. ह्यावरून त्या घराचा योजक असला पाहिजे, असें ठरतें. हीच गोष्ट मोठमोठाले राजवाडे, वाहून नेणारे रथ, सुंदर शयनगृहें, विविध आसनें, यांची आहे. या सामान्य वस्तूंना जर कुशल निर्माणकर्त्यांची आवश्यकता आहे, तर सर्वसुंदर, सर्वविलक्षण, सर्व जीवांस वसति करण्याला योग्य, प्रत्येक कर्मास योग्य फल देण्याचें स्थान, असें विचित्र, नियमबद्ध आणि नियत-कार्यें नियत पद्धतीनें करणारें हें जगत् सर्वज्ञ आणि सर्व-शक्ति परमेश्वरानेंच केलें असलें पाहिजे, हा अनुमानसिद्ध सिद्धान्त सांगावयासच पाहिजे काय ? आत्मा हा नित्य आहे, सर्व-व्यापी आहे, सर्वज्ञ आहे, एकरस आहे, निर्विकार आहे, कार्यकारणातीत आहे, तेव्हां त्याला कर्ता नाहीं, हें ठीकच आहे; पण देशकालानुसार नियमित कार्यें नियमानें करणाऱ्या जड जगाला कोणी तरी ज्ञानी कर्ता असणें हें अवश्य आहे.

पूर्वपक्षी—केवल कर्मानेंच हें जगत् उत्पन्न होत असेल !

सिद्धान्ती—नाहीं. कारण कर्म हें कर्त्याच्या तंत्रानें चालत असतें. कर्म फल उत्पन्न करितें हें खरें; पण येथें कर्म निमित्त मात्र असतें. कर्त्याचें ज्ञान आणि कर्त्याचे हेतु हीं फलनिष्पत्तीचीं मुख्य कारणें असतात. तेव्हां परतंत्र कर्माला ' जगताचें कारण ' असें म्हणतां येत नाहीं.

पूर्वपक्षी—येथें उपभोगांचें वैचित्र्य दिसतें हें खरें. विचित्र साधनें आणि विचित्र प्राणी दिसतात हेंही खरें, त्याचप्रमाणें देश, काल आणि निमित्त यांस अनुसरूनच नियत-प्रवृत्ति, नियत-निवृत्ति, योग्य क्रमानें होतात, हेंही खरें. तथापि हें सर्व योग्य मार्गानें करण्याला नित्य, सर्वज्ञ, आणि सर्वशक्ति परमेश्वराचीच अपेक्षा आहे असें ठरत नाहीं.

शिष्य—तर मग ह्या जगताची नियत व्यवस्था चालते तरी कशी ?

पूर्वपक्षी—कर्माच्या योगानें चालतें. कर्माचा प्रभाव अचिंत्य आहे. फल पाहिलें म्हणजे अमुक प्रकारचें कर्म असतें असें आपल्यास समजतें. फलाचा हेतु (कारण) कर्मच असतें. कर्म दृश्य आहे, तेव्हां हें दृश्य निमित्त टाकून देऊन न दिसणारा ईश्वर स्वीकारावयाचा, त्याच्या ठिकाणीं अमुक फल करण्यास अमुक हेतु पाहिजे, असा धर्म स्थापन करावयाचा आणि शेवटीं सर्वांस पितृस्थानीं असणारा ईश्वर सारख्या रीतीनें वागवीत नाहीं म्हणून तो पक्षपाती आहे व निर्दय आहे अशा दुष्ट दोषांचा त्यावर आरोप करावयाचा, हें सर्व माझ्या समजुतीनें अनावश्यक आहे. कर्मानेंच जर सर्व गोष्टींचा उलगडा होतो, कर्म-वैचित्र्याप्रमाणें फल-वैचित्र्य असतें, असा जर सर्व-सामान्य सिद्धान्त आहे व हें जर ध्यानांत ठेवलें, तर ईश्वराची निरर्थक कल्पना घ्यावी लागत नाहीं; तसेंच, नित्य व नित्य-सर्वज्ञ व नित्य सर्व-शक्ति परमेश्वर हाच फल देणारा आहे, असेंही समजण्याचें कारण राहत नाहीं.

सिद्धान्ती—येथें उपभोगाचें वैचित्र्य आहे, म्हणून कर्मानेंच हें सर्व विश्व उत्पन्न केलें, हें युक्तीला जुळत नाहीं.

पूर्वपक्षी—कशावरून म्हणतां हें आपण ?

सिद्धान्ती—कर्म हें नेहमीं कर्त्याच्या तंत्रानें चालत असतें. बुद्धिमान् पुरुषाचा प्रयत्न कर्म करण्यास अवश्य असतो, व तो प्रयत्न संपला म्हणजे कर्मही संपत असतें. असें आहे म्हणून, कर्तृ-तंत्र कर्म आहे म्हणूनच देशांतरीं किंवा कालांतरींसुद्धां नियमित कर्त्याला नियमित फल निश्चितत्वानें मिळतें, हा अनुभव आहे. तेव्हां आत्मस्वरूपाखेरीज अन्यकोणी सृष्टीचा कर्ता आहे, असें म्हणणें युक्तीला शोभत नाहीं. कारण, देशांतरी किंवा कालांतरी निश्चितफल उत्पन्न करण्याचें सामर्थ्य जड व क्षणिक कर्माला नाहीं. कोणत्या तरी स्थळीं व कोणत्या तरी काळीं उत्पन्न होऊन नष्ट होणारें जड कर्म अन्यस्थळीं व अन्य काळीं फल उत्पन्न करण्यास समर्थ असणें शक्य नाहीं. तेव्हां सर्व ठिकाणीं व सर्व कालीं असणारा व कर्माचे नियम चालविणारा परमेश्वरच सृष्टीचा कर्ता असला पाहिजे.

पूर्वपक्षी—जीवच कर्ता आहे व फलाचा व कालाचा योजक तोच आहे. 'मी कर्म करितों आहें, माझ्या इच्छेच्या अनुरूप मला फल मिळालें पाहिजे' असें जीव नेहमीं म्हणतो. तेव्हां जीव कर्मकर्ता आहे म्हणून सृष्टीचा कर्ता ईश्वर नसून जीव आहे हें ठरेल.

सिद्धान्ती—नाहीं. हें अनुभव-विरुद्ध म्हणणें योग्य नाहीं. जीवाला भिन्न देश, भिन्न काल आणि भिन्न निमित्तें ठाऊक नसतात, तो सर्वज्ञ व सर्व-

शक्ति नसतो. म्हणून विशेष कर्माचें फल विशेष कालीं व अमुक स्थलीं अमुकच होईल, असें त्याला सांगतां येत नाहीं व विशेष फल उत्पन्न करण्याचें सामर्थ्यही त्याला नाहीं.

पूर्वपक्षी—कशावरून ?

सिद्धान्ती—जर कर्त्याला काल-देश-विशेष ठाऊक असून स्वतंत्रतेनें कर्माचा विनियोग करण्याचें पूर्ण सामर्थ्य असेल तर तो स्वतःच अनिष्ट असणाऱ्या अरिष्टकारी कर्माचा व फलाचा प्रयोजक कां झाला असता ? या सृष्टीमध्यें जीवास नको असणारीं अनंत फलें नित्य दृग्गोचर होतात. यावरून जीव स्वतंत्र कर्म-कर्ता नाहीं, सृष्टि करण्यास तो समर्थ नाहीं, असें स्पष्ट होतें.

पूर्वपक्षी—तुम्ही म्हणतां हें खरें; कर्त्याच्या इच्छेविरुद्ध कर्म-फल होत असतें हें खरें; तेव्हां अनिष्ट व इष्ट फलें उत्पन्न होतात, तीं कर्त्या सहवर्तमान असणारें कर्म कांहीं एक कारण नसतां फल उत्पन्न करित असेल, असें म्हणूं या.

शिष्य—म्हणजे काय ?

पूर्वपक्षी—म्हणजे कर्ता कर्म करितो; पण फल उत्पन्न होतें, तें कर्मानें उत्पन्न केलेल्या अदृष्टानें मात्र कांहीं एक निमित्तकारण नसतां उत्पन्न होत असतें. तें फल उत्पन्न करण्याविषयीं कर्त्याची इच्छा नसते व कर्मालाही फल उत्पन्न करण्याचें सामर्थ्य नसतें. पण कर्म झालें म्हणजे तें फल उत्पन्न होतें. त्याला निमित्त असावें लागत नाहीं. अदृष्टाच्या अस्तित्वानें फल उत्पन्न होतें. शरीरावरील कातडें वाढतें किंवा सुरकततें याला कांहीं निमित्त नसतें. तसेंच हे. हें वृद्ध मीमांसकांचें मत आहे, हें ध्यानांत ठेवा.

शिष्य—मत कोणाचेंहि असो; त्या मीमांसकांच्या व तुमच्या या म्हणण्याला दुसरा दृष्टांत आहे काय ? हें म्हणणें उदाहरणानें सिद्ध करून दाखवाल का ? नुसते चर्माला विकार होतात ते सुद्धां निमित्ताशिवाय होत नाहींत. निमित्ताशिवाय फल उत्पन्न होणें अशक्यच आहे.

पूर्वपक्षी—तुम्हीं आमचें म्हणणें समजला नाहीं. एखादा लोहचुंबक घेऊन आपण तो लोखंडाजवळ नेला, म्हणजे तो चुंबक लोखंड आकर्षण करावयास लागतो. आपण तेथून दूर सरलों तरी चुंबकाचें लोहाकर्षण थांबत नाहीं. याप्रमाणें जीवानें कर्म केलें म्हणजे कर्म हें स्वतःच कांहीं अपूर्वयोगानें फल उत्पन्न करीत असतें. हें सौगतांचें म्हणणें आहे.

सिद्धान्ती—हा तुमचा व सौगतांचा केवळ भ्रम आहे. इंद्रियांस व पदार्थास जो प्रेरक प्रेरणा करितो त्याला प्रधान कर्ता असें म्हणतात. तो विद्यमान असेल, तर फल उत्पन्न होईल. हें होईपर्यंत कर्मासह त्याचें अस्तित्व अवश्य असतें.

पूर्वपक्षी–कशाला ?

सिद्धान्ती—फलकालपर्यंत कर्ता विद्यमान नसला तर कर्म न करणाऱ्या पुरुषास फल प्राप्ति होईल आणि कर्म करणाऱ्या पुरुषास फलप्राप्ति होणार नाहीं. हें अकृताभ्यागम (न करून फल मिळणें) व कृतप्रणाश (करून फल न मिळणें) यांचें उत्तम उदाहरण आहे. असो; अर्थातच हा मोठा दोष आहे हा दोष तुमच्या विचारसरणीनें प्राप्त होतो. पण सृष्टीमध्यें असा दोष म्हणजे अव्यवस्था दिसत नाहीं, म्हणून तुम्ही म्हणतां, हें युक्तीला व शास्त्राला जुळत नाहीं.

पूर्वपक्षी—मीं कर्मवाद्यांचा पक्ष सोडून देतों आणि चार्वाकाचा पक्ष स्वीकारून असें म्हणतों कीं, हीं दिसणारीं चार महाभूतेंच सृष्टीची उत्पत्ति करितात.

सिद्धान्ती—तीं तर केवळ साधनें आहेत ! कर्ता जी जी क्रिया करितो, त्याला हीं तुमचीं चार नव्हेतच; पण पांच हीच महाभूतें साधनें मात्र होत असतात. कर्त्याचा व्यापार या पंचमहाभूतांवरच त्यांच्या साहाय्यानें होत असतो. तसेंच कर्म संपल्यानंतर कर्ता ह्यांचा त्यागही करीत असतो. जसा शेतकीचा कार्यभाग आटपला म्हणजे नांगराला आपण एकीकडे टाकून देतों, त्याप्रमाणें कर्त्याचें कर्म संपलें म्हणजे तो या पंचमहाभूतांचा त्याग करीत असतो. याप्रमाणें हीं केवल साधनभूत असणारीं जड पंचमहाभूतें कालांतरानें फल उत्पन्न करण्यास समर्थ असणें शक्य नाहीं. अहो ! मळणी आटपल्यावर नांगरानें कधीं तांदूळ शेतकऱ्याच्या घरांत आणून टाकलेले पाहिलें आहे, काय ? असो; पण याचा वाद कशाला पाहिजे ? हीं पंचमहाभूतें आणि कर्मठांचीं कर्में स्वत; अचेतन असल्यामुळें त्यांना स्वतंत्रतेनें व्यापार करण्याचें सामर्थ्यच नाहीं. तेव्हां यांच्या हातून सृष्टीची व्यवस्थित रचना होणें केव्हांही शक्य नाहीं.

पूर्वपक्षी—जड वायुसुद्धां नाहीं का स्वतःच्या प्रेरणेनें व्यापार करीत ?

सिद्धान्ती—नाहीं. हें तुमचें म्हणणें तुम्हांला सिद्धच करितां येणार नाहीं. स्वरूपानें जड वस्तूला स्वतंत्र प्रवृत्तिच नाहीं. रथादि जे जड पदार्थ आहेत ते स्वतः इष्ट कर्म करण्यास कधीं तरी स्वतंत्रतेनें प्रवृत्त होतात काय ? हीच कथा वायूची !

पूर्वपक्षी—पण शास्त्रांत तर अमुक कर्म अमुक फल उत्पन्न करितें, असें सांगितलेलें आहे. तेथें ईश्वर, हें फल देतों असें परोक्ष रीतीनें सुद्धां म्हटलेलें नाहीं. ज्याला स्वर्ग हवा आहे त्यानें यज्ञ करावा, असें शास्त्र सांगतें. यज्ञ हा स्वर्ग–फल देणारा आहे, हें शास्त्रानें ठरतें. तसेंच, हें फल कालांतरानें मिळत असतें. फलनिष्पत्तीपर्यंत यज्ञकर्म व यज्ञकर्ता येथें विद्यमान नसतो. वैद्यानें दिलेल्या औषधांसही विशिष्ट फल म्हणजे आरोग्यादि फल देण्याचें सामर्थ्य असतें. हा आपला अनुभव आहे. यावरून कर्म स्वतः फल उत्पन्न करितें हें आमचें म्हणणें शास्त्रप्रमाण व युक्तिप्रमाण आहे. त्याचप्रमाणें ईश्वराचें अस्तित्व सांग-

णारें दुसर प्रमाणही नाहीं. फल उत्पन्न होतें. म्हणून फलदाता ईश्वर असला पाहिजे, असेंही अर्थापत्तीनें म्हणतां येत नाहीं. कारण, येथें कर्मालाच फल उत्पन्न करण्याचें सामर्थ्य आहे.

सिद्धान्ती—हें तुमचें म्हणणें बरोबर नाहीं; कारण कर्म आणि फल यांच्यामध्यें जेव्हां कालाचें अंतर असतें, तेव्हां कर्माच्या फलाचा कर्ता कोणीतरी चैतन्यवान् असतो, असा सर्वत्र अनुभव आहे. हा अनुभव तुमच्या म्हणण्यानें अयोग्य ठरेल. श्रुतीनें विहित केलेल्या कर्मांचें कालांतरानें फल उत्पन्न करणारा परमेश्वर मानल्या शिवाय गत्यंतर नाहीं. अनुभवही तसा नाहीं. अनुभव व अनुमान हीं विरुद्ध असतां तुमची कल्पना योग्य आहे, हें ठरविणें अशास्त्रीय आहे, शास्त्रशुद्ध नाहीं. पुनः, असें लक्षांत ठेवा कीं, क्रिया ही दोन प्रकारची असते. कांहीं क्रियांचीं फलें दृष्ट होतात; कांहींचीं अदृष्ट असतात. दृष्ट फलात्मक क्रियाही दोन प्रकारच्या असतात. कांहीं क्रियांचें फल तत्काल होतें व कांहींचें फल सावकाश होतें. तत्काल फलप्रद होणाऱ्या क्रिया ह्या जाणें, उपभोग घेणें, या लक्षणाच्या असतात, कालान्तरानें फलप्रद होणाऱ्या क्रिया कृषि–कर्म किंवा सेवा–कर्म या लक्षणाच्या असतात. तत्काल फलप्रद होणाऱ्या क्रिया फलोदय होतांक्षणीं नष्ट होतात. आणि येथें फल देणाऱ्या कोणाचीं अपेक्षाच नसते. पण कालांतरानें फलप्रद होणारी क्रिया उत्पन्न झाल्याबरोबर नाश पावते म्हणून येथें फलदात्याची अपेक्षा असते. पहा कीं ज्या पृथ्वीची अथवा राजाची आपण सेवा करितों, त्याच्या अधीन कृषिकर्मांचें किंवा सेवेचें फल असतें. तेव्हां कर्म हें स्वतंत्र आहे, किंवा स्वतंत्रतेनें तें फल देतें, असें म्हणणें म्हणजे वर दोन जीं प्रमाणें सांगितलीं, त्यांचा अनादर करणें होय. तसेंच, कमफल–प्राप्ति होत असतां जो अनुभव आपल्यास येत असतो, (म्हणजे कर्मकरणारा व कर्मफल देणारा चैतन्यवान् असतो असें ज्ञान असतें, तो ही अनुभव सोडून देणें योग्य नाहीं. असें आहे म्हणून यज्ञादिकर्म संपल्यानंतर नित्य सर्वज्ञ (कर्ता, कर्म, आणि फल यांचे विभाग जाणणारा) ईश्वरच यागादिकांस योग्य असणारें फल देतो, हें म्हणणें न्याय्य आहे. सेवा केली असतां ज्याप्रमाणें स्वामी सेवकाला सेवेच्या अनुरूप फल देतो, त्याप्रमाणेंच ईश्वरही यज्ञादिकर्मानुरूप स्वर्गादि फल देत असतो.

शिष्य—या ईश्वराचें स्वरूप काय?

सिद्धान्ती—तो सर्वांच्या हृदयांत अधिवास्तव्य करणारा आत्माराम आहे. तोच सर्व सुकृतदुष्कृत कर्मांचा, स्वर्ग–पुत्र–धन–नरकादि फलांचा व सुखदुःखादि-अनुभवाचा साक्षी आहे. तो ज्ञानरूप आहे आणि वासना व अभिमान इत्यादि संसार-धर्मांनीं तो मलीन झालेला नाहीं. सारांश, तो नित्य, बुद्ध, शुद्ध, आणि मुक्त असा आहे.

शिष्य—हा न्याय-दृष्टीनें विचार झाला; पण याला कांहीं श्रुतीचा आधार आहे का?

सिद्धान्ती—हो हो!! हें काय विचारावें 'तो संसारातीत असल्यामुळें संसार-दुःखांनीं लिप्त होत नाहीं' तो जरा आणि मृत्यु यांच्या पलीकडे असून त्यांचें नियमन करणारा आहे' 'तो अजर आणि अमर आहे.' 'तो सत्य-काम, सत्य-संकल्प, सर्वेश्वर, जीवांकडून पुण्यकर्में करवितो,' 'कोणत्याही प्रकारचा उपभोग न घेतां हा सर्वज्ञ सर्व-साक्षी असतो.' 'हे गार्गि! ह्या क्षरशून्याच्या (आत्म्याच्या) शासनानें' इत्यादि श्रुति स्पष्ट सांगतात कीं, आत्मा हा एक आहे, असंसारी आहे व नित्यमुक्त आहे. हजारों स्मृतिही याच अर्थाचे प्रतिपादन करून ईश्वराचें अस्तित्व सिद्ध करितात.

पूर्वपक्षी—हे सर्व अर्थवाद आहेत. कर्मशास्त्रामध्यें जे विधि सांगितले आहेत, त्यांच्या स्पष्टीकरणासाठीं हीं वाक्यें सांगितलीं असतील.

सिद्धान्ती—नाहीं. वेदांतांतील वाक्यें विधिशेष म्हणजे विधींच्या व कर्मांच्या अंगभूत असणारीं हीं वाक्यें नव्हेत. हीं स्वतःप्रमाण आणि ज्ञान-बोधक अशीं वाक्यें आहेत. या वाक्यांवरून उत्पन्न झालेल्या ज्ञानाचा केव्हांही बाध होत नाहीं. म्हणून तीं कर्मविधि-वाक्यांप्रमाणेंच स्वतःप्रमाण आहेत. आणखी; ईश्वर नाहीं असा निषेधही श्रुतींत आढळून येत नाहीं.

पूर्वपक्षी—ईश्वराचे संबंधानें कांहीं बोलण्याचा प्रसंगच नाहीं, म्हणून निषेध नाहीं, दुसरें काय?

सिद्धान्ती—नाहीं, ईश्वराचा उच्चार पुष्कळ वेळ झालेला आहे.

पूर्वपक्षी—उच्चार झाला असेल; पण प्रतिषेध करण्याचें कारणच प्राप्त झालें नाहीं, म्हणून निषेधही केला नाहीं? काम-क्रोधादिकांनीं प्राप्त झालेल्या हिंसेचा निषेध करणें अवश्य आहे. तसें येथें कांहींच नाहीं.

सिद्धान्ती—तसेंही नाहीं, ईश्वराचें अस्तित्व प्रमाण-शुद्ध रीतीनें शास्त्रामध्यें सिद्धही केलें आहे.

शिष्य—भगवन्! प्रतिषेध नाहीं, या सूत्राचा असा अर्थ करावा कीं, कर्मांचें फल प्राप्त होत असतां ईश्वर, काल, इत्यादिकांचा निषेध केला नाहीं; म्हणूनच ईश्वराचें अस्तित्व सिद्ध होतें, मी म्हणतों, त्याचें तात्पर्य हें:—स्वर्गकामी पुरुषानें यज्ञ करावा हा विधि, यज्ञाचें फलदान-सामर्थ्य स्पष्ट करितो, पण त्या बरोबर विद्यमान असणारीं ईश्वर-कालादि सहकारी-कारणें यांचा निषेध करित नाहीं. कर्माला तर फल देण्याचें स्वतः सामर्थ्य नाहीं, निमित्त नसेल तर स्रक् (माला) चंदनादि ही फलद्रूप होत नाहींत. तेव्हां दुसऱ्या प्रमाणांनीं सिद्ध झालेलीं ईश्वर-

काल–इत्यादि निमित्त कारणें फल देणारीं असतात, असें सिद्ध होतें. तसेंच, यज्ञ संपतांक्षणीं नष्ट झालेलें जें जड यज्ञ–कर्म तेंही कालांतरानें फल देण्यास समर्थ असत नाहीं. फलरूपी कार्याला कारण तर अवश्य हवें. केवल हें कारण फलापूर्वी अस्तित्वांत असलें पाहिजे, अपूर्वानें किंवा अदृष्टानें फल उत्पन्न होतें, हें म्हणणेंही योग्य नाहीं; कारण या जड अदृष्टाचा कोणी तरी चालक अवश्य आहे. सारांश, अचेतन कारणांचा उपयोग निदान कालांतरीं घडणाऱ्या कार्यांत होत नाहीं. तेव्हां सेव्य–बुद्धि धारण करून सेवकानें स्वामीची सेवा केली असतां, स्वामी जसा कालांतरानें प्रसन्न अथवा फलप्रद होतो, त्याप्रमाणें सर्वज्ञ जो ईश्वर त्याच्यावर श्रद्धा ठेवल्याकारणानें ईश्वराचा अनुग्रह संपादन केला असला म्हणजे व यज्ञादिकर्माचा नाश झाला असला तरी ही, यज्ञकर्त्यास ईश्वर यज्ञफल देतो, हेंच म्हणणें योग्य आहे.

सिद्धान्ती—म्हणून अहो! आक्षेपक महाराज! हजारों वाक्यें जरी तुम्हीं बोललांत, तथापि पदार्थाचें जें स्वस्वरूप आहे तें कालांतरीं किंवा स्थलांतरींही तुमच्या बोलण्यानें अन्यथा व्हावयाचें नाहीं. कोठेंही गेलांत किंवा कोणत्याही मन्वन्तरांत असलांत, तरी अग्नि हा केव्हांही शीत होणार नाहीं; हें नेहमीं लक्षांत ठेवा. याच न्यायानें जड कर्म केव्हांही स्वतंत्रतेनें फल देण्यास समर्थ असणार नाहीं. फल देण्याला ज्ञानवंताचें साहाय्य अवश्य आहे. असो; आतां आपण कालांतरानें फल उत्पन्न होतें, त्या फलाचा विचार करूं. कालांतरानें जीं फलें उत्पन्न होतात; तीं दोन प्रकारचीं असतात. कृष्यादि जीं कर्में आहेत तेथें बीज व क्षेत्र यांस कोणकोणते संस्कार करावयाचे, त्यांचें रक्षण कसें करावयाचें, यांचें जसें व जितकें ज्ञान कृषीवलांस (शेतकऱ्यांस) असेल, त्याप्रमाणें त्याला फल प्राप्त होतें. तसेंच, ज्याची आपण सेवा करितों, त्याच्या बुद्धीला ज्याप्रमाणें संस्कार झाले असतील, त्याप्रमाणें सेवकाला फल मिळतें. आतां यज्ञादि जीं कर्में आहेत त्यांचे फल अज्ञानी कर्त्याला (अल्पज्ञ जीवाला) त्याच्या ज्ञानानुसार मिळणें योग्य नाहीं व मिळतही नाहीं. तेव्हां कालांतरानें उत्पन्न होणारें जें फल तें कर्म, देश, काल, निमित्त इत्यादिकांचे परिणाम व विभाग जाणण्याचें सामर्थ्य ज्या सर्वज्ञ बुद्धीला आहे, तिच्या अनुरोधानें–यज्ञादिकांचें फल-मिळतें. सेवादि–कर्माला योग्य फल कोणतें? ज्ञानी स्वामीची सेवा केली असतां जें फल मिळतें तें स्वामीच्या बुद्धि–संस्काराची अपेक्षा करित असतें. शेतकीचें फल प्रायः शेतकऱ्याच्या ज्ञानावर अवलंबून असतें. तशी यज्ञादि कर्माच्या फलाची गोष्ट नाहीं. तीं कर्में स्वामीच्या म्हणजे ईश्वराच्या बुद्धिसंस्काराची अपेक्षा करितात. श्रुतिविहित कर्माचें फल तर कालांतरानें श्रुतीनें सांगितल्याप्रमाणें मिळतें. म्हणून हें सिद्ध झालें कीं, सर्वज्ञ आणि भूतांतरात्मा जो ईश्वर तो सर्व जीवांच्या बुद्धीचा कर्माचा व फलाचा विभाग–साक्षी असतो. कोणत्या कर्माला कोणतें फल द्यावें,

हें ईश्वर ठरवितो. सारांश, ज्ञानी ईश्वरच यज्ञादिविहित कर्मांस योग्य फल कालांतरानें देतो, अर्से म्हटल्यावांचून गत्यंतर नाहीं.

पूर्व०—ह्याला आधार ?

सिद्धान्ती—ऐका.

'जो साक्षात् आणि अपरोक्षत्वानें सर्वांचा आत्मा व सर्वांचा अंतर्यामी आहे' अशी श्रुति आहे. 'हाच सर्व जंतूंचा आत्मा आहे' 'हाच द्रष्टा, श्रोता, मंता, व विज्ञाता आहे. याच्याशिवाय दुसरा विज्ञाता नाहीं' याप्रमाणें अनेक श्रुति 'दुसऱ्या सर्वज्ञ विज्ञात्याचा निषेध करितात' 'तें तूं आहेस' ही श्रुति तर प्रत्यक्ष परमात्मा हा जीवांचा आत्मा आहे, असा उपदेश करिते. असो; याप्रमाणें नास्तिकमत खंडित झालें व ईश्वर हा जीवांचा आत्मा ठरला.

शिष्य—खरेंच आहे. मातीच्या पिंडाला कोणी सुवर्णाचा गोळा, असें म्हणेल काय ? कोणी शहाणा पुरुष झाला तरी सुवर्णालाच सुवर्ण म्हणतो. 'परमात्मा हा जीवाचा आत्मा आहे,' हें श्रुतीनें सांगितलें आहे. म्हणून तो सर्वांचा आत्मा असलाच पाहिजे.

पूर्वपक्षी—हें बोलणें असत् आहे. परमात्म्याचें ज्ञान, त्याची शक्ति व त्याचें कर्म हीं अनंत आहेत आणि जीवाचे ज्ञानादि धर्म अल्प आहेत. परमात्मा उपास्य, शुद्ध, आणि मुक्त आहे. पण जीवात्मा उपासक, अशुद्ध आणि बद्ध आहे. तेव्हां जीवात्म्याला 'परमात्मा' असें कसें म्हणतां येईल ? परमात्मा तरी जीवाच्या बरोबरीचा कसा होईल ? तात्पर्य, तुम्हांस परमात्मा आणि आत्मा यासंबंधानें श्रुतीचें काय म्हणणें आहे, हें समजलें नाहीं. सर्वत्र आत्मभेद आहे, आणि तो तुम्हीं मान्य केलाच पाहिजे.

सिद्धान्ती—नाहीं. हा जो भेद तुम्ही सांगत आहांत, हा केवल अपवाद आहे. हा भेद पारमार्थिक नाहीं.

पूर्व०—हा भेद पारमार्थिक आहे; इतकेंच नव्हे, पण हा भेद तुमच्या सर्व सिद्धान्तांचा महा-मारक आहे. तुम्हीं असें म्हटलें आहे कीं, संसारी जीव आणि ईश्वर एकच आहेत; पण हें सर्वथा खोटें आहे. कारण उभयतांमध्यें विलक्षण भेद आहे.

शिष्य—तो कसा ?

पूर्व०—उभयतांचीं लक्षणें भिन्न आहेत, अश्वाला जसा महिष म्हणतां येत नाहीं (किंवा रेड्याला घोडा म्हणतां येत नाहीं) त्याप्रमाणें जीवाला ईश्वर किंवा ईश्वराला जीव म्हणतां येत नाहीं,

शिष्य—कोणता हा लक्षण-भेद आहे उभयतांमध्यें ?

पूर्व०—ऐका: ईश्वराचें ज्ञान नित्य असून सर्वविषयक असतें. तो नित्य ज्ञानी आणि सर्वज्ञ आहे. सूर्यप्रकाशाप्रमाणें त्याचें ज्ञान नित्य आणि सर्व-प्रकाशक आहे. संसारी जीवाचें ज्ञान अनित्य आणि अल्पविषयक आहे. याचप्रमाणें उभयतांमध्यें शक्ति-भेद आहे. ईश्वराची शक्ति नित्य आणि सर्व-कर्त्री आहे, जीवाची शक्ति अनित्य आणि अल्प आहे. ईश्वराचें कर्म ज्ञानरूप आत्मसत्तेनें मात्र होतें. उष्ण-द्रव्य-सत्तामात्र असणारा अग्नि जसा नित्य दाहक असतो त्याप्रमाणें ईश्वराचें कर्म नित्य ज्ञानरूप असतें. राजा, लोहचुंबक, इत्यादिकांप्रमाणें ईश्वर कर्म करित असतांही त्याच्या स्वरूपांत कोणताही विकार उत्पन्न होत नाहीं. कर्म करित असतां जीवाच्या स्वरूपांत विपरीतपणा प्राप्त होतो. पुनः 'उपासना करित जावी' हें वाक्य स्पष्ट सांगतें कीं, राजाप्रमाणें व गुरूप्रमाणें ईश्वर हा उपास्य आहे; आणि शिष्याप्रमाणें व सेवकाप्रमाणें जीव उपासक आहे. आणखी; 'ईश्वर पापशून्य आहे व पापविनाशक आहे.' ह्या श्रुतिवाक्यानें तो नित्य शुद्ध आहे असें ठरतें. पण 'पुण्य कर्मानें पुण्यशील होतो' असें जीवासंबंधानें म्हटलें आहे, म्हणून तो नित्यशुद्ध नाहीं असें ठरतें. म्हणूनही ईश्वर नित्य मुक्त आहे आणि संसारी जीव नित्य अशुद्ध असल्यामुळें बद्ध आहे. शिवाय, जेथें ज्ञानादि लक्षणांनीं युक्त दोन पदार्थ असतात, तेथें नित्य भेद असतो. उदाहरणार्थ अश्व-महिषांमध्यें असणारा भेद घ्यावा. म्हणून ज्ञानादि लक्षणांनीं भिन्न असलेले जीव आणि परमेश्वर यांच्यामध्यें नित्य भेद असलाच पाहिजे. तुमचीं अभेद वाक्यें अन्याय्य ह्याणि अशास्त्रीय आहेत.

सिद्धान्ती—हें तुमचें बोलणें व्यर्थ आहे. उभयतांमध्यें (जीवशिवांमध्यें) भेद नाहीं.

शिष्य—हें कसें ?

सिद्धान्ती—"'मी अन्य आहें, आत्मा अन्य आहे,' असें ज्याचें अज्ञान नष्ट झालें, "जीवशिवांमध्यें भेद नाहीं' असें ज्ञान ज्याला झालें, तो ज्ञानी होय. असे लोक 'अक्षय्य लोकाला जातात;'" पण ज्यांना भेदज्ञान आहे ते 'क्षय्य लोकाला जातात.' 'ज्याला भेददृष्टि आहे तो जन्ममरणाच्या चक्रांत सांपडतो म्हणून भेददृष्टि नाहींशी व्हावी.' अशीं एकत्व सांगणारीं श्रुतिवाक्यें सहस्रशः हवीं तितकीं सांपडतील.

पूर्वपक्षी—पण आम्ही ज्ञानादि-लक्षण भेद जीवशिवांमध्यें दाखविले आहेत, त्यांची व्यवस्था कशी लावितां ?

सिद्धान्ती—ऐका या उभयतांमध्यें भेद आहे, असें आम्ही ग्रहणच करित नाहीं. बुद्ध्यादि उपाधींपासून मुक्त झालेले व उपाधिविलक्षण असणारे

जीवात्मे परमेश्वराहून भिन्न लक्षणाचे आहेत, ही गोष्टच खरी नाहीं. सर्वत्र एकच आत्मा आहे. जो आत्मा तोच ईश्वर होय. हाच सर्व भूतांचा आत्मा आहे. तो नित्यमुक्त आहे. हा श्रुतीचा, शास्त्रांचा (प्राचीन व अर्वाचीन शास्त्रांचा) व अनुभवाचा नित्य सिद्धान्त आहे. बाह्य असणाऱ्या इंद्रिय, मन, बुद्धि, इत्यादिकांच्या समुदाय–संततीनें उत्पन्न झालेले अहंकार, ममत्व इत्यादि जे विपरीत अनुभव त्यांच्या पाशामध्यें अखंड सांपडलेला असतांही ज्याच्या अंतर्यामीं नित्य, शुद्ध, बुद्ध, आणि मुक्त ज्ञानरूपी आत्मारामाचे वास्तव्य आहे, ज्याला नित्य विज्ञानाचा प्रकाश आहे, जो विषय–ज्ञान, सुखदुःखादि-विकार, अज्ञान आणि अज्ञानजन्य शरीर, यांचा आश्रय आहे, तो जीव किंवा जीवात्मा कल्पित आहे, तो अनित्य–ज्ञानरूप आहे. ईश्वरविलक्षण आहे, असें श्रुतीचें सांगणें आहे, सारांश, संसारामध्यें किंवा मायेमध्यें सांपड-लेला जीव मायिक आहे, असत् आहे, अज्ञानानें उत्पन्न केलेला आहे, खरा नाहीं, असें श्रुतीचें सांगणें आहे. बिंबरूपी आत्मा खरा आहे; प्रतिबिंबरूपी जीवात्मा कल्पित आहे. आरशांतलें प्रतिबिंब खरें नसतें, पण बिंब खरें असतें; आत्मा खरा आहे, जीव स्वरूपतः खरा नाहीं. जीवाची स्वतंत्र सिद्धि तुम्हांस करितां यावयाची नाहीं. तुम्ही सिद्ध करावयाची गोष्ट खरी धरून चालत आहांत. सारांश, उपाधि नष्ट झाले म्हणजे जीव व शिव एकत्र आहेत असें होतें.

पूर्वपक्षी—हें असेल, पण हें ज्ञान होण्याचा उपयोग काय ?

सिद्धान्ती—फल काय ? उपयोग काय ? अहो ! जीवात्मक अज्ञान नाहींसे झालें नाहीं तर संसार व संसार–दुःखें नित्य प्राप्त होतात. पण अज्ञान नाहींसें झालें तर मोक्ष मिळतो !

पूर्वपक्षी—जीवाचें राहूं द्या; पण देह हा आत्मा आहे, हें तर प्रत्यक्ष दिसतें कीं नाहीं ! याला तुम्ही कल्पित कसें म्हणणार ?

सिद्धान्ती—अहो ! देह मृत्–पिंडासारखा नाहींसा होतो, हे आपण प्रत्यक्ष पाहतों. मग तो देह देवांचा असो, पितरांचा असो, मनुष्याचा असो; किंवा आणखी कोणाचा असो. देह हा नश्वर असणाऱ्या पंचमहाभूतांनीं घडाविलेला असतो; म्हणून देह अनित्य आहे, असें ठरतें. आत्मा अनित्य नाहीं, असा श्रुतीचा उपदेश आहे. याप्रमाणें बुध्यादि उपाधींनीं युक्त झालेले *जीवात्मे कल्पित आहेत व जीवाचें शरीर नश्वर आहे. तेव्हां हे दोन पक्ष असत् आहेत, हें ठरलें. उपाधिशून्य आत्मे परमेश्वराहून निराळे आहेत,* असें म्हणण्याला प्रत्यक्ष प्रमाण नाहीं, किंवा श्रुतिप्रमाणही नाहीं. याप्रमाणें तिसरा पक्ष संपला. चवथी कल्पना उत्पन्न होणें शक्यच नाहीं. ईश्वराहून आत्मा भिन्न आहे, असें सिद्ध करण्यासाठीं तुम्ही उपाधियुक्त आत्मा पुढें आणिला; पण तो कल्पित आहे, असें आम्ही श्रुतींच्या आधारानेंच सांगितलें. तुमचा देह

हाच आत्मा हा सिद्धान्त देहाच्या नश्वरत्वामुळें खोटा आहे, असें आम्ही ठरविलें. आणि बुध्यादि उपाधींनीं अयुक्त अशा परमात्म्याहून निराळा आत्मा प्रत्यक्ष दिसत नाहीं व श्रुतीनें सांगितला नाहीं म्हणून तो पक्षच उत्पन्न होत नाहीं असेंही ठरविलें. सारांश, ईश्वराहून जीवात्मा निराळा असणें अशक्य आहे; अथवा सर्व उपाधींमध्यें ईश्वरच आत्म-रूपानें राहतो. उपाधि मात्र ईश्वर नव्हे हें ठरलें.

पूर्वपक्षी—हें तुमचें म्हणणें शास्त्रशुद्ध दिसत नाहीं. कारण ईश्वर मुक्त आहे आणि जीव बद्ध आहे. ईश्वर सुखदुःखातीत आहे, जीव सुखदुःखादि ग्रहण करणारा आहे. तेव्हां हे उभयतां भिन्न असलेच पाहिजेत, हें स्पष्ट आहे.

सिद्धान्ती—नाहीं. आत्म्याचें स्वरूप असंसारी आहे, जीवाचें स्वरूप संसारी आहे, हें खरें; परंतु जीव कल्पित आहे म्हणून उभयतांमध्यें विरोध येत नाहीं. भेद-कल्पना स्थित होण्याला जीवाचें वास्तव्य वास्तविक हवें; पण तें तसें नाहीं. आत्म्या-शिवाय (परमेश्वराशिवाय) दुसरा चेतनच नाहीं, मग भेदाला आश्रय कोण होणार ? पुनः असें पहा कीं अंतःकरणादि विकार उत्पन्न होण्याला जरी आत्मा निमित्त आहे, कारण तो सन्निधच असतो, तथापि अहंकारादि सर्व विकार लोकांनीं अज्ञानामुळें पत्करून आत्म्याचे ठिकाणीं आरोपित केले असतात. म्हणून तो संसारी आहेसा वाटत असतो खरी स्थिति तशी नाहीं.

पूर्व०—हें तुमचें बोलणें मला समजलें नाहीं.

सिद्धान्ती—ऐका; सूर्य हा नित्यप्रकाशरूप आहे आणि सर्व लोकांस व लोकांच्या व्यवहारास व्यक्त आणि अनभिव्यक्त करण्याचें तो निमित्त मात्र असतो; म्हणजे सूर्य उगवला असतां, लोक-व्यवहार सुरू होतो आणि तो मावळला असतां लोक-व्यवहार थांबतो. आतां सूर्य तर नित्यप्रकाशस्वरूप आहे; त्याला वस्तुतः अस्तोदय नाहींत, तथापि अज्ञानी लोकदृष्टि, सूर्याचे ठिकाणीं अस्तो-दयांचा आरोप करून रात्रीचें व दिवसाचें कर्तृत्व सूर्याचे ठिकाणीं स्थापित करते ! याप्रमाणें नित्यस्वरूप असणारा परमेश्वर लोकांचें ज्ञान, ज्ञानाची विस्मृति किंवा सुखदुःखाची प्राप्ति व सुखदुःखस्मरण, या सर्वांचें निमित्त होतो; म्हणून जीवांच्या अज्ञानानें आत्म्याचे ठिकाणीं सुखदुःखादिकांचे व बंधमोक्षाचे आरोप होत असतात; हे आरोप अज्ञानमूलक आहेत. आत्म्याचे ठिकाणीं बंधमोक्ष नाहीं किंवा सुखदुःखही नाहीं. सूर्याला उदयास्त नसतांही जसें सूर्याकडे रात्रि-दिवसाचें कर्तृत्व येतें आणि रात्र झाली म्हणजे विषयप्रकाश न होणें, याचें निमित्त कारण सूर्य आहे, असें आपण म्हणतों; किंवा दिवस उगवला म्हणजे विषयप्रकाशनाचेंही निमित्त सूर्य होतोसा दिसतो. पण वास्तविक पाहिलें असतां सूर्याच्या ठिकाणीं अहोरात्र नाहीं किंवा अहोरात्रीचा तो कर्ताही नाहीं. लोकांनीं सूर्याच्या अदर्शनानें रात्र पत्करली, म्हणजे तो सूर्य विषय-प्रकाशन

करीत नाहींसें दिसतें. तसेंच, आत्म्याच्या ठिकाणीं स्वरूपतः बंधमोक्ष कांहीं नाहीं किंवा सुखदुःखही नाहीं. पण अज्ञानानें आपण 'बद्ध आहोंत' असें पत्करिलें म्हणजे आपल्याला आत्मा हा सुखी आहे किंवा दुःखी आहे, हा भास आत्मनिमित्तानें होतो. पण खरें पाहिलें तर आत्मा स्वतः बंधमोक्षातीत व सुखदुःखातीत आहे; लोक मात्र आपआपल्या आत्मदृष्टीप्रमाणें आत्म्यावर हवे तसले आरोप करित असतात.

शिष्य—आणखी एखादा दृष्टांत देऊन मला सांगा ?

सिद्धान्ती—ठीक आहे; एखाद्या स्वच्छ सरोवरामध्यें सूर्यबिंबाचें प्रतिबिंब पडतें, तें तूं पाहिलेंच असशील. हें प्रतिबिंब पाण्याच्या उपाधीनें उत्पन्न होतें; पण या प्रतिबिंबास प्रकाशित करणारें सूर्यबिंब हें निमित्त-कारण मात्र आहे. आतां, पाणी हलविलें म्हणजे सूर्यबिंब हलतांना आपल्यास दिसतें. सूर्य हलतो का ? नाहीं. प्रतिबिंब हलत असतें; आणि त्यावरून सूर्यच हलत आहे, असा अज्ञानी लोकांस भास होतो. तसेंच, उपाधीला आत्मज्ञानाच्या निमित्तानें झालेलें सुखदुःख आत्म्यालाच होतें, असें अज्ञानी लोक व बौद्धादि पंडित समजतात. किंवा आणखी असें पहा. भर बारा वाजतां दुपारीं आकाश कृष्ण मेघांनीं व्याप्त होऊन गेलें म्हणजे सूर्य किंवा सूर्य-प्रकाश दिसत नाहींत. हा सूर्य दिसेनासा झाला म्हणजे ज्याला तो दिसत नाहीं, तो म्हणूं लागतो कीं, 'या वेळीं सूर्य-प्रकाश नाहीं.' तथापि त्याच वेळीं सूर्य-प्रकाश इतरत्र दिसत असतो, तरी 'तो प्रकाशत नाहीं;' असें आपण म्हणतों. समजलें ? ही भ्रांति आहे; आणि याच भ्रांतीमुळें बुद्धीचे ठिकाणीं ज्या वृत्ति उत्पन्न होतात किंवा मावळतात, त्यांचे अस्तोदय आपल्यास आत्म्याच्या साहाय्यानें समजतात, हें खरें; पण आपण मात्र भ्रांतीनें त्या त्या वृत्ति आत्म्यावर आरोपित करून 'आत्मा सुखी आहे' किंवा 'दुःखी आहे,' असें म्हणत सुटतों. स्मरणशक्ति हीसुद्धां ईश्वर-निमित्तानें प्रकट होते. 'माझ्यापासूनच स्मृति व विस्मृति, तर्क व अनुमान हीं उत्पन्न होतात.' 'आत्मा हा कोणाच्याही पापपुण्यानें लिप्त होत नाहीं.' असें भगवद्गीतेमध्यें सांगितलें आहे. याप्रमाणेंच ईश्वर म्हणजे आत्मा एकच एक असून नित्य मुक्त आहे. सूर्यावर जसा अस्तोदयाचा आरोप आपण करितों, त्याप्रमाणेंच नित्यमुक्त आत्म्यावर आपण भ्रांतीनें बंधमोक्षाचा आरोप करितों, तो संसारी आहे, असें म्हणतों; आणि तो एकच असून आत्मे अनेक आहेत असें म्हणतों; पण खरी गोष्ट ही आहे कीं, प्रत्येक जीवाच्या अन्तर्यामी आत्माराम स्वरूपानें आहे. असो; याप्रमाणें शास्त्रादि प्रमाणांनीं आत्मा एक असून, असंसारी (कर्तृत्व-भोक्तृत्वशून्य) आहे, असें ठरतें. साराश, जीव आणि शिव स्वरूपतः एकच आहेत, त्यांच्यांत विरोध नाहीं असें ठरतें. या विवेचनावरून 'भोक्ता मात्र जीव आहे' असें म्हणणारे सांख्य

आणि 'जीव कर्ता व भोक्ता आहे' असें म्हणणारे वैशेषिक यांचाही निरास झाला; आत्मा कर्ता नाहीं व भोक्ताही नाहीं. तसेंच, सांख्य म्हणतात कीं, 'सर्व जीव चैतन्यरूप आहेत.' आतां, सर्वच जीव 'ज्ञानरूप' मात्र असतील, तर एका जीवापासून दुसरा जीव निराळा कसा करावयाचा? निराळेपणा नाहीं, तर जीव-जीवांमध्यें भेदही नाहीं. पुनः, वैशेषिक म्हणतात कीं, 'जीव-जीवांमध्यें अत्यन्त भेद आहे.' पण या मतानें अन्योन्याश्रय (परस्पराश्रय) प्राप्त होतो; म्हणजे अनेक जीव (आत्मे) आहेत, म्हणून त्यांमध्यें अनंत भेद आहेत आणि अनंत भेद आहेत, म्हणून अनंत जीव (आत्मे) आहेत, असा अन्योन्याश्रय दोष येतो. यामुळें हेंही मत ग्राह्य नाहीं. सारांश; मुख्य सिद्धान्त हा कीं, जीव-शिवांमध्यें कोणताही भेद नाहीं म्हणून ते एकरूपच आहेत. चैतन्य अत्यन्त सूक्ष्म आहे म्हणून तें सर्वव्यापी आहे, तेव्हां स्वरूपतः जीव-शिवांमध्यें भेद असणें शक्य नाहीं.

पूर्व०-जीव सुखदुःखादिकांनीं विकार पावतात; हा तर अनुभव प्रत्यक्ष आहे.

सिद्धान्ती-संभाळा! जीव विकारी आहे असें म्हणाल तर तो अनित्य होईल. पण तो अनित्य नाहीं.' सुख-दुःखादि विकार उपाधींचे धर्म आहेत, आत्म्याचे नाहींत.

पर्वपक्षी—मग सर्वच जीव मोक्ष प्राप्त करून घेण्याची इच्छा कां करीत नाहींत?

सिद्धान्ती—जीव स्वरूपतः मुक्तच आहेत. मोक्षही कांहीं विशेष क्रिया नव्हे किंवा विशेष स्थिति ही नव्हे. मोक्ष ही वस्तु तशी आहे, असें म्हणाल तर मोक्ष अनित्य होईल. असो; जीवशिवांमध्ये भेद अविद्येनें उत्पन्न होतो आणि त्या भेदाचा नाश ज्ञानानें होतो. तेव्हां भेद पारमार्थिक आहे, असें म्हणणें योग्य नव्हे. याप्रमाणें जीव-शिव भिन्न नसून एक आहेत असें सिद्ध झालें.

शिष्य—यावरून हेंही सिद्ध होत नाहीं काय? कीं, शरीर, इंद्रिय, मन, बुद्धि, विषय, इत्यादिकांचें जिच्यामुळें सतत ज्ञान होतें, जी अहंकाराला उत्पन्न करिते, जी अज्ञानाचें बीज आहे, जिची उत्पत्ति नित्य ज्ञानाहून अन्य-कारणानें म्हणजे अज्ञानानें होते, आणि जी आत्मतत्त्वाचें यथार्थ ज्ञान झालें असतां नाहींशी होते, त्या अविद्येचा उच्छेद करणें म्हणजे मोक्ष आणि तिचा विच्छेद न करणें म्हणजे बंध, असें सिद्ध झालें?

सिद्धान्ती—हें ठीक आहे. पण हें ध्यानांत ठेव कीं, आत्मा हा सदा मुक्तच आहे. उच्छेद व्हावयाचा तो अज्ञानाचा होय. हे बंधमोक्ष स्वरू-पाच्या दृष्टीनें मात्र सांगितले आहेत.

शिष्य—म्हणजे काय?

सिद्धान्ती—म्हणजे असें. आत्मा मुक्त आहे आणि सोपाधिक जीवात्मा अज्ञान स्थितींत 'बद्ध' आहे. जीवाला 'मुक्त' म्हटलें तर मोक्ष व जीव यांचें सामानाधिकरण्य होत नाहीं आणि केलेंच तर मुक्ताला नित्य संसार प्राप्त होतो! म्हणून आत्मा हा 'मुक्त' आहे व जीव 'बद्ध' आहे. हेंही जीव दृष्टीचें बोलणें आहे. आत्मा वस्तुतः बद्ध नाहीं व मुक्तही नाहीं. उपाधींतून सुटणें हा मोक्ष होय. या उपाधि–नाशासाठींच साधनांची (कर्म–उपासनांची) योजना करून आत्ममीमांसा करावी; हें ठरविलें आहे. म्हटलें आहे. उपाधी-सह व उपाधि–निमित्तानें उत्पन्न झालेलें सर्व औपाधिक मिथ्या असतें.

(याप्रमाणें आचार्यांनीं या तिसऱ्या खण्डाच्या प्रस्तावनेंत परमेश्वराचें अस्तित्व, अविद्याकृत मलीन चित्ताच्या नाशासाठीं परमेश्वराची उपासना व तिची आवश्यकता आणि जीवशिवांमधील अभेद यांची सिद्धि केली आहे.)

ब्रह्म ह, इत्यैतिह्यार्थः । पुरा किल देवासुरसङ्ग्रामे जगत्स्थितिपरिपिपालयिषयाऽऽत्मानुशासनानुवर्तिभ्यो देवेभ्योऽर्थिभ्योऽर्थाय विजिग्येऽजैषीदसुरान्ब्रह्मण इच्छानिमित्तो विजयो देवानां बभूवेत्यर्थः । तस्य ह ब्रह्मणो विजये देवा अमहीयन्त । यज्ञादिलोकस्थित्यपहारिष्वसुरेषु पराजितेषु देवा वृद्धिं पूजां वा प्राप्तवन्तः ॥ १४ ॥ १ ॥

पूर्वी देव–दैत्यांच्या संग्रामामध्यें परमेश्वराच्या कृपेनें देवांचा जय झाला. सृष्टीची स्थिति उत्तम चालावी आणि आपल्या आज्ञेप्रमाणें चालणारे व आपली उपासना करणारे जे देव त्यांचे मनोरथ पूर्ण करावे, म्हणून परमेश्वरानें इच्छामात्रेंकरून देवांस जय प्राप्त करून दिला. ह्या ईश्वरदत्त विजयानें देव मोठी प्रतिष्ठा पावले. कारण उघडच आहे कीं, यज्ञादि सत्कर्मांचा संहार करणारे राक्षस यांचा पराभव झाला, तेव्हां यज्ञादिकांची देवांची प्रतिष्ठा वाढून सर्व लोक त्यांची पूजा करूं लागले. या जयानें त्यांसही मोठा आनंद झाला. पण आनंदाबरोबरच त्यांस स्वसामर्थ्याविषयीं अभिमान उत्पन्न झाला, हें सांगावयास नकोच ॥ १४ ॥ १ ॥

मंत्र दुसरा (क्रमांक १५ वा).

त ऐक्षन्तेति मिथ्याप्रत्ययत्वाद्धेयत्वख्यापनार्थमाम्नायः । ईश्वरनिमित्ते विजये स्वसामर्थ्यनिमित्तोऽस्माकमेवायं विजयोऽस्माकमेवायं महिमेत्यात्मनो जयादि श्रेयोनिमित्तं सर्वात्मानमात्मस्थं सर्वकल्याणास्पदमीश्वरमेवाऽऽत्मत्वेनाबुद्ध्वा पिण्डमात्राभिमानाः सन्तो यं मिथ्याप्रत्ययं चक्रुस्तस्य पिण्डमात्रविषयत्वेन मिथ्या-

प्रत्ययत्वात्सर्वात्मेश्वरयाथात्म्यावबोधेन हातव्यताख्यापनार्थस्तद्वैषामित्याद्याख्यायिकाम्नायः । तद्ब्रह्म ह किलैषां देवानामभिप्रायं मिथ्याहंकाररूपं विजज्ञौ विज्ञातवत् । ज्ञात्वा च मिथ्याभिमानशातनेन तदनुजिघृक्षया देवेभ्योऽर्थाय तेषामेवेन्द्रियगोचरे नातिदूरे प्रादुर्बभूव । महेश्वरशक्तिमायोपात्तेनात्यन्ताद्भुतेन प्रादुर्भूतं किल केनचिद्रूपविशेषेण । तत्किलोपलभमाना अपि देवा न व्यजानत न विज्ञातवन्तः । किमिदं यदेतद्यक्षं पूज्यमिति ॥ १५ ॥ २ ॥

सिद्धान्ती—हा मंत्र मिथ्या–ज्ञान टाकून द्यावें, असा उपदेश करित आहे.

शिष्य—म्हणजे टाकून द्यावयाचें काय ? आणि मिथ्याज्ञान तें कसलें ?

सिद्धान्ती—ईश्वराच्या कृपेनें देवांस जय प्राप्त झाला असतांही त्यांस वाटूं लागलें कीं आमच्या सामर्थ्यानें मात्र आम्हांस जय मिळाला व आमचा मोठेपणा केवल अपूर्व आहे. देवांचें कल्याण ज्याच्या योगानें झालें, 'तो सर्वात्मा, सर्व भूतात्मा, सर्व कल्याणाचें आश्रयस्थान, सर्वेश्वर देव, आत्मरूप आहे.' हें विसरून गेले आणि विजयी झालेले सर्व देव पिंडमात्रावर अभिमानाची स्थापना करून 'आम्हीं, या विशेष व्यक्तींनीं, जय मिळविला' अशा मिथ्या ज्ञानाचा स्वीकार करिते झाले. अर्थातच हें ज्ञान, पिंडमात्राचें व अभिमानयुक्त अहंकाराचें ज्ञान 'हेय' म्हणजे त्याज्य आहे आणि त्याचा नाश आत्म्याच्या यथार्थ–ज्ञानानें मात्र होणार आहे, हा अर्थ ह्या गोष्टीच्या रूपानें श्रुतीला सांगावयाचा आहे. असो; देवांना अविद्या–जन्य अहंकार झाला आहे असें सर्वज्ञ ब्रह्माला तत्काल कळलें. तेव्हां, या अविद्येचा नाश करण्यासाठीं व देवांवर अनुग्रह करण्यासाठीं दयाघन ब्रह्म, अभिमानानें नाचणाऱ्या देवांस दृष्टिगोचर झालें. या ब्रह्मरूपी परमेश्वराला अघटित घटना करणाऱ्या दासीरूपी मायेचें साहाय्य असल्यामुळें परमेश्वरानें विलक्षण पण अतिपूज्य स्वरूप धारण केलें. देवांनीं ही विलक्षण मूर्ति पाहिली तेव्हां 'हें रूप काय आहे ?' हें देवांनांही कळेना. शिष्यराज ! पाहिलेंस ना कसें दयाघन परब्रह्म देवांच्या कल्याणासाठीं मूर्तस्वरूप धारण करितें झालें तें ? ॥ १५ ॥ २ ॥

मंत्र ३–११ (क्रमांक १६–२४ वा).

तद्विज्ञानायाग्निमब्रुवन् । तृणनिधानेऽयमभिप्रायोऽत्यन्तसंभावितयोरग्निमारुतयोस्तृणदहनादानाशक्त्याऽऽत्मसंभावना शातिता भवेदिति । इन्द्र आदित्यो वज्रभृद्वा । अविरोधात् । इन्द्रोपसर्पणे ब्रह्म तिरोदध इत्यत्रायमभिप्रायः इन्द्रोऽहमित्यधिकतमोऽभिमा-

नोऽस्य सोऽहमग्न्यादिभिः प्राप्तं वाक्संभाषणमात्रमप्यनेन न प्राप्तोस्मीत्याभिमानं कथं न नाम जह्यादिति । तदनुग्रहायैवान्तर्हितं तद्ब्रह्म बभूव ॥ १६ ॥ ३ ॥ १७ ॥ ४ ॥ १८ ॥ ५ ॥ १९ ॥ ६ ॥ ॥ २० ॥ ७ ॥ २१ ॥ ८ ॥ २२ ॥ ९ ॥ २३ ॥ १० ॥ २४ ॥ ११ ॥

'हें काय आहे ?' हें जाणून घेण्यासाठीं त्यांनीं प्रथम अग्नीला व नंतर वायूला पाठविलें. या उभयतां श्रेष्ठ देवांसही परमेश्वरानें त्यांस दाखविलेल्या तृणाचें दहन किंवा ग्रहण करितां आलें नाहीं, ही सामर्थ्यशून्यता परमेश्वरानेंच उत्पन्न केली होती. हेतु हा होता कीं, 'आम्ही मात्र हे स्वसामर्थ्यानें विजय प्राप्ति मिळविली' हा देवांचा अभिमान नाहींसा करावा. अकराव्या चोविसाव्या क्रमांक मंत्रांतील 'इंद्र' शब्दानें सूर्य घ्यावा किंवा वज्रधारी इंद्र ही घ्यावा. कांही विरोध नाहीं. तिसरी पाळी इंद्राची होती. तो इंद्र गेला तेव्हां ब्रह्म अंतर्धान पावलें. याचा अभिप्राय हा आहे;—'मी सर्व—श्रेष्ठ आहें असा इंद्राला अभिमान होता. त्याला असें दाखविलें कीं, अग्नि—वायूवर ब्रह्मानें बोलण्याचा अनुग्रह तरी केला, 'पण मला भाषणाचा प्रसादही मिळाला नाहीं, म्हणून माझा मोठेपणाचा अभिमान व्यर्थ आहे हा टाकून दिलाच पाहिजे,' असा त्याला अनुताप झाला. इंद्राचा अभिमान जावा एतदर्थंच ब्रह्म गुप्त झालें होतें. अभिमान नष्ट होणें हा परमेश्वरी अनुग्रहच होय. ॥ १६ ॥ ३ ते ॥ २४ ॥ ११ ॥

स शान्ताभिमान इन्द्रोऽत्यर्थं ब्रह्म विजिज्ञासुर्यस्मिन्नाकाशे ब्रह्मणः प्रादुर्भाव आसीत्तिरोधानं च तस्मिन्नेव स्त्रियमतिरूपिणीं विद्यामाजगाम । अभिप्रायोद्बोधहेतुत्वाद्रुद्रपत्न्युमा हैमवतीव सा शोभमाना विद्यैव । विरूपोऽपि विद्यावान्बहु शोभते ॥२५ ॥१२ ॥

इति तृतीयः खण्डः ॥ ३ ॥

इंद्राचा अभिमान नष्ट झाला व तो जेथें ब्रह्म गुप्त झालें होतें, तेथें ब्रह्मज्ञानासाठीं ध्यान करित राहता झाला. असो; ज्या अंतरालामध्यें ब्रह्मस्वरूप प्रकट होऊन गुप्त झालें होतें, तेथेंच विद्या माऊली अति सुंदर स्त्रीस्वरूप धारण करून उभी राहिली होती, तेथें इंद्र गेला. ही विद्या शंकराच्या पार्वतीसारखी सर्वांग—सुंदरी होती. असो; सामान्यतः कुरूप जीव विद्यावान् असेल तर तो सुरूप दिसतो, मग येथें तर विद्येनें पार्वतीचेंच स्वरूप धारण केलें होतें, तेव्हां त्या तेजस्वी व पूज्यभाव उत्पन्न करणाऱ्या सौंदर्याचें कोणीं काय वर्णन करावें ? ॥ २५ ॥ १२ ॥

॥ तृतीय खण्ड समाप्त ॥

चतुर्थः खण्डः ।

मंत्र १–२–३ (क्रमांक २६–२७–२८).

तां च पृष्ट्वा तस्या एव वचनाद्विद्यांचकार विदितवान् । अत इन्द्रस्य बोधहेतुत्वाद्विद्यैवोमा । विद्यासहायवानीश्वर इति स्मृतिः । यस्मादिन्द्रविज्ञानपूर्वकमग्निवायविन्द्रास्ते ह्येनन्नेदिष्ठमतिसमीपं ब्रह्मविद्यया ब्रह्म प्राप्ताः सन्तः पस्पृशुः स्पृष्टवन्तः । ते हि प्रथमः प्रथमं विदांचकार विदांचक्रुरित्येतत् । तस्मादतितरामतीत्यान्यानतिशयेन दीप्यन्तेऽन्यान्देवांस्ततोऽपीन्द्रोऽतितरां दीप्यते । आदौ ब्रह्मविज्ञानात् ॥ २६ ॥ १ ॥ २७ ॥ २ ॥ २८ ॥ ३ ॥

तिसऱ्या खंडांत अभिमानी देवांचा अभिमान सर्वथा विगलित होतांक्षणीं म्हणजे चित्तशुद्धि होतांक्षणीं ब्रह्मविद्येनें आपलें दिव्य स्वरूप प्रकट केलें, पण ते उपासनारूपी ध्यान करणाऱ्या इंद्राच्या मात्र प्रथमतः दृश्यकोटींत आलें. असो; याप्रमाणें अहंममताभिमानाचा नाश व उपासनेची एकनिष्ठता यांची जोडी सिद्ध होतांच ब्रह्मविद्या प्रकट होण्याचा सुसमय प्राप्त होतो, हें श्रुतिसामर्थ्यानेंच सिद्ध झालें.

पार्वतीला विचारून तिनें सांगितल्यावर इंद्राला कळलें कीं जें अग्नि वायूंस दिसलें तें ब्रह्म होतें. उमेनें इंद्राला ब्रह्मज्ञान करून दिलें म्हणून तीच इंद्राचा गुरु झाली. शिवाय, अशी स्मृतिही आहे कीं 'ईश्वर हा विद्यासाह्यवान् आहे.' ज्या अर्थी इंद्राला ज्ञान होऊन नतर अग्नि, वायु, इंद्र यांस ब्रह्मविद्येसह अतिशय जवळ असणाऱ्या ब्रह्माची प्रथम प्राप्ति झाली, त्या अर्थी ते सर्व–देवांमध्यें श्रेष्ठ आहेत असे ठरलें, हें योग्यच झालें. पण त्यांतल्यात्यांतही इंद्रास प्रथम ब्रह्मज्ञान झालें म्हणून तो सर्व–श्रेष्ठ देव आहे हें सिध्द झालें ॥ २६ ॥ ॥ १ ॥ २८ ॥ ३ ॥

मंत्र चवथा (क्रमांक २९ वा).

तस्यैष आदेशस्तस्य ब्रह्मण एष वक्ष्यमाण आदेश उपासनोपदेश इत्यर्थः । यस्माद्देवेभ्यो विद्युदिव सहसैव प्रादुर्भूतं ब्रह्म द्युतिमत्तस्माद्विद्युतो विद्योतनं यथा यदेतद् ब्रह्म व्यद्युतद्विद्योतितवत् । आ इवेत्युपमार्थ आशब्दः । यथा घनान्धकारं विदार्य विद्युत्सर्वतः प्रकाशत एवं तद् ब्रह्म देवानां पुरतः सर्वतः प्रकाशवद्व्यक्तीभूतमतो व्यद्युतदिवेत्युपास्यम् यथा सकृद्विद्युतमिति च

वाजसनेयके । यस्माच्चेन्द्रोपसर्पणकाले न्यमीमिषत् । यथा कश्चिच्चक्षुर्निमेषणं कृतवानिति । इतीदित्यनर्थकौ निपातौ । निमिषितवदिव तिरोभूतमित्येवमधिदैवतं देवताया अधि यद्दर्शनमाधिदैवतं तत् ॥ २९ ॥ ४ ॥

सिद्धान्ती—कोणत्या प्रकारें ब्रह्माची उपासना करावी, हा उपदेश पुढील दोन तीन मंत्रांत आहे. विजेप्रमाणें एकदम तेजस्वी ब्रह्म प्रादुर्भूत झालें, म्हणून ब्रह्म अनंत विजांप्रमाणें अत्यंत तेजस्वी आहे असें त्याचें एक रूप समजावें. तसेंच निबिड अंधकाराचा नाश करून विद्युत् सर्वत्र प्रकाशच प्रकाश करिते, याप्रमाणें ब्रह्मानें देवांच्यापुढें आपलें तेजस्वी स्वरूप प्रकट केलें म्हणून तें तेजस्वीस्वरूप या दृष्टीनें उपास्य आहे, असें ठरलें. 'ब्रह्म हें एकदम प्रकाशित होणाऱ्या विजेप्रमाणें आहे' अशी वाजसनेय श्रुति आहे.

शिष्य—इंद्र आल्यानंतर ब्रह्म गुप्त कसें झालें ?

सिद्धान्ती—या गुप्त होण्यांत ब्रह्माचें दैवी सामर्थ्य प्रकट झालें. डोळ्याचें पातें लवतें न लवतें इतक्यांत अति तेजस्वी ब्रह्मानें गुप्त होणें हें त्याच्या अनंतशक्तीचें प्रदर्शन आहे.

शिष्य—मंत्रांत 'या प्रमाणें अधि दैवत' असें कां म्हटलें आहे ?

सिद्धान्ती—हें दर्शन देवांस झालें; शिवाय एका क्षणांत तें प्रकट होऊन नाहींसें झालें म्हणून त्याला दैवी दर्शन म्हणावें. येथें ब्रह्मानें आपलें अत्यंत दीप्तिमत्व व क्षणांत गुप्त होण्यानें अनंतशक्तिमत्व दाखविलें. हेतु हा कीं, या दृष्टींनीं ब्रह्माची उपासना करून जीवांनीं कृतार्थ व्हावें.

शिष्य—म्हणजे उपासनेनें ज्ञान उदित झालें म्हणजे कृतार्थ होणार ना ?

सिद्धान्ती—शाबास ! आतां पुढच्या अध्यात्मस्वरूपाकडे चला.

शिष्य—या मंत्रांतील 'आ' ह्याचा अर्थ उपमा असा आपण केला, व विजेप्रमाणें तें प्रकाशित झालें; हें मला समजलें. पण 'इति' व 'इद्' यांचे अर्थ काय ?

सिद्धान्ती—अरे, ते शुद्ध अर्थशून्य आहेत; त्यांना कांहीं अर्थ नाहीं. ॥ २९ ॥ ४ ॥

मंत्र पांचवा (क्रमांक ३० वा.)

अथानन्तरमध्यात्ममात्मनोऽध्यात्ममुच्यत इति वाक्यशेषः । यदेतद्यथोक्तलक्षणं ब्रह्म गच्छतीव प्राप्नोतीव विषयीकरोतीवेत्यर्थः । न पुनर्विषयीकरोति मनसोऽविषयत्वाद् ब्रह्मणोऽतो मनो न गच्छति । येनाऽऽहुर्मनो मतमिति हि चोक्तम् । गच्छतीवेति तु मनसोऽपि मनस्त्वात् । आत्मभूतत्वाच्च ब्रह्मणस्तत्समीपे मनो वर्तत इत्युपस्मरत्यनेन मनसैव तद्ब्रह्म विद्वान्यस्मात्तस्माद् ब्रह्म गच्छतीवेत्युच्यते । अभीक्ष्णं पुनः पुनश्च । संकल्पो ब्रह्मप्रेषितस्य मनसः । अत उपस्मरणसंकल्पादिभिर्लिङ्गैर्ब्रह्म मनोऽध्यात्मभूतमुपास्यमित्यभिप्रायः ॥ ३० ॥ ५ ॥

सिद्धान्ती—आतां, या मंत्रांत ब्रह्माचें अध्यात्मस्वरूप उपासनेसाठीं सांगितलेलें आहे.

शिष्य—पण भगवन्! हें ब्रह्म 'जणुं कांहीं' असे शब्द मंत्रांत कां आहेत?

सिद्धान्ती—अरे! आपल्या मनाला ब्रह्मस्वरूप आकलन करण्याचें सामर्थ्य आहे का? नाहीं. तेथें मनाचा, किंवा बुद्धीचा प्रवेश होणें शक्यच नाहीं. मनाला तें जाणूं शकेल; पण मनानें मात्र ब्रह्म जाणतां येणार नाहीं, असें आपण मागेंच समजन घेतलें आहे. सारांश, मनाची गति तेथें नाहीं, असें दाखविण्याकरितां श्रुतीनें असें म्हटलें कीं, जणुं कांहीं मन तेथें जातेंच आहे! जणुं कांहीं मन ब्रह्माला ज्ञानविषयच करित आहे! अशी भावना करावी. समजलें? शिवाय, ब्रह्म हें सर्वांचा आत्मा आहे, म्हणून तें मनाच्याही अतिशय जवळ असतें व ब्रह्मवेत्ता ब्रह्माचें उपस्मरण मनाच्याच साहाय्यानें करितो; म्हणजे ब्रह्म मनामध्यें अवतीर्ण होतेंसें दिसतें, म्हणून जणुं कांहीं ब्रह्मच मनाकडे जातें असाही अर्थ करावा. जीवानें ब्रह्मप्रेरित मनोद्वारा नेहमीं ब्रह्माचें 'स्मरण करीन' असा संकल्प धारण करून ब्रह्माची एकनिष्ठेनें उपासना करावी, हा अभिप्राय आहे. असो; उपस्मरण, संकल्प इत्यादिकांच्या द्वारानें व चिन्हांनीं ब्रह्म हें मनःस्वरूप म्हणजे अध्यात्म होतें; म्हणून हें अध्यात्म होय. ही अध्यात्मदृष्टीनें उपासना झाली. ॥ ३० ॥ ५ ॥

मंत्र सहावा (क्रमांक ३१ वा).

तस्य चाध्यात्ममुपासने गुणो विधीयते तद्ध तद्वनं तदेतद् ब्रह्म तद्ध तद्वनं च तत्परोक्षं वनं संभजनीयम्। वनतेस्तत्कर्मणस्तस्मात्तद्वनं नाम। ब्रह्मणो गौणं हीदं नाम। तस्मादनेन गुणेन तद्वनमित्युपासितव्यम्। स यः कश्चिदेतद्यथोक्तमेवं यथोक्तेन गुणेन वनमित्यनेन नाम्नाऽभिधेयं ब्रह्म वेदोपास्ते। तस्यैतत्फलमुच्यते। सर्वाणि भूतान्येनमुपासकमभिसंवाञ्छन्तीहाभिसंभजन्ते सेवन्तेस्मेत्यर्थः। यथागुणोपासनं हि फलम्॥ ३१ ॥ ६ ॥

सिद्धान्ती—ही अध्यात्मोपासना करण्यासाठीं कांहीं तरी ब्रह्मगुण सांगितला पाहिजे, म्हणून सांगतात कीं, 'तें पूज्य आहे' या नामानें ब्रह्माची परोक्ष उपासना करावी. त्या ब्रह्माचें कर्म उपास्य आहे म्हणून त्याला तद्वन हें नांव आहे. हें ब्रह्माचें मुख्य नाम नव्हे. असो, या गुणानें त्याची उपासना करावी, 'पूज्य' या नांवानें जो ब्रह्मोपासना विधियुक्त करितो, त्या उपासकाचीं सर्व भूतें या लोकींहि सेवा करितात. जशी उपासना तसें फल मिळावें, हा न्याय आहे. या मंत्रांत ब्रह्मोपासनेचें फल सांगितलें ॥ ३१ ॥ ६ ॥

याप्रमाणें तीन मंत्रांत अधिदैवी, अध्यात्म व गुणान्वित नाम अशा तीन उपासना सांगितल्या आहेत, त्या चित्तशोधक असून जीव-कल्याणासाठींच विहित केल्या आहेत.

मंत्र सातवा (क्रमांक ३२ वा).

उपनिषदं भो ब्रूहीत्युक्तायामप्युपनिषदि शिष्येणोक्त आचार्य आह—उक्ता कथिता ते तुभ्यमुपनिषदात्मोपासनं च अधुना ब्राह्मी वाव ते तुभ्यं ब्रह्मणो ब्राह्मणजातेरुपनिषदमब्रूम वक्ष्याम इत्यर्थः। वक्ष्यति हि। ब्राह्मी नोक्ता। उक्ता त्वात्मोपनिषत्। तस्मान्न भूताभिप्रायोऽब्रूमेत्ययं शब्दः॥ ३२ ॥ ७ ॥

शिष्य—भगवन्! 'मला उपनिषद् सांगा' असें येथें साधक कसें विचारित आहे? आचार्यांनीं तर सर्व उपनिषद् सांगून दिलें आहे.

सिद्धान्ती—आचार्यांनीं ब्रह्मोपनिषत् सांगितलें तें खरें; तसेंच ब्रह्माची उपासना कशी करावी, हेंही सांगितलें, हें खरें आहे. साधकाला आचार्य या प्रमाणें म्हणाले; पण ब्रह्म समजून घेण्यास सदैव सिद्ध असणारी जी ब्राह्मणाची विद्वान् जाति तिनें कशी ब्रह्मोपासना करावी, तें अद्यापि सांगितलें नाहीं; अद्यापि

सांगावयाचें आहे. आचार्य म्हणतात, आत्मोपनिषद् सांगितलें पण ब्रह्म जाणूं इच्छिणाऱ्या ब्राह्मणानें काय करावें, तें अद्यापि सांगितलें नाहीं; म्हणून यापुढें आत्मज्ञानाचीं मुख्य साधनें सांगतात. मंत्रांत 'सांगितलें' असें जें पद आहे त्याचा अर्थ भूतकाळीं करावयाचा नाहीं, तर भविष्यकाळीं करावयाचा आहे. ॥ ३२ ॥ ७ ॥

मंत्र आठवा (मक्रांक ३३ वा).

तस्या वक्ष्यमाणाया उपनिषदस्तपो ब्रह्मचर्यादि दम उपशमः कर्माग्निहोत्रादीत्येतानि प्रतिष्ठाऽऽश्रयः । एतेषु हि सत्सु ब्राह्मोपनिषत्प्रतिष्ठिता भवति । वेदाश्चत्वारोऽङ्गानि च सर्वाणि प्रतिष्ठेत्यनुवर्तते । ब्रह्माश्रया हि विद्या । सत्यं यथाभूतवचनमपीडाकरमायतनं निवासः सत्यवत्सु हि सर्वं यथोक्तमायतन इवावस्थितम् ॥ ३३ ॥ ८ ॥

सिद्धान्ती—आतां जें ब्राह्मणांकरितां उपनिषत् सांगावयाचें आहे, त्याचीं आश्रयस्थानें सांगतात. तप—ब्रह्मचर्य, दम, उपशम, अग्निहोत्रादि कर्म इत्यादि उपासनेचीं मुख्य आश्रयस्थानें आहेत. हीं असतील तर ब्रह्मोपनिषदाचा पाया उत्तम होतो. चार वेद, आणि सर्व वेदांगें हींही ब्रह्मप्रतिष्ठापकच आहेत. विद्या ही ब्रह्माश्रय आहे. म्हणजे विद्येचा आश्रय ब्रह्म आहे. येथें ब्रह्म म्हणजे वेद होत. समजलें ? यथार्थ वचन बोलणें व दुसऱ्यास पीडा न होईल असें बोलणें, ते सत्य होय. हें उपनिषदाचें वसतिगृह आहे. सत्यवक्त्यांमध्यें मात्र ब्रह्म आश्रयस्थान पाहत असतें. ॥ ३३ ॥ ८ ॥

मंत्र नववा (क्रमांक ३४ वा).

तामेतां तपआद्यङ्गां तत्प्रतिष्ठां ब्राह्मीमुपनिषदं सायतनामात्मज्ञानहेतुभूतामेवं यथावद्यो वेदानुवर्ततेनुतिष्ठति । तस्यैतत्फलमाह—अपहत्य पाप्मानम् । अपक्षय्य (क्षीय) धर्माधर्मावित्यर्थः । अनन्तेऽपारेऽविद्यमानान्ते । स्वर्गे लोके सुखप्राये निर्दुःखात्मनि परे ब्रह्मणि । ज्येये महति सर्वमहत्तरे प्रतितिष्ठति सर्ववेदान्तवेद्यं ब्रह्माऽऽत्मत्वेनावगम्य तदेव ब्रह्म प्रतिपद्यत इत्यर्थः ॥ ३४ ॥ ९ ॥

इति चतुर्थः खण्डः ॥ ४ ॥

इति श्रीमत्परमहंसपरिव्राजकाचार्यगोविन्दभगवत्पादपूज्यशिष्यश्रीमत्परमहंसपरिव्राजकाचार्यश्रीमच्छंकरभगवतः कृतौ तलवकारोपनिषदपरपर्यायकेनोपनिषद्भाष्ये क्षुद्रगणवाक्यविवरणं समाप्तम् ॥

हीं जिचीं तपादि अंगें आहेत, ती या साधनांनीं प्रतिष्ठित झालेली ब्राह्मी उपनिषद् सत्यभाषणान्वित असली म्हणजे ती आत्मज्ञानाला कारण होते, हें ज्ञान ज्याला उत्तम समजतें व ह्याप्रमाणें जो आचरण करितो, त्याचीं 'सर्व पापें धर्माधर्म, इत्यादिकांचा क्षय होऊन, अनंत आणि अपार सुखमय अथवा दुःख-शून्य अशा सर्व-श्रेष्ठ ब्रह्मामध्यें हा पुरुष वास्तव्य करितो; म्हणजे सर्व वेदान्तांनीं जाणण्याला योग्य जें ब्रह्म तें व आपला आत्मा एकरूपच आहेत, ब्रह्म हा आत्मा व आत्मा हें ब्रह्म आहे,' असें जाणून तो ब्रह्मापत जातो, म्हणजे मुक्त होतो. ॥ ३४ ॥ ९ ॥

याप्रमाणें वाक्यभाष्य—भाषान्तर समाप्त झालें.

चतुर्थ खण्ड समाप्त.

केनोपनिषत्.

श्रीमद्रामानुज० रंगाचार्यविरचितप्रकाशिकोपेता ।

ॐ तत्सद्ब्रह्मणे नमः ।

अथ कश्चिद्धन्यो ब्रह्म-जिज्ञासुर्जडानां मनःप्रभृतीनां करणानां प्रवृत्तिस्तत्प्रवर्तकचेतनमन्तरेणानुपपन्नेति सामान्यतोऽवगत्य तत्प्रवर्तकचेतनविशेषबुभुत्सया पृच्छति—

सिद्धान्ती—या उपनिषदांत असा प्रसंग आहे कीं, कोणी एक धन्य (पुण्यवान्) व ब्रह्मजिज्ञासु पुरुष मनादि इंद्रियांचा प्रवर्तक कोण आहे, हें जाणण्याच्या इच्छेनें आचार्यांस प्रश्न विचारीत आहे आणि ब्रह्मज्ञ आचार्य उत्तर देत आहेत. सारांश; कोणी साधक आचार्यांस शरण जाऊन आत्मजिज्ञासेच्या तृप्त्यर्थ प्रश्न विचारून समाधान करून घेत आहे, असा प्रसंग आहे.

शिष्य—या मुमुक्षूला मनाचा प्रवर्तक कोण अशी शंका कां उत्पन्न झाली ?

सिद्धान्ती—अरे ! मन हें जड आहेना ! इंद्रियें, प्राण, हींही मनाप्रमाणेंच जड आहेत. तथापि त्यांच्यामध्यें सहेतुक कार्य-प्रवृत्ति दिसत आहे. जडाला स्वतःप्रवृत्तीनें नियत व्यापार करितां येणें शक्य नाहीं. हें सर्व मनांत आणून साधकानें प्रश्न विचारण्याचा उपक्रम केला आहे. त्याला सामान्यतः असें वाटलें कीं, कोणातरी प्रवर्तकाच्या साहाय्याशिवाय मनादिकांचे व्यापाराची व्यवस्था नीट लावतां येणें शक्य नाहीं. म्हणून हा साधक आचार्यांजवळ गेला आणि 'कोणत्या चैतन्य विशेषाच्या साहाय्यानें मनासह सर्व कर्मेंद्रियें आणि ज्ञानेंद्रियें स्वव्यापाराचे संबंधानें प्रवृत्त होतात, असा प्रश्न त्यानें विचारला. ह्या प्रश्नाचा अवतार पहिल्या मंत्रांत आहे.

मंत्र पहिला.

अन्वय व अर्थ—केन प्रेषितं मनः इषितं पतति (कोण प्रेरणा करितें म्हणून मन आपल्यास इष्ट असणाऱ्या विषयाकडे प्रवृत्त होतें ?) **केन युक्तः प्रथमः प्राणः प्रैति** (कोणाच्या प्रेरणेनें प्रथम प्राण—प्राणवायु-स्वव्यापार करितो ?) **केन इषितां इमां वाचं वदन्ति** (कोणाच्या इच्छेनें प्रेरित झालों असतों म्हणून आम्ही जीव बोलणें बोलतों ? उ (महाराज !)

कः देवः चक्षुःश्रोत्रं युनक्ति (कोणता देव नेत्रकर्णांस स्वव्यापाराचे ठिकाणीं प्रवृत्त करितो ?)

सारांश, मन, प्राण, वाणी, नेत्र, कर्ण इत्यादि ज्ञानकर्मेंद्रियें कोणाच्या आज्ञेनें स्वव्यापारांमध्यें प्रवृत्त होतात ? हा प्रश्नाचा भावार्थ आहे.

मन इषितमिष्टं साध्वसाधु वा विषयं प्रति केन देवेन प्रेषितं सत्पतति गच्छति । करणत्वादवश्यं केनचित्प्रेरितमिति वाच्यम् । न तावज्जीव एव प्रेरकः । तेन निगृह्णतोऽपि मनसो विषयं प्रति पतनात् । अतो बलवता केनचिद्देवेनैव प्रेरितमिति वक्तव्यं स इति भावः । एवमग्रेऽपि बोध्यम् । इषितमितीडागमश्छान्दसः । अथ प्रथमः प्राणः पञ्चानां प्राणानां मुख्यः प्राणः केन प्रयुक्तः प्रेरितः सन्प्रैति याति स्वव्यापारं करोतीत्यर्थः । इमां लौकिकीं वैदिकीं च वाचं केनेषितां प्रेरितां वदन्ति जीवा इति शेषः । चक्षुःश्रोत्रमिति प्राण्यङ्गत्वादेकवद्भावः । उ संबुद्धौ । भो देशिक को देवो युनक्ति नियुङ्क्ते प्रेरयतीत्यर्थः । इदमुपलक्षणं शेषकरणानामिति ॥ १ ॥

सिद्धान्ती—साधक विचारतो,—' आचार्य महाराज ! चांगल्या किंवा वाईट विषयाकडे मनाची जी प्रवृत्ति होते; ती कोणत्या देवाच्या प्रेरणेनें होते ? कोणत्या देवाच्या प्रेरकत्वानें मनाला चांगली असो, किंवा वाईट असो; पण ती ती गोष्ट करावीशी वाटते ? मन हें करण (इंद्रिय) आहे, व्यापाराचे एक साधन मात्र आहे. म्हणून त्याला कोणी तरी प्रेरक अवश्य असलाच पाहिजे.' चक्राचा प्रेरक कुलाल निराळा असतो, तसा मनाचा प्रेरक कोण ?

शिष्य—जीव हा मनाचा प्रेरक आहे ना ?

सिद्धान्ती—नाहीं. त्यानें आपलें मन आंवरून धरिलें तरी त्याला न जुमानतां तें मन आपल्या इष्ट विषयाकडे धांवत जातें. तेव्हां कोणा तरी बलवान् देवानें प्रेरणा केलेली असते, म्हणून मात्र मन स्वविषयाकडे प्रवृत्त होतें. तो बलवान् प्रेरक कोण ? हें समजून घेण्याची साधकाची इच्छा आहे. याप्रमाणेंच प्राण व इतर इंद्रियें यांचा प्रेरक कोण, हेंही साधकास समजून द्यावयाचें आहे.

शिष्य—' इषित ' हें पद व्याकरण-शुद्ध नाहीं ?

सिद्धान्ती—हा प्रयोग आर्ष आहे; पूर्वी हा प्रयोग शुद्धच होता. असो; प्राणवायु हा प्राणापानादि पंचकामध्यें श्रेष्ठ आहे, मुख्य आहे, म्हणून प्राणाचा मात्र उल्लेख करून ' तो कोणाच्या प्रेरणेनें स्वव्यापार करितो;' तसेंच, ही लौकिक व वैदिकवाणी कोणाच्या प्रेरणेनें आपला व्यापार करिते; आणि जीव बोलतात; तसेंच नेत्र, कर्ण, इत्यादि प्राण्यांचीं सर्व इंद्रियें कोण प्रेरित

करतो ? हें साधकास समजून घ्यावयाचें आहे. सारांश, सर्व ज्ञानेंद्रियें, कर्मेंद्रियें, मन, प्राण इत्यादि जडांचा प्रेरक कोण ? हें त्यास समजावयास हवें आहे.

शिष्य—मंत्रांतील 'उ' हा शब्द संबोधनार्थी आहेना ? तसेंच, श्रोत्र व चक्षु एकाच देहाचीं अंगें असतात, म्हणून त्यांचा एकरूपानें उल्लेख केला आहे ना ?

सिद्धान्ती—होय. हे आचार्य ! असा आचार्यांचा संबोध येथें इष्ट आहे. सारांश, सर्व इंद्रियांचा प्रेरक कोण आहे, हा मुख्य प्रश्न आहे ॥ १ ॥

इति शिष्येणानुयुक्त आचार्य उवाचेति ज्ञेयम्—

सिद्धान्ती—साधकानें जो प्रश्न विचारला, त्याचें उत्तर या पुढील मंत्रांत आचार्यांनीं दिलें आहे असें समजावें.

मंत्र दुसरा.

अन्वय व अर्थ—सामान्यतः पूर्वीप्रमाणेंच आहे. जेथें कांहीं विशेष अर्थ आहे, तेथें त्या पदांचें व्याख्यान श्रीरंगाचार्यांनीं स्पष्ट केलें आहे. त्याचें अवतरण मात्र करितोंः—धीराः (हें सर्व प्रेरकत्व नारायणाचें आहे असें जाणणारे विद्वान्) अतिमुच्य (लिंगदेह सोडून देऊन) अर्चिरादिमार्गानें जातात आणि मुक्त होतात.

यत् । यः । श्रोत्रस्य श्रोत्रं शब्दभासकत्वशक्तिप्रदः । मनसो मनः । मननशक्तिप्रदः । वाचो वागिन्द्रियस्य वाचं शब्दोच्चारणशक्तिप्रदः । प्राणस्य प्राणः प्राणनशक्तिप्रदः । चक्षुषश्चक्षुर्दर्शनशक्तिप्रदः श्रोत्रादेर्नियन्ता यस्त्वया पृष्टः स देव इत्यन्वयः तथा च श्रुतयः—

'यो मनसि तिष्ठन्मनसोऽन्तरो यं मनो न वेद यस्य मनः शरीरं यो मनोऽन्तरो यमयति' [बृ० ३।७।२०] । 'यो वाचि तिष्ठन्वाचमन्तरो यमयति' [बृ० ३।७।१७] । 'यः श्रोत्रे तिष्ठञ्छोत्रमन्तरो यमयति [बृ० ३।७।१९] । 'यश्चक्षुषि तिष्ठंश्चक्षुरन्तरो यमयति' [बृ० ३।७।१८] । यः प्राणे तिष्ठन्प्राणमन्तरो यमयति' [बृ० ३।७।१६] । इत्याद्या नारायणस्यान्तर्यामित्वप्रतिपादिका इति । स इत्यनेन तादृशो नारायणो देव इति भावः । तथा च भगवद्वाक्यम्—' मत्तः सर्वं प्रवर्तते । इन्द्रियाणि मनो-

बुद्धिरि'त्याद्युक्त्वा 'वासुदेवात्मकान्याहुरि'त्यादिस्मृतयश्च । श्रोत्रादिनियामकत्वज्ञानिनः फलमाह—अतिमुच्येति । धीरा धीमन्तः श्रोत्रादिप्रेरकत्वं नारायणस्य जानन्तः । अस्माल्लोकाद्भौतिकदेहात्प्रेत्य निर्गत्योत्क्रमणं विधायेति यावत् । अर्चिरादिमार्गेण गत्वाऽतिमुच्य लिङ्गदेहं हित्वाऽमृता मुक्ता भवन्तीत्यर्थः ॥ २ ॥

सिद्धान्ती—'मंत्रांत 'यत्' हा शब्द 'यः (जो)' या अर्थी आहे. श्रोत्राला शब्द प्रकट करून घेऊन तो ग्रहण करण्याची शक्ति देणारा, मनाला विचार करण्याची शक्ति देणारा, वाणीला शब्दाचा उच्चार करण्याची शक्ति देणारा, प्राणाला प्राणन-शक्ति देणारा, याचप्रमाणें डोळ्यास पाहण्याचें सामर्थ्य देणारा जो, तो देव आहे, बरें साधका! असो; या व इतर इंद्रियांचा प्रेरक कोण? असा जो साधकानें प्रश्न विचारला होता, त्याचें आचार्यांनीं उत्तर दिलें कीं, हा सर्व-प्रेरक एक परमेश्वर मात्र आहे. हाच कर्णाला, मनाला, वाणीला, व प्राणाला (सारांश, सर्व इंद्रियांना) आपापले व्यापार करण्याला प्रवृत्त करितो.

शिष्य-असें आचार्यांनीं कशावरून म्हटलें? त्यांच्या म्हणण्यास आधार काय?

सिद्धान्ती—किती तरी श्रुति या आचार्यांचें म्हणणें समर्थन करतील? ऐक, 'जो मनामध्यें राहून मनाचें अंतर्याम नियमित करितो, जो मनाला मात्र ठाऊक नाहीं, पण ज्याचें मन हें शरीर आहे. व मनावर ज्याची सत्ता अनियंत्रित चालते.' (बृ०३।७।२०) 'जो वाणीमध्यें राहून वाणीचें अंतर्याम नियमित करितो' (बृ०३।७।१७) 'जो श्रोत्रांमध्यें राहून श्रोत्रांचें अंतर्याम नियमित करितो' (बृ० ३।७।१९) 'जो नेत्रांमध्यें राहून नेत्रांचें अंतर्याम नियमित करितो' (बृ० ३।७।१८) 'जो प्राणांमध्यें राहून प्राणांचें अंतर्याम नियमित करितो (बृ० ३।७।१६) इत्यादि अनेक श्रुति नारायणाचें अंतर्यामित्व स्पष्ट सांगतात. मूळ मंत्रामध्यें 'सः (तो)' हें पद एवंगुणविशिष्ट नारायणास अनुलक्षूनच घातलें आहे.

शिष्य—कशावरून?

सिद्धान्ती—गीतेमध्यें भगवान् म्हणतात कीं, 'माझ्यापासूनच सर्वांची प्रवृत्ति आहे' त्याचप्रमाणें 'इंद्रियें, मन, बुद्धि' असा तिसऱ्या अध्यायांत आरंभ करून 'हें सर्व वासुदेवात्मक आहे' असें सातव्या अध्यायांत श्रीकृष्णानें सांगितलें आहे. सारांश, सर्वांची प्रेरणा नारायणाच्या इच्छेनें होते.

शिष्य—भगवन्! श्रोत्राचें प्रेरकत्व कोणाकडे आहे, हा प्रश्न करून व तें प्रेरकत्व नारायणाकडे आहे, हें समजून घेऊन काय करावयाचें आहे?

सिद्धान्ती—बाळा! या ज्ञानाचें फल फार मोठें आहे. बाबा! नारायण हाच सर्व-प्रेरक आहे, असें ज्या बुद्धिमान् पुरुषांस यथार्थ ज्ञान होतें, त्या

लोकांनीं हा भौतिक देह सोडल्यावर, सारांश, देहपात झाल्यावर, त्यांचा जीवात्मा देवयान मार्गानें जातो आणि लिंग-देहाचा त्याग करून तो अमृत म्हणजे मुक्त होतो. सारांश, हें ज्ञान ज्यांस झालें ते लोक सर्व दुःखांपासून मुक्त होतात आणि अमृतपदाला जातात. सर्वप्रेरकत्व समजून घेण्याचें हें फल आहे. ॥२॥

(आनंदाश्रमांत छापलेल्या प्रतींत तिसरा मंत्र व त्यावरील श्रीरंगाचार्यांचें व्याख्यान हीं मला उपलब्ध झालीं नाहींत. पुढील मंत्राचा क्रमांक चवथा आहे. तेव्हां तिसरा मंत्र व त्यावरील व्याख्यान हीं मुद्रकांच्या अनुग्रहानें स्वकार्यविन्मुख झालीं असावीं !)

मन आदीनां प्रवर्तकनारायणब्रह्म साकल्येनोपदिशेत्यत्राऽऽह यद्वाचेत्यादिमन्त्रैः—

सिद्धान्ती—ह्या पुढील मंत्रांत मनाचें प्रवर्तक जें नारायणरूपी परब्रह्म, त्याचें स्वरूप पूर्णत्वानें समजून द्यावें, अशी विनंति केल्यावरून आचार्यांनीं पुढील मंत्रांत तें स्वरूप सांगितलें आहे.

मंत्र ४-५-६-७-८.

या सर्व मंत्रांचे अन्वय व अर्थ पूर्वीप्रमाणेंच आहेत.*

यद् ब्रह्म वाचा वेदवाण्याऽनभ्युदितं साकल्येन नोक्तम्। येन च प्रेरिता सती वागभ्युद्यते पुरुषैरुच्चार्यते तदेव त्वं ब्रह्म विद्धि जानीहि। नेदं जडजीवादिकं जगद्यत्कामात्मान इदमुपासत इत्यर्थः। एवमग्रेऽप्यर्थो ध्येयः। यन्मनसा कश्चित्साकल्येन न मनुते येन मनो मतम्। येन चक्षूंषि पश्यन्ति दृश्यन्ते इत्यर्थः। यत्प्राणेन न प्राणिति न चेष्टते येन प्राणः प्रणीयते प्रेर्यते ॥४।५।६।७।८॥

इति प्रथमः खंडः ॥ १ ॥

सिद्धान्ती—वाणीला म्हणजे वेद-वाणीला ज्या ब्रह्माचें पूर्णत्वानें वर्णन करितां येत नाहीं, पण ज्याच्या प्रेरणेनें प्रवृत्त झालेली वाणी जीवांचे विचार प्रकट करिते, तें मात्र ब्रह्म होय, असें तूं जाण. ज्याची म्हणजे ज्या जड-जीवात्मक जगताची सकाम पुरुष उपासना करितात तें हें ब्रह्म नव्हे, असा अर्थ

---

* शांकरभाष्याचें भाषांतर करितांना दिलेल्या अन्वयार्थाप्रमाणें.

आहे. सारांश, जड वस्तु किंवा जीवात्मक वस्तु किंवा ह्या सर्व वस्तु जेथें राहतात, तें जमत् ब्रह्म नव्हे; तें ब्रह्म या सर्वांस अगोचर असून सर्वांचें नियामक आणि प्रवर्तक आहे. याच प्रमाणें पुढच्याही चार मंत्रांचा अर्थ समजून घ्यावा. म्हणजे जें मनाला पूर्णत्वानें ग्रहण करितां येत नाहीं, जें डोळ्यांनां दिसत नाहीं, जें प्राणाच्या साहाय्यानें प्रवृत्त होत नाहीं, पण ज्याच्या साहाय्यानें मन, डोळे, प्राण इत्यादि आपापले व्यापार करितात तें ब्रह्म आहे.

शिष्य—किंवा जें मनानें विचार करित नाहीं, जें डोळ्यानें पहात नाहीं, पण जें मनास व डोळ्यांस स्वस्वव्यापाराची शक्ति देतें तें ब्रह्म आहे. असाही अर्थ हाइल. नव्हे ?

सिद्धान्ती—होय. मंत्रांतील पदद्दष्टीन पाहिलें असतां तुझाच अर्थ जास्त आदरणीय आहे. मी केलेला अर्थ वैयाकरणांस ही संमत होणार नाहीं. तरी पण श्रुतीचा भावार्थ मी म्हणतों, असाही असणें शक्य आहे, हें चवथ्या मंत्रावरून दिसतें. शिवाय माझ्या अर्थानें इंद्रियांची दुर्बलता जास्त स्पष्ट होते. असो. तात्पर्य, हें आहे कीं तें सर्व पदार्थांस व ज्ञान-साधनास अगोचर आहे. पण त्याला मात्र सर्व पदार्थ आणि ज्ञान-साधनें यांचें पूर्ण ज्ञान आहे. तसेंच, तें कोणाच्याही तंत्रानें चालत नाहीं म्हणून स्वतंत्र आहे; पण सर्व वस्तु त्याच्या तंत्रानें चालतात म्हणून त्या परतंत्र आहेत; समजलें ? सारांश, तें सर्वज्ञ आणि सर्वप्रेरक आहे. ॥ ४ ॥ ५ ॥ ६ ॥ ७ ॥ ८ ॥

पहिला खण्ड समाप्त.

द्वितीयः खण्डः ।

मंत्र पहिला (क्रमांक ९ वा).

अन्वय व अर्थ—**सुवेद इति यदि मन्यसे** (आपल्याला ब्रह्मज्ञान पूर्णत्वानें झालें असें—हे साधका !—तूं मानीत असशील तर) **त्वं अपि दहरं एवं ननं ब्रह्मणः रूपं वेत्थ** (तुला सुद्धां खरोखर ब्रह्मरूपाचें अल्प ज्ञान झालें असलें पाहिजे) **यत् अस्य त्वं, यत् अस्य देवेषु** (तुझ्यामध्यें जें ब्रह्मरूप आहे व देवांमध्यें जें ब्रह्मरूप आहे त्याचें—तुला फारच अल्प ज्ञान झालें असलें पाहिजे.—पुढील अन्वयार्थ पूर्वीप्रमाणें.

हे शिष्याहं सुवेद ब्रह्मणो रूपं सम्यग्जानामीति यदि मन्यसे तर्हि त्वमपि नूनं दहरमेवाल्पमेव ब्रह्मणो रूपं वेत्थ । तस्यानन्त-

त्वादिति भावः। रूपमिति ब्रह्मगुणानामुपलक्षणम्। यद्यस्माद्हरमेव वेत्थ। अथ तस्मात्त्वं तदिति शेषः। मीमांस्यमेव विचार्यमेव नु इदानीम्। ते त्वयेति ॥ ९ ॥ १ ॥

शिष्य—भगवन्! मागील खंडांतील उपदेश ऐकून त्या साधकाला ब्रह्माचें निश्चित स्वरूप समजलेंच असलें पाहिजे.

सिद्धान्ती—हीच शंका आचार्यांना येऊन त्यांनीं ह्या साधकाला सांगितलें कीं "'ब्रह्मस्वरूपाचें ज्ञान मला यथास्थित झालें आहे.' असें जर तुला वाटत असेल, तर मला असें सांगितलें पाहिजे कीं, तुला ब्रह्मरूपाचें अति अल्प ज्ञान झालें असलें पाहिजे."

शिष्य—कां बरें? आचार्यांनीं असें कां म्हटलें?

सिद्धान्ती—अरे! ब्रह्म अनंत आहे ना? ह्या अनंताचें ज्ञान सान्त जीवबुद्धीला कसें व्हावयाचें? मला अनंत कालांतील सर्व गोष्टींचें ज्ञान यथास्थित झालें आहे, असें जर मी म्हटलें तर तें वेड्यासारखें नाहीं का होणार?

शिष्य—भगवन्! 'ब्रह्माचें रूप' अशी पदें मंत्रांत आहेत, तेव्हां श्रुतीनें रूपाचाच तेवढा कां उल्लेख केला?

सिद्धान्ती—रूप या पदानें ब्रह्माच्या सकल गुणांचा म्हणजे अनंत गुणांचाही उल्लेख केला आहे. रूप हें केवल उदाहरणाकरितां घेतलें आहे. समजलें? असो; या अनंत गुणांपैकीं ज्या अर्थी साधकाला फारच थोड्या गुणांचें ज्ञान झालें आहे, असें आचार्यांनीं पाहिलें, तेव्हां त्यांनीं त्यास सांगितलें कीं, साधका! तुला अद्यापि ब्रह्माच्या पूर्ण स्वरूपाची मीमांसा केलीच पाहिजे. तात्पर्य, झाला इतका विचार फारच थोडा आहे. अद्यापि तुला ब्रह्मस्वरूपाविषयीं पुष्कळच विचार करावयास पाहिजे; तुझ्यामध्यें—सर्व जीवांमध्यें—व सर्व देवांमध्यें जें ब्रह्मस्वरूप विराजमान आहे, त्या स्वरूपाचें अति अल्प ज्ञान झालेलें दिसत आहे, म्हणून आपल्याला या स्वरूपाविषयीं पुष्कळच ऊहापोह केला पाहिजे. ॥ ९ ॥ १ ॥

शिष्य—भगवन्! येथें 'त्वं' ह्या प्रथमाविभक्तिक पदाचा सतम्यर्थ केला आहे, असें समजावयास हवें.

सिद्धान्ती—होय. असो; शेवटच्या 'मन्ये विदितं' या दोन पदांचा अर्थ पुढें केला आहे.

मंत्र दुसरा (क्रमांक १० वा).

अन्वय व अर्थ—मन्ये विदितं (मला स्वरूपज्ञान झालेंसें वाटतें) सुवेद इति अहं न मन्ये (पण मला ज्ञान–विज्ञान झालें आहे असें वाटत नाहीं.) नो न वेद इति वेद च (समजलें नाहीं असें नाहीं व समजलें असें नाहीं.) पुढील अन्वयार्थ पूर्वीप्रमाणें. सारांश स्पष्ट आहे. ॥१०॥२॥

अन्येषां कात्स्न्र्येन ब्रह्माज्ञानित्वेऽपि तव स्वस्ति सम्यग्ब्रह्मज्ञानित्वमिति पृष्टो देशिक आह-मन्य इति । अन्ये सम्यग्वेदायमिति मां वदन्ति अहं तु ब्रह्म विदितं न मन्य इति योजना । तर्हि त्वमपि ब्रह्म सर्वथा न वेत्थ किमित्यत आह-नो नेति । नो वेद न जानामीति न किंतु वेदेति च ।

ब्रह्मणः साकल्येनाज्ञेयत्वमुपपाद्योपसंहरति—

नोऽस्माकं मध्ये यस्तु ब्रह्माहं वेदेति वदति स तन्नो वेद । कुतः परिच्छिन्नत्वज्ञानात् । अहं न वेदेति यो वदत्यसौ वेद च ब्रह्मणोऽपरिच्छिन्नत्वात् ॥ १० ॥ २ ॥

सिद्धान्ती—नंतर साधक आचार्याला म्हणाला भगवन् ! इतर पुरुषास तर ब्रह्माचें सर्वथा अज्ञानच आहे. पण आपल्याला मात्र त्या स्वरूपाचें पूर्ण ज्ञान झालें आहे असें मला वाटतें.

शिष्य—यावर आचार्यांनीं काय उत्तर दिलें ?

सिद्धान्ती—आचार्य म्हणाले. साधका ! पुष्कळ लोक असें म्हणतात कीं मला ब्रह्मस्वरूपाचें ज्ञान यथास्थित झालें आहे. पण मला मात्र तसें वाटत नाहीं. तत्स्वरूपाचें ज्ञान मला समग्र झालेंच नाहीं.

शिष्य—हें उत्तर ऐकून साधक स्तब्ध बसला कीं काय ? मी तेथें असतों तर विचारिलें असतें कीं, 'आचार्य महाराज ! तर मग आपल्यालाही ब्रह्मज्ञान सर्वथा झालें नाहीं असें म्हटलें पाहिजे.'

सिद्धान्ती—तुझ्या प्रमाणेंच साधकानें प्रश्न विचारला. त्याचें उत्तर आचार्यांनीं असें दिलें कीं मला ब्रह्मज्ञान झालें नाहीं, असेंही नाहीं; किंतु झालें आहे.

शिष्य—म्हणजे काय ?

सिद्धान्ती—म्हणजे असें कीं ब्रह्मस्वरूपाचें साकल्यानें ज्ञान होणें हें अत्यंत अशक्य आहे. सारांश, आपल्यामध्यें जो कोणी असें म्हणतो कीं, 'मी ब्रह्मरूप जाणिलें' त्याला कांहीं एक समजलेलें नसतें. कारण जीवाचें ज्ञान मर्यादित आहे. तेव्हां मर्यादित ज्ञानाला अनंताचें ज्ञान होणें शक्यच नाहीं. पण 'ब्रह्मज्ञान

झालें नाहीं.' असें जो म्हणतो, त्याला असें कळलेलें असतें कीं ब्रह्मस्वरूप अनंत आहे आणि तें आपल्यास समजावयाचें नाहीं. हा निश्चय ज्याचा झाला तोच ब्रह्मवेत्ता होय. ब्रह्मस्वरूप अनंत आहे आणि जीवबुद्धि परिच्छिन्न अथवा मर्यादित आहे; म्हणून जीवाला ब्रह्मज्ञान होणें अत्यंत अशक्य आहे. हें निश्चयानें समजणें हेंच खरें ज्ञान होय. ॥ १० ॥ २ ॥

मंत्र तिसरा (क्रमांक ११ वा).

अन्वय व अर्थ पूर्वीप्रमाणें.

यो न इत्यादिना साकल्येन श्रवणाऽगोचरत्वमुक्त्वा मनना ऽगोचरत्वं चाऽऽह–यस्येति। यस्य ब्रह्मामतमिति मतं तस्य पुंसो मतं विचारितमनन्तत्वज्ञानात्। यस्य ब्रह्म मया मतं विचारितमिति मतं बुद्धिः स न वेदानन्तत्वाज्ञानात्। साक्षात्कारोऽपि न साकल्येनेत्याह–अविज्ञातमित्यादिना। वयं ब्रह्म सम्यक्साक्षात्कृतवन्त इति विजानतामविज्ञातं ब्रह्म। आनन्त्याद्ब्रह्मणः साकल्येन ज्ञानाभावात्। अविजानतामुक्तरीत्याऽविजानतां नास्माभिर्ब्रह्म सम्यक्साक्षात्कृतमिति यावत् विज्ञातं ब्रह्म साक्षात्कृतमित्यर्थः। आनन्त्यवेदनादिति भावः ॥ ११ ॥ ३ ॥

सिद्धान्ती—याप्रमाणें श्रवणाला ब्रह्माचें साकल्यानें गोचरत्व होणें अशक्य आहे, असें सांगून (सारांश, ब्रह्म हें इंद्रियांस अगोचर आहे; असें प्रतिपादून) आतां या मंत्रांत तें मननालाही सर्वथा गोचर असणें शक्य नाहीं, असें सांगतात. ज्याला असें समजलें कीं, ब्रह्म ही वस्तु मननाला गोचर होण्यासारखी नाहीं, त्या पुरुषानें खरा विचार केला आहे आणि ब्रह्माच्या अनंतत्वाचें ज्ञान त्याला झाले आहे, असें समजावें. पण उलटपक्षीं 'मीं ब्रह्माचें पूर्ण मनन केलें आहे; आणि माझा तत्स्वरूपाचा निश्चय पक्का झाला आहे' असें ज्याला वाटत असतें, त्याला ब्रह्मरूप समजलेलें नसतें. कारण, अनंतब्रह्म हें ज्ञानाचा विषय होणें शक्यच नाहीं. सारांश, 'ब्रह्म हें अनंत आहे' या तत्त्वाचें या अहंमन्य पुरुषास शुद्ध अज्ञान असतें; ही मननाच्या संबंधानें गोष्ट झाली. तसेंच, त्या स्वरूपाचा समग्र साक्षात्कार होणेंही अशक्य आहे; म्हणून आम्ही ब्रह्मसाक्षात्कारी आहों, आम्हांला तत्स्वरूप प्रत्यक्ष झालें आहे' असें जे लोक समजतात, त्यांना कांहीं एक ज्ञान झालेलें नसतें. कारण वर सांगितलेंच आहे, तें हें कीं, ब्रह्म अनंत आहे म्हणून त्याचें समग्र ज्ञान होणें शक्य नाहीं. त्याचप्रमाणें 'आम्हांला ब्रह्मसाक्षात्कार सामग्र्यानें झाला नाहीं व होणें शक्यही नाहीं' असें ज्यांचें निश्चयपूर्वक मत आहे, त्यांनां ब्रह्मस्वरूपाचें

यथार्थ ज्ञान झालें आहे, असें समजलें पाहिजे. म्हणजे ब्रह्मस्वरूप अनंत आहे, असें स्पष्ट ज्ञान त्यांस झालेलें असतें, म्हणून त्यांचा असा निश्चय होतो.॥ ११॥ ३॥

ब्रह्मणः साकल्येनाज्ञेयत्वे कथं तेनेष्टसिद्धिरिति चेत्स्वस्य योग्यैकदेशज्ञानादेवेष्टसिद्धिरित्याह—

शिष्य—महाराज ! ह्या ब्रह्माचें समग्र ज्ञान होणें केव्हांही शक्य नाहीं, असें जर आहे तर पुरुषार्थसिद्धि तरी कशी सांग व्हावयाची ?

सिद्धान्ती—आपलें ज्ञान सदैव एकदेशी असतें, असा यथार्थ निश्चय झाला, म्हणजे पुरुषार्थसिद्धि होण्याला अथवा कृतार्थ होण्याला कोणताही प्रत्यवाय उत्पन्न होत नाहीं. हेंच स्पष्ट करितात, ऐकः—

मंत्र चवथा (क्रमांक १२ वा).

अन्वय व अर्थ—हि मतं प्रतिबोधविदितं अमृतत्वं विन्दते (कारण आपल्या ज्ञानास योग्य असें अपरोक्षज्ञान अथवा उपासनासिद्ध विद्या पूर्ण होऊन मोक्ष मिळतो.) आणि—धैर्यानें समाधान व भक्तीनें साक्षात्कार, असें फल मिळतें. बाकीचा अन्वय पूर्वीप्रमाणेंच आहे.

प्रतिबोधेत्यत्र श्रुतमिति शेषः । स्वस्य ब्रह्मविद्याया योग्यतानुसारेण पुंभिः श्रुतं मतं ब्रह्म प्रतिबोधेन स्वयोग्यापरोक्षज्ञानेन विदितं चेदमृतत्वं मुक्तिं विंदते लभते पुमानिति वा प्रतिबोधेनोपासनरूपया कयाचिद्ब्रह्मविद्यया विदितं साक्षात्कृतं ब्रह्म विन्दते लभत इति वार्थः । आत्मना धृत्या वीर्यं समाहितमनस्त्वलक्षणं विन्दते लभते । विद्यया । उपासनरूपया भक्त्येति यावत् । अमृतं परमात्मानं विन्दते लभते साक्षात्करोतीति यावत् । 'भक्त्या च धृत्या च समाहितात्मा ज्ञानस्वरूपं परिपश्यतीहे'ति स्मृतेः ॥ १२ ॥ ४ ॥

सिद्धान्ती—या मंत्रांतील ' प्रतिबोधविदित ' पदाच्या नंतर श्रवण केलेलें या शब्दांचा अध्याहार करावा. ब्रह्मविद्येनें स्वतःची जी आत्मिक योग्यता झाली असेल तिच्या अनुसारानें श्रवण केलेलें, मनन केलेलें, ब्रह्मस्वरूप जर स्वज्ञानयोग्यतेनुसार प्राप्त झालेल्या अपरोक्ष ज्ञानानें विदित झालें असलें म्हणजे अमृतत्व (मुक्ति) मिळतें. पुरुषाला त्याच्या ज्ञानयोग्यतेनुसार जर साक्षात्कार झाला तर त्याला अमृतत्व प्राप्त होतें. प्रतिबोध याचा अर्थ अपरोक्षज्ञान असा आहे. आपल्या आत्मिक योग्यतेनुसार आपल्यास ब्रह्मज्ञान होतें. त्या ज्ञानाच्या योग्यते-

प्रमाणें अपरोक्ष साक्षात्कार होतो व हें झालें म्हणजे अमृतत्व मिळतें. असो; प्रतिबोधाचा दुसरा अर्थ असाही करावा कीं, उपासनरूपानें ब्रह्मविद्या प्राप्त होऊन आपल्याला ब्रह्मसाक्षात्कार झाला म्हणजे आपण मुक्त होतों. विद्या म्हणजे उपासनारूप भक्ति होय. ह्या भक्तीनें मुक्ति मिळते. म्हणजे परमात्मस्वरूपाचा साक्षात्कार होतो. म्हटलें आहे, 'भक्तीनें व धैर्यानें (दृढ अभ्यासानें) आत्मा समाहित होऊन (समाधिस्थिति प्राप्त होऊन) पुरुष ज्ञानस्वरूपाचा द्रष्टा होतो,' अशी स्मृति आहे.

शिष्य—'आत्मना वीर्यं विन्दते' याचा भावार्थ काय ?

सिद्धान्ती—तो तर स्पष्ट आहे. आपल्याला जर धैर्य असेल तर आपल्यास उत्तम प्रकारचें वीर्य म्हणजे उत्तमप्रकारची शांति मिळते. मनाला समाधान हवें असेल तर त्यानें धैर्याचा अवलंब करावा. याप्रमाणें दृढ अभ्यासानें शांति आणि 'विद्येनें' (भक्तीनें) अमृत मिळतें. सारांश, जीव मुक्त होतो. तात्पर्य यद्यपि जीव व त्याचें ज्ञान हीं मर्यादित आहेत, तथापि अनंत ब्रह्माचें ज्ञान-विज्ञान संपादणें असेल तर दृढ अभ्यासानें व एकनिष्ठ उपासनेनें आत्म-साक्षात्कारापर्यंत परमात्मभक्ति करावी. या भक्तीला धैर्याचा व ज्ञानाचा अवलंब असावा. हें झालें म्हणजे आपल्या ज्ञानानुसार साक्षात्कार होऊन मोक्ष मिळतो. ॥ १२ ॥ ४ ॥

मंत्र पांचवा (क्रमांक १३ वा).

अन्वय व अर्थ पूर्वीप्रमाणें.

अस्तु विद्यारूपं ज्ञानं भगवत्साक्षात्कारफलं तत्कदा संपाद्यमित्यत आह-इहेति। इह ज्ञानयोग्यब्राह्मणादिदेहेऽवेदीच्चेद्यजानाच्चेत्। अथ तर्हि सत्यं पूर्वोक्तफलं सत्यममृतब्रह्मास्त्येव तत्प्राप्तौ न संदेह इति भावः। इह नावेदीच्चेत्तदा महती विनष्टिर्हानिर्भवति। अथ प्रतिबोधं वक्ति-धीरा ब्रह्मप्राप्तिविनष्टिविवेकिनो भूतेषु सर्वभूतेषु स्थितं ब्रह्म त्रिचिन्त्याऽप्रयाणं स्मृत्वाऽऽस्माल्लोकात्प्रेत्यामृता भवन्तीति ॥ १३ ॥ ५ ॥

इति द्वितीयः खण्डः ॥ २ ॥

शिष्य—ब्रह्मविद्यारूप ज्ञानानें भगवत्-साक्षात्काराचें फल मिळतें हें तर ठीकच झालें, पण या ज्ञानाचें संपादन केव्हां करावयास पाहिजे ?

सिद्धान्ती—या तुझ्या प्रश्नालाच श्रुति उत्तर देत आहे तें ऐक:—येथें म्हणजे ज्ञान करून घेण्यास योग्य असें जें ब्राह्मणादिकांचें शरीर असतें, त्यांतच म्हणजे ब्राह्मणादिजन्मामध्येंच जर हें कृतार्थ करणारें ज्ञान झालें, तर पूर्वी सांगितलेलें फल निश्चितपणानें मिळतें. म्हणजे नित्य असणाऱ्या ब्रह्माची प्राप्ति होते व

मुक्ति मिळते, यांत कांहीं संदेह नाहीं. पण येथें जर आपण प्रयत्न केला नाहीं आणि ब्रह्मज्ञान मिळविलें नाहीं तर मोठा घात होतो, मोठी हानि होते असो; जे धीर पुरुष आहेत, ज्यांना उत्तम प्रकारचा विवेक प्राप्त झाला आहे आणि प्रत्येक भूतांमध्यें ब्रह्म अंतर्यामिरूपानें स्थित असतें, असें ज्याचें अखंड चिंतन आमरण असतें, ते लोक हें भुवन सोडून गेले म्हणजे मुक्त होतात. सारांश, ब्रह्मप्राप्ति व समूल नाश यांच्या मधील तारतम्य समजून जे लोक ब्रह्मज्ञ होतात, ते मुक्त होतात. ॥ १३ ॥ ५ ॥

दुसरा खंड समाप्त.

तृतीयः खण्डः ।

अत्यद्भुतत्वात्साकल्येन न ज्ञेयमिति प्रतिपादितेऽर्थे कां च नाऽऽख्यायिकां वक्ति—

सिद्धान्ती—ब्रह्म वस्तु अपूर्व आणि अद्भुत आहे, म्हणून तिचें ज्ञान समग्रत्वानें केव्हांही होणें शक्य नाहीं, हें तत्त्व स्पष्ट करून सांगण्यासाठीं श्रुति एका आख्यायिकेचा अवतार करीत आहे ती ऐकः—

मंत्र पहिला (क्रमांक १४ वा).

अन्वय व अर्थ पूर्वीप्रमाणें.

देवानां दैत्यदानवैर्युद्धे प्रस्तुते सति ब्रह्म देवानाविश्य देवेभ्यो देवानामर्थे दैत्यादीन्विजिग्ये व्यजयत् । हेति निश्चितमेतदित्यर्थः । अथ विजयानन्तरं तस्य देवेष्वाविष्टस्य ब्रह्मणो विजये सति देवा अमहीयन्तापूज्यन्त । महीङ्, पूजायाम् । कण्ड्वादिभ्यो यगिति यक्प्रत्ययः । गर्विणोऽभवन्निति भावः । हेत्याश्चर्ये । ब्रह्मणो विजये कुतो देवानां गर्व इत्येतदेव व्यनक्ति—त इति । देवा अस्माकमेवायं विजयोऽस्माकमेवायं महिमेत्यैक्षन्त व्यजानन् ॥ १४ ॥ १ ॥

सि०—देव-दानवांचें युद्ध चाललें असतां देवांच्या पक्षाला साहाय्य होऊन ब्रह्मानें दैत्यादिकांचा पराभव देवांकडून करविला. नारायण नेहमीं असेंच करून देवकार्य करितो हें प्रसिद्ध आहे. विजय प्राप्त झाल्यानंतर प्रतिष्ठा प्राप्त झालेल्या देवांनीं मोठा उत्सव केला. पण या विजयाबद्दल त्यांस फार मोठा गर्व झाला आणि अर्थातच ब्रह्माकडून साहाय्य मिळालें असतांही आपल्या आश्रयदात्याचें त्यांस स्मरण झालें नाहीं.

शिष्य—ब्रह्माच्या आश्रयानें जय मिळाला असून देवांस काय म्हणून गर्व झाला ?

सिद्धान्ती—देवांचें हें शुद्ध अज्ञान होतें. त्यांना वाटत होतें कीं केवल आपल्या स्वतःच्या सामर्थ्यानें आपण हा जय मिळविला आहे. ॥ १४ ॥ १ ॥

मंत्र दुसरा (क्रम.क १५ वा).

अन्वय व अर्थ पूर्वीप्रमाणें.

एषां देवानां तदासुरावेशकृतेश्वराज्ञाननिमित्तमहंकारादिकं जज्ञौ व्यजानाद्ब्रह्मेत्यनुषङ्गः । तेभ्यो देवेभ्योऽर्थे देवानां स्वात्मतत्त्वबोधाय यक्षरूपतया प्रादुर्बभूव ब्रह्मेत्यर्थः । तद्यक्षरूपं ब्रह्मेदं किमिति न व्यजानत न व्यजानन् ॥ १५ ॥ २ ॥

सि०—या देवांनां असुर लोकांस योग्य अशा अज्ञानजन्य अहंकाराचा संसर्ग झाला आहे असें सर्वज्ञ ब्रह्माला तत्काल कळलें.

शिष्य—अज्ञान आणि तजन्य अहंकार हे दुर्गुण राक्षसांमध्येंच असतात काय ?

सिद्धान्ती—तसें नाहीं. जेथें अहंकार, अज्ञान, इत्यादि दोष दिसतात तेथें असुरप्रवेश झाला, असुर–संगति झाली, असें समजावें. असो, देवांचें हें अज्ञान घालवून त्यांनां आत्म–तत्त्वाचा बोध करावा म्हणून ब्रह्मानें एक अतिविलक्षण असें यक्षाचें स्वरूप धारण केलें. हें स्वरूप चमत्कारजनक आणि पूज्यभाव–प्रदीपक असें होतें. हें काय स्वरूप आहे हें देवांसही कळलें नाहीं. ॥ १५ ॥ २ ॥

मंत्र तिसरा (क्रमांक १६ वा).

अन्वय व अर्थ पूर्वीप्रमाणें.

ते देवा अग्निमब्रुवञ्जातवेद कामिति विजानीहीति तथेत्युक्त्वा ॥ १६ ॥ ३ ॥

सिद्धान्ती—देवांनीं अग्नीला विनंति केली कीं हे जातवेदा ! (सर्वज्ञा !) ही अति विलक्षण गोष्ट काय आहे, तिचा शोध करून ये. अग्नीनें ' बरें आहे ' असें उत्तर दिलें. ॥ १६ ॥ ३ ॥

मंत्र ४-१० (क्रमांक १७ ते २३).

अन्वय व अर्थ पूर्वीप्रमाणें.

अग्निस्तद्यक्षमाभिमुख्येनाद्रवदगमत् । तद्यक्षमभिमुखमागतमग्निं कोऽसीत्यवदत् । अग्निरहमस्मि जातवेदा अहमस्मीत्यग्निरब्रवीत् । वै प्रसिद्धौ । एतन्नाम ममेत्यर्थः । तस्मिंस्त्वयि तादृशे त्वयि किं वीर्यमिति यक्षमब्रवीत् । यदिदं पृथिव्यामस्ति सर्वमपीदं दहेयमित्यग्निरब्रवीत् । तस्मा अग्नय एतद्धेत्युक्त्वा किंचित्तृणं तत्पुरतो निदधौ यक्षमित्यर्थः । तत्तृणं दग्धुं सर्वजवेन सर्ववेगेणोपप्रेयाय समीपमगमत् । गत्वा तन्न शशाक दग्धुं सोऽग्निः । तत एव तावन्मात्रत एव यक्षरूपमवधार्य निववृते निवृत्तवान्निवृत्य च देवानब्रवीत् । यदेतद्यक्षमित्येतद्विज्ञातुं नाशकमिति । अथानन्तरं वायुं प्राग्वद्व्याख्या । आददीयाऽऽदद्यामित्यर्थः ॥ ४ ॥ ॥ १० ॥ १७ ॥ ॥ २३ ॥

सिद्धान्ती—देवांनीं सांगितल्याप्रमाणें अग्नि त्या यक्षाच्या जवळ लवकर गेला; यक्षासमोर गेल्यावर त्यानें अग्नीला विचारिलें कीं, 'तूं कोण आहेस ? अग्नीनें उत्तर दिलें 'मीं अग्नि आहें, मला जातवेद असेंही म्हणतात.' यक्षानें विचारलें 'तूं जातवेद आहेस तर तुझ्यामध्यें सामर्थ्य तरी काय आहे ?' अग्नीनें उत्तर दिलें 'पृथ्वीमध्यें जें काय आहे, त्या सर्वांला मी दग्ध करून टाकीन.' नंतर यक्षानें अग्नीपुढें एक गवताची काडी ठेविली; आणि म्हणाला,—कीं, 'या काडीला तूं जाळून भस्म करून टाक.' त्या तृणाजवळ त्वरित जाऊन अग्नीनें हें काम करण्याकरितां आपलें होतें नव्हतें तें सामर्थ्य खर्च केलें, पण त्याचा कांहीं एक उपयोग झाला नाहीं. म्हणजे तें गवत त्याला जाळतां आलें नाहीं. नंतर तो अग्नि यक्षस्वरूप न समजण्यासारखें आहे, असें समजून देवांकडे परत गेला; आणि 'मला यक्षस्वरूप मुळींच समजले नाहीं.' असें सांगता झाला. वायूचीही हीच अवस्था झाली; म्हणजे वायूचें सामर्थ्य भग्न होऊन, त्यालाही यक्षस्वरूप काय आहे, हें कळलें नाहीं. मंत्रांत 'आददीय' असें पद आहे, त्याचा अर्थ ग्रहण करणें असा आहे. ॥ १७ ॥ ते ॥ २३ ॥

मंत्र ११-१२ (क्रमांक २४ व २५).

अन्वय व अर्थ पूर्वीप्रमाणें.

तस्मात्तिरोदधे तस्मात्प्रदेशाद्न्तर्हितमभूदिति वा । स इन्द्रस्तस्मिन्नेव यक्षतिरोधानाकाशप्रदेशे यक्षेणोपदेशार्थं स्थापितां स्त्रियं

दृष्ट्वाऽऽजगाम तत्समीपं प्राप्तवान्। सा केत्यत उक्तं बहुशोभमानां हैमवतीं हिमवतः पुत्रीमेतद्यक्षं किमिति तां स्त्रियमुवाच पप्रच्छेत्यर्थः ॥ ११ ॥ १२ ॥ २४ ॥ २५ ॥

इति तृतीयः खण्डः ॥ ३ ॥

नंतर देवांनीं इंद्राकडे ही कामगिरी सोंपविली. तेव्हां इंद्र त्या यक्षाजवळ गेला. तेव्हा यक्ष तेथल्या तेथेंच अंतर्धान पावला. अथवा इंद्राला दिसेनासा झाला. पण त्याच जागीं म्हणजे ज्या आकाशप्रदेशांत यक्ष अंतर्हित झाला होता, तेथें एक सुंदर स्त्री उभी होती, ती इंद्रानें पाहिली. तिच्याजवळ ज्ञानप्राप्तीसाठीं इंद्र जाता झाला. ही स्त्री यक्षानेंच तेथें स्थापित केली होती. तिच्याजवळ गेल्यावर त्याला असें दिसलें कीं, ती स्त्री हिमवताच्या कन्येसारखी (उमेसारखी) अति सुंदर आहे. असो; इंद्रानें तें 'यक्ष-स्वरूप कोणाचें' असें तिला विचारलें. ॥ ११ ॥ १२ ॥ २४॥२५॥

तिसरा खंड समाप्त.

चतुथः खण्डः।

मंत्र पहिला (क्रमांक २६ वा).

* अन्वय पूर्वाप्रमाण.

इन्द्रेण पृष्टा देव्येतद्यक्षं ब्रह्मेति होवाच। हेति निश्चयमाह। एतदेतस्य देवेष्वनुप्रविष्टस्य ब्रह्मणो विजये तद्विजयनिमित्तं महीयध्वं महिमवन्तो भवत न त्वात्मनो विजय-निमित्तं गर्विणो भवत वै निश्चितमेतदिति चोवाचेत्यन्वयः। एवमुमयोपदिष्ट इन्द्रः किं चकारेत्यत आह-तत इति। ततो हैव देव्युपदेशादेव तद्यक्षमिन्द्रो ब्रह्मेति देवविजयोऽस्मदनुप्रविष्टब्रह्मकृत इति विदांचकार ज्ञातवान् ॥ १ ॥ २६ ॥

सिद्धान्ती—हा इंद्राचा प्रश्न ऐकून देवी म्हणाली, कीं 'तें ब्रह्म आहे' हें तुला ठाऊक नाहीं काय ? देवहो ! तुम्हांला अंतर्बाह्य साहाय्य करून ब्रह्मानें जयप्राप्ति दिली आहे आणि म्हणून तुमचा उत्कर्ष झाला आहे. अतएव आपण हा जय मिळविला, असा जो तुम्हांस गर्व झाला आहे त्याचा त्याग करा आणि

---

* अन्वय पूर्वीप्रमाणें, पण अर्थाचें स्पष्टीकरण व्याख्यानांत उत्तम केलें आहे.

हा विजय प्राप्त करून दिल्याबद्दल ब्रह्माचे आभारी व्हा, व त्याची योग्य उपासना करून त्याचा महिमा विश्वांत प्रकट करा. माझें सांगणें निःसंशय खरें आहे.

शिष्य—याप्रमाणें इंद्राला ब्रह्मोपदेश झाल्यावर इंद्रानें काय केलें ?

सिद्धान्ती—हा देवीचा उपदेश ऐकून मात्र इंद्राला ज्ञान झालें कीं जें आपण यक्षस्वरूप पाहिलें तें ब्रह्माचें होतें. तसेंच त्या सर्वशक्ति ब्रह्मानें देव-शरीरांत प्रवेश करून देवांचें अंतर्बाह्य साहाय्य केल्यामुळें आम्हां देवांचा जय झाला, असें इंद्रास आतां कळलें व त्याच्या गर्वाचा परिहार झाला. ॥ १ ॥ २६ ॥

मंत्र दुसरा (क्र० २७ वा).

तस्माद्वै यस्मात्त्वं ब्रह्मणः पूर्वदृष्टत्वादेवैते देवा अन्यान्देवानतितरामिवेति । एते देवाः क इत्यतस्तानाह—यदग्निर्वायुरिन्द्र इति । यदग्निर्योऽग्नियों वायुर्य इन्द्र एते देवाः । कुत एतेऽधिका इत्यतस्तस्मादित्युक्तम् । हेतुं व्यनक्ति—ते होति । हि यस्मादेतद्यक्षरूपं ब्रह्म नेदिष्ठं समीपस्थं पस्पृशुः । स्पृश संस्पर्शने । परामर्शं कृतवन्त इत्यर्थः । परामर्शात्प्राग्ग्निवाय्वोर्यक्षदर्शनमात्रमिंद्रस्य तु यक्षस्य ब्रह्मत्वज्ञानमिति । बोध्यम् । तद्व्यनक्ति—ते होति । तेऽग्निवायविन्द्राः प्रथमः प्रथमं विदांचकार विदांचक्रुः ॥ २ ॥ २७ ॥

सिद्धान्ती—ज्या अर्थी या देवांना ब्रह्मस्वरूपाचें दर्शन अगोदर झालें, त्या अर्थी हे देव इतर देवांपेक्षां योग्यतेनें श्रेष्ठ होते असें ठरल्यासारखें होतें.

शिष्य—हे देव म्हणजे कोणते ?

सिद्धान्ती—अग्नि, वायु, आणि इंद्र असे सर्वश्रेष्ठ देव, हा 'हे देव' याचा अर्थ आहे.

शिष्य—यांनाच श्रेष्ठ देव असें समजण्याचें कारण काय ?

सिद्धान्ती—कारण इतकेंच कीं त्यांना ब्रह्मस्वरूपाच्या जवळ जाऊन त्याचें ज्ञान संपादन करण्याचा सुंदर योग स्वयोग्यतेनुसार प्राप्त झाला. त्यांतल्यात्यांतही अग्निवायूंस यक्षदर्शन मात्र झालें; पण इंद्राला 'हें ब्रह्म आहे' असें जास्त ज्ञान झालें. सारांश, या तीन देवांना प्रथमतः ब्रह्मस्वरूपाचें ज्ञान झालें म्हणून ते श्रेष्ठ होत. येथें 'प्रथम' हें (पहिल्यांदा) या अर्थी आहे. ॥ २ ॥ २७ ॥

ब्रह्मवेदनं चेन्द्रस्य देव्युपदेशादन्यस्य त्विन्द्रोपदेशादिति भा· वेनेन्द्रस्य ज्ञानोदयप्रकारमाह—

सिद्धान्ती—इंद्राला प्रत्यक्ष देवीचा उपदेश होऊन ब्रह्मज्ञान झालें आणि इतर देवांना इंद्राकडून स्वरूपाचें ज्ञान झालें म्हणन या मंत्रांत इंद्राचा श्रेष्ठपणा व्यक्त केला आहे. तो मंत्र असाः—

मंत्र तिसरा (क्र० २८ वा).

तस्मादित्युक्तं हेतुं व्यनक्ति-स ह्येनदिति। एतदेव। तद्वाक्यार्थमेव व्यक्तमाह-स ह्येनत्प्रथम इति। प्रथममित्यर्थः ॥३॥२८॥

सिद्धान्ती—या मंत्रांतील 'तस्मात्' (म्हणून) हें पद या इंद्राचें श्रेष्ठत्व कां आहे, अग्निवायूंपेक्षां इंद्र श्रेष्ठ कां आहे, हें स्पष्ट करितें. आणि हाच अर्थ पुढील वाक्यांत स्पष्ट केला आहे. वाक्यार्थ पूर्व मंत्राच्या अर्थाप्रमाणेंच आहे. असो; 'प्रथमः' हें पदही तोच अर्थ स्पष्ट करितें. या शब्दाचा अर्थ 'सर्वांच्या अगोदर' असा आहे. सारांश, इंद्राला प्रथम ब्रह्मज्ञानोपदेश झाला म्हणून तो अग्नि-वायूंहून श्रेष्ठ आणि इंद्र, वायु व अग्नि यांना प्रथम ब्रह्मदर्शन झालें, म्हणन ते सर्व इतर देवांपेक्षां श्रेष्ठ होत. ३ ॥ ॥ २८ ॥

मंत्र चवथा (क्र० २९ वा).

अधिदैवतमध्यात्मं चोपास्यरूपमुपदिशति—तस्यैष इत्यादिना। तस्य ब्रह्मण एष आदेश उपदेशः। यदेतत्कपिलाख्यं रूपम्। विद्युतो बहुवचनमाद्यर्थं उपलक्षणं वा विद्युदादीस्तेजोरूपानर्थानासमन्ताद्द्योतद्द्योतयददीपयदिति। आ न्यमीमिषत्सम्यङ्मीलयत्। आ पूर्णमित्यर्थः। यद्वा यस्माद्देवेभ्यो विद्युदिव सहसैव प्रादुर्भूतं ब्रह्म द्युतिमत्तस्माद्विद्युतो विद्योतनं यथा यदेतद्ब्रह्म व्यद्युतद्विद्योतितवत्। आ इवेत्युपमार्थे आशब्दः। यथा घनान्धकारं विदार्य विद्युत्सर्वतः प्रकाशत एवं तद्ब्रह्म देवानां पुरतः सर्वतः प्रकाशव्यक्तीभूतमतो विद्युतमिवेत्युपास्यम्। यथा सकृद्विद्युतम् [२।३।६] इति बृहदारण्यके। यस्माच्चेन्द्रोपसर्पणकाले न्यमीमिषत्। यथा कश्चिच्चक्षुर्निमेषणं कृतवानिति। इतीदित्यनर्थकौ निपातौ। निमिषितवदिव तिरोभूतमित्येवमधिदैवतं देवताया अधि यद्दर्शनमधिदैवतं तत् ॥ ४ ॥ २९ ॥

सिद्धान्ती—आतां या व पुढील पांचव्या मंत्रांत अधिदैवत आणि अध्यात्मदृष्टीनें ब्रह्माच्या उपास्यस्वरूपाचा उपदेश आहे, त्या ब्रह्मस्वरूपाचा उपमारूपानें उपदेश आहे. म्हणजे त्याचें स्वरूप पुढें सांगितल्याप्रमाणें कपिल वर्णाचें आहे.

शिष्य—भगवन्! मंत्रामध्यें 'विद्युत्' हा शब्द अनेकवचनी कां आहे?

सिद्धान्ती—आद्यर्थी किंवा आदरार्थी हा शब्द आहे, किंवा विद्युत्–प्रमुख सर्व तेजांचें प्रकाशन करणारा हा शब्द आहे. किंवा या तेजानें सर्व त्रैलोक्यांतील तेजस्वी पदार्थही प्रकाशित झाले होते, असें जाणावें. सारांश, विद्युदादि तेजस्वी पदार्थांचा बोध हा शब्द करितो व सर्व तेजस्वी पदार्थ ही या ब्रह्मतेजानें उद्दीपित झाले, असें हा शब्द सुचवितो.

शिष्य—'आ' पदाचें रहस्य काय?

सिद्धान्ती—त्याचें रहस्य असें आहे कीं, या शब्दानें पूर्णत्वाचा उल्लेख व्हावा; म्हणजे ब्रह्मानें जें निमीलन केलें (ब्रह्म अंतर्धान पावलें) तें पूर्णत्वानें होतें. किंवा या मंत्राचा दुसऱ्याही तऱ्हेनें अर्थ करावा. कसा म्हणून विचारशील तर सांगतों ऐकः—

ज्या अर्थी हें ब्रह्म स्वतेजानें विजेप्रमाणें देवांपुढें एकदम प्रकट होऊन प्रकाशित झालें, त्या अर्थी विजेच्या आकस्मिक लकाकण्याप्रमाणें हें ब्रह्म प्रकाशमान झालें.

शिष्य—म्हणजे येथें 'आ' या पदाचा अर्थ उपमादृष्टीनें 'तसा' या अर्थी झाला. तात्पर्य, निबिड अंधकाराला फोडून काढून ज्याप्रमाणे वीज एकदम सर्व वस्तु क्षणमात्रामध्यें प्रकाशित करिते, त्याप्रमाणें तें ब्रह्म देवांच्यापुढें सर्व बाजूंनीं एकदम प्रकाशित झालें अथवा प्रकाशरूपानें प्रकट झालें, असें होईल.

सिद्धान्ती—आणि म्हणूनच विद्युत्तेज लक्षांत घेऊन त्या ब्रह्माची उपासना केली पाहिजे असें ठरतें. "ज्याप्रमाणें विजेचा प्रकाश एकदम सर्वत्र पडतो" (बृ० २।३।६) अशी श्रुतिही याला प्रमाण आहे. तसेंच ज्या वेळी इंद्र जवळ गेला, त्या वेळीं एखादा पुरुष आपले डोळे एकदम झांकतो, त्याप्रमाणें हें ब्रह्म एकदम अंतर्धान पावलें. ह्या अर्थी ही ब्रह्माची विद्युद्' रूपानें उपासना करावी. मंत्रांत 'इति' 'इत्' अशीं जीं दोन अव्ययें आहेत, तीं अर्थशून्य आहेत. 'निमिषत' म्हणजे अंतर्धान पावणें होय, सारांश, तें क्षणांत नाहींसें झाल्यासारखें झालें. असो; देवतांच्या संबंधानें हें दर्शन आहे म्हणून याला अधिदैवत असें म्हटलें ॥ ४ ॥ २९ ॥

मंत्र पांचवा (क्रमांक ३० वा).

अथेत्यर्थान्तरे । अध्यात्मं देहे तस्योपदेश उच्यत इत्यर्थः । यदेतन्मनोऽनेनैव प्रेरितं सद्गच्छतीव च सम्यङ् न गच्छतीयत्तया वस्तु न विषयीकरोति । अनेनैव ब्रह्मणाऽनिरुद्धाख्येन हरिणाऽनुगृहीतस्तद्विषयजातमुपस्मरति । कीदृशं मन इत्यत उक्तमभीक्ष्णं संकल्प इति । भृशमनेकार्थान्संकलपयतीति । संकलपमित्यर्थः । लिंगव्यत्ययश्छान्दसः । शब्दस्वभावाद्वा । अभीक्ष्णं नित्यं भृशं संकलपश्च भवति । तस्य ब्रह्मणोऽनिरुद्धाख्यस्य हरेरेष उपदेश इत्यर्थः ॥ ५ ॥ ३० ॥

सिद्धान्ती—आतां यानंतर देहदृष्टि ध्यानांत घेऊन, ब्रह्मस्वरूपाचें निरूपण करितात. मनाला प्रेरणा होते ती ब्रह्माकडून होते, हें आपण मागेंच ठरविलें आहे.

शिष्य—येथें 'इव' या शब्दाचा अर्थ कसा करावयाचा ?

सिद्धान्ती—मन गेल्याप्रमाणें दिसतें; पण स्वतंत्रतेनें तें जात नाहीं. सारांश, मनाला ब्रह्मवस्तु ही ज्ञानविषय केव्हांही करितां येत नाहीं व ब्रह्मवस्तु 'अमुक प्रकारची' आहे असें सांगतां येत नाहीं. हें असें समजावयाचें आहे. शिष्या ! ध्यानांत ठेव कीं ह्या अनिरुद्ध नांवाच्या हरीनें (ब्रह्मानें) अनुग्रह केल्याशिवाय मनाला कोणत्याही विषयाचें स्मरणच करितां येत नाहीं. ब्रह्मानें अनुग्रह केला तर मात्र विषय-जाताचें स्मरण करितां येतें. ज्याचा कोठेंही निरोध होत नाहीं, तो अनिरुद्ध हरि आमच्या मनालाही अनुग्रहपूर्वक स्वस्वरूप दाखवितो.

शिष्य—मंत्रांतील 'अभीक्ष्ण' शब्दाचा अर्थ अनेकदां असाच आहे ना ?

सिद्धान्ती—होय. वारंवार अनेक विषयांचें चिंतन करणें, त्यासंबंधानें अनेक संकल्प करणें हें मनाचें स्वरूप आहे. जें मन संकल्प करितें, त्यालाच येथें 'संकल्प' या नांवानें श्रुति संबोधित आहे.

शिष्य—'संकल्प' हें पद पुल्लिंगी आहे. मग मनाला हा प्रतिशब्द कसा होणार व त्याच्याशीं अन्वय तरी कसा होणार ?

सिद्धान्ती—अरे ! हा आर्ष प्रयोग आहे. शिवाय 'संकल्प' हा शब्दही मूळचा पुल्लिंगीच आहे. नित्य व पुष्कळ संकल्प करणें हें मनाचें स्वरूप आहे. तथापि हें मन ब्रह्मप्रेरणेनें स्वव्यापार करीत असतें. असो; या मनाच्या उदाहरणानें या अनिरुद्धाख्य ब्रह्माचा, म्हणजे हरीचा हा उपदेश आहे. तात्पर्य, हरिप्रेरित मनाची मनोरूपानें उपासना करण्यासाठीं या मंत्राची योजना आहे. मनोरूपानें ही उपासना सांगितली म्हणून तिला 'अध्यात्म उपासना' असें नांव दिलें आहे. ॥ ५ ॥ ३० ॥

तस्योपास्यमन्वर्थं नामाऽऽह—

सिद्धान्ती—या ब्रह्माचें उपास्यत्व अन्वर्थच आहे हें कसें तें सांगतातः—

मंत्र सहावा (क्रमांक ३१ वा).

तद्वनं (' तत् '=सर्वव्यापी आणि ' वन '=वंदनीय, असें जें स्वरूप तें ' तद्वनं ' होय.)

तद्धेति । तद्ब्रह्म तद्वनं नाम ततत्वाद्वयाप्तत्वाद्वननीयत्वाद्भजनीयत्वात् । तद्वनमिति कल्याणनिमित्तकनामवत् । तनोतेरत्यजियजितनिभ्य इत्यदप्रत्ययः । वनतेरकारः । तच्च तद्वनं चेति तद्वनमिति । हेति प्रसिद्धम् । तद्वनमित्युपासकस्य फलमाह–स य इति । स प्रसिद्धो योऽधिकार्यतद्ब्रह्मैवं तद्वनं नामेत्येवं रूपेण वेदैनं तद्वनत्वज्ञानिनं सर्वाणि भूतान्यभिसंवाञ्छन्ति । सर्वापेक्षितो भवतीत्यर्थः ॥ ६ ॥ ३१ ॥

सिद्धान्ती—या ब्रह्माचें ' तद्वन ' हें एक सुप्रसिद्ध नांव आहे.

शिष्य—म्हणजे काय ?

सिद्धान्ती—सर्वत्र पसरलेलें म्हणून ' तत् ' आणि सर्वांनीं उपासना करण्यास योग्य म्हणून ' वन ' हा असा ' तद्वन ' शब्द आहे. तात्पर्य, हें ब्रह्म सर्वव्यापी आणि सर्वोपास्य आहे, आणि सर्वांचें कल्याण होण्याचें निमित्तकारण आहे, म्हणून हें नांव हरीच्या इतर अनंत नांवांसारखें मंगलदायक आहे. हा शब्द व हा समास हे उभयतांहि व्याकरणशुद्ध आहेत, हा व्याकरणाचा भाग तुला नीटसा समजणार नाहीं म्हणून मी तुला सांगत नाहीं. असो; मंत्रांतील ' ह ' हें पद प्रसिद्धिदर्शक आहे, या नांवानें ब्रह्माची नित्य उपासना करावी.

शिष्य—या उपासनेनें फलप्राप्ति काय होणार ?

सिद्धान्ती—जो कोणी अधिकारी पुरुष, शुद्ध आणि सात्विक पुरुष, ब्रह्माचें सर्वव्यापित्व आणि सर्वोपास्यत्व जाणतो, व ब्रह्माचें ' तद्वन ' हें नांव सार्थ जाणून त्याची उपासना करितो, त्याला सर्वभूतें (यच्च यावत् स्थावर जंगम पदार्थ, वश होतात. सर्व त्याच्या समागमाची इच्छा करितात, हेंही प्रसिद्ध आहे. सर्वांसच तो परमात्मा हवासा वाटतो. ॥ ६ ॥ ३१ ॥

मंत्र सातवा (क्रमांक ३२ वा).

अन्वयः—यथापूर्व आहे. अर्थ निराळा आहे, तो पुढील व्याख्यानांत स्पष्ट होणार आहे.

एवं श्रुत्वा पुनराचार्यं पृच्छति शिष्य उपनिषदं भो ब्रूहीति। भो आचार्योपनिषदं सप्रतिष्ठां सायतनां ब्रूहीत्यपृच्छदिति शेषः। किमुपनिषत्प्रतिपाद्यं पृच्छस्युतोपनिषदुत्पन्नविद्याया अवस्थानकारणं किं वा विद्यायाः कारणमिति हृदि विकल्प्य क्रमेणोत्तरमाह-उक्ता त इति। ते तुभ्यं ब्राह्मी ब्रह्मविषया वावेत्य संशयं त उपनिषत्स्वरूपमब्रूमावोचामेति। ब्रह्मेति होवाचेत्यादिना ब्रह्मस्वरूपोक्तेस्तत्र वक्तव्यं किमपि नेत्यर्थः॥ ७॥ ३२॥

सिद्धान्ती—हे फल श्रवण केल्यावर तो मुमुक्षु साधक आचार्यास विनंति करिता झाला, कीं मला उपनिषदाचें व्याख्यान सांगा.

शिष्य—भगवन्, आतांपर्यंत उपनिषदाचेंच व्याख्यान झालें ना?

सिद्धान्ती—होय. पण शिष्याचा हेतु असा आहे कीं, आपल्याला उपनिषदाची प्रतिष्ठा व त्याचें आयतन यांचेंही ज्ञान होऊन उपनिषद्व्याख्यान ऐकावयास सांपडावें. हें मनांत आणून आचार्य साधकाला मनांतच प्रतिप्रश्न करितात कीं याला उपनिषद्-प्रतिपाद्य (उपनिषदें ज्याचें संकीर्तन करितात) जें ब्रह्म तें समजून घेण्याची इच्छा आहे किंवा उपनिषदानें जें ज्ञान उत्पन्न होतें त्याचें अधिष्ठानकारण कोणतें तें समजून घ्यावयाचें आहे? किंवा विद्येचें कारण याला समजून घ्यावयाचें आहे? असे विकल्प मनांत उत्पन्न करून साधकाला उत्तर आचार्य क्रमानें देतात कीं, तुला आम्ही ब्राह्मी उपनिषदाचें (ब्रह्म आहे विषय ज्याचा त्या उपनिषदाचेंच) स्वरूप सांगितलें आहे. चौथ्या खंडांत ब्रह्मस्वरूपाचें यथास्थित वर्णन आम्हीं केलेंच आहे. आतां त्यासंबंधानें सांगावयाचें कांहीं एक राहिलें नाहीं.

शिष्य—म्हणजे ब्राह्मी (ब्रह्मविषयक) उपनिषदाचें व्याख्यान हा वेळपर्यंत झालें. असेंचना भगवन्?

सिद्धान्ती—होय. आतां अधिष्ठान व कारण या विकल्पाच्या संबंधानें उत्तरें देतात तें ऐक. ॥ ७ ॥ ३२ ॥

मंत्र आठवा (क्रमांक ३३ वा).

(शंकराचार्यांनीं वेदवेदांगांचा अंतर्भाव प्रतिष्ठेमध्यें केला आहे व श्रीरंगाचार्यांनीं वेदवेदांगांस ' आयतन ' उत्पत्तिस्थान ' यांत जागा दिली आहे. हा भेद ध्यानांत ठेवावा.)

तस्यै तस्या विद्यायास्तपो दमः कर्म च प्रतिष्ठा । तपः कृच्छ्र-चान्द्रायणादि शास्त्रपर्यालोचनं वा । दम इन्द्रियनिग्रहः । कर्म तु वर्णाश्रमोचितक्रियानुष्ठानम् । प्रतिष्ठा प्रतिष्ठाहेतुः । तपआदि-मत्सु विद्या प्रतितिष्ठतीत्यर्थः । वेदा ऋगादयस्तदनुकूलग्रन्थाश्च । शिक्षा कल्पो व्याकरणं निरुक्तं छन्दो ज्योतिषमिति षडङ्गरूप-सर्वाङ्गानि (णि) सत्यं यथाभूतमपीडाकरं वचनमायतनमुत्पत्ति-स्थानं ब्रह्ममीमांसा तस्या इत्यनुषङ्गः । विद्याया इत्यर्थः ॥८॥३३॥

सिद्धान्ती—ह्या विद्येची प्रतिष्ठा तप, दम, आणि कर्म यांच्या साहाय्यानें होते.

शिष्य—तप म्हणजे कृच्छ्र चांद्रायणादि प्रायश्चित्तें करावयाचीं हेंच ना ?

सिद्धान्ती—होय. याचप्रमाणें तपामध्यें शास्त्राचें साग्र आणि सार्थ अवलोकन याचा ही अंतर्भाव होतो. दम म्हणजे इंद्रियांचा निग्रह होय. वर्णाश्रमाला उचित अशा क्रियांचें अनुष्ठान ठेवणें हें कर्म होय. सारांश, इंद्रियनिग्रह, वर्णाश्रमांस योग्य असणारें विहितकर्म आणि शास्त्रांचें अवलोकन हीं सर्व विद्येची स्थापना ठीक व नीट करितात. हीं असली म्हणजे, विद्येला स्थैर्य येते. विद्येची हीच प्रतिष्ठा (अधिष्ठान) आहे.

शिष्य—आतां आयतन म्हणजे काय तें सांगावें.

सिद्धान्ती—ऋग्वेदादि चारी वेद आणि त्यांस अनुकूल असणारे ग्रंथ, याचप्रमाणें शिक्षा, कल्प, व्याकरण, निरुक्त, छंद, आणि ज्योतिष हीं वेदाचीं सहा अंगें आहेत; वेद आणि वेदांगें मिळून विद्येचें उत्पत्तिस्थान होतें. ब्रह्मविद्या उत्पन्न होते, ती वेदवेदांगांच्या दृढ आणि एकनिष्ठ अभ्यासानें होतें. मात्र या अभ्यासाला सत्याचें साहाय्य हवें.

शिष्य—सत्य म्हणजे काय ?

सिद्धान्ती—जसें असेल तसें बोलणें व तें कोणासही पीडा देणार नाहीं. या रीतीनें बोलणें यांचें नांव ' खरें बोलणें ' आहे. सारांश, सत्य वचन आणि वेदवेदांगाचा दृढ अभ्यास हीं सिद्ध झालीं, म्हणजे ब्रह्मविद्येची व ब्रह्ममीमांमांसेची उत्पत्ति होते. येणें प्रमाणें विद्येची प्रतिष्ठा म्हणजे अधिष्ठान व विद्येचें उत्पत्तिस्थान (कारण) हीं आचार्योंनीं साधकास सांगितलीं. एवंच ब्रह्मविद्या, तिचें अधिष्ठान व तिचें उत्पत्तिस्थान यांचें विवरण पूर्ण झालें. ॥ ८ ॥ ३३ ॥

मंत्र नववा (क्रमांक ३४ वा).

एतदुपनिषज्ज्ञानिनः फलमाह—

सिद्धान्ती—या उपनिषदाचें ज्ञान ज्याला होतें, त्याला फलप्राप्ति काय होते, तें सांगतातः—

य इति । योऽधिकार्येतामुपनिषदं वेद स पाप्मानमपहत्यानन्ते त्रिविधपरिच्छेदरहिते स्वर्गे सुखरूपे लोके प्रकाशरूपे ज्येये श्रेष्ठे ब्रह्मणीति योज्यम् । प्रतितिष्ठतीति द्विरुक्तिरुक्तसर्वावधारणार्था ॥ ९ ॥ ३४ ॥

इति चतुर्थः खण्डः ॥ ४ ॥

इति रङ्गरामानुजविरचितप्रकाशिकासमेता तलवकारोपनिषत् ।

सिद्धान्ती—ज्या अधिकारी पुरुषाला ह्या उपनिषदाचें ज्ञान होतें तो सर्व पापांचा विध्वंस करितो आणि तिन्ही प्रकारच्या उपाधींनीं परिछिन्न न झालेल्या सुखरूप आणि तेजोरूप स्वर्गामध्यें म्हणजे अतिश्रेष्ठ ब्रह्मामध्यें जाऊन स्थिर राहतो.

शिष्य—तीन प्रकारच्या उपाधी कोणत्या ?

सिद्धान्ती—देश, काल, आणि वर्तमान ह्या तीन उपाधि होत. स्थलाच्या कालाच्या, आणि परिस्थितीच्या अस्तित्वामुळें दृश्य विषयांना मर्यादित्व किंवा परिछिन्नत्व प्राप्त होतें. तसेंच आध्यात्मिक, आधिभौतिक व आधिदैविक, अशाही तीन उपाधींचा (सारांश सर्व उपाधींचा) हा ज्ञानी पुरुष विध्वंस करितो आणि या उपाधींच्या पलीकडे जो ब्रह्मलोक आहे, जेथें सुख, ज्ञान आणि प्रकाश हींमात्र वास्तव्य करितात, त्या मध्यें जाऊन ज्ञानी जीव स्थिर राहतो. 'प्रतितिष्ठति' या पदाची द्विरुक्ति झाली आहे तिचा हेतु मागील सर्व व्याख्यानाचें तात्पर्य, नीट लक्षांत ठेवावें हें आहे. ब्रह्मस्वरूप त्याची प्रतिष्ठा आणि त्याचें आयतन व ब्रह्मविद्येचें फल यांचा सर्व जीवांनीं यथार्थ विचार करावा आणि त्याप्रमाणें वागावें, एतदर्थ ह्या पदाची द्विरुक्ति केली आहे. ॥ ९ ॥ ३४ ॥

केनोपनिषत्.

श्रीमन्मध्वानुयाय्यानन्दतीर्थकृतभाष्योपेता ।

श्रीमद्धनुमद्भीममध्वान्तर्गतरामकृष्णवेदव्यासात्मकलक्ष्मीहय-ग्रीवाय नमः ॥ अनन्तगुणपूर्णत्वादगम्याय सुरैरपि । सर्वेष्टदात्रे देवानां नमो नारायणाय ते ॥

हे नारायणा ! तुला मीं नमस्कार करितों. तूं अनंत गुणांनीं पूर्ण असल्यामुळें देवांना सुद्धां तुझें ज्ञान होत नाहीं. तूं देवांचे इष्ट मनोरथ पूर्ण करितोस.

याचा अर्थ इतकाच आहे कीं रमा, ब्रह्मदेव, शंकर, प्रभृति सर्व महा-ज्ञानी देवांसही ज्यांचें स्वरूप ज्याच्या गुणांच्या आनंत्यामुळें, समजत नाहीं, आणि जो सर्व देवांचे व जीवांचे पुरुषार्थ सिद्ध करितो, त्या नारायणाला नमस्कार या स्तोत्रामध्यें केला आहे. येथें नारायण हा विषय आहे. त्याची प्राप्ति हें प्रयोजन आणि स्वरूप-जिज्ञासु हा अधिकारी असें ठरतें, या उपनिषदाचे ऋषि ब्रह्मदेव आणि शंकर हे आहेत.

शिष्य—भगवन् ! पहिल्या मंत्रामध्यें कोणीतरी कोणा ज्ञात्या पुरुषाला इंद्रियप्रवर्तक कोण आहे असा प्रश्न केला आहे; पण प्रश्न करणारा व उत्तर देणारा कोण हें सांगितलें नाहीं.

वैजयंते समासीनमेकान्ते चतुराननम् । विष्णोर्विविदिषुस्तत्त्वं पर्यपृच्छत्सदाशिवः ।

सिद्धान्ती—हेंच भगवान् आचार्य सांगतात ऐक. आकाशामध्यें ब्रह्मदेव एकदां एकांतांत बसले असतां शंकर तेथें गेले. त्यांचा हेतु हा होता कीं ब्रह्म-देवाकडून विष्णूच्या स्वरूपाचें तत्त्व समजून घ्यावें. तेथें गेल्यावर शंकरांनीं प्रश्न विचारला, तो पहिल्या मंत्रांत सांगितला आहे.

खण्ड पहिला.

अन्वयार्थ—सामान्यतः पूर्वीप्रमाणें. केन प्रेषितं मनः इषितं पतति (कोणाच्या इच्छेनें जीवाच्या स्वाधीन नसणारें मन स्वविषयाकडे जातें) हा विशेष आहे.

यदिदं पुरुषावश्यं तत्र तत्र पतेन्मनः । केन तत्प्रेरितं याति प्राणः सर्वोत्तमस्तथा ॥ चक्षुः श्रोत्रं तथा वाचं को देवो विनियोजयेत् ।

सिद्धान्ती—पुरुषाला (जीवाला) वश नसणारें मन त्याला इष्ट असणाऱ्या विषयाचें ग्रहण करतें, तेथें मनाचा प्रेरक कोण असतो ? तसेंच सर्वोत्तम प्राण (प्रथम प्राण अथवा प्राणवायु) चक्षु श्रोत्र आणि वाणी यांचा विनियोग कोणता देव करितो ?

याचा अर्थ स्पष्टच आहे. इष्ट विषय म्हणजे मनाला इष्ट असणारा विषय होय. मग तो विषय जीवास चांगला असो, किंवा वाईट असो. आतां मनाला स्वतः व्यापार करण्याचें सामर्थ्य नाहीं, कारण तें जड आहे व तें करण (व्यापार-साधन) आहे. तेव्हां याचा प्रेरक कोणी तरी महासमर्थ असला पाहिजे. हें उघड आहे. जीवाला असें सामर्थ्य नाहीं कीं, जेणेंकरून मन स्वव्यापाराला प्रवृत्त होईल. जीवाच्या स्वाधीन मन नाहीं. तें जीवतंत्रानें चालत नाहीं. शिवाय, मन हें करण आहे. तेव्हां त्याला प्रेरणा करणारा कोणी तरी निराळा देव अवश्य हवा. याचप्रमाणें प्राणाचा प्रेरक तुमच्या माझ्याहून कोणी तरी निराळा असला पाहिजे. कारण तो सर्वश्रेष्ठ आहे. 'देवा ! तुझ्या बरोबरीचा आहे, म्हणून प्राणांवर जीवांची अथवा तुझी सत्ता चालावयाची नाहीं. रमेलासुद्धां ह्या इंद्रियांस प्रेरितां येणार नाहीं. कारण ती विष्णु-तंत्र आहे. तेव्हां तो प्रेरक कोण असावा ? ' हें शंकरास समजून घ्यावयाचें आहे.

शिष्य—ब्रह्मदेवानें काय उत्तर दिलें ?

इति पृष्टस्तदा ब्रह्मा प्राह देवमुमापतिम् ॥ ध्यात्वा नारायणं देवं सर्वाधारमनूपमं । सर्वज्ञं सर्वशक्तिं च सर्वदोषविवर्जितं ॥ यः प्राणस्य प्रणेता च चक्षुरादेश्च सर्वशः । अगम्यः सर्वदेवैश्च परिपूर्णत्वहेतुतः । प्राणादीनां प्रणेता च सर्ववेत्ता च सर्वशः ॥ सर्वोत्तमश्च सर्वत्र स विष्णुरिति धार्यताम् ।

इति प्रथमः खंडः ॥ १ ॥

सिद्धान्ती—प्रथम सर्वाधार, अद्वितीय, सर्वशक्ति, सर्वज्ञ, आणि सर्वदोषविवर्जित अशा नारायणाचें ध्यान करून ब्रह्मदेव उमापतीला उत्तर देता झाला. तें पुढील मंत्रांत आलें आहे. (या आचार्योनीं प्रत्येक मंत्रावर भाष्य केलें आहे असें दिसत नाहीं. या उपनिषदांत तरी श्री भगवान् मध्वाचार्योनीं प्रत्येक खंडाचें तात्पर्य मनांत आणून विवरणपर श्लोक केले आहेत आणि त्यांत मंत्रांतील मुख्य पदांचा अर्थ स्पष्ट होईल अशी योजना केली आहे. तेव्हां मंत्र

दुसरा, मंत्र तिसरा असें न म्हणतां मी या आचार्यपद्धतीनेंच सर्व खंडांचें विवेचन 'वेदेशतीर्थ भिक्षु' यांच्या साहाय्यानें करणार आहें.

हा नारायण प्राणाचा, चक्षु, श्रोत्र, इत्यादि सर्व इंद्रियांचा नायक आणि प्रेरक आहे. हा परिपूर्ण आहे म्हणून जीवांपेक्षां श्रेष्ठ, पण स्वरूपतः अपूर्ण आहे; देवांनांही याचें स्वरूप सकलत्वानें कळत नाहीं. याचें साधार विवेचन पुढें येईल असो; सर्वोत्तम विष्णु हा प्राणादिकांचा, रुद्रादि देवतांचें नियमन करणाऱ्या प्राणाचा प्रणेता आहे. तोच सर्वज्ञानी आहे, रमेहूनही त्याचें ज्ञान श्रेष्ठ आहे, रमेहून तो श्रेष्ठ ज्ञानी आहे, आणि तो नित्य सर्वव्यापी आहे हें समजून घ्या.

यांचें तात्पर्य असें आहे कीं, ज्या नारायणाचे गुण या उपनिषद्रूपी व्याख्यानांत सांगितले आहेत, त्यांचें ब्रह्मदेवानें ध्यान करून मंगलरूपी स्वस्ति-वाचन केलें आणि सांगितले कीं हा नारायण सर्वनियंता, सर्वांच्या अत्यंत निकट असणारा, सर्वांनी उपासना करण्यास योग्य, अशा स्वरूपाचा आहे आणि म्हणून तो सर्वांचा आधार आहे. त्याच्याशीं समानगुण असणारा दुसरा कोणी नाहीं. तोच वाणीचा चालक आहे. आणि सर्वांपेक्षां त्याची शक्ति अधिक आहे. तसेंच तो कोणाचाही आश्रय घेत नाहीं, म्हणून तो स्वतंत्र आणि सर्व-दोष-शून्य आहे.

शिष्य—ज्या क्रमानें प्रश्न विचारले त्या क्रमानें उत्तर न देतां प्राणाचीच गोष्ट भाष्यकारांनी प्रथम कां घेतली ?

सिद्धान्ती—कारण प्राण हा मुख्य आहे. भाष्यांत आदि असा जो शब्द आहे त्यानें कर्ण, वाणी, मन आणि इतर सर्व ज्ञान-कर्मेंद्रियें यांचें ग्रहण होतें.

शिष्य—नेत्रादिक इंद्रियांस हा नारायण अगम्य आहे, असें श्रुति म्हणत असतां भाष्यकारांनीं हा देवेश्वर सर्व देवांसही अगम्य आहे असें कां म्हटलें ?

सिद्धान्ती—श्रुतीनें नेत्रादिकांत देवांचा अंतर्भाव केला आहे. तसेंच पुढें एका मंत्रांत ' आम्हांला समजत नाहीं, आम्हांला उमजत नाहीं ' असें ब्रह्मदेवानें म्हटलें आहे. ब्रह्मदेवासच जर नारायणाचें पूर्ण ज्ञान-विज्ञान नाहीं, तर त्याच्याहून कमी योग्यतेचे असणाऱ्या इतर देवांस तो स्वभावतःच अगम्य असणार.

शिष्य—भाष्यकारांनीं प्राणादिकांचा प्रणेता असें म्हटलें आहे, त्याचें तात्पर्य काय ?

सिद्धान्ती—तें इतकेंच आहे कीं रुद्रादि सर्व देव-देवांचें नियामकत्व असणाऱ्या प्राणाचें प्रभुत्व नारायणाकडेच आहे हें स्पष्ट आहे.

शिष्य—नारायण सर्वज्ञता आहे हें कशावरून ?

सिद्धान्ती—ज्याच्या सत्तेनें वाणी प्रकट होते, मन विचार करितें, नेत्र पाहूं शकतात, कर्णाला ऐकण्याचें सामर्थ्य आहे, सारांश सर्व इंद्रियांना त्यांच्या त्यांच्या विषयांचें ज्ञान करून देण्याचें ज्ञान परमेश्वराला आहे, म्हणून त्याला सर्व-वेत्ता (सर्वज्ञानी) असें म्हटलें.

शिष्य—रमादि कित्येक देव सर्वज्ञानी आहेत.

सिद्धान्ती—ही शंका येऊं नये म्हणून तो सर्वथा ज्ञानी आहे असें भाष्यकार म्हणतात. रमादिदेवांपेक्षां सुद्धां यांचें ज्ञान अधिक असतें. सारांश तो पूर्ण-ज्ञानी आहे.

शिष्य—तो सर्वोत्तम आहे असें श्रुतीनें कोठें म्हटलें आहे ?

सिद्धान्ती—चवथ्या मंत्रामध्यें असें म्हटलें आहे कीं ' तो ज्ञात वस्तूंहून निराळा; पण त्याचा नियंता; व अज्ञात वस्तंहून निराळा व त्यांचा नियामक आहे ' यावरूच त्याचें सर्वोत्तमत्व सिद्ध होतें.

शिष्य—देश व काल हेही ज्ञाताज्ञातांहून निराळे आहेत म्हणून तेही सर्वोत्तमच काय ?

सिद्धान्ती—नाहीं. कारण त्याचें (परमेश्वराचें) वास्तव्य सर्वत्र आहे; देशकालांचें नाहीं. याप्रमाणें हा नारायण सर्वाधार; अद्वितीय, सर्वज्ञ, सर्वशक्ति, सर्वदोषशून्य, सर्वोत्तम आणि सर्वव्यापी असा आहे. हें पहिल्या खंडाचें तात्पर्य आहे.

श्रीमद्राघवेंद्रयतींनीं ' धीर ' म्हणजे श्रोत्रादिकांचा प्रेरक ' हरि ' आहे, हें जाणणारा; ' अतिमुच्य '=लिंगदेहाचा बंध सोडून देऊन; ' तत्र ' (मंत्र ३)=हरीच्या विश्वशासनाचे माहात्म्याच्या ठिकाणीं; ' चक्षुरादि '=चक्षुरादि इंद्रियें व तदभिमानी देवता; ' यथा अनुशिष्यात् '=ज्या पद्धतीनें हा हरि विश्वव्यवस्था चालवून सर्वांस प्रेरित करितो, ती पद्धति; ' विज्ञान '=विशेषज्ञान; ' अधि ' (मंत्र ४)=सर्वोत्तम; ' इदं ब्रह्म न ' (मंत्रपंचक)=' जीवच ब्रह्म आहे ' असें शांकरमतवादी म्हणतात, तें ब्रह्म नव्हे, तर ' ते उप+आस=तुझ्याजवळ नित्य सान्निध्यानें असणारा हरि ब्रह्म आहे' असें जाण. इत्यादि विशेष अर्थ केले आहेत. यांनीं तिसऱ्या मंत्राचे दोन मंत्र केले आहेत. असो; वरील विवेचनानें श्रीमन्माध्वमताचा पूर्ण विकास होईल, असें मला वाटतें.

प्रथम खण्ड समाप्त.

खंड २ रा.

सिद्धान्ती—या खंडांमधील पहिल्या व दुसऱ्या मंत्रांत शंकर आणि ब्रह्मदेव यांस साकल्यानें (पूर्णत्वानें) ब्रह्मरूप समजत नाहीं, असें सांगितलें आहे. अर्थातच इतर देवांस व जीवांसही तें समजावयाचें नाहीं, हें स्पष्टच झालें. हें तात्पर्य लक्षांत ठेवून आचार्य सांगतात—

यं सम्यङ् नैव जानाति कश्चिन्निरवशेषतः। सर्वात्मना विजानामीति तु यस्य मतं भवेत्। तस्याज्ञातः स भगवान्यो नैवं मन्यते सदा। ज्ञातस्तस्य तथास्यैव निःशेषं मननं कृतम्। इति यो मन्यते नास्य मतः स पुरुषोत्तमः। नातिवेद्यो न चावेद्यस्तस्मात्स परमेश्वरः। नेदं जीवस्वरूपं तद्ब्रह्म विष्ण्वाख्यमव्ययम्। किंतु यत्ते समीपस्थमासते विनियामकम्। तदेव ब्रह्म विद्धि त्वं विष्ण्वाख्यं परमव्ययम्। नियामकं तद्देवानां मर्त्यानां किमुतोत्तमम्। तत्प्रसादं विना जीवे मंतव्या न प्रवृत्तयः। किमु जीवस्य तद्भावो न मंतव्य इतीर्यते॥

इति द्वितीयः खंडः॥ २॥

सिद्धान्ती—ज्याच्या स्वरूपाचें खरें ज्ञान पूर्णत्वानें कोणालाही होणें शक्य नाहीं; त्या नारायणाचें स्वरूप 'मला पूर्णत्वानें समजलें व उमजलें' असें म्हणणारा पुरुष नारायण स्वरूपासंबंधानें पूर्णतः अज्ञानी आहे, असें समजलें पाहिजे. पण जो ज्ञानी पुरुष असें समजत नाहीं, म्हणजे 'मी याचें पूर्ण मनन करूनही याचें स्वरूप मला समजलें नाहीं' असें समजतो, त्याला नारायण-स्वरूप समजलें असें म्हणावें. सारांश, 'मला निःशेष स्वरूप समजलें आहे' असें जो म्हणतो त्याला तें मुळींच समजलेलें नसतें व हें स्वरूप पूर्णत्वानें समजणें अशक्य आहे, असें ज्याला समजतें तो खरा ज्ञानी असतो. हा नारायण सर्वथा समजणें केव्हांही शक्य नाहीं व त्याच्या संबंधानें अगदींच कांहीं समजत नाहीं असाही तो नाहीं. ज्या जीवस्वरूपाची लोक उपासना करितात तें विष्णु नांवाचें ब्रह्म खरें ब्रह्म नव्हे; कारण विष्णुनामक ब्रह्म अव्यय आहे, सर्वांच्या अति समीप आहे, व तें सर्वविनियामक आहे. हें खरें ब्रह्म होय. तें देवांचें आणि जीवांचें नियामक आहे. आणि तें उत्तमोत्तम आहे. त्याच्या प्रसादावांचून जीवांची पुरुषार्थाकडे अथवा व्यवहाराकडे प्रवृत्तिच होत नाहीं. ब्रह्म हें जीव-स्वरूपी नाहीं. जीव आणि ब्रह्म एकरूप नाहींत हें आतां सांगावयास नकोच. हा भाष्याचा अर्थ झाला.

याचें तात्पर्य असें:—नारायण—स्वरूपाचें सम्यक् ज्ञान होणें अशक्य आहे.

शिष्य—सम्यक् ज्ञान म्हणजे काय ?

सिद्धान्ती—म्हणजे निरवशेष, निःशेषज्ञान, पूर्णज्ञान होय.

शिष्य—भगवन् ! 'ज्याला समजलें आहे असें वाटतें,' 'त्याला कांहींच समजलें नाहीं' असें श्रुतींत वाक्य आहे. त्याचा अर्थ ज्याला अल्पमात्र भगवत्-स्वरूपाचें ज्ञान झालें तोही सर्वथा अज्ञानी आहे असें ठरलें, होयना ?

सिद्धान्ती—नाहीं. जीवाचें ज्ञान परिच्छिन्न (मर्यादित) असल्यामुळें त्याला नारायणाच्या अनंत (निर्मर्याद) स्वरूपाचें पूर्ण ज्ञान होणें केव्हांही शक्य नाहीं. तेव्हां थोडेंसें ज्ञान होऊनही जो म्हणतो कीं 'मला नारायण स्वरूप समग्र समजलें' तो नारायणाच्या दृष्टीनें अज्ञानीच झाला, असें तात्पर्य आहे.

शिष्य—'ज्याला समजलें नाहीं त्याला समजलें.' या वाक्यावरून अज्ञानी पुरुष ज्ञानी होणार ?

सिद्धान्ती—नाहीं. 'मला पूर्णत्वानें नारायणस्वरूपाचें ज्ञान-विज्ञान झालें नाहीं. नारायणाच्या स्वरूपाला मर्यादा नाहीं.' असें ज्ञान ज्याला होतें 'मला नारायणाचें स्वरूप सामर्थ्यानें केव्हांही समजणार नाहीं' असें जो समजतो, त्याला स्वरूपाचें ज्ञान किती अनंत असलें पाहिजे, याची जाणीव झालेली असते; म्हणून आपल्यास ब्रह्मस्वरूपासंबंधानें अज्ञानी समजणारा जीव ज्ञानी होय.

शिष्य—ज्ञानी लोकांस समजत नाहीं व अज्ञानी लोकांस समजतें असें तिसऱ्या मंत्रांत म्हटलें आहे. त्याचें तात्पर्य काय ?

सिद्धान्ती—हा मंत्र दुसऱ्या मंत्रांतील उत्तरार्धाचें स्पष्टीकरण करणारा आहे.

शिष्य—तें कसें ?

सिद्धान्ती—'मला ब्रह्माचा विशेष विचार करितां आला' असें जो समजतो, त्याला पुरुषोत्तमस्वरूप समजलें नाहीं व 'विशेष स्वरूपाचें मनन करितां येणें मला अशक्य आहे' असें जो समजतो तो ज्ञानी आहे.

शिष्य—मग यापासून फलप्राप्ति काय ?

सिद्धान्ती—फल हें आहे कीं, 'परमेश्वर न समजण्यासारखा नाहीं, मात्र त्याचें सकलज्ञान होणें शक्य नाहीं. म्हणजे त्याचें थोडेंसें मात्र ज्ञान होणें शक्य आहे. अगदींच समजत नाहीं, असें त्याचें स्वरूप नाहीं.' हें ज्ञान होणें हें महाफल आहे.

शिष्य—ज्याची उपासना करितात तें ब्रह्मस्वरूप नव्हे हें सांगण्याचा हेतु काय ?

सिद्धान्ती—हेतु हा कीं, जीवस्वरूपाचें ब्रह्मदृष्टीनें उपासन जे कांहीं लोक करितात; तें ब्रह्म नव्हे. हें ब्रह्म अत्यंत निकट आहे. इतकेंच नव्हे; पण इंद्रियतत्त्वाभिमानी (इंद्रियांवर स्वामित्व चालविणाऱ्या) देव-

तांचें ही हें विनियामक आहे. हें निर्गुण नाहीं. म्हणून अद्वैती लोक म्हणतात, तें म्हणणें श्रुतिबाह्य आहे. तसेंच जीव हा नियम्य आणि विष्णु नियामक हा मोठा भेद आहे, म्हणून जीव व ब्रह्म केव्हांही एक होऊं शकणार नाहींत. हें ब्रह्म सर्वप्रवर्तक आहे व सर्वनियामक आहे. याचा प्रसाद झाला म्हणजे मोक्षसाधनाचें अनुष्ठान करण्याची प्रेरणा जीवांस होते. सारांश, ब्रह्म हें स्वतंत्र, सर्वविलक्षण, सर्वप्रेरक, सर्वज्ञ, सर्वदयालु, सर्वोपास्य, सर्वसद्गुणसंपन्न असें आहे. याचें पूर्ण ज्ञान कोणासही व्हावयाचें नाहीं.

वेदेशतीर्थ भिक्षूंनीं मुख्य मंत्रांवरही व्याख्यान केलें आहे, तें जिज्ञासूंनीं अवश्य वाचावें. ग्रंथविस्तारभयास्तव त्याचें तात्पर्य वर दिलेल्या तात्पर्यानुसार आहे. असो; पुढील विशेष चिंतनीय आहे. 'उ' (मंत्र १)=आणि 'प्रेरक कोण व त्याचें लक्षण काय?' हा प्रश्न आहे. 'उ' (मंत्र २)=मात्र; 'सः=नारायण मात्र आहे; 'प्रेत्य=विशेष जोरानें जाणून; 'अतिमुच्य'=प्रारब्ध कर्मापासून मुक्त होऊन; तिसऱ्या मंत्रापासून नारायणाचें लक्षण सांगितलें. 'विद्मः'=सामान्यत्वानें अथवा परोक्षत्वानें जाणत नाहीं; 'विजानीमः न'=विशेषत्वानें अथवा अपरोक्षत्वानें जाणत नाहीं. 'विदित+अविदित (मंत्र ४)=व्यक्त+अव्यक्त=जगत् (कार्य)+प्रकृति (कारण), अधि=कार्यकारणाहून सर्वोत्तम. हें ब्रह्म वेदांस व देवांस अज्ञात आहे; पण याच्या सामर्थ्यानें वेद व देव प्रवृत्त होतात. खंड २ मागें सांगितल्या अन्वयें 'त्वं' (मंत्र १)=तुझ्यामध्यें जें ब्रह्म आहे; 'प्रतिबोधविदितं (मंत्र ३)=प्रत्यक्ष ज्ञानाचा विषय झालेलें ब्रह्म. 'आत्मना'=ज्ञानोत्तरकृत कर्ममुळें प्रसाद झाल्यावर; 'वीर्य'=अत्यंत आनंद, इह (मंत्र ४) सद्गुरु प्राप्त झाल्यावर, 'अस्मात् लोकात्'=सद्गुरूचा उपदेश झाल्यावर प्रत्यक्ष ज्ञान होऊन मुक्ति मिळते. या खंडांतील राघवेंद्रयतींचें व्याख्यान रंगाचार्यकृत प्रकाशिकेस पुष्कळ जुळतें आहे ही गोष्ट संस्मरणीय होय.

द्वितीय खण्ड समाप्त.

खंड ३ रा.

इत्यत्राख्यायिकां वक्ष्मि शृणु तां त्वं महेश्वर । स्थित्वा देवेषु तद्ब्रह्म व्यजयद्दैत्यदानवान् । देवेभ्योऽर्थाय विजयं तं देवा मेनिरे स्वकम्॥ आविष्टा असुरैस्तेषां प्रबोधाय जनार्दनः। यक्षरूपः प्रादुरभूदुमाशिवसमन्वितः । ब्रह्मणा चैव सहित एतेभ्योपि परो ह्यहम् । एतेऽपि मे भृत्यभूताः परिवार्य व्यवस्थिताः । इति ज्ञाप-

यितुं विष्णुः सह तैरप्युपागतः । यूयमेतानपि ज्ञातुमशक्ताः किमु मामिति । तज्ज्ञानार्थं हुताशश्च नासिक्यो वायुरेव च । इंद्रश्च क्रमशो जग्मुस्तं ज्ञातुं नैव चाशकन् । तत्रेंद्रोऽधिकबुद्धित्वात्पृच्छतीति जनार्दनः । मत्तः शिवाद् ब्रह्मणश्च श्रोतुं नैवापि शक्तिमान् । इति ज्ञापयितुं तत्र नादृश्यत स केशवः । एषैव ज्ञानदाने ते योग्योमेति व्यदर्शयत् ॥

इति तृतीयः खंडः ॥ ३ ॥

सिद्धान्ती—ब्रह्मदेव शंकराला मागील खंडाचा अर्थ स्पष्ट करण्यासाठीं एक आख्यायिका सांगतात. एकदां देव-दैत्यांच्या संग्रामांत परमात्म्यानें देवांचें साहाय्य केलें आणि त्यांस विशेष कार्यासाठीं विजय प्राप्त करून दिला; पण देवांस वाटलें कीं आपल्या सामर्थ्यावर आपण हा विजय संपादन केला आहे. त्यांचें तें अज्ञान नष्ट करून आत्मबोध करण्यासाठीं परमात्मा हा उमाशंकर व ब्रह्मदेवासहित तेथें प्रकट झाला. उमादिकांस बरोबर घेण्याचा हेतु हा होता कीं 'शंकर व ब्रह्मदेव हे माझे दास आहेत, मी परमेश्वर यांच्याहूनही श्रेष्ठ आहें, यांचें नियंत्रण मीच करितों' असें देवांस समजावें. तसेंच 'शंकर, ब्रह्मदेवादिकांचें स्वरूप जर देवहो ! तुम्हांस समजत नाहीं. तर माझें स्वरूप तुम्हांस कसें समजेल ?' हेंही देवांस विचारावयाचें होतें. असो; यक्षरूपानें परमेश्वर प्रकट झाल्यावर 'ह्या यक्षाच्या' स्वरूपज्ञानासाठीं अग्नि, प्राणवायु व इंद्र जाते झाले; पण त्यांस यक्षाचें स्वरूप कांहीं समजलें नाहीं. नंतर इंद्र जास्त बुद्धिमान् असल्यामुळें 'यक्षवस्तु काय आहे !' अशी पृच्छा करील म्हणून 'शंकर, ब्रह्मदेव अथवा मी, यांचे शब्द ऐकण्याचेंही सामर्थ्य इंद्राला नव्हतें.' हें दाखविण्यासाठीं भगवान्, शंकर आणि ब्रह्मदेव गुप्त झाले. उमा मात्र तेथें उभी राहिली; कारण, इंद्राला उपदेश करण्याची तिची योग्यता होती. हा तिसऱ्या खंडाचा भाष्यार्थ आहे.

शिष्य—*ही देव-दानवांच्या युद्धाची अप्रस्तुत कथा येथें आणली आहे, ती देवांसही परमात्म्याचें स्वरूप साकल्यानें कळत नाहीं, हें सांगण्याकरितांच आणिली आहेना ?*

सिद्धान्ती—होय. पण ही कथा अप्रस्तुत नाहीं. नारायणाचें सामर्थ्य दाखविण्यासाठीं *ह्या कथेचा अवतार आहे. परमेश्वर या युद्धांत विद्यमान होते, तरी देवांना त्याचें रूप कळलें नाहीं, हेंही सांगावयाचें आहे.*

शिष्य—आपणच जय मिळविला असा देवांना कां भ्रम झाला ?

सिद्धान्ती—कारण देवांना यावेळीं असुरांची संगति झाली होती. शिवाय रामकृष्णादि अवतारांत देवांस रामकृष्णांचीं रूपें प्रत्यक्ष दिसत होतीं; पण या वेळीं नारायण गुप्तत्वानें देव-साहाय्य करित होते.

शिष्य—सर्व देवांना हा भ्रम झाला होता काय ?

सिद्धान्ती—नाहीं. उमा, शंकर आणि ब्रह्मदेव यांस हा भ्रम झाला नव्हता.

शिष्य—हें कशावरून ?

सिद्धान्ती—कारण, इंद्राला ब्रह्मस्वरूपाचा उपदेश उमेकडून झाला, असें पुढें सांगितलें आहे. उमेपेक्षां शंकराचें ज्ञान श्रेष्ठ, आणि शंकराहून ब्रह्मदेवाचें ज्ञान श्रेष्ठतर आहे. म्हणून त्यांस भ्रम झाला नव्हता, हें उघडच आहे.

शिष्य—उमा, शंकर आणि ब्रह्मदेव यांस परमात्म्यानें बरोबर कशाला आणिलें होतें ? ब्रह्मोपदेश करण्याला त्यांची आवश्यकता होती, असें दिसत नाहीं, निदान रुद्र-ब्रह्मदेवांचें येणें तरी व्यर्थ होतें ?

सिद्धान्ती—नाहीं. आचार्यांनीं स्पष्ट सांगितलें आहे कीं रुद्र व ब्रह्मदेव यांपेक्षांही परमात्मा श्रेष्ठ आहे, हें सिद्ध करण्यासाठीं त्यांस बरोबर आणिलें होतें. नारायणाबरोबर आलेले उमासहित रुद्र ब्रह्मदेव हे इतर देवांपेक्षां श्रेष्ठ आहेत; पण हेच जर भगवंताचे दास आहेत, तर इंद्रादि देवांची योग्यता परब्रह्माहून किती तरी खालच्या पायरीची आहे, हें देवांस स्पष्ट दाखवावें, हा हेतु होता. शिवाय देवांचा भ्रम व अभिमानही नाहींसा करावयाचा होता, म्हणूनही या रुद्रब्रह्मदेवांस बरोबर घेतलें होतें.

शिष्य—यक्ष म्हणजे परमात्माच ना ?

सिद्धान्ती—होय. त्यानेंच अग्नि व वायु यांस 'आपण सर्वथा अशक्त आहों, परतंत्र आहों व यक्षरूप जाणण्यास असमर्थ आहों' असें ज्ञान करून देऊन त्यांचा अभिमान दूर केला.

शिष्य—बरें मग अग्नि वायूंस दिसणारें ब्रह्म इंद्राच्या आगमनकाळींच कां गुप्त झालें बरें ?

सिद्धान्ती—कारण, देवश्रेष्ठ इंद्राला उपदेश व्हावयाचा होता. तो उमेकडूनच व्हावयास पाहिजे होता. आपणाकडून किंवा शिव-ब्रह्मदेवाकडून हा उपदेश घेण्याचें सामर्थ्य इंद्राला नव्हतें; कारण तो असुरसंगतीनें दुष्ट झाला होता.

शिष्य—केशव या शब्दाचा अर्थ काय ? भगवन् !

सिद्धान्ती—क म्हणजे ब्रह्मदेव आणि ईश म्हणजे शंकर या उभयतांसह तो नित्य वर्तत असतो, म्हणून त्याला केशव असें म्हणतात. असो; केशव अदृश्य झाला आणि उमा मात्र तेथें उपदेश करण्यासाठीं प्रकट झाली.

तृतीय खंड समाप्त.

खण्ड ४ था.

उमा सा सम्यगाचष्ट तस्मै विष्णुं परं पदम् । यस्माद्ब्रह्मा च वायुश्च शेषवींद्रौ शिवस्तथा । सभार्या गर्विणो नासन्सुरेभ्यस्तेऽधिकास्ततः । इंद्रस्तु प्रथमं ब्रह्म व्यजानात्तेन तूत्तमः । दक्षादिभ्यस्तथा कामस्तज्ज्ञातुं पूर्वमुक्तवान् । दक्षो बृहस्पतिश्चैव मनुः कामात्मजस्तथा । सूर्याचंद्रमसौ धर्मो वरुणश्चोचुरोमिति । नासिक्यवायुरग्निश्च प्रथमं तदपश्यताम् । सर्वदेवाधिकास्तस्मादेते देवाः प्रकीर्तिताः । एतेभ्यश्चेंद्रकामौ तु ताभ्यां ब्रह्मादयोऽधिकाः । एतेषामवमो वह्निः परमो विष्णुरुच्यते । अंतराले स्थितास्त्वन्ये ब्रह्माद्याः पूर्वमीरिताः । अग्निः पश्चाद्यजानात्तदिंद्रवाक्यात्ततोऽवमः । तस्माद्विष्णवभिसंबंधात्पारावर्यं सुरेष्विदम् । व्यद्योतयद्विद्युदादीन्कपिलाख्यस्तु यो हरिः । अक्ष्णोर्निमेषणं कृत्वा यः शेते क्षीरसागरे । स एवैकः परं ब्रह्मेत्येवं तस्योपदेशनम् । अधिदैवे तथाध्यात्मे यं मनो गच्छतीव च । सम्यङ् न गच्छति क्वापि मनो येन स्मरत्यपि । सोनिरुद्धाख्य ईशेशः परं ब्रह्मेति कीर्त्यते । स विष्णुस्तद्वनं नाम ततत्वाद्वननीयतः । एवमेनं तु यो वेद भवेत्सर्वैरपेक्षितः । एतच्छ्रुत्वा हरोऽपृच्छद् ब्रह्माणं पुनरेव तु । विद्याकारं मम ब्रूहीत्युक्तो ब्रह्माह तं पुनः । विद्यावेद्यं तव प्रोक्तमास्थानं ते वदाम्यहम् । तपोदमस्वधर्मेषु ये स्थितास्तेषु तिष्ठति । विद्यास्थानानि तस्यास्तु वेदा अंगानि निर्णयः । वेदैतामेवमखिलं यो विष्णौ प्रतितिष्ठति ॥ इत्यादि ब्रह्मसारे । विद्युतः सूर्यादिप्रकाशान् । आसमंताद्व्यद्युतत्प्राकाशयत् । यदादित्यगतं तेजो जगद्भासयतेऽखिलम् । यच्चंद्रमसि यच्चाग्नौ तत्तेजो विद्धि मामकमिति वचनात् । तमेव भांतमनुभाति सर्वं तस्य भासा सर्वमिदं विभातीति च । न्यमीमिषत् आसमंतान्निमीलिताक्षमभवत् । स वै किलायं पुरुषः पुरातनो य एक आसीदविशेष आत्मनि । अग्रे गुणेभ्यो जगदात्मनीश्वरे निमीलितात्मा निशि सुप्तशक्तिष्विति वचनात् । पूर्णत्वाच्च आः । अभीक्ष्णं संकल्प इति मनसो विशेषणम् । संकल्पकमित्यर्थः । सप्रतिष्ठां सायतनामुपनिषदं ब्रूहीत्युक्ते सम्यगेव मयोपनिषत्स्वरूपमुक्तम् । तत्र वक्तव्यं नास्ति । तपो दमः कर्म च विद्यायाः प्रतिष्ठा । तद्वत्सु विद्या प्रतितिष्ठतीत्यर्थः । सत्यमिति मीमांसा ।

निर्णीयते यतः सम्यगिदं सत्यमिति स्फुटम् । श्रुतिस्मृत्युदितं सर्वं व्यक्तं मीमांसयैतया । सत्यमित्युच्यते तस्मान्मीमांसा ब्रह्मनिश्चयेति शब्दनिर्णये । ऋग्यजुःसामाथर्वाख्याः पंचरात्रं च भारतम् । मूलरामायणं चैव पुराणं भगवत्परम् । वेदा इत्युच्यते सद्भिः शिक्षाद्यं स्मृतयस्तथा । अंगानि सत्यं मीमांसा तद्विद्यायतनं त्रयमिति विद्यानिर्णये ॥

इति चतुर्थः खण्डः ॥ ४ ॥

सिद्धान्ती—नंतर उमादेवीनें इंद्राला अति श्रेष्ठ जो विष्णु, त्याचें श्रेष्ठ स्वरूप समजून देऊन, त्याला गर्वहत केलें व 'हरिमहिमा वाढवा, अभिमान धरूं नका' असें सांगितलें असो; ज्या अर्थी ब्रह्मा, वायु, शेष, पक्ष्यांचा राजा गरुड व शंकर हे आपापल्या भार्यासहवर्तमान जाणत होते कीं 'हा अंतर्यामी नारायण आम्हांस विजय देता झाला' म्हणून ते गर्वयुक्त झाले नव्हते, या देवांना गर्व झाला नव्हता, त्या अर्थी ते इतर देवांपेक्षां श्रेष्ठ होत. इंद्राला प्रथम ब्रह्मज्ञान झालें म्हणून तो दक्षादिदेवांपेक्षां जास्त उत्तम पदवी पावला. कामदेवाला प्रथम जिज्ञासा झाली, म्हणून तो श्रेष्ठ होय. दक्ष, बृहस्पति, मनु, कामसुत, सूर्यचंद्र, धर्म, वरुण या देवांनीं 'होय' असें म्हटलें म्हणून ते श्रेष्ठ होते, आणि प्राण वायु व अग्नि यांना प्रथम ब्रह्मदर्शन झालें म्हणून ते श्रेष्ठ-तर होते, यासाठीं हे आतांच सांगितलेले इंद्र, अग्नि व वायु हे देव इतर देवांपेक्षां श्रेष्ठ आहेत. या श्रेष्ठ देवांतही इंद्र-कामांची योग्यता जास्त आहे; कारण त्यांस ब्रह्मज्ञानाची इच्छा झाली. या उभयतांपेक्षां ब्रह्मा, शंकर आणि उमा वरिष्ठ आहेत; कारण ही मंडळी ब्रह्माबरोबर आली. असो; या सर्व देवांत अग्नि कनिष्ठ आणि विष्णु श्रेष्ठ आहे असें वेदवेत्ते म्हणतात. यांच्यामध्यें बाकीच्या देवांची योग्यता कशी असते, हें पूर्वीच सांगिलें आहे. इंद्रानें सांगितल्यावरून अग्नीला ब्रह्मरूप कळलें. म्हणून तो सर्वांपेक्षां कनिष्ठ आहे. याप्रमाणें विष्णु हा श्रेष्ठ असून याच्या अपेक्षेनें देवांमध्यें श्रेष्ठ कनिष्ठ ही योग्यता ठरते. असो; इंद्रादि देवांस प्रथम दर्शन झालें तेव्हां कपिल-रूपी हरि विद्युदादि प्रकाशाप्रमाणें तेजस्वी दिसला. हा हरि डोळ्यांचें निमीलन करून क्षीरसागरामध्यें शेषावर शयन करित असतो. तोच एक परब्रह्म आहे. असें वेद म्हणतात. विद्युदादि तेजोगोलांपेक्षां अनंतपट तेजस्वी नारायण क्षीरसागरीं योगनिद्रा घेतो, हें त्याचें अधिदैवी स्वरूप आहे. हें आधि-दैविक वर्णन झालें. मनाची धांव परब्रह्मापर्यंत गेल्यासारखी दिसते, पण तेथपर्यंत पूर्णत्वानें जात नाहीं; ज्याच्या सामर्थ्यानें मनाला स्मरण-शक्ति येते तो अनिरुद्ध होय. तो शंकरादिकांचा स्वामी आहे. याला परब्रह्म म्हणतात, विष्णूही याचेंच नांव आहे. 'तद्वन' ही त्याचेंच नाम होय, कारण तो तत्-सर्वव्यापी व वन-सर्ववंद्य आहे. सर्वांनी याचीच नामरूपी उपासना करावी,

असें ज्ञान ज्याला झालें तो सर्व लोकास वंद्य होतो. ब्रह्मदेवाचें हें प्रवचन ऐकून शंकरानें पुनः प्रश्न केला कीं 'मला विद्यारूप ब्रह्म सांगा.' ब्रह्मदेवानें उत्तर केलें कीं तुला तें विद्यारूप ब्रह्म सांगितलेंच आहे. आतां या विद्येचें स्थान मात्र तुला सांगतों. स्वधर्मामध्यें कर्म (यज्ञयागादि) तप (चांद्रायणादि) आणि दम (इंद्रियनिग्रह) यांच्यासह जे पुरुष राहतात. त्यांच्या ठिकाणीं ही विद्या राहते. तसेंच, 'चार वेद, सहा वेदांगें आणि मीमांसा हीं विद्येचीं स्थानें आहेत. शंकरा! हें ज्याला सांगोपाङ्ग समजलें म्हणजे ज्यानें विद्येचें अधिष्ठानासह व आयतनासह अध्ययन केलें, तो विष्णुस्वरूपामध्यें (निरुपाधिक ब्रह्मस्वरूपामध्यें) राहतो.' असें ब्रह्मसार ग्रंथामध्यें सांगितलें आहे. मघांशीं विद्युदादि प्रकाशक सांगितले. त्यांत सूर्य चंद्र इत्यादिकांचाही अंतर्भाव होतो. सारांश, ब्रह्माचा प्रकाश त्यावेळीं सर्वत्र पसरला होता. गीतेमध्येंही सांगितलें आहे कीं त्रैलोक्याला प्रकाश देणारें जें सूर्य तेज आहे, जें चंद्र-तेज आहे आणि जें अग्नि-तेज आहे, तें विष्णूपासूनच सूर्यचंद्र-अग्नींस प्राप्त झालें आहे. 'ब्रह्माचा प्रकाश झाला म्हणजे सर्व प्रकाशमान होतें.' 'याच्या तेजानें हें सर्व प्रकाशित होतें.' असा श्रुतीचाही उपदेश आहे. 'डोळे मिटून विष्णु क्षीरसागरीं राहिला' असे म्हटलें त्याचा अर्थ श्रीपरमेश्वर सर्वत्र अंधेर उत्पन्न करिता झाला, असा आहे! असें म्हटलें आहे कीं हा एक षड्गुणैश्वर्यसंपन्न पुराणपुरुष एकाकी व सर्वश्रेष्ठ असा, आपल्या निर्विशेष स्वस्वरूपामध्यें रममाण होणारा, स्वगुणांच्या पूर्वी असणारा हरि आपले डोळे मिटून योगनिद्रेमध्यें* सर्व सत्वादिशक्तींसहवर्तमान प्रलयकालीं स्वस्थ असता झाला. तिसऱ्या मंत्रामध्यें 'अभीक्ष्ण' आणि 'संकल्प' अशीं दोन पदें आहेत, तीं त्याच मंत्रांत असणाऱ्या मनाचीं विशेषणें आहेत. दोन्हीं मिळून एकच अर्थ उत्पन्न होत आहे. म्हणजे उभयतांचा अर्थ नित्य संकल्प करणारा असा आहे. शेवटीं शंकरानें प्रश्न विचारला त्याचा हेतु ब्रह्मविद्येची प्रतिष्ठा व तिचें स्थान समजावें हा होता. ब्रह्मदेवानें विद्येचें स्वरूप तर सांगितलेंच होतें. त्या संबंधानें जास्त कांहीं सांगावें असें राहिलें नव्हतें. पण ब्रह्मदेवानें सांगितलें कीं तप, दम आणि कर्म हीं साध्य झालीं म्हणजे विद्येचें प्रतिष्ठापन उत्तम होतें. मंत्रांतील सत्य याचा अर्थ मीमांसा हा आहे. सत्य म्हणजे ज्यापासून सम्यक् (उत्तमप्रकारचा) निर्णय होतो तें होय, हें सत्य किंवा मीमांसा श्रुतिस्मृति-वाक्यांना स्पष्ट करितें, म्हणून 'मीमांसेला, सत्य' हें नांव ब्रह्मनिश्चयाच्या प्रसंगीं देत असतात. असा शब्द-निर्णयकारांचा सिद्धान्त आहे. ऋक्, यजु, साम, अथर्व, पंचरात्र, भारत, मूलरामायण, भागवत यांनां वेद ही संज्ञा पंडितांनीं दिली आहे, शिक्षादि ग्रंथांना स्मृति हें नांव आहे, हीं वेदाचीं अंगें होत. हीं अंगें वेद आणि मीमांसा हीं ब्रह्मविद्येचें आयतन म्हणजे स्थान आहेत.

---

* जगत् जन्म, स्थिति, प्रलय, करणाऱ्या ईश्वर-रूपामध्यें.

भाष्यकारांची स्तुति व नति.

यश्चिदानंदसच्छक्तिसंपूर्णो भगवान्परः ।
नमोऽस्तु विष्णवे तस्मै प्रेष्ठाय प्रेयसां च मे ॥

इति श्रीमदानंदतीर्थभग० तलवकारोपनिषद्भाष्यं संपूर्णम् ॥

जो सच्चिदानंद परमेश्वर पूर्णशक्ति, षड्गुणैश्वर्यसंपन्न आणि सर्वश्रेष्ठ आहे. त्या अत्यंत प्रियतम हरीला मी आपल्या स्वत:च्या पारमार्थिक कल्याणासाठीं नमन करितों.

या आचार्यांच्या भाष्याचें तात्पर्य थोडक्यांत सांगत आहें. कोणत्या देवापेक्षां कोणते देव श्रेष्ठ आहेत, अशी शंका येते, तिचें निवारण करण्यासाठीं आचार्यांनीं हेतुकथनपूर्वक या शंकेचें निवारण केलें आहे. येथें वायु, गरुड आणि शेष व त्यांच्या भार्या यांचें ग्रहण केलें आहे, तें मंत्रामध्यें उमासहित शंकर आले होते, त्या आधारावरून केलें आहे. आतां ज्याअर्थी हे देव इतर देवांपेक्षां श्रेष्ठ आहेत असें सांगितलें, त्या अर्थी हे देव कोणते आणि ते कोणते, हें समजलें पाहिजे. तात्पर्य असें आहे कीं अग्नि, वायु, इंद्र या शब्दांनीं अग्नि आणि इंद्र यांच्यामध्यें असणाऱ्या कामादि सर्व देवांचें ग्रहण करावयाचें आहे, अग्नि हा सर्व देवांमध्यें कनिष्ठ आहे, हें प्रसिद्ध आहे व इंद्र,काम,आदिदेव सर्व देवांपेक्षां श्रेष्ठ आहेत; पण ह्या प्रसंगीं अग्नि वायु आणि इंद्र, हे सर्व बाकीच्या देवांपेक्षां मोठे ठरले, कारण यांना ब्रह्मज्ञान सर्वांच्या आधीं झालें. इंद्राला तर उमेनेंच ब्रह्मस्वरूपाचा उपदेश केला म्हणून तो श्रेष्ठ ठरला. ज्या वेळीं यक्षरूप प्रकट झालें, त्या वेळीं कामदेवाला प्रथम ब्रह्मस्वरूप जाणण्याची जिज्ञासा झाली. म्हणून तो दक्षादिकांपेक्षां श्रेष्ठ ठरला. इतर आचार्यकथित देवांनीं 'ठीक आहे. ब्रह्मस्वरूप समजून घ्यावें.' असें म्हटलें, म्हणून ते उत्तम ठरले. प्राणवायु आणि अग्नि यांनीं प्रथम यक्षस्वरूप पाहिलें; म्हणून ते उत्तम झाले. असो; ज्या अर्थी आतांच सांगितलेल्या रीतीनें इंद्र कामादि उत्तम देव ठरले, त्या अर्थी इंद्रादि देव इतर सर्व देवापेक्षां श्रेष्ठ झाले, हें उघड आहे. अग्नि हा सर्व देवांमध्यें कनिष्ठ आहे. विष्णु सर्वश्रेष्ठ आहे, इतर देव या उभयतांमध्यें स्थित होतात. अशी श्रुतिच आहे. आतां, अग्नि कनिष्ठ कां झाला, याचें उत्तर हें आहे कीं कामादि सर्व देवांना इंद्रासह उमा देवतेनें उपदेश केला म्हणून ब्रह्मस्वरूप प्रथम समजलें. मग इंद्रानें सांगितल्यावर अग्नीला स्वरूपाचें ज्ञान झालें. सारांश, ज्या ज्या वेळेच्या मानानें विष्णुस्वरूपाचें ज्ञान देवांस झालें, त्या त्या मानानें श्रेष्ठ अथवा कनिष्ठ योग्यता ठरविली आहे.

कपिल हें विष्णूचें नांव आहे. श्रुतीमध्यें चवथ्या खंडाच्या तिसऱ्या मंत्रांत 'तद्वनं' असें पद आहे; त्याचा अर्थ सर्व-व्यापित्व आणि सर्व वर्णनीयत्व

हे दोन गुण असणारा जो विष्णु तो होय. चवथ्या मंत्रामध्यें ब्राह्मी उपनिषद् अशीं पदें आहेत यांचा अर्थ विद्याप्रतिष्ठापन करणारें उपनिषद्, असा करावयाचा आहे. उपनिषदाचें ज्ञान झालें म्हणजे विष्णुलोक-प्राप्तीचें फल मिळतें. हें स्पष्ट सांगून देवांच्या स्वर्ग लोकांत जावें लागतें कीं काय, या शंकेचें निवारण केलें. 'मला ब्राह्मी उपनिषदाचा उपदेश करा' असें शंकरानें मागणें मागितलें, तेव्हां ब्रह्मदेवानें सांगितलें कीं, तुला तें उपनिषद् पूर्वीच समग्र सांगितलें आहे. याचा अभिप्राय असा कीं, विष्णुस्वरूपाचें साकल्यानें (पूर्णत्वानें ज्ञान होणें व उपदेश करतां येणें या गोष्टी अशक्य आहेत) असें ब्रह्मदेवानें शंकराला दुसऱ्या खंडांतच सांगितलें होतें. त्याचाच अनुवाद करून ब्रह्मदेव येथें म्हणतात कीं, साकल्यानें ब्रह्मज्ञान-विज्ञान होणें अशक्य आहे. हें तुम्हांस पूर्वीच सांगितलें आहे.

मुख्य तात्पर्य हें आहे कीं, ब्रह्मविद्या साकल्यानें कळणें केवल अशक्य गोष्ट आहे.

याप्रमाणें वेदेशीय तीर्थभिक्षुकृत माध्वभाष्याचें स्पष्टीकरण-तात्पर्य आहे. अवश्य तेवढा भाग घेतला आहे. या भिक्षूंनीं श्रीमन्मध्वाचार्यांच्या भाष्यानुसारानें उपनिषदाचेंही व्याख्यान केलें आहे. तें जिज्ञासूंनी अवश्य वाचावें.

याच उपनिषद्-भाष्यावर प्रसिद्ध श्रीमद्-जयतीर्थांचे शिष्य व्यासतीर्थ यांनीं एक लहानसा 'विवरण' ग्रंथ लिहिला आहे. यांत नमनश्लोकाचें स्पष्टीकरण केलें आहे तें असें—विष्णु हा अनंत आहे; कारण तेथें इंद्रियांची व देवांची गतिच नाहीं, म्हणून तो अनंतगुणपूर्ण आहे. त्यानें सुरासुरांच्या युद्धांत देवांचें अभीष्ट केलें म्हणून त्याला सर्वेष्टदाता (सर्व इष्ट वस्तूंचा दाता) असें नमनांत म्हटलें आहे. या उपनिषदाचें व्याख्यान 'वैजयंत' नामक पर्वतावर झालें, प्रथम खंडांत चवथ्या मंत्रामध्यें अविदित असें पद आहे, त्याचा अर्थ 'खपुष्पासारखें अज्ञेय' नव्हे तर 'पूर्णत्वानें अज्ञेय' असा आहे.

दुसऱ्या खंडांतील तिसऱ्या मंत्राचें व्याख्यान करितांना ब्रह्मश्रवण झालें, त्याचें मनन झालें, आणि विज्ञान झालें, म्हणजे अमृतत्व प्राप्त होतें. तथापि ज्ञान झाल्यावरही यज्ञादि कर्म केलें असतां अत्यंत आनंद मिळतो, म्हणून जीवानें ज्ञान संपादन केल्यावरही वैदिक धर्माचा त्याग करूं नये, विद्येनें अज्ञाननिवृत्ति होते, पण ज्ञानकालोत्तर कर्मानें निरतिशय (पूर्ण) आनंद मिळतो.

या विवरणांत व श्रीमद्राघवेंद्रयतींच्या 'खंडार्थोत' मागें निर्दिष्ट केल्याप्रमाणें श्रीमद्रामानुजसंप्रदायी रंगाचार्यांचा व या श्रीमन्माध्व शिष्यांचा पुष्कळ ठिकाणीं सुसंवाद (एकवाक्यता) दिसतो.

श्रीमन्माध्वसंप्रदायी उपनिषद्भाष्य-भाषान्तर संपूर्ण.

केनोपनिषत्.

श्रीमद्दयानंदस्वामिशिष्यभीमशर्मकृतव्याख्योपेता।

उपक्रमे.

सर्वा इमा उपनिषदो वेदमूलिका वेदानुकूलाश्चेति सर्वशिष्टसम्मतम्। तत्र वाजसनेयोपनिषन्मूलयजुर्वेदस्य चत्वारिंशत्तमाध्यायरूपा। अन्याः काश्चिद् ब्राह्मणान्तर्गताः काश्चिच्छाखान्तर्गताः सन्ति तेषु तेषु शाखाब्राह्मणेषु यो यो भागो वेदैकवेद्यब्रह्मणः स्वरूपनिरूपकः स स उपनिषच्छब्दवाच्योस्ति। तत्रेयं तलवकारोपनिषत्-सामवेदीयतलवकारशाखान्तर्गता। तत्राष्टभिरध्यायैः कर्मकाण्डं प्रतिपाद्य नवमेऽध्याये ब्रह्मपरोपनिषदुच्यते-तलवकारशाखा चेदानीमप्रचरिता॥

ही सर्व उपनिषदें वेदापासून उत्पन्न झालीं असून वेदाला अनुकूल असतात, असें सर्व विद्वान् लोकांचें निश्चित मत आहे. त्यांत वाजसनेय उपनिषत् (ईशावास्योपनिषत्) हें यजुर्वेदाच्या संहितेमध्यें आहे, असें ह्या उपनिषदाचें प्रकाशन केलें, तेव्हां सांगितलेंच आहे. दुसरीं कित्येक उपनिषदें कांहीं ब्राह्मणामध्यें आहेत व कांहीं शाखांमध्यें अंतर्भूत झालेलीं आहेत. त्यांत या शाखा-ब्राह्मणांपैकीं जो जो भाग वेदैकवेद्य ब्रह्मस्वरूपाचें निरूपण करण्यामध्यें समर्पित होतो, त्या त्या भागाला 'उपनिषद्' असें म्हणतात, ब्रह्मस्वरूप हें एक वेदांस मात्र सांगण्याचा अधिकार आहे, वेदाशिवाय ब्रह्म समजण्याला दुसरा मार्ग नाहीं, हें सर्वश्रुतच आहे. आतां आम्हीं ज्याचें प्रकाशन करणार आहों, तें उपनिषद् सामवेदांतील 'तलवकार' शाखेमध्यें अंतर्भूत झालेलें आहे. या शाखेंतील पहिले आठ अध्याय कर्म-कांड प्रसिद्ध व प्रतिपादन करण्यामध्यें विनियुक्त झाले आहेत आणि नववा अध्याय ब्रह्मनिरूपण करण्यामध्यें समर्पित झाला आहे. ही तलवकार शाखा प्रस्तुत कालीं पूर्ण उपलब्ध नाहीं, पण ही शाखा श्रीशंकराचार्यांच्या वेळीं उपलब्ध होती असें दिसतें.

मंत्र पहिला.

(केन) हेतुना (प्रेषितम्) प्रेरितम् (मनः) संकल्पविकल्पात्मकम् (इषितम्) अभीप्सितं विषयम् (पतति) प्राप्नोति। (केन) (युक्तः) स्वकर्मणि नियुक्तः (प्रथमः) स्वाधिकरणस्थानेषु विस्तृतः (प्राणः) शिरःस्थमार्गैर्निस्सरणशीलो वायुः (प्रैति) प्रतिक्षणं स्वव्यापारं करोति । (केन) (इषिताम्) नियताम् (इमाम्) श्रोत्रद्वारेण प्रत्यक्षीभूताम् (वाचम्) (वदन्ति) जना इति शेषः । (उ) (कः, देवः) द्योतनात्मकः (चक्षुः, श्रोत्रम्) स्वस्वकार्ये (युनक्ति) सर्गकाले सर्वाणीन्द्रियाणि स्वस्वविषयग्राहकाणि केन नियम्यन्ते । अर्थात् चक्षुषा रूपमेव गृह्यते शब्दः कथं न श्रूयत इति नियमः केन कृतोऽस्ति । प्राप्तसाधनो जीवात्मेन्द्रियैर्मनः संयोज्य कार्याणि करोति । यद्यपि व्यवहारदशायां मन आदीन्द्रियाणां प्रेरकत्वं जीवात्मन एवास्ति तथापि तत्तदिन्द्रियेण विषयग्रहणनियमः केन कृतोऽस्ति । अर्थात् चक्षूरूपग्रहणायैव केन प्रेर्यते चक्षुषा रसः किमर्थं न गृह्यते ? । इति प्रश्नः ॥ १ ॥

सिद्धान्ती—कोणत्या हेतूनें (कोणत्या कारणानें) प्रेरित झालेलें आपलें संकल्प-विकल्पात्मक मन हें इष्ट विषयाची प्राप्ति करून घेतें, कोणीं स्वकर्मांमध्यें नियुक्त केला आहे म्हणून नेत्र-कर्ण-मुखादिक ज्ञान-कर्मेंद्रियांमध्यें प्राणापानादि रूपांनीं दृश्य होणारा आपला प्राण नित्य व्यापार करित असतो, (हा प्राण मस्तकस्थ मार्गांनीं बाहेर पडत असतो हें सर्व श्रुत आहे.), कोणाच्या इच्छेनें ही आपली प्रकट होणारी वाणी स्वव्यापार करिते ? (आपण हिच्याच सहायानें आपले विचार प्रकट करित असतों) आणि कोणता तेजःस्वरूपी देव आमच्या नेत्रादिकांस स्वकार्यांमध्यें प्रयुक्त करितो ? सारांश, हीं जीं मनासह सर्व ज्ञान-कर्मेंद्रियें आहेत, तीं आपापले विषय ग्रहण करण्याला समर्थ होतात; हें सर्व कोणाच्या सामर्थ्यानें होतें ? हीं इंद्रियें स्वविषयाकडे मात्र जावीं, असें प्रथमपासूनच कोण नियुक्त करितो ? नेत्रानें रूपाचें मात्र ग्रहण करावें, शब्दाचें करूं नये, हा नियम कोणी केला आहे ? आपल्यास असें दिसतें कीं सर्व साधनांनीं युक्त असलेला जीवात्मा इंद्रियांचा मनाशीं संयोग करून, त्याच्या सहायानें आपलीं इष्ट कार्यें करीत असतो, आणि हीं कार्यें करित असतां आपणच या सर्वांना प्रेरित करितों, असें जीवाला व्यवहारकालीं वाटतही असतें. पण विशेष इंद्रियानें विषय-विशेषाचेंच ग्रहण करावें, असा नियम कोणी केला असावा बरें ? सारांश, नेत्रानें रूप मात्र पहावें, रसादि अन्य विषयांचें ग्रहण करूं नये, असेंच

कां होतें ? इंद्रियांचा मुख्य प्रवर्तक कोण आहे, तो समजून घेण्याची इच्छा या मंत्रांत प्रदर्शित झाली आहे. या प्रश्नाचें उत्तर दुसऱ्या मंत्रांत दिलें आहे ॥ १ ॥

मंत्र दुसरा.

(यत्) यः (श्रोत्रस्य) श्रूयते शब्दोऽनेन तस्य शब्द-ग्राहकस्येन्द्रियस्य (श्रोत्रम्) श्रवणशक्तिदानेन तद्रक्षणेन च (मनसः) सुखदुःखादिज्ञानसाधनस्यान्तःकरणस्य (मनः) शक्तिदानरक्षणाभ्यां साधनं ब्रह्म (वाचः) तत् वागिन्द्रियस्य (ह) (वाचम्) वदन्तीति पूर्वेणान्वयः । तस्यैवानुग्रहेण वागिन्द्रियं प्रवर्ततेऽन्यथा मूकत्वादिसम्भवः । यथा सूर्यानु-ग्रहेण चक्षुः पश्यति सूर्यश्च यस्यानुग्रहेण तपति तदेवान्य-कारणानामपि कारणम् । (सः, उ) स एव (प्राणस्य) हृत्स्थ-स्योर्द्ध्वगामिनो वायोः (प्राणः) चालयिता (चक्षुषः) चष्टे रूपं पश्यत्यनेन तस्येन्द्रियस्य (चक्षुः) दर्शनशक्तिसाध-नम् । एवं श्रोत्रादिकृत्यसाधकं यद्ब्रह्म यस्यैव प्रेरणया नियमेन वा मन आदीनीन्द्रियाणि स्वं स्वं कर्मातिवाहयन्ति तेन च यद्यत् पृथिव्यादि भूतमुपादाय यद्यद् घ्राणादीन्द्रियं निर्मितं तत्तदिन्द्रियं कार्यकारणसम्बन्धात्तस्य तस्यैव पृथिव्यादिभूतस्य गन्धादिगुणं गृह्णातीति नियमस्तेनैव कृतोऽस्ति तदेतत्पूर्व-मन्त्रस्योत्तरम् । तस्य नियामकत्वेऽपि श्रोत्रादित्वं न भवति । अत एव शरीरेंद्रियसङ्गं जीवन्त एव (अतिमुच्य) त्यक्त्वा (धीराः) ध्यानशीला योगिनो मनुष्याः (अस्मात्) प्रत्य-क्षात् (लोकात्) दृश्याद् वस्तुनो देहादिभ्यश्च (प्रेत्य) मृत्वा (अमृताः) अमरणधर्माणो मुक्ता (भवन्ति) ॥ २ ॥

सिद्धान्ती—शब्द-ग्रहण करण्याचें म्हणजे ऐकण्याचें सामर्थ्य असणाऱ्या कर्णाला श्रवणाची शक्ति देऊन जें त्याचें रक्षण करितें, सुख-दुःखादि अंतर्विषयांचें व रूपरसादि बाह्य-विषयांचें ज्ञान मनाला ज्याच्या सत्तेनें होतें, त्या मनाला जें स्वव्यापार-सामर्थ्य देतें व मनाचें रक्षण करितें, तें ब्रह्म होय. त्यालाच वाणीची वाणी असें म्हणतात. या ब्रह्माच्या मात्र अनुग्रहानें वाणी आपला स्वव्यापार करिते. ब्रह्मानुग्रह नसता तर वाणीला मूकत्व प्राप्त झालें असतें. सूर्याच्या अनुग्रहानें नेत्राला पहाण्याचें सामर्थ्य येतें, हें खरें; पण सूर्य हा स्वतः ब्रह्माच्या अनुग्रहानें मात्र सर्वप्रकाशक व उष्णताप्रयोजक होतो. तेव्हां कर्ण, मन, वाणी, प्राण, नेत्र इत्यादि सर्व अंतर्बाह्य ज्ञानकर्मेंद्रियांस स्वस्वव्यापाराचें सामर्थ्य देऊन

त्यांचें रक्षण करणारा परमेश्वर हा सर्व कारणाचें कारण आहे. तोच हृदयांत राहणाऱ्या व ऊर्ध्वगामी असणाऱ्या प्राणवायूचा चालक (चलनकर्ता) आहे. तोच पाहण्याचें काम करणाऱ्या डोळ्याला बघण्याचें सामर्थ्य देतो, कर्ण-प्रभृति इंद्रियांचाही तोच व्यापार-प्रेरक आहे. त्याच्याच प्रेरणेनें किंवा नियमानें मनःप्रभृति इंद्रियें आपापले व्यापार व्यवस्थित रीतीनें करितात.

शिष्य—भगवन्! हे नियम कोणते बरें?

सिद्धान्ती—अरे! पृथिव्यादि पंचमहाभूतें उत्पन्न करून त्यांपासून नासिकादि इंद्रियें परमेश्वरानें निर्माण केलीं, म्हणून घ्राणेंद्रियाचें उपादान कारण पृथ्वी आहे, रसनेंद्रियाचें उपादान कारण जल* आहे. अशीं सर्व इंद्रियांचीं पंचमहाभूतें अनुक्रमें उपादान कारणें आहेत. तेव्हां या कारणांचीं कार्यें जीं इंद्रियें त्यांनीं स्वकारणाच्या गुणाचें मात्र ग्रहण करावें, म्हणजे घ्राणेंद्रियानें (नाकानें) पृथ्वीच्या गुणाचा म्हणजे गंधाचा स्वीकार करावा, तसाच जिव्हेनें जलगुणाचा (रसाचा), नेत्रानें तेजोगुणाचा (रूपाचा), कर्णानें आकाश-गुणाचा (शब्दाचा) आणि स्पर्शेंद्रियानें वायुगुणाचा (स्पर्शाचा) स्वीकार करावा हे नियम परमेश्वरकृत आहेत.

याप्रमाणें साधकानें विचारलेल्या पहिल्या मंत्रांतील प्रश्नाचें उत्तर झालें आणि सर्व-कर्ता-करविता परमेश्वर आहे, असें साधकास सांगितलें. पुनः; त्यास हेंही सांगितलें कीं, परमेश्वर इंद्रियांचें नियमन करितो, तरी तो स्वतः तींतीं इंद्रियें होत नाहीं; तेव्हां परमेश्वर इंद्रियें नव्हे, असें ज्ञान ज्यांस झालें ते ध्यानशील योगी शरीरासह इंद्रियांचा जिवंत असतांनाच त्याग करितात. पुढें मृत्युसमय येऊन या लोकांचा देह-पात झाला म्हणजे हा दृश्य लोक आणि तेथील वस्तु यांचा त्याग करून म्हणजे कोणतीही वासना न ठेवितां, शेवटीं ते देहादिकांचा त्याग करून अमृत-पदाला जातात. सारांश, विषयाचा संग न करितां जे योगी परमेश्वराचें ध्यान अखंड करितात ते अमृत होतात ॥ २ ॥

---

* घ्राणेंद्रिय पृथ्वीपासून, रसनेंद्रिय जलापासून, चक्षुरिंद्रिय तेजापासून, त्वगिंद्रिय, वायूपासून, श्रोत्रेंद्रिय आकाशापासून, हा उत्पत्तिक्रम आहे. ज्या इंद्रियाचें जें उपादान कारण असतें त्याचा गुण तें इंद्रिय ग्रहण करितें.

मंत्र तिसरा.

(तत्र) ब्रह्मणि (चक्षुः) रूपग्रहणाय (न, गच्छति तस्या-रूत्पवात् (वाक्) श्रोत्रद्वारमिव (न, गच्छति) (नो, मनः) न च मनस्तत्र गच्छति मनसोऽपि तस्यातिगतिमत्वात्। अत एवोक्तं वाजसनेय्यां मनसो जवीय इति। एवमन्यान्यपीन्द्रियाणि तत्र गन्तुमसमर्थानि चक्षुरादीनामुपलक्षणार्थत्वात्। अत एव वयम् (न, विद्मः) इन्द्रियमनोभ्यामेव वस्तु ज्ञातुं शक्यते (न, विजानीमः (विशेषतयाऽपि ज्ञातुं न शक्नुमः)। अवयवविभागज्ञान-मन्तरेणाकृतिमात्रज्ञानं सामान्यज्ञानं, अवयवविभागज्ञानपूर्वकं विज्ञानं विशेषज्ञानम्। तस्यातीन्द्रियत्वादुभयथाऽपि न जानीम इत्यर्थः। (यथा) येन प्रकारेण (अनुशिष्यात्) शिष्या-द्यायोपदिशेत्। यथा ज्ञातं वस्तूपदेष्टुं शक्यते न तथेन्द्रिया-गोचरत्वेन विज्ञानाभावात्तस्यानुशासनं कर्तुं शक्यम्। (तत्) ब्रह्म (विदितात्) इन्द्रियज्ञातविषयात् (अन्यत्, एव) पृथगेवास्ति तर्हि न केनाऽपि ज्ञातुं शक्यमिति प्राप्तम्। अत आह (अथो) अनन्तरम् (अविदितात्) विदिक्रियाया अविषयीभूता दव्याकृतादव्यक्तात् (अधि) उपरि वर्ततेऽन्यदस्तीत्यर्थः। अथवाऽविदितमव्याकृतं जगत्कारणं परमाण्वाद्यतिसूक्ष्मं तस्मा-दन्यत्। विदितादन्यदित्युक्त्या हेयशून्यम्। इन्द्रियगोचरा नश्वरा विषया हेयास्तद्विलक्षणं ब्रह्मात एवाहेयम्। सर्वत्र व्याप्तत्वाद्धानं कर्तुमशक्यम्। तथा साकारं वस्तूपादीयते तस्य च निराकारत्वा-दुपादानमसम्भवम्। एवं विदिताविदिताभ्यां विलक्षणं ब्रह्म (इति) एवम् (पूर्वेषाम्) पूर्वाचार्याणां वचो वयम् (शुश्रुम) श्रुतवन्तः (ये) आचार्याः (नः) अस्मभ्यम् (तत्) ब्रह्म (व्याचचक्षिरे) व्याख्यातवन्तः। इदमुक्तं भवति ब्रह्मस्वरूप-निरूपकेण ब्रह्म पृष्टेन गुरुणा शिष्या उपदेष्टव्यास्तद्ब्रह्म भौतिके-न्द्रियैर्ज्ञातुमशक्यं तदविषयीभूतत्वात्। किन्तु अन्तःकरणशुद्धया सूक्ष्मबुद्धिग्राह्यं महता कालेन श्रमेण वा केनचित्कदाचिदेव प्राप्यं नतु सर्वदा सर्वेणेति गुरुशिष्यपरम्परातः पूर्वेषामाचार्याणां वचां-स्यश्रौषमहमिति ॥ २ ॥

सिद्धान्ती—या इंद्रिय–नियामक परमेश्वराकडे इंद्रियांची गति नाहीं, हें या मंत्रांत सांगावयाचें आहे. ब्रह्माचें स्वरूप ग्रहण करण्यासाठीं नेत्राला ब्रह्माजवळ जातां येत नाहीं, कारण परमेश्वराला रूप नाहीं. कानामध्यें प्रवेश करणारी वाणी

तेथें जात नाहीं. कारण, तो शब्दातीत आहे. तेथें मन जात नाहीं, कारण तो मनाच्याही पलीकडचा आहे. 'मनापेक्षां परमेश्वर अतिशय वेगवान् आहे, मनाच्या धांवेपलीकडे परमेश्वराची धांव आहे' असें ईशावास्यांत सांगितलें आहे. याचप्रमाणें दुसरींही इंद्रियें परमेश्वराला विषय करण्यास समर्थ होत नाहींत. चक्षु, वाणी, व मन हीं केवल उदाहरणाकरितां मात्र घेतलीं आहेत. असो; तो सर्व इंद्रियांचा, मनाचा, व बुद्धीचा अविषय आहे म्हणून साधकाला आचार्य या मंत्रांत सांगतात कीं तो परमेश्वर आम्हांला समजत नाहीं,

शिष्य—म्हणजे आपल्यास कोणत्याही विषयाचें ज्ञान होतें तें मनासह इंद्रियांच्या द्वारानें होतें. इंद्रियांची व मनाची गतिच जर परमेश्वरापर्यंत नाहीं, तर परमेश्वर समजत नाहीं हें म्हणणें ठीकच आहे; पण समजत नाहीं, असें म्हटल्यावर पुनः जाणतां येत नाहीं, असें म्हटलें आहे, याचा हेतु काय ?

सिद्धान्ती—जाणणें म्हणजे विषयाचें विशेष स्वरूप समजणें होय. अवयव विभाग न समजतां नुसत्या आकृतीचेंच सामान्य ज्ञान झालें म्हणजे त्याला समजणें असें म्हणावें; पण जो विषय जाणला आहे त्या विषयाच्या अवयवांचें म्हणजे भाग-प्रभागांचें समग्र ज्ञान व्हावें लागतें. याला जाणणें असें म्हणावें. पहिल्यास ज्ञान म्हटलें, तर दुसऱ्याला विज्ञान म्हणजे विशेष ज्ञान असें म्हणावें. सामान्य ज्ञान नसणें म्हणजे न समजणें आणि विशेष ज्ञान नसणें म्हणजे न जाणणें अथवा उमजणें होय. इंद्रियांहून पलीकडे परमेश्वर आहे म्हणून तो समजत नाहीं; परंतु त्यांच्या स्वरूपाचें विशेष ज्ञान नाहीं म्हणून तो उमजतही नाहीं; हें स्पष्ट करण्यासाठीं आचार्यांनीं साधकाला दोन निरनिराळ्या शब्दांनीं सांगितलें कीं, हें ब्रह्म समजत नाहीं व उमजतही नाहीं. अर्थातच असल्या अज्ञात-विज्ञात विषयाचा शिष्याला उपदेशही करितां यावयाचा नाहीं. ज्ञात-विज्ञात वस्तूचा उपदेश करितां येतो, पण तद्विलक्षण असणारी वस्तु उपदेशाच्या पलीकडची असते. म्हणून आचार्य सांगतात कीं, परमेश्वर ही वस्तु इंद्रियांस समजणाऱ्या वस्तूंहून निराळी आहे.

शिष्य—तर मग ही वस्तु कोणालाही समजणें शक्य नाहीं असें झालें.

सिद्धान्ती—नाहीं. कारण परमेश्वर ही वस्तु इंद्रियांस अविषय असणाऱ्या वस्तूंहून निराळी आहे, म्हणजे इंद्रियातीत वस्तूहून, अव्यक्ताहून निराळी आहे आणि निराळी असूनही अव्यक्ताचें नियमन करणारी आहे. अथवा याचा दुसराही एक अर्थ असा करावा कीं, अविदित म्हणजे अव्याकृत (अव्यक्त) जे परमाणु आदि (जगताचें सूक्ष्म कारण) त्यांहून निराळी आहे. सारांश, परमेश्वर जगताचें उपादान कारण जे परमाणु त्यांहून निराळा; पण त्यांचें नियमन करणारा आहे. असो; तो इंद्रिय-गोचर विषयांहून निराळा आहे म्हणजे नश्वर विषयांहून निराळा आहे. नश्वर वस्तु त्याज्य असतात. परमे-

श्वर मात्र त्याज्य नाहीं. शिवाय, सर्व-व्यापी परमेश्वराचा आपल्यास त्यागही करितां येणें अशक्य आहे. जी वस्तु सर्वत्र ओतप्रोत भरली आहे, तिचा त्याग कसा करावयाचा ?

शिष्य—तसेंच साकार वस्तूचें ग्रहण करितां येतें. परमेश्वर निराकार आहे म्हणून तो उपादेय (देतां घेतां येण्यासारखा) नाहीं. यावरून तो हेयोपादेय नाहीं, त्याला टाकितां येत नाहीं व घेतांही येत नाहीं !

सिद्धान्ती—म्हणजे तो ज्ञातवस्तूहून विलक्षण आणि अज्ञात वस्तूहून विलक्षण असा झाला. हेंच गूढ रहस्य पूर्व ऋषींनीं पूर्व-शिष्यांस सांगितलें आहे. आणि आचार्य साधकाला म्हणतात कीं, आम्हांस जें परंपरेनें ब्रह्मवस्तूचें प्रवचन ऐकावयास सांपडलें, त्याचा तात्पर्यार्थ हा आहे कीं ब्रह्म हें ज्ञाताज्ञात-विलक्षण आहे.

शिष्य—पण तात्पर्य काय तें अजून माझ्या लक्षांत येत नाहीं.

सिद्धान्ती—साधकानें आचार्यास असा प्रश्न केला होता, कीं मला ब्रह्म-स्वरूपाचें निरूपण करा. नेहमींची पद्धति अशी आहे, कीं, विचारल्याशिवाय केव्हांही विषयाचें निरूपण करूं नये. असो; साधकानें विचारिलें; तेव्हां आचार्य सांगतात कीं, आपलीं जीं पंचमहाभूतांनीं घडविलेलीं इंद्रियें आहेत; त्यांना अगोचर असणारें हें ब्रह्म आहे, तेव्हां इंद्रियद्वारानें हें समजावयाचें नाहीं.

शिष्य—तर मग ब्रह्म समजण्यास कांहींच मार्ग नाहीं काय ? मघाशींच एकदां मी हा प्रश्न विचारिला होता.

सिद्धान्ती—मार्ग आहे; पण तो असा आहे.—साधकानें अंतःकरण शुद्ध केलें म्हणजे त्याच्या सूक्ष्म व शुद्ध झालेल्या बुद्धीला पुष्कळ कालानें व पुष्कळ श्रमांनीं ह्या विषयाचें आकलन करितां येतें, तें मुद्दां सर्वांस करितां येत नाहीं. तर ज्या साधकावर गुरूचा अनुग्रह झाला आहे, त्या साधकास जेव्हां प्रश्नोत्तर-रूपानें ह्या विषयाचें गुरुजींनीं निरूपण करावें; तेव्हां हा विषय समजतो. सारांश, परंपरामार्गानें हा विषय शुद्धचित्त झालेल्या पुरुषानें अखंड चिंतन महत्कालपर्यंत केलें तर मात्र कदाचित् समजेल, अन्यथा नाहीं. ब्रह्मज्ञानविज्ञान होण्याला सद्गुरूचा पूर्ण अनुग्रह अवश्य हवा आहे ॥ २ ॥

मंत्र चवथा.

(यत्) ब्रह्म (वाचा) वागिन्द्रियेण (अनभ्युदितम्) अप्रकाशितम् वाचा शब्दः प्रकटीभवति, अशब्दं ब्रह्मातो वाग्-विषयो न भवतीत्यर्थः (येन) ब्रह्मणा (वाक्) (अभ्युद्यते)

प्रकाशिता भवति [अर्थाद्ब्रह्मकृतनियमेनैव वाचोच्चरितः शब्दोऽर्थं बोधयति]। यद्यपि वेदादिशब्दप्रमाणमाश्रित्यैवमादिप्रकारकं ब्रह्मेत्याचार्या वाचैव शिष्यानुपदिशन्ति तेन च यथासंस्कारमन्तेवासिनोऽपि ब्रह्म बुद्धयन्ते तथापि साऽऽचार्याणां वाक् शब्दार्थसम्बन्धज्ञापनायैव प्रयुक्ता ब्रह्मज्ञानं प्रति कारणं न भवति । किन्तूच्चरिताया वाचः श्रवणं प्रति कारणत्वं स्वसाधनसिद्धस्य ध्यानस्य च ब्रह्मज्ञानं प्रतिसाक्षात्कारणत्वम्] (तत्, एव, त्वम्) वाचो ह वाचमित्यादिनोपदिष्टम् (ब्रह्म) (विद्धि) जानीहि । मनुष्याः (यदिदम्) कार्यं वागिन्द्रियगम्यं शब्दादिरूपम् (उपासते) सेवन्ते तत् (इदम्) (न) ब्रह्म नास्तीति शेषः ॥ ४ ॥

सिद्धान्ती–शब्द–प्रकाशन करणाऱ्या वाणीला परमेश्वरावर प्रकाश पाडतां येत नाहीं. म्हणून तो शब्दातीत आहे. तथापि वाणी मात्र स्वव्यापार करण्यास समर्थ होते, ती परमेश्वराच्या सामर्थ्यानें होते. वाणीला विचार–प्रकटनाचें सामर्थ्य देणाऱ्या परमेश्वराचें तिला वर्णन करितां येत नाहीं.

शिष्य—भगवन्! शब्दालाच जर हा परमेश्वर अगोचर आहे, तर आचार्यांना तरी साधकाला ब्रह्माचा उपदेश कसा करितां येणार? उपदेश करावयाचा तो शब्दांनींच केला पाहिजे. आणि परमेश्वर जर शब्दागोचर आहे तर हा उपदेश होणें शक्यच नाहीं, असें मला वाटतें. मग आचार्यांचे शब्द स्वतःचे असोत किंवा ते शब्द वेदांतील वाक्यानुसार असोत.

सिद्धान्ती—तूं म्हणतोस, हें खरें आहे. श्रुतीच्या आधारानें आचार्य फार तर परमेश्वर असा असा आहे असें सांगूं शकतात. आणि साधकास आचार्य–प्रवचनापासून कांहींसा संस्कार होतो म्हणजे श्रुतींतील शब्दांचा अर्थ मात्र त्यास समजतो. पण या अर्थ–बोधापासून साधकाला ब्रह्मज्ञान–विज्ञान कांहा होत नाहीं.

शिष्य—मग या अध्ययनाचें फल तरी काय?

सिद्धान्ती—फल असें आहे कीं, या आचार्यकृत उपदेशानें साधकाचें श्रवण सिद्ध होतें. आणि नंतर साधकानें मनन आणि निदिध्यास यांच्या साह्य्यानें परमेश्वराचें अखंड ध्यान जर केलें, तर मात्र त्याला स्वतःच्या निरंतर श्रमानें ब्रह्मज्ञान होतें. असो; मागें दुसऱ्या मंत्रांत जो उपदेश केला आहे तें खरें ब्रह्मस्वरूप आहे, असें जाण; पण ज्याची हल्लीं लोक उपासना करितात, तें ब्रह्म नव्हे, हेंही लक्षांत ठेव. इंद्रिय–गोचर कोणताही विषय ब्रह्माचें स्वरूप दाखवीत नाहींत, म्हणून विषयाची उपासना करणें, दिसणाऱ्या वस्तूंची उपासना करणें, हें सर्वथा निंद्य आहे ॥ ४ ॥

मंत्र पांचवा.

(यत्) ब्रह्म (मनसा) मनुतेऽनेनेति मनोऽन्तकरणं ज्ञातुर्जीवात्मनः सुखदुःखादिजन्यस्य ज्ञानस्य साधनं तेन (न, मनुते) न सङ्कल्पयति न निश्चिनोति किन्त्वकायत्वादन्तः करणमन्तरेणैव ब्रह्म सर्वं वेत्ति (येन) ब्रह्मणा (मनः) अन्तःकरणम् (मतम्) ज्ञातं विषयीकृतं व्यापकत्वात्प्राप्तं व्याप्तं वा (आहुः) वदन्ति ब्रह्मविद इति शेषः (तत्, एव) मनसो मन इत्यादिना प्रतिपादितम् (त्वम्) जिज्ञासो ! (ब्रह्म) (विद्धि) जानीहि (यदिदम्) मनोगम्यं सुखादिकम् (उपासते) जनाः सेवन्ते तदिदं ब्रह्म (न) नास्ति ॥ ५ ॥

सिद्धान्ती—ज्ञानी जो जीवात्मा त्याला मनानें सुख–दुःखादिकांचें व बाह्य विषयांचें ज्ञान होतें; मन हें सुखादिज्ञानाचें व विषयज्ञानाचें साधन आहे. पण परमेश्वराची गोष्ट निराळी आहे. तो मनानें संकल्प करित नाहीं किंवा निश्चयही करित नाहीं. त्याला शरीर नाहीं व नको आहे आणि मनही नाहीं व नको आहे. तो सर्वज्ञ आहे; पण त्याचें ज्ञान मनोद्वारा झालेलें नसतें. असें असूनही तो मनाला सुद्धां जाणत असतो. तो सर्व–व्यापी आहे. म्हणून तो मनही व्यापून त्याचें स्वरूप जाणतो, असें तत्त्वज्ञ म्हणतात. मनाला मात्र तो जाणतां येत नाहीं. खेरेंच आहे, मनाच्या मनाला मन कसें जाणूं शकणार ? तेव्हां हे साधका ! तूं मनःप्रकाशक परमेश्वर आहे असें जाण; पण मनानें प्रकाशिलेले हे सुखादि विषय परमेश्वर नव्हेत, हें विसरूं नको. सामान्य लोक विषयसुखच ब्रह्म होय, असें समजून त्याची उपासना करितात. ॥ ५ ॥

मंत्र सहावा.

(यत्) ब्रह्म (चक्षुषा) रूपज्ञानसाधनेन्द्रियेण (न, पश्यति) (येन) ब्रह्मणा (चक्षूंषि) बुद्धिवृत्तीरन्तःकरणभेदभिन्नाः (पश्यति) जीवात्मेति शेषः (तत्, एव) चक्षुषश्चक्षुरित्यादिना प्रतिपादितम् (त्वम्) (ब्रह्म, विद्धि) (यदिदम्) चक्षुर्ग्राह्यं रूपान्वितं वस्तुजातं जनाः (उपासते) सेवन्ते तत् (इदम्) ब्रह्म (न) नास्तीति जानीहि ॥ ६ ॥

सिद्धान्ती—रूपज्ञान करून देणाऱ्या नेत्रांनीं हें ब्रह्म पाहत नाहीं. पण नेत्र मात्र ब्रह्माच्या सामर्थ्यानें विषय प्रकाशितात व जीव आपल्या मनोवृत्ति व बाह्यविषय ब्रह्माच्या अनुग्रहानें पाहतो. परमेश्वर नेत्राचा नेत्र म्हणजे प्रकाशक आहे,

पण नेत्रांनीं प्रकाशित केलेल्या रूपवान् वस्तु परमेश्वर नाहींत, हें जाण. मागच्याही मंत्रांत तुला हाच उपदेश केला आहे. सामान्य लोक मात्र ह्या वस्तुच परमेश्वर आहेत असें समजून रूपवंत वस्तूंची उपासना करितात ॥ ६ ॥

मंत्र सातवा.

(यत्) ब्रह्म (श्रोत्रेण) श्रवणसाधनेन (न, शृणोति) (येन) ब्रह्मणा (इदम्) श्रोत्रम् कर्णेन्द्रियम् (श्रुतम्) व्यापकत्वात् विषयीकृतं ज्ञातम् श्रोत्रमपि ब्रह्मसत्तामन्तरेण स्वकार्यं दातुमसमर्थमित्यर्थः । (तदेवेत्यादि) पूर्ववत् ॥ ७ ॥

सिद्धान्ती—श्रवणाच्या साधनानें ब्रह्म ऐकत नाहीं; पण सर्वव्यापी परमेश्वराला श्रवणाचें ज्ञान असतें. ब्रह्मसत्तेनें मात्र कर्ण आपला व्यापार करूं शकतो. ब्रह्मसत्ता नसेल तर श्रोत्राला आपला व्यापार करितां यावयाचा नाहीं. असो; लोक शब्दाची मात्र उपासना करितात, तो परमेश्वर नव्हे ॥ ७ ॥

मंत्र आठवा.

(यत्) ब्रह्म (प्राणेन) श्वासावृत्त्या (न, प्राणिति) पार्थिवनासिकापुटाभ्यां न श्वसिति (येन) कारणभूतेन ब्रह्मणा (प्राणः) (प्रणीयते) स्वस्य कर्मणि चेष्टते (तदेव) (त्वम्) जीवात्मन्! (ब्रह्म) विद्धि) जानीहि (यदिदम्) जनाः (उपासते) तंत् (इदम्) न ब्रह्म नास्तीति ॥ ८ ॥

सिद्धान्ती—परमेश्वर नाकानें श्वासोच्छ्वास करीत नाहीं; पण श्वासोच्छ्वासरूपी प्राण आपलें कर्म करण्यास समर्थ होतो. तो ब्रह्मसामर्थ्यानें होय. परमेश्वर हा प्राणाचा प्राण आहे. सामान्य लोक उपासना करितात तो प्राण परमेश्वर नव्हे ॥ ८ ॥

इत्येवमस्मिन् प्रथमे खण्डे व्याप्यव्यापकसम्बन्धेनेन्द्रियेषु व्याप्तत्वात्संनिहितमपि विषयापेतं ब्रह्माकृतात्मभिर्दुर्ज्ञेयमिति प्रतिपादितम् । वाङ्मनश्चक्षुःश्रोत्रप्राणानां प्राधान्यादुपलक्षणार्थं ब्रह्मणम् । तत्र कर्मेन्द्रियेषु वाचः प्राधान्यम् । ज्ञानेन्द्रियेषु चक्षुषः श्रोत्रस्य च, मन उभयात्मकम् । वायुभेदेषु प्राणस्य प्राधान्यम् । यत्कर्तुं प्रधानस्य सामर्थ्यं नास्ति तत्राप्रधानस्य का कथेति ध्वनितम् ॥

॥ इति प्रथमः खण्डः ॥

सिद्धान्ती—याप्रमाणें या पहिल्या खंडांत असें सांगितलें आहे कीं, ज्यांच्या मनाला संस्कार झाला नाहीं, त्यांना ब्रह्मस्वरूप समजणें असंभवनीय आहे. सर्वव्यापक ब्रह्म इंद्रियांना व त्यांच्या विषयांना व्यापितें व म्हणून तें इंद्रियांच्या व विषयांच्या अत्यंत सन्निध आहे. तथापि तें विषयांहून अत्यंत भिन्न आहे म्हणून सामान्य पुरुषास ब्रह्मज्ञान होणें कठिण आहे. वरील मंत्राष्टकांत वाणी, नेत्र, कर्ण, आणि प्राण यांचा स्वीकार केला आहे, तोही इंद्रियें सर्वच्या सर्व सांगितलीं या बुद्धीनें नव्हे, तर हीं इंद्रियें मुख्य व प्रतिनिधीभूत आहेत म्हणून होय. कर्मेंद्रियांमध्यें वाणी प्रधान आहे, ज्ञानेंद्रियांमध्यें नेत्र व कर्ण प्रधान आहेत, मन हें ज्ञान-स्वरूप व कर्मस्वरूप आहे. प्राण हा वायूंमध्यें प्रधान आहे. तेव्हां या प्रधान व प्रधानतम इंद्रियांसही परमेश्वर अगोचर आहे म्हणून सांगितलें. यावरूनच तो बाकीच्या इंद्रियाना अर्थातच अगोचर असला पाहिजे, हें सिद्ध झालें. जी अवघड गोष्ट उत्तम कारकुनास करितां येत नाहीं, ती गोष्ट बाकींच्या रेम्याडोक्या खरडेघाशांस कशी करितां येणार? सारांश, ब्रह्म इंद्रियांस सर्वथा अगोचर आहे.

प्रथम खंड समाप्त.

मंत्र नववा.

अस्यामुपनिषदि गुरुशिष्यसंवादेन ब्रह्मस्वरूपनिरूपणं पूर्वतः प्रारब्धम्। तत्र प्रथममन्त्रे जिज्ञासुना प्रश्नः कृतस्तस्योत्तरं गुरुणाष्टमन्त्रैः प्रतिपाद्येदानीं तेनैवोच्यते ॥

सिद्धान्ती—या उपनिषदामध्यें पहिल्या खंडांत गुरु-शिष्य-संवादरूपानें ब्रह्मस्वरूपाचें निरूपण आरंभिलें आहे. वाचकांस विदितच आहे कीं, पहिल्या मंत्रांत साधक जिज्ञासूनें प्रश्न केला आहे आणि त्याचें उत्तर आचार्यांनीं पुढील सात मंत्रांत दिलें आहे. हें उत्तर दिल्यानंतर पुनः गुरुजीच स्वतः सर्व व्याख्यान करितात, त्याचा विस्तार या दुसऱ्या खंडांत केला आहे.

खंड २ रा.

मंत्र पहिला (क्रमांक ९ वा).

हे शिष्य! (यदि) (त्वम्) (अस्य) ब्रह्मणः (यत्) (दभ्रम्) सूक्ष्मम् (एव) (रूपम्) स्वरूपम् । रूपमिति नेन्द्रियग्राह्यमत्र कल्पनीयमपि तु येन धर्मेण यन्निरूप्यते तदेव तस्य रूपमिति विज्ञेयम् । (नूनम्) निश्चयेन तत् (सुवेद) सुष्ठु वेदाहम् (इति) (मन्यसे) तर्हि (देवेषु) विद्वत्सु विद्याप्रकाशेन (विदितम्) प्रकाशितम्) (यत्) (अस्य) ब्रह्मणो रूपं तत्त्वम् (वेत्थ) जानासि इति नाहं मन्ये इति शेषः (अथ, नु) अनन्तरं नु (ते) तव ब्रह्म (मीमांस्यमेव) उपपत्तिभिस्तर्कावितर्कैर्विचार्यमेवास्तीत्यहम् (मन्ये) साधु मन्ये । अर्थात् यो जानाति मया सम्यग्ब्रह्म ज्ञातमिति स न जानाति यदा साधारणावस्थायामप्यहङ्कारस्य तत्तत्कार्यविरोधित्वं तदा किमुत ब्रह्मज्ञानेऽहङ्कारः साधको भवेदिति सम्भवोऽस्ति? । अतो ज्ञात्वाऽपि नैवमभिमन्तव्यं वक्तव्यं वाऽहं सुवेदेति नेयं विदुषां मर्यादा । यदि सुवेदाहं ब्रह्मेति । त्वं मन्यसे तर्हि मैवं मंस्थाः । नैवं मन्यमानो वृद्धिमवाप्नोति । अतस्त्वया मीमांस्यमेव ब्रह्मेति ॥ १ ॥ ९ ॥

सिद्धान्ती—आचार्य म्हणतात. हे साधका! तुला ठाऊकच आहे कीं ज्या धर्मानें पदार्थाची ओळख पटते, पदार्थाचें जें आपण वर्णन देतों, तें वर्णन किंवा ती ओळख पटण्याची खूण म्हणजे त्या पदार्थाचें स्वरूप होय. ब्रह्माचें स्वरूप अति सूक्ष्म आहे तें इंद्रियांनीं ग्रहण करितां येण्यासारखें नाहींच आहे; असे असूनही ब्रह्मस्वरूप व त्याचें निश्चित ज्ञान आपल्यास पूर्णत्वानें झालें असें जर तुला वाटत असेल, विद्येनें प्रकाशित असलेल्या पंडितांस ज्या स्वरूपाची ओळख झाली आहे, तें स्वरूप तुला उत्तम कळलेंसें वाटत असेल, तर तुला तें समजलेंच नाही असें म्हटलें पाहिजे. म्हणून श्रुतीच्या व श्रुतीस अनुकूल असणाऱ्या तर्क–वितर्कांच्या साहाय्यानें तुला तें स्वरूप अद्यापि समजून घ्यावयाचें आहे, व मलाही तें तुला समजून सांगितलें पाहिजे, असें ठरतें.

शिष्य—खरेंच आहे. आपण व्यवहारांत असें पाहतों कीं, जे अहंकारी किंवा अहंमन्य पुरुष आहेत, त्यांना सामान्य गोष्टीचें ज्ञान होणें सुद्धां दुष्कर असतें. उघड आहे कीं अभिमान असला म्हणजे सामान्य गोष्टीचें सुद्धां ज्ञान होत नाहीं. आणि जेथें तर इंद्रियांस अग्राह्य अशा ब्रह्मस्वरूपाची गोष्ट आहे.

तेव्हां 'मला सर्व समजतें,' 'मला ब्रह्माचें ज्ञान पूर्ण झालें आहे' असा व्यर्थ अभिमान ज्यास झाला, त्याला ब्रह्मज्ञान होण्याचा मुळींच संभव नाहीं.

सिद्धान्ती—बरोबर आहे. ब्रह्मस्वरूप समजलें तरी ह्या समजण्याचा अभिमान असतां उपयोगी नाहीं. किंवा तो समजण्याचा भाग बोलून दाखविणें हेंही योग्य नाहीं. ही विद्वत्तेची मर्यादाच नव्हे. सारांश, आचार्य म्हणतात. हे साधका! जर तुला ब्रह्मस्वरूप निश्चयानें समजलें असें वाटत असेल, तर तें वाटणे व्यर्थ आहे. ज्ञानाचा अभिमान उत्पन्न झाला म्हणजे ज्ञानवृद्धि होत नाहीं. अभिमान हा ज्ञानवृद्धीचा कट्टा शत्रु आहे. म्हणून अभिमान बाळगूं नकोस. नेहमीं अशी भावना असावी कीं आपल्यास अद्यापि ब्रह्मविचार कर्तव्य आहे. ॥ १ ॥ ९ ॥

मंत्र दुसरा (क्रमांक १० वा).

अन्वय व अर्थ—**सुवेद इति अहं न मन्ये** (मला चांगलें समजलें, असें मी मानीत नाहीं) **न वेद इति नो** (समजलें नाहीं, असेंही म्हणत नाहीं.) **च वेद** (मला समजलें आहे.) **नः यः तत् वेद,** (आमच्यापैकीं ज्याला तें माझें बोलणें समजलें) **तत् वेद** (त्याला समजलें) **'नो न वेद इति वेद च** (माझें बोलणें हें कीं, मला समजलें व समजलें नाहीं !) सारांश, ब्रह्मरूप समजलें व समजलें नाहीं, असें जो मानितो, त्याला तें समजतें.

(अहम्) ब्रह्म (सुवेद) (इति) (न, मन्ये) (न वेद) इति च (नो) न मन्ये (वेद, च) जानाम्यपि (नः अस्माकं विद्यार्थिनां मध्ये) (यः) कश्चित्सतीर्थ्यः (तत्) मदुक्तं वचः (वेद) जानाति सः (तत्) ब्रह्म (वेद) जानाति । किन्तन्मदुक्तं वच इत्याह—नो न वेदेति वेद चेति । अहम्ब्रह्म सुवेद इति न मन्ये इति कथनेन पूर्वमन्त्रोक्ता शंका निराकृता । य एवं साहंकारं ब्रूयादहं सुवेदेति न स जानाति । अहंकारस्यास्मिताक्लेशान्तर्गतत्वाज्ज्ञानस्य चेदं गुह्यं लक्षणं यदहंकारविरहं स्वरूपावस्थानम् । तर्हि त्वं न वेत्थेति प्राप्तम् । तत आह—न वेदेत्यपि नो मन्ये । अपि तु वेद । विदित्वाऽपि सुवेद न वेद वा इति नो मन्ये । य एवं जानाति स ब्रह्म वेद । सुवेद न वेद इत्येतयोर्निर्वचनं कर्तुमशक्यमनुभवमात्रग्राह्यत्वात् । ब्रह्म किमित्याशंकानिरासाय वेदेति वक्तुं न शक्यते । प्रत्यक्षमिवाव्यपदेश्यं ब्रह्मेत्याशयः । यथेन्द्रियार्थसन्निकर्षोत्पन्न-

मात्रस्य व्यपदेष्टुमनर्हस्य ज्ञानस्य प्रत्यक्षत्वमेवं व्यपदेशानर्हस्यैव ब्रह्मज्ञानत्वम् । अत एव न तत्र चक्षुर्गच्छति न वाग्गच्छति नो मन इत्यादि सङ्गच्छते ॥ २ ॥ १० ॥

सिद्धान्ती—या आचार्यांच्या शंकेवर साधक अति नम्रपणानें म्हणतो तें ऐक. तो म्हणाला,—'भगवन्! मला ब्रह्मस्वरूप पूर्णत्वानें समजलें असें वाटतच नाहीं, व अभिमानही उत्पन्न झाला नाहीं, किंवा तें मुळींच समजलें नाहीं, असेंही वाटत नाहीं. माझ्या सहाध्यायी विद्यार्थ्यांमध्यें जो कोणी मी काय बोललों तें जाणतो, त्यानें तें ब्रह्म जाणलें असें भी म्हणतों; ते माझें म्हणणें हें आहे कीं, मला तें समजलें नाहीं व समजले आहे. सारांश, मला ब्रह्मज्ञाना-विषयीं अभिमान मुळींच उत्पन्न झाला नाहीं. जो अहंकारानें बोलतो, त्याला कांहींच समजत नसतें.

शिष्य—म्हणजे हा साधक ठिकाणावर होता, मर्यादा पाळणारा होता, असें दिसतें. पण अहंकारविरुद्ध श्रुतीचा एवढा कटाक्ष कां ?

सिद्धान्ती—अरे! अहंकारामध्यें व्यर्थ अभिमान व पुष्कळ क्लेश यांचा अंतर्भाव होत असतो. ज्ञानाचें हेंच गूढ लक्षण आहे कीं, याच्या स्वरूपामध्यें अहंकाराचा लेशसुद्धां सहन होत नाहीं.

शिष्य—तर मग दुसऱ्या कोणाला अशी शंका येईल कीं, त्याला ब्रह्मस्वरूप समजलेंच नव्हतें कीं काय ?

सिद्धान्ती—या शंकेचें निराकरण करण्यासाठींच साधक म्हणाला, कीं 'मला समजलें नाहीं असेंही वाटत नाहीं.' तें जाणूनही ब्रह्मस्वरूप चांगलें समजलें अथवा मुळींच समजलें नाहीं, हें कांहींच म्हणतां येत नाहीं; असें ज्याला ज्ञान झालें तो खरा ब्रह्मज्ञ होय. समजलें किंवा समजलें नाहीं, याचें स्पष्टीकरण करणें ही गोष्ट ब्रह्मसंबंधानें अशक्यच आहे. कारण ही अनुभवाने मात्र ग्रहण करण्याची वस्तु आहे. 'ब्रह्म ही वस्तु काय आहे?' ती तुला समजली का? असें जर कोणीं विचारिलें तर 'समजली नाहीं.' असें ब्रह्मज्ञाला म्हणतांच येत नाहीं. ब्रह्म ही वस्तु प्रत्यक्ष दिसणाऱ्या इंद्रियग्राह्यवस्तूंप्रमाणें नव्हे, कीं 'ही ती ब्रह्मवस्तु' असें बोलून ती दाखवितां येण्यासारखी आहे. इंद्रिय आणि विषय हीं उभयतां एकत्र झालीं म्हणजे एखाद्या वस्तूचें प्रत्यक्ष ज्ञान होतें. पण जसें इंद्रियांस अग्राह्य असणाऱ्या अर्थाचें (गोडीचें प्रत्यक्ष ज्ञान होतें, पण तें, ज्ञान बोलून दाखवितां येत नाहीं; तसेंच ब्रह्मवस्तूसंबंधानें म्हणावयास हवें. ब्रह्माचे ठिकाणीं चक्षूचा प्रवेश नाहीं, वाणी व मन ब्रह्मवस्तूपासून निवृत्त होतात. हें जें मागें तिसऱ्या मंत्रांत सांगितलें आहे, तें वरोबरच आहे ॥ २ ॥ १० ॥

मंत्र तिसरा (क्रमांक ११ वा).

सम्प्रति पूर्वमन्त्रोक्तविषयस्यातिसूक्ष्मदृष्ट्या सारांशमाह— (यस्य) प्रभूततत्त्वज्ञानस्य ब्रह्म (अमतम्) अज्ञातम् [मनसेति शेषः] चक्षुरादिसाधनासिद्धस्य ज्ञानस्य साधनं मनो रूपादीनां चक्षुरादीनीव । यथा चक्षुषा पश्यति तथा मनसा विजानाति, इति वात्स्यायनोक्तेः । इति मतं निश्चयः (तस्य) (मतम्) ज्ञातं तेन सम्यग्बुद्धं ब्रह्मेति (यस्य) मनआदिना मया (मतम्) ज्ञातं विदितं ब्रह्मत्याशयः (सः, न, वेद) स न तज्जानाति । अत एव (विजानताम्) ब्रह्मविज्ञानाभिमानिनाम् (अविज्ञातम्) न तैर्ज्ञायते च (अविजानताम्) तद्विज्ञानाभिमानं त्यक्तवन्तस्तेषाम (विज्ञातम्) तैः सम्यग्ज्ञातमित्यर्थः ॥ ११ ॥

सिद्धान्ती—या मंत्रांत पूर्व–मंत्रांत सांगितलेला अर्थ सारांशरूपानें अति सांगत आहे. श्रुतीची दृष्टि येथें अतिसूक्ष्म म्हणजे अति गूढ आहे. असो. मुख्य रहस्य सांगावें हा आमचा उद्देश आहे. ज्याला पूर्ण तत्त्वज्ञान झालें आहे, त्याचा असा निश्चय होतो कीं, हें तत्त्व मनानें समजावयाचें नाहीं म्हणून अज्ञातच रहावयाचे. कारण, रूपादि विषयाचें ज्ञान नेत्रादि इंद्रियांनीं होतें. तसेंच इंद्रियांच्या साधनानें सिद्ध न होणाऱ्या ब्रह्मस्वरूपाचें ज्ञान मनानें होऊं शकेल, असें कोणी म्हणेल तर त्याला श्रुति येथें उत्तर देते कीं, हें ज्ञान मनालाही ग्रहण करितां यावयाचें नाहीं. ' डोळ्यानें दिसतें हें जसें खरें तसेंच मनानें जाणतां येते हें खरें ' असें वात्स्यायन ऋषींचें वचन आहे, तेंही येथें मात्र प्रमाण नाहीं. सारांश, मनानेंही ब्रह्म समजत नाहीं असें ज्याला ज्ञान झालें, तो खरा ब्रह्मज्ञ होय. पण ' माझ्या मनानें या परमेश्वराचें ज्ञान ग्रहण केलें ' असें ज्याला वाटत असतें, त्याला ईश्वरज्ञान झालेलें नसतें. म्हणून ब्रह्मविज्ञानाचा अभिमान बाळगणारास कांहीं समजलें नसतें, व समजत नाहीं. ज्यांना अभिमान नाहीं, त्यांना मात्र यथार्थ ज्ञान झालेलें असतें ॥ ३ ॥ ११ ॥

मंत्र चवथा (क्रमांक १२ वा).

पूर्वं ब्रह्मज्ञानिनो वैलक्षण्यमुक्तं तत्र कथं ब्रह्म ज्ञातुं शक्नोतीति उच्यते—(प्रतिबोधविदितम्) इन्द्रियैर्विषयग्रहणेन तदाकारा बुद्धिर्बोधः । इन्द्रियाणि विषयेभ्यो निरुध्य प्रत्यगात्मनि धारणाध्यानसमाधिसंयमद्वारा बुद्धिवृत्तिभिर्बुद्धिवृत्तीनां ग्रहणं प्रतिबोधस्तेन विदितं ज्ञातं ब्रह्म (मतम्) ज्ञातं भवति । अनेन ज्ञानेन

पुरुषः (हि) निश्चितम् (अमृतत्वम्) अमरणधर्मत्वम् (विन्दते) जीवन्मुक्तिं प्राप्नोति । जीवन्मुक्तो भूत्वैवोपात्तं देहं परिहाय सुखं विमुच्यते । (आत्मना) स्वस्वरूपेण (वीर्यम्) पराक्रमं योगबलम् (विन्दते) लभते (नास्ति योगसमं बलम्) इत्युक्तत्वात् । अणिमाद्यैश्वर्यं प्राप्नोतीत्यर्थः । आत्मना स्वेन जीवस्वरूपेण बलवत्त्वादेव हेतोः (विद्यया) ब्रह्मविषयया (अमृतम्) मरणादिदुःखरहितं परमात्मानम् (विन्दते) प्राप्नोति । नायमात्मा बलहीनेन लभ्य इत्युक्तत्वात् ॥ ४ ॥ १२ ॥

सिद्धान्ती—याप्रमाणें मागच्या मंत्रांत ब्रह्मज्ञानाची विलक्षणता सांगितली, म्हणजे ' मला पूर्ण ज्ञान झालें नाहीं ' असा ज्याचा निश्चय असतो, त्यालाच पूर्ण ज्ञान झालेलें असतें असें सांगितलें.

शिष्य—' मग ब्रह्म समजतें तरी कसें ' या शंकेचें निराकरण श्रुतीनें केलें आहे काय ?

सिद्धान्ती—ऐक. इंद्रियांनीं आपापल्या विषयांचें ग्रहण केलें म्हणजे जिवाची बुद्धि विषयाकार होत असते. या विषयाकार बुद्धीला ' बोध ' असें म्हणतात. आतां इंद्रियांस विषयांपासून निवृत्त करून बुद्धि-वृत्तींनीं धारणा, ध्यान समाधि, आणि संयम यांच्या सहायानें प्रत्यगात्म्याचे ठिकाणीं आपलें वास्तव्य केलें, म्हणजे बुद्धिवृत्तींचें जें ग्रहण होतें त्याला प्रतिबोध असें म्हणत असतात. म्हणजे विषयनिवृत्त झालेल्या ' बोधानें ' बुद्धीमध्यें उत्पन्न होणाऱ्या तरंगांमधून शुद्ध बुद्धीचा प्रवाह समजून घेणें, याला प्रतिबोध म्हणतात. या प्रतिबोधानें जें ज्ञान होतें तें ब्रह्मज्ञान होय. ब्रह्मज्ञान करून घेण्याचा हा मार्ग आहे. असें ज्ञान झालेला पुरुष अमरणधर्मा होतो, अमर होतो, जीवन्मुक्त होतो, आणि हा पंचमहाभूतात्मक देह निःसंदेहानें सोडून देऊन जीव परम सुखी होतो. आत्मस्वरूपाच्या ज्ञानानें योगबलाचे पराक्रम साध्य होतात. ' योगासारखें बल नाहीं. ' असें वचन आहे. ब्रह्मज्ञ पुरुषाला सर्व ऐश्वर्य प्राप्त होतें, कारण अणिमा, लघिमा इत्यादि अष्ट-सिद्धि त्याच्या दासी होतात आणि हें उत्तम प्रकारचें योगैश्वर्य या ब्रह्मज्ञास प्राप्त झाल्यामुळें हा बलवंत योगी सर्व विद्येचें संपादन करून जन्ममरणादि दुःखशून्य जें परमात्मस्वरूप त्याची ही प्राप्ति करून घेतो. ' ज्याला बल नाहीं त्याला आत्मप्राप्ति व्हावयाची नाहीं ' असें श्रुतीचें वचन म्हणजे प्रत्यक्ष सागणें आहे. ॥ ४ ॥ १२ ॥

मंत्र पांचवा (क्रमांक १३ वा).

अन्वय व अर्थ पूर्वीप्रमाणें.

(इह) वर्तमाने जन्मनि (चेत्) यदि (अवेदीत्) जानीयात् आत्मानमिति शेषः (प्रायोत्रोपनिषत्सु छन्दोवत् कार्याणि दृश्यन्त इति सार्वकालिकश्छान्दसोऽत्र लुङ्वेदीदिति) (अथ) तदा (सत्यम्) सुफलम् (मनुष्यजन्म जन्तोः परिश्रमश्च) (अस्ति) (चेत्) यदि (इह) (न, अवेदीत्) न जानीयात् तदा (महती) महान् (विनष्टिः) सुखस्य विनाशो हिंस्यशरीरादेर्बन्धनच्छेदनाविच्छेदलक्षणो देवमनुष्यतिर्यक्स्थावरादियोनिस्थजन्ममरणयोः संहननरूपो जायते । तस्मादेताः स्थावरान्तासु योनिषु दुःखबहुलाः प्राणिनां गतीः पश्यन्तो योगिनः (धीराः) ध्यानवन्तो विद्वांसः (भूतेषु भूतेषु) सर्वप्राण्यप्राणिषु चराचरेषु ध्यानयोगेन (विचिन्त्य) विशेषचिन्तया तन्निष्ठया निश्चित्यात्मानं साक्षात्कृत्य (अस्मात्) प्रत्यक्षादेषणात्रयरूपात् (लोकात्) दृश्यात्संसारात् (प्रेत्य) उपात्तं शरीरादिकं त्यक्त्वा मरणं प्राप्य परमात्मानमेव ध्यायन्तः (अमृताः) मुक्ता अविद्यादिजन्यदुखेभ्यः पृथग्भूताः (भवन्ति) ॥ ५ ॥ १३ ॥

इति द्वितीयः खण्डः ॥ २ ॥

सिद्धान्ती—ह्या वर्तमान जन्मामध्यें आत्मस्वरूपाचें ज्ञान झालें तर मनुष्यजन्माचें व त्याच्या श्रमाचें सार्थक होतें. पण हें ज्ञान जर झालें नाहीं, तर अत्यंत विनाश होतो. मग काय विचारावें ? या पुरुषाला सुखाचें नांवच घ्यावयास नको. त्याला नश्वर शरीराची प्राप्ति होऊन कारागृहवास, शिरश्छेद, इत्यादि दुःखें कायमचीं प्राप्त होतात. तसेंच देव, मनुष्य, पशु, पक्षी, स्थावर—योनी इत्यादि देहांमध्यें घातकारी जन्ममरण घेणें प्राप्त होतें. म्हणून या प्रत्येक योनीमध्यें अत्यंत दुःख आहे आणि जीवांची गति अति दुर्धर आहे. अशा प्रकारचें ज्ञान (म्हणजे ब्रह्मज्ञानानें सुखप्राप्ति आणि अज्ञानानें दुःखप्राप्ति होते, हें ज्ञान) ध्यान—धारणा करणारे योग्यांस तपश्चर्येच्या बलानें मिळतें. चराचर वस्तूंना काय काय दुःखें भोगावीं लागतात, हें योगी लोकांना योग—सामर्थ्यानें साक्षात् समजतें. असो, हे योगी नश्वर विषयांचा त्याग करून त्या चराचर नश्वर वस्तूमध्यें परमेश्वर पूर्ण भरलेला आहे, असा ध्यानयोगानें निश्चित साक्षात्कार करून घेतात, आत्मस्वरूपाचा यांस प्रत्यक्ष अनुभव येतो व पुत्रेषणा, लोकेषणा, आणि वित्तेषणा, (पुत्र असावा, कीर्ति असावी, द्रव्य असावें, या वासना)

यांचा (अर्थात् दृश्य संसाराचा) हे योगी त्याग करितात. शेवटीं त्या वासनांनीं प्राप्त झालेल्या शरीरादिकांस टाकून देऊन एकनिष्ठ-चित्तानें परमेश्वराचें ध्यान करित होत्साते मुक्त होतात. अर्थातच यांना अज्ञानापासून होणाऱ्या दुःखाची पुढें केव्हांही बाधा होत नाहीं.

शिष्य—हें मला सर्व समजलें; पण एक गोष्ट विचारावीशी वाटते ती ही उपनिषदें अपौरुषेय आहेत, असें म्हणतात आणि येथें व अन्य ठिकाणीं केव्हां केव्हां भूतकालिक प्रयोग दिसतात, यांची संगति कशी लावावयाची ? कालस्थलातीत ग्रंथांनीं भूतभविष्यादि कालांचा प्रयोग कां करावा ?

सिद्धान्ती—याला पाणिनि-सूत्राचा आधार आहे. 'वेदामध्यें भूतकालीं प्रयोग आले, तरी ते सार्व-कालिक आहेत, नित्य वस्तूचें प्रतिपादन करणारे आहेत, असें समजलें पाहिजे' ॥ ५ ॥ १३ ॥

द्वितीय खंडाची समाप्ति.

आद्ये खण्डे ब्रह्मज्ञानाय प्राणादीनामनुपयोगित्वं प्रदर्श्य द्वितीये ब्रह्मज्ञानाय वैलक्षण्यं दुष्प्राप्यत्वं चाभिधायेदानीं तत्पोषणार्थमलङ्कारपूर्वकमाख्यायिकयापि ब्रह्मणो महत्त्वं दुष्प्राप्यत्वं च द्रढयितुमाह । अत्र शब्दार्थे तात्पर्यं नास्त्यपि तु वाक्यार्थाभिप्राय एव ग्राह्यः ॥

सिद्धान्ती—पहिल्या खंडामध्यें असें सांगितलें कीं ब्रह्मज्ञान होण्याला नेत्र-मन-प्राणादिकांचा कांहीं एक उपयोग होत नसतो. दुसऱ्या खंडांत ब्रह्मज्ञानाची विलक्षणता आणि दुष्प्राप्यता सांगितली. आतां या खंडामध्यें मागील सिद्धान्ताचें समर्थन एका आलंकारिक गोष्टीनें करावयाचें आहे. या गोष्टींत ब्रह्माचें महत्व आणि दुर्लभत्व सांगावयाचें आहे. येथें श्रुतीनें ज्या शब्दांचा उच्चार केला आहे त्यांकडे लक्ष द्यावयाचें नाहीं, तर श्रुतीचें तात्पर्य काय आहे, वाक्यार्थाचा अभिप्राय काय आहे, हें मात्र आपल्यास पहावयाचें व ग्रहण करावयाचें आहे.

खण्ड तिसरा ।

मंत्र पहिला (क्रमांक १४ वा).

अन्वय व अर्थ पूर्वीप्रमाणें.

(ह) किल (ब्रह्म) सर्वेभ्यो बृहत्तमम् (देवेभ्यः) पृथिव्यादिभूतेभ्यस्तत्कार्येभ्यश्चेतनाविशिष्टघ्राणादीन्द्रियेभ्यश्च (विजिग्ये) विजयं प्राप्तवान् इति तत्त्वार्थः (तस्य, ह, ब्रह्मणः)

(विजये) जाते तेषु व्याप्तस्य ब्रह्मणस्तेजसा बलेन च तेजस्विनो बलवन्तश्च भूत्वा (देवाः) पृथिव्यादयो घ्राणादयश्च (अमहीयन्त) महत्त्वं प्राप्नुवन्तः सन्तः (ते) देवाः (ह) किल (ऐक्षन्त) मन्यन्ते (भित्तिः पिपतिषतीत्यादिवत्) किं मन्यन्ते (अस्माकमेवायं विजयोऽस्माकमेवायं महिमेति) यथा कश्चित् शिष्यादिजनो गुर्वादिसामर्थ्येन समर्थो भूत्वाऽहं स्वयं समर्थ इति मन्यते यथा वा कस्यचिद्राजादेरनुकम्पया कश्चिद्धन्यो भूत्वा स्वस्यैव धनं मन्येत। एवं ब्रह्मसामर्थ्येन समर्थानीन्द्रियाणि स्वस्यैव सामर्थ्यमिति दर्शयन्तोऽर्थात् ज्ञातारोऽपि देवेषु महत्त्वं दृष्ट्वैव तेषामेवेदं तेजोबलं वेत्यज्ञानतो जानन्ति ॥ १ ॥ १४ ॥

सिद्धान्ती—एकदां सर्वश्रेष्ठ असणाऱ्या अनंत परमेश्वरानें पृथिव्यादि पंच महाभूतांस व घ्राणेंद्रियादि चेतनाविशिष्ट (सचेतन) पांचभौतिक कार्यांस म्हणजे पंचेंद्रियांवर स्थापन केलेल्या चैतन्यास, विजय प्राप्त करून दिला हा वाक्यार्थ आहे. असो; हा परमेश्वरदत्त विजय प्राप्त झाला असतां सर्व–व्यापी परमेश्वराच्या बलानें व तेजानें हीं पंचभूतें व त्यांचीं कार्येंही सहजच महत्व–पदवी संपादन करिती झालीं; पण त्या वेळीं त्यांस वाटूं लागलें कीं, हा विजय आमच्या सामर्थ्यानें आम्हीं मिळविला व आम्हांस मिळालेलें ऐश्वर्य हें आमचेच आहे.

शिष्य—भगवन्! पंचमहाभूतें व त्यांचीं कार्ये (जीवांस प्राप्त होणारीं इंद्रियें) स्वरूपानें अचेतन आहेत, जड आहेत, तेव्हां त्यांना आनंद झाला अभिमान उत्पन्न झाला अर्से श्रुति कसें म्हणते?

सिद्धान्ती—अरे! हें आलंकारिक भाषण आहे. 'भिंतीला पडावेंसें वाटलें' इत्यादि वाक्यें आपण नेहमीं बोलतोंच ना? या गोष्टींत शब्दाकडे लक्ष द्यावयाचें नाहीं, वाक्य–तात्पर्य पहावयाचें आहे, असें मी प्रथमच सांगितलें, तें तूं विसरलास वाटतें! असो; तात्पर्य असें आहे कीं आचार्यांच्या उपदेशानें ज्ञानी झालेला शिष्य 'मी स्वतःच्याच बुद्धीनें ज्ञानी झालों' असें वेड्यासारखें समजतो किंवा राजानें अनुग्रह केल्यामुळें एखादा सेवक महत्पदवीस चढला असतां माझ्याच सामर्थ्यानें मला हें पद व ही संपत्ति मिळाली असें बालिश-पणानें समजतो. त्याप्रमाणेंच पंचमहाभूतांना व इंद्रियांना वाटलें कीं, आपल्यास प्राप्त झालेलें महत्त्व आपल्याच सामर्थ्यानें आपल्यास मिळालें आहे! ह त्यांचें शुद्ध अज्ञान होतें. तसेंच, केव्हां केव्हां ज्ञानी पंडित सुद्धां ब्रह्मानुग्रहानें समर्थ झालेल्या इंद्रियांमध्यें तेज, बल, सामर्थ्य इत्यादि गुणधर्म पाहून असें समजतात कीं, हे तेजादि गुणधर्म इंद्रियांचेच आहेत. ज्याप्रमाणें इंद्रियादिकांस परब्रह्माचें

विस्मरण होतें त्याचप्रमाणें ज्ञाते लोकही केव्हां केव्हां परमेश्वरास विसरतात आणि अज्ञानानें इंद्रियांवर भलतेच आरोप करितात ॥ १ ॥ १४ ॥

मंत्र दुसरा (क्रमांक १५ वा.)

अन्वय व अर्थ पूर्वीप्रमाणेः—

(तत्) ब्रह्म (एषाम्) देवानां चेष्टितमिति शेषः (विजज्ञौ) विज्ञातवान् सर्वज्ञत्वात् पृथिव्यादिदेवान् मनुष्यास्तेजस्विनो बलवतो दृष्ट्वा तेषामेव महिमानं मंस्यन्ते इति सर्वज्ञत्वात् पूर्वमेव विज्ञाय) (तेभ्यः) देवेभ्यो देहिनां मिथ्याज्ञानं मा भूदिति (ह) निश्चयेन (प्रादुर्बभूव) तेष्वेव देवेषु प्रकटमभूत् । ते देवाः (इदम्) अस्मत्तेजोऽभिभावुकं (किम्) (यक्षम्) पूजनीयतमं वस्त्विति । यक्ष पूजायामित्यस्याजन्तः प्रयोगः (तत , न, व्यजानन्त) परोक्षगुणकर्मस्वभावं ब्रह्म नहि विज्ञातवन्तः । इदमुक्तं भवति यदा ब्रह्मचर्याद्याश्रमधर्मानुष्ठानेन ब्रह्मध्यानादिना वा तेजस्वीनीन्द्रियाणि जायन्ते तदा तेषामेव महत्त्वमिति बोधो जायते तन्न सम्यक्तस्यैव ब्रह्मणस्तेजसा सूर्यादीनामपि तेजोवत्त्वात् । अतः सूर्यादिगतमिन्द्रियगतं च सर्वं तेजो ब्रह्मण एवास्ति ॥ २ ॥ १५ ॥

सिद्धान्ती—सर्वज्ञ परमेश्वराला हें सर्व लागलींच समजलें. म्हणजे पंचमहाभूतांनीं व इंद्रियांनीं जे वेडेचार केले, ते ब्रह्मास समजले. तेव्हां पृथ्वादिकांस व त्यांच्या द्वारानें मनुष्यास झालेलें अज्ञान व अभिमान नाहींशीं व्हावीं, त्यांच्या मिथ्या–ज्ञानाचें निराकरण व्हावें, म्हणून परमेश्वर तेथें स्वतेजानें प्रकट झाला. हें विलक्षण व सर्वपराभवक तेज पाहून 'ही पूज्य वस्तु काय आहे ?' हें समजण्याची देवांस (इंद्रियादिकांस) इच्छा झाली. कारण ती वस्तूच तशी वंद्य स्वरूपाची होती. शिवाय, त्यांना परोक्ष (अप्रत्यक्ष) असणाऱ्या परमेश्वराचें व त्याच्या गुणकर्म–स्वभावाचें ज्ञानही मुळींच नव्हतें. हें देवाचें अभिमानत्व व मानवांचें अज्ञानत्व सर्वजाण ब्रह्माला अगोदर समजलें होतें. असो; सारांश, हें सांगावयाचें आहे कीं ब्रह्मचर्यादि आश्रम–धर्मांचें उत्तम अनुष्ठान केलें, परमेश्वराची धारणा, त्याचें ध्यान हीं एकाग्रतेनें केलीं म्हणजे सर्व इंद्रियें तेजस्वी होतात. हें झाल्यावर जीवांस असा भास होतो कीं, ह्या इंद्रियांची तेजस्विता इंद्रिय–तंत्र आहे. हा भास आहे. ही भ्रांति आहे. ही जाणीव खरी नव्हे. सूर्यादिकांच्या तेजामुळें कांहीं पदार्थ तेजस्वी दिसतात पण तें त्यांचें तेज सूर्यदत्त

असतें, स्वतःचें नसतें. त्याचप्रमाणें इंद्रियांस प्राप्त झालेलें तेज इंद्रियकृत नसतें, ब्रह्मदत्त असतें. फार काय सांगावें, सूर्यादि तेजोगोलकांचें तेज ही स्वकीय नसतें. त्यांस तें तेज ब्रह्मापासूनच मिळालेलें असतें. सारांश, सूर्याचें किंवा इंद्रियांचें तेज ब्रह्मदत्त आहे, ब्रह्माचें आहे, हें तात्पर्य येथें लक्षांत ठेवावयाचें आहे. ॥ २ ॥ १५ ॥

मंत्र तिसरा (क्रमांक १६ वा).

अन्वय व अर्थ पूर्वीप्रमाणेः—

(ते) चक्षुरादयो देवाः साश्चर्यम् (अग्निम्) कार्यकारणशक्त्याभेदमापन्नं चक्षुरिन्द्रियमिदम् (अब्रुवन्) हे (जातवेदः) जातं जायते वा वेदो ज्ञानं धनं वा यस्मात्तत्सम्बुद्धौ (एतत्, किम्) (यक्षम्) इत्येतत्त्वम् विजानीहि यथा कुत्रचिद्विषये साश्चर्यो विचारः प्रवर्तते तस्मिन् समुदाये प्रधानमेवं वदन्ति भवानेतद्वदत्विति । एवमत्रापि सर्वेन्द्रियेषु चक्षुषः प्राधान्यं तैजसत्वात् । चाक्षुषं तेजश्चेतनाविशिष्टं रूपग्रहणान्निरुद्धमन्तःकरणे बुद्धेः साहाय्येन परम्परयाऽऽत्मज्ञानस्य कथञ्चित्कारणं सम्भवदिति मत्वा ब्रह्मज्ञानायादेशः । आवृत्तचक्षुरमृतत्वमिच्छन्नित्युक्तत्वात् । यद्यपीन्द्रियेष्वयं व्यवहारो न सिध्यात यदन्यान्यचेतनानीन्द्रियाण्येकं चक्षुरादिकमिन्द्रियं यक्षं ज्ञातुं प्रार्थयेयुरिति । तथापि जीवात्मनः सर्वेन्द्रियविषयेष्वाविष्टत्वात्स एव चेतन इन्द्रियभेदभिन्नो व्यवहरतीति न कश्चिद्विरोधः ॥ १६ ॥

सिद्धान्ती—ते नेत्रादि देव आश्चर्ययुक्त होऊन नेत्राला म्हणाले,—

शिष्य—भगवन्! येथें मंत्रांत 'अग्नि' हे पद आहे आणि त्याचा आपण नेत्र असा अर्थ करितां हें कसें?

सिद्धान्ती—अग्नि हा तेजोरूपी असून पदार्थरूप अभिव्यक्त करणारा आहे. आपल्या नेत्रांस रूप दिसतें, त्याचें कारण अग्नितेज आहे. तेव्हां येथें कार्यालाच (नेत्राला) कारणाचा (अग्नीचा) व्यपदेश केला आहे, म्हणजे चक्षूला अग्नि असें म्हटलें आहे. कार्य-कारणामध्यें वस्तुतः भेदही नसतो. असो; ज्याच्यायोगानें ज्ञान होतें; त्या जातवेदाला म्हणजे नेत्राला दुसरीं इंद्रियें म्हणालीं.—

शिष्य—ज्यापासून ज्ञान किंवा धन उत्पन्न होतें, तो जातवेद होय.

सिद्धान्ती—ठीक. इंद्रियें नेत्रांस म्हणालीं, 'हें काय चमत्कारिक तत्त्व आहे, तें जाणून ये.' जेथें पुष्कळसा आश्चर्ययुक्त विचार चालत असतो, साशंक, ज्या समाजांत एखाद्या गोष्टीचा नीटसा उलगडा होत नाहीं, त्या समाजामध्यें प्रधानपुरुषालाच विचाराची मीमांसा करावयास सांगतात. हा सिद्धान्त मनांत ठेवून तेजस्वी नेत्राला, दुसऱ्या इंद्रियांनीं हें वरील काम सांगितलें.

शिष्य—नेत्र हा तेजोगोल आहे. त्याच्यामध्यें चैतन्य वास्तव्य करितें आणि रूप-ग्रहणानें तें विशिष्ट तेजस्वी चैतन्य इतर सर्व इंद्रियांपेक्षां नेत्रास श्रेष्ठ करितें. असो; हें तेज अंतःकरणामध्यें बुद्धीच्या साहाय्याने आत्मज्ञानाचें म्हणजे आत्मज्ञानाच्या उत्पत्तीचें थोडेसें कारण होतें. असो; नेत्र रूपग्राहक आहेत त्यामुळें परंपरेनें ते आत्मज्ञानाचें कारण होतात, म्हणून नेत्राला ही ब्रह्मजिज्ञासेची कामगिरी सांगितली. होय ना ?

सिद्धान्ती—ठीक. शिवाय श्रुतिही असें म्हणते कीं, ज्याला मोक्ष हवा आहे, त्यानें नेत्रनिमीलन केलें पाहिजे. म्हणजे डोळे झांकून बाहेरचे विषय निवृत्त केले पाहिजेत. सारांश, नेत्र हे आत्मज्ञानाचें जरी प्रत्यक्ष कारण नव्हेत, तरी परंपरेनें यांस कारणत्व प्राप्त होतेंच होतें. आतां अचेतन इंद्रियें अचेतन चक्षूला यक्ष-ज्ञानाविषयीं प्रार्थना करितात, असें यद्यपि आपल्यास व्यवहारांत दिसत नाहीं, तथापि सर्व इंद्रियांच्या विषयामध्यें व इंद्रियांमध्यें राहणारा एकच जीवात्मा असल्यामुळें तोच निरनिराळ्या इंद्रियांस अथवा निरनिराळ्या इंद्रियांच्या द्वारा आपणच व्यवहार करितो व व्यवहार करावयास लावतो. म्हणून येथें विरोध मानण्याचें कांहीं एक कारण नाहीं. असो; इंद्रियांहून जीव निराळा असून तो त्यांचा नियंता आहे, हें तुला सांगावयास नकोच.

शिष्य—पुढें वायुआदिकांची व्यवस्था या अग्नीप्रमाणेंच लावावयाची असेल.

सिद्धान्ती—ठीक अनुमान केलेंस. आतां पुढील कथाभाग ऐकः—अग्नीनें यक्षजिज्ञासेची कामगिरी स्वीकृत केली, हें ध्यानांत ठेवून पुढील मंत्र वाचावा. ॥ ३ ॥ १६ ॥

मंत्र चवथा (क्रमांक १७ वा).

अन्वय व अर्थ पूर्वीप्रमाणेः—

(तत्) (वै) निश्चयेन उद्भूतं तेजोरूपं ब्रह्म-[कर्म] (अभ्यद्रवत्) अभिमुखं प्राप्तवान्-अग्निरिति शेषः (तम्) जातवेदसम् (अभ्यवदत्) अभिमुखमुक्तवत् ब्रह्म कर्तृ इति शेषः ॥

त्वम् (कः) (असीति) तदुपरि (अहम्, अग्निरस्मीति)- (अहं, जातवेदाः, अस्मीति) (अब्रवीत्) यद्यपि ब्रह्मणो निराकारत्वात्केनचित्तस्य संवादो रूपवत इव न सम्भवति तथापि ब्रह्मविद्यास्तुत्यर्थं ब्रह्मणो दुर्विज्ञेयत्वज्ञापनार्थं चानभूतः सम्प्रज्ञातसमाधिदशायां भासितः संवादोऽनूद्यते ॥ १७ ॥

सिद्धान्ती—तो अग्नि लवकर लवकर त्या तेजस्वी वस्तूकडे गेला, तेव्हां अग्नीला समोर आलेला पाहून ब्रह्मानें त्यास विचारलें ' तूं कोण आहेस ? ' त्यानें सांगितलें ' मी जातवेद म्हणजे सर्वज्ञ व सर्व संपत्तिमान् आहें.'

शिष्य—निराकार ब्रह्म रूपवान् वस्तूप्रमाणे भाषण कसें करितें ?

सिद्धान्ती—हा सर्व ब्रह्मविद्या-स्तुतीचा प्रकार आहे. ब्रह्माचें ज्ञान होणें अति दुष्कर आहे, हें सांगण्यासाठीं व संप्रज्ञात समाधीमध्यें (सविकल्पकसमाधीमध्यें) मात्र हा संवाद होऊं शकतो, हे दाखविण्यासाठीं, हा संवाद उपयोजिला आहे. हा अर्थवाद आहे. ही स्तुति आहे, निराकार ब्रह्म वाद-प्रतिवाद केव्हांही करित नाहीं. ॥ ४ ॥ १७ ॥

मंत्र पांचवा (क्रमांक १८ वा).

अन्वय व अर्थ पूर्वीप्रमाणें,

तेजोमयं ब्रह्माब्रवीत् (तस्मिन्) उक्तनाग्नि (त्वयि) अग्नौ (किम्) (वीर्यम्) पराक्रमः सामर्थ्यम् । इत्येवमुक्तवादिव सोऽग्निरब्रवीद् (अपीदं, सर्वं दहेयम्) अत्र " अपि " सम्भावनायाम् । यदिदं पृथिव्यामिति ॥ १८ ॥

सिद्धान्ती—तेजोमय ब्रह्मानें त्याचें नांव ऐकल्यासारखें केलें आणि पुनः त्यास विचारलें कीं, ' तुझा पराक्रम कोणत्या स्वरूपाचा आहे ? ' तो अग्नि म्हणाला ' ' या पृथ्वीवर जें काय आहे तें मी आपल्या स्वतःच्या सामर्थ्यानें एका क्षणांत भस्म करून टाकीन. माझें सामर्थ्य मात्र पूर्ण भरतीला आलें पाहिजे. असो; हां हां म्हणतां हें सर्व विश्व व त्यांतील पदार्थ मी एका क्षणांत भस्म करीन. ॥ ५ ॥ १८ ॥

मंत्र सहावा (क्रमांक १९ वा.)

(तस्मै) अग्नये ब्रह्म (तृणम्) (निदधौ तदग्रे स्थापितवत् । संस्थाप्य च (एतत्) (दह) इत्यवोचदिव, अग्निः (तत्) तृणम् (सर्वजवेन) सर्वोत्साहेन वेगेन च (उपप्रेयाय) प्राप्य तृणसमीपं गत्वा (तत्) तृणम् (दग्धुम्) (न, शशाक) न समर्थोऽभूत् । (सः, ततः, एव) तृणदहनकर्मण एव (निववृते) निवृत्य च देवानुक्तवान् (नैतदशकं विज्ञातुं यदेतद् यक्षमिति) ब्रह्माग्रे तृणमात्रमपि सामर्थ्यमग्न्यादिषु नास्तीत्युक्तं भवति । एवमनन्तसामर्थ्यवद् ब्रह्मास्तीत्यभिप्रायः ॥ १९ ॥

सिद्धान्ती—मग अग्नीच्यापुढें एक गवताची काडी ठेवून ब्रह्म म्हणालें 'ही जाळून टाक, पाहूं.' तेव्हां अग्नि आपला सर्वोत्साह व सर्व वेग जमवून त्या तृणाला जाळण्यासाठीं जवळ गेला व त्यानें आपलें सर्व सामर्थ्य खर्ची घातलें; पण त्याला तें जाळतां येईना ! निराश होऊन त्या दहन-कर्मापासून तो लज्जावृत्तीनें परावृत्त झाला आणि आपल्या नित्याच्या स्थानावर जाऊन तो इतर देवांस म्हणाला 'ही तेजस्वी वस्तु काय आहे, हें मला सांगतां येत नाहीं.'

शिष्य—म्हणजे यावरून हें सिद्ध झालें कीं, अग्नीला स्वतःच्या सामर्थ्यानें एक गवताची काडी देखील ब्रह्मासमोर जाळितां येत नाहीं ! सर्वव्यापी ब्रह्म आपल्यासमक्ष असतां व त्याच्या देखत एक सुद्धां कार्य स्वतःच्या सामर्थ्यानें सिद्धीस नेण्याची आपल्या स्वतःला शक्ति नाहींना ? सारांश, ब्रह्माचें सामर्थ्य अनंत आहे, हें येथें साधकानें समजून घ्यावें होय ना ?

सिद्धान्ती—आपल्या जवळ असलेलें सर्व सामर्थ्य ब्रह्माचें आहे, हेंही विसरूं नये ॥ ६ ॥ १९ ॥

मंत्र सातवा (क्रमांक २० वा).

(अथ) अग्निसामर्थ्यज्ञानानन्तरम् (वायुम्) अवशिष्टदेवेषु समर्थं बलवन्तम् (अब्रुवन्) अग्न्यादयो देवा इति शेषः । हे (वायो !) त्वम् (एतत्) विजानीहि किमेतत्-यक्षमिति) शीतोष्णज्ञानं त्वगिन्द्रियस्य विषयः । प्रकृतिपुरुषविशिष्टस्यैवेन्द्रियस्य ज्ञानशक्तिः सम्भवति । तत्र स्पर्शगुणो वायुस्तत उत्पन्नं त्वगिन्द्रियं तद्गुणभूतमिति प्रकृतिशक्तिः । आत्मा मनसा

संयुज्यते मन इन्द्रियेणेन्द्रियमर्थेनेति पुरुषशक्तिमविन्द्रियं चेतनवद्भाति ॥ २० ॥

सिद्धान्ती—याप्रमाणें अग्नीचा पराभव झाल्यानंतर अवशिष्ट देवांत विशेष समर्थ असा जो वायुदेव त्याला याच कामगिरीवर देवांनीं पाठविलें.

शिष्य—शीतोष्णाचें ज्ञान स्पर्शेंद्रियानें होतें आणि वायु स्पर्श-ज्ञानाची देवता आहे. प्रकृतिपुरुषविशिष्ट जर इंद्रिय असेल तर मात्र त्याला ज्ञान होतें. इतरथा त्याला विषयाचें ज्ञान होत नाहीं.

सिद्धान्ती—याप्रमाणें वायु हाही प्रकृतीची एक शक्ति आहे. असो; आत्म्याचा मनाशीं, मनाचा इंद्रियाशीं, आणि इंद्रियाचा विषयाशीं संयोग झाला म्हणजे ज्ञानाची प्राप्ति होते. आपलीं सर्व इंद्रियें, मन आणि बुद्धि हीं चैतन्याच्या साहाय्यानें मात्र ज्ञान संपादण्यास प्रवृत्त होतात. सारांश, प्रकृतिशक्ति वायु आणि चैतन्यदत्त संयोग ही प्रकृतिपुरुषांचीं जोडी सिद्ध होते, तेव्हां इंद्रियांस ज्ञानग्रहणाचें सामर्थ्य येतें ॥ ७ ॥ २० ॥

मंत्र आठवा (क्रमांक २१ वा.)

(अथ) स वायुः (तत्) ब्रह्म (अभ्यद्रवत्) अभिमुखमाप्तवान् (तम्) वायुम् (त्वम्, कः, असि, इति) ब्रह्म (अभ्यवदत्) सः (वै) निश्चयेन (अहम्, वायुः, अस्मि, इति) (वै) निश्चयेन (अहम्, मातरिश्वा, अस्मि, इति) च (अब्रवीत्) अत्र वायुशब्देन सर्वत्र त्वगिन्द्रियमुपलक्ष्यते । द्वयोः कार्यकारणयोः सामर्थ्यस्य भेदविवक्षाया अभावात् ॥ २१ ॥

सिद्धान्ती—आपल्याकडे वायु शीघ्रवेगानें आल्यावर ब्रह्मानें त्याला विचारिलें, तेव्हां त्यानें आपलें 'वायु' असें नांव सांगितलें. आपल्यास 'मातरिश्वा' म्हणतात असेंही वायु म्हणाला.

शिष्य—मातरिश्वा म्हणजे आकाशांत भ्रमण करणारा वायु. होय ना ?

सिद्धान्ती—होय आणि, वायु म्हणजे स्पर्शेंद्रिय ! तेथेंही पुनः कार्य-कारणाचा अभेद करून स्पर्शेंद्रियाला 'वायु' असें म्हटलें आहे ॥ ८ ॥ २१ ॥

मंत्र नववा (क्रमांक २२ वा.)

वायुं प्रति ब्रह्माब्रवीत् (तस्मिन्, त्वयि) (किम्, वीर्यम्) किंभूतः पराक्रमोऽस्तीति । तदुपरि वायुराह-(यदिदम्) चराचरं जगत् (पृथिव्याम्) दृश्यते (इदम्, सर्वम्, अपि आददीयम्, इति) इत्थंभूता मयि शक्तिरस्तीति ॥ ९ ॥ २२ ॥

सिद्धान्ती—'तुझा काय पराक्रम आहे ?' असें विचारल्यावर वायूनें ब्रह्माला सांगितलें कीं जगांतील कोणत्याही चराचर वस्तूचें ग्रहण करण्याला व ती घेऊन जाण्याला मी समर्थ आहें. ॥ ९ ॥ २२ ॥

मंत्र १० वा (क्रमांक २३ वा).

ब्रह्म (तस्मै) वायवे (तृणं निदधौ) निधाय च (एतत्, आदत्स्व, इति) आह (तत्) तृणम् आदातुं वायुः (सर्वजवेन) पूर्णवेगेन (उपप्रेयाय) तृणसमीपं गतवान् (तत्) तृणम् (आदातुं, न, शशाक) (सः) वायुः (तत एव) तृणसमीपात्तदानीमेव (निववृत्ते) निवृत्तः । निवृत्य चाहम् (यत्) (एतत्, यक्षम्, इति) प्रत्यक्षं प्रवृद्धं किं किम्प्रकारकं वेत्येवम् (एतत्, विज्ञातुं न अशकम्) न ह्येनद्विज्ञातुं शक्नोमीति । ब्रह्मापेक्षया वायावपि तृणमात्रं सामर्थ्यन्नास्तीत्याशयः ॥ २३ ॥

सिद्धान्ती—ब्रह्मानें त्याला पूर्वीचेंच तृण ग्रहण करावयास सांगितलें. तेव्हां लवकर लवकर जवळ जाऊन वायूनें आपलें शक्तिसर्वस्व खर्ची घातलें व तें तृण उचलण्याचा प्रयत्न केला, पण तो सर्व निष्फल झाला. तेव्हां निराश होऊन 'ती तेजस्वी व गंभीर वस्तु काय आहे ! कसली आहे ! हें मला समजणें शक्य नाहीं' असें देवांजवळ जाऊन वायु अग्नीप्रमाणेंच म्हणाला. सारांश, वायूला एक गवताची काडी हालविण्याचें सुद्धां स्वतःचें सामर्थ्य नाहीं, ब्रह्म-सहायानें मात्र सर्व चराचर वस्तु आपापलीं कार्यें करण्यास समर्थ होतात, असें येथेंही ठरलें. ॥ १० ॥ २३ ॥

मंत्र अकरावा (क्रमांक २४ वा).

(अथ) वायोः सामर्थ्यज्ञानानन्तरं देवा भौतिकशक्तिधारीणीन्द्रियाणि हे (मघवन्) ऐश्वर्यवन् त्वम् (एतत्) प्रत्यक्षमुद्भूतं वस्तु (विजानीहि) (एतत्) (किम्, यक्षम्, इति,) एवम्प्रकारेण विजानीहीति पूर्वेणान्वयः । (इन्द्रम्) जीवात्मानमिन्द्रियाधिष्ठातारम् (इन्द्रस्य जीवात्मनो लिङ्गं चिह्नमिन्द्रियमिति निर्वचनादिन्द्रो जीवात्मा इन्द्रियैर्विषयान् बुध्यमानस्यैव जीवात्मनोऽस्तित्वं प्रतीयतेऽन्यथा मृत इत्युच्यतेऽत इन्द्रियाणि जीवात्मनो लिङ्गानि) एतमुक्तप्रकारेण (अब्रुवन्) उक्तवन्तः । तदेन्द्रः (तथेति) स्वीकृत्य (तत्) ब्रह्म (कर्म) (अभ्यद्रवत्) अभिमुखं गतवान् (तस्मात्) इन्द्रगमनकारणादेव (तिरोदधे) अन्तर्हितमभूत् । न तत्र यक्षमदृश्यतेन्द्रेण । इदमुक्तं भवति–अयं कथञ्चिच्छुद्धान्तःकरणः सिद्धसाधनश्चेज्ज्ञातुं शक्नुयादिति मत्वाऽस्य जीवात्मनोप्यऽभिमाननिराकरणाय तद्गोचरीभूतमाश्चर्यजनकं वैद्युतमिव तेजस्तिरोभूतम् ॥ २४ ॥

सिद्धान्ती—याप्रमाणें अग्नीचा आणि वायूचा पराभव झाल्याबरोबर सर्व भौतिक शक्ति धारण करणारीं इंद्रियें इंद्रास म्हणालीं, हे ऐश्वर्यवान् देवा ! ही अद्भुत वस्तु काय आहे ! हें समजण्यास तूं मात्र समर्थ आहेस; म्हणून तूंच प्रत्यक्ष जा आणि काय आहे तें पाहून ये.

शिष्य—भगवन् ! येथें इंद्र शब्दानें कोणाचा निर्देश केला आहे ?

सिद्धान्ती—इंद्र म्हणजे सर्व इंद्रियांचा अधिष्ठाता जीवात्मा होय.

शिष्य—हा अर्थ कसा सिद्ध होतो ?

सिद्धान्ती—इंद्रियें हीं जीवात्म्याचीं चिन्हें आहेत म्हणजे जोंपर्यंत इंद्रियांच्या द्वारानें विषयाचें ज्ञान होतें, तोंपर्यंत जीवाचें अस्तित्व प्रस्थापित होतें. हें ज्ञान होईनासें झालें म्हणजे तो पंचत्व पावला असें म्हणतात. इंद्रियादि चिन्हांनीं मात्र ओळखितां येतो म्हणून जीवाला इंद्र असें म्हटलें आहे; असो, इंद्रियांनीं सांगितल्यावरून इंद्र ' बरें ' म्हणाला आणि ब्रह्मवस्तूकडे धांवत गेला; म्हणून ती वस्तु एकदम अंतर्धान पावली. इंद्र आला म्हणून ती वस्तु अदृश्य झाली. इंद्राला तेथें कांहीं दिसेना.

शिष्य—हें सांगण्याचा भावार्थ काय ?

सिद्धान्ती—ज्याचें अंतःकरण शुद्ध आहे व ज्याचीं ज्ञान–साधनें सिद्ध आहेत, त्याला मात्र ज्ञान होतें. जीवात्म्याला–इंद्राला–अभिमान होता तो नाहींसा

करण्यासाठीं तें प्रकट झालेलें विद्युत्प्रकाशक तेज तेथल्या तेथेंच विजेप्रमाणें एका क्षणांत अदृश्य झालें. अभिमान असला म्हणजे ज्ञान होत नाहीं, हें सांगण्याचा उद्देश आहे. ॥ ११ ॥ २४ ॥

मंत्र बारावा (क्रमांक २५ वा).

अन्वय व अर्थ पूर्वीप्रमाणेः—

(सः) इन्द्रो जीवात्मा (तस्मिन्, एव) यत्रोद्भूतं तिरोभूतं च यक्षं तत्रैव (आकाशे) हृदयान्तरिक्षे (हैमवतीम्) सुवर्णालङ्कारयुक्तामिव बहुशोभमानाम्। अत्यन्तशोभायुक्ताम् (उमाम्) ब्रह्मविद्यारूपां ब्रह्मज्ञानतत्परां सूक्ष्मां बुद्धिम् (स्त्रियम्) कामुकः स्त्रीमिव (आजगाम) प्राप्तवान् ' उमा ब्रह्मविद्या । ' इति तैत्तिरीयोपनिषत् प्र० १ अ० ४८। (दृश्यते त्वग्र्यया बुद्धया सूक्ष्मया सूक्ष्मदर्शिभिः) इति कठोपनिषत्प्रमाणाच्च। सूक्ष्मा बुद्धिर्ब्रह्म द्रष्टुं समर्था इति (मत्वा) इन्द्रः (ताम्, उमाम्,) (उवाच) (ह) खेदेन (किम्, एतत्, यक्षम्, इति) ॥ १२ ॥ २५ ॥

॥ इति तृतीयः खंडः ॥ ३ ॥

सिद्धान्ती—त्या इंद्राला (जीवात्म्याला) एक सु-वर्णालंकृत, अति सुंदर आणि सुवर्णालंकारांनीं विभूषित केल्याप्रमाणें अत्यंत शोभायमान अशी ब्रह्मविद्यारूपी सूक्ष्म बुद्धि तेथेंच उमारूपानें प्रकट झाली. ज्या हृदयाकाशांत ती चमत्कारिक वस्तु प्रकट होऊन, तिरोधान पावली होती, [दिसून नाहींशी झाली होती] तेथेंच ही त्रिभुवनसुंदरी इंद्राला दिसली. तिला पाहून तो इंद्र त्या उमा नामक ब्रह्मविद्येकडे जाता झाला. तरुण पुरुष सुंदर स्त्रीकडे जसा आतुरतेनें जातो, तसा हा आतुर जीवात्मा त्या ब्रह्मविद्येला विद्येसाठीं शरण गेला.

शिष्य—उमा म्हणजे ब्रह्मविद्या हें आपण कसें ठरविलें ?

सिद्धान्ती—उमा ही ब्रह्मविद्या आहे, हें तैत्तिरीय उपनिषदांत सांगितलें आहे. [प्र० १ अ० ४८] तसेंच, ' सूक्ष्म पाहणाऱ्या ब्रह्मजिज्ञासु योग्याच्या सूक्ष्म बुद्धीला मात्र ब्रह्मस्वरूपाचें आकलन करितां येतें, असें कठोपनिषदांत सांगितलें आहे. असो; इंद्र उमेजवळ गेला; आणि तिला विचारता झाला, कीं ' हे देवि ! येथें प्रकट झालेली व मी आल्यावर हर ! हर ! एकदम अंतर्धान पावलेली अद्भुत वस्तु काय होती ? हें मला कृपा करून सांगशील काय ? मी सर्वथा अनाथ आहें.' ॥ १२ ॥ २५ ॥

तिसरा खण्ड समाप्त.

खंड ४ था.

मंत्र पहिला (क्रमांक २६ वा).

(सा) उमा (ह) प्रसिद्धौ तदुद्भूतं तेजोमयं यक्षम् (ब्रह्म) अस्ति इति (उवाच) (वै) निश्चयेन (विजये) स्वस्यैवाभिमते (ब्रह्मणः) ब्रह्मणो विजये (एतत्) (महीयध्वम्) महीयमानं प्राप्नुत ब्रह्मसेवया महान्तो भवत । अर्थादेतन्महत्त्वं ब्रह्मण एवास्ति (ततः) तस्मादुमाकृतोपदेशात् (ह, एव) (ब्रह्म, इति, विदाञ्चकार) यक्षं ब्रह्मैवास्तीति विज्ञातवान् । अव्ययद्वयं सर्वथास्वातन्त्र्यनिवृत्यर्थम् । अर्थादिन्द्रोऽपि बुद्धिमन्तरा ब्रह्मात्मानं ज्ञातुमशक्त इत्युक्तं भवति । सर्वस्योपरि विजयो महत्त्वं च ब्रह्मण एवाऽस्ति न तस्य कश्चिदध्यक्षः समो वा विद्यते इत्यपि सूच्यते ॥ १ ॥ २६ ॥

सिद्धान्ती—'उमा' नामक ब्रह्मविद्या म्हणाली: 'ती प्रकट झालेली तेजोमूर्ति ब्रह्मस्वरूपाची होती. तुम्हीं सर्व लोक ध्यानांत ठेवा कीं, ब्रह्माचा विजय झाला, ब्रह्माचा महिमा वाढला, म्हणजे तुम्हांस इष्ट असणारा विजय मिळेल आणि तुमचाही महिमा वाढेल. ब्रह्माची सेवा करून तुम्हाला मोठेपणा मिळेल, स्वतःचा महिमा वाढवून तुम्हांला मोठेपण मिळणार नाहीं. हा सर्व महिमा ब्रह्माचा आहे. समजलें ? हा उमाकृत उपदेश ऐकल्यावर तें प्रकट व गुप्त झालेलें अद्भुत रूप ब्रह्माचें होतें असें जीवास समजलें.

शिष्य—येथें 'ह' व 'एव' हीं दोन अव्ययें कशाला ?

सिद्धान्ती—सर्वांचा स्वातंत्र्याभिमान निश्चयानें नाहींसा करण्यासाठीं दोन अव्ययांची योजना झाली आहे. असो; प्रत्यक्ष इंद्राला सुद्धां ब्रह्मबुद्धीशिवाय ब्रह्मज्ञान करून घेण्याचें सामर्थ्य नव्हतें. तसेंच, सर्व विजयत्व व सर्व महत्त्व एका सर्वशक्ति व सर्वगुणसंपन्न ब्रह्माचीं मात्र आहेत. तें सर्वश्रेष्ठ व सर्वाध्यक्ष आहे. त्याच्या जोडीस दुसरें कोणीही नाहीं. हें सर्व सुचविण्याचा उद्देश आहे ॥ १॥ २६॥

मंत्र दुसरा (क्र० २७ वा).

(अग्निः, वायुः) कारणशक्त्यभिज्ञे त्वक्चक्षुषी देवौ (इन्द्रः) तृतीयो जीवात्मा (ते, हि) एते त्रयो हि (एनत्) पूर्वोक्तं यक्षरूपमुद्भूतं तेजः (नेदिष्ठम्) अत्यन्तसमीपम् (पस्पृशुः) स्पृष्ट-

वन्तः (ते, हि) अग्न्यादयः (एनत्) उक्तं यक्षम् (प्रथमः) अन्यापेक्षया पूर्वम् । क्रियाविशेषणमिदम् । लिङ्गव्यत्ययः (विदाञ्चकार) विदांचक्रुः । इन्द्र उमाद्वारा इन्द्रद्वारा चाग्निवायू इति शेषः । अत्र वचनव्यत्ययः । यत इमे पूर्वं ब्रह्म ज्ञातवन्तः (तस्मात्) अत एव कारणात् (एते) अग्न्यादयः (देवाः) व्यवहारसाधनानीन्द्रियाणि (अन्यान्, देवान्) श्रोत्रादीन् (अतितराम्) अतिक्रम्य प्रशस्ता बभूवुः । त्वक्चक्षुषोर्जीवात्मनश्च मुख्यत्व आदौ यक्षरूपब्रह्मसम्बन्ध एव कारणमित्यर्थः ॥ २ ॥ २७ ॥

सिद्धान्ती—याप्रमाणें अग्नि वायु ह्या कारणशक्तींशीं अभिन्न असणारीं कार्यरूपी नेत्र–स्पर्शेंद्रियें आणि तिसरा इंद्र म्हणजे जीवात्मा या तिघां देवांसही पूर्वोक्त ब्रह्मस्वरूपाचें अपूर्व तेज स्पष्ट दिसलें. अथवा त्या तेजाचा या देवांस प्रत्यक्ष स्पर्श झाला. कारण तें यांच्या अत्यंत समीप होतें. अर्थातच इतर देवांच्या (इंद्रियांच्या) अगोदर ब्रह्मस्वरूप त्यांस साक्षात्कृत झालें, उमेच्या सहायानें इंद्राला आणि इंद्राकडून अग्नि–वायूंना हें स्वरूप समजलें आणि ज्याअर्थी नेत्र, स्पर्शेंद्रिय व जीवात्मा यांस अगोदर ज्ञान झालें, त्याअर्थी जीवात्म्यासह नेत्र स्पर्शेंद्रियें इतर देवांहून (व्यवहार करणाऱ्या श्रोत्रादि इंद्रियांहून) श्रेष्ठ–तर–आहेत असें झालें. स्पर्शेंद्रिय, नेत्रेंद्रिय आणि जीवात्मा हीं शरीरांतील मुख्य अंगें आहेत आणि म्हणून त्यांस यक्षरूपी ब्रह्माची प्रथम ओळख झाली.

शिष्य—भगवन्! येथें 'प्रथमः' म्हणजे पहिल्यांदा असा अर्थ आहेना? तसेंच 'विदांचकार' हा एकवचनी प्रयोग अनेकवचनार्थी आहे ना?

सिद्धान्ती—ठीक. त्वक्, नेत्र, वक्त्र, जीव हे निरनिराळे घ्यावे. ॥२॥२७॥

मंत्र तिसरा (क्र० २८ वा).

यतः कारणात् (इन्द्रः) जीवात्मा (एनत्) आविर्भूतं यक्षस्वरूपं ब्रह्म (नेदिष्ठम्) अतिसमीपम् (पस्पर्श) (प्रथमः) पूर्वम् (सः, हि) इन्द्र एव इदं यक्षम् (ब्रह्मेति, विदाञ्चकार) विवेद (तस्मात्) कारणात् (अन्यान्) अग्न्यादीन् (देवान्) (वै) निश्चयेन (अतितराम्) अतिक्रान्तवान् । अर्थात् सर्वदेवेषु पूज्यः श्रेष्ठो बहुमान्य आसीत् ॥ ३ ॥ २८ ॥

सिद्धान्ती—तसेंच जीवात्म्याला अति जवळ असणाऱ्या ब्रह्मस्वरूपाचें ज्ञान प्रथम झालें.

शिष्य—म्हणजे इंद्राला त्या सर्ववंद्य ब्रह्मस्वरूपाचें ज्ञान झालें. होयना ? 'तें ब्रह्म होतें' असें स्वरूपज्ञान प्रथम इंद्राला व मग अग्निवायूंस झालें.

सिद्धान्ती—इंद्र म्हणजे जीवात्मा हें ध्यानांत ठेव. असो; जीवात्म्याला हें ज्ञान प्रथम झालें म्हणून तो नेत्रेंद्रियांपेक्षां व स्पर्शेंद्रियांपेक्षां अधिक श्रेष्ठ होता, असें ठरलें. सर्व इंद्रियांहून श्रेष्ठ म्हणून जीवात्मा त्यांस पूज्य असलाच पाहिजे. ॥ ३ ॥ २८ ॥

मंत्र चवथा (ऋ० २९ वा).

उक्तार्थमेव द्रढयितुमाह (तस्य) उक्तस्याविर्भूतस्य तिरोभूतस्य च ब्रह्मणः (एषः) प्रत्यक्षः (आदेशः) उपमयोपदेशः (विद्युतः) तडितस्तेजःस्वरूपं ज्योतिः (व्यद्युतत्, आ) व्यद्योतिष्टेव । आ इत्युपमार्थे । (इति) इत्थम्भूत आदेशः (इति) एवं वदन्ति (न्यमीमिषत्, आ) अत्राप्याकार उपमार्थे । यथा चक्षुर्निमेषं करोति तथाऽयं प्रादुर्भावतिरोभावरूप आदेशः (इति) एवम्प्रकारकम् (अधिदैवतम्) देवताविषयं व्याख्यानं ब्रह्मणोऽस्ति । यथा विद्युत् क्षणमात्रं नेत्रतेजसोऽभिभवित्री दृश्या भूत्वाऽन्तर्हिता भवति यथा वा चक्षुष उन्मीलने निमेषमात्रं किञ्चिदत्यल्पकालमाश्चर्यरूपं दृश्येत निमीलने च सद्यस्तिरोभवेत्तथैव नेत्रादीन्द्रियदेवतेजोभिभावुकस्य ब्रह्मणः प्रकाशतिरोभावाभ्यामुपदेशोऽस्तीति भावः ॥ ४ ॥ २९ ॥

सिद्धान्ती—हा पाठीमागील मंत्रांत सांगितलेला अर्थ दृढ करण्यासाठीं श्रुति दोन उपमा घेऊन तोच अर्थ अन्यरूपानें सांगत आहे. प्रत्यक्ष दिसून गुप्त झालेल्या ब्रह्माला विजेची उपमा कांहीं अंशांनीं मात्र शोभते. तेजस्वी विजेचें स्वरूप जसें एकदम प्रकट होऊन नाहींसें होतें, त्याच्या अनंतपट तेजानें ब्रह्म प्रकट होऊन नाहींसें झालें. किंवा डोळा उघडून तो मिटावा हा प्रकार होण्याला एक क्षण सुद्धां पुष्कळ होतो, पण ब्रह्मस्वरूपाचा प्रादुर्भाव व तिरोभाव एक अनंतांश क्षणामध्यें झाला. या आधिदैविक उपमा आहेत, असें ब्रह्मशास्त्रांत निपुण असलेले पंडित म्हणत असतात. वीज एक क्षणमात्र चमक दाखवून नेत्र–तेजाला दिपविते आणि एकदम नाहींशी होते, किंवा डोळा उघडून लागलीच मिटला जातो. हीं जशीं तेजाचीं अल्प काल राहणारीं आश्चर्यें आहेत, त्याच्या अनंतपट तेजानें विशिष्ट असणाऱ्या आणि त्याच्या अनंतपट वेगानें अलंकृत झालेल्या ब्रह्माचें या मंत्रांत वर्णन केलें आहे.

हें ब्रह्मतेज सर्व नेत्रादिकांस, त्यांच्या देवतांस, व जीवात्म्यास आपल्या तेजोबलानें पाठीमागें टाकणारें आहे. म्हणून यांस ब्रह्मस्वरूपाचें ग्रहण करितांच यावयाचें नाहीं. पण कांहीं तरी समजूत पडावी म्हणून विजेच्या उदयास्तार्ची व नेत्रोन्मेष-निमेषार्ची (नेत्र उघडून झांकण्यार्ची) उदाहरणें दिलीं आहेत. हीं देवता संबंधार्ची दोन्ही उदाहरणें आहेत म्हणून हा उपदेश आधिदैविक आहे. ॥ ४ ॥ २९ ॥

मंत्र पांचवा (क्रमांक ३० वा).

(अथ) आधिदैविकोपदेशानन्तरम् (यत्, एतद्) उक्तगुणविशिष्टं ब्रह्म प्रति (मनः) कर्तृ (गच्छति, इव) इति ध्यायेदिति शेषः (च) समुच्चये (अनेन) मनसा ब्रह्म (उपस्मरति) समीपतः स्मरति लेट् स्मरेदित्यर्थः । (संकल्पः) अन्तःकरणस्य निश्चयात्मिका वृत्तिश्च (अभीक्ष्णम्) मुहुर्मुहुर्ब्रह्मविषया कार्या । एतत्सर्वम् अध्यात्मं आत्मन्यन्तःकरण विवेचनम्। ब्रह्मजिज्ञासुर्दुःखान्मुमुक्षुः पुरुष एवं ध्यायेत्-मदीयं मनो ज्योतीरूपं ब्रह्म प्रति गच्छतीव मम संकल्पः सदैव ब्रह्मप्राप्तय उद्युक्तः स्यादहं च तन्मनाः सन् नित्यं ब्रह्मैव स्मरेयमिति भावः ॥ ५ ॥ ३० ॥

सिद्धान्ती—या मंत्रांत अध्यात्म दृष्टीनें उपदेश केला आहे. जीवानें असें ध्यान करावें कीं ' माझें मन पूर्वोक्त गुणसंपन्न ब्रह्मस्वरूपाकडे जणुं कांहीं धांव घेत आहे.' तसेंच, मनानें सर्वदा ब्रह्माचें स्मरण करावें. तें ब्रह्म आपल्या जवळ आहे, असा निश्चय ठरवावा. शेवटीं आपल्या अंतःकरणांत जी निश्चयात्मिका बुद्धिवृत्ति आहे ती वारंवार ब्रह्मविषय करावी. म्हणजे निरंतर ब्रह्मस्वरूपाचें ध्यान करित असावें. अंतःकरणाचें साहाय्य घेऊन ब्रह्माचें चिंतन अखंड करावें, असा उपदेश येथें आहे म्हणून त्याला 'आध्यात्मिक' उपदेश असें म्हटलें आहे. ज्याला ब्रह्मज्ञान संपादावें अशी इच्छा आहे आणि दुःखापासून मुक्त व्हावें, असें ज्याला वाटतें, त्यानें रात्रंदिवस असें ध्यान करावें कीं ' माझें मन तेजस्वी ब्रह्माकडे धांव घेत आहे. आणि माझा संकल्प सदासर्वदां ब्रह्मप्राप्तीचा प्रयत्न करित असावा. सारांश मला नित्य ब्रह्माचें स्मरण होत असावें. ' सारांश जीवानें सदैव ब्रह्मचिंतन करावें, हा भावार्थ आहे. ॥ ५ ॥ ३० ॥

मंत्र सहावा (क्रमांक ३१ वा).

(तत्, ह) प्रसिद्धं पूर्वोक्तं ब्रह्म (तद्वनम्) तेषां तैर्वा विद्वद्भिर्दुःखान्मुमुक्षुभिः प्राणिभिर्वनं वननीयं भजनीयं सेवनीयमिति (नाम) प्रसिद्धम् । उक्तकारणात् (तद्वनम्) एतन्नामकं ब्रह्म (इति) एवम्प्रकारेण उपासितव्यम्) मनुष्यैरितिशेषः (सः, यः) मनुष्यः (एतत्) ब्रह्मणः (एवम्) उक्तप्रकारेणोपासनम् (वेद) (अभि) सर्वतो जानाति (एनम्) उक्तमुपासकम् (सर्वाणि) (भूतानि) (संवाञ्छन्ति, ह) निश्चयेनाभिलषन्ति ॥ ६ ॥ ३२ ॥

सिद्धान्ती—जें मी तुला आतांपर्यंत ब्रह्मस्वरूप सांगितलें आहे त्याचें उपासन विद्वान् लोकांनीं केलें पाहिजे. ज्यांना या संसाराच्या तापत्रयांतून मुक्त व्हावयाचें आहे, त्यांनीं ब्रह्माची सेवा करावी, हें योग्यच आहे. कारण ब्रह्मसेवेनें सर्व शोक-मोहांचा व तत्कारणांचा अस्त होतो. असो; या ब्रह्माची आतांच सांगितल्याप्रमाणें सर्व मनुष्यांनीं 'तद्वन' नामानें उपासना करावी. याप्रमाणें ब्रह्मस्वरूपाचें ज्ञान ज्याला झालें व तद्वनाची उपासना करावी हें पूर्णत्वानें समजलें त्या विद्वान् पुरुषाची संगति करावी, असें सर्व मनुष्यांस निश्चयपूर्वक वाटूं लागतें. सारांश, सर्व लोक त्याची स्तुति करूं लागतात आणि विद्वान् लोक ज्या ब्रह्माची उपासना करितात तें ब्रह्मही भक्तवत्सल आहे, अशी सर्वत्र कीर्ति होते आणि इष्ट अशा ब्रह्मोपासनेला प्रारंभ होतो.

शिष्य—भगवन् ! 'तद्वनं' म्हणजे ?

सिद्धान्ती—'तत्' म्हणजे तें 'वनं' म्हणजे वंद्य व उपास्य होय. सर्ववंद्य हें ब्रह्माचें एक नांव आहे. त्यालाच 'तद्वन' म्हणावें ॥ ६ ॥ ३१ ॥

मंत्र सातवा (क्रमांक ३२ वा).

अस्यामुपनिषदि प्रारम्भाद्गुरुशिष्यसंवादः प्रवृत्तः स एवोपसंहारे पुनः प्रदर्श्यते । शिष्यः (इति) एवम् आह (भोः) आचार्य ! (उपनिषदम्) ब्रह्मविद्याम् (ब्रूहि) वद । आचार्य आह (ते) तुभ्यम् (उपनिषत्) ब्रह्मविद्या (उक्ता) पूर्वं या ब्रह्मविद्योक्ता तत्र यदि किमप्यवशिष्टं तद्वदेति शिष्याभिप्रायः पूर्णतया मया ब्रह्मविद्योक्ता न तत्र किमप्यवशिष्टमित्याचार्यस्याशयः । तदेव द्रढयितुं पुनराह (वाव) निश्चयेन (ते) तुभ्यम् (ब्राह्मीम्) ब्रह्मसम्बन्धिनीम् (उपनिषदम्) (अब्रूम) उक्तवन्तः (इति) पूर्णम् । नात्र किमपि वक्तव्यमिति भावः ॥ ७ ॥ ३२ ॥

सिद्धान्ती—ह्या उपनिषदाच्या प्रारंभीं जो गुरुशिष्यांचा सुखकर संवाद झाला आहे, त्याचाच उपसंहार त्यांच्या संवादरूपानें पुनः येथें अवतारिला आहेः—त्याचें वर्तमान गुरुशिष्यांच्या संवादरूपानें तुला सांगतों तें ऐक.

साधक म्हणतो कीं 'अहो आचार्य, मला ब्रह्मविद्येचा उपदेश करा' आचार्यांनीं सांगितलें 'तुला ब्रह्मविद्या पूर्वीच सांगितली आहे.'

शिष्य—म्हणजे साधकाचा अभिप्राय असा कीं 'हे आचार्य! जी आपण मला विद्या सांगितली त्यांत कांहीं सांगावयाचें राहिलें असेल तर तें सांगावें' हाच ना त्याचा आशय?

सिद्धान्ती—पण आचार्यांस कांहीं सांगावयाचें राहिलेंच नव्हतें. ते म्हणालेः 'मी तुला जें सांगावयाचें तें सर्व सांगून ब्रह्मविद्येचें प्रवचन पूर्ण केलें आहे. आणखी पुनः तुला निश्चयानें सांगतों कीं, ब्रह्मसंबंधी उपदेश पूर्णत्वानें झाला आहे, आतां कांहीं एक सांगावयाचें राहिलें नाहीं.'—शिष्यराज! याप्रमाणें त्या आचार्यसाधकांचा संवाद झाला. ॥ ७ ॥ ३२ ॥

मंत्र आठवा (क्रमांक ३३ वा).

ब्रह्मविद्या तु पूर्णतयोक्ता तस्या विशिष्टं साधनमुच्यते (तस्यै) उपनिषदे ब्रह्मविद्याप्राप्त्यर्थम् (तपः) द्वन्द्वसहनं चान्द्रायणादिव्रतानि वा (दमः) मनसो वशीकरणम् (कर्म) श्रौतमग्निहोत्रादिकं स्मार्तं च (इति) एतान्येव त्रीणि मुख्यसाधनानि । एषां च साधनान्याह (प्रतिष्ठा) सत्कर्मानुष्ठानेन पूजाप्राप्तिः शुद्धस्थाने शरीरेन्द्रियमनोबुद्धीनां चाञ्चल्यरहिता स्थितिर्वा (वेदाः) ऋगादिवेदाः (सर्वाङ्गानि) शिक्षादिषडङ्गानि । एषां सर्वेषामध्ययनाध्यापने (सत्यम्) सर्वस्य (आयतनम्) स्थानम् । सत्ये सर्वं प्रतिष्ठितमिति वचनात् । मनोवाक्कायकर्मभिः सत्यस्याचरणं ब्रह्मज्ञानस्य मुख्यं श्रेष्ठतमं साधनम् । 'अश्वमेधसहस्रं च सत्यं च तुलया धृतम् । अश्वमेधसहस्राद्धि सत्यमेकं विशिष्यते' इति वचनात् सत्यं सर्वोपरि स्थितम् ॥ ८ ॥ ३३ ॥

सिद्धान्ती—कसा! याप्रमाणें ब्रह्मविद्येचें पूर्णप्रवचन झालें. आतां या मंत्रांत तिचीं साधनें मंत्र सांगितलीं आहेत. ब्रह्मविद्येच्या प्राप्तीचें तप हें एक साधन आहे.

शिष्य—तप म्हणजे शीतोष्णाचें सुख-दुःखांचें, सारांश! सर्व द्वंद्वांचें सहन करणें किंवा तें बल उत्पन्न होण्यासाठीं चांद्रायणादि व्रतें करणें. हेंच होय ना? तपानें मनाला स्थैर्य येतें आणि येईल. तो प्रसंग सुखासमाधानानें कंठितां येतो. होय ना?

सिद्धान्ती—होय. दम म्हणजे मनाला वश करून घेणें, हें एक साधन आहे. तसेंच श्रौत (अग्निहोत्रादि कर्म) आणि स्मार्त (औपासन होमादि) हेंही एक साधन आहे. याप्रमाणें तप, दम, आणि वेदस्मृतिविहित कर्म हीं तीन मुख्य साधनें आहेत. या साधनास जी स्थिरता येते, ती सत्कर्माच्या अनुष्ठानानें जी आपली कीर्ति होते, तिनें येते; किंवा शुद्ध स्थानीं शरीर, इंद्रिय, मन, बुद्धि, यांची निश्चल स्थिति राहणें या वृत्तीनें स्थिरता येते. तसेंच ऋग्वेदादि चारी वेद; शिक्षा-कल्पादि सहा अंगें 'यांच्या अध्ययन आणि अध्यापनामध्यें आपला सर्व काल-क्षेप करावा हें एक साधन आहे म्हणून हें मुख्य कर्तव्य आहे. श्रुतिही म्हणते कीं सत्याच्या पायावर सर्व साधनांची उभारणी आहे. सत्य हा सर्व कर्माचा व सर्व ज्ञानाचा आधार आहे. सत्याचरण हें ब्रह्मज्ञानाचें श्रेष्ठतम साधन आहे. हें सत्याचें एकरसात्मक अनुष्ठान मनानें, वाणीनें व शरीरानें नित्य करित असलें पाहिजे. म्हटलें आहे "सहस्र अश्वमेध आणि सत्य या उभयतांचें वजन केलें तर सत्याचें वजन जास्त होऊन त्याचें पारडें खालीं जाईल.' म्हणून सत्य हें सर्वापेक्षां श्रेष्ठ आहे सत्याहून श्रेष्ठ कांहीं नाहीं. ॥ ८ ॥ ३३ ॥

मंत्र नववा (क्रमांक ३४).

(यः) पुरुषः (वै) निश्चयेन (एताम्) केनेषितमित्याद्युपनिषत्प्रतिपाद्यां ब्रह्मविद्याम् (एवम्) उक्तप्रकारेण (वेद) जानाति सः (पाप्मानम्) अनादिकालसंचितवासनावासितमन्तःकरणस्थं कलमषम् (अपहत्य) विनाश्य (अनन्ते) अविनाशिन्यपरिच्छिन्ने वा (स्वर्गे) आनन्दमये सुखस्वरूपे (लोके) सूक्ष्मबुद्ध्या दर्शनीये ज्ञातव्ये (ज्येये) सर्वेभ्यः श्रेष्ठतमे परमात्मनि (प्रतितिष्ठति प्रतितिष्ठति) अवश्यं-प्रतिष्ठितो भवति । अतिशयद्योतनार्थोऽभ्यासो ग्रन्थसमाप्तिद्योतनार्थो वा ॥ ९ ॥ ३४ ॥

॥ इति भीमसेनशर्मकृतं तलवकारोपनिषद्भाष्यं समाप्तम् ॥

सिद्धान्ती—ज्या पुरुषाला या उपनिषदामध्यें प्रतिपादन केलेली ब्रह्मविद्या येथें सांगितल्याप्रमाणें निश्चयपूर्वक समजली, तो महापुरुष श्रेष्ठ अशा परमात्म्याच्या

लोकाप्रत जातो. अनादि कालापासून संचित झालेल्या वासनांनीं मलिन झालल अंतःकरण व तेथें राहणारें पाप आणि पापबुद्धि यांचा नाश करून ब्रह्मज्ञ पुरुष अविनाशी, निरुपाधिक, अमर्याद, आनंदमय आणि सुखस्वरूपी लोकांमध्यें जाऊन राहतो. हा लोक सर्वश्रेष्ठ आहे आणि हा शास्त्रशुद्ध सूक्ष्म बुद्धीला मात्र ग्राह्य आहे. सामान्य मनुष्याला ब्रह्मज्ञान व्हावयाचें नाहीं व तो ब्रह्मलोकास जातही नाहीं. असो; ब्रह्मज्ञ पुरुष ब्रह्मलोकचा अखंड निवासी होतो. अखंड निवासी होतो.

शिष्य—येथें शेवटचें पद द्विवार कां घातलें आहे ?

सिद्धान्ती—फलाची श्रेष्ठ योग्यता सांगण्यासाठीं व ग्रंथाची समाप्ति दाखविण्यासाठीं शेवटील पदाचा द्विवार उच्चार करण्याचा संप्रदाय आहे. ॥९॥३४॥

॥ भीमसेनशर्मकृततलवकारोपनिषद्भाष्य समाप्त ॥

ॐ तत्सद्ब्रह्मणे नमः ।

केनोपनिषत्.

संपादकाचें विवरण.

मंत्र पहिला.

अन्वय व अर्थ—केन इषितं मनः प्रेषितं पतति (कोण प्रेरणा करितो म्हणून आमचे मनाला इष्ट असणाऱ्या विषयाकडे तें स्वतःच धांवून जातें ?) **केन युक्तः प्रथमः प्राणः प्रति** (कोणाच्या आज्ञेनें सर्व कर्मेंद्रियांचा व ज्ञानेंद्रियांचा नियंता जो प्राण आहे, तो आपल्या व्यापारास प्रवृत्त होतो ?) **केन इषितां इमां वाचं वदन्ति** (कोणाच्या प्रेरणेनें जीव—आपल्यास इष्ट असणारी—वाणी बोलतात ?) **उ** (हे आचार्य) **कः देवः चक्षुः श्रोत्रं युनक्ति** (आमच्या नेत्रांस व कर्णांस कोणता देव आज्ञापितो बरें ?)

सारांश, जीवाला प्राप्त झालेलीं ज्ञानेंद्रियें व कर्मेंद्रियें कोणाच्या प्रेरणेनें स्वस्वव्यापारांस प्रवृत्त होतात, हा प्रश्नाचा भावार्थ आहे.

या उपनिषदांमध्यें असा एक मनोहर प्रसंग विषयाच्या प्रवेशासाठीं अवतीर्ण केला आहे कीं, ज्या मध्यें एका जिज्ञासु साधकाला एक शंका आली ती अशी; जीवाला प्राप्त झालेलीं सर्व ज्ञानेंद्रियें आणि कर्मेंद्रियें स्वतः आणि स्वरूपानें जड असूनही तीं आपआपले इष्ट व्यापार चोख रीतीनें करीत असतात. जडाच्या हातून योग्य व्यापार घडणें शक्य दिसत नाहीं. मन व बुद्धिसुद्धां इंद्रियांस प्रवृत्त करूं शकणार नाहींत. कारण तींही जडच ! प्राणवायूमध्येंही तें सामर्थ्य नाहीं. तेव्हां सहजच शंका उत्पन्न होते कीं, हीं स्वतः जड असणारीं इंद्रियें आपापले इष्ट व्यापार करितात ते कोणाच्या प्रेरणेनें करितात ? हा प्रश्न आहे. किंवा ही शंका आहे. प्रत्येक विचारी पुरुषास ही शंका केव्हां तरी येते व तिचें निरसन झाल्याशिवाय त्याचें समाधान होत नाहीं. याप्रमाणें सामान्यतः कोणत्याही प्राचीन अथवा अर्वाचीन शोधक जिज्ञासूला वरील सारखा प्रश्न उत्पन्न होतोच होतो. आपल्यास प्राप्त झालेले भोग सुखानें भोगावे आणि एक दिवस निघून जावें, अशी ज्यांची अज्ञानजन्य समाधान वृत्ति असते, त्यांना ही शंका उत्पन्न होत नाहीं व व्हावयाचीही नाहीं. दृष्टान्त वाईट आहे व कोणाची निंदा अथवा कोणाचा उपरोध करावा म्हणून मी हा दृष्टान्त देत नाहीं; परंतु

केवल विषयाची समजूत पडावी म्हणून देत आहें. मनुष्यजीवाशिवाय बाकीच्या सर्व भूलोकांवरील प्राण्याला वरीलप्रकारची शंका केव्हांही येत नाहीं. कारण उघड आहे कीं, मनुष्य जीवाची बुद्धि जितकी विकसित झाली असते, तितकी पशुपक्ष्यादि जीवांची झालेली नसते. तेव्हां या प्राण्यांस या जगांतील अवाढव्य व्यापारांच्या संबंधानें कोणत्याही प्रकारची शंका न येणें हें नीट आणि रास्त आहे. पण मनुष्यप्राण्याची तशी स्थिति नाहीं. त्याला स्वकर्मानुसार विषयांचा उपभोग घ्यावा लागतो; तथापि विषयाचें स्वरूप आणि व्यापारांचा कार्यकारणभाव समजून घेण्याची प्रवृत्ति होण्याइतकी चौकस बुद्धि परमेश्वरी कृपा-प्रसादानें त्याला प्राप्त झाली असते; म्हणून तो जिज्ञासु असतो. असो; ही जिज्ञासा सर्व लौकिक व वैदिक शास्त्रांचे आणि तत्त्वज्ञानाचे मुळाशीं संबद्ध झालेली आहे. तत्त्वज्ञानाचा उगम या जिज्ञासेमध्यें आहे. या दृश्य विश्वांत सर्वत्र सुव्यवस्था आहे आणि ती आपल्यास समजावी, अशी प्रत्येक जिज्ञासु पुरुषाची इच्छा असते. असो. या इच्छेनें प्रेरित होऊन साधकानें हा वरील प्रश्न विचारला आहे. ज्यांस हा प्रश्न विचारला आहे, ते आचार्य वेदविद्या-पंडित होते हें सांगावयास नकोच.

कोणी असें म्हणल कीं, जीवात्म्याच्या इच्छेनेंच मनप्राणादि—सर्व इंद्रियें स्वव्यापाराविषयीं प्रवृत्त होत असतात. पण हें म्हणणें बरोबर नाहीं, असें प्रश्न करणाऱ्या साधकाप्रमाणेंच मलाही वाटतें. कारण पुष्कळ वेळीं असें घडतें कीं, जीवाची इच्छा नसतांना, इतकेंच नव्हे, तर जीव नको नको म्हणत असतांही आपलें मन व आपलीं नेत्रकर्णादि इंद्रियें आपणा जीवांस अनिष्ट असणाऱ्या विषयांकडे धांवत जात असतात. हें खर आहे, कीं जीवाच्या इच्छेप्रमाणें आपलीं इंद्रियें केव्हां केव्हां व्यापार करितात; पण त्याप्रमाणें हेंही खरें आहे कीं, आपणांस नको असणाऱ्या विषयांचें चिंतन आपलें मन कित्येक वेळ करीत असतें आणि आपलीं नेत्रकर्णादि इंद्रियें जीवास अनिष्ट असणाऱ्या विषयांकडे धांवून जात असतात. म्हणजे जीवास नको असणारे विषय इंद्रियें पाहतात व ऐकतात आणि मन अनिष्ट विषयांत रत होतें. तेव्हां हा प्रकार आहे तरी काय? या सर्वांचा प्रवर्तक कोण? कोणाच्या सत्तेनें (अस्तित्वानें) अथवा कोणाच्या इच्छेनें आपलीं हीं जड इंद्रियें स्वव्यापार करीत असतात? असा प्रश्न उत्पन्न होणें साहजिक आहे. मंत्रामध्यें शेवटीं 'देव' पद आहे, त्यावरूनही साधकाचा अभिप्राय स्पष्ट होतो. जीवाच्या कर्तृत्वासंबंधानें साधकाला शंका नव्हती, तर जीवव्यतिरिक्त कोणातरी चैतन्यविशिष्ट योजकाच्या आज्ञेनें हीं आमचीं जड आणि अचेतन इंद्रियें आपापले व्यापार करितात, असा त्याचा निश्चय झालेला होता असें दिसतें. हा चैतन्य—विशिष्ट योजक कोण, हें त्यास (साधकास) विचारावयाचें आहे. सारांश, इंद्रियें जड असल्यामुळें व

जीव पुरुषळसा परतंत्र असल्यामुळें इंद्रियव्यापार करविणारा कोण असावा या शंकामूलक प्रश्नाचें उत्तर श्रुतीनें निर्माण केलेल्या साधकास हवें आहे. ॥ १ ॥

मंत्र दुसरा.

अन्वय व अर्थ—**श्रोत्रस्य श्रोत्रं मनसः मनः**–(हा योजक म्हणजे–कर्णाचा कर्ण व मनाचें मन–आहे)–**यत् वाचः ह वाचं सः उ प्राणस्य प्राणः चक्षुषः चक्षुः** (जो वाचेची वाचा आहे, तोच प्राणाचा प्राण आणि चक्षुचा चक्षु आहे) **धीराः अतिमुच्य अस्मात् लोकात् प्रेत्य अमृताः भवन्ति** (धीर म्हणजे बुद्धिमान् लोक जे आहेत ते या जड देहाच्या आणि इंद्रियांच्या पाशांचा नाश करून ह्या भूलोकांतून बाहेर गेल्यावर अमृतस्वरूपी होतात.)

सारांश, साधकानें पहिल्या मंत्रांत जो प्रश्न विचारिला आहे, त्याचें उत्तर त्या मंत्रांत ब्रह्मज्ञ आचार्यांनीं दिलें आहे. हा सर्व–प्रवर्तक कोण असावा ? याचें उत्तर असें आहे कीं, तो कर्णेंद्रियाचें कर्णेंद्रिय, मनाचें मन, असणारा आहे. जो वाणीची वाणी आहे तोच प्राणाचा प्राण आणि नेत्रांचा नेत्र आहे. म्हणजे सर्व इंद्रियांचा प्रवर्तक एकच आहे. हें जाणून विचारी पुरुष इंद्रियांच्या पाशांतून आपल्यास सोडवून घेतात आणि देहपात झाल्यावर अमृतत्व पदवीला जाऊन पोहोंचतात.

वाचकांस असें स्पष्ट दिसेल कीं, पहिल्या मंत्रांतील प्रश्नाला दुसऱ्या मंत्रामध्यें निश्चित प्रकारचें उत्तर दिलें आहे, तें उत्तर असें:– जीवाचीं इंद्रियें स्वस्व-व्यापार करितात, त्यांला प्रेरक म्हटला म्हणजे एकच तत्व आहे. जो कर्णाला किंवा मनाला प्रेरित करितो, वाणीला किंवा प्राणाला अथवा नेत्राला प्रवृत्त करितो, तोच सर्व–प्रेरक आहे. याचा भावार्थ असा कीं, इंद्रियें स्वतः केव्हांही स्वव्यापारांच्या संबंधानें प्रवृत्त होत नाहींत. जीं जड आहेत म्हणजे अचेतन आहेत. त्यांना स्वतः हालचाल करण्याचें सुद्धां सामर्थ्य नाहीं, मग आपल्यास इष्ट असणाऱ्या व्यापाराची प्रवृत्ति त्यांना होणार नाहीं, हें सांगण्याचेंही कारण नाहीं. शिवाय, अमुक एक व्यापार केला असतां त्याचा परिणाम अमुक होईल, असें कार्यकारणाचें ज्ञान असणें हें जड इंद्रियांस केव्हांही संभवनीय नाहीं. तेव्हां जड इंद्रियांकडूनही इष्ट प्रवृत्ति होत नाहीं, असें साधकाप्रमाणेंच अधिकारी आचार्यांसही निश्चितपणानें वाटत होतें, हें त्यांच्या उत्तरावरून स्पष्ट दिसतें. वाचप्रमाणें जीवामध्येंही हें सामर्थ्य नाहीं, असा अर्थ ह्या उत्तरानें सहज सुचविला आहे. जीवाला इष्ट विषयाचें मात्र चिंतन करण्याचें स्वतंत्र सामर्थ्य असतें,

तर त्यानें केव्हांही आपणांस अपाय करणाऱ्या विषयांचें चिंतन केलें नसतें, अनिष्ट गोष्टी समजून घेतल्या नसत्या व हानिकारक विषयांचा उपभोगही घेतला नसता. वास्तविक स्थिति अशी आहे कीं, जीव पुष्कळसा परतंत्र आहे. तेव्हां त्याच्या हातून इंद्रियांस प्रवृत्त करण्याचें स्वतंत्र कर्म होणें शक्य नाहीं. यावरून हें उघड दिसतें कीं, हा महाप्रेरक इंद्रियांच्या पलीकडे राहून इंद्रियांस नियंत्रित करणारा आहे. तसेंच हा सर्वव्यापी असला पाहिजे. कारण त्याला जीं विशेषणें दिलीं आहेत तीं सर्वव्यापित्वाचीं दर्शक आहेत. प्राणाचा प्राण, मनाचें मन, ज्ञानेंद्रियांचें ज्ञानेंद्रिय व कर्मेंद्रियांचें कर्मेंद्रिय तो आहे, असें त्याचें वर्णन केलें आहे. मन व प्राण यांचा तर स्पष्टच उच्चार आहे. मन म्हणजे अंतःकरण होय. या अंतःकरणाचे मन, बुद्धि, चित्त आणि अहंकार असे चार विभाग आहेत, हे चारी मिळून अंतःकरण होतें. प्राणाचे पांच मुख्य प्रकार आहेत व पांच उपप्रकार आहेत. असो; मनाचें मन आणि प्राणांचा प्राण या विशेषणांनीं हा सर्वप्रेरक मनाच्या व प्राणांच्या पलीकडचा असून म्हणजे मन-प्राणांपेक्षां श्रेष्ठ असून पुनः तो त्यांचा नियंता आहे, म्हणजे तो मनप्राणांत राहून त्यांचें नियंत्रण करितो, असें मंत्रांतील पदांवरून स्पष्ट होतें. त्याचप्रमाणें तो सर्व इंद्रियांहून श्रेष्ठ असून पुनः त्यांचा तो नियंता आहे, असें मंत्रावरून उघड होतें. चक्षु आणि श्रोत्र यांच्या उच्चारानें सर्व ज्ञानेंद्रियांचा संग्रह होतो व वाणीच्या उच्चारानें सर्व कर्मेंद्रियांचा अंतर्भाव वाणीमध्येंच होतो. याप्रमाणें इंद्रियांत राहून इंद्रियांचें नियंत्रण करणारा म्हणजे तो प्रेरक सर्वव्यापी, व सर्व-शक्ति आणि सर्वज्ञ असा असला पाहिजे. तसेंच तो एकच स्वरूपाचा असला पाहिजे. 'जो वाणीची वाणी असतो, तोच प्राणाचा प्राण आहे' या मंत्रस्थ वाक्यावरून तो एकच स्वरूपाचा असला पाहिजे, असें निश्चित होतें. शेवटीं, या महायोजकाला कोण त्याही जड वस्तूची उपाधि नाहीं असें 'चक्षुषः चक्षुः' मनाचें मन इत्यादि पदांवरून स्पष्ट होतें. याप्रमाणें जडशून्य अथवा पूर्णचैतन्य स्वरूपाचा सर्वव्यापी सर्वज्ञ आणि सर्वशक्ति इत्यादि विशेषणांनीं युक्त असा हा सर्वप्रवर्तक असला पाहिजे, असें ठरतें. यावरून हा योजक सगुणस्वरूपी आहे, असें वाटण्याचा संभव आहे, पण हें वाटणें बरोबर नाहीं. कारण तो एकरूप आहे त्याचें स्वरूप एकरसात्मक आहे असें सांगण्याचा श्रुतीचा आशय आहे. एवंच फलितार्थ असा निघतो कीं, सर्वांस प्रवृत्त करणारा जो योजक आहे, तो एकस्वरूपी परमात्मा असला पाहिजे; हेंच परब्रह्म होय. सारांश, परब्रह्म हेंच आपल्या सत्तेनें म्हणजे अस्तित्वानें सर्व जड वस्तूंस आपापले व्यापार करण्याचें सामर्थ्य देतें असें सर्वज्ञ श्रुतीला सांगावयाचें आहे. असो; हा मंत्राच्या पहिल्या अर्धाचा इत्यर्थ झाला. पुढें श्रुति असें म्हणते कीं, जे धीर पुरुष आहेत म्हणजे तत्त्वज्ञानी पुरुष आहेत, ते या सर्व जड वस्तूंचा त्याग करितात. ह्या दृश्य म्हणजे जड वस्तूंचा त्याग करणें म्हणजे पूर्ण चैतन्य-स्वरूप होणें होय. तात्पर्य पूर्ण ज्ञान

विज्ञान झाल्यानंतर अथवा साक्षात्कार झाल्यानंतर ते अमर होतात, हें सांगावयासही नको. अमृतत्व हवें असेल त्या पुरुषानें ह्या लोकांतील जडवस्तूंचा उपभोग-दृष्टीनें सर्वथा त्याग केला पाहिजे; आणि ज्ञान-कर्मेंद्रियांचें पूर्ण ज्ञान करून घेऊन त्यांचा जो नियंता आहे, त्याचेंही ज्ञान-विज्ञान करून घेतलें पाहिजे. हें ज्ञान-विज्ञान झालें म्हणजे मोक्ष मिळतो. ॥ २ ॥

मंत्र तिसरा.

अन्वय व अर्थ—**तत्र चक्षुः न गच्छति, वाक् न गच्छति, न मनः** (तेथें नेत्र जात नाहीं, वाणी जात नाहीं, आणि मनही जात नाहीं) **न विद्मः यथा एतत् अनुशिष्यात् न विजानीमः** (आम्हांला ब्रह्म विदित नाहीं व शिष्याला कसें समजून सांगावें, हेंही आम्हांला माहीत नाहीं) **तत् विदितात् अन्यत् एव, अथ अविदितात् अधि** (तें ज्ञात वस्तूंहून भिन्न आहे आणि अज्ञातवस्तूंहूनही भिन्न आहे; तें सर्वांपेक्षां श्रेष्ठ आहे.) **इति ये नः तत् व्याचचक्षिरे शुश्रुम** (याप्रमाणें पूर्व-संप्रदाय जाणणाऱ्या ज्या पंडितांनीं आम्हांकरितां स्वस्वरूपाचें विवेचन केलें त्यांपासून आम्हीं ऐकिलें आहे.)

सारांश, या ब्रह्मवस्तूचे ठिकाणीं नेत्र, वाणी, अथवा मन म्हणजे कर्मेंद्रियें, ज्ञानेंद्रियें आणि त्या सर्वांचें नियंत्रण करणारें मन, यांस जातां येत नाहीं. म्हणून ब्रह्मवस्तु काय आहे हें समजत नाहीं, किंवा दुसऱ्यांसही समजून देतां येत नाहीं. ही वस्तु ज्या सर्व ज्ञात आणि ज्ञेय वस्तू आहेत त्यांहून निराळी आहे. तसेंच ज्या अज्ञात आणि अज्ञेय वस्तु आहेत, त्यांहूनही ही वस्तु निराळी आहे. ही वस्तु सर्वश्रेष्ठ आहे. असा पूर्वसंप्रदायानुरूप आमच्या गुरुजींनीं आम्हांस उपदेश केला आहे, असें आचार्य म्हणतात.

या मंत्रांत ब्रह्मवस्तूचें स्वरूप समजणें किती कठिण आहे, नव्हे, किती असाध्य आहे, हें सांगितलें आहे. मागच्या मंत्रांत सर्व इंद्रिय-प्रवर्तक जो परमात्मा आहे म्हणून सांगितलें, तसेंच, जो इंद्रियांचें इंद्रिय, प्राणांचा प्राण व मनाचें मन म्हणून सांगितलें, त्या परमात्म्याचें वर्णन येथें आहे. ही वस्तु किंवा हा परमात्मा नेत्रांस दिसावयाचा नाहीं, वाणीला त्याचा उच्चार करितां यावयाचा नाहीं आणि मनानें त्याचा संकल्पही करितां यावयाचा नाहीं, अशा स्वरूपाचा आहे. सारांश, हा नामरूपांच्या कक्षेबाहेरचा असून त्यांचा नियंता आहे. आणि म्हणूनच मागील मंत्रांत त्याला इंद्रियांचें इंद्रिय, व मनाचें मन म्हणून संबोधिलें आहे. हा बुद्धीलाही अगोचर आहे. सामान्यतः बुद्धीला

मनाच्या सहायानें इंद्रियद्वारा बाह्य विषयांचें ज्ञान होतें. पण येथें सांगितलें आहे कीं, ब्रह्मवस्तूचें स्थान मनाला अगोचर आहे व इंद्रियांसही अगोचर आहे. जी वस्तु इंद्रियांस ग्रहण करितां येत नाहीं; जेथें इंद्रियांची धांव पोहोंचत नाहीं, ती वस्तु मनालाही ग्रहण करितां येत नाहीं. इंद्रियांचा स्वतंत्रतेनें बाह्य-विषयांच्या रूप-रंगाशीं संबंध झाला म्हणजे आपलें मन रूपरंगादि विषयांच्या गुणधर्मांचें ग्रहण करितें. याचप्रमाणें अंतःकरणामध्यें जे सुख दुःखादि विकार उत्पन्न होतात, त्यांचेंही ग्रहण मनाला करितां येतें. पण ज्या सर्वप्रवर्तक ब्रह्मवस्तूचा आपण शोध करीत आहोंत, ती वस्तू रूपरंगादि गुणधर्मांनीं वियुक्त आहे. तसेंच सुखदुःखादि विकारांनींही ती वस्तु वियुक्त आहे. अर्थातच अशा गुणधर्म-वियुक्त आणि विकारशून्य वस्तूचें मनाला ग्रहण करितां येत नाहीं. असो. जी वस्तू मनाला अग्राह्य किंवा अगोचर आहे ती बुद्धीलाही अग्राह्य आणि अगोचर अशीच असणार. समजणें हा धर्म बुद्धीचा आहे, मनानें ग्रहण केलेल्या वस्तूचा बुद्धि निश्चय करिते. तेव्हां मनालाच जें अग्राह्य तें बुद्धीला समजत नाहीं, हें उघड आहे. याप्रमाणें ही ब्रह्मवस्तु इंद्रियांस मनास व बुद्धीस अगोचर आहे, असें ठरलें.

अशा जीवाच्या सर्व ज्ञानसाधनास अग्राह्य असणाऱ्या वस्तूचा उपदेश करितां येणें अशक्य आहे असें जें मंत्रांत सांगितलें आहे तें सर्वथा युक्तच आहे. जी गोष्ट आपणा स्वतःस समजली नाहीं किंवा समजणें शक्य नाहीं त्या वस्तूचा उपदेश दुसऱ्याला करितां यावयाचा नाहीं, हें सांगण्याचीही आवश्यकता नाहीं. याप्रमाणें ब्रह्मवस्तु समजून घेणें व समजून देणें ह्या गोष्टी अशक्य आहेत, असें श्रुतीनें ठरविलें आहे.

अनादि कालापासून वेदाची अशी वास्तविक संप्रदाय-परंपरा रूढ होत आली आहे कीं, ही ब्रह्मवस्तु ज्ञात व्हावयाची नाहीं व तो वस्तु कधींहि ज्ञेय असावयाची नाहीं. हा मुख्य सिद्धान्त आहे. त्याचप्रमाणें ही वस्तु अज्ञात व अज्ञेय वस्तूंहून भिन्न आहे; ज्ञात व अज्ञात, ज्ञेय व अज्ञेय वस्तूंचें नियंत्रण करणारी ही वस्तु आहे, ब्रह्मवस्तु ज्ञाताज्ञात वस्तूहून भिन्न असून त्यांचे नियंत्रण करणारी आहे, हाही सिद्धान्त अनादिकालापासून वेदानें स्वीकृत केला आहे. आणि तो यथार्थही आहे. या सिद्धान्ताची यथार्थता उपसंहाराचे वेळीं स्पष्ट करून दाखविण्याचा मी प्रयत्न करीन. येथें इतकेंच सांगून ठेवावयाचें आहे कीं, ही वस्तु ज्ञेय नाहीं व अज्ञेयही नाहीं, ज्ञात नाहीं व अज्ञातही नाहीं. या प्रमाणें 'इंद्रियांस कोण प्रवृत्त करितो?' असा प्रश्न पहिल्या मंत्रांत उत्थापित केला आहे त्याला दुसऱ्या व तिसऱ्या मंत्रांनीं असें उत्तर दिलें आहें कीं, परमात्म्याच्या सत्तेनें सर्व इंद्रियें आपआपले व्यापार करण्यास प्रवृत्त होतात. तसेंच हा परमात्मा जीवास जीं ज्ञानसाधनें प्राप्त झालीं आहेत त्यांस व त्यांच्या द्वारां गोचर होण्यासारखा नाहीं. याला रंगरूप नाहीं म्हणून तो इंद्रि-

यांस दिसत नाहीं. याला विकार उत्पन्न होत नाहींत म्हणून तो इंद्रिय-संग्राहक जें मन त्यालाही गोचर होत नाहीं. मनासह इंद्रियांस जें अंतर्बाह्य विषयांचें स्वरूप समजतें त्याचा संग्रह करणाऱ्या बुद्धीसही हा गोचर नाहीं. सारांश, नामरूपातीत स्वरूपाचा हा परमात्मा आहे असें श्रुतीनें सांगितलें. तो सर्व इंद्रियांस अगोचर आहे, हेंही सांगितलें आणि तात्पर्य असें प्रतिपादितें कीं, ही परब्रह्मवस्तु इंद्रियांस सर्वथा अज्ञेय आहे, पण ती ज्ञेयही आहे असें येथें सुचवून ठेविलें आहे. पण याचा विचार आपण दुसऱ्या खंडांतील पहिल्या चार मंत्रांची मीमांसा करितांना स्पष्ट करूं. येथें श्रुतीनें केवल परंपरागत सिद्धान्त सांगितला कीं, ब्रह्मवस्तु ज्ञाताज्ञात नाहीं, व ज्ञेयाज्ञेयही नाहीं. ॥ १ ॥

मंत्र ४ ते ८.

अन्वय व अर्थ पूर्वीप्रमाणेंच आहेत.—

आतांपर्यंत इंद्रियांस प्रवृत्त करणारा परमात्मा इंद्रियांस अगोचर आहे व मनोबुद्धीस अगोचर आहे असें सांगितलें. आतां या मंत्राष्टकांत असें सांगावयाचें आहे कीं, त्याला नियमित करणारी इंद्रियादि कोणतीही उपाधि नाहीं, त्याला बोलण्यासाठीं वाणी नको असते, विचार करण्यासाठीं मन नको असतें, पाहण्यासाठीं किंवा ऐकण्यासाठीं त्याला नेत्रकर्णांची आवश्यकता नाहीं, जिवंत राहावें एतदर्थ त्याला प्राणवायूचाही आश्रय करावा लागत नाहीं. सारांश, जीवाला विषय-बोध किंवा स्वरूप-बोध होण्यासाठीं ज्या इंद्रियांची अपेक्षा अवश्य असते ती अपेक्षा परमात्म्याला नाहीं. पण हाच परमात्मा वाणी, मन, नेत्र, कर्ण, प्राण इत्यादि सर्व ज्ञानकर्मेंद्रियांस स्वस्वव्यापार करण्यास प्रवृत्त करितो. जिव्हा नसून बोलणारा व जिव्हेचे व्यापार नियमित करणारा, मनाची अपेक्षा न ठेवितां विचार करणारा व मनास नियमित करणारा, याचप्रमाणें नेत्रकर्णादि इंद्रियांची आवश्यकता न ठेवितां त्या त्या इंद्रियांचे व्यापार करून त्यावर स्वामित्व गाजविणारा असा सर्वउपाधिविवर्जित म्हणजे निरुपाधिक असून सर्व व्यापार निजसत्तेनें करणारा हा परमात्मा आहे.

येथें ब्रह्मवस्तूच्या वर्णनाचें कार्य श्रुतीनें संपूर्ण केलें आहे. हें वर्णन कांहीं अस्तिवाचक व कांहींसें निषेधवाची आहे. कोणत्याही गुणधर्माची उपाधि ब्रह्माला नसून तें ज्ञेय नाहीं, असें निषेधमुखानें सांगितलें. तसेंच, तो सर्व-प्रवर्तक, सर्वव्यापी, सर्वज्ञ आणि सर्वथा अनाज्ञात आहे, असें अस्तिवाचक पद्धतीनें सांगितलें. सारांश, तो निर्गुण असून सर्वसाक्षी आहे असें त्याचें स्वरूप ठरविलें.

येथें पहिल्या खंडाची समाप्ति होते. या खंडांत मनासह इंद्रियांचा व प्राणांचा प्रवर्तक कोण असा प्रश्न उत्पन्न केला आहे आणि या प्रश्न करणाराचा

मनोगतच असा दिसत आहे कीं, त्याला अचेतनाकडून देहव्यापार चालणार नाहीं, असा उपदेश पूर्वीच झाला आहे. जडाला स्वतःप्रवृत्ति नाहीं हा त्याचा निश्चय झालेला आहे, तसेंच इंद्रियेंहीं स्वतंत्र नसून तीं केवल इष्टव्यापारास अनुकूल अशीं आहेत, असाही त्याचा निश्चय झालेला आहे. जगामध्यें प्रवृत्ति तर दिसत आहे आणि ती प्रवृत्ति-निदान आपली देहप्रवृत्ति तरी-कांहीं एक इष्ट हेतु सिद्ध करण्यासाठीं व्यापृत होत असते, असा आपला अनुभव आहे. तेव्हां सहजच प्रश्न असा उत्पन्न होतो कीं, जडदेह किंवा साधनमात्र असणारीं इंद्रियें हीं जर इष्ट हेतु घडवून आणित नाहींत, यांना जर इष्ट हेतु साध्य करण्याचें सामर्थ्य नाहीं, चेतनाशिवाय इष्ट प्रवृत्ति होणें शक्य नाहीं, तर या देहाचा आणि इंद्रियांचा, तसाच मन आणि प्राण यांचा प्रवर्तक कोण असावा ?

हा प्रवर्तक चैतन्ययुक्त असला पाहिजे, हें प्रश्न करणाराच्या मनानें घेतलें आहे. तेव्हां एक जीवात्मा तरी देहेंद्रिय-प्रवर्तक असावा किंवा दुसरा कोणी चैतन्यशील प्रवर्तक असावा असा संशय येईल. पण त्यानेंच आपल्या मनानें या संशयी प्रश्नाचें उत्तर दिलें आहे कीं, जीवात्मा प्रवर्तक असणें शक्य नाहीं. तेव्हां हा प्रवर्तक कोण आणि त्याचें लक्षण काय हें समजावें, म्हणून या केनोपनिषदाची प्रवृत्ति झाली आहे.

पुढील दोन ते आठ मंत्रांमध्यें या दोन्ही प्रश्नांचीं उत्तरें दिलीं आहेत. त्यांवरून हें स्पष्ट होतें कीं, हा चैतन्य स्वरूपी प्रवर्तक सर्व इंद्रियांस प्रकाशित करणारा आहे. व त्यांस आपआपले व्यापार करण्याची प्रेरणा करणारा आहे. हा एक असून एकस्वरूपी आहे. हा सर्व इंद्रियांचा स्वामी असून स्वतंत्र आहे. हें त्याचें स्वरूप आपल्या इंद्रियांस, प्राणांस, किंवा मनास समजण्यासारखें नाहीं; कारण उघड आहे कीं, इंद्रियांस सर्वदां प्रवृत्त करणारा, त्यांचें नियमन करून त्यांचीं स्वरूपें जाणणारा, जो सर्वज्ञ देवाधिदेव त्याचें स्वरूप त्याच्याच तंत्रानें चालणाऱ्या व त्याच्याशिवाय हालचाल करण्याचें सामर्थ्य नसणाऱ्या बिचाऱ्या इंद्रियांस समजणें शक्यच नाहीं. कौरव सैन्यांतील महाप्रसिद्ध धनुर्धराग्रणी जो अंगराजा कर्ण त्यानें एकदां सर्वांस आधार देणाऱ्या पृथ्वीवर उभें राहून पृथ्वी उचलण्याचा प्रयत्न केला आणि फसला. आपण आपल्या स्वतःच्या खांद्यावर उडी मारून बसणें हें केव्हांही संभवनीय नाहीं; त्याचप्रमाणें परमात्म्याच्या सत्तेनें निर्माण होऊन व्यापार करणाऱ्या इंद्रियांसही आपल्या प्रवर्तकाचें स्वरूप केव्हांही कळणार नाहीं. याप्रमाणें परमात्मा हा नेत्रांस अगोचर आहे; मनाला अग्राह्य आहे, बुद्धीचा रिघाव तेथें होत नाहीं, वाणीला मौन धरावें लागतें व प्राण स्तब्ध होतात. सारांश, कोणत्याही इंद्रियांस तेथें जाण्याचें सामर्थ्य नाहीं, असें त्याचें स्वरूप आहे. हें स्वरूप ज्या महापुरुषाला सद्गुरूच्या कृपेनें आणि

वेद–वेदांताच्या सहायानें समजलें, तो महात्मा लिंगदेहाच्या म्हणजे इंद्रियांच्या वासनेच्या पलीकडे जाऊन परमेश्वर–स्वरूपीं लीन होतो आणि शेवटीं मुक्त होतो. आतां त्याचें लक्षण श्रुतीनें कसें सांगितलें तें पाहूं या. या लक्षणांचा विचार चार ते आठ मंत्रांत केला आहे; श्रुति म्हणते कीं याला वाणी प्रकट करूं शकत नाहीं. याचा मनाला विचार करतां येत नाहीं, किंवा विचार करण्यासाठीं याला मनाची अपेक्षा नसते. पाहण्याकरितां याला नेत्रांचें सहाय घ्यावें लागत नाहीं. श्रवण करण्यासाठीं याला कर्णांची आवश्यकता नाहीं. जिवंत राहण्यासाठीं याला प्राणाची गरज नाहीं. असा हा सर्व इंद्रिय–विरहित आणि सर्व इंद्रियातीत आहे. तो इंद्रियशून्य आहे म्हणून निरुपाधिक म्हणजे स्वतंत्र म्हणजे केवल स्वरूपाचा आहे. तो डोळ्यास दिसत नाहीं म्हणजे त्याला रूपरंग नाहीं. तो मनाला अगोचर आहे म्हणजे तो विचाराच्या पलीकडचा आहे, इत्यादि चिन्हांवरून जीवदृष्टीनें तरी तो निर्गुण आहे असें ठरतें. असें असूनही तो सर्व नेत्रकर्णादि इंद्रियांचा, वाणीचा, मनाचा, व प्राणाचा चालक आहे ! यावरून तो सर्वप्रवर्तक आहे असेंही ठरतें. तेव्हां श्रुतीनें उत्पन्न केलेल्या प्रश्नाला पहिल्या खंडानें हें उत्तर दिलें कीं, त्या स्वरूपाचे लक्षण निर्गुणात्मक आहे, अधिकारी जीवास मात्र तो 'आहे' या स्वरूपानें, ज्ञानाच्या स्वरूपानें आणि आनंदाच्या स्वरूपानें प्रकट होतो. अर्थात् तो सच्चिदानंद स्वरूपाचा आहे असें सिद्ध होतें. तात्पर्य इंद्रियांचा प्रवर्तक कोण ? याला उत्तर सच्चिदानंदरूपी निर्गुण परमात्मा म्हणजे परब्रह्म हें आहे. याप्रमाणें निर्माण केलेल्या प्रश्नाचे उत्तर श्रुतीनें दिलें. हा पहिल्या खंडाचा इत्यर्थ आहे.

खण्ड २ रा.

मंत्र पहिला.

अन्वय व अर्थ—यत् अस्य ब्रह्मणः रूपं त्वं वेत्थ इति नूनं अपि त्वं मन्यसे (या ब्रह्माचें स्वरूप अल्प रीतीनें तरी आपल्यास उत्तम समजलें आहे, असें जर तुला खरोखरच वाटत असेल) **यत् अस्य देवेषु** (आणि देवांस जें स्वरूप प्रकट झालें आहे,–तें आपल्यास समजलें असें तुला वाटत असेल–) **अथ नु ते विदितं मीमांस्यं एव मन्ये** (तर तुला जें समजलें असें वाटत आहे, त्याची मीमांसा करावयास पाहिजे असें मला वाटतें.)

सारांश, प्रवचन करणारे आचार्य साधकाला या मंत्रानें पुढील उपदेश करून शुद्धीवर आणीत आहेत. मागें पहिल्या खंडांत ब्रह्मस्वरूपाची आणि त्याच्या लक्षणाची मीमांसा झाली. या मीमांसेवरून साधकाला असें वाटलें असेल कीं मला ब्रह्मस्वरूपाचें सर्व–निदान थोडेसें तरी–उत्तम म्हणजे पूर्ण ज्ञान झालें आहे. देवांस किंवा साधुसंतांस या स्वरूपाचा निश्चित रीतीनें जो बोध झाला असेल तितका बोध जरी आपणास झाला नाहीं, तथापि ब्रह्मस्वरूपासंबधानें व तल्लक्षणसंबंधानें आपणास जें कांहीं अल्प स्वल्प ज्ञान झालें आहे तें पूर्ण आणि निश्चित आहे. हा अर्थातच साधकाचा भ्रम आहे. कारण बुद्धीला ब्रह्मस्वरूप ग्रहण करण्याचें अथवा त्याचें लक्षण समजून घेण्याचें सामर्थ्य नाहीं, असें स्पष्ट सांगितलें असतांहो, थोडें कां होईना, पण आपल्यास ब्रह्मस्वरूप लक्षणासह निश्चित रीतीनें समजलें, अशी साधकाची कल्पना होणें हें केव्हांही बरोबर नाहीं. ही कल्पना म्हणजे शुद्ध भ्रम आहे, हा साधकाचा भ्रम नाहींसा करावा आणि देहादिकांचे उपाधींमध्यें राहणाऱ्या जीवाला उपाधि–स्थितींत ब्रह्माचें ज्ञान-विज्ञान होणें शक्य नाहीं, हें समजून सांगावें आणि जें काय ज्ञान होणें शक्य आहे, तें कोणत्या स्वरूपाचें असतें हें समजून द्यावें, एतदर्थ या खंडाची योजना आहे. आणि त्यांतील पहिला मंत्र आतांच सांगितल्याप्रमाणें साधकाला जो भ्रम होतो तो स्पष्ट करून सांगतो, आणि अद्यापिही ब्रह्मस्वरूपाचा पुष्कळसा ऊहापोह (भवति न भवति) व्हावयास पाहिजे, असें सुचवितो. सारांश, ब्रह्मविचार पहिल्या खंडांत पूर्ण झाला नाहीं, निदान श्रुतीनें पूर्णत्वानें म्हणून जो विचार केला, त्यावरून साधकाचा निश्चय न होतां भलतेंच ज्ञान त्यांस उत्पन्न झालें, तें घालविण्यासाठीं दुसऱ्या खंडाचा आणि दुसरे खंडांतील पहिल्या मंत्राचा अवतार आहे. अद्यापि पुष्कळसा विचार कर्तव्य आहे, हा पहिल्या मंत्राचा इत्यर्थ आहे.

मंत्र दुसरा.

अन्वय व अर्थ—सुवेद इति अहं न मन्ये (मला निश्चित ज्ञान झालें आहे, असें केव्हांही वाटत नाहीं) **नो न वेद इति नो वेद इति च** (मला समजलें नाहीं असेंही वाटत नाहीं आणि समजलें असेंही वाटत नाहीं) **नः यः तत् वेद तत् नो वेद** (आमच्यापैकीं ज्यास मी ब्रह्मज्ञ झालों असें वाटतें, त्याला कांहीं समजलें नाहीं) **नो न वेद इति वेद च** (आणि मला कांहीं समजलें नाहीं अथवा समजणें शक्य नाहीं, असें ज्ञान ज्याला झालें तो पूर्णज्ञानी आहे.)

सारांश, आचार्य म्हणतात मला निश्चित ज्ञान झालें, असें वाटत नाहीं व कांहीं समजलें नाहीं, असेंही वाटत नाहीं. ज्याला समजलें असें वाटतें त्याला कांहीं समजत नाहीं. आणि समजणें शक्य नाहीं म्हणून ब्रह्मस्वरूप आपल्यास समजलें नाहीं, असें ज्याला समजतें तो ज्ञानी असतो.

येथें आचार्यांनीं आपल्या ज्ञानाचें स्वरूप सांगितलें आहे. आचार्यांस ठाऊक आहे कीं, ब्रह्माचें स्वरूप सर्वथा अपरिच्छिन्न (उपाधिशून्य) असतें. ब्रह्मस्वरूपाला कोणत्याही प्रकारची उपाधि नाहीं. तें स्वरूप देशानें मर्यादित होत नाहीं, कालानें मर्यादित होत नाहीं आणि परिस्थितीनेंही मर्यादित होत नाहीं. त्याला गुणधर्म नसतात. येथें अधिभौतिक, अधिदैविक आणि अध्यात्मिक उपाधींचाही प्रवेश होत नसतो. फार काय सांगावें? ब्रह्मस्वरूप हें जीवांच्या परिच्छिन्न बुद्धीचा विषयसुद्धां होत नाहीं.

'ब्रह्म समजणें' म्हणजे ब्रह्मानें जीवाच्या बुद्धीचा विषय होणें होय. बुद्धीचा विषय होणें, बुद्धीला गोचर होणें, म्हणजे परिच्छिन्न होणें अथवा मर्यादित होणें होय. ही मर्यादा ब्रह्माचे ठिकाणीं होणें किंवा असणें केव्हांही शक्य नाहीं. म्हणून ब्रह्म समजलें असें म्हणणें हा निवळ भ्रम आहे. सर्वव्यापी आकाशाला आपण एखाद्या भांड्यांत म्हणजे घटांत अथवा मठांत कोंडून ठेविलें, हें म्हणणें जसें शुद्ध वेडेपणाचें आहे, तसेंच, बुद्धीच्या कक्षेंत ब्रह्माला आणिलें असें म्हणणें हेंही अज्ञानाचें दर्शक आहे. तेव्हां ब्रह्मसंबंधानें कांहींच समजणें शक्य नाहीं कीं काय, अशीही एक शंका येण्याचा संभव आहे, तिचा निरास करून या मंत्रांत आचार्य असा उपदेश करितात कीं, ब्रह्मसंबंधानें कांहीं समजत नाहीं, असेंही नाहीं व समजतें असेंही नाहीं. म्हणजे असें: ब्रह्म ही वस्तु अज्ञेय आहे, ती आपल्या बुद्धीला केव्हांही समजावयाची नाहीं, असा ज्याचा निश्चय होतो व तें ब्रह्म निर्गुण आहे आणि शुद्धचित्त झालेल्या जीवास सच्चिदानंद स्वरूपानें भासणार आहे असें ज्यास ज्ञान होतें, तो ब्रह्मस्वरूपाचा परोक्षज्ञानी होय. परंतु मला ब्रह्माचें स्वरूप पूर्ण समजलें, असा ज्याचा समज झाला आहे त्याला ब्रह्मस्वरूपाचे संबंधानें कांहींएक समजलें नसतें; इतकेंच नव्हे तर या स्वरूपाच्या संबंधानें त्याच्या विलक्षण आणि अवास्तव कल्पना झालेल्या असतात. या कल्पनांचा निषेध या मंत्रांत केला आहे. मागें अनेकवेळ सांगितलेंच आहे कीं, अपरिच्छिन्न ब्रह्माचें स्वरूप परिच्छिन्न बुद्धीच्या कक्षेंत येणें केव्हांही शक्य नाहीं. बुद्धीला तें नेहमीं अज्ञेयच राहील. सारांश, ब्रह्मसंबंधी ज्ञान आपल्यास झालें आहे, असें वाटणें हें शुद्ध अज्ञान आहे आणि ब्रह्मवस्तु अज्ञेय आहे असें निश्चित ज्ञान होणें हें खरें ज्ञान आहे. हा अर्थ स्पष्ट करण्यासाठीं मंत्रामध्यें म्हटलें आहे कीं, 'ज्याला मी ब्रह्मज्ञ आहें असें वाटतें तो ब्रह्मज्ञानशून्य आहे, आणि मी ब्रह्मसंबंधानें अज्ञ आहें असें निश्चयानें समजतो, तो पूर्ण परोक्ष ज्ञानी आहे. सारांश, तुला ब्रह्म समजलें काय? याला उत्तर 'मला तें समजलें नाहीं आणि

समजलें आहे,' असें आहे. 'समजलें नाहीं' याचा अर्थ ब्रह्म अज्ञेय आहे आणि समजलें याचा अर्थ तें अज्ञेय आहे असें समजणें होय. ज्यांना गणित शास्त्राचा थोडा तरी परिचय आहे त्यांना अनंत शब्दाचा अर्थ विचारल्यास ते असेंच उत्तर देतील. अनंत ही संख्या मांडा, असें त्यांस सांगितलें असतां ती मांडतां येणें शक्य नाहीं, असेंच ते गणितशास्त्री म्हणतील. अनंताविषयीं तुम्हांस काय समजलें आहे असें विचारिलें असतां अनंताचें स्वरूप-वर्णन करणें अशक्य, ही गोष्ट आम्हांस समजली आहे असें ते म्हणतील. हीच तऱ्हा भूमितींतील 'बिंदु' या शब्दाची व अर्थाची आहे. 'काल' व 'आकाश' या शब्दांची व अर्थाची हीच गति आहे. याचप्रमाणें जीवात्मा म्हणजे काय? असें विचारल्यास त्याचें लक्षण व त्याचें स्वरूप कोणासही स्पष्ट रीतीनें सांगतां यावयाचें नाहीं. ही जर अनंत, बिंदु, काल, आकाश, जीवात्मा इत्यादि आपल्यास नित्य परिचयांत असणाऱ्या वस्तूंची गोष्ट आहे, तर ह्या गोष्टीपेक्षां अनंतपटीनें बुद्धीस अग्राह्य असणाऱ्या ब्रह्म शब्दाचें व अर्थाचें स्वरूप-लक्षण समजणें आणि समजावून देणें ह्या गोष्टी अनंत पटीने अशक्य आहेत हे कोणासही सहज समजणार आहे व हाच या मंत्राचा इत्यर्थ आहे. ॥ २ ॥

मंत्र तिसरा.

अन्वय व अर्थ—यस्य अमतं तस्य मतं (ज्या पंडिताला ब्रह्मवस्तु अज्ञेय आहे असें समजलें, तो खरा विचारी पुरुष होय) **यस्य मतं सः न वेद** (परंतु माझ्या मनाच्या कक्षेंत ब्रह्मवस्तु आली, असें ज्यास वाटतें तो पुरुष अविद्वान् असतो.) **विजानतां अविज्ञातं** (आम्हांस विशेष स्वरूप समजलें, असा अभिमान धरणाऱ्या पुरुषांस तें समजलेलें नसतें) **अविजानतां विज्ञातं** (आपल्यास ब्रह्मस्वरूपाचें विशेष ज्ञान मुळींच झालें नाहीं, असा ज्यांच्या बुद्धीनें लीनवृत्तिपूर्वक निश्चय केला, त्यांस ब्रह्मस्वरूपाचें सामान्य ज्ञान झालेलें असतें.)

सारांश, मागच्या मंत्रांत सांगितलेल्या सिद्धान्ताचा पुनः येथें अनुवाद केला हें स्पष्ट आहे.

मागच्या मंत्रांत आचार्यांनीं आपल्या स्वतःचा व आपल्यास परिचित असलेल्या मंडळीचा अनुभव सांगितला आहे. या अनुभवाला प्रस्तुतच्या मंत्रांत सर्वगामी स्वरूप दिलें आहे. पहिला मंत्र स्वानुभवाचा आहे, तर दुसरा मंत्र सिद्धान्तरूप आहे. म्हणजे एका पुरुषास जो अनुभव येतो तोच अनुभव सर्व विचारी पुरुषांस आला पाहिजे, असा या प्रस्तुतच्या मंत्राचा अभिप्राय आहे.

कारण येथें व्यक्तिविषयक रागद्वेषाचें कांहीं कारण नसल्यामुळें जो व्यक्तीला अनुभव येतो, तोच सर्वगामी असतो. तेव्हां आचार्यांनीं सांगितलेला अनुभव व्यक्तिनिष्ठ नव्हे, व्यक्तीच्या आग्रहानें किंवा दुराग्रहानें उत्पन्न झालेला तो अनुभव नव्हे, असें स्पष्ट दाखविण्यासाठीं या मंत्राची सिद्धान्तपर योजना श्रुतीनें केली आहे. या मंत्रांतील सिद्धान्त मागच्या मंत्राचा अनुवाद करितो आणि व्यक्तीच्या अनुभवाला सिद्धान्ताचें स्वरूप देतो, असें समजलें म्हणजे दुसऱ्या व तिसऱ्या मंत्रांची संगति नीट जुळते आणि पुनरुक्ति झाली आहे कीं काय, अशी शंका येण्याचा संभव असतो त्याचा निरास होतो. या मंत्राचें जास्त विवरण करण्याचें कारण नाहीं. कां कीं पाठीमागच्या मंत्रांत सांगितलेला अर्थ येथें सामान्यरूपानें म्हणजे सिद्धान्तरूपानें सांगितला आहे.

ह्या उपनिषदाचें काळजीपूर्वक अध्ययन करणाऱ्या विचारी पुरुषांच्या सोयी साठीं एकच सिद्धान्त अनुभवरूपानें सांगून पुनः श्रुतिमाउलीनें त्याच सिद्धान्ताचें सामान्यरूपानें प्रणयन केलें आहे. हेतु हा आहे कीं, वारंवार एकच गोष्ट निरनिराळ्या स्वरूपानें सांगितली म्हणजे ती जिज्ञासूंच्या मनावर उत्तम रीतीनें ठसून राहतें. आपला सामान्य अनुभव असा असतो कीं, एखादी गोष्ट आपण प्रथम ऐकली तर तिचे स्वरूप त्यावेळीं जसें कळतें, त्यापेक्षां दुसऱ्या वेळी ज्यास्त स्पष्ट रीतीनें आपल्यास त्या गोष्टीचा उलगडा होतो. आणखी अशी ही एक गोष्ट लक्षांत ठेवावयाची कीं, जीवाला आपल्या बुद्धीचें वैभव फार मोठें आहे असें वाटत असतें. 'बुद्धीस ग्रहण करितां येण्यासारखी वस्तु नाहीं, अशी वस्तुच नाहीं' हा सामान्य पुरुषाचा सामान्य ग्रह असतो. दुसरा असा एक समज असतो कीं, जी गोष्ट बुद्धीला समजत नाहीं ती गोष्ट अस्तित्वांतच नसते! हे दोन्ही ग्रह किंवा हे दोन्हीं दुराग्रह विध्वस्त करावे, हा दुसऱ्या आणि तिसऱ्या मंत्राचा हेतु आहे. जीवाच्या बुद्धीस न समजणाऱ्या अशा पुष्कळ वस्तु आहेत, निदान ब्रह्मवस्तु तरी तशी आहे, आणि ती वास्तव स्वरूपानें अस्तित्वांत आहे, हें येथें विशेष स्पष्टपणानें सांगावयाचें आहे. असो. या मंत्राचा भावार्थ मागच्या मंत्रांत स्पष्ट झाला आहे तरी पुनः एकवार सांगतों. सर्वप्रवर्तक ब्रह्मवस्तूचें स्वरूप अज्ञेय आहे, तिचे विशेष स्वरूप आणि विशेष लक्षणें यांचें पूर्ण ज्ञान होणें शक्य नाहीं, असें ज्या विचारी पुरुषास ज्ञान-विज्ञान झालें, तो विचारी पुरुष खरा ज्ञाता आहे. ह्याच्या उलट ज्याचा समज असतो, ब्रह्मवस्तु ही बुद्धीच्या सत्तेला वश होते असें ज्याला ज्ञात होतें, सारांश ब्रह्मवस्तु ज्ञेय आहे असें ज्यास वाटते किंवा असें अज्ञान ज्यास असतें, तो विचारी पुरुष नव्हे व ज्ञाताही नव्हे. याप्रमाणें आचार्यांनीं साधकाच्या आत्मकल्याणासाठीं परमात्म वस्तूच्या स्वरूपाची मीमांसा दोन मंत्रांत विस्तारानें केली आहे. ॥ ३ ॥

मंत्र चवथा.

अन्वय व अर्थ—प्रतिबोधविदितं मतं हि अमृतत्वं विन्दते (प्रतिबोधामुळें विदित झालेलें स्वरूप निश्चित समजलें म्हणजे अमृतत्वाचा सहजच लाभ होतो) **आत्मना वीर्यं विन्दते** (आत्मज्ञान झालें असतां उत्तम प्रकारचें तेजोबल प्राप्त होतें) **विद्यया अमृतं विन्दते** (विद्येच्या सामर्थ्यानें अमृतत्व म्हणजे मोक्ष मिळतो).

सारांश, प्रत्येक बोधाच्या वेळीं म्हणजे जीवास जें प्रत्येक ज्ञान होतं त्यावेळीं जें तत्त्व नित्य विद्यमान असतें, तें पूर्णत्वानें समजलें म्हणजे अमृतत्व अथवा मोक्ष सहजच प्राप्त होतो. आत्मज्ञानाच्या सामर्थ्यानें विलक्षण तेजोबल प्राप्त होतें आणि आत्मविद्येच्या योगानें मोक्ष मिळतो.

या मंत्रांत आत्मज्ञानाचा उदय करून घेण्याचें रहस्य व फल हीं सांगितलीं आहेत. हें रहस्य जिज्ञासूंनीं अवश्य समजून घ्यावें. ' प्रतिबोधविदित ' म्हणजे प्रत्येक विषयज्ञान होते वेळीं जें ज्ञान नित्य असतें तें होय. त्याचें ज्ञान तें ब्रह्मज्ञान होय. ज्ञान होत असतां जें प्रतिकार्य होतें, तो प्रतिबोध होय. आपल्यास विषयाचें ज्ञान होत असतां त्याच वेळीं अशी एक गूढ भावना स्पष्ट होत असते कीं, या सर्व बाह्य ज्ञानांचा कोणीतरी एक नित्य विद्यमान असणारा, एक निर्विकार साक्षी आहे. याचप्रमाणें मनाला किंवा अंतःकरणाला ज्या गोष्टी स्पष्ट दिसत असतात त्यांचाही तोच साक्षी असतो. अशी भावना विचारी पुरुषास होत असते. आणखी, सुषुप्तीमध्यें (आपल्यास गाढ निद्रा लागली असतां) मनासह आपलीं सर्व इंद्रियें स्तब्ध म्हणजे व्यापारशून्य झालेलीं असतात, हा अनुभव सर्वांस आहेच. तथापि या सुषुप्त स्थितींतही जीवास एकप्रकारचें निरामय सुख प्राप्त होत असतें, असें झोपेंतून जागें झाल्यावर आपल्यास स्मरणरूपानें कळतें. ' मी सुखानें निद्रा करित होतों, निद्रेमध्यें मला उत्तम प्रकारचें सुख प्राप्त होत होतें, असा निद्रेतून उठलेल्या प्रत्येक जीवाचा स्मरणगामी—अनुभव असतो. पूर्वज्ञान झालें असल्याशिवाय स्मरण असत नाहीं. पाहिलेल्या किंवा प्रत्यक्ष झालेल्या वस्तूंचें मात्र स्मरण होतें. जागें झाल्यावर सुखाचें स्मरण होतें, तें सुख कोणी तरी अनुभविलें असलें पाहिजे. पण आपलीं ज्ञानेंद्रियें तर लीन होतीं. तेव्हां म्हणजे सर्व इंद्रियें व त्यांचे विषय लीन झाले असतांही एक, नित्य, साक्षित्वानें असणारें तत्त्व आहे अशी निश्चित भावना होते. ह्या भावनेचें स्फुरण होणें म्हणजे प्रत्येक बोधाच्या वेळीं एकच स्वरूपानें जागृत असणाऱ्या साक्षीचा अनुभव येणें होय. हा मंत्रांतील ' प्रतिबोध—विदित ' या समस्त पदाचा अर्थ आहे.

याप्रमाणें प्रत्येक बोधाच्या वेळीं विद्यमान असणारें जें तत्त्व आहे, तें जीवास स्वसंवेद्यरूपानें समजलें म्हणजे अमृतत्व प्राप्त होतें. वेदान्तकाळीं असा समज प्रचलित होता कीं, आपण किंवा आपली बुद्धिवृत्ति ज्ञेयाशीं म्हणजे जाणावयाच्या वस्तूशीं एकाकार झाल्याशिवाय आपल्यास त्या वस्तूचें ज्ञान होत नाहीं. समजणें म्हणजे ज्ञेयाकार होणें होय. या मानसशास्त्राचे सिद्धांतप्रमाणें बोधाचा साक्षी समजणें म्हणजे आपण साक्षीरूप होणें, असें होतें. म्हणून प्रत्येक बोधाचा एकाकार साक्षी समजला म्हणजे बुद्धिवृत्तिही साक्षिरूप झाली, असें होतें. साक्षी अमर आहे म्हणून त्याच्या जाणणाऱ्यासही अमरत्व प्राप्त होतें. सारांश, ब्रह्मज्ञान झालें म्हणजे जीव ब्रह्म होतो. हाच सिद्धांत अर्वाचीन काळीं मान्य होत चालला आहे.

तसेंच, या आत्मज्ञान झालेल्या पुरुषाचें तेज अद्वितीय असतें. त्या पुरुषाला कसलीही भीति अथवा शोक असत नाहीं. कारण भीतीचीं व शोकाचीं कारणें नष्ट होतात. यासाठीं मंत्रांत असा उपदेश केला आहे कीं, आत्मरूप झाल्यावर उत्कृष्ट वीर्य मिळतें आणि ब्रह्मज्ञानाच्या योगानें अमरत्व प्राप्त होतें.

याच मंत्राचे मागील दोन मंत्रांत ब्रह्मरूप समजावयाचें नाहीं, असें म्हटलें आहे. त्याचा अर्थ जीवाचे बुद्धीस ब्रह्मरूप आकलन करण्याचें सामर्थ्य नाहीं, असा आहे. येथें जीव ब्रह्मरूपच होतो, ज्ञानरूप होतो. बुद्धीच्या पलीकडे असणाऱ्या आत्म्याला ब्रह्मस्वरूप प्राप्त होतें, म्हणून त्याला तें समजतें, असें म्हटलें आहे. असो; 'समजतें' हें पद सुद्धां मोठ्या कष्टानेंच वापरावयाचें आहे. पण उपाय काय? अद्वैताचा अर्थ सांगावयास लागलें म्हणजे द्वैताची भाषा उपयोजावी लागते. असो; ब्रह्म समजण्याला ब्रह्मरूप होणें हाच एक मार्ग आहे. याप्रमाणें या मंत्रांत ब्रह्मरूप समजण्याचा जो एकच गूढ मार्ग आहे तो स्पष्टपणें सांगितला आहे ॥ ४ ॥

मंत्र पांचवा.

अन्वय व अर्थ—**इह चेत् अदेवीत्** (येथें जर पूर्ण ज्ञान झालें) **अथ सत्यं अस्ति** (तर सत्स्वरूपाचा लाभ होतो) **न चेत् इह अवेदीत्** (पण आत्मस्वरूपाचें येथें ज्ञान झालें नाहीं) **महती विनष्टिः** (तर अतिशय मोठा घात होतो) **भूतेषु भूतेषु विचित्य* धीरा अस्मात् लोकात् प्रेत्य अमृताः भवन्ति** (शाहाणे पुरुष असतात ते प्रत्येक भूता-

---

* कोठें कोठें विचिंत्य असाही पाठ आहे.

मध्यें जें आत्मतत्त्व आहे त्याचा शोध लाविताते आणि या दृश्य संसाराच्या पलीकडे असणारें अमरत्व प्राप्त करून घेतात).

सारांश, या जन्मीं पूर्ण तत्वज्ञान झालें तर अति उत्तम फल मिळतें म्हणजे जीव ब्रह्मरूप अथवा सद्रूप होतो. पण जर हें ज्ञान आपण संपादन केलें नाहीं, तर आपल्यास अत्यंत कष्ट भोगावे लागतात. या साठीं जे शाहाणे लोक आहेत ते प्रत्येक पदार्थाचे ठिकाणीं जें अंतर्बाह्य आत्मतत्त्व आहे त्याचें ज्ञान करून घेतात आणि या कष्टमय संसारसागराचा त्याग करून अमर होतात. अथवा ते ब्रह्मरूप होतात.

चवथ्या मंत्रांत आत्मज्ञानाचें फल सांगितलें आहे, त्याचाच अनुवाद ह्या पांचव्या मंत्रांत करून ज्यास्त असें सांगितले आहे कीं, ज्या लोकांस आत्मज्ञानाचा लाभ होणार नाहीं, ते लोक जन्ममरणाच्या तापत्रयामध्यें म्हणजे संसारामध्यें घुटमळून अधोगतीस जातात. त्यांचा सर्वथा नाश होतो. म्हणजे अनंत जन्म पर्यंत त्यांस कष्ट सोसावे लागतात. तेव्हां हें कष्टप्रद जीवित आपल्यास नको असेल, तर जीवानें प्रत्येक वस्तूच्या आंत बाहेर जें आत्मतत्व ओतप्रोत भरलें आहे, त्याचा शोध श्रुतिमार्गानें व गुरूचें साहाय्य घेऊन लावावा आणि श्रुतीनें सांगितलेल्या साधनांचा म्हणजे श्रवण मननादि साधनांचा अवलंब करून आत्मरूप व्हावें. असें केलें तर जन्मास आल्याचें सार्थक्य होणार आहे. सारांश, कृतकृत्य होण्याला आत्मज्ञानाची अत्यंत आवश्यकता आहे. जे लोक हें आत्मज्ञान यथाविधि संपादन करितात, ते लोक शाहणे होत असें सांगण्याचा श्रुतीचा आशय आहे. ॥ ५ ॥

येथें दुसरें खंड समाप्त झालें. या खंडांत ब्रह्मस्वरूपाचें लक्षण काय आणि ब्रह्मस्वरूपाची प्राप्ति कशी करून घ्यावी, या दोन गोष्टी मुख्यत्वानें सांगितल्या आहेत. पहिल्या मंत्रांत केवल परोक्ष ज्ञान झालें असतां आत्मज्ञान पूर्ण झालें, असा कित्येक लोकांचा समज होतो तो निवळ भ्रम आहे शुद्ध भ्रांति आहे, असें सांगितलें आहे. पुढें दुसऱ्या आणि तिसऱ्या मंत्रांत ब्रह्मज्ञान झालेल्या पुरुषांस काय समजलेलें असतें त्याचें निदर्शन केलें आहे आणि स्पष्ट सांगितलें आहे कीं जीवाच्या परिच्छिन्न बुद्धीला अपरिच्छिन्न ब्रह्माचें केव्हांही ज्ञान-विज्ञान होणें शक्य नाहीं. 'माझ्या बुद्धीला ब्रह्मज्ञान होणें शक्य नाहीं, ब्रह्म अज्ञेय आहे' असें ब्रह्माचें परोक्ष ज्ञान झालेल्या पुरुषास समजतें. सारांश, जोंपर्यंत जीवाला अहंकार, बुद्धि, मन, इंद्रियें आणि देह इतक्या उपाधि बद्ध करित असतात, जोंपर्यंत 'मी कर्ता आहें' 'मी भोक्ता आहें' असा अभिमान आणि 'विषयांपासूनच मला सुखप्राप्ति होणार आहे' अशी वासना, ह्या दोन्ही गोष्टी जिवंत आहेत आणि 'बुद्धीच्या व मनादि इंद्रियाच्या साहाय्यानेंच जें काय मला ज्ञान व्हावयाचें तें होणार आहे' अशी वृत्ति

जोपर्यंत कायम आहे, तोंपर्यंत उपाधिग्रस्त अज्ञानी जीवाला ब्रह्मज्ञान होण्याचा केव्हांही संभव नाहीं. पण जेव्हां 'आपल्यास विषयाचें ज्ञान होतें, जेव्हां सुखदुःखादि विकार होतात, तेव्हां म्हणजे या ज्ञानाचे व विकाराचे वेळीं कर्तृत्व-भोक्तृत्वशून्य असा एक नित्यसाक्षी निरंतर आहे व तो आत्मरूप आहे अशी स्वसंवेद्य (आपण स्वतःच आपल्यास प्रकट करणारी) आणि एकरसात्मक भावना प्रत्यक्ष होते; ही समजली म्हणजे आपलें कार्य झालें. सारांश, जेव्हां आपल्यास आत्मरूपाचा साक्षात्कार होतो, तेव्हां आपण ब्रह्मरूप होतों आणि ब्रह्माचें ज्ञान-विज्ञान पूर्ण होतें. ब्रह्म आहे व तें प्रत्यक्ष आपणच आहों असें ज्ञान-विज्ञान झालें म्हणजे अपरोक्ष ज्ञान होऊन जीव मुक्त होतो. हा मुख्य अर्थ पांचव्या मंत्रांत सांगितला आहे. आणि सहावे मंत्रांत या ज्ञानाची फलश्रुति सांगून पांचव्या मंत्रांत सांगितलेल्या फलाला दुजोरा दिला आहे. याप्रमाणें ब्रह्मज्ञानाचें स्वरूप आणि त्याच्या प्राप्तीचें स्वरूप व प्राप्तीचें फल या गोष्टी सांगून दुसरें खंड समाप्त केलें आहे.

पहिल्या खंडांत परोक्ष ज्ञान सांगितलें. आणि दुसऱ्या खंडांत अपरोक्ष ज्ञान सांगितलें. ब्रह्मविद्येची परिसमाप्ति येथें झाली.

खण्ड तिसरा.

मागील दोन खंडांत जो अर्थ सांगितला, त्याचें स्पष्टीकरण या खंडांत एक आख्यायिका सांगून केलें आहे.

मंत्र पहिला.

अन्वय व अर्थ—ब्रह्म ह देवेभ्यः विजिग्ये (एकदां असें झालें कीं, देवांचें साहाय्य करून ब्रह्मानें असुरांचा पराभव केला) **ह तस्य ब्रह्मणः विजये देवाः अमहीयन्त** (त्या ब्रह्माच्या योगानें विजयप्राप्ति झाली म्हणून देवांचें ऐश्वर्य अतिशय वाढलें) **ते ऐक्षन्त** (त्यांस वाटलें कीं,) **अस्माकं एव अयं विजयः** (हा विजय आम्हींच आपल्या सामर्थ्यानें मिळविला) **अस्माकं एव अयं महिमा इति** (आणि हा आमचाच सर्व महिमा आहे).

सारांश स्पष्टच आहे. ॥ १ ॥

एकदां देव-दानवांचें युद्ध झालें त्यांत देवांचें साहाय्य ब्रह्मानें केलें म्हणून देवांस जयप्राप्ति झाली. चांगल्या गुणाचा प्रसार व्हावा सद्धर्माचा उत्कर्ष व्हावा म्हणून देवांचा पक्ष ब्रह्मानें स्वीकृत केला होता. असो; पण ब्रह्माच्या साहा-

त्याचा सर्व भाग विसरून जाऊन देवांस अभिमान झाला कीं, आपल्यास जो विजय मिळाला तो आपल्या सामर्थ्याचें व आपल्या मोठेपणाचें मात्र फल आहे ॥ १ ॥

मंत्र दुसरा

अन्वय व अर्थ—**तत् ह एषां विजज्ञौ** (सर्वज्ञ ब्रह्माला देवांस झालेल्या अभिमानाची वार्ता तत्काल समजली)—म्हणून—देवांस प्रत्यक्ष होईल अशा ठिकाणीं—**तेभ्यः ह प्रादुर्बभूव** (ब्रह्म तेथें प्रकट झालें) **किं इदं यक्षं इति तत् न व्यजानन्त** (पण ही प्रकट झालेली तेजस्वी वस्तु काय आहे हें देवांस समजलें नाहीं).

सारांश स्पष्टच आहे ॥ २ ॥

दैवी संपत्तीच्या प्रभावानें अलंकृत असणाऱ्या देवांस अज्ञानाचा ताप होऊं नये म्हणून ब्रह्म तात्काल तेथें प्रकट झालें. हेतु हा होता कीं, देवांचा अभिमान व देवांचें अज्ञान ह्यीं तावडतोब नाहींशीं करावीं. असो; तें ब्रह्म अशा स्वरूपामध्यें प्रत्यक्ष झालें कीं, ती तेजस्वी वस्तु काय आहे हें देवांस समजेना. देवांमध्यें एक गोष्ट चांगली होती ती ही कीं, त्यांची चौकस बुद्धि अथवा जिज्ञासा अद्याप पर्यंत जागृत होती. ॥ २ ॥

मंत्र तिसरा.

अन्वय व अर्थ—**ते अग्निं अब्रुवन्** (ते देव अग्नीस म्हणाले) **जातवेद किं एतत् यक्षं इति एतत् विजानीहि** (सर्वज्ञ जातवेदा ! अग्ने ! ही चमत्कारिक तेजस्वी वस्तु काय आह हें समजून घे) **तथा इति** (अग्नि म्हणाला बरें आहे, ह्या वस्तूचा शोध करून मी येतों).

सारांश उघड आहे. अग्नि हा सर्वज्ञ आहे, त्याला सर्व कांहीं समजतें, असा देवांस भरंवसा होता म्हणून त्यांनीं पहिल्या प्रथम अग्नीला ही कामगिरी सांगितली. ॥ ३ ॥

मंत्र चवथा.

अन्वय व अर्थ—**तत् अभ्यद्रवत्** (तो अग्नि, ती अग्निदेवता यक्षाकडे म्हणजे त्या तेजस्वी वस्तूकडे धांवत धांवत गेली) **कः असि इति**

तं अभ्यवदत् (यक्षानें अग्नीस विचारिलें कीं, तूं कोण आहेस) अहं अग्निः अस्मि वा इति जातवेदाः अहं अस्मि वा इति अब्रवीत् (अग्नि म्हणाला: मला अग्नि असें म्हणतात किंवा जातवेद हेंही माझें दुसरें नांव आहे).

अग्नि यक्षाकडे धांवत धांवत गेला; पण तेथें गेल्यावर त्याचें तें विलक्षण तेज आणि स्वरूप पाहून अग्नि घाबरला. आणि आपल्यास काय विचारावयाचें होतें तें विसरून जाऊन स्तब्ध उभा राहिला. तेव्हां यक्षानेंच त्याचें नांव गांव विचारिलें. अग्नीनें आपलें नांव सांगितलें व ढाळानें असेंही सांगितलें कीं, मी सर्वज्ञ आहें ॥ ४ ॥

मंत्र पांचवा.

अन्वय व अर्थ—तस्मिन् त्वयि किं वीर्यं इति (तेव्हां यक्षानें त्याला पुनः प्रश्न केला कीं, तुझें सामर्थ्य काय आहे.) अपि यत् इदं पृथिव्यां सर्वं दहेयं इति (अग्नि म्हणाला या पृथ्वीमध्यें म्हणजे विश्वामध्यें ज्या काय वस्तु आहेत, त्या सर्वध्या सर्व जाळून टाकण्याचें मला सामर्थ्य आहे.)

या अग्नीच्या भाषणावरूनच त्याला केवढा गर्व झाला होता, आपल्या ज्ञानाचा व सामर्थ्याचा त्याला केवढा अभिमान झाला होता हें स्पष्ट दिसतें. ॥५॥

मंत्र सहावा.

अन्वय व अर्थ—तस्मै तृणं निदधौ (त्याच्यापुढें ब्रह्मानें एक गवताची काडी ठेविली)—आणि एतत् दह इति (हें जाळून टाक असें यक्षानें अग्नीस सांगितलें) तत् उपप्रेयाय (तो त्या काडीजवळ गेला.)—पण—सर्वजवेन तत् दग्धुं न शशाक (त्यानें आपल्या सर्व सामर्थ्याचा उपयोग केला तरी त्याला तें दग्ध करितां आलें नाहीं.)—तेव्हां—सः ततः एव निववृते (तो तसाच तेथून तडक निघून परत देवांच्या मंडळींत गेला.) यत् एतत् यक्षं इति एतत् विज्ञातुं न अशकं (आणि म्हणाला हा विलक्षण यक्ष कोण आहे, हें मला समजून घेतां आलें नाहीं.

यावरून अग्निदेवतेला सुद्धां स्वतःच सामर्थ्य किती अल्प आहे, याची कल्पना सहज होतें. ॥ ६ ॥

मंत्र सातवा.

अन्वय व अर्थ—**अथ वायुं अब्रुवन् वायो किं एतत् यक्षं इति एतत् विजानीहि** (नंतर देवांनीं वायूस पाचारण करून त्याला त्या यक्षाचें स्वरूप समजून घेऊन येण्यास सांगितलें. ॥ ७ ॥

मंत्र आठवा.

अन्वय व अर्थ—**तत् अभ्यद्रवत्** (तो अति त्वरेनें यक्ष होता त्या ठिकाणाकडे गेला.) **कः असि इति तं अभ्यवदत् अहं वायुः वा अस्मि इति अहं मातरिश्वा वा अस्मि इति अब्रवीत्** (यक्षानें वायूचें नांव विचारलें तेव्हां त्यानें आपलें नांव सांगून 'मला मातरिश्वा म्हणतात' असेंही वर्तमान तो आपणच सांगता झाला. ॥ ८ ॥

मंत्र नववा.

अन्वय व अर्थ—**तस्मिन् त्वयि किं वीर्यं इति** (तुझें सामर्थ्य काय आहे असें वायूस विचारिलें, तेव्हां) **यत् इदं पृथिव्यां सर्वं अपि इदं आददीय*** (तेव्हां वायु म्हणाला पृथ्वीमध्यें म्हणजे (विश्वामध्यें) जें काय आहे त्या सर्वांचें मी ग्रहण करूं शकतों.) ॥ ९ ॥

मंत्र दहावा.

अन्वय व अर्थ—**तस्मै तृणं निदधौ** (यक्षानें त्याच्यापुढें तीच गवताची काडी ठेविली.) **एतत् आदत्स्व इति** (ही काडी तूं उचल असें यक्ष म्हणाला.) **तत् उपप्रेयाय सर्वजवेन तत् आदातुं न शशाक** (त्या काडीजवळ वायु गेला आणि आपलें सर्व बल खर्च करून ती काडी उचलण्याचा प्रयत्न त्यानें केला, पण व्यर्थ !) **स ततः एव निववृते यत् एतत् यक्षं इति विज्ञातुं न अशकं** (तो अग्नीप्रमाणेंच हिरमुसला होऊन परत गेला आणि देवांस म्हणाला कीं, तेथें जाऊन मला कांहीं एक समजलें नाहीं.)

---

* कोठें कोठें ' आददीयं ' असा पाठ आढळतो.

अग्नीची व वायूची एकच अवस्था झाली. म्हणजे स्वतःच्या सामर्थ्यानें अग्नीला गवताची एक काडी जाळतां आली नाहीं किंवा वायूला तीच काडी उचलतां आली नाही. या एका गोष्टीवरूनच जीव केवळाही मोठया योग्यतेचा असला तथापि ब्रह्माच्या किंवा ईश्वराच्या अनुग्रहाशिवाय स्वसामर्थ्यानें त्याला कांहींएक करितां येत नाहीं हें स्पष्ट झालें. मग आपल्या इंद्रियांची, मनाची अथवा प्राणाची वार्ता कशाला पुसावी ? अर्थातच जीवाला कर्तृत्वाचा अभिमान असतो तो व्यर्थ आहे, हें सिद्ध झालें. याप्रमाणें जोंपर्यंत अभिमानवृत्ति कायम आहे, तोंपर्यंत जीवास स्वरूपाचें ज्ञान व्हावयाचें नाहीं हेंही ठरलें. मातरिश्वा हें नांव पूर्वी अग्नीचें होतें असें दिसतें. स्वर्गांतून पृथ्वीवर अग्नि आणिला तो यानेंच; तथापि वेदाच्या उत्तर कालांत मातरिश्वा हें नांव वायूला मिळालें. या पदाचें निर्वचन शंकराचार्यांनीं आपल्या भाष्यांत केलें आहे, तें वाचकांनीं पाहिलेंच असेल.

मंत्र अकरावा.

अन्वय व अर्थ—अथ इंद्रं अब्रवन् मघवन् किं एतत यक्षं इति एतत् विजानीहि (नंतर देवांनीं इंद्रास यक्षस्वरूप समजून घेण्याची विनंति केली.) तथा इति तत् अभ्यद्रवत् तस्मात् तिरोदधे (बरें आहे असें म्हणून इंद्र त्वरेनें तिकडे गेला, तों यक्ष अंतर्धान पावला, गुप्त झाला !)

यावरून श्रुतीचा अभिप्राय असें दाखविण्याचा दिसतो कीं; इंद्राला अतिशय गर्व झाला होता म्हणून ब्रह्माला इंद्राबरोबर बोलावें असें मुद्दां वाटलें नाहीं. अर्थातच इंद्रास वाईट वाटलें, त्यानें आपल्या गर्वाचा त्याग केला, आणि यक्षस्वरूप समजेतोंपर्यंत येथेंच चिंतन करित रहावयाचें, अग्निवायूंप्रमाणें परत जावयाचें नाहीं, असा विचारी व दृढ निश्चयी इंद्रानें संकल्प केला. ॥ ११ ॥

मंत्र बारावा.

अन्वय व अर्थ—तस्मिन् एव आकाशे बहु शोभमानां हैमवतीं उमां स्त्रियं आजगाम (जेथें यक्ष गुप्त झाला होता त्याच आकाशामध्यें एक अतिलावण्यवती व सुवर्णालंकारभूषित अशी उमा नांवाची स्त्री प्रकट झाली.) सः तां किं एतत् यक्षं इति उवाच ह (इंद्रानें त्या स्त्रीला बहुमानपूर्वक विचारलें कीं, ही जी तेजस्वी वस्तु येथें गुप्त झाली, ती कोण ?)

ही उमा नामक स्त्री म्हणजे हिमालयाची कन्या आणि शंकरपत्नी उमा होय. उमा म्हणजे मूर्तिमंत ब्रह्मविद्या आहे. इंद्राचा निश्चय पाहून ब्रह्मविद्येनें त्याला प्रत्यक्ष दर्शन दिलें व त्यानेंही ब्रह्मस्वरूपाविषयीं पृच्छा केली, हें बरें व्हावें तसेंच झालें. ॥ १२ ॥

येथें तिसरा खंड समाप्त झाला. या खंडांत स्पष्ट सांगितलें आहे कीं, आपल्या स्वतःच्या बलावर कोणतीही गोष्ट करण्याचें जीवाला किंवा जीवदेवांच्या इंद्रियांस सामर्थ्य नाहीं. अर्थातच कर्तृत्वाचा अभिमान येथें व्यर्थ होतो. इतकेंच नाहीं तर तो आपल्या परम कल्याणाच्या आडही येतो. तेव्हां कितीही ज्ञान झालें, आपलें केवढेंही मोठें सामर्थ्य असलें, तसेंच जगामध्यें आपली कोणत्याही तऱ्हेची श्रेष्ठता अथवा मानमान्यता असली, तथापि सर्वज्ञ अग्नीच्या, सामर्थ्यशील वायूच्या, श्रेष्ठ आणि देवमान्य इंद्राच्या उदाहरणांवरून आपण जीवांनीं हा बोध घ्यावयास हवा कीं, आपणास देहाचा अभिमान किंवा विषयाची वासना यांचा यत्किंचित् जरी स्पर्श झाला, तरी आपल्यास स्वरूपज्ञान होत नाहीं, आपण कृतार्थही होत नाहीं आणि भयशोकात्मक जो संसार त्यांतून पार पडत नाहीं. वरील गोष्टींतील देवांस ब्रह्मस्वरूप दिसूनही त्याचें त्यांस अपरोक्ष ज्ञान झालें नाहीं! त्याचें कारण अभिमानाची जागृति हें होय.

येथें ब्रह्म यक्षरूपानें अवतीर्ण झालें व अग्नि-वायूंशीं त्यानें संवाद केला, इत्यादि गोष्टी विलक्षणशा वाटतील; तथापि लहान-थोरांस ब्रह्मस्वरूपाचा महिमा काय आहे, हें लक्षांत यावें म्हणून अरूप असणाऱ्या ब्रह्मास श्रुतीनें सरूप केलें आहे आणि वाणीच्या आश्रयाची अपेक्षा नसणाऱ्या ब्रह्माकडून अग्नि-वायूंशीं संवाद करविला आहे. हा अर्थवाद आहे. याचें खरें तात्पर्य हें आहे कीं, प्रत्येक वस्तूमध्यें ब्रह्म ओतप्रोत भरलें असतांही आपल्या उपाधींच्या अडचणीमुळें तें स्वरूप आपल्यास समजत नाहीं; पण जीवांच्या दृष्टीनें विचार केला म्हणजे ब्रह्माला जीवांच्या कल्याणासाठीं सरूप व्हावें लागतें. चित्त शुद्ध होण्याला जशी कर्मांची आवश्यकता असते, त्याप्रमाणें उपासनेचीही असते. साकार स्वरूपाव्यतिरिक्त उपासनेचा उदय होत नाहीं. म्हणून श्रुतीनें येथें यक्षस्वरूपाचा अवतार केला आहे.

खंड चवथा.

मंत्र पहिला.

अन्वय व अर्थ—**ब्रह्म इति सा उवाच ह** (उमा देवी म्हणाली, तें ब्रह्म होतें.) **ब्रह्मणः विजये वै एतत् महीयध्वं इति** (आणि ब्रह्माच्या साहाय्यानें तुम्हां देवांस विजय मिळाला म्हणून तुमचें ऐश्वर्य वाढलें आहे. हा

महिमा खरोखर ब्रह्माचाच आहे.) **ततः ब्रह्म इति विदाञ्चकार** (नंतर इंद्राला कळलें कीं, तें ब्रह्म होतें.)

गुरुमुखानें ऐकिल्याशिवाय ब्रह्मस्वरूपाचें ज्ञान-विज्ञान होत नाहीं, असें या मंत्राचें स्पष्ट सांगणें आहे. ॥ १ ॥

मंत्र दुसरा.

अन्वय व अर्थ—यत् अग्निः वायुः इंद्रः ते हि एनत् नेदिष्ठं पस्पर्शुः (ज्या अर्थी अग्नि, वायु, इंद्र ह्या देवांस ह्या ब्रह्माचा अत्यंत निकट संबंध झाला.) **ते हि एनत् ब्रह्म इति प्रथमः विदाञ्चकार** (आणि ज्याअर्थी ह्या देवांस ब्रह्माचें प्रथम ज्ञान झालें) **तस्मात् वै एते देवाः अन्यान् देवान् अतितरां इव** (त्याअर्थी हे देव इतर देवांपेक्षां श्रेष्ठ होत असेंच ठरलें म्हणावयाचें !) व ह्या मंत्रांत अग्नि, वायु आणि इंद्र हे देव इतर देवांपेक्षां श्रेष्ठ कां, याचें कारण सांगितलें आहे. त्यांनां ब्रह्म अतिशय जवळ जाऊन पहावयास सांपडलें आणि ' हें ब्रह्म आहे ' असें ज्ञान त्यांस प्रथम झालें म्हणून त्यांस श्रेष्ठत्व आलें.)

' विदाञ्चकार ' हें एकवचनी रूप आहे. वास्तविक येथें अनेकवचन पाहिजे होतें. तसेंच मंत्रामध्यें 'प्रथमः' हें पद क्रियाविशेषणासारखें आहे, असें अर्थाच्या दृष्टीनें दिसतें. व्याकरणाच्या दृष्टीनें मात्र तें सविभक्तिक विशेषण आहे, अव्यय नाहीं, असें दिसेल. तसेंच इव या पदाचाही नीटसा अर्थ लागत नाहीं. अर्थात् हे सर्व आर्ष प्रयोग आहेत म्हणून तरी निर्वाह केला पाहिजे किंवा इव या शब्दाला अर्थ नाहीं आणि प्रथमः हें पद इंद्राचा उल्लेख करण्याकरितां घातलें असलें पाहिजे, असें तरी समजलें पाहिजे. या दुसऱ्या पक्षांतही व्याकरणाचा घोटाळा राहतोच. सारांश, या मंत्रांत प्रयोगदृष्टीनें व्याकरणाच्या बऱ्याच अडचणी आर्षयोजनेनें उत्पन्न झाल्या आहेत. ॥ २ ॥

मंत्र तिसरा.

अन्वय व अर्थ—तस्मात् वै इंद्रः अन्यान् देवान् अतितरां इव हि सः एतत् नेदिष्ठं पस्पर्श सः हि एनत् ब्रह्म इति प्रथमः विदाञ्चकार (त्याच कारणासाठीं म्हणजे अत्यंत निकटसंबंध होऊन प्रथम इंद्राला ब्रह्मज्ञान झालें म्हणून तो इतर देवांपेक्षां श्रेष्ठ झाला. याही मंत्रांत पूर्वीच्या

दोन अडचणी आहेतच. प्रथमः या पदानें इंद्राचा बोध होतो, म्हणून विदाञ्चकार या एकवचनी क्रियापदाचा अन्वय बरोबर लागतो. इव या पदाच्या अर्थाची अडचण मात्र दूर होत नाहीं. असो.)

सारांश, हा आहे कीं, अग्नि व वायु यांच्यापेक्षां इंद्र श्रेष्ठ आहे असें ठरलें. कारण त्याला उमेकडून म्हणजे प्रत्यक्ष ब्रह्मविद्येकडून ब्रह्मज्ञान प्रथम झालें. अर्थातच तो सर्व देवाच्यापेक्षां–अग्निवायूंपेक्षां–श्रेष्ठ म्हणून सर्वश्रेष्ठ झाला. ॥३॥

मंत्र चवथा.

अन्वय व अर्थ—तस्य एषः आदेशः (त्याचा म्हणजे प्रत्यक्ष दर्शन देऊन एकदम गुप्त झालेल्या ब्रह्माचा उपदेश पुढील उपमेनें सिद्ध होतो.) **यत् एतत् विद्युतः व्यद्युतत् आ इति** (जें हें विजांच्या प्रकाशाप्रमाणें एकदम प्रकाशित झालें.) **न्यमीमिषत् आ इति** (आणि ज डोळ्याची पापणी लवते न लवते त्याप्रमाणें प्रत्यक्ष दर्शन देऊन गुप्त झालें.) **इति अधिदैवतम्** (याप्रमाणें हा देवांच्या दृष्टीनें उपदेश झाला.)

सारांश, ब्रह्म कसें दिसलें हें सांगण्यासाठीं दोन दैवी उपमांचा आधार घेऊन सांगितलें आहे कीं हजारो विद्युत्–तेजाच्या प्रकाशाप्रमाणें व तेजस्वी नेत्रांच्या उघड–झांपीप्रमाणें ब्रह्माचा आविर्भाव व तिरोभाव झाला. ब्रह्म प्रकट झालें व गुप्तही झालें. येथें ' उपमा अलंकार ' आहे.

ज्याप्रमाणें वीज ही प्रत्यक्ष दिसल्याबरोबर यच्चयावत् सर्व पदार्थांस प्रकाशित करते, त्याप्रमाणें अथवा, विद्युत्-प्रकाशाच्या अनंतपट तेजापेक्षां जास्त तेजानें ब्रह्म प्रकाशित होऊन त्यानें सर्व विश्व तेजःसमुद्रामध्यें बुडवून टाकिलें. अर्थातच हा दिव्य प्रकाश होता. नंतर ब्रह्माचें दर्शन जवळ जाऊन घ्यावें, असा इंद्रानें विचार केल्याबरोबर तें विलक्षण दिव्य तेज एका क्षणाच्या सहस्रांशाच्या अवधींत लुप्त झालें. डोळ्याची उघड, झांप होण्यास जो वेळ लागतो, त्याच्या किती तरी कमी वेळांत हें तेज एकदम नाहींसें झालें! येथें तेजाची उपमा घेतली आहे, म्हणून या ब्रह्मवर्णनाला अधिदैवत असें नांव दिलें आहे. देवांस दर्शन झालें म्हणूनही हें नांव दिलें, असेंही म्हणणें शोभेल.

मुख्य तात्पर्य हें आहे कीं, येथें ब्रह्माचें सामर्थ्य किती आहे, हें दाखवावयाचें आहे. तें सर्वश असूनही जीवाच्या नेत्रांस तें कसें अगोचर असतें, हे येथें दाखविलें आहे. असो; तेजोरूपानें तरी ब्रह्माची उपासना करावी, यासाठीं ब्रह्माचें वर्णन आपणास प्रत्यक्ष होणाऱ्या विजेच्या तेजोरूपानें केलें आहे. ॥४॥

मंत्र पांचवा.

अन्वय व अर्थ—**अथ अध्यात्मं** (आतां यानंतर अध्यात्म दृष्टीनें ब्रह्मोपासना कशी करावी हें सांगतात.) **यत् एतत् मनः गच्छति इव** (आपलें मन याच्याकडे जणुं कांहीं जातच असतें) **अनेन च एतत् उपस्मरति** (हें मन याचें नित्य स्मरण करतें) **अभीक्ष्णं संकल्पः** (संकल्प वारंवार करितें.)

सारांश, उपासकानें आपलें मन ब्रह्माकडेच जणुं कांहीं जात आहे, ब्रह्माचें स्मरण नित्य करित आहे आणि ब्रह्मस्वरूपाचा निश्चय-निदान संकल्प तरी वारंवार करित आहे, अशी वृत्ति ठेवावी.

आपलें मन ब्रह्माकडे लागलें आहे, आपल्यास त्याचें वारंवार स्मरण होत आहे आणि आपली बुद्धिवृत्तिही तदाकार होत आहे; सारांश, मनोरूप ब्रह्म आहे अशी उपासना करावी. ही मनोरूप उपासना सांगितली म्हणून या उपासनेला अध्यात्मउपासना म्हटलें आहे. या मंत्रांत 'उत्प्रेक्षा' अलंकार आहे. ॥५॥

मंत्र सहावा.

अन्वय व अर्थ—**तत् ह तद्वनं नाम** (त्या ब्रह्माचें तद्वन हें नांव आहे. तद्वन याचा अर्थ तें सर्वव्यापी असून सर्व जीवांनीं उपास्य आहे, असा केला आहे.) **तद्वनं इति उपासितव्यं** (तद्वन या नांवाचा जप करून ब्रह्माची उपासना करावी.) **यः एतत् एवं वेद** (ज्या पुरुषाला ब्रह्माची तद्वन या नांवानें ओळख झाली व या नामाच्या जपानें ती उपासना सिद्ध झाली.) **सः** (तो खरा उपासक होय.) **एनं सर्वाणि भूतानि अभिसंवाञ्छन्ति** (या पुरुषाची संगति करावी, याचा अनुग्रह संपादन करावा, असें सर्व भूतांस वाटतें.)

सारांश, सर्वत्र ब्रह्म पसरलें आहे आणि सर्व स्वरूपांमध्यें तेंच उपास्य आहे, असा निश्चय करून जो पुरुष ब्रह्मनामाचा अखंड जप करितो आणि आपली नामोपासना सिद्ध करितो, तो पुरुष सर्ववंद्य होऊन त्याचा अनुग्रह आपल्यावर असावा, अशी लोक इच्छा करितात.

हा नामोपासनेचा प्रकार होय. ही उपासना करणारा पुरुष शांत आणि सर्वकल्याणकर्ता असतो, म्हणून लोक त्याच्या संगतीस राहण्याची इच्छा करितात. तसेंच या नामोपासकावर भक्तवत्सल परमेश्वराचा अनुग्रह झाला

आहे, असें पाहून जीवांस परमेश्वराच्या वात्सल्याची ओळख पटते आणि तेही या पुरुषाच्या संगतीनें परमेश्वरभक्ति करावयास लागतात. ॥ ६ ॥

याप्रमाणें चवथ्या, पांचव्या व सहाव्या मंत्रांत परमेश्वराची अथवा सगुण ब्रह्माची उपासना कशी करावी हें सांगितलें आहे. प्रथम तेजोरूपानें, नंतर मनोरूपानें आणि सहावे मंत्रांत नामरूपानें उपासना करावी, हें सांगितलें. अर्थातच ज्या पुरुषांची चित्तशुद्धि झाली नाहीं व म्हणून ब्रह्मस्वरूपाचें ज्ञान होण्याचा ज्यांस अधिकार प्राप्त झाला नाहीं, तथापि ब्रह्मस्वरूप समजावें आणि मुक्त व्हावें असें ज्या पुरुषांस वाटतें, त्यांचें चित्त शुद्ध होण्यासाठीं व त्यांस ब्रह्मज्ञानाचा अधिकार प्राप्त व्हावा एतदर्थ, या तीन मंत्रांत तीन निरनिराळ्या उपासना सांगितल्या आहेत. यांचा स्वीकार करून जीवानें आपलें चित्त शुद्ध करून घ्यावें आणि मोक्ष मिळविण्याचें जें ज्ञानसाधन तें स्वीकारण्याचा अधिकार आपल्यास प्राप्त होईल, अशी प्रत्येक मुमुक्षूनें व्यवस्था करावी. हें या मंत्राचें तात्पर्य आहे. या खंडांतील पहिल्या व दुसऱ्या मंत्रांत ब्रह्माचें परोक्ष व अपरोक्ष ज्ञान झालें असतां श्रेष्ठपणा कसा प्राप्त होतो, हें प्रत्यक्ष उदाहरणें देऊन सांगितलें आहे. तसेंच साक्षात्कार होईपर्यंत सगुणस्वरूपाची उपासना करावी हें येथें विहित केलें आहे.

मंत्र सातवा.

अन्वय व अर्थ—**भोः उपनिषदं ब्रूहि** (आचार्य महाराज! मला उपनिषदाचा उपदेश करा.) **ते उपनिषत् उक्ता** (तुला उपनिषदाचा उपदेश आम्ही आधींच केला आहे.) **ते ब्राह्मीम् उपनिषदं अब्रूम इति** (आम्हीं तुला ब्राह्मी उपनिषदाचा, ब्रह्मस्वरूप प्रतिपादन करणाऱ्या उपनिषदाचा उपदेश मागेंच केला आहे.)

सारांश, उपासनेचा चाललेला विचार ऐकून साधकानें आचार्यांस प्रार्थना केली कीं, मला आपण ब्रह्मस्वरूपाचें प्रतिपादन करावें. तेव्हां आचार्यांनीं त्यास सांगितलें कीं, पहिल्या व दुसऱ्या खंडामध्यें केवल ब्रह्मस्वरूपाचें संपूर्ण प्रतिपादन आम्हीं केलेंच आहे, आतां त्यासंबंधानें नवीन असें कांहीं सांगावयाचें राहिलें नाहीं. उपासनेचा प्रकार जो तुला सांगितला व देव-दानवांच्या युद्धाची कथा सांगितली, ती तुझ्या निमित्तानें मंद अधिकारी लोकांसही उपदेश व्हावा यासाठीं सांगितली आहे. आतां एकच गोष्ट सांगावयाची राहिली आहे, ती सांगून आम्हीं आपलें प्रवचन संपवितों. ॥ ७ ॥

मंत्र आठवा.

अन्वय व अर्थ—तस्यै तपः दमः कर्म इति प्रतिष्ठा (या ब्रह्मज्ञानाचें स्थापन तप, दम आणि कर्म यांच्यावर होत असतें.) **वेदाः सर्वाङ्गानि** (सर्व वेद हे ब्रह्मज्ञानाचीं निरनिराळीं अंगें आहेत.) **सत्यं आयतनं** (आणि सत्य हें ब्रह्मविद्येचें वसतिस्थान आहे.)

सारांश, ब्रह्मविद्येचा प्रासाद उभारण्यासाठीं तिला तप, दम (इंद्रियनिग्रह) आणि कर्म (वेदविहित विधिनिषेधात्मक नित्य नैमित्तिक कर्में) यांचा आधार घ्यावा लागतो. तप, दम आणि कर्म हीं योग्य रीतीनें सिद्ध झाल्याशिवाय ब्रह्मविद्येची इमारत उभी करितां येत नाहीं. ब्रह्मविद्येचे अवयव म्हणजे सर्व वेद होत. आणि सत्य हें तिचें राहण्याचें घर आहे.

या मंत्रांत ब्रह्मविद्येला आरंभ करण्याचे पूर्वी काय काय गोष्टी केल्या पाहिजेत तें सांगितलें आहे. सुखदुःखें समाधानानें सहन करण्याचें सामर्थ्य असणें, मन व इंद्रियें आपल्या सर्वथा स्वाधीन करून घेणें आणि विहित उपासनेसह नित्यनैमित्तिक कर्में निष्काम आणि निरभिमान बुद्धीनें करणें, सारांश, चित्ताची शुद्धि उत्तम प्रकारानें करणें, ही गोष्ट सिद्ध झाल्याशिवाय ब्रह्मज्ञान-विज्ञान व्हावयाचें नाहीं. चित्तशुद्धि हा ब्रह्म-विद्येचा पाया आहे. पाया ठीक नसेल तर वरील इमारत उभी करितां येत नाहीं, किंवा इमारत तयार झाली तरी ती फार वेळ टिकत नाहीं; त्याप्रमाणें ज्या पुरुषाचें अंतःकरण शुद्ध झालें नाहीं, त्याला ब्रह्मज्ञान व्हावयाचें नाहीं आणि यथाकथंचित् झालेंच तर विपरीत ज्ञान मात्र होईल. म्हणून प्रथम मुमुक्षूनें चित्तशुद्धि करून घेतली पाहिजे. दुसरी गोष्ट ध्यानांत ठेवावयाची ती ही आहे कीं, ब्रह्मज्ञान होतें तें श्रुतीनें प्रतिपादन केलेल्या ज्ञानमार्गानें मात्र होतें. येथें शुद्ध मानवी तर्काचें कांहीं एक चालावयाचें नाहीं. ब्रह्मज्ञान होण्याला श्रुतीनें सांगितलेलें ज्ञान हें काय तें एक साधन आहे. श्रुतिबाह्यज्ञानाचा मात्र स्वीकार केला असतां ब्रह्मज्ञान केव्हांही व्हावयाचें नाहीं, आणि तिसरी गोष्ट ध्यानांत ठेवावयाची ती ही कीं, आपलें चिंतन नेहमीं सद्रूप असेल तर—आपली वाणी सद्रूप असेल आणि आपलें आचरण सद्रूप असेल तर—ही विद्या आपल्याजवळ चिरकाल वास्तव्य करील. याप्रमाणें ब्रह्मविद्येला चित्तशुद्धीची, श्रुतिज्ञानाची आणि सत्यज्ञान, सत्यवाणी व सत्य आचार, यांची अपेक्षा आहे. ॥ ८ ॥

मंत्र नववा.

अन्वय व अर्थ—यः वै एतां एवं वेद (ज्या पुरुषाला याप्रमाणें ब्रह्मविद्येचें ज्ञान झालें–तो–) **पाप्मानं अपहत्य** (आपल्या सर्व पापी वृत्तींच्या कारणांचा नाश करून) **अनंते ज्येये स्वर्गे लोके प्रतितिष्ठति** (अनंत आणि अतिश्रेष्ठ अशा सुखरूप भुवनामध्यें चिरकाल राहतो.)

सारांश, स्पष्टच आहे. ज्याला या उपनिषदांत सांगितल्याप्रमाणें ब्रह्मस्वरूपाचें ज्ञान झालें आहे, आणि त्याच्या साधनांचें परिपूर्ण ज्ञान झालें आहे, तो पुरुष आपल्या कर्तृत्वभोक्तृत्वरूपी अज्ञानाचा विध्वंस करून असें स्थान पावतो कीं, जें अनंत आहे, 'शुद्ध आहे', सर्वश्रेष्ठ आहे, आणि सुखरूप आहे. सारांश तो ब्रह्मरूप होऊन मुक्त होतो. ॥ ९ ॥

याप्रमाणें चवथ्या खंडांत सगुण ब्रह्माचें उपमा दृष्टीनें स्वरूप वर्णन, उपासनेचे मार्ग आणि ब्रह्मविद्येचीं मुख्य साधनें, यांचा निर्देश झाला आहे. पहिल्या खंडांत ब्रह्मविद्येचें परोक्षतः रूपवर्णन केलें. दुसरे खंडांत अपरोक्ष ज्ञानाचें संकीर्तन केलें. तिसरे खंडांत एक आख्यायिका सांगून चित्तशुद्धि झाली नसेल तर ब्रह्मज्ञान होण्यास प्रत्यवाय उत्पन्न होतो, असें सांगून चवथ्या खंडांत स्वरूपज्ञानाचा उपदेश केला व ब्रह्मविद्येच्या मुख्य साधनांचा निर्देश केला. याप्रमाणें या उपनिषदाचें विवरण संपलें. इतर गोष्टींचा विचार करावयाचा तो उपसंहाराचे वेळीं करूं असें सांगून हें प्रकरण येथेंच आटोपितों.

येथें संपादकाचें विवरण समाप्त झालें.

उपसंहार.

या उपनिषदांत परोक्ष आणि अपरोक्ष ब्रह्मज्ञानाचें व त्याचप्रमाणें सगुण आणि निर्गुण परब्रह्माच्या स्वरूपाचें वर्णन केलें आहे. पहिल्या मंत्रांत केलेला प्रश्न फार मनोरंजक आणि अनेक विचार सुचविणारा आहे. या विश्वामध्यें व विशेषतः जीवाच्या देहामध्यें जी घडामोड चालली आहे, मी कर्ता आहें, मी भोक्ता आहें, इत्यादि गोष्टी पतकरून जीवाचा जो व्यापार चाललेला असतो, त्याचा प्रवर्तक कोण ? हा मुख्य प्रश्न आहे. इंद्रियें स्वतःच्या प्रेरणेनें प्रवृत्त होतात कीं नाहीं, हा प्रश्नच आपल्यास स्पष्ट सांगतो कीं, देहादि जड वस्तु स्वतः व्यापार करण्यास केव्हांही प्रवृत्त होत नाहींत. हें तत्त्व प्रश्नकर्त्या साधकाला मान्य आहे. याचा अर्थ असा होतो कीं, अतिकालानंतर जी सांख्य-पद्धति उत्पन्न झाली व तिचे फांटे केवळ हिंदुस्थानांतच नव्हेत तर सर्व जगभर हळुहळूं पसरले, त्या पद्धतीचे काल्पनिक सिद्धान्त अगोदरच मनांत आणून त्यांचा निरास प्रश्नकर्त्या साधकानें आपल्या मनाशीं करून ठेविला आहे. प्रकृति जड आहे म्हणून तिला स्वयंप्रेरणा असणें किंवा तिनें स्वयंप्रेरणेनें कोणताही व्यापार व विशेषतः इष्ट व्यापार बुद्धिपूर्वक करणें, या गोष्टी असंभवनीय आहेत, असा प्रश्नकर्त्याचा निश्चय झालेला दिसतो. सारांश, ज्याला आधिभौतिकवाद म्हणतात तो वाद किंवा तें मत प्रश्नकर्त्यास व उत्तर देणाऱ्या आचार्यास संमत नाहीं, असें स्पष्ट दिसतें.

जडप्रकृतीकडून प्रवृत्ति होण्याचा जर संभव नाहीं, तर इंद्रियें स्वतःच आपआपल्या विषयाकडे धांवत जातात किंवा त्यांस प्रवृत्त करणारा दुसरा कोणी चेतन पदार्थ आहे, असा विचार सहज जिज्ञासु पुरुषाच्या अंतःकरणांत उत्पन्न होतो. पण या विचाराचाही निरास प्रश्नकर्त्यानेंच आपल्या मनाशीं ठरवून ठेविला आहे. 'कोणाच्या प्रेरणेमुळें इंद्रियांची स्वविषयाकडे प्रवृत्ति होते, ह्या प्रश्नाच्या मांडणीवरून इंद्रियें स्वयंप्रेरित नसतात, हा त्याचा निश्चय झाला आहे असें दिसतें; कारण इंद्रियें, मन आणि प्राण हीं स्वरूपतः जड आहेत' हा वैदिक सिद्धान्त प्रश्नकर्त्यास मान्य होता. इंद्रियांचें जडत्व आधुनिक काळीं मात्र यूरोपमधील कांहीं मानसशास्त्र्यांस मान्य झालें आहे, असें दिसतें. पण वेदकाली तें भारतवर्षांतील सर्व पौरस्त्य आर्यांस मान्य होतें म्हणून इंद्रियें स्वतः प्रवृत्त होत नाहींत असा सार्वलौकिकसमज होता.

याप्रमाणें इंद्रियांची वाट लावल्यावर जीव आणि परमेश्वर या दोन चैतन्यविशिष्ट पदार्थांमध्यें प्रश्नाची कक्षा स्थित होते. इंद्रियप्रवर्तक जीव आहे किंवा परमेश्वर आहे, इतकाच कायतो प्रश्न राहतो. यामध्येंही 'कोणता देव प्राणा-

कडून व्यापार करवितो' या प्रश्नाच्या रूपावरून जीवाविषयींही प्रश्नकर्त्याच्या मनांत शंका येत नाहीं. जीव स्वतः प्रवृत्त कां होऊं शकत नाहीं, यांचीं कारणें श्रीमत्भाष्यकारांचें अनुकरण करून मी आपल्या विवरणामध्यें दिलीं आहेत. आतां जीव हा सर्वदेह-प्रवर्तक आहे असा नैयायिक, वैशेषिक इत्यादि दर्शनकारांचा सिद्धान्त आहे. धर्मशास्त्रांचा व भक्तिमार्ग-प्रतिपादकांचाही सिद्धान्त असा आहे कीं, ज्ञानी जीवच इंद्रियप्रवर्तक आहे आणि कर्ता व भोक्ता तोच आहे. पण हें मत प्रश्नकारास मान्य नव्हतें. अद्वैतसिद्धान्तही असाच आहे. म्हणजे जोंपर्यंत जीवाला स्वरूपाचें ज्ञान नसतें. सारांश, जोंपर्यंत जीव अज्ञानी असतो, तोंपर्यंत 'मी इंद्रियादिकांचा प्रवर्तक आहें, मी कर्ता आहें, माझ्या कर्मांचें फल मलाच मिळाल पाहिजे, तें मींच भोगिलें पाहिजे, व मला उत्तम प्रकारचें फल मिळावें' असा कर्मकर्तृत्वाचा अभिमान आणि फलभोक्तृत्वाची वासना हीं जिवंत असतात. ज्या पुरुषाला स्वरूपाचें ज्ञान झालें आहे, तो मात्र कर्तृत्व-भोक्तृत्वाचा संबंध आपलेकडे मुळींच लावून घेत नाहीं. तसेंच, हा संबंध जीवाकडे सर्वस्वी नसतोही. याप्रमाणें जीवाच्या कर्तृत्वाची व्यवस्था लागली म्हणजे कोणता देव इंद्रियांस प्रवृत्त करितो, इतकाच काय तो प्रश्न शिल्लक राहतो. या प्रश्नाचा विचार या केनोपनिषदांत केला आहे.

वरील प्रश्नाच्या उत्तराला दुसऱ्या मंत्रापासून आरंभ झाला आहे आणि पहिल्या खंडांत या सर्वप्रवर्तक परमेश्वराचें स्वरूप काय आहे आणि तो परमेश्वर प्रत्येक इंद्रियांस आपआपले व्यापार करण्याला मात्र कसा प्रवृत्त करितो, यांचेंही स्पष्टीकरण केलें आहे. हा सर्वप्रवर्तक परमेश्वर श्रोत्राचें श्रोत्र आहे, मनाचें (अंतःकरणाचें) मन आहे, इत्यादि सांगून असें स्पष्ट केलें आहे कीं, कर्णादि इंद्रियांस, मनाला आणि प्राणवायूला स्वस्वविषयीं मात्र व्यापार करण्याचें जें सामर्थ्य असतें तें, परमेश्वर स्वतःच ऐकण्याची शक्ति देणारा, विचार करण्याची शक्ति देणारा, इत्यादि स्वरूपांनीं त्या त्या ठिकाणी राहून त्या त्या इंद्रियांस आपआपले नियमित व्यापार करावयास लाविंतो, यामुळें प्रकटतें. हें परमेश्वराचें स्थूलस्वरूप आहे. एकरसात्मक परमेश्वर प्रत्येक इंद्रियाचें अधिष्ठान असून त्या त्या इंद्रियांकडून त्यास योग्य असणारे व्यापार नियमानें करवितो, असें सांगावयाचें आहे. वाचकांस ठाऊक आहे कीं, एकाच विहिरीचें अथवा पाटाचें पाणी, ऊंस, केळीं, लिंबें, मिरच्या इत्यादि निरनिराळ्या बीजांस पोहोंचलें तर तें एकच पाणी गोड, मधुर, आंबट, तिखट इत्यादि रस-स्वरूपानें प्रकट होतें. त्याचप्रमाणें एकाच गुरूच्या हाताखालीं शिकलेले शिष्य स्वयोग्यतेनुसार अनेक प्रकारचे व्यापार करण्यास समर्थ होतात. पण अधिष्ठानांतील मूळची शक्ति एकच असते. पाणी जसें एक आणि एकरूप, गुरूचें सांगणें जसें एक आणि एकरूप असूनही त्यापासून निरानिराळे व्यापार फलरूपानें आपले दृष्टीस पडतात, त्याचप्रमाणें परमेश्वर (परब्रह्म) एकरूप असूनही निरनिराळ्या इंद्रियांच्या

द्वारा निरनिराळ्या व्यापाररूपानें प्रत्यक्ष होतो. सारांश, प्रवृत्तीचा उगम एकच आहे. आणि तो उगम म्हणजे चैतन्याचें पूर्णस्वरूप अथवा परमेश्वर होय. इष्ट व्यापार बुद्धिपूर्वक घडवून तो व्यापार सफल करण्याचें सामर्थ्य एका परमेश्वरास मात्र आहे, त्याचें स्वरूप शुद्ध चैतन्यात्मक आहे, हें जाणून घ्यावें आणि जडाच्या बंधनापासून सुटावें, असा श्रुतींचा व आचार्यांचा दुसऱ्या मंत्रांत उपदेश आहे. ते असें सांगतात कीं, चैतन्यशून्य जडपदार्थांचा संबंध सर्वथा तोडून टाकून शाहणे लोक संसारसागरांतून तरून जातात आणि अमर होतात.

ह्या उत्तरानें एक गोष्ट सिद्ध होते. ती ही कीं, सर्व प्रवृत्ति परमेश्वराच्या सत्तेनें सिद्ध होते आणि परमेश्वरामध्यें जडाचा एकही अंश असत नाहीं. यावरून नास्तिक व आस्तिक सांख्यांचा, त्याचप्रमाणें मीमांसकांचा पक्ष निरस्त होतो. नास्तिक, सांख्य व मीमांसक परमेश्वराचें अस्तित्व कबूल करित नाहींत. निदान या जगांतील प्रवृत्तीला परमेश्वराची कांहीं अपेक्षा आहे, असें त्यांस वाटत नाहीं. प्रकृतीच सर्वकर्त्री आहे, हा सांख्यांचा पक्ष घेतला, किंवा कर्मच स्वतःप्रेरणेनें फलद्रूप होत असतें, असा मीमांसकांचा पक्ष घेतला तरी, एक मुख्य अडचण उत्पन्न होते ती ही:—प्रकृति जड आहे, असें सांख्य म्हणतात. तेव्हां चतन्यशून्य जडप्रकृति इष्ट व्यापार बुद्धिपूर्वक करून ते सफल कसे करणार ? ह्या प्रश्नाला सांख्यमतामध्यें उत्तर नाहीं. बुद्धीचें म्हणजे कार्यकारणनियमांच्या सर्वव्यापी अस्तित्वज्ञानाचें ग्रहण केल्याशिवाय, (ज्ञानाचें, चैतन्याचें) ग्रहण केल्याशिवाय सहेतुक प्रवृत्ति घडणें शक्यच नाहीं. जड प्रकृतीला स्वतश्चेतना आहे, असें म्हणूनही वरील प्रश्न सुटत नाहीं. अमुक फलप्राप्तीसाठीं मला अमुकच गोष्ट केली पाहिजे हें ज्ञान जडाला नाहीं; तेव्हां जड गतिवंत आहे, असें मानिलें तरी फलद्रूपी कार्य त्याच्या द्वारां सिद्ध होणें शक्य नाहीं. चैतन्याच्या सत्तेनें व प्रेरणेनें प्रकृति सांगितलेलें काम करील, पण स्वयंप्रेरणा असणें तिला कव्हांही शक्य नाहीं. कर्माचीही कथा अशीच आहे. म्हणून सांख्यमत अथवा शुद्ध कर्मसिद्धान्त हे वैदिक सिद्धांतांशीं एकरूप होणें संभवनीय नाहीं. सहेतुक प्रवृत्ति सफल होण्याला शुद्धचैतन्याच्या अस्तित्वाची अपेक्षा आहे. ही वस्तु ज्या मतांत स्वीकारली नाहीं तें मत विचारास ग्राह्य होणें शक्य नाहीं. असो; दुसऱ्या मंत्रांत जें उत्तर दिलें आहे तें सिद्धांतपर आहे. सर्व प्रवृत्ति एकरूप शुद्धचैतन्याच्या सत्तेनें मात्र होते आणि या सत्तेचें पूर्ण ज्ञान झाल्याशिवाय अमृतत्व प्राप्त होत नाहीं, असें आचार्यांनीं या मंत्रांत प्रतिपादन केलें आहे. आतां हें सांगावयास नकोच आहे कीं, शंका अथवा प्रश्न उत्पन्न करून संवादरूपानें आलेल्या शंकेचें समाधान करणें ही पद्धति विचारसंक्रमणाला विशेष उपयोगाची असते. नुसतें केवल सिद्धांताचें निदर्शन मात्र करून प्रवचन केलें, तर श्रोत्यांस किंवा वाचकांस विषयाचें स्वरूप चांगलेंसें आकलन करितां येत नाहीं. ग्रीस देशांतील तत्त्वज्ञानाचा प्रणेता आणि

पुरस्कर्ता प्लेटो यानें याच पद्धतीचा स्वीकार केला होता. पण आमच्या येथील ज्ञानकांडपर–श्रुतीनीं ही पद्धति हजारों वर्षांपूर्वी आर्यस्थानांत प्रचलित केली होती. अर्थातच या पद्धतीनें कठीण विचारांचें काठिण्य कमी होत जाऊन साधकाला नवीन विचारांच्या संग्रह करणें सुलभ होत जातें. म्हणून या पद्धतीचा स्वीकार श्रुतीनें या व इतर कित्येक उपनिषदांत केला आहे. आमच्या येथें नुसते सिद्धांत मात्र सांगितले आहेत. पण त्यांची प्रक्रिया (सिद्धान्त सिद्ध होणाऱ्या साधनांची मांडणी) येथें आमचे ग्रंथकार सांगत नाहींत, असा आरोप पुष्कळ पाश्चात्य ग्रंथकार व कांहीं आधुनिक पौरस्त्य विद्वान् वक्ते व लेखक करीत असतात. हा आरोप सर्वथा खरा नाहीं, हें या उपनिषदाच्या मांडणीवरून सिद्ध होतें. त्याप्रमाणेंच कठ, प्रश्न, छांदोग्य, बृहदारण्यक इत्यादि उपनिषदांच्या घटनेवरूनही मी म्हणतों ही गोष्ट सिद्ध होते. असो; या प्रश्नाचें उत्थापन करून त्याचा पूर्ण विचार कठोपनिषदाच्या उपसंहारांत करीन, असें सांगून आतां तिसऱ्या मंत्राचा विचार करण्याकडे मी आपला मोर्चा वळवितों.

या मंत्रांत स्पष्ट सांगितलें आहे कीं, चक्षु, वाणी, मन इत्यादि सर्व इंद्रियांचा प्रवेश आतांच सांगितलेल्या आत्मस्वरूपामध्यें होत नाहीं. तो नेत्राचा नेत्र आहे, म्हणूनच तो आत्मा नेत्राला गोचर नाहीं असें सांगावयाचें आहे. तेथें इंद्रियांची गति नाहीं म्हणजे विवरणांत सांगितल्याप्रमाणें त्याला रूप, रस, गंध इत्यादि इंद्रियांस गोचर होणाऱ्या कोणत्याही गुणधर्माचा संपर्क त्याला नाहीं, असें सिद्ध होतें. त्याचें स्वरूप वाणीला सांगतां येत नाहीं. किंवा मनाला आकलन करितां येत नाहीं. सारांश, तो सामान्यत्वानें अथवा विशेषरूपानें कसा आहे हें समजत नाहीं किंवा समजलें तरी त्याचें स्वरूप दुसऱ्यांस सांगतां येत नाहीं. तो आहे इतकें मात्र समजतें. पण त्याच्या स्वरूपाचें ज्ञान इंद्रियादि उपाधि असणाऱ्या जीवाला केव्हांही व्हावयाचें नाहीं; हा या मंत्राचा सारांश आहे.

ज्या आर्य लोकांची उपनिषद्–वाक्यावर श्रद्धा आहे, त्या लोकांस किंवा त्या लोकांच्या आचार्यांस असें म्हटलेंच पाहिजे कीं, परमेश्वराचें स्वरूप जीवाला समजणें केंव्हांही शक्य नाहीं. कारण जीवाला ज्ञानदृष्टीनें समजतील असे गुणधर्म परमेश्वराच्या स्वरूपामध्यें नाहींत, हें या तिसऱ्या मंत्राच्या भावार्थावरून स्पष्ट होत आहे. विचारदृष्टीनें सिद्ध झालेल्या व श्रुतीचा आश्रय असलेल्या तत्त्वज्ञानाला या सृष्टीचा व्यापार चालविणारें व सृष्टीचें आदिकारण असणारें ज एक अखिल–व्यापी तत्त्व आहे, तें केवल–स्वरूपाचें आहे, तेथें जाणणें किंवा जाणविणें, विकार होणें, कमीजास्तीपणा असणें, इत्यादि गोष्टींचा संभव असणें शक्य नाहीं. भक्तीच्या दृष्टीनें तुम्हीं परमेश्वरावर वाटतील त्या सद्गुणांचा आरोप करा, जेवढें वाटेल तेवढें सामर्थ्य व दयालुपणा त्याच्या स्वरूपामध्यें आणून ठेवा, जीवाचें या भक्ति–दृष्टीनें अपरिमित कल्याणही होवो, पण वास्त-

विक पाहिलें असतां सर्व गुणधर्मांच्या पलीकडून सर्व गुणधर्मांस नियंत्रित करणारें आत्मतत्त्व आहे, हें श्रुतीचें व श्रुतीस धरून चालणाऱ्या विचाराचें एककंठानें सांगणें आहे.

'आपल्या स्वतःच्याच स्वरूपाचें स्वरूप काय आहे' असा आपण शोध करित गेलों, तर आपल्यास काय आढळतें बरें? त्याच्या संबंधानें आपणांस काय म्हणतां येईल? आपलें स्वरूप हा दिसणारा स्थूल देह आहे काय? विचारी पुरुषाला देह हा माझें स्वरूप नव्हे' असेंच म्हणावें लागेल. कारण देह हा लहान मोठा होतो; त्याला बाल, तरुण, वृद्ध अशा निरनिराळ्या अवस्था आहेत; पण ह्या अवस्था आपल्या स्वरूपाला आहेत असें म्हणतां येत नाहीं. 'माझा देह लहान होता, तो तारुण्यावस्थेमध्यें आला आणि आतां तो वृद्धावस्था भोगित आहे; व पुढें कधीं तरी तो नाहींसा होईल;' असें मी म्हणतों. पण याचप्रमाणें या देहाचा चालक जो अहंवृत्ति धरणारा 'मी' हा कधीं लहान होता किंवा मोठा झाला किंवा पुढें कधीं नाहींसा होईल असा विचार करणें तरी आपल्यास शक्य होईल काय? जो मी पूर्वी होतों तोच आतां आहें आणि तसाच पुढें राहीन असें विचारदृष्टीनें आपल्यास समजतें. हीच गोष्ट इंद्रियांचीही आहे. इंद्रिये स्तब्ध असतांही (झोपेमध्यें, मूर्च्छेच्या अवस्थेमध्यें किंवा योग्याच्या समाधि-स्थितीमध्यें) आपण नाहींसें होत नाहीं, हा अनुभव आपल्यास व योग्यास नित्य येत असतो; म्हणजे इंद्रियांहून आपण निराळे आहों, असें होतें. हीच कथा प्राणाची, मनाची, बुद्धीची आणि अहंकाराची आहे. ज्याप्रमाणें हा देह माझा आहे असें मी म्हणतों, त्याचप्रमाणें माझीं इंद्रियें, माझें मन, माझी बुद्धि इत्यादि व्यवहार आपण करित असतों. हीं माझीं आहेत असें म्हणण्यानें हीं 'मी' नव्हेत असें सिद्ध होतें. असो; देहादिकांचा व अहंकारापर्यंत सर्वांचा निरास केला तरी 'मी' चा निरास होत नाहीं. मग 'मी' चें स्वरूप काय? तें आहे. पण तें काय आहे, हें सांगतां येत नाहीं. सारांश, आपल्या स्वतःच्या स्वरूपाचें वर्णन आपल्याला करितां येत नाहीं. तेथें नेत्राचा किंवा वाणीचा किंवा मनाचा प्रवेश होत नाहीं. 'आपण आहों' येवढें मात्र आपल्यास सांगतां येतें, पण 'आपण काय आहों?' हें आपल्यास सांगतां येत नाहीं. आपण आपलें स्वरूप समजतों असेंही म्हणतां येत नाहीं, किंवा आपल्यास आपलें स्वरूप अज्ञात आहे असें ही म्हणतां येत नाहीं, हा अनुभव ज्याची निराग्रह बुद्धि असेल त्याला आलाच पाहिजे. श्रुतीचेंही पण हेंच सांगणें आहे. देह म्हणून, इंद्रियें म्हणून, प्राण म्हणून किंवा मन म्हणून, म्हणजे या एक किंवा अनेक स्वरूपांनीं खुशाल आपण आपल्या स्वरूपाचें भजन-पूजन करूं या; देहादिक उपाधि नित्य सात्विक होत जातील असा प्रयत्न आपण अखंड करूं या; पण या सर्वांहून आपलें स्वरूप निराळें आहे, तथापि तें या सर्व उपाधींचें नियंत्रण करणारें आहे, असेंच आपल्यास दिसेल. ही पूर्ण दृष्टि

देण्याला वेदविहित कर्म आणि वेदविहित उपासना अवश्य आहेत. सत्-कर्मा-शिवाय, सद्-विचाराशिवाय आणि सत्-भक्तीशिवाय आपलें स्वरूप आपणास दिसणार नाहीं. हें जितकें खरें आहे, इतकेंच सद्विचार, सदाचार आणि सद्-भक्ति-म्हणजे आपले स्वरूप नव्हे हेंही खरें आहे. या आपल्या स्वतःच्या स्वरूप-मीमांसेवरून प्रत्येक विचारी पुरुषास असा बोध झाला पाहिजे कीं, आपलें स्वरूप सर्व दृश्य व कल्पनीय उपाधींच्या पलीकडचें आहे. पण सर्व उपाधींचें नियमन करणारें तें अधिष्ठान आहे. सारांश आपलें स्वरूप निर्गुण आहे हा बोध स्वानुभवानें जसा आपल्यास होतो, तसेंच त्याचें वर्णन श्रुतीनें केलें आहे.

ही आपल्या स्वरूपाची गोष्ट झाली. परमात्मस्वरूपाचीही अशीच काहणी आहे. हें वर्तमान जीवांस समजावें म्हणून श्रुतीचा अवतार झाला आहे. विचारी पुरुषांच्या दृष्टीनें हेंच खरें आहे असें ठरते. महाधार्मिक जो जगत्-प्रसिद्ध तत्ववेत्ता कॅंट त्यापासून तों सर्वप्रसिद्ध महाविचारी व अज्ञेयवादी स्पेन्सर, हक्स्ले इत्यादि श्रुतीस न ओळखणाऱ्या तत्वज्ञांस विश्वाच्या अधिष्ठानाचें स्वरूप गुणशून्य, विकारशून्य पण सर्वव्यापी आणि सर्वनियामक आहे, असेंच समजून आलें. या व इतर पाश्चात्य तत्वज्ञांस श्रुतीचा परिचय नव्हता म्हणून एक मुख्य गोष्ट समजली नाहीं. परमात्मस्वरूप सर्वथा अज्ञेय आहे असा त्यांनीं सिद्धान्त केला, तो बरोबर आहे; पण 'आपणही स्वरूपतः तेंच आहों.' हें शुभ वर्तमान श्रुतीनें आमच्या पूर्व पूर्वज ऋषींस स्फुरणरूपानें श्रुत केलें पाश्चात्यांस अश्रुत राहिलें. हें वर्तमान समजलें नसल्यामुळें त्यांची वृत्ति साशंक राहिली. पण आम्हांस तसें साशंक राहण्याचें कारण नाहीं. 'आपण तें आहों हें वर्तमान किंवा हा सिद्धान्त इतर लोकांस समजला नाहीं, हें त्यांच्या विचाराचें वैगुण्य अपौरुषेय श्रुतिज्ञानाच्या अभावानें झालें आहे; आम्हांस मात्र हा सिद्धांत समजण्याचें साधन आहे. परंतु आपण श्रुतिमार्गानें सदाचारपूर्वक, सद्भक्तिपूर्वक, व एकनिष्ठेनें शोध करित राहिलें पाहिजे.

आणखी एक गोष्ट येथें सांगावीशी वाटते. ती ही कीं, आमच्या येथें तत्व-ज्ञानाचा विचार नेहेमीं गुरुपरंपरेनें होत आला आहे. ही परंपरा इतर देशांमध्यें विशेष जोरानें प्रज्वलित आहे असें मला वाटत नाहीं. ग्रंथाच्या परिशीलनानें ज्ञान होतें, हें खरें; पण ज्ञानाचें विज्ञान होण्याला गुरुमुखाची अत्यन्त आवश्यकता आहे. पुस्तक ज्ञान देईल पण तें स्वतः जड असल्यामुळें पुस्तक वाचतांना ज्या शंका उद्भूत होतात, त्यांचें निवारण बिचाऱ्या पुस्तकास करितां येत नाहीं. म्हणून आमच्या येथें गुरूपरंपरेचा जो संप्रदाय प्रचलित झाला, तो केवल अपूर्व आहे. गुरुभक्तीचें माहात्म्य हिंदु लोकांत जितकें स्पष्टपणानें प्रकटलें आहे, तितकें इतरत्र कोठेंही झालें नाहीं, असें मला वाटतें. गुरु सद्गुरु असावा, तो श्रोत्रिय आणि ब्रह्मनिष्ठ असावा, तो ज्ञानी आणि तत्वदर्शी असावा, असें एक-

कंठानें सांगितलें आहे, त्याचें मात्र विस्मरण होतां उपयोगी नाहीं. आपल्या गुरूकडून आपल्यास जें ज्ञानविज्ञान प्राप्त झालें, तें श्रुतिमार्गानें आणि विचार-दृष्टीनें संरक्षित करून वृद्धिंगत करावयाचें आणि त्याचा प्रसार करावयाचा, उपाधींचें स्वरूप समजून घेऊन त्यांचें ज्ञान वृद्धिंगत करावयाचें, भक्ति जागृत ठेवावयाची पण विचारज्योतीला मालवून टाकावयाचें नाहीं, आपल्यापेक्षां आपले शिष्य श्रेष्ठ–तर योग्यतेचे होतील, असा आपला शिक्षणक्रम ठेवावयाचा, इत्यादि सद्गुणांची सामग्री प्रत्येक गुरूजवळ अवश्य असली पाहिजे. होतां होईल तितकें ज्ञान वाढवून व सत्कर्म वाढवून अज्ञानी लोकांस ज्ञानदान करावयाचें आणि जसजसें ज्ञान व सात्विकवृत्ति वाढत जातील तसतसें मनुष्यकृत भेदांचा व बंधनांचा नाश करित जावयाचा, ही दीक्षा प्रत्येक लोककल्याणकारी गुरूनें धारण केली पाहिजे. आमच्या येथील पूर्वीचा संप्रदाय असाच होता. उपनिषत्कालपर्यंत हा प्रवाह प्रचंड ओघानें एकसारखा अज्ञान-विध्वंस करित राहिला होता. पुढें अनेक कारणांनीं श्रद्धेचें, भक्तीचें आणि विचारदौर्बल्याचें प्रस्थ-च्यास्त माजून राहिलें, तेव्हां विचाराची प्रगति खुंटली, अंधपरंपरा वाढली, एक-देशी श्रद्धेचा वरपगडा झाला आणि पूर्वपरंपरेचा विध्वंस झाला; ही गोष्ट अप वादात्मक आहे. सिद्धान्त हा आहे कीं, पुस्तकांच्या किंवा ग्रंथांच्या अस्तित्वा-बरोबरच सद्गुरूचेंही अस्तित्व जिवंत असलें पाहिजे. पुस्तक आहे तें ज्ञान कायम टेवील; सद्गुरु तें ज्ञान वाढवील; पुस्तक शंकासमाधान करणार नाहीं. सद्गुरु संशयात्मक वृत्ति राहूं देणार नाहीं. पुस्तकाला वाचकांच्या मनाचें स्वरूप व योग्यता समजत नाहींत, गुरूला शिष्याची विचारशक्ति व ग्रहण-सामर्थ्य हीं कळतात. सारांश; पुस्तक हा मेलेला गुरु आहे आणि सद्गुरु हा जिवंत पुस्तक आहे.

हें विस्तारानें सांगण्याचें कारण, या तिसऱ्या मंत्रामध्यें गुरुपरंपरेचा उल्लेख आहे हें होय. गुरुपरंपरेचें माहात्म्य इतर लोकांस समजत नाहीं. आम्हांस तें समजावें, अशी श्रुतीची इच्छा आहे. ही एकदृष्टि झाली. दुसऱ्या दृष्टीनें असें दिसतें कीं, अलीकडच्या काळांत अनेक कारणांनीं विचारशक्ति दुर्बल झाली म्हणून आमच्या येथें गुरुपरंपरेला अंधपरंपरेचें स्वरूप प्राप्त झालें, असें मला वाटतें. पूर्वीच्या लोकांनीं जें ज्ञान संपादन केलें. तितकेंच काय तें ज्ञान आहे, ज्ञानाची प्रगति होणें शक्यच नाहीं, हें दुर्मत अस्तित्वांत आलें तेव्हां आमच्या येथील व्यक्तिनिष्ठ व समाजनिष्ठ प्रगति स्तब्ध झाल्या. याचप्रमाणें पूर्वीच्या समाजांत व्यक्तीला व समाजाला नियंत्रित करणारे जे नियम घालून ठेविले होते, ते ते नियम त्या त्या काळीं मंगलप्रद कल्याण करणारे होते हें निर्विवाद आहे. पण काळाची गति थांबविणें सर्वशक्ति परमेश्वरास सुद्धां शक्य नाहीं. त्याप्रमाणें समाजाची प्रगति किंवा अवनति स्तब्ध करणें हें सामर्थ्य पूर्वकालीन नियमांमध्यें किंवा विधींमध्यें असणें शक्य नाहीं. प्रागतिक समाजांस योग्य असणारे

नियम किंवा विधि हे प्रतिगामी (उत्तरोत्तर हीन व दुर्बल होत जाणाऱ्या) समाजाला केव्हांही उपयोगी पडावयाचे नाहींत. ते अनर्थ मात्र उत्पन्न करतील. ही जाणीव पूर्वीच्या लोकांस होती; हें उपनिषत्-कालींच अनेक प्रकारचे विचार प्रचलित होते, अनेक दर्शनें अस्तित्वांत आलीं, यावरून स्पष्ट होतें. याचप्रमाणें श्रौत आणि स्मार्त सदाचाराचे नियम करणाऱ्या अनेक स्मृतींमध्यें निरनिराळे आणि परस्परविरोधी नियम आढळतात, भिन्नविधि विहित केलेले दिसतात, यावरून स्पष्ट दिसतें. आचाराचे विधि देशकालानुसार बदलत जातात. भक्तीचीही गोष्ट अशीच आहे. शंकर, विष्णु, गणपति इत्यादि अनेक देवांची उपासना विहित केली. ॐकारोपासना, प्राणोपासना, दहरोपासना इत्यादि अनेक प्रकारच्या उपासना श्रुतीनें विहित केल्या. याचें तात्पर्यच हें आहे कीं, समाजाच्या व व्यक्तीच्या अधिकारानुसार या भिन्न उपासना विहित केल्या आहेत.

असो; याप्रमाणें ज्ञान, कर्म आणि भक्ति यांचे नियम समाजाच्या ग्रहणसमर्थ्यावर बांधावे लागतात; ही जाणीव पूर्वीच्या लोकांस होती. हल्लीं ही जाणीव नाहीं म्हणून गुरुपरंपरेचें स्तोम अंधसंप्रदायानें एका पक्षीं ज्यास्त वाढलें आहे. आणि दुसऱ्या पक्षीं गुरुसंप्रदायाची विलक्षण निंदाही होत आहे. एकीकडे आमच्या धार्मिक-समाजातील भोळे लोक आपल्या तनमनधनानें गुरुसेवा करावयास तत्पर आहेत, तर दुसरीकडे याच परंपरेची वाटेल तशी निंदा करणारे 'विद्वान् आणि चौकस' लोकांचे आखाडेही आहेत. विचारदृष्टीला या दोन्हीं पक्षांत अतिरेक दिसतो. असो; यावर लिहावें तितकें थोडेंच आहे. मला विशेषतः सांगावयाचें आहे तें हें कीं, पूर्वीपासून जो गुरुपरंपरेनें वैदिक संप्रदाय चालत आला आहे, त्यामध्यें विरजण न पडता सद्गुरूनीं ज्ञानविज्ञानाचें संपादन व प्रसार करावा आणि करवावा व जीवांचा सदाचार वाढेल असा प्रयत्न करावा व करवावा; आणि व्यवहारामध्यें व परमार्थामध्यें आपपरभाव नाहींसा करून सर्वांचें परमार्थिक कल्याण होईल, अशी प्रवृत्ति सुरू ठेवावी.

या मंत्रांत जीवाला ब्रह्म कोणत्याही उपाधींनीं समजावयाचें नाहीं म्हणजे उपाधि आहेत तोंपर्यंत समजावयाचें नाहीं. ब्रह्म समजावयास सद्गुरूची अखंड श्रद्धापूर्वक सेवा, अज्ञानाचा ऱ्हास, आत्मशोध आणि आत्मविचार यांची आवश्यकता आहे असें सांगितलें तें योग्यच आहे.

पुढील चार ते आठ मंत्रांत ब्रह्माला एकही उपाधि नाहीं, त्याला बोलण्यासाठीं वाणीची आवश्यकता नाहीं. विचार करण्यासाठीं मन नको, पाहावयाला व ऐकावयाला डोळ्यांची व कानाची गरज नाहीं व जिवंत राहवयाला प्राणाचीही अपेक्षा नाहीं; सारांश, स्वव्यापार करण्याला अज्ञानी जीवास ज्या साधनांची अपेक्षा असते तीं साधनें ब्रह्माचे ठिकाणीं नाहींत व नकोही आहेत; पण यामुळें

त्याचे सर्व व्यापार स्तब्ध होत नाहींत; इतकेंच नाहीं, तर हें ब्रह्म जीवांच्या वाणीला बोलण्याचें सामर्थ्य देतें, मनाकडून विचार करवितें, नेत्रकर्णांला रूप–शब्दांचें ग्रहण–सामर्थ्य देतें आणि प्राणाला जिवंत राहण्याचें सामर्थ्य देतें. हा ब्रह्माचा व्यापार व त्याचें प्रवर्तकत्व हीं अखंड आणि अबाधित असतात. सूर्य-प्रकाश झाल्याबरोबर नेत्राला स्वविषय दिसूं लागतात. आकाशाच्या अस्तित्वानें मात्र कर्णाला शब्द ग्रहण करण्याचें सामर्थ्य असतें. पण पाहण्यासाठीं सूर्याला नेत्राची गरज नाहीं अथवा आकाशाला कर्णाची अपेक्षा नाहीं हें आपण नित्य पाहतों. लोहचुंबक सर्वांनीं पाहिलेलाच आहे. हा स्वतः आपलें स्थान न सोडतां केवळ स्वसामर्थ्यानें लोखंडामध्यें चलनवलनाचे व्यापार उत्पन्न करितो; पण या वर दिलेल्या उदाहरणांपैकीं प्रत्येक उदाहरणांत एका पदार्थाला एकच प्रकारचें सामर्थ्य असतें, असें आहे. सूर्य पाहण्याचें सामर्थ्य देईल पण ऐकण्याची शक्ति देणें त्याच्या स्वाधीन नाहीं. याचप्रमाणें इतर सर्व सामर्थ्यांची गोष्ट आहे. पण ब्रह्मामध्यें मात्र कोणतीहि उपाधि नाहीं. तथापि त्याला सर्व प्रकारचे व्यापार घडवून आणण्याचें सामर्थ्य आहे. सारांश, ब्रह्म निरुपाधिक आहे आणि म्हणून स्वतंत्रही आहे. हें ध्यानांत रहावें आणि ज्या कांहीं वस्तूंना आपण ब्रह्म समजून अथवा परमेश्वर समजून त्यांची उपासना करित असतों, तें खरें ब्रह्म नव्हे हें समजावें, म्हणून वरील मंत्रपंचकाचा अवतार आहे.

हें सांगण्याचें कारण उघड आहे. कित्येक लोक महाभूतांची मात्र उपासना करून व त्यांचें स्वरूप समजून घेऊन आपण कृतार्थ होऊं, असें समजतात. यांनाच हल्लीं नास्तिकवादी असें म्हणण्याचा प्रघात आहे. हा पंथ म्हणजे चार्वाकदर्शनाची सुधारून वाढविलेली नवीन आवृत्ति आहे. या दृश्य विश्वाच्या पलीकडे कांहीं नाहीं, दृश्य विश्व समजून घेऊन जीवानें आपली सत्ता ज्यास्त वाढविली आणि उपभोगाचे विषय सुकर आणि सुखकर करून आपली जीवित-यात्रा सुलभ केली, म्हणजे जीवाचें इतिकर्तव्य संपलें, असें या लोकांस वाटतें. श्रुतीला असें सांगावयाचें आहे कीं, दृश्य विश्व समजलें किंवा त्यांतील सर्व सामर्थ्यांवर आपली सत्ता प्रस्थापित झाली व त्यांची उपासना सिद्ध झाली म्हणजेच जीवाचें अथवा समाजाचें ज्ञातव्य अथवा कर्तव्य संपत नाहीं; कारण आपल्या स्वरूपामध्येंच अशी एक वस्तु आहे कीं जी समजल्याशिवाय किंवा जिची उपासना केल्याशिवाय जीवाला अथवा समाजाला अखंड शान्ति मिळावयाची नाहीं. विश्वरूप समजलें आणि त्याच्या उपासनेनें विश्वांतील सर्व सामर्थ्ये आपल्या आधीन झालीं, तरी या विश्वाचा कर्ता कोण, त्याचा चालक कोण, या अखिल ब्रह्मांडाचें पुढें काय होणार आहे, इत्यादि प्रश्न कितीही जोरानें निरुद्ध केले, तरी ते चेंडूच्या उसळीप्रमाणें पुनः पुनः उत्पन्न होऊन वर येतात आणि जीवामध्यें असमाधान उत्पन्न करितात. असो; आधिभौतिक उपासनेच्या व ज्ञानाच्या पुढें जाऊन जीव हाच कर्ता

व करविता आहे; जीवाचें दृश्य स्वरूप समजून घेतलें, व्यक्तीच्या आणि समाजाच्या आशा व वासना तृप्त करून जीवतत्वाची उपासना केली म्हणजे ज्ञातव्य व कर्तव्य संपलें असें म्हणणारा एक पक्ष आहे. दीनांचें कल्याण करावें, परस्वापहार करूं नये, आपली नीति उत्तम ठेवावी, विश्वांतील व्यक्तींमध्यें जे भेदाभेद आहेत ते समूळ नष्ट करावे, हीच खरी उपासना आहे, हेंच खरें ज्ञान आहे, युक्तीला हेंच मानवतें, याच्या पलीकडे आपल्यास कांहीं समजावयाचें नाहीं, असें म्हणणारा हा पक्ष आहे. आपल्या येथें गौतम नांवाचा बुद्ध अवतीर्ण झाला तो या पक्षाचा नायक आहे. फ्रान्स मधील कॉम्प्टे, इंग्लंड मध्यें मिल, मोर्ले, हॅरिसन इत्यादि अनेक तत्त्वज्ञ या पक्षाचे पुरस्कर्ते झाले. या पक्षांत (व्यक्तिस्वरूपांत अथवा समष्टींत) सत्याचा अंश पुष्कळ आहे. तथापि येथें ज्ञानाचा प्रवाह व कर्तव्याचा प्रवाह थांबून धरितां येत नाहीं. 'सर्व जीवांच्या सर्व वासना तृप्त झाल्यावर मला पूर्ण आनंद होईल काय?' असा मिल नामक तत्त्वज्ञाला तळमळ उत्पन्न करून चिंतामग्न करणारा प्रश्न उत्पन्न झाला होता; पण या प्रश्नाचें उत्तर त्याला आपल्या तत्त्वज्ञानाच्या पद्धतीप्रमाणें देतां आलें नाहीं. त्यानें काव्यें वगैरे वाचून कसें बसें आपलें समाधान करून घेतलें हें निराळें, पण प्रश्न हा आहे कीं, जीवाच्या दृश्य स्वरूपाचें ज्ञान झालें व त्याच्या सर्व विषयवासना पूर्ण झाल्या म्हणजे ज्ञानाची मर्यादा संपते कीं काय व जीवाची कर्तव्यता पूर्ण होते कीं काय? या प्रश्नाला वरील तत्त्वज्ञ समाधानकारक उत्तर देत नाहींत.

याच्या पुढचा प्रश्न म्हटला म्हणजे आस्तिक धर्ममीमांसकांचा होय. हे लोक भक्तीनें परमेश्वराचें अस्तित्व स्थापन करितात. 'सर्व कर्ता व करविता परमेश्वर आहे, तो एकच एक असून स्वतंत्र आहे, त्याची उपासना केली व त्याचें स्वरूप आपआपल्या धर्मग्रंथांवरून समजून घेतलें, विश्वांतील पदार्थांचें ज्ञान करून घेऊन जीवयात्रा सुखकर केली, उत्तम सदाचरण ठेविलें आणि प्रत्येकानें आपआपलें कर्तव्य केलें म्हणजे आपले चारी पुरुषार्थ सिद्ध होतात;' असें या पक्षाचें मत आहे. आपल्या येथील सर्व धार्मिक पंथ हेंच म्हणतात. पार्शी, मुसलमान, ख्रिस्ती, इत्यादि विशिष्ट धर्माचे अनुयायी हेंच म्हणत आले आहेत. सारांश, 'महायोजक आणि सर्वव्यवस्थापक जो सर्वव्यापी आणि सर्वदयाघन परमेश्वर त्याचें स्वरूप आपआपल्या धर्मग्रंथांवरून समजून द्यावें, त्याची अखंड उपासना करावी आणि आपलें आचरण स्वतःचें व स्वेतरांचें उत्तम कल्याण करील असें ठेवावें; असा या धार्मिक तत्त्वज्ञांचा आशय आहे. अर्थातच या तत्त्वज्ञांच्या मतांत सत्याचा पुष्कळच अंश आहे व प्रत्येक जीवानें वर ज्या ज्या पक्षांचा उल्लेख केला आहे, त्यांनीं प्रतिपादित केलेल्या सत्याचें व कर्तव्याचें ग्रहण केलेंच पाहिजे. या मार्गांतून गेलें तरच जीवाचें परम कल्याण होणार आहे. हें सर्व खरें; पण श्रांति येथें थांबत नाहीं; कारण अंतिम तत्त्वज्ञानाची जिज्ञासा एकत्व प्राप्त झाल्याखेरीज स्तब्ध राहणें शक्य नाहीं. तसेंच, विचाराचा प्रवाहही येथें अडवून धरल्यासारखा दिसतो.

परमेश्वराचें स्वरूप समजलें, जीवाचें स्वरूप समजलें व विश्वाचेंही पूर्ण ज्ञान झालें, तरी जीव, विश्व आणि परमेश्वर, यांमध्यें परस्पर-संबंध काय आहेत; हें वरील पक्षत्रयाच्या तिन्ही प्रतिपादनांनीं नीटसें समजत नाहीं. विश्व कां उत्पन्न झालें ? जीवाची यात्रा दुःखपर कां असते ? परमेश्वराचा आणि जीवाचा संबंध सेव्यसेवकत्वाचा कां असावा ? असें कांहीं एक तत्त्व आहे का, कीं जें जीव आणि परमेश्वर या तिन्ही पदार्थांस अंतर्भूत करील, इत्यादि अनेक प्रश्न आपआपल्या उत्तरासाठीं जीवापुढें दत्त म्हणून पुढें उभे राहतात. या सर्व प्रश्नांचा उलगडा व्हावा म्हणून तर श्रुतीचा अवतार आहे. ती स्पष्ट सांगते, कीं जीवांनों ! तुम्हीं ज्या ज्या उपाधियुक्त पदार्थांची उपासना करित आहांत, ते खरें ज्ञातव्य नव्हे. मग 'ज्ञातव्य ब्रह्म तरी कोणतें ?' याला उत्तर श्रुति देते. हें ज्ञातव्य म्हणजे सर्वप्रवर्तक, सर्वउपाधिशून्य, सर्वथा स्वतंत्र, असें एक व्यापक ब्रह्म आहे. हें जाणून घ्या आणि याची उपासना करा म्हणजे वर जे जे प्रश्न उत्थापित झाले आहेत, त्या सर्वांचें समाधान होईल, ज्ञातव्य संपेल आणि कर्तव्यही अवशिष्ट राहावयाचें नाहीं.

हें श्रुतीचें सांगणें केवळ अपूर्व आहे. आम्हांस या अद्वितीय श्रुतिग्रंथाचा लाभ झाला, हें आमचे परम भाग्य होय. इतर देशांतील तत्त्वज्ञांनीं आपल्या बुद्धीच्या जोरावर विश्वाचा उलगडा करण्याची पुष्कळ खटपट केली आहे, व त्यांच्या ह्या भगीरथ-प्रश्नाला पुष्कळसें यशही आलें आहे. आमच्या येथेंही चार्वाकापासून तों श्रीमत् रामानुजाचार्यापर्यंत पुष्कळ तत्त्वज्ञांनीं वरील प्रश्नाला समाधानकारक उत्तरें देण्याची शर्थ केली आहे, व आपल्या म्हणण्यास श्रुतीचा आधार आहे, असें प्रत्येक प्रसंगीं या आचार्यांनीं दाखवून दिलें आहे. तथापि जीव, विश्व आणि शिव हे स्वरूपतः एकच आहेत, सर्वत्र तादात्म्य संबंध आहे, एक ब्रह्मतत्त्वाशिवाय दुसरा पदार्थच नाहीं, द्वितीयत्वाचें जें ज्ञान होतेसें दिसतें, तें सोपाधिक म्हणून मिथ्या आहे, असें सर्व श्रुति एकच स्वरानें व एकतानतेनें सांगतात. असो; हें स्पष्टपणानें समजून घेतलें तरच आपल्याला अखंड शांति मिळेल, असें मला वाटतें.

असो. हा जो वर प्रपंच केला आहे, त्याचा इत्यर्थ इतकाच आहे कीं, उपाधिशून्य परब्रह्माचें स्वरूप सोपाधिक जीवांस समजावयाचें नाहीं आणि हा सोपाधिक जीव ज्याची परम आस्थेनें उपासना करितो ती वस्तु सर्वशः अंतिम उपास्य नव्हे, हें श्रुतीचें तत्त्व या पुस्तकाच्या आस्तिक विचारी पुरुषांनीं सहज समजावें.

याप्रमाणें पहिल्या खंडाचा विचार झाला. येथें ब्रह्माचा म्हणजे इंद्रियांस स्वव्यापाराविषयीं नियमांनीं प्रवृत्त करणाऱ्या सर्वव्यापी व स्वतंत्र तत्त्वाचा विचार झाला. सर्व प्रवृत्ति ब्रह्माच्या सत्तेनें होते, तें स्वतः निरपेक्ष आणि निरुपाधिक आहे, असें विस्तारानें सांगितलें आणि श्रोत्र-कर्णादि उपाधींच्या

पलीकडे आपल्या ज्ञानाचा प्रवाह जाईल, अशी सद्गुरूच्या साहाय्यानें जाणीव उत्पन्न करून घ्यावी, आणि जी अवश्य उपासना करावयाची आहे, ती या ब्रह्मस्वरूपाची मात्र करावी, असा उपदेश ह्या पहिल्या खंडांत झाला आहे. येथून पुढें दुसऱ्या खंडाचा उपसंहार–दृष्टीनें विचार करावयाचा.

मागें जें विवेचन झालें त्यावरून वाचकांची व साधकांची अशी कल्पना कदाचित् होईल कीं, आपल्यास आतां पूर्ण ब्रह्मज्ञान झालें; म्हणजे समजावयाचें असें कांहींएक शिल्लक राहिलें नाहीं. हीच समजूत पुष्कळ तत्त्वज्ञांचीही झालेली दिसते. पाश्चात्य देशांत अलीकडे जे तत्त्वज्ञ झाले, श्रुतीचें कोणत्याही प्रकारचें साहाय्य नसतां केवल आपल्या कल्पना-प्रतिभेच्या विचारी सामर्थ्यानें ज्या माहात्म्यांनीं विश्वाची व्यवस्था लावण्याचा प्रयत्न करून कांहीं अनुभवशुद्ध प्रमेयें जगजाहीर केलीं, त्यांत इंग्लंडांत अवतीर्ण झालेले स्पेन्सरसाहेब हे प्रमुख आहेत. या महात्म्यानें ठरवून टाकिलें कीं एक सर्व-व्यापी, सर्वाधार, स्वतंत्र, सर्वविकारशून्य आणि केवल–स्वरूपाचें असें एक तत्त्व आहे कीं, ज्याच्या सत्तेनें या विश्वाच्या सृष्टि-स्थिति-लयांचे व्यापार निराबाध रीतीनें चालले आहेत. येथपर्यंत या तत्त्वज्ञाचे विचार ठीक आहेत; पण याच्याही पुढें जाऊन ते असें म्हणतात कीं, हें स्वतंत्र तत्त्व जीवास केव्हांही म्हणजे कोणत्याही अवस्थेमध्यें समजणें शक्य नाहीं. आपल्यास विश्वव्यवस्था कदाचित् समजेल; पण प्रकृति, तिचे गुणधर्म, काल आणि आकाश इत्यादि कोठून कशीं पैदा झालीं, हें समजावयाचें नाहीं. मग, विश्वरूप समजलें म्हणजे आपलें काम आटोपलें कीं काय? या व अशाच इतर प्रश्नांची दुसऱ्या खंडामध्यें मीमांसा व्हावयाची आहे. ब्रह्म सर्वथा अज्ञेय आहे कीं काय, हा प्रश्न श्रुतीला जीवांच्या कल्याणार्थ सोडवावयाचा आहे.

मागें ज्या भाष्यांचा अवतार केला आहे आणि ज्यांच्या पुष्कळशा साहाय्यानें मीं माझें विवरण तयार केलें आहे, त्यांमध्यें दुसऱ्या व तिसऱ्या मंत्राचें तात्पर्य काय हें विस्तारानें व संक्षेपतः सांगितलेंच आहे. बुद्ध्यादि उपाधीस ब्रह्मज्ञान–विज्ञान होणें अशक्य आहे हें कळलें आणि सद्गुरूकडून परोक्ष स्वरूपज्ञान करून घेतल्यावर मात्र आत्मसाक्षात्कार होतो, हें समजलें म्हणजे जीवाला ब्रह्मज्ञान झालें. निदान ब्रह्मज्ञानाचा मार्ग तरी समजला असें होतें; हा या दोन मंत्रांचा भावार्थ आहे. ब्रह्म समजणें अशक्य आहे तरी ब्रह्म होतां येणें शक्य व संभवनीय आहे; ही गोष्ट श्रुतीशिवाय इतर कोणासही समजली नाहीं व समजणें शक्यही नाहीं. तात्पर्य, श्रुतीचा आधार नव्हता व नाहीं म्हणून यूरोपियन लोक नास्तिक, संशयवादी-निदान अज्ञेयवादी तरी-बनले.

आतां 'ब्रह्म अज्ञेय आहे तथापि सद्रूप आहे, इत्यादि अवघड व घोटाळ्यांत घालणाऱ्या श्रुति–तात्पर्यांची चर्चा करित बसून फायदा काय?' व्यव-

हार चालविण्याला या शुष्क आणि रसहीन वादानें कांहीं मदत होते काय? नीतीचा किंवा भक्तीचा परिपोष होतो काय? व्यक्तीचें किंवा समाजाचें परम कल्याण होऊन त्यांचे ज्ञानाच्या वृद्धीला कांहीं साहाय्य होतें काय? इत्यादि प्रश्न प्रत्येक नास्तिक म्हणजे वेदश्रद्धाशून्य पुरुषाला व कित्येक स्वदेशी आणि विदेशी आस्तिक लोकांना उत्पन्न होण्याचा संभव आहे. हे व ह्यांच्यासारखे अनेक प्रश्न पूर्वकालींही उत्पन्न झाले होते व पुढेंही उत्पन्न होतील. त्यांचा ह्या दुसऱ्या खंडांत श्रुतीनें थोडासा समाचार घेतला आहे, त्याचा थोडासा विस्तार येथें करितो.

या खंडाच्या चवथ्या मंत्रांत सांगितलें आहे कीं, ज्याला आत्मज्ञान होतें व आत्मसाक्षात्कार होतो, त्याचें तेज व पराक्रम अत्यंत तेजस्वी असतात आणि विद्येच्या अधिगमानें म्हणजे प्राप्तीनें त्या पुरुषाला अमृतत्वाचा लाभ होतो. प्रत्येक विचारी पुरुषास हें तत्त्व संमत झालेंच पाहिजे, असें मला वाटतें. व्यवहार आणि परमार्थ यांची ताडातोड करण्याचा जो प्रयत्न आपल्या येथें व इतर देशांतही झाला तो महाघातकारी आहे व त्याचे परिणामही अनर्थाची उत्पत्ति करणारे झाले आहेत, अशी माझी स्वतःची समजूत आहे. जीवाचें परम कल्याण होणें हा अंतिम पुरुषार्थ आहे, हें परम कल्याण म्हणजे जीवानें आपलें स्वतःचें स्वरूप प्राप्त करून घेणें हें होय; हें स्वरूप ज्ञानात्मक, सुखात्मक आणि अस्तित्वात्मक आहे. जीवाचें मूळचें स्वरूप सच्चिदानंदात्मक आहे, असें वेद सांगतात. विचारास ही गोष्ट पटते आणि अनुभवानेंही ही गोष्ट सिद्ध होते. हेंच मूळचें स्वरूप जीवास प्राप्त करून घ्यावयाचे आहे. यासाठींच ज्ञानाची, कर्माची आणि भक्तीची प्रवृत्ति आहे. ज्या शांतीमध्यें दुःखाचा अंश नाहीं, अज्ञानाचा लेश नाहीं व मृत्यूची भीति नाहीं, ती अखंड शांति प्राप्त करून घ्यावयाची आहे. हें जर खरें असेल तर त्या प्राप्तीला एकच मार्ग आहे. तो हा कीं ज्या उपाधींमध्यें गुरफटून गेल्यामुळें स्वरूपाची विस्मृति झालेला जीव अज्ञानांत, दुःखांत आणि भीतीच्या चक्रांत सांपडलासा दिसतो, तें हें उपाधिजन्य अज्ञान, ही भीति आणि हें दुःख, नाहींसें करावयाला स्वरूपाचें आणि उपाधींचें ज्ञान पूर्ण होणें, हाच सामर्थ्यवंत उपाय आहे. उपाधींचें ज्ञान पूर्ण होण्याला विश्वाचें निरीक्षण उत्तम प्रकारानें सिद्ध झालें पाहिजे. या विश्वव्यवस्थेचा असा संकेत दिसतो कीं, जीवाला अविद्येमुळें जें अज्ञान प्राप्त झालें आहे त्याचा निरास करण्याला, स्वरूपविज्ञानाच्या आधीं, उपाधींचें पूर्ण ज्ञान होऊन त्यांचा परित्याग करण्याचें सामर्थ्य जीवाला झालें पाहिजे. भोग-दृष्टीनें उपाधि अज्ञानांत ढकलतात पण ज्ञानदृष्टीनें याच उपाधि जीवाच्या विमोचनास कारण होतात. यांची उदाहरणें पहावयास फार लांब जावयास नलगे. अज्ञानाला वश होऊन पुत्रकलत्रावर भोगदृष्टीनें ममत्व केलें तर जे जीव आपल्यास व आपल्या कुलांस बंधामध्यें घालण्यास कारण

होतात, तेच जर पुत्र, मित्र, कलत्रादिकांस ज्ञान-दृष्टीनें वागवितील तर ते कुलदीपक आणि समाजाचे उद्धारक होतील. वास्तविक पाहिलें असतां संसार हें बंधाचें कारण नाहीं, इतकेंच नव्हे, तर योग्य रीतीनें चालविला असतां हाच संसार जीवाला मुक्त करण्याचें साधन होतो. बंध व मोक्ष हे मनाचे खेळ आहेत. मन भोगदृष्टीनें व्याप्त झालें असेल तर जो संसार बंधनाला कारण होतो, तोच संसार ज्ञानदृष्टीनें जीवाला मोक्ष प्राप्त करून देण्याचें उत्तम साधन होतो. हे गूढ तत्त्व आमच्यांतील गुरुपरंपराभ्रष्ट झालेल्या कांहीं लोकांस समजलें नाहीं, म्हणून त्यांनीं संसाराच्या स्वरूपाचें भेसुर चित्र रेखाटलें आहे. पहा कीं, आपला स्वतःचा स्वार्थीभोग नाहींसा करण्याला पुत्रप्रेम जितकें साहाय्य करितें, तितकें साहाय्य एकदम प्राप्त झालेलें ज्ञान करीत नाहीं. याचप्रमाणें गृहस्थाश्रमामध्यें जे पंचमहायज्ञ सांगितले आहेत ते स्वार्थीभोग हळुहळू कमी व्हावे आणि वासना क्रमाक्रमानें मावळत जावी यासाठीं सांगितले आहेत. कुटुंब-संरक्षण व परिपोषण, समाज-संरक्षण व समाज-प्रगति, राष्ट्र आणि विश्व यांचें संरक्षण व प्रगति व्हावी, एतदर्थ या संस्थांची योजना दूरदृष्टि असणाऱ्या शास्त्रानें केली आहे. अन्नग्रहण करण्याचे 'वेळीं मनुष्यांचें आणि पशूंचें कल्याण होवो' अशी जी प्रार्थना विहित केली आहे, भूत-यज्ञ करावयास जो सांगितला आहे, ती प्रार्थना व तो यज्ञ केवल मंत्र म्हटल्यानें किंवा बलिहरण करतांना भूतांच्या नांवानें एखादा घास टाकल्यानें सफल व्हावयाचीं नाहींत. जशी आपण प्रार्थना करितों, त्या प्रकारचें कांहीं तरी प्रत्यक्ष कर्म (जीवविमोचन) आपल्या हातून झालें पाहिजे. ह्याचप्रमाणें नुसत्या बलिहरण करण्यानें, भूतयज्ञ सिद्ध व्हावयाचा नाहीं. आपल्या सामर्थ्यानुसार आपण कांहीं तरी अनाथ जीवांचा समाचार रोजच्यारोज घेतला पाहिजे, असा वैश्वदेवांतील बलिहरणाचा अर्थ आहे. अर्थात् हे पंच महायज्ञ करावयाचे म्हणजे आपल्यास आपल्या स्वतःच्या योगक्षेमाचें सामर्थ्यही वाढविलें पाहिजे. आपण विश्वाचें व त्यांतील सामर्थ्याचें ज्ञान शक्त्यनुसार संपादन करून, भूतकल्याण करावयाचा प्रामाणिक संकल्प निष्कामबुद्धीनें केला म्हणजे परमेश्वराचा अनुग्रह होऊन, आपल्या योगक्षेमाचें सामर्थ्य वाढतें आणि हळू हळू वासनेचा व अभिमानाचा क्षय, ज्ञानाचीं जशी जशी वृद्धि होते, तसतसा होत जातो. वासना मारण्याला संन्यास घेऊन, वनांत जाण्याचीच आवश्यकता आहे असें नाहीं. शिवाय माझ्या समजुतीनें अज्ञानकाळीं झालेलें वैराग्य दुःखास व बंधास मात्र कारण होतें. चित्तशुद्ध न झालेल्या विश्वामित्राचा तपोभंग एका क्षणांत करण्यास एक सुंदर विश्वयोषिता लीलेनें समर्थ झाली! पण ज्ञानी जनकराजा सामंतचक्राचा राज्यकारभार चालवीत असतांही आपल्या स्वरूपापासून च्युत झाला नाहीं. तात्पर्य हें कीं प्रपंचांतील पंचमहायज्ञ हे आपल्या संसारी कर्तव्याची दिशा मात्र दाखवितात

व स्पष्ट सांगतात कीं आपल्या वर्तनाचें धोरण या यज्ञानुसार असलें पाहिजे, असें झालें म्हणजे संसारांतच परमार्थाला प्रारंभ होतो.

असो. मला विशेष आग्रहानें हें सांगावयाचें आहे कीं, प्रपंचाचा आणि परमार्थाचा जो वास्तविक संबंध आहे तो आमचे अर्वाचीन पूर्वज विसरून गेले आणि संसार भयप्रद आहे असा भलताच दुराग्रह घेऊन बसले. संसार नाश करितो. कोणाचा ! जो नित्य भोगदृष्टीनें मात्र संसारामध्यें गुंतून राहातो त्याचा नाश संसार करितो. आतां भोगदृष्टिच असेल तर केवढेंही वैराग्य बळेंच पत्करिलें, परमार्थाचे कीतीही शब्द कानावर येऊन आदळले किंवा जिव्हेच्या द्वारानें निघाले तरी त्यांचा कांहीं एक उपयोग होत नाहीं, हें विश्वामित्राच्या व पराशराच्या, गौतमाच्या, जमदग्नीच्या इत्यादि अनेक उदाहरणांवरून सिद्ध करून देतां येईल. तात्पर्य, अग्नि हा स्वयंपाकाच्या उपयोगीं पडतो, तसाच तो यजमानाचे घराची राखरांगोळी करूं शकतो. त्याप्रमाणें संसाराची स्थिति आहे. योजकाच्या खऱ्या ज्ञानावर बंध किंवा मोक्ष प्राप्त होणें हें अवलंबून असतें. तेव्हां प्रपंच आणि परमार्थ यांच्या वास्तविक संबंधाचा आमच्या अलीकडील पूर्वजांनीं विपर्यास केल्यामुळें वेदान्ताच्या संबंधानें लोकांच्या मनांत, विशेषतः अलीकडील शिकलेल्या लोकांच्या मनांत, एक विलक्षण अढी उत्पन्न झाली आहे. ते स्पष्ट विचारतात कीं, वेदान्ताच्या परिशीलनानें जर आमचें प्रापंचिक कल्याण होत नाहीं, जर आमचा समाज दिवसेंदिवस दुबळा आणि नेभळा होत चालला आहे, तर जगांतील हल्लींच्या जीवनकलहास कोणत्याही प्रकारें उपयोगी न पडणारा हा तुमचा वेदान्त शिकून किंवा घोकून कांहीं एक फायदा होईल असें आम्हांस वाटत नाहीं.

हा आक्षेप सर्वथा विचारणीय आहे. आणि यांचें समाधानकारक उत्तर दिल्याशिवाय आपल्या समाजाला या अपूर्व वेदान्त सिद्धान्ताचा जो लाभ झाला आहे, त्याचें सार्थक्यही व्हावयाचें नाहीं. म्हणून या खंडाच्या चवथ्या मंत्रामध्यें स्वच्छ आणि स्पष्ट रीतीनें श्रुति प्रतिपादन करिते कीं जीवांच्या सामर्थ्याचा परिपोष होण्याला आत्मज्ञानासारखें दुसरें साधन नाहीं.

व्यवहार तर आपण सर्वजण करितोंच; पण ज्या व्यवहाराला नीतीचें पाठबल नाहीं तो व्यवहार लुला पडतो, असें इतिहासाच्या वाचकांस सांगण्याचें कारणच नाहीं. नीति म्हणजे स्वार्थी व्यवहाराला नियमित करणारे सिद्धान्त होत. परापकार न करितां, परोपकार करीत राहिलें, तरच आपला व्यवहार ठीक चालेल, हें नीतीचें सांगणें आहे. इतर कारणें व सामग्री सारखींच असतां, केवळ नीतीच्या सामर्थ्यानें एक समाज दुसऱ्या समाजाचा पाडाव करितो, हें सिद्ध करण्यास कोणत्याही देशांतील कोणत्याही कालाचा इतिहास सदैव सिद्ध आहे. मात्र नीतीचे नियम परोपकारी असून, त्यांचें आचरण हाडामांसांत खिळून गेलेलें

असलें पाहिजे. नीतीला धमार्चें आणि ज्ञानार्चें पाठबळ अवश्य हवें; हें नसेल तर नीतीचे सिद्धान्तही पंगु होतात. एका पाश्चात्य नीतिग्रंथांत एकां वाव-दूकानें आपल्या बापाला असा प्रश्न केला आहे कीं, 'मला न विचारतां किंवा माझें संमत न घेतां तूं मला जगांत काय म्हणून आणलेंस?' या प्रश्नाला धर्म-शून्य नीतिवाङ्मयाला समर्पक उत्तर देतां येणें शक्य नाहीं. कुलवृद्धि करून समाजार्चें पोषण अशा दृष्टीनें करावयार्चें कीं, ज्यायोगें आपला समाज व नंतर विश्वसमाज परमेश्वराजवळ जाऊन सुखरूप होण्याच्या योग्यतेचा होईल, हा प्रजोत्पादनाचा मुख्य हेतु आहे. असो; धर्माचें व ज्ञानार्चें अधिष्ठान म्हणजे जीवार्चें व ब्रह्मार्चें स्वरूपज्ञान होय. याप्रमाणें ब्रह्मज्ञानानें धर्म व विश्वज्ञान पुष्ट होत जातात. धर्मानें व ज्ञानानें (राष्ट्राची संपत्ति समृद्ध होऊन) नीतीला वळण मिळते आणि नीति व्यवहाराला शुद्ध करिते. पण आमच्यापैकी, कांहीं भोंदू ब्रह्मज्ञानी लोकांनीं व्यवहाराचा विचारच केला नाहीं, व व्यवहार हा बद्धक आहे, अशी समजूत करून घेऊन तिचाच अवाढव्य प्रसार केला म्हणून आमची नीति लंगडी पडली, शील नाहींसें झालें, धर्म अर्थशून्य झाला आणि शेवटीं ब्रह्मज्ञान ही केवळ धोकेपट्टीची विद्या झाली. असो. झाल्या गोष्टीचा खेद कर-ण्यांत कांहीं अर्थ नाहीं. आपण आपलीं कर्तव्यें करण्यास म्हणजे विश्वज्ञान वाढ-वून निष्काम कर्माचा संचय करावयास शिकलें पाहिजे, हेंच मला विशेषतः सांगावयार्चें आहे. वेदान्तार्चें रहस्यही हेंच आहे आणि परमेश्वराचा संकल्पही असाच दिसतो.

या खंडांतील पांचव्या मंत्रार्चें वरवर अवलोकन केलें तरी मी म्हणतों, याची सत्यता वाचकांच्या नजरेस येईल. 'भूतेषु भूतेषु विचित्य धीराः' या मंत्रखंडां-तील प्रत्येक पदाचा आपण नीट विचार केला, तर असें ध्यानांत येईल कीं प्रत्येक वस्तूचें स्वरूप नीट समजून घेऊन सर्व भूतांमध्यें जें एक सामान्य तत्त्व ओतप्रोत भरलें आहे, त्यार्चें ज्ञान कार्यक्षम आणि चित्तशुद्ध झालेले पंडित योग्य रीतीनें करून घेतात व स्वतःच्या अनुभवानें गुरूंपासून प्राप्त झालेले ज्ञान वाढवितात. असा या पदांचा सरळ अर्थ आहे. हा अर्थ समजून त्याप्रमाणें आचरण केलें तरच जीवाला अमृतत्वाचा लाभ होईल हें श्रुतीचें सांगणें आहे. याचा विचार वेदान्ताच्या विद्यार्थ्यांनीं अवश्य करावा.

वेदान्तासंबंधानें आणि विशेषतः श्रुतींचें आत्मरूप झालेल्या अद्वैत वेदा-संबंधानें, अलीकडील शिक्षणानें व्यवहारैकपर झालेली विद्वान् मंडळी व सर्व द्वैत-वादी यांचा एक मोठा गैरसमज झालेला आहे. तो हा कीं 'प्रत्यक्ष दिसणाऱ्या प्रपंचाला व विश्वाला अस्तित्वच नाहीं असें अद्वैत सिद्धान्ती सांगतात; पण हें त्यांचें म्हणणें न्यायाला आणि अनुभवाला पटत नाहीं.' हा आक्षेप नाहींसा करावयाचा असेल, आपल्या श्रुतींचें रहस्य समजून घेऊन तिनें प्रणीत

केलेल्या सिद्धान्तांचें माहात्म्य वाढवावयाचें असेल, स्वतःचें, स्वराष्ट्राचें आणि स्वविश्वाचें अपरिमित कल्याण करणें हें कर्तव्य परम पुरुषार्थाचें असेल, तर प्रत्येक ज्ञानाभिमानी व धर्माभिमानी सुज्ञ पुरुषांनीं ब्रह्म-सिद्धान्त समजून घेऊन त्याचा योग्यरीतिनें प्रसार करावा अशी करद्वय जोडून माझी प्राचीन पद्धतीनें वागणाऱ्या व अर्वाचीन पद्धतीनें राहाणाऱ्या सर्व लोकांस नम्र विनंति आहे.

ब्रह्मज्ञान बरोबर झालें तर जीवाचे सर्व पुरुषार्थ सिद्ध होतील आणि तें झालें नाहीं तर त्याचा सर्वस्वी घात होईल असें पांचवा मंत्र स्पष्ट सांगतो, याचा तरी विचार आमच्या लोकांनीं नीटपणें आणि शांतपणें करावा.

आणखी एक गोष्ट सांगून हा विस्तृत झालेला विचार आटोपता घेतों. ब्रह्मज्ञान-विज्ञान होणें ही गोष्ट योग्य मार्गानें गेलें असतां जितकी सुकर आणि सुखकर आहे, तितकीच अवैदिक मार्गानें गेलें असतां दुष्कर आणि दुःखकर आहे. चित्तशुद्धि झाल्याशिवाय म्हणजे भोग-दृष्टि संपल्याशिवाय म्हणजे विषय-वासना आणि देहाचा अभिमान या द्वयीचा निशेष संहार झाल्याशिवाय ब्रह्मज्ञानविज्ञान व्हावयाचें नाहीं. 'अहं ब्रह्मास्मि' असें माझ्यासारखे लोक पुष्कळ वेळ बडबडत असतात; पण आपल्या उपभोगाच्या मार्गामध्यें किंवा अभिमानाच्या पंथामध्यें एखादा क्षुल्लक प्रत्यवाय आला तर त्याचें देहभान आणि ज्ञानभान नाहींसें होऊन हे लोक अज्ञानी लोकांपेक्षांही ज्यास्त स्वैर आचरण करूं लागतात. एक सामान्य गोष्ट हरिदास लोक सांगत असतात. ती प्रकृत विचारास अनुकूल आहे, म्हणून तात्पर्यरूपानें येथें सांगतों. ब्रह्मज्ञानाचें पुराण ऐकणाऱ्या एका राजाला हें ज्ञान सद्गुरूकडून समजून घ्यावे अशी इच्छा उत्पन्न झाली. तो ब्रह्मज्ञानी सद्गुरूला शरण गेला आणि त्याला नमस्कार करून त्यानें आपली जिज्ञासा प्रकट केली. 'तुझें चित्त शुद्ध झालें नाहीं म्हणून तुला हें ज्ञान समजावयाचें नाहीं व तुझें कल्याणही व्हावयाचें नाहीं' असें त्या महापुरुषानें राजास सांगितलें. पण या नूतन राजविलासी साधकाची समजूत पटेना. तेव्हां गुरुजींनीं त्याला विचारलें कीं, 'तूं आज येथें येतानां कांहीं चमत्कारिक गोष्ट पाहिली आहेस काय?' राजा म्हणाला,—येतांना एक चांगला घट्टा कट्टा उंट आपल्या पायांनीं चालत असतां एकाएकीं खालीं पडला आणि मेला. हें ऐकून त्या सिद्ध पुरुषानें राजास सांगितलें कीं, तूं आपल्या इष्ट देवतेचें ध्यान करावयास लाग; पण ध्यान करितांना मेलेल्या उंटाचें स्मरण होऊं देऊं नकोस. हें तुझें ध्यान सिद्ध झालें म्हणजे मी तुला ब्रह्मोपदेश करीन. राजा आनंदानें परत गेला आणि शुचिर्भूत होऊन ध्यान करावयास बसला. पण ज्या ज्या वेळेला तो इष्ट देवतेचें ध्यान करावयास लागे, त्या त्या वेळीं त्याच्या मनांत त्या मेलेल्या उंटाची आकृति प्रत्यक्ष होत असे. त्यानें पुष्कळ खटपट केली पण उंटाचें विस्मरण त्यास होईना. पुष्कळ दिवस त्याचा हा प्रयत्न विफल झाला. तेव्हां

निरुपायानें तो राजा त्या सिद्ध पुरुषाकडे गेला आणि आपली अडचण त्यास सांगता झाला. तेव्हां सिद्धपुरुषानें सांगितलें कीं, 'बाबा तुला किळसवाणे विषयांचें विस्मरण जर अद्यापि करितां येत नाहीं, तर ज्या भोगात्मक संसारामध्यें तूं आजपर्यंत वाढलास त्या भोगाचें विस्मरण तुला कसें करितां येईल ? आणि हें जोंपर्यंत व्हावयाचें नाहीं. सारांश, तुझ्या इष्ट देवतेचें ध्यान जोंपर्यंत एकाग्रमनानें तुला करितां येणार नाहीं, तोंपर्यंत तुला ब्रह्मज्ञानाचा उपदेश घेण्याचा अधिकार प्राप्त व्हावयाचा नाहीं. यासाठीं प्रथम तूं प्रपंचांत राहूनच आपल्या सामर्थ्यानुसार विषयभोगाचा त्याग करावयास शिक. हें विचारानें व अभ्यासानें सिद्ध होऊं लागलें म्हणजे तुला ब्रह्मजिज्ञासेचा अधिकार प्राप्त होईल.' असो; तात्पर्य हें आहे कीं, वासनेस व अभिमानास नाहींसें करावयाचें असेल तर त्याचें उत्तम साधन म्हणजे संसारांत राहून गृहस्थाश्रमादि तिन्ही आश्रमांस विहित केलेलीं कर्में व विहित केलेलें ज्ञान आपण अवश्य करून घेतलें पाहिजे. अर्थात् ज्यांना खरें वैराग्य झालें असेल त्यांना वाटेल त्या आश्रमांत ब्रह्मज्ञानाचा अधिकार असतच आहे; पण जेथें केवल प्रसूतिवैराग्य किंवा श्मशानवैराग्य यांचें मात्र अस्तित्व आहे, तेथें ब्रह्मज्ञान केव्हांही सफल व्हावयाचें नाहीं. प्रपंच नेटका करावा व मग त्या प्रपंचांतच ज्ञानानें उत्पन्न होणारें वैराग्य साधून घेऊन परमार्थाच्या मार्गाला लागावें असें श्रीसमर्थ रामदास-स्वामीचें सांगणें आहे. श्रीएकनाथ, श्रीतुकाराम इत्यादि महाराजांचें हें नुसतें सांगणें नसून या महापुरुषांनीं प्रपंचांतच परमार्थाचा लाभ करून घेतला. असो; एकंदरींत समजून घ्यावयाचें आहे तें हें कीं, ब्रह्मज्ञान करून घेणें ही गोष्ट अत्यंत अवघड आहे तथापि अशक्य नाहीं. आणि त्याचप्रमाणें ब्रह्मज्ञान करून घेतलें तरच जीवाचें सार्थक्य होणार आहे. हें ज्ञान करून घेण्याचा अधिकार ज्याचें चित्त सर्व प्रकारांनीं शुद्ध झालें आहे व ज्याला मोक्ष मिळावा अशी इच्छा आहे त्याला मात्र असतो आणि चित्तशुद्धि व्हावयाला आरंभ होतो, तो गृहस्थाश्रमांतील नित्यनैमित्तिक व यज्ञदानतपादि कर्में करूनच होतो. हीं कर्में यथासांग करावयासाठीं आपल्यास राजमान्य व लोकमान्य पंथानें द्रव्याची प्राप्ति करून घेतली पाहिजे. द्रव्यप्राप्तीला उत्पादक अर्थ-शास्त्राच अध्ययन करून शास्त्रोक्तकर्म करणें अवश्य आहे. एवंच लौकिक नीति व पदार्थज्ञान हीं द्रव्य उत्पन्न करण्यास साह्य देतात, द्रव्यानें गृहस्थाश्रम सिद्ध होऊन चित्तशुद्धि होते, या चित्तशुद्धीला उपासनेचें साहाय्य मिळालें तर सर्वांचेंच कल्याण होतें आणि निर्मल चित्त झाल्यावर आत्मज्ञान-विज्ञानाचा अधिकार प्राप्त होतो. असा हा प्रपंचपरमार्थाचा हितकारी संयोग आहे. ही गोष्ट सर्व वाचकांनीं अवश्य ध्यानांत ठेविली पाहिजे.

पहिल्या व दुसऱ्या खंडांत जे सिद्धान्त सांगितले त्यांच्या स्पष्टीकरणार्थ तिसऱ्या खंडांत देवांस ब्रह्मज्ञान होण्याला चित्तशुद्धीची, जिज्ञासेची आणि सद्गुरुमुखाची किती आवश्यकता आहे हें समजून देण्याचा प्रयत्न केला आहे. या आख्यायिकेसंबंधानें विशेष असें कांहीं सांगावयाचें नाहीं. एक गोष्ट मात्र ध्यानांत ठेवावयाची ती ही कीं, स्वर्गांतील सुखें भोगणाऱ्या आणि राक्षसांचा पराभव केल्यामुळें महदैश्वर्य प्राप्त झालेल्या देवांची वृत्ति जरी उन्मत्त झाली होती, तथापि त्यांची जिज्ञासा वृत्ति मिळवून गेली नव्हती. सामान्यतः मानवी इतिहासांत व विशेषतः हिंदुस्थानचे अर्वाचीन इतिहासांत जिज्ञासावृत्ति जिवंत असण्याचे प्रसंग फारच थोडे आढळून येतात. संपत्तीकरितां व ऐश्वर्याकरितां अलीकडील पौरस्त्य लोक पुष्कळ प्रयत्न करितात व त्यांना केव्हां केव्हां यशाचा लाभही होतो; पण ऐहिक ऐश्वर्याचा उपभोग घेत असतां हें ऐश्वर्य कोणत्या दैवी सामर्थ्यानें प्राप्त झालें, या ऐश्वर्याचे गुणदोष काय, याच्या पलीकडे आणखी कांहीं ऐश्वर्य अथवा जाणावयासारख्या गोष्टी आहेत, कीं नाहीं, परमेश्वराचें स्वरूप आपल्या ग्रथांमधून सांगितलें आहे, तसेंच आहे किंवा त्यापेक्षां कांहीं निराळें आहे, इत्यादि प्रश्नांची स्वतः उत्पत्ति करून त्यांचा विचार करावयाचा व स्वतःच्या प्रयत्नानें अनुभव घ्यावयाचा, ही ज्ञातृत्वाची व कर्तव्याची बुद्धि आमच्या येथें जिवंत राहाते असें मला वाटत नाहीं. पूर्वीच्या लोकांमध्यें ती असे म्हणून त्याचें ऐश्वर्य वृद्धिंगत होत असे व त्यांस मोक्षाचा मार्गही सहज रीतीनें सांपडे. लक्ष्मीदेवी यांच्यावर प्रसन्न झाली असतांही ते सरस्वती देवीची उपासना अखंड जागृत ठेवीत, म्हणून त्यांच्याकडून जगताचें खरें कल्याण करणारें ज्ञान अवतीर्ण झालें. आलीकडे मात्र लक्ष्मी सरस्वतीमध्यें वैरभाव उत्पन्न झाला आहे आणि सामान्यतः लक्ष्मी असेल तेथें सरस्वतीचें वास्तव्य नसतें आणि सरस्वती [विद्या] असते तेथें लक्ष्मी राहत नाहीं, असा उभयतांमध्ये सवतीमत्सर उत्पन्न झाला आहे. ही गोष्ट सर्वतः शोचनीय होय. असो; आपण सर्वांनीं या दोन्हीं देवींमध्यें जो भेदभाव उत्पन्न झाला आहे तो नाहींसा करण्याचा प्रयत्न करावा आणि आपल्या पूर्व पूर्वजांचें अनुकरण करून त्यांची जिज्ञासावृत्ति आपण हौसेनें स्वीकारावी, म्हणजे आपल्यास सर्व प्रकारच्या दैवी-संपत्तीचा भोग घ्यावयास सांपडून आपलें ज्ञान-विज्ञानही उत्तम प्रकारानें वृद्धिंगत होईल. प्रयत्न करणें आपलें काम आहे, फलदाता श्रीपरमेश्वर आहे.

चवथ्या खंडांत सद्गुरुमुखानें ब्रह्मज्ञान प्राप्त होतें व जे पुरुष ब्रह्मज्ञानी होतात ते मात्र श्रेष्ठ पदवीच्या अत्युच्च शिखरावर जाऊन शुद्धज्ञानाचा उत्कृष्ट अनुभव घेतात, असें सांगितलें आहे. त्याचप्रमाणें मंद अधिकारी लोकांकरितां तेजस्वी स्वरूपाची, ज्ञान देणाऱ्या निर्मळ मनाची व सर्व-संरक्षक जो परमेश्वर त्याच्या नांवाची उपासना सांगितली आहे. यावरून आपण स्वतः

विश्वाचें व स्वरूपाचें ज्ञानपूर्वक अवलोकन केलें पाहिजे आणि ब्रह्मस्वरूपाचें अखंड चिंतन केलें पाहिजे, असा बोध निष्पन्न होतो. ब्रह्मविद्येला उपासनेची अत्यन्त आवश्यकता आहे, हें येथें स्पष्ट सांगितलें आहे. आधीं उपासना आणि नंतर ब्रह्मज्ञान, असा वैदिकमार्गाचा कार्यक्रम आहे. जिज्ञासा उत्पन्न व्हावी, सद्गुरुमुखानें जिज्ञासेचें समाधान होऊन परोक्षज्ञान व्हावें, उपासना-मार्गानें अंतःकरणांतील किल्मिषांचा नाश झाल्यावर ब्रह्मज्ञान-विज्ञान व्हावें, आणि साक्षात्कार व्हावा असा हा ज्ञान-विज्ञानाचा मार्ग आहे. शेवटीं जिज्ञासेच्या आधीं कांहीं गोष्टी कराव्या लागतात, त्याही सांगितल्या आहेत. तप, दम आणि वेदांमध्यें सांगितलेलें चित्तशोधक कर्म यांचें सतत अनुष्ठान एकनिष्ठेनें केलें तरच चित्तशुद्ध होण्याचा पुष्कळ संभव असतो; म्हणजे सर्व इंद्रियें आपल्या स्वाधीन ठेवणें; मनावर सत्ता स्थापन करणें आणि इंद्रिय-मनांच्या साहाय्यानें स्वोपकारी व परोपकारी कर्में एकनिष्ठेनें करणें, या साधनांची आवश्यकता उपासनेइतकीच जोराची आहे. श्रुतीनें तर या अंतर्बाह्य कर्मास उपासनेची प्रतिष्ठा असें म्हटलें आहे. हा ब्रह्मज्ञान-विज्ञानाचा मुख्य पाया आहे; याच्याशिवाय ब्रह्मज्ञान-विज्ञान व्हावयाचें नाहीं, आणि ब्रह्मज्ञान-विज्ञान झाल्याशिवाय आपल्यास अखंड शांतीही मिळावयाची नाहीं.

आजमितीला आपल्या येथें तपाचा अल्प तरी गंध आहे काय? कोणता तरी एक प्रश्न घेऊन, तो सोडविण्याचें कामीं भगीरथ प्रयत्न एकनिष्ठेनें करावयाचा, या प्रयत्नाला लागणारी शारीरिक व मानसिक सामग्री सिद्ध ठेवावयाची, असा प्रकार आपल्यास दिसतो काय? त्याचप्रमाणें मन आपल्या ताब्यांत ठेवावयाचें, याचा थोडासा तरी मासला आपल्यास कोठें दिसतो बरें! प्रबल सत्ता आपल्या संकल्पाच्या विरुद्ध असेल तर आपल्या मनांतील विचार आपण दाबून ठेवितों, अशी मात्र आपली कीर्ति आहे हें खरें; पण शुद्ध ज्ञानाच्या पाठीमागें लागून आपल्या भोगविषयक मनोवासना नियंत्रित करावयाच्या, हें आपल्या पूर्वकालीन पूर्वजांचें व्रत आपण जणूं कांहीं बहिष्कृतच केलें आहे! लोक-लज्जेनें किंवा राजदंडाच्या भयास्तव आपण नीतिमान् आहों, असें नाटक करून दाखवितों; परंतु स्वतःच्या मनोलज्जेनें किंवा स्वकृत दंडाच्या भयानें किंवा स्वपर-नीतीच्या प्रेमानें आपण नीतिमान् अथवा ज्ञानभक्त असत नाहीं, असा अवैदिक प्रकार प्रचलित झालेला दिसतो. वैदिक कर्मांचें तर नांवच नाहींसें झालें आहे. याप्रमाणें तप नाहीं, दम अदृश्य झाला, कर्मांचें नांव ऐकूं येत नाहीं अशी जेथें स्थिति आहे, तेथें ब्रह्मज्ञानाची प्राणप्रतिष्ठा निराबाध रीतीनें होत नाहीं यांत कांहीं आश्चर्य नाहीं. सारांश, श्रुतीचें सांगणें असें आहे कीं, ही तप, दम कर्मांची त्रयी स्थापित झाली तर ब्रह्मज्ञान-विज्ञान होतें, येरवीं होत नाहीं.

पुनः श्रुतीचें असें सांगणें आहे कीं, वेदवेदांगांचा श्रद्धापूर्वक निदिध्यास हें ब्रह्मविद्येचें मुख्य अंग आहे. वेदांमध्यें सर्व ऐहिक व पारमार्थिक ज्ञानाचा संग्रह झाला आहे, अशी पूर्वकाळीं समजूत होती व ' अनंता वै वेदाः (वेद हे अनंत आहेत, म्हणजे ज्ञान अनंत आहे, अनंत ज्ञानाचा जेथें संग्रह असतो तेच वेद होत) ' असें वैदिक लोक म्हणत होते व म्हणत असतात. याचें तात्पर्य मला इतकेंच दिसतें कीं, सर्व ऐहिक आणि पारमार्थिक निराबाध ज्ञानाचा, शास्त्राचा आणि तत्त्वांचा जेथें संग्रह केला असतो, त्या ग्रंथास वेद असें म्हणावयाचें. सारांश, विश्वज्ञान आणि स्वरूप ज्ञान हीं ब्रह्मविद्येचीं मुख्य अंगें आहेत. वर सांगितलेल्या कर्मांप्रमाणेंच अलीकडे आपण ज्ञानाची व आपली फारकत करून टाकली आहे. पूर्वी वेद पाठ करीत असत व हल्लीं आपल्यांतील कांहीं लोक इंग्रजी व मराठी ग्रंथ पाठ करितात, सारांश, आपण घोकंपट्टी चांगली करितों आणि तीही शरीर–पोषण व्हावयाचें असलें म्हणजे व जितकी अवश्य तितकीच करितों, असा आपला लौकिक आहे. ज्ञान किंवा ब्रह्मज्ञान प्राप्त व्हावें म्हणून आपण शिकत नाहीं, तर उदरपोषण व्हावें म्हणून शिकतों. अर्थात् आपलें घोकंपट्टीचें ज्ञान पोटासाठीं आणि पोटापुरतें मात्र असतें म्हणून आपलें पोटही पुरतेंसें भरत नाहीं; कारण आपलें ज्ञान वरिष्ठ प्रतीचें नसतें. कमी ज्ञानाला कमी प्रतीची कामे करावीं लागतात. आणि कमी योग्यतेच्या कामानें उत्पन्न झालेलें फलही कमी प्रतीचेंच असतें, हें सांगावयासच नको. नुसत्या व्यक्तीच्या उदरपोषणाची ही रडकथा तर कुटुंबपोषण व्हावें, समाज संघटना व्यवस्थेशीर असावी, इत्यादि वरिष्ठ हेतूप्रीत्यर्थ लागणाऱ्या ज्ञानाची व कर्माची काय हाल हवाल असेल हें विचारावयासच नको. अर्थात् ब्रह्मस्वरूप समजण्याला जें ज्ञान आपण अवश्य मिळवावयास पाहिजे तें आपल्याजवळ नाहीं. म्हणजे तत्त्वज्ञानाचें मुख्य अंग हल्लींच्या लोकांजवळ नाहीं असें मात्र झालें. श्रुति म्हणते कीं ब्रह्मज्ञान होण्याला वेदज्ञानाची अत्यंत अपेक्षा आहे.

सत्य हें ब्रह्मविद्येचें वसतिस्थान आहे. सत्यविचार, सत्यवाणी आणि सत्य आचार जेथें शुद्ध स्वरूपानें दिसतात व असतात तेथें ब्रह्मविद्येचेंच वास्तव्य असतें हें श्रुतीला सांगावयाचें आहे. सत्याच्या माहात्म्याविषयीं विवेचन करण्याचें कारणच नाहीं. ' सत्यापरता नाहीं धर्म । सत्य तेंची परब्रह्म । सत्यापाशीं पुरुषोत्तम । अखंड वास्तव्य करितसे ॥ ' अशा अर्थाचें एक महा साधूचें वाक्य आहे, याचा उल्लेख मात्र केला म्हणजे पुरे.

याप्रमाणें चित्तशुद्धि हीं ब्रह्मविद्येची प्रतिष्ठा, वेद हीं तिचीं अंगें अथवा घटकावय आणि सत्य हें तिचें वास्तव्य स्थान होय. या तीन्हींचा अधिगम झाल्या शिवाय ब्रह्मज्ञान–विज्ञानाला स्वैर्य यावयाचें नाहीं. हीं तीन असतील तरच ब्रह्मज्ञान–विज्ञान होईल हें सांगण्याकडे श्रुतीचा कटाक्ष आहे.

असो; ज्याला ब्रह्माचें स्वरूप समजलें त्याचीं सर्व पापें व दुःखें विध्वस्त होऊन हा परब्रह्म पुरुष सर्वश्रेष्ठ अशा सुखरूपी अथवा सच्चिदानंदरूप स्वर्गामध्यें अखंड वास्तव्य करितो, अशी या ज्ञानाची फलश्रुति सांगितली आहे.

वाचकहो ! आपल्याला हिंदुस्थानांत जन्म प्राप्त झाला हें आपलें महद्-भाग्य आहे. आपले पूर्व पूर्वज महापुरुष होते. त्यांच्या वंशांत आपल्याला जन्म प्राप्त झाला आहे. आपली परंपरा श्रेष्ठ योग्यतेची आहे. कोणासही प्राप्त झालें नाहीं असें ज्ञानविज्ञानाचें भांडार आपल्याला सहज सौभाग्यानें प्राप्त झालें आहे. आपली मनोवृत्ति केव्हांही व कोणत्याही दारुण प्रसंगीं उच्छृंखल होत नाहीं, आपण फारसे उन्मत्त केव्हांहा होत नाहीं, जीवकर्तृत्वाचा फारसा अभिमान कधींहीं आपल्यास नसतो. अखंड सुख आपल्यास मिळावें अशी आपली इच्छा असते. या प्रकारची आपली मनोघटना आहे. आपल्या देशाची आधिभौतिक संपत्ति सर्वांगसुंदर आणि सर्वोपकारक अशा प्रकारची आहे, हें सर्व कृपा करून आपण विसरूं नका. जेव्हां जेव्हां आपल्या येथें ज्ञानाचा, धर्माचा व श्रेष्ठ प्रतीच्या कर्माचा लोप होण्याचा प्रसंग आला, तेव्हां तेव्हां जगन्नियत्या दयाळू परमेश्वरानें आपल्या येथें वेळोवेळीं अवतार घेऊन, ज्ञानधर्मकर्मांची पुनः पुनः योग्य आणि प्रसंगास अनुरूप अशी प्रतिष्ठापना केली आहे, याचें स्मरण असूंद्या आणि ज्या परमेश्वरानें आमचें कल्याण करण्याचें व्रत स्वीकृत केलें आहे, ज्या आपल्या महापूर्वजांना आपल्यासाठीं आणि सर्व मनुज-जातीसाठीं परम कल्याण करणारें ज्ञान-भांडार आपल्याला दिलें आहे, त्या सच्चिदानंदघन परमेश्वराचें आणि त्या त्या महाश्रेष्ठ साधुपुरुषाचें कृतज्ञतेनें आपण अखंड चिंतन केलें पाहिजे. ह्या सत्पुरुषांनीं जें ज्ञान आपल्यासाठीं सांठवून ठेविलें आहे, तें संपादून वाढवावयाचें आणि त्यांनीं ज्या मनोवृत्तीनें सत्कर्म करणें विहित केलें आहे, त्या शुद्ध मनोवृत्ति संस्कृत करून, निष्काम व निरभिमानी परोपकारी कर्मांचा संचय करणें हींच आपल्या कृतज्ञतेची खरी साक्ष होय. खरी कृतज्ञता जागृत झाली म्हणजे परमेश्वरी अनुग्रह होऊन, आपल्या स्वकार्यांची सिद्धि होईल. आपल्यास फार मोठें कर्तव्य करावयाचे आहे; पहा कीं आपला, आपल्या राष्ट्राचा आणि आपल्या या सर्व जगताचा उद्धार करण्याचें श्रेष्ठ काम परमेश्वरीकृपेनें आपल्याकडे आलें आहे हें ध्यानांत ठेवावयाचें आहे. आपला अधिकार फार मोठा आहे. या अधिकारानुसार आपलें ज्ञान आपण वाढवून वर्णाश्रमधर्मानुसार जीं जीं कर्तव्यें प्राप्त होतात, तीं तीं यथासांग सिद्धीस नेणें हें आपलें मुख्य कर्तव्य आहे. अधिकाराबरोबरच कर्तव्याची जबाबदारी प्रत्येकाच्या जीवावर असते. ह्या

जबाबदारींतून पार पडणें म्हणजे मोक्ष मार्गानें जाणें होय. असो; हा वेदमार्ग आहे. आणि माझी अशी समजूत आहे कीं, या मार्गानें मात्र आपलें उत्तम कल्याण होणार आहे. परमेश्वर करो आणि आम्हांस व आमच्या पुढील पिढ्यांस आमचीं अवश्य कर्तव्यें करण्याचें आणि अवश्य ज्ञातव्य समजून घेण्याचें सामर्थ्य येवो! हें सामर्थ्य येऊन पूर्व सामग्री सिद्ध झाली म्हणजे ज्ञान-धर्म-नीति-संरक्षक परमेश्वराचा अवतार होऊन सर्वांचेंच परमकल्याण होईल!

॥ ॐ शान्तिः शान्तिः शान्तिः ॥

ॐतत्सत्.

केनोपनिषत् संपलें.

* शब्दांचें सूचीपत्र.

अ.

अग्नि १६
अग्नि १७, २७
अतितरां २७, २८
अतिमुच्य २
अथ ९, १३, २०, २४, ३०
अथो ३
अधि ३
अधिदैवतं २९
अध्यात्मं ३
अनन्ते ३४
अनभ्युदितं ४
अनेन ३०
अनु ३
अन्यत् ३
अन्यान् २७, २८
अपहत्य ३४
अपि १८, २२
अब्रवीत् १७, २१
अब्रूम ३२
अब्रुवन् १६, २०, २४
अभि ३१
अभीक्ष्णं ३०
अभ्यद्रवत् १७, २१, २४
अभ्यवदत् १७, २१
अभ्युद्यते ४
अमतं ११
अमहीयन्त १४
अमृतं १२
अमृतत्वं १२
अमृताः २, ११
अयं १४
अविजानतां ११
अविदितात् ३, ३३
अविज्ञातं ११
अवेदीत् १३
अशकं १९, २३
असि १७, २१
अस्माकं १४
अस्मात् २, १३
अस्मि १७, २१
अस्य ९
अयं १४
अहं १०, १७, २१

आ.

आ २९
आकाशे २५
आजगाम २५
आत्मना १२
आदत्स्व २३
आददीय २२
आदातुं २३
आदेशः २९
आयतनं ३३
आहुः ५

* सूचींतील शब्दांपुढें जे अंक मांडले आहेत, ते मंत्रांचे क्रमांक आहेत, असें समजावें.

इ.

इत् १९
इति ३, ९, १०, १४, १५, १६, १७, १८, १९, २०, २१, २२, २३, २४, २५, २६, २७, २८, २९, ३१, ३२, ३३.
इदं ४, ५, ६, ७, ८, १५, १८, २२
इंद्रं २४
इंद्रः २७, २८
इमां १
इव २७, २८, ३०
इषिता १
इषितं १
इह १३

उ.

उ १, २
उक्ता ३२
उपनिषत् ३२
उपनिषदं ३२
उपस्मरति ३०
उपप्रेयाय १९, २३
उपासते ४, ५, ६, ७, ८
उपासितव्यं ३१
उमां २५
उवाच २५, २६

ए.

एतत् १६, १९, २०, २३, २४, २५, २६, २९, ३०, ३१
एतद् १६
एतां ३४
एते २७
एनत् २७, २८
एनं ३१
एव ३, ४, ५, ६, ७, ८, ९, १४, १९, २३, २५
एवं ३१, ३४
एषां १५
एषः २९
ऐक्षन्त १४

क.

कर्म ३३
किं १५, १६, १८, २०, २२, २४, २५
केन १
कः १, १७, २१

ग.

गच्छति ३, ३०

च.

च १०, ३०
चक्षुः १, २, ३
चक्षुषा ६
चक्षुषः २
चक्षूषि ६
चेत् १३

ज.

जातवेद १६
जातवेदाः १७
ज्येये ३४

त.

तत् ३, ४, ५, ६, ७, ८, १०, १५, १७, १९, २०, २३, २४, ३१
ततः १९, २३, २६

तत्र ३
तद् ३
तथा १६, २४
तपः ३३
तद्वनं ३१
तस्मात् २४, २७, २८,
तस्मिन् १८, २२, २५
तस्म १९, २३
तस्य ११, १४, २९
तस्यै ३३
तां २५
तिरोदधे २४
ते ९, १४, १६, २७, ३२
तेभ्यः १५
तृणं १९, २३
तं १७, २१
त्वं ४, ५, ६, ७, ८, ९,
त्वयि १८, २२

द.

दभ्र ९
दमः ३३
दह १९
दहेयं १८
देवान् २७, २८
देवः १
देवाः १४, २७
देवभ्यः १४
देवेषु ९

ध.

धीराः २, १३

न.

न ३, ४, ५, ६, ७, ८, १०, ११, १३, १५, १९, २३
नाम ३१
निदधौ १९, २३
निवर्तते १९, २३
नु ९
नूनं ९
नेदिष्ठं २७, २८
नौ ३, १०
नः ३, १०
न्यमीमिषत् २९

प.

पतति १
पश्यति ६
पस्पर्श २८
पस्पर्शुः २७
पाप्मानं ३४
पूर्वेषां ३
प्रणायते ८
प्रतितिष्ठति ३४
प्रतिबोधविदितं १२
प्रतिष्ठा ३३
प्रथमः १, २७, २८
प्राणस्य २
प्राणिति ८
प्राणन ८
प्राणः १, २, ८
प्रादुर्बभूव १५
प्रेत्य २, १३
प्रेषितं १
प्रैति १
पृथिव्यां १८, २२

ब.

बहुशोभमानां २५
ब्रह्म ४,५, ६, ७, ८, १४, २६, २७, २८

ब्रह्मणः ९,१४,२६,२७,
ब्राह्मी ३२
ब्रूहि ३२

भ.

भवन्ति २,१३
भूतानि ३१
भूतेषु १३
भोः ३२

म.

मतम् ५, ११, १२
मघवन् २४
मनसा ५
मनसः २
मनुते ५
मनः १, २, ३, ५, ३०
मन्यसे ९,
मन्ये ९, १०
महती १३
महिमा १४
महीयध्वं २६
मातरिश्वा २१
मीमांस्यं ९

य.

यत् २, ४, ५, ६, ७, ८, ९,
१८, २२, २३, २७, २९
३०
यथा ३
यदि ९
यस्य ११
यक्षं १५, १६, १९, २०,
२३, २४, २५
युक्तः १
युनक्ति १
ये ३
येन ४, ५, ६, ७, ८, १९
यः १०, ३१, ३४

र.

रूपं ९

ल.

लोकात् २, १३
लोके ३४

व.

वदन्ति १
वाक् ३, ४
वाचो ४
वाचं १, २
वाचः २
वाव ३२
वायुं २१
वायो २०
वायुः २१, २७
विचित्य १३
विजज्ञौ १५
विजये १४, २६
विजयः १४
विजानतां २१
विजानीमः ३
विजानीः १६, २०, २४
विजिग्ये १४
विदाञ्चकार २६, २७, २८
विदितात् ३
विदितं ९
विद्धि ४, ५, ६, ७, ८
विद्मः ३
विद्यया १२
विद्युतः २९
विन्दते १२
विनीष्टः १३

विज्ञातं ११
विज्ञातुं १९, २३
वीर्यं १२, १८, २२
वेत्थ ९
वेद १०, ११, ३१, ३४
वेदाः ३३
वै १७, २१, २६, २७, २८, ३४
व्यजानन्त १५
व्यद्युतत् २९
व्याचचक्षिरे ४

श.

शशाक १९
शिष्यात् ३
शृणोति ७
श्रुतं ७
श्रात्रस्य २
श्रात्रण ७
श्रोत्र १, २, ७

स.

सत्यं १३, ३३
सर्वे १८ २२,
सर्वांच्छन्ति ३१
सर्वजवेन १९, २३
सर्वाणि ३१
सर्वांगानि ३३
सा २६
सुवेद ९, १०
शुश्रम ३
सः २, ११, १९, २३, २५, २८, ३१
संकल्पः ३०
स्त्रियं २५
स्वर्गे ३४

ह.

ह २, १४, १५, २५, २६, ३१
हि १२, २७, २८
हैमवतीं २५

